## प्रकरण पहिले

# आद्य कुटुंब

या संशोधनाकरिता ( १ ) त्र्यंबकेश्वर, नाशिक, तुळजापूर व घृष्णेश्वर येथील तीर्थोपाध्यायांच्या संग्रहीच्या नामावल्या ( २ ) पेशवे दप्तरातील रुमाल ( ३ ) प्रसिद्ध झालेले ऐतिहासिक साहित्य ( ४ ) काही ओक मंडळींनी पुरविलेल्या वंशावळी व जुने कागदपत्र व ( ५ ) प्रसिद्ध झालेले कुलवृत्तांत यांचा उपयोग केला आहे. सन १९७० च्या ऑक्टोबर–नव्हेंबरपासून काम चालू केले. बरीच माहिती मिळाली पण ती पूर्ण नाही. अजून पुष्कळ माहिती वरील साधनांद्वारा मिळू शकेल असा भरंवसा आहे.

**ओक कुल :**

मूळ आडनाव ओक असलेली काही घराणी कालांतराने सिद्रस, महाजन, दीक्षित, फडनीस, देशमुख ही उप-आडनावे लावू लागली. ओंकार यांनी ओक आडनाव टाकून ओंकार आडनाव सुरू केले. ही सर्व मंडळी वासिष्ठ गोत्री तैत्तिरीय शाखेची हिरण्यकेशी आहेत. जुन्या कागदपत्रांत वोक, वोंकार असे नाव लिहिलेले आढळते, एवढेच नव्हे. तर स्वदस्तुरची सही वोक केलेली आढळते. बळवंतराव कृष्ण वोक जहागिरदार मौजे पिंपळगाव भावक यांनी अहमदनगर कलेक्टरला इ. स. १८२९ मधे दिलेल्या पावती-वरची सही वोक अशी आहे. तर त्यांचीच १८४८ च्या जबाबावर ओक म्हणून सही आहे. तीर्थोपाध्यायांकडील वह्यात ॐक असे लिहिलेले आढळते तर सन १८३५ मधील एका जबाबावर 'आत्मारामभट बिन बाळंभट ॐक वस्ती नाशिक' अशी स्वदस्तुरची बाळबोधीत सही आहे. सन १५९४ व १५९५ मधील फारसी भाषेतील दोन फर्माने आहेत त्यांत ओक असे नाव आहे म्हणून मूळ आडनाव ओक हेच खरे.

**सर्वांत जुने कागद :**

सर्वांत जुने कागद मिळाले ते म्हणजे फारसी भाषेतील दोन समकालीन फर्माने आहेत. एक फर्मान पालशेतचे श्री. बापूराव महाजन यांनी आपल्या संग्रहीचे दिले ते

( लेखांक १ ) सन १५९५ चे असून त्यात महादू गणेश ओक महाजन मौजे पालशेत मामले मुस्तफाबाद याला दहिजा कदीम पासून चालत आहे त्याबद्दल फर्मान आहे. यावरून ओकांकडे पालशेतची महाजनकी सन १५९५ च्या बरीच आधीपासून होती व सन १५९५ मधे महादू गणेश ओक हे महाजन होते.

दुसरे फर्मान पेशवे दप्तरातील कागदात मिळाले ते सन १५९४ चे असून बालाजी ओक देसाई मामले हमजाबाद याना छत्र व पालखीसाठी मळण व वेळंब हे दोन गाव इनाम आहेत; पण ते पुरे पडत नाहीत म्हणून मौजे करदे हा गाव आणखी इनाम दिल्याबद्दल ते फर्मान आहे ( लेखांक २ ) म्हणजे सन १५९४ पूर्वीपासून ओक हमजाबादेचे देसाई म्ह. देशमूख होते व सन १५९४ मध्ये बालाजी ओक देशमुखी करीत होता. सन १५९४ पूर्वीचा ओकांचा इतिहास बाळाजी नारायण वोक पालशेतकर पांगारकर खोत देशमुख यांच्या सन १७४४ च्या जबानीत रेखाटला आहे ( लेखांक ३ ) त्यातील महत्त्वाचा भाग पुढीलप्रमाणे : " पालशेत गाव बहुतकाल जुनट. रामराजा कानडाजवळ आपले वडील होते. तेव्हा कर्नाटक सही केला. त्यावेळेस पालशेत गाव इनाम दिला. इनाम पुष्कळ दिवस चालल्यावर राजा तुरुक झाला. ओक परागंदा झाले. काही दिवसांनी परत पालशेत गावी ब्रह्मवणेयात आले. ओक गलबते वाहून किराणामाल आणून सावकारी करीत. पुढे तुरुकाणांचे आंती दिल्लीहून विजापूर येथे पादशाही सुभा आला. कोकणांत मोवास बहुत जाहले. लुटतात. तेव्हा चव्हाण सरदरा व हरबा ओक दिवाण यानी मोवास मोडून पाच्छाई अंमल बसविला तेव्हा देशमुखी मिळाली. "

या जबाबाचा अन्वयार्थ लावून व इतर ऐतिहासिक घटनांचे आधारे ओकांच्या इतिहासाची संगत कशी लागते ते पुढे प्रकरण दोन मधे दिले आहे. त्यावरून ओक हे रामराजा कानडाजवळ म्हणजे विजयनगरच्या हरिहर या राजाकडे कानडी मुलुखात होते व त्यांचेकडून पालशेत गाव सन १३५० चे सुमारास इनाम मिळाला व सोळाव्या शतकाच्या आरंभी त्यांना विजापूर पातशहाकडून देशमुखी मिळाली असा अंदाज काढला आहे.

पेशव्यांच्या एका सनदेत " राजश्री बाळाजी महादेव उपनाम वोक, गोत्र वासिष्ठ, शाखा तैत्तेरिय, सूत्र हिरण्यकेशी आपस्तंभ " असा मायना आहे ( ले. १०४ व १०५ ) हिरण्यकेशी व आपस्तंभ अशा दोन सूत्रांचा उल्लेख आहे. ' चित्पावन ' या ग्रंथात श्री. नानासाहेब चापेकर लिहितात : " चित्पावनांतील काही लोक तैत्तिरीय वेदाध्ययन करणारे आहेत; आणि त्यांत आपस्तंबी, बोधायनी, सत्याषाढी आणि हिरण्यकेशी व श्रोधेयी अशा पाच शाखा आहेत, आंध्र देशात आपस्तंब, कृष्णातीरी सत्याषाढी, माल्य पर्वत देशांत श्रौधेयी, व परशुराम क्षेत्री हिरण्यकेशी याप्रमाणे शाखा चालत असल्याचे चरणव्युहावरून दिसते. " ओकांच्या गोत्र उच्चारात आंध्रप्रदेशातील आपस्तंब व परशुराम क्षेत्रातील हिरण्यकेशी दोन्ही शाखांचा उल्लेख करितात यावरून ओकांचा

कानडी मुलुखाशी संबंध होता हे दिसून येते. ओकांच्या संध्येतील अभिवादनात " वासिष्ठेन्द्र प्रमदाभरद्वस्वेति त्रिप्रवरान्वित वासिष्ठ गोत्रोत्पन्नोऽहं यजुर्वेदस्य तैत्तिरीय शाखान्तर्गत हिरण्यकेशी शाखाध्यायी....शर्माऽहं भो गुरो अभिवादयामि " असा स्वतःचा उल्लेख करितात व स्वतःस आपस्तंब म्हणवितात.

## प्रकरण दुसरे

# विजयनगरचा रामराजा कानडा

**पालशेत :**

वरील त्या जबाबात " पालशेत गाव बहुत काल जुनट " असा उल्लेख आरंभालाच आहे. किती जुना याचा निश्चित अंदाज या चार शब्दांवरून होत नाही. पण त्याच्या पंचक्रोशीतील समुद्रकाठाजवळचे नरवण हे हल्लीचे गाव शके ६६४ मध्ये ( म्ह. सन ७४२ मध्ये ) होते असे भारत इतिहास संशोधक मंडळाच्या त्रैमासिक वर्ष १० च्या पहिल्या अंकात पान १६ वर वर्णिलेल्या ताम्रपटावरून दिसते. हर्णैजवळील मुरूड गाव सन ११०० चे सुमारास वसविला व त्याच वेळी गुहागर गावची नवीन रचना केली असे स्कंदपुराणातील सह्याद्रि खंडातील इषुयात रामक्षेत्र वर्णन ऊर्फ गुहागर-माहात्म्य या हस्तलिखित पोथीतील उताऱ्यावरून ( भाइसंमं-अचवल संग्रह ) दिसते. पालशेत गाव समुद्रकिनाऱ्याजवळ आहे व तो सन ११०० मध्ये अगर तत्पूर्वी असावा असा अंदाज करण्यास हरकत नाही. अकराव्या शतकात दक्षिण कोकण बहुतेक जंगल होते असे मुंबई गॅझेटिअरमधील कोकणच्या इतिहासात दिले आहे. म्हणजे पिकाखाली येण्यासारख्या जमिनी फारशा उपलब्ध नव्हत्या.

**कर्नाटकशी संबंध :**

नरवण गाव जुन्या काळी दुर्गनाम स्वामी, टोणस्वामी पुत्र नागडी दीक्षित, नारायण नन्न स्वामी इत्यादींना इनाम दिल्याचा उल्लेख लेखांक ४ मधील ताम्रपटात आहे. ही मंडळी त्यांच्या नावावरून कानडी किंवा तेलंगण मुलुखातील वाटतात. लेखांक ३ मधील जबाबात, " त्यावळीस रामराजा कानडा त्याजवळ आपले वडील होते " असे आहे. म्हणजे रामराजाचे काळात या ओकांचे पूर्वज कानडी मुलखात होते व त्यावेळी पालशेत गाव इनाम मिळाला, सन १३०० चे आधीपासून चित्पावन घराणी दक्षिणेतील हदूं राजाकडे होती. श्री. बी. व्ही गोखले यांच्या ' दक्षिण कानडातील चित्पावन ब्राह्मण '

यातील उतारा जोग कुलवृत्तांत ऐतिहासिक पान ३४६ वर दिला आहे तो " म्हैसूरच्या होयसळ राजघराण्यातील पहिल्या नरसिंह राजाने ( स. ११४३ ते ११७२ ) चित्पावन ब्राह्मणांना राज्यकारभाराकरिता आणविले " तसेच छत्रे कुलवृत्तांतात पान २० वर " छत्रे मूळचे देवगिरीच्या यादवांकडील " असे आहे. त्याचप्रमाणे खरे कुलवृत्तांतात पान ५२९ वर " काही घराणी कोकणातून विजयनगरच्या राजाच्या पदरी देवीच्या अनुष्ठानास गेली. विजयनगरचे साम्राज्य बुडाल्यावर ही मंडळी आनेगुंदी संस्थानात आली " असा उल्लेख आहे. कानडी राजाच्या आश्रयास असणे हा रिवाजच होता असे दिसते. पानसे हे मूळचे कर्नाटकातील असे त्यांच्या घराण्याच्या इतिहासात आले आहे. ओकही १२ व्या १३ व्या शतकात तिकडे असणे साहजिकच वाटते. ज्या रामराजा कानडाजवळ ओकांचे वाडवडील होते व ज्या रामराजाने कर्नाटक सही केला ( लेखांक ३ ) तो रामराजा कोण याचा निर्णय होण्यावर कालनिर्णय अवलंबून आहे.

**रामराजा कानडा :**

लेखांक ३ मधील जबाब काही शतकांनंतर दिला गेला असल्यामुळे रामराजा कानडा याचा अर्थ कोणीतरी कानडी राजा असा घ्यावा असे इतिहासतज्ज्ञ श्री ग. ह. खरे यांनी मत दिले. मात्र विजयनगरच्या रामराजाचा संबंध शके १४५६ पूर्वी कोणत्याही घटनेशी आणणे हे श्री. खरे चूक समजतात असे त्यांच्या " श्री विट्ठल व पंढरपूर " पुस्तकातील पान २७ वरून वाटते. तरीही पण रामराजा कानडा म्हणजे कोणीतरी कानडी राजा या मताच्या समर्थनार्थ आधार मिळाले. रामराजा कानडा हे नामाभिधान विजयनगरच्या राजाबाबत निरनिराळ्या कालावधीत वापरलेले पुढील-प्रमाणे आढळते. सरदेसाई कुलवृत्तांताच्या १९६१ च्या आवृत्तीत ऐतिहासिक कागद-पत्र या प्रकरणात घराण्याची बखर या शीर्षकाखाली पान ५ व पान ६१ वर " रंगोबा नायकाचा ज्येष्ठ पुत्र सोमाजी याने विद्यानगरात जाऊन सातशतगावची देशमुखीची पत्रे घेतली. अंमल बसावा तंव रामराजा कानडा साहय नाही तंव बिदरची पातशाही याची चढाई झाली. वर घांटे व तळकोकणात सर्व सत्ता बिदरची जाहली. काळा खोजा व गोरा खोजा कोकणात संचणी करण्यास आले " असे आहे. हा रामराजाचा उल्लेख सन १४३० च्या सुमाराचा असला पाहिजे. कारण बहमनी राज्याची राजधानी गुलबर्ग्याहून बीदरला सन १४२५ चे सुमारास आली असे हैद्राबादचे श्री शेरवानी यांच्या म. म. द. वा. पोतदार Comemoration volume मधील लेखात देतात तर सन १४३२ त बिदर हे बहमनी राज्याचे मुख्य ठिकाण झाले असे महोदयाचा पूर्वरंग पुस्तकात दिले आहे. बिदरला पातशाही येण्यापूर्वी रामराजा कानडा होता म्हणजे सन १४२५ पूर्वीच्या राजाला रामराजा कानडा म्हटले आहे. बिदरच्या सत्तेनंतर काळाखोजा व गोरा खोजा कोकणात आले असे त्या उताऱ्यात आहे. सरदेसाई कुलवृत्तांत पृ. ६१ वर मलिकुत्तुज्जार हा गोरा खोजा व ब्राह्मण अंमलदार हा काळा खोजा असे स्पष्टीकरण आहे. मलिकुत्तुज्जार याचा काळ सन १४२९ च्या आसपासचा असा महाराष्ट्र गॅझेटिअर, रत्नागिरी

जिल्हा पृ. १३० वर दिला आहे. महाराष्ट्र महोदयाचा पूर्वरंग यात तो १४५३ दिला आहे. सेवेलच्या ए ' फरगॉटन एम्पायर ' या ग्रंथात पृ. १०३ वर महमूद गावानला सन १४५७ मध्ये मलिकुत्तुज्जार हा किताब मिळाला होता व बहमनी बादशहाचा ख्वाजा महमूद गावान यानी दाभोळ व चौल लगत स्वारी केली म्हणजे कोकणात बहमनी राजाची म्हणजे बिदरच्या पातशाईची चढाई झाली. यावरूनही रामराजा कानडा हा उल्लेख सन १४३० किंवा सन १४५३ याच्या काही काल पूर्वीच्या राजाचा केलेला आहे. म्हणजे विजयनगर स्मारक ग्रंथातील ' मराठीत विजयनगर ' या लेखात म. म. द. वा. पोतदार ' सरदेसाई कुलवृत्तांतात उल्लेख केलेला रामराजा म्हणजे विजयनगरच्या अस्ताच्या वेळचा ( सन १५२९ ते सन १५६५ ) असावा ' असे सूचित करतात पण तसे नसावे हे दाखविण्याकरिता वरील ऊहापोह केला व त्यावेळच्या राम-राजाखेरीज अगोदरच्या विजयनगरच्या राजाचा उल्लेख रामराजा म्हणून केलेला आहे. रामराजाबद्दल आणखीही निरनिराळया काळचे उल्लेख अन्य ठिकाणीही आहेत. ' विजापूरची आदिलशाही–फारशी ग्रंथांचे मराठी भाषांतर ' न. वि. पारसनीसकृत व वा. सी. बेंद्रे यानी संपादन केलेल्या ग्रंथात पृ. ४९ वर " रामराजा संपत्तीवान सन १४३६–३७ साली विजयनगरचे तख्तावर बसला. २८ वर्षे राज्य केले. त्यांनी यवनांना आश्रय दिला. त्या मुसलमानास तुर्क असे नाव ठेविले " असा उल्लेख आहे. म. म. चित्रावशास्त्री यांच्या चरित्रकोशात विजयनगरच्या राजघराण्यापैकी औक घराणे दिले आहे. त्यात एक रामराजा सन १४८१–१५०८ या काळातला दिला आहे. विजय-नगरच्या राज्याला कन्नड देश म्हणत असत ( Further Sources of Vijayanagar History, vol. I p. 87). आवळसकरांच्या इतिहासाची साधने ले. ४४, चौल अधिकारी यांचे दप्तरातील कागदाचा उतारा व ले. ६६ चित्रे पोलादपूर यांचे संग्रहातील कागदाचा उतारा ( ले. ४ व ५ ) वाचता अनागोंदीच्या राजांचा उल्लेख म्हणजेच विजयनगरच्या राजाचा उल्लेख रामराजा कानडा असा उल्लेख करीत असत हे स्पष्ट आहे. या सर्व उल्लेखांवरून लेखांक ३ मध्ये उल्लेख केलेला रामराजा कानडा म्हणजे कोणीतरी विजयनगरचा राजा एवढाच बोध होतो. पण लेखांक ३ मधील अन्य घटनांचा कालनिर्णय होत नाही म्हणून त्या राजांपैकी कर्नाटक कोणी सही केला हे पाहिले पाहिजे.

**कर्नाटक सही केला :**

सन १३०७ चे सुमारास अल्लाउद्दीन खिलजी याची दृष्टी दक्षिणेतील मुलुखाकडे वळली तेव्हापासून कर्नाटक सही (मुक्त) करण्याचे प्रसंग बरेच आले. कानडी साम्राज्य या नावाने विजयनगरला ओळखले जाते, म्हणून त्यापैकी कोणा विजयनगरच्या राजा-बद्दल हा उल्लेख आहे हे ठरविले पाहिजे. राक्षसतंगडीच्या वेळच्या रामराजाने कर्नाटक सही केला असे नाही. त्याच्या अगोदरच्या कृष्णदेवरायानी इ. स. १५१०–११ साली रायचूर, कलबर्गे, बीदर व कृष्णा-गोदावरी नद्यांमधील मुलूख हस्तगत केला. ( श्री. ग. ह. खरे " विजयनगरचा सम्राट कृष्णदेवराय व विजयानगर स्मारक ग्रंथ ) हा मुलूख

म्हणजे कर्नाटक. कृष्णदेवरायाने त्या मुलुखाला सुरक्षितता आणून दिली. हा कृष्ण-देवराय म्हणजे रामराजा कानडा असे मानले तर कर्नाटक सही केल्यानंतर पालशेत गाव इनाम मिळाला व बहुत दिवस इनाम चालल्यानंतर राजा तुरुक जाहला व त्यापुढे काही वर्षांनी तुरकाणांचे अंती दिल्लीहून विजापूर येथे बादशाही सुभा आला या लेखांक ३ मधील घटनांची संगती लागत नाही; म्हणून कृष्णदेवरायापूर्वी कर्नाटक कधी सही केला ते पाहिले पाहिजे.

## इनाम मिळविण्याचा काळ :

कर्नाटक सही करण्याची पहिली घटना सन १३३६ चे सुमारास झाली. त्या-बद्दलचा इतिहास 'Further Sources of Vijayanagar History' by prof. N. A. 'Neelkanth Shastri and N. Venkatramanayya, University of Madras--1946 publication, या ग्रंथाच्या पहिल्या खंडात विस्तृत दिला आहे. महाराष्ट्र महोदयाचा पूर्वरंग या ग्रंथात पृष्ठे ४० ते ५० येथे तशाच प्रकारचा इतिहास आहे. तो इतिहास असा : हम्पी म्ह. विजयनगरच्या पूर्वेस अडीच मैलांवर तुंगभद्रेच्या काठी कम्पिला गावी ( म्ह. अनागोंदी–महाराष्ट्र, महोदय ) कम्पिलदेवांनी सन १३०७ मध्ये राज्य स्थापिले. त्या राज्यात बेल्लरी, चितळदुर्ग, रायचूर, धारवाड या जिल्ह्यांचा म्हणजे कर्नाटकचा समावेश होत होता. इ. स. १३२६ ( शके १२७६–पा. ४२ महाराष्ट्र महोदय ) मधे दिल्लीचा सुलतान मुहम्मद तुघ्लुक याने कम्पिलदेवाची हत्या करून त्या राज्याचा सर्व प्रदेश आपल्या आधिपत्याखाली आणला. म्हणजे कर्नाटक मुसलमानांच्या ताब्यात प्रथम सन १३२६ चे सुमारास गेला. श्री. बाळाजी प्रभाकर मोडक यांच्या कोलापूर व कर्नाटक प्रांतातील राज्ये व संस्थाने यांचा इतिहास यातही पा. १८४ वर "महमद तघलघ दिल्लीच्या गादीवर बसला त्यावेळी ज्यास हल्ली महाराष्ट्र व कर्नाटक म्हणतात तो बहुतेक सर्व प्रदेश मुसलमानांच्या ताब्यात होता" असा पाठपुरावा आहे. इ. स. १३३० चे सुमारास त्या प्रांतात बरीच बंडे होऊ लागली. त्यावेळी हरिहर व बुक्क हे दोघे हुशार पाहून मुहम्मद तुघ्लुघानी त्यांना आपल्या पदरी ठेविले होते. प्रथम त्यांना कैदी म्हणून धरून नेले व मुसलमान केले असा उल्लेख आहे. या दोघांना ही बंडे मोडण्याकरिता पाठविले. त्यांनी तो प्रदेश आपल्या ताब्यात घेऊन मुहम्मद तुघ्लुकाची म्हणजे मुसलमानांची सत्ता धुडकावून लावली. व इ. स. १३३६ ते १३४९ पर्यंत ( शके १२६२ इति महोदयाचा पूर्वरंग ) कन्नड प्रांत आपल्या अंमलाखाली आणला. सन १३४९ त सर्व कन्नड प्रांत सही केला व विजयनगरच्या राज्याचे बी पेरले गेले. प्रो. नीळकंठ शास्त्री व वेंकटरमणय्या यांच्या वर उल्लेखिलेल्या ग्रंथाच्या पहिल्या खंडाच्या पृ. ८३ वरील मजकुरावरून बहमनी राजाकडून सन १३७५ चे सुमारास गोवा, खारेपाटण, चौल आणि दाभोळ हा प्रदेश विजयनगर राजानी हिसकावून घेतला असे कळते. सन १३४७ चे सुमारास कोकणातील राजे विजयनगरचे आश्रित होते असे रा. मा. फडके यांच्या रत्नागिरी जिल्ह्याचा राजकीय इतिहास या

पुस्तकात आहे. श्री. ठब्बू यांनी आपल्या ‘ कुलाबकर आंग्रे ’ या पुस्तकात पृ. २६ वर कान्होजी आंग्रे याचे कुळासंबंधी व कर्तबगारीसंबंधी एक कोकणी भाषेतील उतारा दिला आहे, त्यांत आंग्रे यांचे “ मुदलचे कुळनाव संगपाळ. हे घराणे चौदाव्या शेकडयात विजयनगरच्या पैल्या बुक्करायाच्या वेळार जायते गाजताले. १३६६ त माधव मंत्री जेन्ना कोकण घेवंक आयलो तेन्ना संकपाळान ताका जायते आडमेळे हाडले. परंत निमाणे ताका हार जाली ” यावरून कोकणातही सन १३५० ते १३७५ मधे विजयनगरचा अंमल होता. विजयनगर स्मारक ग्रंथातील श्री. रामशर्मा यांच्या ‘ विजयनगर साम्राज्याचा इतिहास ’ या लेखात सन १३४० ते १३४३ च्या दरम्यान हरिहर व त्याचा भाऊ बुक्क यांनी मिळून तुंगभद्रेच्या उत्तरेचा व दक्षिणेचा मुलूख हस्तगत केला अशी माहिती आहे. म्हैसूर गॅझेटिअरच्या बल्लारी जिल्हयाच्या वर्णनात हरिहरांनी सन १३३६ मधे कर्नाटक ताब्यात घेतला असे आहे. वर उल्लेखिलेल्या प्रो. नीलकंठ शास्त्री व वेंकटरमणय्या यांच्या ग्रंथात पृ. ७४ वर हरिहर याच्या कारभाराचे धोरण दिले आहे त्यात जंगल तोडून शेतीची जमीन संपादन करण्याकरिता त्यांनी अतिशय प्रयत्न केले व गावाच्या वसाहतीकरता व लागवडीकरिता जंगल तोडणारांना त्यांनी अभयपत्र दिले व शेतजमिनीची वाढ करणाऱ्यांना त्यांनी वंशपरंपरागत जमिनी दिल्याचा व गावाच्या कारभाराकरिता आयगार ( आयगार म्हणजे बाराबलुते असा अर्थ त्याच ग्रंथाच्या तिसऱ्या खंडात पृ. ३११ वर दिला आहे ) नेमिले असा उल्लेख आहे. सन १३४९ पर्यंत हरिहरांनी कर्नाटक सही केला व सन १३५० ते १३७५ मधे कोकण घेतले त्यावेळी पालशेत गाव नाम दिला असे मानण्याने इनाम मिळाल्यानंतरच्या ज्या घटना लेखांक ३ मधे सांगितल्या आहेत त्या सुसंगत जमतात, हे प्रतिपादन यापुढे आता केले आहे.

**राजा तुरूक :**

‘ बहुत दिवस इनाम चालिला पुढे राजा तुरूक जाहला ’ असे लेखांक ३ मधे सांगितले आहे. तुर्क हे नाव सर्वसाधारणपणे मुसलमानांना लावलेले आढळते. श्री. बेंद्रे यांच्या ग्रंथातील पृ. २९ वरील उतारा वर एके ठिकाणी दिला आहे त्यात सन १४३६ मधील रामराजाने मुसलमानांना आश्रय दिला त्यांना तुर्कवाले असे नाव ठेविले असे दिले आहे. ‘ Further Sources of Vijayanagar History ’ खंड दुसरा यात ठिकठिकाणी मुसलमान याअर्थी तुर्क शब्द वापरला आहे. कारण पूर्वीच्या कोरीव लेखात ( inscriptions ) तो तसा वापरला आहे. त्यांपैकी एका ठिकाणी राक्षसतंगडीच्या रामराजाने मुसलमानांसाठी तुर्कवाडा म्हणून एक भाग मुक्रर केला होता असे आहे. महाराष्ट्र महोदयात याला तुर्की मोहला असे म्हटले आहे. एस्. कृष्णस्वामी आपल्या लिटल नोन चॅप्टर ऑफ विजयनगर हिस्ट्री या सन १९३५ च्या पुस्तिकेत तुर्कीमुसलमानांशी सत्तास्पर्धा करणारे हबशी, व निजामुल्मुल्क या बाटलेल्या तेलंगी ब्राह्मणाच्या नेतत्वाखालील दक्षिणी असे आणखी दोन मुसलमानी गट देतात. यावरून तुर्क हे नाव सर्वसाधारणपणे उत्तरेकडून आलेल्या मुसलमानांना लावलेले दिसते.

**कोकणात तुर्क :**

इ. स. १४३६ मधे अल्लाउद्दीन दुसरा याने कोकणात सैन्य पाठविले व तेथील राजांनी खंड देण्याचे मान्य केले. सन १४६९ साली ख्वाजा गावान कोकणात स्वारीस निघाला. स. १४८२ त आदिलखान (तुर्क) कोकणात गुंतला होता. ( बा. अ. मोडक–कोलापूर व कर्नाटक राज्ये व संस्थाने–इतिहास ) मावळंकर सरदेसाई कुलवृत्तांतात पृ. ३०४ वर दिले आहे की सन १४७५ चे सुमारास सुरतेचे मोगली सुभेदार व बहामनी रियासतीचे सुलतान यांच्यामधे दाभोळ बंदर व त्याच्या आसपासचा मुलूख घेण्यासाठी झटापटी होऊन महमूद गावानाने मुलूख जिंकला. याला तेथे राज्यक्रांतीचा काळ म्हटले आहे. यावरून १४२९ ते १४८२ या काळात कोकणात मुसलमानी अंमल आला. इ. स. १४२९ त मलिकुत्तुज्जार याने विजयनगरची कोकणातील सत्ता उलथवून टाकली, असे महाराष्ट्र गॅझेटिअर व सरदेसाई कुलवृत्तांतात आहे. सन १३५० मधे ओकांना मिळालेले इनाम ' बहुत दिवस चालिले. ' त्यानंतर म्हणजे इनाम मिळाल्यानंतर १००–१२५ वर्षांनी ' राजा तुरुक जाहला '. यावेळी बहामनी राज्य होते व मुहम्मद तुघ्लुकाचे धोरणाऐवजी हिंदू लोकांशी सलोख्याची वागणूक सुरू होती. गावानाने जमीन-कारभारात सुधारणाही घडवून आणल्या. सन १४७५ च्या राज्यक्रांतीच्या काळात " लुटालुटीमुळे वोक परागंदा जाहले " ( लेखांक ३ ) पण गावानाच्या जमीनविषयक सुधारणांमुळे लवकरच स्थिरता आली असावी. त्यावेळी म्हणजे सन १४८५ ते १४९५ चे दरम्यान हरबा व शिवबा परत आले व पालशेत गावी ब्रह्मवणेत राहिले. हल्ली श्री. बापूराव महाजन यांचे घराचे बाजूस ब्रह्मवणे भाग आहे व जेथे प्रथम ओक राहिले तो मानाचा वड तेथे दाखवितात. परत आल्यानंतर आपले कागदपत्र व जमिनी परत मिळवून गावची लावणी केली. लेखांक ३ मधे उल्लेखिलेले ' मालक्ष्मी ' चे देऊळही नदीचे डाव्या तीराजवळ आहे. पुढे ओक " सावकारी गलबते वहिवाटून किराणा माल आणून सावकारी करीत असत " ( लेखांक ३ ) पालशेतला पूर्वीच्या बंदराच्या खुणा दाखवितात. तो किनारा वाळूमातींनी भरून गेला असून नदी तेथून फार दूर सरकली आहे. समुद्रातून बंदरात येण्याची वाट दोन डोंगरांमधून आहे व तीन बाजूंच्या टेकड्यामुळे बंदर बंदिस्त व सुरक्षित आढळते.

**विजापुरी पादशाही सुभा :**

तुरकाणांचे आंती दिल्लीहून विजापूर येथे पादशाही सुभा आला. ( लेखांक ३ ). या घटनेचा काल निश्चित करणे कठीण आहे. सन १४८९ त विजापूरची आदिलशाही स्थापन झाली. दिल्लीहून विजापूर येथे पातशाही सुभा आला " म्हणजे सन १५०० च्या सुमारास दिल्लीच्या बादशहाचा अंमल जाऊन ( तुरकाणांचे आंती ) विजापूरच्या बादशाहाचा अंमल सुरू झाला.

**देशमुखी**

परागंदा झालेले ओक परत आल्यापासून या काळपर्यंत व्यापार व सावकारी

करीत होते. त्यांना व इतरांना मोवासांचा त्रास फार होत होता. ( लेखांक ३ ) कोकण प्रांतात पूर्वी कोळयांची राज्ये होती. ( चित्पावन पृ. ३०५ ). दर्या नाखवा हा पडवे शहराचा खावंद. ( लेखांक ६ ). पडवे बंदर गुहागर तालुक्याच्या दक्षिणेस शास्त्री नदीच्या मुखाशी आहे. त्या दर्या नाखवाच्या सांगण्यावरून कानोजी चव्हाण याने आपला दिवाण हरबा ओक याचे कर्तबगारीने मोवास मोडिले, व पातशाही अमल बसविला, मुलुखाची लागवड केली. त्याबद्दल विजापूर दरबारात त्याचा मानसन्मान होऊन त्यांना हमजाबादेची ४।। महालांची देशमुखी दिली. यात हवेली महाल अर्धा आहे. हवेलीचा दुसरा भाग मामले जाफराबादमधे पडतो. त्या मामले जाफरबादची ४।। महालांची देशमुखी मोडकांना मिळाली असे मोडक कुलवृत्तांतातील ऐतिहासिक कागदपत्र क्र. ३ वरून दिसते. मोडकांनी इदिलशाही दिवाणाचे कौल घेऊन नूतन आगर निर्माण केले व देशमुखी मिळविली. त्यांचे त्यावेळचे देशमुखीचे कागद जळाले; पण देशमुखी मिळाल्याचा एक दाखला सन १५५८ च्या आधीचा आहे. त्यावरून १६ व्या शतकाच्या आरंभाला त्यांना देशमुखी मिळाली असावी.

भा. इ. सं. मंडळाच्या शके १८३५ च्या इतिवृत्तात पृ. ३१९ वर श्री. दत्तो वामन पोतदार यांनी अंजनवेल तालुक्याच्या वहिवाटीचे बंद ३०, पालशेतचे चिंतो गोविंद वैशंपायन यांच्याकडे मिळालेले कागद छापले आहेत. ( ले. ५ ) त्यातील माहिती जुन्या काळापासूनची, पण सन १८२४ मध्ये लिहिलेली आहे. त्यात ( १ ) विजयनगरचा अमल होता त्या काळास कानडा रामराजा छत्रपती याचा अंमल म्हटले आहे. ( २ ) सन १५०३ चे सुमारास विजापुरास अलि इदलशाचा अमल आला त्यास पादशाई अमल म्हटले आहे व ( ३ ) सन १५०३ ते सन १५२५ पर्यंतच्या मुस्ताफाखान अमलदाराच्या अमदानीत महालास देशमुख इ. व गावास खोत कायम केले असे दिले आहे. " तेही कालनिर्णयाचे वरील तर्कांना व देशमुखी १६ व्या शतकाच्या आरंभाला मिळाली असावी या तर्कास पुष्टी देतात. श्री आवळसकरांनी चौल अधिकारी संग्रहातील व पोलादपूरच्या चित्रे यांच्या संग्रहातील असे जे काही कागद ' ऐतिहासिक साधने ' या पुस्तकात छापले आहेत, ( सन १८२१ ). त्याच्याशी पालशेतच्या वैशंपायनांकडील सन १८२४ च्या कागदपत्रातील शब्दप्रयोग व शकवर्षे जुळती आहेत.

बिदरशाही लोपून विजापुरी पातशाही चालू झाली ( सुमारे १४८९ ), तेव्हा सरदेसाई यांनी जाफराबाद व हमजाबाद या त्यांच्या सरदेशमुखीचा जीर्णोद्धार करून फर्मान घेतला. अशा संबंधित घडामोडींवरून ओक यांना हमजाबादेची देशमुखी मिळण्याचा काळ सोळाव्या शतकाच्या आरंभीचा ठरतो. सन १५९४ मधील फर्मान ( ले. २ ) बाळाजी ओक देशमुख मामले हमजाबाद यांचे नावचे आहे. देशमुखी संपादन करणार हरबा ओक यांचा लेक कृष्णाजी त्याचा थोरला पुत्र रामाजी ओक बेलंबकर ( लेखांक २ ). या बेलंबकराकडे देशमुखी अखेरपर्यंत चालत होती, हे इतर

कागदपत्रांवरून दिसते. या रामाजीचा पुत्र बाळाजीराम. चौथ्या पिढीच्या बाळाजीचा उल्लेख सन १५९४ मध्ये आहे. यावरूनही ओकांना देशमुखी सोळाव्या शतकाच्या आरंभी मिळाली हे निश्चित होते. ( पहा वंशावळ क्र. १·३/अ ) सन १३५० मध्ये पालशेत गाव इनाम मिळाले व १५०–१७५ वर्षांनी देशमुखी मिळाली.

## प्रकरण तिसरे

# ओक नावाची उपपत्ती

हरिहर व बुक्क यांच्या वेळेस ओकांचे पूर्वज कानडी मुलुखात होते असे मानले तर तिकडील परंपरेप्रमाणे गावाचे नावावरून आडनाव पडले असावे. मॅकेंझीनी ग्रथित केलेल्या कोरीव लेखात 'अकुमल्ला लेख (**Makenzies manuscripts-Akumalla Inscription**) दिला आहे. '**Further Sources of Vijayanagar History**' खंड २ पृ. २४ वर त्या साधनाचा पाठ दिला आहे. (लेखांक ७) त्यात-" इत्येवं महामहिम मल्लिनाथः प्रिय मित्रस्य हरिहर महाराजस्याज्ञया निजभुजपरिपालित स्वनाम्नि देशे सङ्केत भूमौ सर्व सम्पदाम् औकु नगर्यां निवसन्नेव राज्य परिपालन कुर्वन्--" असा मजकूर आहे. याचा इंग्रजी अनुवाद तिसऱ्या खंडात पृ. २१ वर दिला आहे. हरिहराचा परममित्र व थोर महिमा असलेला मल्लीनाथ हरिहराच्या आधिपत्याखालील भागावरील राज्याचा कारभार करीत होता. तो औकु नगरात राहात असे. याचा इंग्रजी सारांश देताना ग्रंथाचे संपादक नीळकंठशास्त्री व वेंकटरमणय्या यांनी औकुचे रूपांतर **owk** असे म्हणजे आउक किंवा ओक असे केले आहे. उकारान्त उच्चार नाही. म्हैसूर गॅझेटिअरमधे रायचूर तालक्याला रायचुरु म्हटले आहे. विजयनगर स्मारक ग्रंथात म. म. पोतदार यानी आपल्या लेखात एक शिलालेख दिला आहे त्यात " शालिंवाहन सकु १३३५ " असे शब्द आहेत. शके १२२३ च्या शिलालेखात असेच आहे ( ले. १२ अ ) सकु शब्दाचे उकारान्त रूप पुढील काळात अकारान्त झाले. त्या काळात मराठीत उकारान्त शब्द वापरलेले ज्ञानेश्वरीत पदोपदी आढळतात. ते पुढील काळात अकारान्त झालेले आहेत. पालशेत इनाम मिळविणारे कुटुंब हरिहराच्या पदरी औकु गावात रहात असावेत. व त्यावरून त्या कुटुंबाचे नाव आउक वा ओक असे पडले असेल. चित्रावशास्त्री यांच्या मध्ययुगीन चरित्रकोशात औकु घराण्याची सन १७८५ पर्यंतची वंशावळ दिली आहे. ती आम्हा ओकांची नाही. विजयनगरच्या राजघराण्यापैकी तिम्मा ( सन १५०८–१५३६ ) ची जहागीर औक येथे होती म्हणून तिम्माच्या घराण्याला औक किंवा

आवुक घराण म्हणतात असे दिले आहे. रघोजी आंग्र यांना वे. शा. सं. गोपिनाथशास्त्री दीक्षित ओक यांनी शके १६८७ चे सुमारास एक पत्र लिहिलेले भा. इ. सं. मंडळाच्या शके १८३२ च्या इतिवृत्तात पृ. १०२ वर श्री शं. श्री. देव यांनी छापले आहे व श्री. ढब्बु यांनी कुलाबकर आंगरे या शके १८६१ च्या ग्रंथात पृ. २४५ वर तेच छापलेले आहे. ( ले. ९ ) त्यात “ ---रसस्वादेच्छुकौकोपाख्य गोपिनाथ दिक्षीत ” असा प्रारंभ आहे. इच्छुक औक उपाख्य असा त्याचा विग्रह होतो. या थोर विद्वान शास्त्री-बुवांनी आपले नाव औक असे संस्कृतमधे दिले आहे. मॅकेंझीनी औकु नगरला ओक म्हटले आहे इ. स. १८०८ मधे त्यानी काढलेल्या नकाशात ओक ( Oak ) हा गाव विजयनगरच्या पूर्वेस सुमारे ११० मैलांवर १५°–११' व ७८°–११' या अक्षांश रेखांशात दाखविला आहे. त्या नकाशापैकी कामापुरत्या भागाचे छायाचित्र प्रस्तुत लेखा-बरोबर दिले आहे. ( नकाशा क्र. १ ) हा नकाशा कर्नल विल्क्सच्या म्हैसूरचा इतिहास या ग्रंथाच्या दुसऱ्या आवृत्तीच्या पहिल्या खंडाबरोबर छापलेला आढळला. हा तीन खंडांचा ग्रंथ सन १८०७ ते १८१७ च्या दरम्यान लिहिलेला आहे. या ग्रंथाच्या मुख-पृष्ठाची नक्कल **पुढील पृष्ठावर दिली आहे**. या ग्रंथात म्हैसूर या हिंदू राज्याचा इतिहास विजयनगरच्या राज्यापासून मुळारंभ करून अखेरपर्यंत ग्रथित केला आहे. म्हणून नकाशात विजयनगरच्या वेळचे ओक गाव समाविष्ट झाले आहे. सरकारी रोडमॅप-मधेही owk गाव आहे. भा. इ. सं मंडळाच्या शके १८३४ च्या इतिवृत्तात काही शब्दाची उत्पत्ती दिली आहे. त्यात आऊक पासून ओक झाल्याचे दिले आहे. गीर्वाणलघुकोश, शब्दस्तोम महानिधी किंवा शब्दार्थ कौस्तुभ या कोशातही उचपासून ओक अशी व्युत्पत्ती दिली आहे. या कोशातून ओक याचा अर्थ घर, आश्रय, पक्षी, शूद्र, प्रसन्न करणारा, समन्वय करणारा असे अर्थ दिले आहेत. या अर्थावरून आडनाव पडण्याच्या शक्यतेपेक्षा गावावरून नाव पडण्याची शक्यता जास्त आहे व गावावरून आडनावे कोकणातही पडत असल्याबद्दलचे उल्लेख श्री. ना. गो. चापेकर यांच्या चित्-पावन या ग्रंथात द्वितीयावृत्तीत पृ. ७४ व ८२ वर सोदाहरण आहेत. सन १५६५ मधे महालिंगदास या कवीने गावावरून आडनाव प्राप्त होते असे म्हटल्याचे पृ. ६३ वर दिले आहे व तसे एक औक आडनावाचे घराणे होते ( ले. ८ ). आवुक ( Owk ) असे पोस्ट ऑफिस सध्या आहे.

HISTORICAL SKETCHES

OF THE

SOUTH OF INDIA,

in an attempt to trace the

HISTORY OF MYSOOR;

FROM THE

origin of the Hindoo Government of that state to
The extinction of The Mohammedan Dynasty in 1799
founded chiefly on Indian authorities collected by the author while
officiating for several years as

Political Resident at the court of Mysoor

BY LIEUT. COLONEL MARK WILKS

VOL I

SECOND EDITION

MADRAS,

HIGGINBOTHAM AND CO.,

PUBLISHERS

1869

# प्रकरण चौथे

# उप-आडनावे

**देशमुख ओक :**

ओकानी १६ व्या शतकात हमजाबादेची ४॥ महालांची देशमुखी मिळविली. त्याचे सरंजेमास ( १ ) कसबे वेळंब ( २ ) मौजे कोतळीक ( ३ ) मौजे शिवने ( ४ ) मौजे बामणोली ( ५ ) मौजे पांगारी ( ६ ) मौजे मळण ( ७ ) मौजे बोरगाव व ( ८ ) मौजे जानवले हे आठ गाव त्यांनी घेतले. लेखांक ३ मधे कसबे वेळंबचे ऐवजी वलम पांगारी एकत्र दिला आहे. व असगोली हा आठवा दिला आहे. पण असगोली हा तांब्यांना दिला व वलम ( वेळंब ) व वेलंबाचा कोड पांगारी होता तो निरनिराळे करून आठ गाव केले ( लेखांक४ ) लेखांक ३ मधे कोतापूर किरवले असा आठांपैकी एक गाव आहे. त्यालाच पुढे कोतळूक हे नाव ठेविले ( ले. २१ ) किरवले हा कोतापूरचा कोड ( म्ह. एक भाग ) होता. ( ले. २० ) ही आठ गावे ओकांची वतनी खोतीची गावे व त्या त्या गावी जाऊन ओक स्थायिक झाले व आठ वंश सुरू झाले व गावचे महाजन म्हणून एक वंश पालशेत मधेच राहिला. या आठ वंशांपैकी वेळंबचे ओकांकडे देशमुखीचा कारभार होता व ती मंडळी देशमुख हे उपपद लावू लागली. देशमुखी मिळवणारापासून ती रद्द होईपर्यंत ज्यांच्याकडे चालली ती वंशावळ क्र. ३.१ ची आहे. या आठ वंशांशिवाय पालशेत या मूळ गावी राहणारे व पांगारकर हे उप-आडनाव लावणारे ओक हे देशमुखीत भागीदार होते असे दिसते. ( वंशावळ २.१ ) कारण नाशिकच्या एका उपाध्यायांकडे पांडुरंग जनार्दन गाव : पालशेत याचे नावापुढे सन १८१३ किंवा सन १८३८ पैकी एका वेळेस खोत देशमुख गुहागर असे लागले आहे. देशमुख ओक यांना मळण, वेळंब व कर्दे हे तीन गाव इनाम होते ( लेखांक २ व ७ ). पालशेत इनाम गाव या वंशाकडे नव्हता. पण त्या सर्वांचा मूळ गाव पालशेत होता. ( ले. ११३ )

**महाजन ओक :**

पालशेतची महाजनकी ज्यांच्याकडे होती ते महाजन ओक असे नाव लावू लागले. हल्ली पालशेतमधे ब्रह्मवणे भागात घर, वाडी इ. असलेले श्री. काशिनाथ गणेश ओक ऊर्फ बापूराव महाजन या नावाने ओळखले जातात. सन १५९५ मधे महादु गणेश महाजन ओक यांच्याबद्दलचे फर्मान ( लेखांक १ ) आहे. हे अस्सल फारसी भाषेतील फर्मान बापूरावांनी मजला पाठविले. तसेच सन १७६१ चे दुसरे एक फर्मान ( लेखांक १० ) परशराम बल्लाळ वोक यांचे स्वाधीन महाजनकी करावी अशाबद्दलचे फर्मानही त्यांचेच कृपेने उपलब्ध झाले. महाजनकी कोणाची हे जसे या फर्मानात जने कागदपत्र पाहून व गावकरांची हकीगत मनास आणून ठरविले त्याप्रमाणे ठरविण्याचे यापूर्वी सन १७१४ व सन १७३२ मधे प्रसंग आले होते. त्यांपैकी सन १७१४ ची जबानी पेशवे दप्तरातील कागदात मिळाली ( लेखांक ११ ). व सन १७३२ ची कानिटकर कुल-वृत्तांतात छापलेली आढळली. ( लेखांक १२ ). ओक परागंदा झालेमुळे एक हिस्सा महाजनकीचा कानिटकरांना मिळाला असे दिसते. विद्यमान महाजन ओक ब्रह्मवणेकर यांची वंशावळ क्र. १.१ मधे दिली आहे. ब्रह्मवणेकर व सिद्रस ओक यांपैकी महाजनकी कोणत्या वंशाची हे ठरविण्याकरिता ( तकरीरा ) झालेल्या जबान्यांपैकी एक जबानी सन १७१४ ची लेखांक ६ ची आहे. सन १५९५ मधील महादु गणेश ओक महाजन यांच्या नंतरची मराठी राज्यापर्यंतच्या महाजन ओकांची नावे मिळू शकली नाहीत. महाजन ओक व सिद्रस ओक हे दोन वंश पालशेतमधे स्थायिक आहेत. तीर्थोपाध्यायांकडील लेखात महाजन हे उपपद लिहिणारा आणखी एक वंश ( वं. क्र. १.३ ) आढळतो. तो सिद्रस घराण्याशी जमेल असे वाटते. कोतळूकचे ओक ही ' पुरातन पालसेतचे महाजन मिरास-दार ' असा उल्लेख आहे. ( लेखांक २० )

**सिद्रस ओक :**

लेखांक ११ मधे जो जबाब सोहोनी यांनी दिला आहे त्यात जुन्या पादशाहीचे कारकीर्दीत महाजनकीचे दाहिजे सिद्रस खात असत असे दिले आहे. पण यावरून जुन्या पादशाहीचे कारकीर्दीत सिद्रस हे उपआडनाव ओक लावीत होते असे निश्चित म्हणता येणार नाही. जबानी देणार अन्तो हरी सोहोनी सन १७१४ मधे ८० वर्षांचे होते. त्यांच्या हयातीत त्यांनी ज्या सिद्रसांचा उल्लेख केला त्यांचे पूर्वज महाजनकीचा दाहिजा खात असा अर्थ असू शकेल. पालशेतचे हल्लीचे सिद्रस श्री. वामन गोविंद हे कळवितात की त्यांच्या मूळ पुरुषाचे सहा भाऊ होते; त्यापैकी एक योगी झाला त्याला सिद्धरस म्हणत असत व त्यावरून हे नाव पडले. त्यांचा मूळ पुरुष सदाशिव हा नाशिकहून आला असे सिद्रस कळवितात. सिद्रस ओक महाजन पालशेत असे तीर्थोपाध्यायांकडील वहयात लिहिले आहे त्यावरून दोन वंशावळी तयार होतात (वंशावळ क्र. १.२ व २.६) त्यांचा एकमेकाशी संबंध लागू शकला नाही. पण सिद्रस लिहितात त्याप्रमाणे सदाशिवला सहा भाऊ असलेले वंशावळ क्र. २.६ मधे आढळतात. व त्या भावांपैकी केशव महादेव

सिधोकृष्ण हे सन १८०१ मधे आपले वास्तव्य अभोणे असे तीर्थोपाध्यायांकडे लिहितात. अभोणे हे नाशिक जिल्ह्यात दिंडोरीच्या उत्तरेस आहे व त्यांचे चुलत घराणे म्ह. निळकंठ बाळंभट नाशिकास होते असे पे. दप्तरातील कागदावरून ( लेखांक ५१, ५२ व ५३ ) दिसते. त्यात बाळंभट्ट बिन गोविंदभट्ट वोक हे वर्षासन संपादन करणारे यांना मोगलाई कारकीर्दीतील म्हणजे सन १७५२ पूर्वीच्या सनदा होत्या असे आहे. बाळंभटाच्या पत्नी त्र्यंबकेश्वरास सन १७४२ मधे गेल्या होत्या. गोविंदभटाचा काळ सन १६७५ च्या सुमारचा असावा. या गोविंदभटांना सिद्धेश्वर हे नाव दिलेले आढळते. त्र्यंबकेश्वरी एक उतारा " गोविंद सदाशिव अजे महादेव सिद्धेश्वर " " सिद्रस महाजन " असा आहे त्यांचाच घृष्णेश्वरला " गोविंद सदाशिव अजे महादाजीपंत महाजन वोक सिद्रस मातुश्री सावित्री पालसेत गुहागर प्रांत दाभोळ " असा आहे. सिद्धेश्वर या पणजोबांच्या नावावरून सिद्रस उपआडनाव पडण्याची शक्यता वाटते. पण त्या पिढीतील पुढे कोणी सिद्रस नाव लावलेले आढळले नाही. पेशवे दप्तरातील सन १७१४ च्या जबानीत ( लेखांक ११ ) कृष्णो गणेश या सिद्रस महाजनांचा उल्लेख आहे. सन १७३२ च्या जबाबात ( लेखांक १२ ) सिद्दी सातचे वेळी म्ह. सन सुमारे १७२०–२५ ला केशव सिद्रसचा महाजन म्हणून उल्लेख आहे. सन १७०९ मधील झाप देण्या-घेण्याबद्दल यादी आहे ( लेखांक १६) त्यात पालशेतला महादेव सिद्रस महाजन असा उल्लेख आहे. यावरून सन १७०९ च्या आधीपासून सिद्रस हे उप-आडनाव धारण केलेले आहे. पालशेतला विद्यमान सिद्रस आहेत ते वंशावळ क्र. १.२ मधे येतात. त्यांचे पूर्वजांपैकी सदाशिव भिकाजी व इतर पाच मिळून सहा भाऊ आहेत व श्री. वामन गोविंद सिद्रस ओक यांनी पाठविलेल्या माहितीप्रमाणे त्यांपैकी काही भाऊ वऱ्हाडात व परत नाशिकास गेले असे आहे. तीर्थोपाध्यायांकडील उताऱ्यावरून ते खानदेशात गेले व चुलतभाऊ पांडुर्ली ( पाडार्ली ) नाशिक येथे गेले असे दिसते; पण त्या सहा भावांचा काल सन १७५० नंतरचा आहे. महाजनकीच्या मथल्याची शहानिशा करविण्यास सन १७१४ मधे जे कृष्णाजी केशव व गोपाळ महादेव ( लेखांक ११ ) हे कारणीभूत झाले ते महाजनांच्या व सिद्रसांच्या वंशावळीत आढळून येतात. श्री. वासुदेव श्रीधर सिद्रस ओक यांच्य मातोश्रीनी ( वय सुमारे ७६ ) दिलेल्या माहितीवरून ते कळवितात की पूर्वी सिद्रसांचे पालशेतचे घरावर दरोडा पडला म्हणून ती मंडळी नाशिक वऱ्हाड या बाजूला शे-दोनशे वर्षे राहिली व नंतर पालशेतला परतले.

**दीक्षित ओक :**

ऐ. संकीर्ण साहित्य खंड ३ मधे गोपिनाथ गणेश दीक्षित ओक याची माहिती व जन्मकुंडली दिली आहे. ( ले १८४) त्यांचा जन्म सन १७२७ चा व ते वाराणसीहून पुण्यास आले. त्यांनी पाच यज्ञ केले व पंडितमान्य ग्रंथनिर्मिती केली. त्यांचा लेख घृष्णेश्वर उपाध्यायांकडे " गोपिनाथ दीक्षित गणेश दीक्षित अजोबा केशव दीक्षित पंजे कृष्ण दीक्षित " असा आहे. म्हणजे गोपिनाथ दीक्षितांच्या पंजोबापासून प्रत्येक वंशजाचे

नावापुढे दीक्षित हे उपपद लावू लागले असे दिसते. ( प्रकरण १६ ) गोपिनाथ शास्त्र्यांनी यज्ञयाग केले म्हणून ते दीक्षित नाव लावू लागले असे नव्हे. त्यांच्या वडिलांचाही दीक्षित म्हणूनच वृष्णेश्वरला लेख आहे. त्याचे वंशज दीक्षित म्हणून गणले गेले. दीक्षित ओकांकडे मौजे नरवणची मुकादमी होती ( लेखाक १८१ ) व वतन हेदवीला ( लेखांक २११ ) होते. पुण्याचे शिंदे आळीतील ओक नरवण मुकादमांपैकीच आहेत; पण त्या वंशाचे नाव दीक्षित न लागता ओकच लागत आले आहे. फर्ग्युसन कॉलेजचे माजी प्रा. अण्णुभाऊ हे दीक्षित म्हणूनच ओळखले जात होते. ते ओक दीक्षित होते. गोपिनाथ शास्त्री दीक्षिताना सन १७६५ मध्ये साकुर्डी ता। वाडे, प्रांत जुन्नर हा गाव इनाम दिला होता म्हणून ते साकुर्डीकर दीक्षित असे ओळखले जात.

## फडनीस ओक :

फडनीस उपआडनाव लावणारे ओक सांगलीत आहेत. गंगाधर बापूजी ओक हे सन १७६४ मधें सांगलीकर पटवर्धनांचे फडनीस होते. तेंव्हापासून यांचे वंशज फडनीस नाव लावू लागले.

## पांगारकर ओक :

पालशेतचे पूर्व अंगास पांगार–तड–पालशेत म्हणून ओळखला जाणारा एक भाग आहे; तेथे एका ओक घराण्याची वतनी शेतीवाडी होती. स. न. २१० व ६० यापैकी जमिनी कुळकायद्यापर्यंत ओकांकडे होत्या व वस्तीही असावी त्या घराण्याचा निर्देश पांगारकर ओक केलेला आढळतो. लेखांक क्र. ३ मधील बालाजी नारायण ओक आपला उल्लेख पालशेतकर पांगारकर खोत देसाई तर्फ हमजाबाद, सुभा दाभोळ असा करतात. पांगारकर ओकांची वस्ती धार, यवतमाळ, इंदूर, मुंबई व कुलाबा जिल्ह्यात शिरसाट, बोरवाडी, महाड रोहे येथे आहे.

## ओंकार :

हे उपआडनाव नसून मूळ आडनाव ओक टाकून त्याऐवजी ओंकार हे नाव धारण केले गेले. ओंकार हे नाव लावल्याची माहिती त्र्यंबकेश्वर येथील वे. मू. यज्ञेश्वर नारायण दीक्षित–शुक्ल यजुर्वेदी माध्यंदिन शाखेचे उपाध्यायाकडील लेखावरून प्रथम मिळते. तो लेख–गणेश कृष्णाजी अजे महादाजी गणेश पुतणे महादाजी व केशव हरी उपनाम ओंकार गाव पालशेत व बामणोली व कोतळूक व शिवने– असा आहे. या लेखात पुतण्याची नावे आहेत पण मुलांची म्हणजे बाबूजी, परशराम किंवा वैजनाथ यांची नावे नाहीत म्हणजे लेख त्यांच्या जन्मापूर्वीचा असावा. त्र्यंबकेश्वरच्या वे. मू. फडके गुरुजींच्या वहीत गणेश कृष्णाजीच्या पुतण्यांचा सन १७०६ चा लेख– केशव हरी बंधू महादेव ( इत्यादी ) यांचा ओक या नावाचा आहे. म्हणून ओंकार नावाचा लेख सन १७०६ च्या सुमारचाच असावा. ओकांनी ओंकार हे नाव लावावयास त्यावर्षी सुरुवात

केली पण पुढे त्यानी ओकही नाव लावलेले आढळते. घृष्णेश्वर उपाध्यायांकडे सन १७४० च्या सुमाराचा लेख– बाबूजी नाईक भाऊ परशराम नाईक पिते गणेश अजे कृष्णाजी नाईक पुत्र गंगाधर नाईक व चिंतामण नाईक उपनाव ओक सु. वाराणसी दुर्गाघाट भावजई जानकीबाई भ्र. परशराम नाईक सून जयंतीबाई ब्राह्मणोली–असा आहे. सन १७४० मधे बाबूजी नाईक हे ओक आडनाव लिहितात तर त्याच वर्षी चिमाजी अप्पा पेशव्यांनी लिहिलेले एक पत्र पे. द. खंड ९ बाजीराव कौटुंबिक यात छापले आहे त्यात बाबूजी नाईक ओंकार याची मूल...रघुनाथरावासाठी राहवणे...असा ओंकार उल्लेख पेशवे करतात. स. १७५४ ते सन १७९९ पर्यंतच्या कालावधीत मळणकर व बोरगावकर ओकानी स्वतःचा उल्लेख, व लोकांनी त्यांचा उल्लेख कधी ओक तर कधी ओंकार केलेला आढळतो. पेशव्यांनी बोरगावकर ओकांना कधी ओंकार म्हटले आहे पण मळणकराना म्हटले नाही. रा. ब. ग. चिं. वाड संकलित बाळाजी बाजीराव पेशवे रोजनिशी भाग २ मधे पृ. १७० वर पेशव्यांच्या धनकोंची नावे दिली आहेत त्यात सन १७६१–६२ मधे जमादिलाबल महिन्याच्या २४ तारखेला गंगाधर बल्लाळ ओक याजकडून २८६८६१ रुपये व पुढे चार महिन्यांनंतर सव्वाल ६ ला गंगाधर बल्लाळ ओंकार याजकडून रुपये ७५००० कर्जाऊ घेतले अशी दोन्ही नावे वापरली आहेत. ही आडनावांची धरसोड काय मनःस्थितीत झाली हे कळत नाही. बाबूजी नाईक ओंकार यांचे वंशजानी मात्र ओंकार नाव सोडले नाही व ओक नावाचा नामशेषही ठेविला नाही.

चिमाजी अप्पा पेशवे यांची मुलगी बयाबाई बाबूजी नाईक ओंकाराचे मुलास दिली होती व तिला सासरचे ओक आडनाव आवडेना म्हणून ओंकार हा बदल केला या आख्यायिकेत सत्यांश नाहीं. श्री. गो. स. सरदेसाई ( नाना ) हे सुद्धा ओंकार नाव पडण्याचे हे कारण प्रतिपादन करतात ( ले. २४६ ) हे आश्चर्य आहे. नावातील हा बदल बयाबाईचे जन्माआधी ३०–३५ वर्षांपूर्वी केला गेला होता. बामणोलीस महाअनुष्ठानें व अश्वत्थउद्यापन केले त्यावरून ओक नावाचा त्याग केला गेला असण्याचा संभव आहे. या उद्यापनाचे उपाध्येपण बोपदेवभट खरे यांनी केले ( लेखांक १४ ) ते उपाध्याय सन १७०९ पूर्वी दिवंगत झाले होते ( खरे कुलवृत्तांत–ऐ. उल्लेख क्र. १०१ अ पैकी (७) व (९) व वंशावळ पृ. १५० ) म्हणजे उद्यापन सन १७०६ चे सुमारास किंवा त्यापूर्वी झाले असावे. लेखांक ५ मध्ये ही उद्यापने शामलाने अंजनवेल घेतल्यानंतर म्ह. सन १६९६ नंतर झाली असे दिले आहे. उद्यापनाचा काल सन १७०० ते १७०६ च्या दरम्यानचा ठरतो. ही महानुष्ठाने करणारांना त्यापायी कर्ज झाले ते ओंकार प्रथम नाव धारण करणाराच्या वडिलांनी फेडले व उद्यापन करणारांच्या संगतीचा मार्ग करून लेख लिहून घेतला. ( लेखांक १५ ) विसो केशव व नागदेभटानी गोत्रे पुरविली व क्षयेवृद्धी तीन दिवस धरावी असे केले ( लेखांक ६ ) यावेळी पिढया तोडल्या असे दिसते. वरील विसो केशव ओक हे भालेराईस मिळाले होते. मुलखाची खराबी केली होती. सर्व भावाबंधाची हलाखी केली, लोक जीवे मारले व नंतर स्वतः

पळून गेले त्यावेळी त्याचे भाऊबंधांना हलाखी करून अटकेत बेड्या घालून पडावे लागले होते. इतके होऊनही विसो केशवना गावी परत आणविल्यानंतरही त्यांची द्वेष-बुद्धी गेली नाही ( लेखांक ६ ) याची घृणा येऊन ओक या नावाचा त्याग करून " ॐक " याशी साम्य असलेले व सोज्वळ असे " ॐ कार " नाव लावण्याचे ठरविले असण्याचा संभव आहे. ओंकार प्रथम लावले ते वर्ष व उद्यापनाचे वर्ष ही त्या दृष्टीनी जुळती मिळती आहेत.

ओकांचे ओंकार झाले ती वंशावळ



## प्रकरण पाचवे

# पालशेतचे महाजन

पालशेत हा गाव रत्नागिरी जिल्हयात गुहागर तालुक्यात गुहागरचे दक्षिणस चार मैलांवर आहे. येथे समुद्र आखातासारखा सुमारे अर्धा मैल आत पालशेत गावाजवळ आलेला आहे. हा गाव सन १३५० चे सुमारास विजयनगरच्या राजांनी ओकांना इनाम दिला. पालशेत गावी ओक राहावयास आले त्यावेळी पालशेतला निराळे महाजन वतनदार नव्हते. इनामदार हेच गावातील शिष्ट व त्यांच्यावर गावाच्या अबादानीचे उत्तरदायित्व होते; म्हणून त्यांचे व्यापारउदीम, बाजार इत्यादींचे काम ओकच बघत; यास्तव तेच पालशेतचे महाजन होते. बाजारपेठेचे वतनदार शेटे, महाजन व चौधरी असत. ( पाचे शेटे कुलवृत्तांत ) कोकणात शेटेपणाची वृत्ती फारशी आढळत नाही. पेशवे दप्तरात कोकणबद्दलच्या खर्चाचे सन १७०९ पासून पुढील शंभर वर्षांचे कागद आढळतात, त्यात महाजनांना मोईन ( ठराविक मानधन ) दिल्याचे खर्च आहेत. शेटे, चौधरी यांचा उल्लेख नाही. सन १५९४ साली पालशेतचे महाजन महादो गणेश ओक हे नाराज होऊन कारभार सोडून घरी बसून राहिल्यामुळे ( लेखांक १ ) गावाचे कारभारावर विपरीत परिणाम होऊ लागला. म्हणून त्यांना समजावून महाजनकीबद्दल दोनशे तन्कह ( त्यावेळचे एक नाणे ) दहिजा देण्याचे मान्य होऊन तशी सनद देण्याची आज्ञा झाली.

ब्रह्मवणेकर ओक महाजन यांचे वंशापैकी हल्लीचे श्री. बापूराव महाजन यांच्या खाजगी मालकीचे देऊळ पालशेतच्या ब्रह्मवणे भागात आहे ; त्यातील मूर्तींच्या दगडी आसनावर पुढील लेख कोरलेला आहे. “ स्वस्ती श्री शके १५६६ तारण नाम संवत्सरे फाल्गुन शुक्ल सप्तमी शनि रोहिण्या श्री केशवस्य प्रतिष्ठा विद्वत् महाजन नुकुळ भानाजी नागनाथ प्रभुणा श्रीकृष्णार्पणमस्तु ”. शके १२२३ च्या शिलालेखात ( ले. १२ अ ) असाच नागनाथाचा उल्लेख मिळतो. मूर्तींची प्रतिष्ठापना २२ फेब्रुवारी सन १६४५ मधे महाजनानी केली. ( पहा : ओकांची देवालये प्र. २० )

त्यानंतर महाजन व्यक्तीचे नाव कळले ते बाळाजी कृष्ण यांचे ( लेखांक १२ ).

हे मराठी राज्यात महाजनकी करीत होते. अन्तो हरी सोहोनी ( जन्म सन १६३४, ले. ११ ) पालशेत यांचे मुलीचे लग्नात कज्जा झाला त्याची फिर्याद झाली. बाळाजी कृष्ण वेळंबच्या पूर्वेस असलेल्या सुरल गावच्या पऱ्हयात म्हणजे ओढयात मारले गेले. ओक परागंदा झाले. त्यानंतर दादाजी कानिटकर महाजनकीची वहिवाट करू लागला, व यानंतर संभाजी महाराजांना धरून नेले. या लेखांक १२ मधील हकीगतीवरून बाळाजी कृष्णचा महाजनकीचा काळ १६५० ते १६७५ च्या दरम्यान असावा असे वाटते.

ओक परागंदा झाल्यामुळे दादोबा कानिटकर महाजनकीची वहिवाट करीत होते. पण शामलानी त्याची मुले-माणसे धरून नेली. पारकर-कानिटकर हे त्यानंतर पाच-सात वर्षे महाजनकीचा कारभार करीत होते. पण त्यांच्यातही कारभारी उरला नाही. केसो कृष्ण आंबडेकर मुकादम रयतेस उपद्रव देऊ लागला. गावात अनर्थ झाला म्हणून कृष्णाजी विश्वनाथ कानिटकर महाजन मौजे अडूर याजकडे पालशेतमधील शिष्टमंडळी मदतीसाठी गेली. शिष्टमंडळीत म्हादो हरी ओक, पांगारकर, दोघे कानिटकर होते. पण ओकांच्या महाजनकीचा कारभार करण्यास म्हादो हरी ओक सरसावले नाहीत. किंवा कानिटकर काही दिवस कारभार करीत होते म्हणून शिष्ट मंडळातील दोघे कानिटकरच कारभार करण्यास पुढे आले नाहीत याचे कारण समजत नाही. कृष्णाजी विनायक कानिटकर यांना सातान्याहून बोलावून आणले व कामास अधिकार पाहिजे म्हणून पालशेतची महाजनकी त्याचे स्वाधीन केली.

हे कानिटकर मूळचे पालशेतचे नव्हेत. कानिटकर कुलवृत्तांतावरून असे दिसते की बाराव्या घराण्यातले अप्पाजी रघुनाथ कानिटकर हे पालशेतमध्ये राहात होते. त्यांचे सोबतीस दाभोळयाहून पाचव्या घराण्यातील दुसरा पुरुष विसाजी केशव येऊन राहिला. त्यांचे नातू केसो विश्वनाथ यांना सातान्याहून बोलावून आणले; व ते महाजनकीच्या काही भागास कायमचे चिकटले. याच सुमारास म्हणजे सन १७०५ ते १७०८ च्या दरम्यान श्यामलाच्या अंमलातच कृष्णाजी केशव ओक ब्रह्मवणेकर ( वंशावळ क्र. १·१ ) हे महाजनकी करू लागले. ( लेखांक १२ ). केसो विश्वनाथ कानिटकर सातान्याहून येण्यापूर्वी पालशेतचे मुकादम ( हे एक वतन होते ) केसो कृष्ण अंबडेकर यांनी कित्येक प्रकारे रयतेस उपद्रव दिला होता. त्यांचे चिरंजीव हरी केशव अंबडेकर यांनी शामलाच्या कारकीर्दीचा फायदा घेऊन कृष्णाजी केशव ओक ब्रह्मवणेकर यांचे विरुद्ध सिद्रस ओकांना मसलत देऊन म्हणजे चिथावून महाजनकीबद्दल तंटा उपस्थित केला व सिद्दी सातकडून सर्व संबंधित लोकांना जंजिऱ्यास बोलावून नेले. सिद्दी सुरूल याचे मत महाजनकी ब्रह्मवणेकराची असे पडले. पण सिद्दीच्या कारभाऱ्यांनी शक्कल काढिली की जो एक हजार रुपये आज देईल त्यास महाजनकीचे वतन दिले जाईल. परशराम ओक ब्रह्मवणेकराजवळ तेवढे पैसे नव्हते. केशव सिद्रस ओक याला पुढे केले. त्यांनी हजार रुपये देण्याचे मान्य केले व त्याचे नावे एकतर्फी सिद्दीनी सनद दिली. सन १७०९ मधे महादेव सिद्रस याचे नाव केसो विश्वनाथ कानिटकर व हरी अप्पाजी कानिटकर यांचे

नावाबरोबर पालशेतला महाजन म्हणून लागले आहे ( लेखांक १६ ). ओकांपैकी सिद्रस ओक खरे महाजन की ब्रह्मवणेकर खरे हे ठरवून घेण्याकरिता सन १७१४ मधे गोपाळ महादेव सिद्रस ओक व कृष्णाजी केशव ओक ब्रह्मवणेकर हे जंजिऱ्यास गेले व तेथून तानाजी नाईकास हुकूम आणिला की गावोगावचे शिष्ट व रयत यांना पालशेतला बोलावून आणून पालशेतच्या महाजनकीची काय हकीगत आहे त्याबद्दल साक्षी घेऊन त्या लिहून पाठविणे. ज्याचे मुलीचे लग्नात बालाजी कृष्ण ओक ब्रह्मवणेकराचा कज्जा झाला होता त्या अंतो हरी सोहोनी ( वय ८० ) याची साक्ष ( लेखांक ११ ) ब्रह्मवणेकराविरुद्ध झाली. त्या चौकशीचा निकाल काय झाला त्याचे कागद आढळले नाहींत. पण तो ब्रह्मवणेकरासारखा झाला असला पाहिजे; कारण सन १७१८ मधे कानोजी आंगरे यानी मोईन मुक्रर केल्याची गावोगावची यादी आहे ( लेखांक १७ ) त्यात पालशेतचे महाजन म्हणून रु. १५ केसो विश्वनाथ कानिटकर व रु. ९ कृष्णाजी केशव ओक ही दोन नावे आहेत. तसेच सन १७२८ मधे आदिलशाहीतील शेख हसन हवलदार व कारकून ताा हमजाबाद सुभा दाभोळ यानी मोईन मुक्रर केल्याचे यादीत रु. ७।। केसो विश्वनाथ कानिटकर व रु. ४।। कृष्णाजी केशव ओक महाजन ही नावे महाजन म्हणून आहेत ( लेखांक १८ ). इ. स. १७३२ च्या श्रीपतराव प्रतिनिधींच्या धामधुमीत ओक पुन्हा परागंदा झाले. ( लेखांक १२ ) व त्याची महाजनकी चालली नाहीं. पे. द. घ. रु. ४२१ मधे सन १७६९ चा खर्च आहे त्यातील दफाते पत्र विसाजी केशव कानिटकर महाजन पालशेत एवढाच आहे. ओकांची महाजनकी पुन्हा चालू करावी म्हणून परशराम बल्लाळ ब्रह्मवणेकर व भास्कर बाबाजी ओक कोतळूककर ( वंशावळ क्र. १·५ अ ) यांनी चिमाजी माणकर सुभेदार याजकडे अंजनवेलीस जाऊन विनंती केली. शामलाचे वेळचे कागदपत्र पाहून व गावकऱ्यांची हकीगत ऐकून सुभेदारांनी निकाल दिला की परशराम कृष्ण ओक ब्रह्मवणेकर हे पूर्वी महाजनकी चालवीत व त्यापूर्वीही ब्रह्मवणेकर महाजनकी चालवीत होते त्यावरून परशराम बल्लाळ ओक याचे नावे पालशेतच्या महाजनकीची सनद झाली व महाजनकीचा मुशाहिरा पूर्वीप्रमाणे त्यांना देण्याचा हुकूम झाला (लेखांक १०). सन १७७७ च्या जमा वसुलाचे हिशोबात मोईनबद्दल नेमणुकीचे आकडे आहेत त्यात रु. १५ राघो केशव कानिटकर व रु. १२ परशराम बल्लाळ ओक महाजन अशी दोन नावे महाजन म्हणून आहेत (लेखांक १९) सन १७७८, सन १७७९ व शके १७०४ ( म्ह. सन १७८३ ) मधेही याचप्रमाणे नेमणुकीचे आकडे आहेत.

अंतो हरी सोहोनीचे मुलीचे लग्नात तंटा झाला म्हणून ओक पालशेतहून परागंदा झाले. ते पालशेतहून पूर्वेस वेळंब वरून सुरलकडे गेले ( पहा नकाशा क्र. २ ) मराठी राज्यात महाजनकी करणारे बालाजी कृष्ण सुरलला मारले गेले ( लेखांक १२ ). त्यचों बरोबरच त्यांचे कोणीतरी आप्त सुरलच्या दक्षिणेस दोन अडीच मैलांवर असलेल्या कोतळूक गावी गेले असावेत. कारण कोतळूकला प्रथम आलेले ओक " हे पुरातन पालशेतचे महाजन इनामदार. शिवाजी महाराजांचे पहिले अमदानीपासून ओक ( कोतळूकची )

खोती करतात. केसो महादेव ओक पालशेतहून आला अशी हकीगत साने ओक खोती तंट्यातील साक्षीदारांनी सांगितली आहे (लेखांक २०). कोतळूकचे नाव पूर्वी सुरल कोतापूर होते. (लेखांक २२) सुरल निराळे होऊन कोतापूरचे कोतळूक झाले. कोतळूकचा ओक वंश हा ब्रह्मवणेकर ओक महाजनांपैकी ठरतो आणि म्हणूनच श्रीपतराव प्रतिनिधींच्या धामधुमीनंतर ब्रह्मवणेकर ओकांची बंद झालेली महाजनकी पुन्हा चालू करण्याच्या विनंतीकरता परशराम बल्लाळ ओक यांचे बरोबर भास्कर बाबाजी ओक कोतळुककर हे चिमाजी माणकर सुभेदाराकडे गेले होते (लेखांक १०). पालशेतच्या ओकांचे तीन संतान म्हणजे तीन वंश एका साक्षीदारानी लेखांक ११ मध्ये सांगितले आहेत. त्यांपैकी एका गटात ब्रह्मवणेकर व कोतळूककर दोघेही आहेत. ब्रह्मवणेकर ओक महाजनांपैकीच कोतळूकचे ओक होते असे अनमान चूक होणार नाही.

## प्रकरण सहावे

# कोतळूककर ओक

हमजाबादेची ४।। महालांची देशमुखी ओकांना मिळाली. त्याच्या सरंजामास आठ गाव दिले (ले. ३ ) त्या आठही गावांची वतनी खोती ओकांची होती ( ले. २१ ). त्या आठ गावांपैकी कोतळूक हा एक होता. त्यामुळे कोतळूकची खोती ओकांची होती पण कोतळूकचे साने व ओक यांचा त्या खोतीबद्दल तंटा सन १७१५ मधे सुरू झाला. तंट्याची हकीगत पेशवे दप्तरात आठ निरनिराळया रुमालांत आढळली. त्याआधारे पुढील इतिहास लिहिला आहे. तंट्यातील जाबजबाबावरून व साक्षीपुराव्यावरून दोन काळांत परस्परविरोधी निकाल कसे दिले गेले, दडपणे कशी पडत असत, जबरदस्ती कशी होत होती हे कळते.

कोतळूक हा गाव पूर्वी सुरलकोतापूर होता. त्याचे खोत नानल होते. पुढे सुरल गाव निराळा झाला व कोतापूरचे नाव कोतळूक झाले. नानलाने सुरलची खोती स्वतः-कडे ठेवली व कोतळूकची खोती सान्यांना दिली अशी हकीकत रघुनाथभट आचार्य साक्षीत सांगतात ( ले. २२ ). साने स्वतःच्या जबाबात फक्त सांगतात की इदिलशाहाचे कारकीर्दीत नारो गोविंद साने खोती करीत होते व शिवाजी महाराजांचे कारकीर्दीत त्यांचे पुत्र महादजी नारायण साने खोती करीत होते. ( ले. २२ )

ओक हे पुरातन पालशेतचे महाजन मिरासदार हे सर्वांना मान्य होते (ले. २०). शिवाजी महाराजांच्या काळात हरबाजी केशव ओक पालशेतात होते. तेथे त्यांच्या घरा-वर दरोडा पडला. ते सान्यांचे सोईरे म्हणून त्यास सान्यांनी कोतळुकास आणून गावा-तील किरवले ( करिवल ) या भागात ठेविले. काही साक्षीदार सांगतात की, शिवाजी महाराजांच्या कारकीर्दीत केशव महादेव, हरबाजी केशवचे वडील हे कोतळुकास येऊन राहिले. महाजन ओकांची हकीगत अन्यत्र आहे. त्यात पालशेतचे महाजन बाळाजी कृष्ण हे शिवाजी महाराजांच्या अमलात काही तंट्यामुळे परागंदा झाले ते सुरलच्या ओढयात मारले गेले ( ले. १२ ) असे आले आहे. त्यांपैकी ओक महाजन कोतळूकला आले

असावेत. साने-ओक तंट्यातील पंधरा आसामींचे साक्षीत खोती ओकांची वतनी म्हणून सांगितले आहे त्यांपैकी सहा आसामींनी ओक पालशेतहून आले हेही मान्य केले आहे. ओकांचे म्हणण्याप्रमाणे हरबाजी केशव ओक कोतळूकची खोती करीत असता कापरे गावाहून साने आले. त्यांना ओकांनी आश्रय दिला. (ले २२) कापऱ्याची खोती केसो गोविंद साने यांना त्यांचे मामा चितळे यांनी शिवाजीचे अंमलापूर्वी दिली होती. (ले. २२). कापरेगाव चिपळूणच्या पश्चिमेस पाच सहा मैलांवर आहे.

संभाजी राजे यांच्या कारकीर्दीत कोतळूक गाव आपला म्हणून शिर्के जोरा करीत (ले. २०) होते. त्यावेळी नारो महादेव साने व बाबाजी नारायण ओक यांनी पंत अमात्यांकडे जाऊन शिर्क्यांना दूर केले (ले. २१) भालेराईत म्हणजे सन १६८८ चे सुमारास साने मोडकळीस आले. ओक खोती करीत होते. सन १६९८ मध्ये हबशी यांचा अंमल झाला. तेव्हा साने भाऊबंदासुद्धा कल्याणास गेले. काही दिवसांनी साने परत आले. ओक सान्यांना खोती देईनात म्हणून सन १७१५ मध्ये बालाजी खाडिलकर वर्तक हे सुवर्णदुर्गाहून कोतळुकास पाहणीस आले त्यांच्या समोर हा वाद प्रथम मांडला गेला ( ले. २० व २१ ) जाबजबाब व साक्षी झाल्या पण फडशा झाला नाही. बाबाजी नारायण ओक त्यावेळी खोती करीत होते. कोतळूकचा मिरासदार काना महार हा कोतळूकची खोती सान्याची असे म्हणत होता. म्हणून बाबाजी नारायण ओक यांनी त्याला त्याच्या अंगास गवत बांधून जाळण्याचा धाक घातला होता असा त्या ९० वर्षे वयाच्या महाराचा सन १७१५ मधे पहाणीदारापुढे दिलेला जबाब आहे. ओकांचे आप्त राघोबा नाईक दर्वे यांचे पेशवे दरबारात वजन फार होते, यास्तव खोतीच्या तंट्यातील कुणबी साक्षीदारांना खोड्यात घातले होते (ले. २२) व इतर साक्षीदारांवर जबरदस्ती झाली असा सान्यांनी ओकांवर आरोप केला होता.

सिद्दी सातचे अमलात ओक खोती करीत असता सिद्दी सैद हुनावरी यांनी निम्मे खोती घेतली. त्याचे व बाबाजी नारायण ओक यांचे जमेना म्हणून ओक परागंदा होऊन दक्षिणेस शास्त्री नदी ओलांडून रत्नागिरी तालुक्यात जयगडजवळ नांदिवडे ता. सैतवडे येथे जाऊन राहिले. पाच सात सालांनंतर १७३२ च्या सुमारास कोकणात प्रतिनिधी उतरले तेव्हा सिद्दीकडून सुरक्षिततेचे आश्वासन म्हणजे कौल मिळाला. त्यावेळी बाबाजी नारायण ओक हयात नव्हते. त्यांचा मुलगा भास्कर बाबाजी अल्पवयी होता व मालगुंड येथे राहात होता ( ले. ६ ) त्याच्या तर्फे पांडुरंग शेणवईकडून खोतीचा कारभार काही वर्षे चालविला. तुळाजी आंगरे याचा अंमल स. १७४५ मधे झाला. तेव्हा वासुदेव नारायण सान्यांनी खोतीविषयी तंटा उकरून काढला. सन १७५७ मधे पुण्यास रामाजी महादेव ( सुभेदार ) आले असता त्यांचे पुढे वासुदेव नारायण साने यांनी आपली तक्रार मांडली व पुण्यातच काही साक्षी झाल्या. पुढे दोन वर्षांनी स. १७५९ मधे अंजनवेलीस चिमाजी माणकर याचेकडे जाऊन खोतीबद्दलचे शके १३६८ चे एक पत्र सान्यांनी दाखविले व तंट्यास उभे राहिले ( ले. २२ ); पण सान्यांच्या

बाजूच्या साक्षीदारावर जबरदस्ती झाली म्हणून फडशा झाला नाही. सन १७६६ मधे नारायण वासुदेव साने व विसाजी केशव साने यांनी सरकारात जाऊन भास्कर बाबाजी ओक हे खोतीविषयी तंटा करतात असा दावा केला. मौजे नांदिवडे, तालुके रत्नागिरी येथील कऱ्हाटेश्वराचे देवालयात पृथक पृथक साक्षी लिहून घेतल्या त्या ज्या त्या साक्षीदारांनी आपल्या साक्षी श्रीचे पिंडीवरून उचलून दिल्या. या साक्षीदारांत काही कुणबी, महार आहेत; त्यांना श्रीचे पिंडीपर्यंत त्या काळात जाता आले असेल असे वाटत नाही. या नांदिवडे येथील चौकशीचे वेळी सान्यांनी सन १७२३ चा एक कागद दाखविला. तो कागद यापूर्वीच्या चौकशीचे वेळी ओकांचे दहशतीमुळे दाखविला नाही असे साने यांनी लिहून दिले. तो कागद मागील तारीख टाकून नव्याने तयार केलेला आहे असा ओकांनी दावा मांडला. तो कागद खोटा असल्याबद्दलचा पुरावा तीन महिन्यांत देण्याचे ओकांनी सन १७६८ मधे मान्य केले. पण ते घडून आले नाही. नारायणराव पेशव्यांचा वध होऊन त्याची पत्नी गंगाबाई पुरंदरास असता तेथे सखाराम विश्वनाथ साने याचे आधिपत्य होते म्हणून सान्यांच्या हिमायतीपुढे दाद लागेना; म्हणून भास्कर बाबाजी ओक कुटुंबसुद्धा इंग्रजांचे राज्यात म्हणजे बाणकोटास पळून गेले. सन १७७५ मधे बाणकोटवर इंग्रजांचा अंमल झाला होता. भास्कर बाबाजी ओक यांजकडून सान्यांचा कागद खोटा असल्याबद्दलचा पुरावा सादर झाला नाही म्हणून सन १७७६ मधे कोतळूक गावाच्या खोतीचे वतन सरकारात जप्त केले गेले. ( ले. २३ ). वतन जप्तीत असता सन १७७८ मधे भास्कर बाबाजी ओक याने बाणकोटहून कोतळुकवर स्वारी घालून गाव जाळिला. जमाखर्च जळाले त्यामुळे गावावरची बाकी नुकसान खर्ची लिहिली ( ले. २५ ). सन १७८० मधे रामशास्त्री व पंचायतीपुढे खोतीबाबाचे सन १७१५ चे पहाणीदारापुढील व सन १७६८ चे नांदिवड्यास घेतलेले साक्षीपुरावे यांचा ऊहापोह होऊन सान्यांनी दाखविलेला सन १७२३ चा कागद खरा मानला गेला. साने खरे व ओक खोटे ठरले.म्हणून खोतीचे वतन जप्तीतून मोकळे करून साने यांचे स्वाधीन करण्याची आज्ञा झाली. त्याबद्दल एक हजार एक रुपये पेशवे सरकारात जमा झाले ( ले.२४ )

सन १७७८ मधे ओक परागंदा होऊन इंग्रज राज्यात गेले तिकडेच वीस बावीस वर्षे होते. भास्कर बाबाजी ओक तिकडेच निवर्तले असावेत. कारण सन १८०१ मधे त्यांचा पुतण्या भिकाजी बल्लाळ ओक यांनी पेशव्यांकडे दाद मागितली. सान्यांनी दाखविलेला सन १७२३ चा कागद खोटा ठरला; कारण ज्याच्या नावाचा कागद होता ते विसाजी केशव साने त्यावेळी दहा वर्षांचे होते व त्या वयात ते जंजिऱ्यास जातील हे संभवनीय नव्हते. शिवाय त्यावेळी विसाजी केशवचे वडील जिवंत होते. कागदावर हिजरी व अरबी दोन्ही सन घातलेले होते त्यांमधे दोन वर्षांची तफावत आढळली. या कारणावरून खुर्दखताचा कागद मागील सन घालून नवा केला असे सिद्ध झाले. पूर्वी तीनही वेळा ओकांच्या जबरदस्तीमुळे कागद दाखविला नाही हे बोलणे प्रमाण नाही.

म्हणून भिकाजी बल्लाळ ओक याजकडे खोतीचे सर्व काम मानपान सुपूर्त करण्यात आले (ले. २७). येथे खोतीचा ७५ वर्षांचा तंटा संपला. बाणकोटास जाण्यापूर्वी सन १७७२ मधे भिकाजीपंत ओक वेळणेश्वरास सुभेदाराबरोबर गेल्याचे चाफेकर कुल-वृत्तांत पृ. १६ वर छापलेल्या नारळाच्या हिशोबावरून दिसते. सन १७७१ त भिकाजी बल्लाळ खोत मौजे कोतळूक यांना सन १७६१ च्या सनदेस अनुसरून भात देण्याबद्दलची आज्ञा आढळते ( ले. २८ ).

इ. सन १७८० मधे कोतळूकची खोती विसाजी केशव साने यांचे नावे करून दिली ती सन १८०१ पर्यंत त्यांचेकडे होती. मध्यंतरी सन १७८८ मधे त्यांनी ' येक गाव नूतन इनाम करून दिला पाहिजे ' म्हणून पेशव्यांना विनंती केली त्यावरून त्यांना कोतळूक हा गाव इनाम करून दिला. ( ले. २९ ). हे इनाम त्यांचे मृत्यूपर्यंत म्ह. सन १८०४ पर्यंत त्यांचेकडे चालले होते. त्यांचे पुत्र सखाराम विश्वनाथ हे सरकार अपराधी म्हणून इनाम त्यांचे नावे झाले नाही. ते रा. खंडेराव निळकंठ याजकडे बंडवाले यांचे बंदोबस्ता-करिता छ १६ रबिलावल स. १८०४ मध्ये दिले ( ले. ३० ). पण चार एक महिन्यांत म्ह. छ. २२ रजब स. १८०४ ला तो खंडेरावाकडून काढून बाळकृष्ण गंगाधर याजकडे दिला. (ले. ३१). एकाच गावाला खोत व इनामदार या दोन व्यक्ती असत असे दिसते.

भास्कर बाबाजी ओक यांच्या आयुष्यभर सान्यांची खोतीविषयी तक्रार चालू होती त्यास ते तोंड देत होते. याशिवाय मौजे केतकी, मौजे बिवली व मौजे करंबवणे ह्या चिपळूण तालुक्याच्या ईशान्येकडील तीन गावांच्या खोतीबद्दल केतकर व भितेकर यामधे तंटा होता म्हणून ती खोती जप्त करून तिची कमाविस सन १७६५ मधे भास्कर बाबाजी ओक यांना सांगितली होती. (ले. ३२ ) सन १७७६ मधे खोती पुन्हा केत-करांकडे दिली. (ले. ३३)

भास्कर बाबाजी ओक बरेच उलाढाली करणारे होते असे दिसते. ओकांची पालशेतची महाजनकी परशराम बल्लाळ ओकांचे नावावर पुन्हा चालू करून घेण्या-करिता अंजनवेलीस सुभेदाराकडे परशराम बल्लाळबरोबर भास्कर बाबाजी इ. स. १७६१ मधे गेले होते. ( ले. १० ) भालेराईनंतर ( सन १६८८ ) ओकांकडील देशमुखी बरीच वर्षे चालली नाही ती आपली देशमुखी परत मिळविण्यासाठी मळणकर ओकांबरोबर भास्कर बाबाजीही मसलतीत होते. (ले. ६). सरदेशमुखीचा हक्क देण्याचे भास्कर बाबाजी ओक खोत मौजे कोतळूक यांनी इतर वतनदारांप्रमाणे दोन तीन वर्षे नाकारले होते. तो दिला पाहिजे म्हणून पेशव्यांची सन १७७१ ची आज्ञा झाली. ( ले. ३४ )

# प्रकरण सातवे

# महादाजी खंडेराव

ब्रह्मवणेकर, सिद्रस व कोतळूककर याखेरीज आणखी चौथा महाजन म्हणविणारा वंश आढळतो ती वंशावळ क्र. १३ मधे दिली आहे. त्यापैकी चौथे पुरुष गणेश बल्लाळ हे सन १७०५–१७०६ मधे त्र्यंबकेश्वरला गेले होते व बरोबर मातोश्री भागिर्थी होत्या असे तीर्थोपाध्याय फडके गुरुजी यांचेकडील उताऱ्यात आहे. गणेश बल्लाळांचा मुलगा खंडो गणेश स. १७७९–८० मधे मृत्यू पावला ( लेखांक क्र. ३६ ). यावरून गणेश बल्लाळ हे आपल्या मातोश्रीना घेऊन त्र्यंबकेश्वरला २५–३० वर्षांचे असताना गेले असा अंदाज केला तर त्या वंशातील पहिला पुरुष हा महादो गणेश महाजन ( लेखांक १ ) याचेबरोबरचा असावा असा हिशोब येतो. गणेश बल्लाळ यांचा लेख घृष्णेश्वरला हल्लीचे राजारामभट पैठणकर यांचे कडील वहीत आहे. त्यात गाव पालशेत सुखवास देवळाली दिला आहे. इ. स. १७७२ त पाा नाशिकची मामलत कोणा खंडो गणेशाकडे होती (लेखांक ३७). गणेश बल्लाळ हे देवळालीस म्हणजे नाशिकनजीक होते, म्हणून नाशिकची मामलत मिळविणारे खंडो गणेश हे गणेश बल्लाळांचे चिरंजींव असावेत असे साहजिक वाटते. खंडो गणेश तसे वजनदार इसम असावेत. कारण शितोळ्यांना त्यांच्या दत्तक प्रकरणात खर्ची दिली व इतर कामकाजात उपयोगी पडले व दत्तक शाबीत झाला. त्याकरिता शितोळ्यांनी त्यांना सन १७७६ मध्ये पाषाण ताा हवेली प्रांत पुणे येथील १५ बिघे जमीन बाग करण्यास बक्षीस दिली. ( ले. ३५ ).महादजीं खंडेराव यांचे जमाखर्चात ( ले. ३८ ) पाषाणच्या जमिनीचे बरेच उल्लेख आहेत. खंडो गणेश सन १७७९–८० मधे मृत्यू पावले. ( लेखांक ३१ ).

खंडो गणेश यांचे पुत्र माहादाजी खंडेराव कोकणातून तांदूळ खंडी सात व फिर्गाण माल आणतील त्यावर जकात घेऊ नये, अशी जकात माफीपत्रे माहादाजी खंडेराव यांचे नावाची सन १७८० पासून सन १७८९ पर्यंतची प्रत्येक वर्षाची पे. द. घडणी रु. ३९९ मधे आहेत. त्यात स. १७८० च्या माफीपत्रात “सदरहू दस्तक

सालाबाद खंडो गणेश यांचे नावे होतें तें मृत्यू पावले; सबब साल मजकुरापासून त्यांचे पुत्राचे नावे करार करून दिला असे. म्हणजे खंडो गणेश यांनाही अशी माफीपत्रे दिली जात असत.

पाच्छापूरकरच्या बखरीवरून काही माहिती ठाण्याचे श्री. वि. ल. भावे यांनी आपल्या मराठी दप्तर रुमाल २ मधे लेखांक १ मधे पा. ४ वर छापली आहे. त्यावरून महादाजी खंडेराव ओक हे सन १७८६ मधे कित्तूरचे सुभेदार होते. त्यांचे बंधू रामचंद्रपंत ओक होते. सांगोल्यास कोणी बळवंतराव ओक व हरिपंत फाळके होते. महादाजी खंडेरावांचे सन १७८६ पासून पुढील दहाबारा वर्षांचे जमाखर्च आहेत. त्यांत बळवंतराव दादांनी चर्मी जोडा विकत घेतला म्हणून दाहा आणे खर्च पडला आहे. अर्धा आणा बळवंतराव दादाकरिता व पाव आणा चि. गणोबाकरिता न्हावी खर्च पडला आहे. सात रु. बळवंतराव दादा यास धोतरजोडा खरेदी केल्याचा खर्च आहे ( लेखांक ३८ ). या खेरीज पैशाच्या देवघेवीचा, मोती खरीदण्याचा असा अन्य खर्च गुजारत ( म्ह. मार्फत) बळवंतराव असा आहे. त्यावरून बळवंतराव ओक हे महादाजी खंडेरावाचे थोरले भाऊ असावेत. हरिपंत फाळके यांचेही नाव जमाखर्चात आढळते. यांचे नाव हरि गोविंद फाळके असे दिले आहे ( फाळके म्ह. काश्यपगोत्री भट) हे ओकांचे विश्वासू गृहस्थ असावेत. बळवंतराव ओक व हरिपंत फाळके हे सांगोल्यास असताना कित्तुरकर देसाई यांनी सांगोल्यास वेढा दिला होता व बळवंतराव व हरिपंत यांना कैद केले होते. त्यांची मुक्तता सुभेदार व देशपांडे बागेवाडीकर यांच्या मध्यस्थीने झाली याच वर्षी धोंडोपंत गोखले श्रीरंगपट्टणच्या स्वारीहून परत आले होते. त्यांनी येऊन कित्तुरकराचा मोड केला व तालुक्याचा बंदोबस्त महादाजी खंडेराव याच्या हवाला करून आपण निजामाच्या मोहिमेवर गेले ( गोखले कुलवृत्तांत ) सवाई माधवराव रोजनिशी लाड पृ. १७६ कित्तुरच्या कारभाराबाबत महादाजी खंडेराव यांचे नावे सनद छापली आहे महादाजी खंडेरावांकडे पाषाणहून गाईचे दूध आणल्याचे बरेच उल्लेख जमाखर्चात आहेत. खंडो गणेशना पाषाणची जमीन बक्षीस मिळाली होती ( लेखांक ३५ ).

सदाशिव पेठेत नगरकर तालमीवरून सोटया म्हसोबाकडे जाणाऱ्या रस्त्यावर व शनवारपेठेत मेहुणपुऱ्यात खंडो गणेश ओक यांची घरे होती असे पे. द. तील जमाव पुणे प्रांत, रुमाल क्र. १७० मधील घरांच्या खानेसुमारीवरून दिसते. सन १७९० व १८०० च्या खानेसुमारीत मेहुणपुऱ्यातील घराला खंडो गणेश यांचे नाव आहे. नंतर १८०३ व १८११ साली महादाजी खंडेराव यांचे नाव आहे. सदाशिव पेठेतील घर महादाजी खंडेरावांनी मिळविले असले पाहिजे. सन १८११, १८१५ व १८१८ च्या खानेसुमारीत महादाजी खंडेराव यांचे नावे ते आहे. सदाशिव पेठेतील घरात भाडेकरू होते असे जमाखर्चावरून दिसते. गणपतराव जिवाजी जोग यांचेही घर मेहुणपुऱ्यात रास्ते यांच्या वाड्यासमोर होते ( जोग कुलवृत्तांत ). गणपतराव जिवाजी जोग यांचे वडील स. १७९३ मधे कोकणचे सरसुभे होते. जोग व ओक ही दोन्ही कुळे

समव्यवसायी व पुण्यात शेजारी राहणारी होती. गणपतराव जिवाजी व महादाजी खंडेराव यांनी अक्कलकोटच्या भोसल्यांचे सरदार रुस्तमराव पांढरे शरीफन्मुलुक यांच्याकडील सरंजामाची जिम्मेदारी पत्करून सरकारी नजराणा इत्यादीचा भरणा केला होता. ते पांढरे यांचेकडून येणे फिटण्यासारखे नव्हते, म्हणून सन १७९५–९६ साली तो सरंजाम जोग व ओक यांच्या नावावर करून देण्यात आला ( लेखांक ३९ ) या दोन सावकारांचा व अक्कलकोटचे शहाजी भोसले यांचा तंटा होता म्हणून पांढरे यांचा सरंजाम स्वतःचे नावावर करून घेताना सरंजामाबदली आम्ही भोसल्यांकडे चाकरी करणार नाही अशी अट त्यांनी सरंजामाच्या बंदोबस्ताच्या कलमात घातली होती. ( लेखांक ४० ).

महादाजी खंडेराव याचे बंधू रामचंद्र खंडेराव हे सन १७८६ च्या सुमारास कित्तूरकर देसाई यांच्या धामधुमीच्या वेळेला सांगोल्यास होते. हे दप्तर-कारकून होते ( लेखांक ४१ ). महादाजी खंडेराव हे पांढरे यांच्या सरंजामाचा कारभार करीत असता रामचंद्र खंडेराव हे माहाली आले होते. त्यास दोन वर्षांचे रु. २४०० पालखीबद्दल दिल्याचा सन १७९२ मध्ये खर्च पडला आहे. रामचंद्र खंडेराव ओक यांचे कारकीर्दीत जप्ती झालेले एक गाव मोकळे केल्याबद्दल व दुसरे साकुरडे हा गाव इमल्यातील खोतीने असल्याने आणखी एक महिना जप्ती करू नये; सरकारी हुकुमाची वाट पाहावी अशाबद्दलची सन १८१२ मधील दोन पत्रे पे. दप्तरात कों. ज. रु. ५४८ मधे आहेत. रामचंद्र खंडेरावांना कंपनी सरकारकडून द. म. रु. २०० पेन्शन मिळत होते असे सन १८२१–२२ च्या पेन्शनरांच्या यादीत आहे ( ले. १६२ ).

रामचंद्र खंडेरावांचे चिरंजीव गणेश ओक यांनाही इंग्रजी अमलात रु. ६०० वार्षिक पेन्शन मिळत होते. पेन्शनसाठी त्यांनी सन १८२८ त अर्ज केला होता. त्यावर रिपोर्ट झाला होता ( लेखांक ४१ ) त्यावरून रामचंद्र खंडेराव हे पेशव्याकडे दप्तर कारकून म्हणून होते व डेक्कन कमिशनरकडेही दोन वर्षे दप्तर कारकून म्हणून काम केल्याचा उल्लेख आहे. गणेश रामचंद्रांनी एक वर्ष दप्तरकारकून म्हणून काम केले होते. सन १८२८ त अर्ज केला यावरून रामचंद्र खंडेराव त्या वर्षी अगर अगोदरच्या वर्षी वारले असले पाहिजेत. गणेश रामचंद्र १३ फेब्रुवारी सन १८४२ मधे वारले ( लेखांक ४२ ). त्यांचा जन्म १७९४–९५ चा आसावा. कारण महादाजी खंडेरावाचे जमाखर्चात स. १८०० मधे त्यांना लिहावयास शिकविणाऱ्या पंतोजींना चार महिन्यांचे दोन रुपये दिल्याचा खर्च आहे. त्याच जमाखर्चाच्या सन १८११ च्या नोंदीवरून त्या वर्षी गणेश रामचंद्र व्यवहार पाहू लागल्याचे कळते.

यापुढील वंशवेल समजला नाही. नगरकर तालीम चौक ते सोट्या म्हसोबा या रस्त्यावर महादाजी खंडेराव यांचे घर सन १८११ ते १८१५ मधे होते, हे वरील मजकुरात आले आहे. त्या रस्त्यावर सेवासदन ते उंबऱ्या गणपती चौकाच्या दरम्यान हल्लीच्या लक्ष्मीपथावर कित्येक पिढया चालत आलेले ओकांचे घर आहे. त्यांच्या पूर्वजांची नावे

त्रिंबकेश्वरच्या लेखावरून मिळतात. त्यात बळवंत या नावापर्यंत आपण पोचतो ( वं. १.४ ( अ ) या बळवंताच्या हयातीचा काळ व महादाजी खंडेराव यांचे बंधू बळवंतराव दादा यांचा काळ एकच येतो. त्यावरून असे वाटते की, या बळवंतराव दादांचे वंशज ते ओक असावेत.

# प्रकरण आठवे

# सावनूरचे दिवाण

खंडो गणेश ओक यांच्याबद्दल सविस्तर माहिती मागील प्रकरण ७ मधे दिली आहे. त्यातील माहितीपैकी ( १ ) हे वजनदार इसम होते. ( २ ) त्यांना रामचंद्रपंत नावाचा मलगा होता. ( ३ ) तो सरदार पटवर्धनांकडून कित्तूर, सांगोला या सावनूर-कडील प्रांतात लढाईत होता व ( ४ ) त्यांचा मृत्यू सन १७७९-८० मधे झाला या गोष्टी विशेषतः सावनूरच्या दिवाण खंडेरावाशी जमतात. यावरून खंडो गणेश ओक हेच सावनूर नबाबाचे दिवाण होते काय असा संशय उत्पन्न होतो.

सावनूर नबाबाचे दिवाण म्हणून कोणी खंडेराव होते. या खंडेरावाबद्दल वासुदेव वामनशास्त्री खरे यांच्या ऐतिहासिक लेखसंग्रहातील मिरजेच्या सरदार पटवर्धनांच्या पत्रव्यवहारात बरेच वेळा उल्लेख आहेत. त्यात दिवाण खंडेराव नावाचा एक मराठा ब्राह्मण एवढ्या उल्लेखाखेरीज त्याच्या आडनावाचा अगर गावाचा मुळीच उल्लेख नाही. खरे शास्त्री यांच्या ऐ. ले. संग्रहातील सन १७७७ नवंबरच्या परशरामभाऊंच्या पत्रात खंडेराव हे हैदरच्या पक्षातील असे लिहिले आहे. हैदर प्रारंभी म्हैसूरच्या राजाचे सेनापती होते व खंडेराव दिवाण होते. हैदरचा दिवाण खंडेराव हा एक मराठा ब्राह्मण होता ( खरे ऐ. ले. सं. पृ. ६६२ ते ६८७ ) सन १७६१ मधे खंडेरावांनी म्हैसूर राजाची बाजू घेऊन गोपाळ हरी पटवर्धन यांच्या सहकार्याने हैदरला हरविले होते. पुढे हैदराने खंडे-रावाला पकडून पिंजऱ्यात कोंडून ठेविले व दोन वर्षांनी पिंजऱ्यातच खंडेराव मेला अशी कथा **Historical Sketches of South India by Mark Wilks 1869 edition** मध्ये दिली आहे. खंडेरावांना रामचंद्र नावाचा मुलगा होता. कारण ऐ. ले. संग्रह पृ. १४४१ वर सावनूरच्या कारकुनांनी सरदार गोपाळराव पटवर्धन यांना ६ नवंबर १७६९ ला लिहिलेले पत्र आहे. त्यात " बाळाजी गणेश यास हदरखान यांनी खंडेराव यास बोलाविणे पाठविले आहे . . . सामोरे आणावयास खंडेराब याचे पुत्र रामराव गेले होते तसेच रामचंद्रपंताला पेशव्यांनी आपल्याकडे लावून घ्यावे अशीही इच्छा खंडेरावांनी

प्रदर्शित केली होती. नवंबर १७७५ च्या एका पत्रात लक्ष्मेश्वरचे मामलेदार पांडुरंग तात्या पटवर्धनास लिहिलेल्या पत्रात ( ऐ. ले. सं. पृ-२४११ ) लिहितात, " राजश्री खंडेराव, दिवाण सावनूर यांनी स्वामीस पत्र लिहिले आहे. त्यांचा भाव जे आपला पुत्र हजार पाचशे स्वारानिशी सरकारात अगर स्वामीकडे ठेवावे. सरकार सेवा करून दाखवून आपले ऊर्जित स्वामीचे हातून करून घ्यावे. हा दरबार मोगलाई. याजकरिता मातबराचे पदरी एक मूल असावा असा मानस आहे " स्वामींनी लिहिले, ' प्रसंग पडलेस रामचंद्रपंत याचे साहित्य तुम्ही करीत जावे...लष्कर देशी आलेवर तुमचे मनोदयानुरूप घडेल ' या विनंतीप्रमाणे रामचंद्र खंडेराव यांना पटवर्धनांकडे लावून घेतले असावेत. कारण पेशव्यांकडून सरदार पटवर्धनांचे आधिपत्याखाली कित्तूर, सांगोला इत्यादी सावनूरकडील भागात ज्या रामचंद्रपंत ओकांचे नाव आढळते[1] ते हेच खंडेरावांचे चिरंजीव असावेत. कारण या रामचंद्रपंताचे नावाबरोबर सांगोला, कित्तूरकडील लढाईत महादाजी खंडेराव, बळवंतराव ओक, हरिपंत फाळके ही नावे आहेत. ती नावे महादाजी खंडेराव यांचे जमाखर्चात ( ले. ३८ ) आढळतात. त्यावरून हे रामचंद्र खंडेराव ओक होत.

खंडो गणेश यांचा मृत्यू सन १७७९-८० मध्ये झाला ( ले. ३६ ) खंडेराव दिवाणांचा मृत्यूही त्याच सुमाराचा देतात. त्यांच्या निधनाची दिलेली हकीगत विपरीत असावी असे वाटते.[2] ज्या पुस्तकात ती माहिती आहे त्यातच ' नाना म्हणजे वडील म्हणून पेशव्यांना नाना म्हणत असत ' आणि ' माधवरावाचा वध राघोबानी केला ' अशी खुळचट विधाने त्यात आहेत. म्हणून खंडेराव पिंजऱ्यात मेला हे त्याचे विधान खोटे समजणे सोइस्कर आहे. ह्या पुस्तकाची व हैदर व टिपूचा इतिहास **M. M. D. L. T.** या लेखकाच्या पुस्तकाची आवृत्ती काढताना टिपूच्या एकुलत्या एका मुलाने ही विधाने दोहोंतही घातली का कळत नाही. पिंजऱ्यात ठेवल्याची ही कथा सन १७६२-६३ ची असावी असे त्या दोन्ही पुस्तकांत आहे. ऐ. ले. सं. पृ. ३०२७ वर सन १७७७ त खंडेराव कैदेत आहेत व त्यांचे फार हाल होत आहेत एवढेच दिले आहे.

खंडो गणेश ओक यांच्याकडे सन १७७३ मध्ये नाशिकची मामलत होती ( ले. ३७ ) पण त्यासाठी त्यांना स्वतःला तेथे राहावे लागत नसे, म्हणून त्या कालात ते हैदरकडे किंवा सावनूरकडे असणे शक्य आहे.

---

१. गोखले रास्ते घराण्याचा इतिहास पृ. १९१ व पाच्छापूरकर बखर, पृ. ४ ले. १ व मराठी दप्तर-रुमाल २ ले. वि. ल. भावे.

२. Historical Sketches of S. India by Mark Wilks 1869 edition.

## प्रकरण नववे

# पांगारकर ओक

पालशेतच्या पांगार भागात शेतीभाती सन १७०० पूर्वीपासून ज्या ओकांची होती ते पांगारकर ओक म्हणून ओळखले जाऊ लागले. या घराण्यापैकी पांडुरंग भट्ट जनार्दन यांच्या त्रिंबकेश्वराच्या लेखात "उपनाव ओक पांगारकर खोत व देशमुख" असे दिले आहे. ओकांच्या देशमुखीत हे सहभागी होते, पण महाजनकीत नव्हते, असे दिसते. वेळंबचा कोडपांगारी हा देशमुखीच्या सरंजामापैकी एक गाव होता. त्याचा पांगारकर नावाशी संबंध नाही. त्या गावची खोती वेळंबच्या दहाव्या पिढीकडे होती.

पांगारकर ओकांबद्दल जुन्यातला जुना उल्लेख आढळतो तो म्हादो हरी पांगारकर ओक असा सन १७३२ च्या सुमारचा असेल (ले. १२.) नाशिक येथील उताऱ्यात "बाळाजी नारायण अजे महादेव अनंत" व "नारायण महादेव अजे अनंत पुत्र बल्लाळ" असे दोन उल्लेख आहेत. या बाळाजी नारायणानी सन १७४४ मध्ये ओक कुटुंबाचा जुना इतिहास वर्णन केला आहे (ले. ३) यावरून अंदाज केल्यास महादेव अनंत हे सन १७९९ मध्ये प्रौढ असावेत व म्हणून म्हादो हरी व महादेव अनंत हे एकच गृहस्थ असण्याचा संभव आहे. सन १७६५ च्या सुमारास केशव पांगारकर ओक असा उल्लेख खरे कुलवृत्तांत पृ. ६८ वर आहे ते केशव म्ह. बचंभट्ट असावेत. (वं. २·१) वर उल्लेखिलेले बाळाजी नारायण यांचे एक चिरंजीव नारायण हे पालशेत नजीकच्या अडूर गावाहून त्र्यंबकेश्वरी गेले होते. त्यांचे वंशज वसई, संदसी (सौंधत्ती) व चिकोडीकडे गेले. दुसरे दोन चिरंजीवांचे म्हणजे जनार्दनभट व बचंभट यांचे वंशज ार, इंदुर, यवतमाळ व मुंबईस गेले.

जनार्दन भटांचे पुत्र पांडुरंगभट यांना नाना देशमुखांनी मुसक्या बांधून बंद लावून पांगारी येथे मारले; येविसी शिक्षा असावी म्हणोन समस्त ब्राह्मण मौजे वेळणेश्वर यांनी पांडुरंग भटाला समस्त ब्राह्मण कसबे गुहागर याजकडे पाठविले होते. ते पत्र चापेकर कुलवृत्तांतात पृ. २३ वर छापले आहे. पांगारी म्हणजे पालशेतचा भाग

पांगार होय. हा भाग व अडूर व वेळणेश्वर ही गावे एकास एक लागून चार मैलांच्या परिसरात आहे. यापैकी जनार्दन भटांचे नातू विष्णु पांडुरंग व काशिनाथ पांडुरंग यांनी १५९४ सनाच्या महाजनकीच्या ( ले. १ ची ) फारशी कागदाच्या मराठी भाषांतरावरून एक नकल केलेली मोडी लिपीतील मिळाली. पण त्या भाषांतरात व १९७३ मध्ये प्रो. शर्मा व प्रा. ग. ह. खरे यांनी केलेल्या भाषांतरात महाजनाला दिले गेलेल्या रकमेत फरक आढळतो. विष्णु पांडुरंग यांनी पांगारतड–पालशेत येथील आपली जमीन गहाण ठेविली होती. त्यांना पुत्र नव्हता म्हणून ती जमीन वारसाहक्काने त्यांचे पुतणे शिवराम काशिनाथ यांचेकडे आली. ती शिवराम काशिनाथचे संमतीने त्याचे चुलतचुलत बंधूनी ती सोडवून घेतली व त्या वंशाकडे पुढेही ती होती. शिवराम काशिनाथ हे धार संस्थानच्या हिस्टरी ऑफिसचे ॲसिस्टंट होते. त्यांनी धार संस्थानचा इतिहास लिहिला. यांच्या चुलत घराण्यापैकी वासुदेव काशीनाथ हे दादर व कल्याण येथील दादर एज्युकेशन सोसायटीच्या इंग्रजी शाळेचे मुख्याध्यापक होते. संस्कृत विषयाचे ते नामवंत शिक्षक व कवी व नाटककार होते. मृत्यू सन १९०६. यांचे बंधू रामचंद्र काशिनाथ ( १८७७–१९३७ ) हे दादर एज्युकेशन सोसायटीचे आजीव सभासद होते. मराठीचे शिक्षक. पंडितराज जगन्नाथ यांच्या गंगालहरीचे मराठीत समवृत्तात भाषांतर केले. त्यांचे चिरंजीव विष्णु रामचंद्र यांनी मुंबईच्या विलसन हायस्कूलमधे २७ वर्षे शिक्षकाचे काम केले. मुंबई विद्यापीठाच्या सेनेटचे ते सदस्य म्हणून व अनेक सार्वजनिक संस्थांत त्यांची कामगिरी आहे. शिवराम काशिनाथ यांचे हे चुलत घराणे म्हणजे जनार्दनभटाचे बंधू बचंभट यांचे वंशज. या बचंभटांनी सन १७८५ मध्ये गुहागरला जमीन विकत घेतली. म्हणून त्यांचे काही वंशजानी तीर्थोपाध्यायांकडील लेखात गाव पालशेत हल्ली वास्तव्य गुहागर असे लिहिले आहे.

## महाडचे ओक

बाळाजी नारायणाचे आणखी दोन चिरंजीव गोविंद व गणेश हे महाडास स्थायिक झाले. गोविंद यांनी स. १७९३ मध्ये व गणेश यांनी सन १७९४ मधे महाडला घर विकत घेतले. यापूर्वी गोविंद हे महाड दासगाव जवळील सोनघर गावी जमीन कसून वस्ती करून राहिले होते. सोनघर जवळील कोसबी व अंबोली या गावी ओकांची जुनी घरे अजून आहेत. ( पहा नकाशा क्र. ३ ) सोनघर येथील जमिनी शिद्दीने खुष होऊन काही ब्राह्मणांना दिल्या होत्या; त्यांत गोविंदभटाचे आजोबा पंजोबा असावेत. भालेराईनंतर पुष्कळ ओकांना कैदेत ठेविले होते. ( लेखांक ४ ). या गोविंदभटाचे पणतू म्हणजे कृष्णाजी गोविंद यांना स. १८७१ मधे जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ती मिळाली होती. ते पुण्याच्या न्यू इंग्लिशस्कूलमधे संस्कृतचे शिक्षक होते. लो. टिळक त्यांना शास्त्रीबुवा म्हणत. जनार्दन विनायक ओक या विद्वानांनी आपला गीर्वाण लघुकोश "परमपूज्य गुरुवर्य कृष्णाजी गोविंद ओक शास्त्री संस्कृत शिक्षक न्यू इंग्लिश स्कूल, पुणे" यांस अर्पण केला.

महाडला घर विकत घेण्यापूर्वी गणेश बल्लाळ हे पेशव्यांचे पदरी होते. सन १७७८ ते १७८२ पर्यंत ते मौजे जंजिरे उंदेरी येथे दरकदार होते. इंग्रजांच्या दर्यावर्दी हालचालीबद्दल ते पेशव्यांना माहिती पाठवीत ( लेखांक ४३ ). पेशव्यांचे आज्ञेप्रमाणे १०६ गारदी त्यांनी कल्याणकडे जलदीने रवाना केल्याचे त्यांच्या सन १७८१ च्या ज्येष्ठ महिन्यातील पत्रावरून दिसते ( ले. ४४ ) पण कल्याणचे ठाणे सन १७८१ मधे इंग्रजांकडे गेले ( ले. ४५ ). इंग्रजांचे लढाईत चाकरी केली म्हणून गणेश बल्लाळ फडनीस यास आत्फागिरीची नेमणूक मिळाली होती ( लेखांक ४६ व ४७ ) दरकदार असताना घेतलेले कर्ज व खर्चास दिलेल्यांपैकी काही रक्कम गणेश बल्लाळ याजकडे लागू होती ( लेखांक ४८ ). सन १७८३ मधे तालुके बिरवाडी येथील मामलत गणेश बल्लाळ व त्याचे पुत्र हरी गणेश यास पेशव्यांनी सांगितली होती ( ले. ४९ ). बिरवाडीबरोबरच अवचितगडची मामलतही या पितापुत्रांकाडे होती. अवचितड रोहयाजवळ व मेढे या गावाजवळ आहे. सन १७८५ मध्ये अवचितगड व बिरवाडीची मामलत दूर केली गेली ( ले. ५० ). गणेश बल्लाळ हे सबनिसीकडील फडणीस होते व त्याबद्दल त्यांना मुशाहिरा ( पगार ) स्वतःसाठी व ३ पोरग्यांसाठी, तसेच दिवटीसाठी तेल मिळत होते. (ले.४७). कुलाबा जिल्हयात या कामगिऱ्या गणेश बल्लाळ यांनी केल्यामुळे ते सन १७९४ मध्ये महाडास घर घेऊन स्थायिक झाले ( वंशावळ १–४ ).

## मेढयाचे ओक

मेढे येथील एक वंश (वं. क्र. १ – ६) अवचितगडच्या फडनीसाचा सांगतात. त्यांचा संबंध गणेश बल्लाळशी बसत नाही. त्या वंशाचा आरंभ हल्लीचे वंशज जनार्दनापासून सांगतात. तालुके उंदेरी येथील सुमारे सात वर्षांच्या खर्चात व जमेत तफावत आढळली ती बऱ्याच लोकांकडे लागू झाली होती ( ले–४८ ). त्यांत गणेश बल्लाळ यांचेबरोबर जनार्दन नारायण ओक यांचे नाव आढळते. तेच जनार्दन मेढयाच्या वंशजाचे पूर्वज असावेत. या पूर्वजांना अवचितगडची फडनिसी होती असे त्यांचे वंशज सांगतात.

बाळाजी नारायण यांचे चुलतबंधूंपैकी बाळंभट यांना दररोज एक रुपया दक्षणा मिळावी अशा मोगलाई कारकीर्दीतील सनदा होत्या. त्यावरून बाळाजी बाजीराव प्रधान यांनी परगणे अकोले पैकी सनद नीलकंठ भट बिन बाळंभट यांचे नावची करून दिली ( ले. ५१ ). सन १७९६ पर्यंतचा बाकीचा हिशेब ( ले. ४८ ) काढला त्यात दरसाल रु. १७७ राजुराकडील दाखविले आहेत. यावरून उरलेले रु. १८८ त्याच परगण्यातील दुसऱ्या गावाकडील असावेत. नंतर इंग्रजी अमदानीत आत्माराम भट बिन नीळकंठ भट यांना अकोले परगणेपैकी रु. १६ ची सनद सन १८३५ मध्ये दिली गेली. ( ले. ५३ ).

## जांभूळपाडा ओक

बाळंभट बिन गोविंदभट यांचे बंधू महादेव गोविंद यांचे पुत्रापैकी केशवभट यांचे भाऊ रामभट श्रौति होते ते कुलाबा जिल्हयात जांभूळपाडयास गेले व तेथे त्यांचा वंश

चालू राहिला. रामभटांना पेशव्यांची दक्षणा चालू होती असे त्यांचे वंशज कळवितात.

## बोरवाडी, रोहे ओक

केशव भटाचे दोन भाऊ सदाशिव व कृष्ण यांचे वंशही कुलाबा जिल्ह्यात शिरसाड, बोरवाडी, रोहे, कुडली येथे आहेत. कृष्ण यांचे चिरंजीव नारो कृष्ण पेशव्यांकडे दप्तराकडे कारकून होते. त्यांना रु. ३९० मोईन सन १७६६ ते १७९० पर्यंत प्रत्येक वर्षी दिल्याचा खर्च पडला आहे ( ले. ५४ ). सन १७६०–६१ मध्ये ते पुण्यात राहात होते तेथे कोकणातून ते तांदूळ नेत असत ( ले. ५५ ) त्यांना पुण्यास घर बांधावयास २० हात लांब व २० हात रुंद अशी जागा पेशव्यांनी सन १७७३ मध्ये दिली होती ( ले. ५६ ) त्यांनी सन १७७८ मध्ये बोरवाडीचे घर बांधले त्याचे शाकारास म्हणजे कौलारू छप्पर घालण्यास पेशव्यांनी त्यांना रु. ५०० दिले होते. ( ले. ५७ ).

## प्रकरण दहावे

# वेळंबकर देशमुख ओक

हमजाबादेच्या ४।। महालांची देशमुखी चव्हाण व ओक यांना मिळाली. त्यांच्या सरंजामासाठी चव्हाण व ओक यांना प्रत्येकी आठ आठ गाव मिळाले. आठही गावी ओकांची खोती व शेतीवाडी होती. दरबारचे काम पार पाडण्याकरिता ओकांना मळण व वेळंब हे दोन इसाफत म्ह. संपूर्ण इनाम सरकारचा भाग नाही असे होते. पालखी व अफ्तागीर यासाठी फार पूर्वीपासून हे गाव दिलेले आहेत ते पुरत नाहीत म्हणून आणखी एक गाव द्यावा अशी मागणी बाळाजी ओक देशमुख यांनी सन १५९४ मधे केली व त्यावरून करदे हा तिसरा गाव मशाल व इतर खर्चासाठी दिला. चव्हाणांकडे मौजे पाटपन्हाळे, मौजे उबळ व मौजे पाटदुसबे हे तीन गाव इसाफत होते ( ले २ ). ओकांच्या देशमुखीचा कारभार वेळंबकर ओक या वंशाकडे होता म्हणून देशमुखीचा इतिहास व वेळंबकरांचा इतिहास बराच संलग्न आहे.

चव्हाण-ओक यांच्या देशमुखी हक्काचे प्रमाण चाफेकर कुलवृत्तांतात दिले आहे (ले. ६० ) व मौजे वेळणेश्वरच्या जमाखर्चात १३८६ वसुलाचा तपशील दिला आहे ( ले. ६१ ) मधे सांगितलेल्या हक्काच्या प्रमाणातच वेळणेश्वरच्या वसुलाचा तपशील आहे. तपशिलात सुपारी व नारळ यावरील वसुलाचे दर दिले आहेत, त्यांतील ८३७।।, ८६२।। हे रेवड्याचे आकडे असावेत. २५ रेवड्यांचा एक आणा होतो व हकदारीच्या प्रमाणाशी तो जुळतो. देशमुखी हक्क चव्हाण-ओक यांना देण्याविषयी पेशव्यांनी पंत-प्रतिनिधींना सन १७७६ मधे लिहिलेल्या पत्रातही हेच दर आहेत ( ले. ७० ). गुहागर तर्फेतील काही गावांवरील देशमुखांचे दोन हक्क सन १७५४ मधे एक खंडी एक मण पाऊण पायिली दिला गेला होता ( ले. ६३ ). देशमुखी हक्क गाववार मिळत होता त्याचे सन १७५४ ते सन १८०६ पर्यंतचे काही वर्षांचे आकडे पेशवे दप्तरातील कोकण जमाव, रुमाल क्र. ५४८ मधे आहेत.

तर्फ म्हणजेच महाल असा शब्द लेखांक ३४ मधे वापरला आहे. हमजाबादच्य

देशमखीच्या ४॥ महालांत पाच तर्फा होत्या (ले. ६४ व ७२). १. वेळंब २. सावर्डे ३. चिपळूण ४. हवेली ५. गुहागर. यापैकी हवेली महाल आर्धा जाफराबादमधे व अर्धा हमजाबादमधे होता. व याचा वसूल सन १८०२ मधे ओकांचे कारकून केसो कृष्ण टिळक यांनी केला होता ( ले. ६४ ). हमजाबादेत सहा तर्फा व त्यात २८६ गावे होती ( ले. ६४ अ ). त्यांपैकी चिपळोण व हवेली मोडकांच्या मामले जाफराबाद या देशमुखीत त्याच कागदात दाखविल्या आहेत.

## भालेराई

वेळंबकरांच्या पाच सहा पिढयांपर्यंत भालेराई त्यांचेकडून देशमुखीचा एवज इतर ओक मंडळींना त्यांच्या विभागाप्रमाणे व्यवस्थित मिळत असे. नंतर विसो केशव ओक वेळंबकर देशमुखीचा कारभार ( अंदाजे स. १६७० ते १६८८ चे दरम्यान ) पाहू लागला. त्याने चव्हाणाशी तंटा केला व आपले भाऊबंदाशी शत्रुत्व धरले व देश-मुखी हक्क विभागाप्रमाणे देण्यास कज्जा करू लागला. सन १६८८ मधे विसो केशव हे भालेराई ( ले. ६५ ) नावाच्या पुंडाव्यात सामील झाले, मुलुखाची खराबी केली, वतन-दारास हैराण केले, भाऊबंदांची परिस्थिती हलाखीची केली. ( ले. ४ ). त्यांनी लोक जमा केले व अंजनवेल हे त्यावेळचे तालुक्याचे मुख्य ठिकाण ते घेण्यास गेले. तेथे रुद्राजी अनंत हे सुभेदार होते. भालेराईपर्यंत रुद्राजी अनंत हे अंजनवेलीस कारभारी होते असे भा. इ. सं. मंडळाच्या शके १८३५ च्या इतिवृत्तात दिले आहे. त्यांच्या माणसांनी सामना देऊन विसो केशवला पिटाळले. परत फिरल्यावर विसो केशवनी रुद्राजी अनंत सुभेदार याचे भाऊबंद व शरीरसंबंधी यांना नरवण गावी पकडून वेळंबला नेले. त्यांपैकी सात आठ माणसांना ठार मारले. विसो केशवला पकडण्याकरिता स्वारी आली. आपणाला पकडण्याकरिता आले आहेत असे विसो केशवला समजले तेव्हा तो आपली मुले-माणसे घेऊन दक्षिणेकडे शिवणे येथे बाबाजी हरी ओक यांचे घरी लपून राहिला व पुढे चिप-ळुणाकडे गेला. हे बाबाजी हरी कोतळूकपैकी असावेत. विसो केशवचा थांगपत्ता कळावा म्हणून मळणकर ओक, कोतळुककर ओक इत्यादी भाऊबंदांना सुभेदारांनी हलाखी करून अटकेत ठेविले. विसो केशवने दंगा करून मुलुखाची खराबी केली म्हणून बाबाजी नारायण ओक ( कोतळुककर ) यास बहिरवगडावर ( चिपळूण जवळ ) तेरा महिने बेडी घालून अटकेत ठेविले. ( ले. ४ ) मध्यंतरी महादाजी बल्लाळ नि॥ परशरामपंत ( प्रति-निधी ) हे अंजनवेलचे सुभेदार झाले. त्यानंतर म्हणजे सन १६९७–९८ मधे अंजनवेल शामलानी म्हणजे सिद्दीनी घेतली. सिद्दीचे अभयपत्र मिळवून विसो केशवला त्याच्या नातलगांनी आपल्या गावी आणले. पण विसो केशवची द्वेषबुद्धी गेली नाही. बामणोलीचे दोन भागीदारांनी बामणोलीत महाअनुष्ठाने केली. तेथे विसो केशव गेले व पिढयाप्रमाणे ओक मंडळीचे आप्तसंबंध मर्यादित केले किंवा तोडले. (ले. ४ ).

विसो केशवच्या वर्तणुकीची भीती घेऊन किंवा चीड येऊन काही ओक कुटुंबांनी

स्थलांतर केले व देशमुखीत न पडणाऱ्या म्ह. कोळथरे, बुरोंडी, गिम्हवणे गावी जाऊन राहिले. बामणोलीच्या एका कुटुंबाने नामांतर करून ओंकार नाव धारण केले. भालेराई-पासून देशमुखीचे वतन निर्वेध मिळण्यास खो बसला.

## देशमुखीचे पुनर्जीवन

भालेराईनंतर ७–८ वर्षे विसो केशवला मुलुखाबाहेर राहावे लागले व सिद्दीचे अभयपत्र मिळवून विसो केशव परत आले. पण देशमुखी हक्क सिद्दीने जप्त केले व तो देईल ती ठराविक रक्कम घेऊन ओकांना स्वस्थ बसणे प्राप्त झाले. सर्व वसूल मिळेना; अर्ज विनंतीचा उपयोग झाला नाही. सन १७४५ मधे तुळाजी आंग्रे यांनी सिद्दीकडून अंजनवेल घेतली पण आंग्र्यांचे हातूनही ओकांची देशमुखी सुटली नाही. ( ले.६६ ). त्याबद्दल ओकांना प्रतिवर्षी ठराविक नाममात्र रक्कम ( मोईन ) मिळत असे (ले.१७). विसो केशव स. १७३४ पर्यंत तरी हयात होते व लेखांक ११ व १२ मधे विसो केशवच्या नावापुढे देशमुख वेळंबकर असा हुद्दा लिहिलेला आढळतो. इ. स. १७५६ मधे अंजनवेल पेशव्यांचे अमलाखाली आले. त्यानंतर विसो केशवचे पणतू गोपाळ रामचंद्र वेळंबकर व हरी महादेव मळणकर यांनी श्रीमंत नानासाहेब पेशव्यांकडे अर्ज केला व देशमुखी परभारा रयताकडून वसूल करून घेण्याचा त्यांचा जप्त असलेला हक्क मोकळा करावा म्हणून विनंती केली व त्याप्रमाणे आज्ञा झाली. सरकार नजराणा म्हणून तीन हजार रुपये सरकारात भरले पण सनदा होण्यापूर्वी चिमाजी अप्पांचे जावई गंगाधर बाबुजी ओंकार बामणोलीकर यांनी हरकत घेतली व आपणही देशमुखीत विभागी आहोत म्हणून आपला हिस्सा आपणास द्यावा अशी मागणी केली. त्यास पेशव्यांनी सांगितले की देशमुखीच्या हिश्शाचा उपभोग त्यांनी पूर्वी कधी घेतला होता असा दाखला आणून सरकारला पटविले तर त्याप्रमाणे आज्ञा करता येईल. पण तसे काही घडले नाही (ले. ६६) व दुर्दैवाने सन १७६१ मधे पानिपतच्या लढाईवर गंगाधर बाबुजी ओंकार गेले ते परत आले नाहीत ( पानपतचा रणसंग्राम ले. सेतु माधव पगडी ) पानपतचा पराभव व त्यानंतरचा नानासाहेब पेशव्यांचा मृत्यू या राज्यावरील आघातानंतर स्थिरस्थावर झाल्यावर सन १७६४ मधे गोपाळ रामचंद्र व हरी महादेव यांचे नावे वतन करण्याबद्दल पेशव्यांनी आज्ञा दिली. पण कोकणराव चव्हाण व ओक यांच्यामधील भाऊपणाच्या लढ्यामुळे थोडा विलंब लागला. आपआपसातली भांडणे असतील ती आमची आम्ही पाहून घेऊ असे चव्हाण व ओक यांनी एकमताने पेशव्यांना सन १७७६ मधे आश्वासन दिल्यावरून चव्हाण–ओक देशमुखाकडून साडेच्यार हजार येक रुपये सरकार नजरेसाठी घेऊन (ले. ६७) सनदा देण्याची आज्ञा झाली. भाद्रपद महिन्यात ( मुसलमानी रजब महिना ) आज्ञा झाली व माघ महिन्यात ( मुसलमानी जिल्हेज ) गोपाळ रामचंद्र वेळंबकर ओक यांनी विठोबा नाईक रास्ते याजकडून ती रक्कम सरकारात जमा केली. (ले.६८)

पैसे भरल्यानंतर दोन महिन्यांत सुभेदाराकडे व सरदेशमुखांकडे सनद पाठविली गेली व आज्ञा दिल्या गेल्या. देशमुखी इत्यादी सरंजामांना द्यावयाच्या ऐवजाची सुभेदाराकडे अगाऊ बेगमी करून ठेवलेली असे. पण चव्हाण ओक देशमुख यांच्या ऐवजाची नेमणूक सुभेदाराकडे अगाऊ दिलेली नव्हती म्हणून ते चव्हाण ओकांना ऐवज देण्यास खळखळ करणे साहजिकच वाटल्यावरून त्या अडचणीचे निवारण कसे करावयाचे हे पेशव्यांनी सुचवून ठेविले ( ले. ६९ ). चव्हाण–ओक यांचा देशमुखी ऐवज सुभेदारांनी दिला तर इतर खर्चास रक्कम कमी पडेल म्हणून चव्हाण ओकांकडून १५०० रु. कर्ज जमा दाखवून देशमुखी खर्ची टाकावी अशी सूचना होती. परशरामपंत पंडित प्रतितिधी यांच्या कडे चिपळूण महालाच्या गावांपैकी काही चौथाईचा हक्क होता. त्यावरही देशमुखी हक्क चव्हाण-ओकांना द्यावा व तो कोणत्या प्रमाणात द्यावयाचा शिरस्ता आहे हेही पेशव्यांनी प्रतिनिधींना पत्राने कळविले ( ले. ७० ). याप्रमाणे देशमुखी हक्क निवध मिळण्याकरिता अवश्य त्या आज्ञा पेशव्यांनी दिल्या होत्या तरीही पण देशमुखीच्या हक्कासंबंधी शिर्के यांनी अडथळा आणला. नानासाहेब पेशव्यांचे वेळेस शिर्के व चव्हाण ओक यांचा कज्ज्या लागला होता व शिर्के यास खंडीस अर्धा मण देण्याचा करार झाला होता ( ले. ७१ ) सन १७६४ च्या मळण गावच्या जमाखर्चात रु. १२८≡ शिर्क्यांना देशमुखीबद्दल दिल्याचा उल्लेख आढळतो. पण शिर्क्यांच्या अशा अडथळ्यामुळे चव्हाण–ओक देशमख यांचेकडे जे इसाफत व इनाम गाव होते ते जप्तीतून मोकळे करू नयेत अशी एक तात्पुरती आज्ञा पेशव्यांनी दिली होती. (ले. ७२).

देशमुखी हक्काचा गावोगावचा वसूल किती होता याचे कित्येक वर्षांचे गाववार आकडे पेशवे दप्तर कोकण जमाव रुमाल ५४८ मध्ये दिलेले आहेत. सरकारात जमा झालेला काही वर्षांचा ऐवज देशमुखांना देण्याबद्दल सन १७८५ चे एक पत्र (ले.७३) व ऐवज पोचल्याची एक पावती (ले. ७४) आढळते.

देशमुखीचा कारभार वेळंबकर ओकांकडे होता. इतर ओकांचा विभाग त्यांना त्यांच्या हिश्शाप्रमाणे मिळत होता. कोणाला किती मिळत होता ह्याचा उल्लेख आढळला नाही. पण कोतळूककर व मळणकर व बामणोलीकर ओक देशमुखी आपली ओकांची असा उल्लेख करतात (ले. ६, २२ व ६६). अंजनवेलवर सन १७५६ मध्ये पेशव्यांचा अंमल झाल्यानंतर जप्त झालेला हक्क मोकळा करून घेण्याकरिता पेशव्यांकडे विनंती केली होती ती वेळंबकरांपैकी एक व मळणकरांकडील एक अशा दोघांनी एकत्रित केली; व बामणोलीकर ओकांनी आपणही देशमुखीत सहभागी आहोत अशी हरकत घेतली होती. देशमुखीवर इतके जण हक्क सांगत होते. पण सरकारात नजर म्हणून १७७६ मध्ये पैसे भरले त्यांत चव्हाणांची दोन नावे आहेत. पण ओकांपैकी वेळंबकरांचे एकच नाव आहे (ले. ६८ ).

देशमुखी मिळविणाऱ्या हरीपासून ६ व्या पिढीतील केसो हरी हे देशमुखी करीत होते. त्यांचे बंधू नारो हरी यांचे वंशापैकी सुमारे ११ व्या वंशातील गणेश कृष्ण व

दत्तात्रय गोविंद यांनी केसो हरीच्या वंशातील रामकृष्ण विठ्ठल यांचा देशमुखीचा पाव आणा हिस्सा सन १९२० मध्ये खरेदी केला. ( ले. ७५ ). यावरून त्या वंशाकडे देशमुखी नव्हती असे वाटते. तरीपण तत्पूर्वी ७ व्या, ८ व्या पिढीतील लोकांनी त्र्यंबकेश्वरच्या आपल्या लेखात स्वतःचा उल्लेख ' देसाई वेळंब ' असा केला आहे. गुहागर तालुक्यातील धोपावे गावचा बाग तेथील देवालयास चव्हाणांनी सन १७९९ मध्ये इनाम करून दिल्यानंतर ओकांचे हक्काचे इनामपत्र करून द्यावे म्हणून गोपाळ रामचंद्र वेळंबकरांनाच विनंती केली आहे. (ले. ७६). सन १८११ पर्यंत देशमुखीचा कारभार चव्हाण व ओक यांच्याकडे होता असे लेखांक क्र. ७४ वरून दिसते. गोपाळ रामचंद्र यांचे वास्तव्य वाईत बराच काळ होत असे. त्र्यंबकेश्वराच्या लेखात त्यांनी आपले ' वास्तव्य वाई ' असे लिहिले आहे. त्यांचा व रास्ते यांचा घनिष्ठ संबंध होता असे दिसते. कारण पेशवे सरकारात नजरेची रु. ४५०१ ची रक्कम त्यांनी रास्ते यांचे कडून देवविली ( ले. ६८ ). सन १७८५ मध्ये रास्ते यांचे एका फारकतीवर त्यांची वाई मुक्कामी सही झालेली आहे ( ले. ७७ ). सन १७७१ मध्ये रास्त्यांनी जमीन विकत घेऊन तेथे धर्मपुरी वसविली. रास्त्यांकडून मिळालेल्या वाईच्या धर्मपुरीच्या घरात त्यांच्या एका मुलाचा म्ह. रामचंद्रचा वंश राहात होता. त्या वंशात आता कोणी पुरुष वारस नाही.

चिपळुणास राहणारे श्री. परशराम दामोदर देशमुख ओक याची गाठ सन १९७३ च्या डिसेंबरात लेखकांनी चिपळुणात घेतली. त्यांचेकडे देशमुखीबद्दलचे जुने कागद पेटीभर आहेत असे त्यांनी सांगितले. पण ते कागद दाखविले नाहीत. त्यांनी दिलेल्या माहितीवरून त्यांचा जन्म शके १८१३ म्हणजे सन १८९१ चा. त्यांचे वडील दामोदर कृष्ण सन १९५० मधे वयाच्या ८४ व्या वर्षी वारले. त्यावेळी दामोदर कृष्ण ५८–५९ वयाचे होते. कोकणराव चव्हाणांचा देशमुखीचा हिस्सा गोपाळ रामचंद्र यांचेकडे गहाण होता व तो गोपाळ रामचंद्रकडेच राहिला. पुढे गोपाळ रामचंद्रचे वाईतील पणतू रावजी काशिनाथ याचा वारसा चिपळूणचे दामोदर कृष्ण यांचेकडे आला. गोपाळ रामचंद्रचे एक चिरंजीव सदाशिव गोपाळ यांनी वेळंबनजीकची काही टाकावू जमीन शेत तयार करण्याकरिता सन १८१७ मध्ये मिळविली. तयार केलेल्या शेतजमिनीस वीस वर्षे सरकारसारा नव्हता. त्यानंतर १८३७ ते १८४१ ही पाच वर्षे प्रत्येक बिघ्यास रु. १, १।, १॥, १।॥, व २॥ याप्रमाणें सारा घेतला व त्यापुढे प्रत्येक बिघ्यास वार्षिक रु. ३ सारा देण्याची आज्ञा होती. ( ले. ७८ ).

## हमजाबाद व जाफराबाद

मामले जाफराबादचे ४॥ महालांचे देशमुखी वतन मोडकांना व मामले हमजाबादचे ४॥ महालांचे ओकांना साधारण एकाच काळात मिळाले होते. हमजाबाद नावाचा एक गाव औरंगाबाद जिल्हयाच्या गंगापूर तालुक्यात आहे; पण हल्ली ओसाड आहे. जाफराबाद हा औरंगाबाद जिल्हयाचा महाल आहे. तरी पण हमजाबाद किंवा जाफरा-

बादमधे मोडणारे नऊही महाल सर्व रत्नागिरी जिल्हयात आहेत. सर्व्हे ऑफ इंडियाच्या हल्लीच्या गुहागर तालुक्याच्या नकाशात पांगारी गाव ता।। हवेल. जाफराबाद अशा उल्लेखांनी दाखविला आहे. अर्धा ता। हवेली हमजाबादेत होता. या एका उल्लेखा-शिवाय जाफराबाद किंवा हमजाबादचा नकाशात इतर कोठेही निर्देश नाही. मावळंकर घराण्याच्या इतिहासाच्या १९६१ च्या आवृत्तीत पृ. ४९ प्रकरण ३ मधे दिले आहे की, मुसलमानी अमलात प्रभानवल्लीस मुज्फराबाद, दाभोळयास मुस्तफाबाद, खेडास जाफराबाद व गुहागरास किंवा अंजनवेलीस हमजाबाद ही नावे जुन्या सनदपत्रात दिलेली आढळतात; पण ऐ. संकीर्ण साहित्यखंड ६ मधील ले. २५ पृ. ३१ वर मामले जाफराबाद ऊर्फ चांदवड सु।।सन ११४३ असे व बरवे घराण्याचा इतिहास पृ. १२ वर मौजे कोठुरे मामले जाफराबाद तर्फ चांदवड असे दिले आहे. यावरून जाफराबाद महालातील गावे फक्त रत्नागिरी जिल्हयापुरती मर्यादित होती असे नाही. पराग मासिकाच्या (संपादक श्री. य. न. केळकर प्रभृती ) डिसेंबर १९४८ च्या अंकात पृ. ४७ वर जाफराबाद ऊर्फ चांदवड असाच निर्देश आहे. त्याच मासिकाच्या फेब्रुआरी १९४८ च्या अंकात माहिती आहे की कुलाबा जिल्हयातील जंजिरा संस्थानचे सध्याचे क्षेत्रफळ ३७७ चौ. मैल आहे. या क्षेत्रफळात काठेवाडातील जुनागड संस्थानच्या दक्षिणेस समुद्रकाठी जाफराबाद या नावाचा जो लहानसा प्रदेश ह्या संस्थानच्या मालकीचा आहे त्याचाही समावेश होतो. अशी जाफराबादबद्दल विविध माहिती मिळाली तितकी हमजाबादबद्दल आढळली नाही. मामले जाफराबाद व मामले हमजाबाद यांचा विस्तार किती व कोठपर्यन्त होता व या मामल्यांचे याच नावाचे किंवा अन्य नावाचे केंद्रस्थान कोठे होते ही माहिती मिळावयास पाहिजे होती. पेशवे काळात देशमुखीचे तंटेबखेडे, जमा, वसूल इत्यादी सर्व बाबतींत पेशव्यांच्या आज्ञा सुभेदार अंजनवेल यांचेकडे जात असत.

# प्रकरण अकरावे

# मळणकर ओक

हमजाबादेची देशमुखी मिळविणाऱ्या हरबापासून चौथ्या पिढीतील बाळाजी ओक यांनी सन १५९४ मधे मौजे कर्दे हा तिसरा गाव इनाम म्हणून मागून घेतला (ले. २). त्याआधी वेळंब व मळण हे दोन गाव इनाम होते. बाळाजी ओक व त्यांचे वंशज वेळंबला राहिले व वेळंबकर ओक म्हणून ओळखले जाऊ लागले. बाळाजीचे भाऊ कृष्णाजी हे व त्यांचे वंशज वेळंबपासून दोन मैलांवर असलेल्या मळण या गावी राहिले व मळणकर ओक वंश सुरू झाला. ( वं. क्र. ३.२ ). या वंशाचा प्रारंभ ले. २ प्रमाणे सन १५९४ चे आसपास झाला. मळणकरांच्या तिसऱ्या वंशापर्यंत एकेकच पुत्र होता असे आढळते. तिसऱ्या पिढीत चार भाऊ होते. त्यांपैकी महादेव बल्लाळ यांचे चुलत बंधू त्रिंबक अंताजी यांचे वास्तव्य चिखलगावला होते असे त्यांच्या त्र्यंबकेश्वरच्या लेखावरून दिसते. मळण सोडून ही मंडळी बाहेर पडली की यांचे वडील बाहेर पडले ह्याबद्दल कागदोपत्री आधार आढळला नाही. पण भालेराईस मिळून विसो केशव ओक वेळंबकर यांनी भाऊबंदांचे हाल केले ( ले. ४ ) त्यामुळे महादेव बल्लाळ व त्यांचे बंधू मळण सोडून अंजनवेल तालुक्याच्या बाहेर गेले असण्याचा फार संभव आहे. या चार भावांपैकी बापूजीचा एक मुलगा चिंतामण लहान वयात वारला व दुसरा सदाशिव परागंदा झाला. उरलेल्या तीन भावांनी खोती वाटून घेतली व प्रत्येकास पाच आणे चार पैचा हिस्सा आला. महादेव बल्लाळ यांचे पाचही पुत्र नाशिकला राहत होते. त्यांचे पैकी अप्पाजी, रामाजी व राघो हे तिघे जण स. १७५४ नंतर म्हणजे अंजनवेल तालुका पेशव्यांकडे आल्यानंतर मळणास आले होते. भालेराईमुळे जप्त झालेल्या देशमुखीचा जीर्णोद्धार करावयाचे आपले कर्तव्य आहे असे तेव्हा ते नातलगांना पटवीत होते. ( ले. ६ ) व त्याप्रमाणे इ. स. १७६५ मधे पेशव्यांकडे त्याबाबत केलेल्या विनंतीपत्रावर या तिघांचे थोरले बंधू हरी महादेव यांचे नाव वेळंबच्या गोपाळ रामचंद्र यांचे नावाबरोबर आढळते ( ले. ६६ ); पण सन १७७६ मधे देशमुखी परत मिळाली ती वेळंबकर

गोपाळ रामचंद्र यांचे नावावर झाली. ( पहा वेळंबकर वंश क्र. ३.१ ). सवाई माधवरावाचे लग्नाचे सन १७८३ च्या यादीत आनंदीबाईचे सोयरे म्हणून हरिपंतांना निमंत्रण होते. इंग्रज अमदानीत महाराष्ट्र व दक्षिण मराठा प्रदेशातील तिसऱ्या दर्जाच्या सरदारांच्या सन १८४१ च्या यादीत हरिपंत ओकांचे नाव होते. स. १८४९ मधे तयार केलेल्या यादीत हे गहस्थ मयत नाहीत असे खोडून त्याऐवजी ते मृत आहेत पण मृत्युदिन मिळू शकत नाही अशी दुरुस्त नोंद आहे ( ले ७१ ); पण म्हणून सन १८४१ मधे हरिपंत जिवंत होते असे मानता येणार नाही. कारण हरिपंतांच्या धाकटया भावाच्या मुलीचा म्ह. आनंदीबाईचा जन्म १७४७ चा आहे. त्या हिशोबांनी हरिपंताचा जन्म सन १७१७ चे आसपासचा येईल व सन १८४३ मध्ये त्यांचे वय सव्वाशेचे घरात जाईल. पण इंग्रजांनी सरदारांच्या प्रती लावल्या होत्या तेव्हा म्हणजे सन १८१८ च्या सुमारास हरिपंत हयात होते असे अनुमान निघते व हरिपंत शतायु होते असे ठरते. सन १७८३ च्या निमंत्रणाचे यादीत हरिपंतांचे चिरंजीव चिमणाजी यांचे नाव शिधा पोचविण्याच्या यादीत आहे ( ले. ८१ ). या चिमणाजीचे पुतणे बापूजी केशव यांचे नाव सन १८१७ मधे मंडलिकांचे जमाखर्चात आढळते. ( ले. २१४ ).

## आनंदीबाई पेशवे

मळणकरांकडील पाचव्या पिढीतील राघो महादेव हे पेशव्यांचे पदरी शिलेदार कारकून होते व त्यांना सरंजाम म्हणून पाच हजार रुपयांची नेमणूक होती. यांची मुलगी ( सन १७४७–१७९४ ) ही आनंदीबाई पेशवे झाली. हे लग्न कागलचे दक्षिणेस सुमारे १२–१४ मैलांवरील गलगले या म्हैसूर राज्याच्या सीमेवरील गावी १७–१२–१७५५ रोजी झाले. रघुनाथराव पेशव्यांची ही दुसरी पत्नी. रघुनाथरावांच्या बोलण्या-बागण्याला पुरून उरेल अशी ही मुलगी पाहून नानासाहेब पेशव्यांनी हिला रघुनाथराव दादाकरिता. पसंत केली व लग्नाकरिता मुलीचे वडील राघो महादेव ओक यांना तातडीने बोलाविले. त्यांना इतक्या घाईगर्दीने यावे लागले की; जरी ते शिपाई गडी होते तरी या दौडीमुळे त्यांचे पाय सुजले ( महाराष्ट्र इतिहासाची साधने भाग ३ पृ. २४१ ले. वा. सी. बेंद्रे ). या राघो महादेवना औरस मुलगा असूनही त्यांनी दत्तक मुलगा घेतला होता. त्याचे नाव बापूजी होते. त्या बापूजी रघुनाथांना द. सा. २४२० रु. पोलिटिकल पेन्शन मिळत असे अशी एक नोंद साताऱ्च्या राजदप्तरदार दाजीबा जोशी यांच्या कागदपत्रांतील, श्री. य. ना. केळकर यांचेकडून मिळाली.

औरस मुलाचे नाव नारायण होते व इ. स. १७६९ त राघो महादेव मृत्यू पावले. त्यानंतर त्यांची सरंजामाची नेमणूक नारो रघुनाथ यांचे नावे पेशव्यांनी केली. ( प्रकरण १२ वे ) नारो रघुनाथनंतर तो ऐवज त्यांचे पुत्र गंगाधर नारायण याजकडे चालू राहिला. आनंदीबाईचा भाऊ म्हणून पेशव्यांकडे नारो रघुनाथ हेच ओळखले जात. भाऊबीजेकरिता प्रतिवर्षी नारो रघुनाथांनाच बोलावणे जाई व यथोचित मानसन्मान होई.

सवाई माधवरावांच्या लग्नाची निमंत्रणे सोयऱ्यांना केली त्यातही दत्तक भावाचे नाव आढळत नाही. ( ले. ८१ ) त्या लग्नाचे वेळी म्हणजे सन १७८३ मध्ये राघो महादेव यांचे चिरंजीव नारो रघुनाथ व त्यांच्या मातोश्री यशवदाबाई मळणास राहत होते. राघोपंतांचे बंधू रामाजीपंत, अप्पाजीपंत व हरिपंत नाशकास असत. त्यांपैकी अप्पाजीपंत त्यावेळी निवर्तलेले होते व त्यांच्या पत्नी अन्नपूर्णाबाई पुण्यास राघोपंत ओक यांचे घरी राहत होत्या. ( ले. ८१ ). सन १८०१ मध्ये दुसऱ्या बाजीरावाने त्यांना संसारबेगमीबद्दल सालिना १२०० रुपये नेमून दिले ते पुण्यास पावते करावे अशी आज्ञा होती. ( पहा प्रकरण १२ वे ).

आनंदीबाईचे नातेवाईक म्हणून ले. ८१ मधील याद्या आहेत त्यांवरून कळते की, राघो महादेव यांना तीन भाऊ व तीन बहिणी होत्या. एक बहीण गुहागर तालुक्यातील वेळणेश्वरच्या चापेकरांकडे, एक दापोली तालुक्यातील चिखलगावचे अनंतराव टिळकांना व एक सोमणांकडे दिलेली होती. त्याच यादीवरून कळते की, राघो महादेव यांची पत्नी म्हणजे आनंदीबाई पेशव्यांची आई ही पालशेतच्या कानिटकरांकडील. तिचे नाव यशवदाबाई. खरे कुलवृत्तांतात पृ. ५७४ वर आनंदीबाईचे आजोळ खऱ्यांकडे असे दिले आहे त्यास आधार नाही. सन १७६९ मधील अनुष्ठान खर्चात मातुश्री यशोदाबाई ओक अनिष्ट ग्रहशांति असा खर्च आहे ( ले. १८२ ). तसेच ( ऐ. सं. साहित्य खंड ४ ) दुसऱ्या बाजीरावाच्या स्वारीचे ताळेबंदात सन १८१६ मधे १० मोहोरा शेटशाई यशोदा आजीबाई ओक यांजकडून उसनवार घेतल्याचा उल्लेख आहे.

राघो महादेव यांना आनंदीबाई खेरीज आणखी दोन मुली होत्या.

एक येसाजी ( विसाजी ) पंत चोळकरांना दिली होती व एक सदाशिवपंत परांजपे वसईकर यांना दिली होती. सवाई माधवरावाचे लग्नाला पुण्यात आलेल्या ओकांच्या नात्यातील काही मंडळी शनवार पेठेत राघोपंत ओकांचे घरी उतरली होती. राधाबाई पेशव्यांच्या सोयऱ्यांपैकी धोंडभट जोसी हे पालशेतचे म्हणून राघोपंत ओकांचे घरी उतरले होते असे ले. ८१ मधील यादीवरून दिसते.

आनंदीबाईची एक बहीण म्हणजे राघोपंत ओकांची एक मुलगी देशस्थाकडे दिली होती अशी माहिती श्री. नानासाहेब चापेकर यानी चितपावन या त्यांच्या ग्रंथात दिली आहे पण ती काय आधारे दिली आहे ते समजत नाही व त्याप्रमाणे कोठे उल्लेखही आढळला नाही. तसे असते तर निमंत्रितांचे यादीत त्यांचेही नाव आले असते. राघो महादेव ओक या आनंदीबाईच्या माहेराबद्दल पुष्कळ माहिती प्रसिद्ध झाली आहे. त्यातील व इतर चूक माहितीचा ऊहापोह पुढील प्रकरण १२ मध्ये केला आहे.

आनंदीबाईच्या मातोश्री यशवदाबाई यांचा उल्लेख ताई ओक म्हणून केलेला आढळतो. राघो महादेव यांचे म्हणजे यशवदाबाईचे नातू गंगाधर नारायण याचे नावावर सरंजामाचे म्हणून वडगाव पो. नाशिक व पाडली, ता खेड ह्या दोन गावांची पेशव्यांची सनद होती ती ताई ओक यांची अशी नोंद ( ले. ८३, ८४ व ८५ ) आढळते. सन

१७९९–१८०० मधे वसईहून काही जिन्नस आले ते कोणकोणाकरिता त्याची नावनिशीवार यादी आहे ( ले.८६ ). त्यात ताई वोकीण यांना किती पावते करावयाचे ते दिले आहे. तितकेच जिन्नस काकूबाईंचे नावापुढे आहेत. या काकूबाई म्हणजे अप्पाजी महादेव यांची पत्नी म्हणजे आनंदीबाईची काकू असावी. हिच्याबद्दल माहिती पुढील प्रकरणामध्ये दिली आहे. अप्पाजी महादेव यांना मुलगा नव्हता म्हणून सन १८०० मधील त्याच्या मृत्यूनंतर त्याजकडे कमाविसीने असलेला मौजे चुचाले हा गाव त्यांचे बंधू रामाजी महादेव यांचे नावे केला. (ले. ८७). सन १७६२ मधे रामाजी महादेव व अप्पाजी महादेव यांस चुचाले गावाजवळील १२ बिघे जमिनीचा चकनामा लिहून दिला. त्यात त्यांचे नाव ओंकार लिहिले आहे. (ले. ८८). तसेच त्रिंबक रामाजी यांना सन १७९९ मधे चकनामा (ले. ८९) दिला त्यातही त्यांचे नाव ओंकार लिहिले आहे. कचो रामचंद्र यांनाही सन १८१६ मधे चकनामा लिहून दिला त्यात नाव ओंकार लिहिले आहे (ले. ९०); पण सन १८०७ च्या इनाम पत्रात ओक आहे (ले. ९१). सन १८२० मधील इंग्रज अमदानीत पुन्हा वोक हेच नाव लिहिलेले आहे. (ले. ९३ व ९४ ). अप्पाजी महादेव याजकडे चुचाले गावाजवळील कुरणही पेशव्यांनी दिले होते ( ले.९२). व ते नंतर कचो रामचंद्रकडे आले त्याबद्दल जो पत्रव्यवहार सन १८२० चा आहे त्यात ओक नाव आहे. ले. ८८ व ८९ मधील जमिनी मिळाल्या त्या त्यांनी चुचाले गावावर बहुतप्रकारे मायावाद धरला म्हणून दिल्याचा उल्लेख आहे. व ले. ९० व ९१ मधील जमिनी कर्जापोटी आलेल्या आहेत. या चकनाम्यात ओंकार हे नाव लिहिले तरी ते ओकच होते असे इनाम जमिनीची यादी ( ले. ८० ) मिळाली त्यावरून नक्की होते. बामणोलीकर ओक किंवा बोरगावकर ओक यांना पेशव्यांचे पत्रव्यवहारात ओंकार संबोधिल्याचे आढळते तसे मळणकर ओकांना पेशव्यांनी ओंकार नाव लिहिलेले आढळत नाही. सर्वसाधारण जनतेने यांना ओंकार संबोधिले की यांनी आपण होऊन ते आडनाव चकनाम्यात घालून घेतले हे समजण्यास मार्ग नाही.

अप्पाजी याचेकडे चचाले गाव आला त्याबरोबर तेथे तयार केलेले कुरण दिले गेले नव्हते ते त्याचेकडे स. १७६२ मधे पेशव्यानी दिले. ( ले. ९२ ). चुचाले गावाबरोबर ते २५० बिघे ( ले. ८० ) कुरणही रामाजीकडे आले. रामाजी महादेव यांना सवाई माधवरावांचे लग्नाचे निमंत्रण होते. त्या निमंत्रण-यादीवरून ( ले. ८१ ) त्यांचे बरोबर त्यांची पत्नी, दोघी सुना व एक भाचेसून म्हणजे चापेकरांकडे दिलेल्या बहिणीची सून होती. रामाजीपंतांना कचेश्वर व त्रिंबक असे दोन मुलगे होते. त्यांच्या बायका सवाई माधवरावांच्या लग्नाला गेल्या होत्या; पण कचेश्वर व त्रिंबक यांचा समावेश निमंत्रितात नव्हता. आपाजी व रामाजी या दोघांचे नावचा चकनामा बारा बिघे शेतजमिनीचा आहे. ती जमीन फुले, तुळसी शाकभाजी करावयास त्यांना दिली असा उल्लेख आहे ( ले. ८८ ). हे शेत त्रिचोली गावाजवळ एका महाराचे होते व ते त्याजकडून घेऊन इनाम म्हणून रामाजी महादेव व अप्पाजी महादेव यांना बक्षीस दिले. महारास

नाशिक वाटेवरील १५ बिघे शेत त्याच्या पसंतीने देऊन त्याची समजूत घातली. अप्पाजी-नंतर रामाजीकडे ( ले. ८७ ) व त्यानंतर हे बारा बिघे शेत कचेश्वरचे नावावर होते ( ले. ८० ). कचेश्वरचे धाकटे बंधू त्रिंबक याचे नावचा सन १७९९ चा चार बिघे भातजमिनीचा चकनामा आहे ( ले. ८९ ). ही जमीन सन १८१६ मधे ( ले. ८७ ) कचेश्वरचे नावावर होती. स. १७९९ पूर्वी रामाजी महादेव मृत्यू पावले असावेत म्हणून हा चकनामा त्यांचे मुलाचे नावचा आहे. दुसरे चकनामे कचेश्वरचे नावावर आहेत ते १७९९ नंतरचे आहेत. चिचोलीजवळील कुरण कशा प्रकारचे आहे त्यापासून कोणास त्रास होतो काय याबद्दल स. १८२० मधे अहमदनगरचे कलेक्टर पॉटिंजरसाहेबांनी अहवाल मागविला होता व त्यानुसार ते कुरण कचो रामचंद्र ओक याजकडे पूर्वीप्रमाणे चालत राहावे म्हणून आज्ञा झाली होती ( ले. ९२ व ९३ ). कचो रामचंद्र व त्रिंबक हे आनंदीबाईचे चुलत भाऊ म्हणून दुसऱ्या बाजीरावाचे कारकीर्दीत त्यांचा उल्लेख कचो-मामा व त्रिंबकराव मामा म्हणून केला जात असे. कचोमामांना पालखी, मशाल, अफ्तागिरी या मानासाठी ५० रुपये स. १८१६ मधे दिले गेले होते ( ले. ९४ ) व त्याचसाठी रु. ५० काकूआजी ओक म्ह. आनंदीबाईची चुलती अन्नपूर्णाबाई यांना दिले होते. अन्नपूर्णा काकूआजी ओक दि. १-२-१८०८ ला मृत्यू पावली. तिच्या क्रियेसाठी पाच हजार रुपये खर्च पडला आहे. त्याअगोदर दि. २–१–१८०८ ला त्रिंबकरावमामा ओक मृत्यू पावले. त्या वेळी क्रियेसाठी चारशे रुपये व त्यांच्या वर्ष-श्राद्धासाठी शंभर रुपये खर्च आहे (ले. ९५ ). त्याच खर्चात आजी ओक मृत्यू पावण्या-पूर्वी सुमारे एक वर्ष आधी दि. १६–२–१८०७ ला रु. १६३२ दिले असा खर्च आहे. हे बहुधा तिला मिळावयाच्या वार्षिक बाराशे रुपयांच्या संसार-बेगमीच्या हिशोबातील असावेत. ( पहा पुढील प्रकरण. )

कचेश्वरांचे पुत्र तीन त्र्यंबकेश्वर लेखावरून मिळतात. दादो तथा रावजी यांची पत्नी राधाबाई इचा लेख आहे. त्या तिघांपैकी कृष्णाजी तथा कुशाबा यांचे वंशज नाशिकास कारंज्यापासून पुलाकडे जाणाऱ्या रस्त्यावर लेलेवाड्यात आहेत. कृष्णाजींचा उल्लेख ना. गो. चापेकरांनी पुण्याचे तात्यासाहेब चिपळूणकर यांचे कागदपत्रांतून काढलेला आहे. चिपळूणकरांकडे यांचे नाते होते का घरोबा होता हे समजले नाही. पेशवाईचे सावलीत या ग्रंथात पृ. २५५ वर दिलेल्या एका पत्राच्या सारांशावरून कचेश्वर नाशकाहून पुण्यास तात्यासाहेब चिपळूणकरास लिहितात " परंतु तेथे सुधारले लोकांचा सहवास नसावा आणि पुण्याचे लोक चांगल्या चालीचे नाही सबब दोनचार महिने सहवास तुटावा. " दुसरे एक पत्र कृष्णाजी कचेश्वरनी चिपळूणकरांना लिहिलेले भा. इ. सं. मंडळाच्या वर्ष ६ च्या त्रैमासिकात पृ. १४४ वर छापले आहे. संगमनेरचे अग्नेयेस ६ कोसांवर पानोडी येथे शिंद्याचे पेशव्याकडील वकील रामजी पाटील यांचा वाडा आहे. तो विकून आपले गुंतलेले पैसे मोकळे करण्याच्या विवंचनेचे आहे. त्या पत्राच्या वर्षाचा उल्लेख नाही. तिथी-महिना फक्त पत्रात आहे. कचेश्वर सावकारी

करीत असत त्यात ह्या वाड्यावर कर्ज दिलेले असावे व ते फिटले नाही, म्हणून पानोडीचा वाडा विकून पैसे वसूल करावे लागले असे दिसते. कर्जाऊ दिलेल्या पैशापोटी मिळकती पदरात पडत असत असे कचेश्वरांचे हयातीत घडले होते (ले-९० व ९१) याप्रमाणेच ही मिळकत घ्यावी लागली असावी.

कृष्णाजी कचेश्वरांचे नातू गणेश हरी सन १९३८ मधे पुण्याच्या भा. इ. सं. मंडळाचे ४ थ्या वर्गाचे सभासद होते. मंडळाच्या त्या वर्षीच्या पाक्षिक सभांत त्यांनी " मराठेशाहीतील सरकारी नोकरी " व ' तीन शिलालेख ' हे लेख वाचले होते.

कचेश्वरांचे बंधू त्रिंबक म्हणजे दुसऱ्या बाजीरावाचे त्रिंबकरावमामा यांच्या नावे स. १७१९ मध्ये चार बिघे भात जमिनीचा एक चकनामा झाला होता (ले. ८९) पण सन १८१६ च्या यादीत (ले. ८०) तो त्यांचे थोरले बंधू कचेश्वर यांचे नावावर लिहिलेला आढळतो. त्रिंबकरामचे वंशज बडोद्याकडे गेल्याचे आढळतात (वं. क्र. ३-२।अ).

### प्रकरण बारावे

# आनंदीबाई पेशवे यांचे माहेर-प्रसिद्ध माहितीतील चुका

पेशवे घराण्यातील गाजलेल्या स्त्रियांपैकी आनंदीबाई ही एक होती. व तिच्याविषयी बरेच लिखाण ऐतिहासिक म्हणून प्रसिद्ध झाले आहे. पेशवे दप्तरातून निवडलेल्या कागदांपैकी आनंदीबाईंची दिनचर्या म्हणून एक स्वतंत्र खंड सन १९३० मधे सरकारीरीत्या छापला गेला आहे. त्याच्या इंग्रजी प्रस्तावनेत संपादक म्हणतात की, 'ऐतिहासिक गोष्टींबद्दलच्या रूढ समजुती व काढलेले निष्कर्ष यांचा खरेखोटेपणा पडताळून पाहण्यास अस्सल कागदपत्रांचा उपयोग होतो हे आनंदीबाईचे बाबतीत विशेष अनुभवास येते.' आनंदीबाईचे माहेर ओकांकडे. ओक घराण्याच्या इतिहासाची जी साधने गेल्या काही वर्षांत मला मिळाली आहेत त्यांवरून संपादकांच्या वरील विधानाची प्रचीती आली.

आनंदीबाईचे माहेर असलेले ओक कुटुंब गुहागरचे असे फार ठिकाणी लिहिले गेलेले आहे ( १ ) आनंदीबाईची दिनचर्या या पेशवे दप्तर-निवडक कागद खंड ४ च्या प्रस्तावनेत संपादक सांगतात की, आनंदीबाईचे माहेर असलेले ओक कुटुंब गुहागरचे. ( २ ) सन १९३८ मधे श्री. चिं. ग. कर्वे संपादित व श्री. सयाजी ज्ञानमालेनी प्रसिद्ध केलेल्या आनंदीबाईच्या चरित्रात सुद्धा ओकांचे गाव गुहागर म्हटले आहे. ( ३ ) त्यापूर्वीही शके १८४५-४६ च्या भारत इतिहास संशोधक मंडळाच्या त्रैमासिकात श्री पां. न. पटवर्धन यांची 'कित्येक नवे शोध' या शीर्षकाखाली आनंदीबाई पेशव्यांचे माहेर अशी एक नोंद प्रसिद्ध झाली आहे. त्यातही ओक हे गुहागरचे असेच विधान आहे. ( ४ ) काही ऐतिहासिक व्यक्तींच्या वंशावळी श्री. गो. स. सरदेसाई यांनी पे. द. कागद खंड २२ मधे छापल्या आहेत. त्यात आनंदीबाईच्या माहेरची वंशावळ आहे. तिचा मायना "ओक-गुहागरचे-आनंदीबाई पेशवे इचे माहेर-कोकणस्थ ब्राह्मण गोत्र वाशिष्ठ" असा दिला आहे. म्हणजे आनंदीबाईचे माहेरचे ओक कुटुंब गुहागरचे असेच आजपर्यंत प्रतिपादले गेले आहे. पण त्या कुटुंबाचा गुहागरशी संबंध नव्हता. त्यांचे

गाव हल्लीच्या गुहागर तालुक्यातील मळण. हा गाव गुहागरच्या अग्नेयेस सुमारे २० कि. मी. अंतरावर आहे. ज्ञानकोशात मात्र आनंदीबाई ही राघो महादेव ओक मळणकर यांची कन्या असे दिले आहे. महामहोपाध्याय चित्रावशास्त्री यांच्या मध्ययुगीन चरित्रकोशात आनंदीबाईचे चरित्र दिले आहे. ते देताना तिच्या माहेरचे गाव मळण ही कल्पना संपादकांना असावी पण घाटावरील मळठण गावाच्या जास्त परिचित नावामुळे त्या कोशात ओकांना मळठणकर ओक म्हटले आहे. पण तो वंश मळणच्या ओकांचा. त्र्यंबकेश्वर व घृष्णेश्वर ( वेरूळ ) येथील तीर्थोपाध्यायांच्या वह्यात या कुटुंबातील मंडळींनी आपले गाव मळण असेच लिहिले आहे. सर्व ओकांचे मूळगाव गुहागरच्या दक्षिणेस सुमारे ६ कि. मी. अंतरावर समुद्रकाठी असलेले पालसेत हे होय, असे पहिल्या तीन प्रकरणांवरून ठरते. पालसेतच्या एका ओक कुटुंबाला देशमुखी मिळाली; त्याच्या सरंजामास आठ गाव मिळाले; त्यांपैकी मळण हे एक होते. त्या आठही गावी ओक कुटुंबाच्या शाखा गेल्या. त्यांपैकी मळणला गेलेल्या शाखेत आनंदीबाईच्या वडिलांचे व चुलत्यांची नावे आहेत. तीर्थोपाध्यांकडील नामावल्यांवरून बनविलेल्या वंशावळीपैकी कामापुरेसा भाग पृष्ठ ५३ वर दिला आहे.

या वंशावळीतील राघो महादेव हे आनंदीबाईचे वडील. शके १७६५ चा म्हणजे सन १८४३ चा एक जदनामा सन १९०५ च्या एका मुकदम्यात दाखल केलेला मिळाला. त्यात आनंदीबाईच्या माहेरची मंडळी आहेत. व हा जदनामा तीर्थोपाध्यायांकडील नामावल्यांवरून केलेल्या वंशावळीशी जुळतो. जदनाम्याचा मायना " जदनामा बाळाजीराम ओक देशमूख ता. अंजनवेल यास पुत्र दोन. त्यांची वंशावळ वेळंब व मळण शके १७६५ " असा आहे. सन १७६५ च्या सुमारास भास्कर बाळाजी ओक कोतळुककर यांनी देशमुखीबद्दल पेशव्यांकडे लिहून दिलेली एक तकरीर पेशवे दप्तरातील रुमालात मिळाली. (ले. ६) त्यात पुढीलप्रमाणे उल्लेख आहे. " .......कोकणात रामाजी महादेव व राघो महादेव व आप्पाजी महादेव मळणकर ओक मळणास आले ते समयी--" इ. यावरून आनंदीबाईचे वडील व चुलते हे मळणकर ओक. त्यांपैकी राघो महादेव हे कारकून शिलेदार होते ते मळणबाहेर घाटावर असत. रामाजी महादेव व अप्पाजी महादेव हे नाशिकास राहात (लेखांक ८१, ८७, ८८) तेथून ते आपले गावी मळणास आले होते. गुहागरहून आले नव्हते. सन १७८५ मधील जमाबंदी पहाणीत प्रथमच एका ओकांचे नाव गुहागरला आढळते. खरे कु. [वृ. पा. १०२–गुहागरचा आगरझाडा स. १७८९ ते १८०९ यात तर ओकांचे नावही नाही.

वर उल्लेखिलेल्या शके १८४५–४६ च्या त्रैमासिकातील श्री. पां. न. पटवर्धन यांच्या नव्या शोधात " आता गुहागर येथे ओकांपैकी कोणी नाही असे कळते " असे विधान आहे. पण ते पूर्ण सत्य नाही. गुहागर येथे सुमारे शंभर वर्षांपूर्वीपासून आजपर्यंत ओक कुटुंबे घरदार करून आहेत. आनंदीबाईच्या माहेरची कधी नव्हती व हल्लीही नाहीत.




टीप :– यातील नावे ज्येष्ठतेच्या क्रमाने असतीलच असे नाही.

दुसऱ्या बाजीरावाने कसबे गुहागर तालुका अंजनवेल येथे नवा वाडा बांधावयाचे सन १८११ मधे ठरविले ते काम मराठे वसईकर याजकडे सोपविले व लाकूडसामान, कौले इ. सामान वसईहून जलमार्गांनी आणले. चिपळूणास वाड्याचे इमारतीबद्दल मोरोबा साने व राघोबा वोक यांस तीन हजार रुपये दिले. चिपळुणाहून गुहागरास व रात्री फडके यांचे वाड्यात राहून दुसरे दिवशी नवे वाड्यात येऊन राहिले. पुण्यास परत यताना वाटेतील मुक्कामांपैकी पालगडच्या भोजन खर्चाचे पैसे तेथील राघोबा वोखास

दिले. इत्यादी माहिती पेशवे दप्तरातील निवडून छापलेल्या कागदपत्रांत दिलेली आहे. त्यात त्यांच्या आजोळच्या म्हणजे आनंदीबाईच्या घराचा किंवा व्यक्तींचा उल्लेख आलेला नाही. पेशवे दप्तरातील कागदांत सन १८०६ पर्यंत ' मौजे मळण तरफ वेळंब तालुके अंजनवेल ' असा उल्लेख केलेला आहे. त्यातही गुहागरचा उल्लेख नाही. आनंदीबाईचे माहेर गुहागरच्या ओकांकडे नसून मळणच्या ओकांकडे होते हे वरील विवेचनावरून निश्चित होते.

दुसरी चुकीची माहिती छापली गेली आहे ती आनंदीबाईच्या भावांविषयी. आनंदीबाईच्या वडिलांनी एक मुलगा दत्तक घेतला होता हे खरे, पण म्हणून श्री. चिं. ग. कर्वे संपादित आनंदीबाईचे चरित्रातील " राघो महादेवास मुलगा मुळीच नव्हता तेव्हा त्याने दत्तक मुलगा घेतला " हे विधान किंवा श्री. पां. न. पटवर्धनांच्या ' कित्येक नवे शोध ' या शीर्षकाखालील भा. इ. सं. मंडळाच्या त्रैमासिकाच्या अंकात " रघुनाथराव ओकास औरस मुलगा नव्हता सबब त्याने.......यास दत्तक घेतले " हेही विधान सर्वस्वी बरोबर नाही. तसेच श्री. गो. स. सरदेसाई यांनी प्रसिद्ध केलेल्या ऐतिहासिक व्यक्तींच्या वंशावळीमध्ये आनंदीबाईच्या माहेरची वंशावळ पुढीलप्रमाणे दिली आहे. वंशावळी विद्यमान व्यक्तींकडून माहिती मिळवून दिल्या आहेत असे संपादकीय आहे.

रघुनाथराव = यशवदा (ताई)

- आनंदीबाई (रघुनाथराव पेशव्यांची द्वितीय पत्नी)
- गणपतराव
- बाबूराव (दत्तक)
  - गणपतराव
  - माधवराव
    - विनायक
      - विश्वनाथ

दत्तक मुलाखेरीज औरस मुलगा दाखविला आहे त्याचे नाव गणपतराव लिहिले आहे. पण त्या नावाचा पाठपुरावा कोठे आढळत नाही. दत्तक मुलाचे नाव बाबूराव दिले आहे व पां. न. पटवर्धनांनी आपल्या ' कित्येक नवे शोध ' या लेखात तेच बाबूराव नाव दिले आहे तेही बरोबर नाही. श्री. चिं. ग. कर्वे यांनी आपल्या आनंदीबाईच्या चरित्रात " दत्तक मुलगा घेतला हा आनंदीबाईचा भाऊ नारायण ओक " असे दिले आहे. तोही वस्तुस्थितीचा विपर्यास आहे. या लेखात वर एके ठिकाणी उल्लेखिलेल्या सन १९०५ च्या मुकदम्यात दाखल केलेल्या सन १८४३ च्या जदनाम्यात दत्तकाचा उल्लेख आवर्जून दाखविला आहे. तो म्हणजे राघो महादेवचे ज्येष्ठ बंधू हरिपंत यांचा पणतू बाळ हा राघो महादेवनी दत्तक घेतला व तो बापूजी झाला. त्याच्या वंशात मुंबईचे बॅरिस्टर विश्वनाथ

इत्यादी विद्यमान आहेत. इतरत्रही बापूजी असाच उल्लेख आहे. राघो महादेवला दोन औरस मुलगे होते. औरस मुलांपैकी गोपाळ हा लहान वयात वारला असावा. ( पहा – तीर्थोपाध्यायांकडील नामावलीवरून केलेली याआधी दिलेली वंशावळ). नारोपंत हा आनंदीबाईचा सख्खा भाऊ. त्यास भाऊबीजेकरिता आणावयास आनंदीबाईंनी कोपरगावाहून घोडी व माणसे धाडली. नारोपंत हा सख्खा भाऊ व रामाजीपंत ओक नाशिककर यांचे पुत्र हे चुलतभाऊ हे आले व त्यास सालाबादप्रमाणे पोशाख दिल्याचे उल्लेख पे. द. खंड ४ मधे आढळतात. दत्तक भावाबद्दल हे नाते दाखविलेले आढळत नाही. त्र्यंबकेश्वरच्या उपाध्यायांकडे बापूजीपंताच्या मुलांनी लिहून दिलेला लेख निर्णायक आहे. तो असा :

> " गणेश बापूजी आजे राघो महादेव चुलत आजे रामाजी महादेव निपणजे बाळाजी दामोदर चुलते नारोपंत, बंधू माधवराव, त्रिंबक व केशव पुतणे रघुनाथ व विष्णू व वामन व पुरुषोत्तम व वासुदेव व दामोदर मळण "

यावरून बापूजी व नारोपंत या दोन व्यक्ती होत्या व पूर्वनिर्दिष्ट मुकदम्यातील जदनाम्यावरून बापूजी हा दत्तक आलेला हे निश्चित होते. नारोपंत हा औरस पुत्र व त्याच्याकडे राघो महादेवचा वारसा आला हे पेशवे दप्तरात घडणी रु. ३९१ मधे मिळालेल्या पुढील आज्ञापत्रावरून दिसून येते.

राजमंडळ

स्वारी राजश्री.......................सुमा सबैन

सरंजाम राघो महादेव वोक कारकून शिलेदार–परभारे छ २८ जमादिलावल मशारनिल्हे यास सालिना तालुके असेरे येथील बेहेडयास पाच हजार रुपयांची नेमणूक आहे त्यास मशारनिल्हे मृत्यू पावले सबब त्यांचे पुत्र नारो रघुनाथ याचे नावे करार करून सालाबादप्रमाणे खाजगी याद ५००० रु. पाच हजार रुपये तो॥ असेरी नि ॥ रंगनाथ नारायण याजकडून देविले.

श्री. पां. न. पटवर्धन यांच्या 'काही नवीन शोध' या शिर्षकाखालील नोंदीत " आनंदीबाईने आपल्या दत्तक भावाच्या स्वास्थ्याकरिता त्यास काही इनाम करून देवविले ते इनाम कमिशन पावेतो चालत होते. पुढे बापूस पोलिटिकल पेन्शन मिळू लागले. " असे लिहिले आहे. सन १८२१ साली ते पेन्शन वार्षिक रु. २४०० होते असे सातारचे राजदप्तरदार दाजीबा जोशी यांच्या दप्तरातील उपलब्ध यादीवरून दिसते असे श्री. य. न. केळकरांचे टिपण आहे. पेशवे कालात काय इनाम होते याचा तपशील कोठे आढळला नाही. तरीपण श्रीं. पटवर्धनांची " दत्तक भावाच्या स्वास्थ्याकरिता " व " आनंदीबाईने देवविले " ही दोन विधाने व श्री. चिं. ग. कर्वे यांचे आनंदीबाईचा दत्तक भाऊ तिच्यावरच बराचसा अवलंबून असे. " हे विधानही तर्कशुद्ध वाटत नाही. आनंदीबाईच्या माहेरकडील इतर मंडळींना वतने होती. ती आनंदीबाईमुळे मिळाली

नव्हती. आनंदीबाईचे चुलते हरी महादेव ओक व वेळंबचे गोपाळ रामचंद्र ओक या इर-दुजणांची पूर्वापारच्या देशमुखी वतनावर स्थापना करावयाची सन १७६५ ची आज्ञा पे. द. रुमालात मिळाली ( लेखांक ६६ ). दुसरे चुलते बाळाजी महादेव याजकडे नाशिक त्र्यंबकचा पोतदारी हक्क व मौजे इंदोरे, पो. दिंडोरी हा गाव मोकासा होता. मौजे पिंपळगावभावक हा गाव जहागीर होता. याबद्दलचे सन १७५६ व सन १७५९ चे कागद पे. द. रुमालात मिळाले आहेत (ले. १०५,१०६ ). त्यात वतने पेशजी करून दिली आहेत पण ऐवज सुरळीत पावत नाही म्हणून तो साल दरसाल पावत जाणे म्हणून आज्ञा आहे. ही वतने आनंदीबाई ही पेशवे कुळात येण्यापूर्वीची आहेत. व पुढे वंशपरं-परेने चालत होती. आणखी एक चुलते अप्पाजी महादेव याजकडे मौजे चुचाले, पो. नाशिक हा गाव सन १७९१ मध्ये कमाविशीने दिला होता. त्यास पुत्र नव्हता म्हणून सन १८०१ मधे त्यांच्या मृत्यूनंतर तो त्यांचे बंधू रामाजी महादेव याजकडे आला ( लेखांक ८७ ) व त्यांच्या मुलानातवंडांकडे तो चालू राहिला. हा गाव कमाविशीने मिळाला त्या वेळी आनंदीबाई नजरकैदेत व नानाफडणविसांच्या गैर मर्जीत होती व त्यापूर्वी सुमारे ८ वर्षे रघुनाथराव पेशवे वारले होते. यापैकी कोणतेही वतन आनंदीबाई-मुळे मिळाले असे दिसत नाही. इतरही ओकांना त्यासुमारास वतने होती. आनंदीबाईच्या दत्तक भावाला काही इनाम होते म्हणून ते आनंदीबाईने देवविले हे तर्कशुद्ध वाटत नाही. दत्तक भावाच्या स्वास्थ्याकरिता त्याला इनाम करून देण्याइतकी आनंदीबाईला त्याच्या-बद्दल आस्था असती तर तिने भाऊबीजेला त्यालाही निमंत्रण पाठवून शेला-पागोटे दिले असते. पण सख्ख्या भावाला आणावयास घोडी व माणसे पाठविली व नारायणराव व चुलत बंधू, मामेबंधू आल्याचा उल्लेख पे. द. खंड ४ मधे आहे. दत्तक भाऊ आल्याचा उल्लेख नाही. दत्तक बंधू सन १८२१ पर्यंत हयात होते; कारण त्या सालच्या पोलिटिकल पेन्शनरांच्या यादीत त्यांचे नाव आहे. सख्ख्या भावाची, चुलत्यांची, चुलतभावांची वतने आनंदीबाईमुळे मिळाली नाहीत अशी परिस्थिती असता दत्तक भावाला तिने वतन करून देवविले हे विधान प्रत्यक्ष पुराव्याअभावी ग्राह्य वाटत नाही; तसेच त्याच्या स्वास्थ्या-करिता नेमणुकीची आवश्यकता पडावी अशी ओकांची सांपत्तिक परिस्थिती होती असे दिसत नाही. रा. ब. ग. चिं. वाड संपादित बाळाजी बाजीराव पेशवे रोजनिशी भाग २ मधे पेशवे सरकारनी वेळोवेळी कर्ज घेतले त्याची यादी आहे. त्यात १७४९–५० मधे म्हणजे आनंदीबाई पेशवे घराण्यात येण्यापूर्वी, बाळाजी महादेव ओक याजकडून म्हणजे आनंदीबाईच्या चुलत्यांकडून पाच लाख रुपये द. म. एक रुपया व्याजाने घेतल्याचा उल्लेख आहे. ( लेखांक १०८). त्याच यादीत आनंदीबाईचे चुलतभाऊ गंगाधर बल्लाळ ओक याजकडून इहिदे सितैन मया व अलफच्या जमादिलावल २४ ला. रु. २,८६,८६१ व त्याच सालात सव्वाल ६ ला रु. ७५००० द. म. १ रु. व्याजाने घेतले असा उल्लेख आहे. इतर ओकही अपापल्या परीने सुस्थितीत असताना दत्तक भावाच्या स्वास्थ्याकरिता ( स्वास्थ्य = उपजीविकेचे सुखाचे साधन-इनाम जमीन इ. दाते-कर्वे कोश ) इनाम दिले

गेले हे विसंगत वाटते.

आनंदीबाईच्या मृत्यूनंतर दुसऱ्या बाजीरावाने आपल्या आजोळच्या ओक मंडळींना जवळ केल्याचे उल्लेख आढळतात. आनंदीबाईचे चुलत बंधू कचेश्वर रामाजी म्हणजे बाजीराव साहेबांचे कचोपंत मामा यांचा उल्लेख सन १८१६ च्या दु. बा. खाते जमाखर्चात सरकारातून पालख्या व दिवट्या व अफ्तागिऱ्या वगैरे नेमणूक आहे त्या यादीत

५० आजीबाई ओक

५० कचोपंत मामा ओक

असा आला आहे. ( लेखांक ९४ ). कचेश्वरचे दुसरे बंधू त्र्यंबकराम यांचा उल्लेख पे. द. भाग २२ मधे " रु. ४०० त्रिंबकरावमामा ओक मृत्यू पावले. सबब क्रियेबद्दल २–१–१८०८ व रु. १०० त्रिंबकराव मामा ओक यांचे सांवत्सरिक श्राद्धाबद्दल " असा आहे. ( ले. ९५ ). आनंदीबाईचे चुलते अप्पाजी महादेव यांच्या पत्नीस बाजीरावाने नेमणूक करून दिली ती आज्ञा पे. द. घडणी रुमाल ४१ मधे पुढीलप्रमाणे आहे :

यादी अन्नपूर्णाबाई ओक सुमा इहिदे मयातैन व अलफ (सन १८०१) संसार-बेगमीबद्दल सालमजकुरापासून नेमणूक सालिना रु. १२०० बारासे रुपये पुण्यात पावते होत ऐसा ऐवजी नेमून देवावा. मखलाशी चिंतोपंत देशमुख. अन्नपूर्णाबाई ओक, अप्पाजी महादेव यांची स्त्री पुण्यात रहातात सबब यास खर्चाबद्दल सालिना येक हजार दोनसे रुपये सालमजकुरापासून करार करून देऊन हे सनद सादर केली असे. तरी सदरहूप्रमाणे येक हजार दोनसे रुपये दरसाल प्रा। पुणे पैकी पाववीत जाणे मामलेदार प्रा। मजकूर यास सनद देणे (देणे अक्षरे बाजीराव सोाची) छ १४ मोहरम अधिक ज्येष्ठ सुमा सन इहिदे ( पुढील भाग फाटला आहे)

१६–२–१८०७ ला तीर्थरूप गंगाभागिर्थी अन्नपूर्णा आजी ओक हिला रु. १६३२ दिल्याचा उल्लेख पे. द. भाग २२ मधे आहे. याखेरीज मातोश्री यशोदाबाई ओक अनिष्ट ग्रहशांतीबद्दल खर्च पेशव्यांचे जमाखर्चात आहे (ले. १८२) व शके १७३८ मधे बाजीरावाचे स्वारीचे ताळेबंदात यशोदा आजीबाई ओक पोा १० मोहरा शेटशाही उसनवार घेतल्याचा उल्लेख आहे. ( ले. ८२ ) या यशोदाआजी म्हणजे आनंदीबाईंच्या मातोश्री. याखेरीज पे. द. खंड ३२ मधे २६–८–१७९९ चा लेख छापला आहे त्यात वसईहून केळी, नारळ इ. पाठविल्याचा उल्लेख आहे ( ले. ८६ ); त्यात ताई वोकीण ( आनंदीबाईची आई ) व काकूबाई यांच्या नावांनीही पाठविली आहेत व त्यांची संख्या खाशा खाऱ्यांना पाठविलेल्या वस्तूंइतकी जवळजवळ आहे. आनंदीबाईच्या माहेरच्या माणसांना योग्य तो आदर बाजीरावाचे कारकीर्दीत मिळत होता.

आनंदीबाईच्या बहिणींबद्दल एक त्रोटक माहिती पुढीलप्रमाणे प्रसिद्ध झालेली आहे :( १ ) त्र्यंबक धोंडदेव सोमण यांना दिली होती व ती सती गेली असे सोमण

कुलवृत्तांतावरून कळते. (२) पुण्याचे शंकर गंगाधर चापेकर कुलवृत्तांतात दिलेल्या माहितीवरून नारो अनंत चापेकर हे दुसऱ्या बाजीरावाचे सख्खे मावसभाऊ होते. नारो अनंतची आई अन्नपूर्णाबाई यांना ब्रिटिश सरकारकडून रु. ४०० पेन्शन मिळत असे व अन्नपूर्णाबाईच्या मृत्यूनंतर त्यांचे मुलास रु. २५० काही वर्षे मिळाले अशी माहिती मिळते. (३) तिसऱ्या बहिणीचा सूचक उल्लेख ‘ आनंदीबाईची दिनचर्या ’ या खंडात आहे. भाऊबीजेसाठी आलेल्या मंडळींचे यादीत “ देवाजी बाबाजी मराठे बाईचे मेहुणे नाशकाहून मुलाचे लग्नाचे योजनेस आले ” असा उल्लेख आहे. (४) एक बहीण देशस्थाकडे दिली होती असे ऐकिवात आहे असे भा. इ. सं. मं.च्या चौथ्या वर्षाच्या एका अंकात दिले आहे. सोमण व चापेकर कुलवृत्तांतात आलेल्या माहितीस ऐकीव अंदाज येवढाच आधार वाटतो. त्याउलट सोमण व चापेकर यांच्याकडे आनंदीबाईच्या आत्या दिल्या होत्या असे भावे दप्तरातील काही याद्या श्री. य. न. केळकर यांनी पराग मासिकात प्रसिद्ध केल्या आहेत यावरून दिसते ( लेखांक ८१ ). सवाई माधवरावांचे लग्नास कोणत्या सोयऱ्यांना बोलवावयाचे त्याच्या याद्या आहेत त्यात सोयऱ्यांचे पेशवे घराण्यात कोणाशी व काय नाते हे दिले आहे. त्यात चिंतोपंत सोमण हे आनंदीबाईचे आतेभाऊ व रामाजी महादेव (आनंदीबाईचे चुलते) यांची सौ. भाची ही चिंतोपंताची स्त्री असे नाते दिले आहे. तसेच केसोपंत चापेकर हे आनंदीबाईच्या आतेचे लेक व यांचे पुत्र पुण्यास शनवारात राघोपंत ओक यांचे घरात बिऱ्हाडाने राहात आहेत असे दिले आहे. या जुन्या कागदातील माहिती जास्त विश्वसनीय वाटते. त्याच सोयऱ्यांचे यादीत आनंदीबाईच्या एका बहिणीचा उल्लेख पुढीलप्रमाणे आहे :– सदासिव पंत परांजपे वसईकर यांची स्त्री सौ. पार्वतीबाई श्रीमंत सौावती आनंदीबाई यांची बहीण यास चिठ्ठया पाठविणे. सदासिवपंत परांजपे मेव्हणे श्री त्रिंबकेस्वरी आहेत त्यास १ घोडे पाठविणे दुसरी बहीण येसाजीपंत चोळकर याची स्त्री मौजे जांबसूद ताा. अंजनवेल यास घोडे पाठविणे अशी दोन बहिणींची माहिती मिळते.

## प्रकरण तेरावे

# बोरगावकर ओक

ओकांचा मूळ पुरुष हरबा ओक; याच्या पश्चात ओकांची तीन घराणी झाली. त्यांपैकी एका घराण्यात वेळंबकर देशमुख, सिद्रस ( महाजन ), मळणकर व बोरगावकर असे चार वंश येतात ( लेखांक ११ ). वेळंबकरातून मळणकर निराळे झाले ते प्रकरण ११ मध्ये दिलेले आहे. त्यांपैकी बाळाजी महादेव हे बोरगावला होते असे या प्रकरणाच्या उत्तरार्धात म्हटले आहे; पण बोरगावकरांचा संबंध उरलेल्या वेळंबकर वंशात अगर मळणकर वंशात कोठे बसतो ते समजण्यास साधन उपलब्ध झाले नाही. परंतु ओकांना देशमुखीबरोबर सरंजामास मिळालेल्या गावी ओक गेले व तेथील खोत झाले. सरंजामापैकी बोरगाव हा एक गाव होता व तेथील खोत ओक होते. त्र्यंबकेश्वराच्या लेखात अनेक ओकांनी आपल्या नावापुढे ' खोत बोरगाव ' असा उल्लेख केलेला आहे. बामणोलीच्या ओकांनी खोत या नात्याने आपल्या गावचे उपाध्येपण मिरासवृत्तीने गुहागरचे वे. मू. विश्वनाथभट खरे यांना दिले. त्या पत्रावर साक्षीदार नावे आहेत त्यावरून शके १६३५ ( सन १७१४ ) मध्ये कृष्णाजी केशव व नारो महादेव हे बोरगावचे खोत होते असे कळते ( ले. ९६ ). त्याअगोदर खोत होते त्या ओकांची नावे मिळू शकली नाहीत; पण त्याअगोदर ४–५ पिढया तरी ओक हे बोरगावचे खोत होते; कारण बामणोलीकर खोत कृष्णाजी केशव हे शके १६३७ ( सन १७१५ ) च्या पत्रात ( ले. १४ ) विश्वनाथ भट बोपदेव भट यांना लिहितात की, तुमचे आजे रामचंद्र अग्निहोत्री त्यांचे आजे बोपदेव भट हयासी बोरगावकर खोत याही उपाध्येपण दिल्हे होते म्हणून आमचे वडिलांनी बोरगावास जाऊन वे. रामचंद्र अग्निहोत्री यास बोलावून उपाध्येपण दिले. यावरून सन १७१५ च्या पिढीपूर्वी चार पाच पिढया म्हणजे सन १६१५ पासून किंवा त्यापूर्वीपासून बोरगावला ओक खोत होते. मळणचे हरी महादेव, आप्पाजी महादेव इत्यादी ४–५ भाऊ सन १७५० चे सुमारास नाशिक क्षेत्री राहत असत; त्यापैकी बाळाजी महादेव हेही शके १६७४ ( सन १७५२ ) मधे सतक्षेत्री नाशिकास राहत होते ( ले. १०३

१०४, १०५) पण सन १७५४ मधे त्यांचे वास्तव्य बोरगावास होते असे बाळाजी बाजीरावांच्या सनदेवरून दिसते ( ले. १०४,१०५ ) पण त्यांचा किंवा पुढे त्यांच्या वंशजांचा खोत म्हणून उल्लेख केलेला नाही. कृष्णाजी केशव व नारो महादेव खोत बोरगाव (लेखांक ९६) ते खोतीमधे दोन हिस्सेदार असावेत. सन १७२६ मध्ये त्र्यंबकेश्वरी खंडो केसो ओक यांचा लेख आहे, त्यात आपला उल्लेख ते " खोत मौजे बोरगाव " असा करतात ( वं. क्र. ४.१।अ ) पण त्यानंतरच्या त्यांच्या पिढयांचे वास्तव्य मलकापूर, टेंभी इकडे होते. त्यांनी त्र्यंबकेश्वरी आपला उल्लेख खोत म्हणून न करता जहागीरदार टेंभी असा केला आहे. खोत म्हणून उल्लेख करणारे खंडो केसो हे कृष्णाजी केशव ओक खोत यांचे भाऊ असण्याचा संभव आहे. खंडो केसोच्या वंशाचे वास्तव्य टेंभी माकोडी असे त्र्यंबकेश्वराच्या लेखात आहे. टेंभी व माकोडी ही दोन्ही गावे वऱ्हाडांत ( विदर्भात) मलकापूरच्या नैर्ऋत्येस सुमारे १०–१२ मैलांवर आहेत.

कृष्णाजी केशव व नारो महादेव या दोन हिस्सेदारांखेरीज आणखी एका वंशाकडे खोतीचा तिसरा हिस्सा होता तो वंश मुंबईचे दिनकर रावजी ओक ( मृत्यू २७। १ १९७४ ) यांनी मिळवून पाठविलेल्या कागदपत्रांवरून कळून येतो. महादाजी बल्लाळ खोत मौज बोरगाव व बोरगावची उपाध्येपणाची वृत्ती असलेली ( वृत्यंशी ) लक्ष्मण जोशी यांचा तंटा होता. त्यात जोशांनी कुंपण तोडली म्हणून व जोशाची वृत्ती न मानत होळीची पूजा परगावच्या इसमाकडून करून घेतली म्हणून सन १७८९ मध्ये सुभेदारांनी महादाजी खोत यांना पंचवीस रुपये दंड केला होता ( ले. ९७ ). त्याचेच दुसरे वर्षी म्हणजे सन १७९० मध्ये लक्ष्मण जोशी यांनी वृत्तीच्या मानपानाविषयी व झाडे तोडल्याबद्दल महादाजी बल्लाळ खोताविरुद्ध तक्रार केली होती ( ले. ९८ ). त्याच वेळी गोपाळभट खोत ओक व हरभट जोशी वृत्यंशी यांचा तंटा जमीनजुमला, मानपान इ. बद्दल होता ( ले. ९९ ) यास प्रतितक्रार गोपाळ भटांनी केली ( ले. १०० ). गोपाळा भट हे दुसरे दोन हिस्सेदार कृष्णाजी केशव व नारो महादेव यांचेपैकी असावेत. महादाजी बल्लाळ खोतानंतर मोरो महादेव यांचा खोत म्हणून सन १८०९ मध्ये उल्लेख आहे ( ले. १०१). या मोरो महादेवांचे व त्रिंबक गोपाळ ओक यांचे संयुक्त खाते अंजनवेलचे मोरोपंत आचवल व केसोपंत टिळक यांच्या खतावणीत सन १८११ ते १८२२ या वर्षात होते ( ले. २१४ ). त्रिंबक गोपाळ हे गोपाळभटाचे पुत्र असावेत. बोरगावच्या वासुदेव गोविंद मेहेंदळयांनी सन १८३६ मधे कर्जरोखा लिहून दिला होता त्याची भरपाई मेहेंदळे अगर मोरो महादेव ओक करतील असे कर्जरोख्यात म्हटले आहे कर्जरोखा चिपळणचे १२०० नं. ला नोंदलेला आहे. मोरो महादेव नंतर बाळाजी मोरेश्वर खोत होते. कान्हेरे व सिर्के यांच्या वसूलबाकीचे सन १८४३ चे एक पत्र त्यांच्या हस्ताक्षरात आहे. ( ले १०२ ). बाळाजी मोरेश्वर ओक यांनी त्रिंबक गोपाळ यांचे नातू परशाम नारायण यांना दत्तक घेतले व महादाजी नाव ठेविले. व महादाजी बल्लाळ हे खोतीत १/३ हिस्सेदार झाले अशी माहिती परशाम नारायण यांचे पुतणे दिनकर रावजी

यांनी पुरविली.

मळणचे हरी महादेव, अप्पाजी महादेव इत्यादी ४–५ भाऊ सन १७५० चे सुमारास नाशिकक्षेत्री राहत असत (ले. ८८, ८९, ९०) त्यांपैकी बाळाजी महादेव हे शके १६७४ म्हणजे सन १७५२ मधे सतक्षेत्री नाशिकास राहत होते (ले. १०३,१०४,१०५ इ.). पण १७५४ मधे त्यांचे वास्तव्य बोरगावास होते असे बाळाजी बाजीरावांच्या एका सनदेवरून दिसते ( ले. १०५). पण त्याचा किंवा त्याच्या वंशजांचा खोत म्हणून उल्लेख केलेला नाही. बाळाजी महादेव व त्यांच्या वंशजांचा उल्लेख अधून मधून ओंकार असा केलेला आढळतो ( ले १०६, १०७, १०८). तसाच मळणच्या चार बंधूंचा व त्यांच्या वंशजांचा अधूनमधून केलेला आढळतो ( ले. ८८, ८९, ९० ) इतर कोणत्याच ओकांचे नावात अशी घरसोड नाही. बामणोलीकरांच्या एका वंशाने मात्र ओंकार हे नाव यापूर्वीच धारण केले व ते कायम ठेविले. मळणकर ओकांना लोकांनी नासिक-जवळच्या जमिनी दान दिल्या ( ले. ८८ व ८९). तसेच जमिनीचे दान बाळाजी महादेव यांना त्याच काळात मिळाले होते ( ले. १०३ ). या साम्यावरून मळणच्या तिसऱ्या पिढीतील पाच भावांपैकी बाळाजी महादेव–आनंदीबाईचे चुलते–हेच बोरगावास राहत होते असे दिसते व म्हणून त्यांना बोरगावकर वंशात समाविष्ट केले आहे. शिवाय त्यांचे विद्यमान वंशज (नाशिक) आपले मूळगाव वेळंब सांगतात. बाळाजी महादेवांना पेशव्यांनी सन १७५६ मधे दिलेल्या सनदा आहेत (ले. १०४, १०५ ). त्यात बाळाजी महादेवांची वस्ती मौजे बोरगाव ताा वेळंब, सुभा दाभोळ हल्ली वास्तव्य को। नासिक असा उल्लेख आहे. नाशिकास येण्यापूर्वी ते बोरगावास होते असे दिसते. घृष्णेश्वरच्या उपाध्यायांकडे बाळाजी महादेव व त्यांचे वंशज यांचा गाव बोरगाव दिला आहे.

ओक देशमुखांना सरंजामास मिळालेल्या गावांपैकी बोरगाव हा एक गाव होता, तसाच मळणही होता म्हणून एक बंधू बोरगावास गेले असावेत. पण नाशिकच्या आस-पास वतने मिळाल्यामुळे ते नाशिकच्या पुण्यक्षेत्री राहावयास आले आसावेत. पण त्यांच्या किंवा त्यांच्या वंशजांच्या नावापुढे कोठेही ‘ खोत ’ असा उल्लेख नाही. वर उल्लेखिलेली सनद त्यांना बाळाजी बाजीरावांनी दिली आहे. त्यातील जमीन त्यांना प्रथम मोगलाई अमल असताना म्हणजे सन १७५२ पूर्वी मिळालेली होती. सन १७५२ मध्ये त्यांना बीस बिघे जमीन तुळशी, फुले इत्यादी करण्याकरिता सत्पात्र ब्राह्मण म्हणून पवारांनी इनाम दिली होती ( ले. १०३ ). त्याच जमिनीची सनद बाळाजी बाजीरावांनी पेशव्यांचा अंमल चालू झाल्यावर दिली असावी. याचप्रमाणे मोगलाई अंमल असता मौजे पिंपळगाव भावले ( हल्ली ‘ बहुले ’ म्हणतात ) पो। नाशिक येथील दोन तक्षिमा ( हिस्से) जहागीर बाळाजी महादेवाकडे होती त्याची पेशवाई सनद बाळाजी बाजीरावांनी सन १७५६ मध्ये करून दिली ( ले. १०५ ). याशिवाय नाशिक–त्रिंबक येथील पोतदारी हक्क मोगलाईपासून चालत होता ( ले. १०६ ) व बाळाजी महादेवाकडे मौजे इंदोरे पो।. दिंडोरी येथील मोकासा व मौजे पिंपळदे पो। नाशिक हा गाव कमाविसीने होता, व

त्यापैकी एक हजार रुपये पालखीचे सरंजामास मिळत होते. असे हे बाळाजी महादेव जाहागीरदार मोकाशी, कमाविसदार, पोतदार व पालखीपदस्थ होते. पण पुढील काळात हे घराणे ओळखले जाऊ लागले ते मामलेदार (कचेरीवाले) ओक म्हणूनच !

परगणे नाशिकमध्ये पेशवे कारकीर्द सुरू झाल्यावर पहिली दोन वर्षे म्हणजे फसली सन ११६२ व ११६३ किंवा ७ डिसेंबर १७५२ ते ५ जून १७५३ मध्ये बाळाजी महादेव वोक मामलेदार होते. त्यानंतर पुन्हा फसली सन ११६९ मध्ये म्हणजे ५ जून १७८४ पासून त्यांचेकडे मामलेदारी एक वर्ष होती. फसली सन ११९५ (इ. स. ५-६-१७८५) ते फ. सन १२०८ (ता. ५-६-१७९९) मिळून चौदा वर्षे मामलत बाळाजी महादेवाचे नातू कृष्णराव गंगाधर याजकडे होती (ले. ८० यादी चौथी). बाळाजी महादेव हे १७६९ मध्ये निवर्तले (ले. ९९). त्याच वर्षी त्यांचे पुत्र गंगाधर बल्लाळ मृत्यू पावले (ले. १०७) म्हणून पोतदारी व मोकासा बाळाजी महादेवांच्या मृत्यूनंतर त्यांचे नातू माधवराव गंगाधर याजकडे आला (ले. १०६). तरीपण सन १७५९ मध्ये मल्हारजी होळकर, नारो शंकर, विठ्ठल शिवदेव प्रभृतींना बाळाजी-बाजीरावांनी पत्रे लिहिली; त्यांत नाशिकची पोतदारी वतनी रा. गंगाधर बल्लाळ वोक याची आहे व आपआपल्या गावावरचा पोतदारी ऐवज बाकी न ठेवता त्यास सालोसाल पावता करावा अशी ताकीद केली आहे (ले. १११). बाळाजी महादेव यांच्या ह्यातीतच त्यांचे पुत्र गंगाधर बल्लाळ पोतदारी वतनाचा कारभार करू लागले होते. बाळाजी महादेव यांनी सन १७४९-५० मधे पाच लाख रुपये दरमहा १ रु. व्याजाने व गंगाधर बल्लाळ यांनी १७६०-६१ मधे रु. २८६८६१ व रु. ७५००० त्याच व्याजाच्या दराने पेशवे सरकारला कर्ज दिले होते (ले. १०८). गंगाधर बल्लाळनी दिलेल्या कर्जा-मधील अवधी पाच महिन्यांची आहे पण तेथेही प्रथम ओक म्हटले आहे व दुसऱ्या खेपेस ओंकार म्हटले आहे. ज्या बाळाजी महादेवांनी सन १७५२ मधे जमिनीची याचना करून तिचे दान घेतले (ले. १०३) ज्यांनी सन १७५६ मधे योगक्षेम चालविण्याकरिता ती जमीन व जहागिरीचा भाग मागून घेतला (ले.१०४ व १०५) तेच बाळाजी महादेव सन १७४९-५० मधे पेशवे सरकारला पाच लाखांचे कर्ज देतात ही विचार करण्या-सारखी घटना आहे. इ. स. १७५५ मधे बाळाजी महादेवांनी दादंभट धर्माधिकाऱ्याकडन चोरीचा ठिकाण लावून चोरीच्या ऐवजापैकी सरकारी चौथाई कापून घेऊन वेदमूर्तींचा ऐवज त्यास परत केला. ती चौथाईची रक्कम धर्मादाय खर्ची घालून भटजींना पुरेपूर रक्कम देण्याची आज्ञा दिली होती (ले. १०९). बाळाजी महादेव याजकडे पोतदारी वतन होते (ले. १०६). त्याचा काही गावांवरचा ऐवज त्यांना वेळचे वेळी मिळत नव्हता म्हणून त्या त्या गावच्या वतनदारांना पेशव्यांनी १७५६ ते १७५८ मधे ताकीद-पत्रे दिली होती (ले. ११०). तशीच ताकीद-पत्रे गंगाधर बल्लाळ यांना देण्याबद्दलची सन १७५८ ची आहेत (ले.१११).

गंगाधर बल्लाळ यांना माधवराव व कृष्णराव असे दोन मुलगे होते. माधव-

रावांकडे पोतदारीचा वारसा आला ( ले. १०६ ). वडिलार्जित पालखीच्या सरंजामास मिळणारा एक हजार रुपयांचा ऐवज मध्यंतरी तो महाल रघुनाथदादा पेशव्यांकडे दिला होता तेव्हा मिळत नव्हता. महाल सरकारकडे सन १७६८ त परत घेतले. तेव्हा त्यानंतर तो ऐवज मिळावा म्हणून माधवराव व कृष्णराव या दोघा बंधूनी पेशव्यांकडे विनंती करून तो ऐवज मिळविला ( ले. ११६ ). पोतदारी वतनाच्या ऐवजापैकी निमे पेशवे सरकार व निमे ओक अशी वाटणी होती. माधवरावांकडे पोतदारी वतन आल्यानंतरही तो ऐवज सुरळीत पावत नव्हता. माधवरावांच्या वाडवडिलांचे वेळीही असे घडत होते त्या वेळेप्रमाणच याही वेळी पेशव्यांना गावोगावच्या वतनदारांना ताकीदपत्रे लिहावी लागली. ( ले. ११७ ). सवाई माधवरावांचे लग्न १०–२–१७८३ ला झाले. त्या लग्नाच निमंत्रण नागपूरच्या भोसल्यांना देण्याकरिता नाना फडणविसांनी माधवराव गंगाधर यास पाठविले होते. ( ले. ११८ )

कृष्णराव गंगाधर याजकडे नासिकची मामलत ५ जून१७८५ पासून ५–६–१७९९ पर्यंत एकूण १४ वर्षे होती ( ले. ८० ). माधवराव गंगाधर यांचे कसबे नाशिक येथील बागेला एका ओढ्याचे पाणी, दुसऱ्याचे थोडे थोडे बोभाटा न येईल इतके कमी करून दर सात दिवसांनी एक प्रहर पाणी देण्याची पेशव्यांची आज्ञा सन १७८५ सालची आहे ( ले. ११९ ). त्याची अंमलबजावणी कृष्णाजी गंगाधर यांनी कमाविसदार ( मामलेदार) म्हणून करावयाची होती. नाशिक परगण्यात अवर्षण पडले त्या अपत्तीची चौकशी करून कळविण्याचे काम कृष्णाजी गंगाधर कमाविसदार याजकडे सोपविले होते ( ले. १२० ). नाशिक परगण्यात पेशवे गेले होते. त्याकरिता कृष्णाजी गंगाधर यांनी जो खर्च केला होता त्याची भरपाई करण्यास गाववार किती पट्टी वसूल करावयाची त्याची यादी सरकारातून आली व कृष्णाजी गंगाधर याजकडे सहासष्ट गावांची वसुली रु. १३३७ करून घेण्याचे काम होते. त्यात माधवराव गंगाधर यांच्या मौजे पिंपळगाववर सोळा रुपये पट्टी बसली होती ( लेखांक १२१ ). नाशिक येथील सिंहस्थाचे यात्रेचा बंदोबस्त राखण्याकरिता शंभर गाडदी कमाविसदारांकडे पाठविले होते ( लेखांक १२२ ). पठाण, पेंढारी दंगा करतील त्यांना पकडून पाठवून देण्यास पेशव्यांनी सर्व अंमलदारांना स. १७९८-९९ मधे आज्ञा पाठविल्या होत्या. परगणे नाशिकची आज्ञा माधवराव गंगाधर यांना पाठविली असे रा. ब. ग. चिं वाड यांच्या दुसरे बाजीराव रोजनिशीत पृ. १७५ वर आहे.

सन १७९२–९३ मधे कृष्णाजी गंगाधर यांचे बरोबर राजाराम सडे त्रिंबककर यांना द्यावयाचे वर्षासनाचे १०० रुपये महादाजी खंडेराव ओक यांनी पुण्याहून पाठविले होते ( लेखांक ३८ ). सन १७९८–९९ मधे यशवंतराव होळकर दंगा करीत नाशिकास आले होते. तेव्हा पठाणांनी नाशिक क्षेत्रास फार उपद्रव दिला. माधवराव गंगाधर कमाविसदार यांनी त्यांना १५०० रुपये दिले तरी त्यांची मागणी चालू होती. ते दिले नाहींत म्हणून पठाणांनी त्यांचे घर खणून ऐवज शोधला. ( ले. १२२ अ ).

कृष्णरावांचे हयातीत नाशिकवर इंग्रज अंमल सुरू झाला व कृष्णाजी गंगाधरना आपली वडिलार्जित वतने चालू ठेवण्याबद्दल इंग्रजांकडे विनंती करावी लागली व त्या विनंती-पत्रावर देशमुख देशपांडे यांचे दाखले जाहगिरी पूर्वीपासून चालू असल्याबद्दलचे आहेत ( लेखांक १२३ ).

त्यानंतर सन १८२४ च्या आश्विनात कृष्णरावांनी स्वतःच्या हस्ताक्षरात लिहून ही वतने व जमिनी कशा संपादन झाल्या ते पुराव्यासह कळविले ( लेखांक १४४ ). कृष्णराव गंगाधर यांची भावजय लक्ष्मीबाई ही सरकारात खोटे सांगून जाहागिरी गावा-पैकी रु. २५० परस्पर घेऊ लागली अशी तक्रार कृष्णरावानी अहमदनगरचे कलेक्टर पॉटिंजर यांचेकडे केली त्यावरून कलेक्टरनी लक्ष्मीबाईंना कागदपत्र घेऊन बोलाविले होते ( ले. १२५ ). त्याचा निकाल काय झाला हे समजण्यास कागद उपलब्ध झाले नाहीत पण डेक्कन सरदारांच्या सन १८४२ च्या यादीत लक्ष्मीबाई ओकांचे नाव होते ( लेखांक ७६ ). कृष्णराव गंगाधर याजकडे पिंपळगाव भावला येथील निमे पाटिलकी होती त्यापैकी २ चाहुर जमीन त्यांनी विकली होती ( ले. ८० ).

कृष्णराव गंगाधर दि. १० फेब्रुवारी सन १८२५ ला दिवंगत झाले व त्या वेळी इंग्रजांनी ठरविलेल्या धोरणाप्रमाणे त्यांची वतने जप्त केली गेली ( लेखांक १२६ ). कृष्णरावांना मुलगा नव्हता म्हणून त्यांच्या पत्नी राधाबाई यांनी इंग्रजाकडे अर्ज केला व त्याप्रमाणे दत्तक घेण्याची अनुज्ञा त्यांना २४ ऑगस्ट सन १८२५ ला मिळाली ( लेखांक १२७ ) व इनाम मोकळे करून राधाबाईंच्या नावाने वतने गाव व ऐवज राधाबाईचे हवाली झाल्याची पावती राधाबाईनी श्रावण व।। १ शके १७४७ ला लिहून दिली ( लेखांक १२८ ). राधाबाईनी ज्येष्ठ शु।। १४ शके १७४८ ला मुलगा दत्तक घेतला त्याचे नाव बळवंतराव. त्या वेळी मुलाचे वय ८ वर्षांचे होते ( लेखांक १२९ ). राधाबाई वैशाख व।। ४ शके १७५३ ला ( २२ मे १८२९ ) मृत्यु पावली. त्यानंतर तिच्या कुटुंबातील मंडळीची व जमीनजुमल्याची माहिती इंग्रजांकडे दुमालदारांनी पाठविली ( लेखांक १२९ ). राधाबाई २२ मे ला मरण पावली व २३ मे पासून पिंपळगाव भावक हा जहागिरीचा गाव सरकारजमा झाला व त्या गावाचे पूर्वीचे पाच सहा महिन्यांची वसूल बाकीची माहिती नासिकच्या कुलकर्ण्यांनी सरकारकडे लिहून पाठविली. ( लेखांक १३० ). बळवंतराव कृष्ण यांचे विनंतीवरून सवाल-जबाबांनी चौकशी होऊन ( लेखांक १३३ ) नासिक व त्रिंबक येथील पोतदारी वतनाबद्दल त्यांना दरसाल रु. ८५ देण्यास इंग्रजांनी १ अक्टोबर १८२९ ला ( लेखांक १३२ ) व ३ अक्टोबर १८२९ ला जहागिरीची जप्ती मोकळी होऊन गाव बळवंत कृष्ण यांचे सुपूर्त करण्याची आज्ञा झाली ( ले. १३१ ) व त्याप्रमाणे बळवंतराव कृष्ण याची गाव पावल्याबद्दल २८ अक्टोबर १८२९ ची पावती झाली ( लेखांक १३४ ). बळवंतरावांनी वैद्यांचे घरातील मुलगा दत्तक घेतला. त्याचे नाव गंगाधर. त्यांना सात मुलगे आहेत.

### पिंपळगाव भावलेचे जहागिरदारांची वंशावळ

महादेव
|
बल्लाळ (बाळाजी) पत्नी मनुबाई
|
गंगाधर पत्नी रमाबाई
|
- माधवराव पत्नी लक्ष्मीबाई
  - ०
- कृष्णराव पत्नी राधाबाई
  - बळवन्तराव (दत्तक) पत्नी यमुनाबाई
    - गंगाधर (वैद्यांकडून दत्तक)
      - वासुदेव ऊर्फ राजा
      - विश्वनाथ ऊर्फ वसन्त
      - दत्तात्रय
      - नारायण
      - गजानन
      - शंङ्कर

# प्रकरण चौदावे

# कोळथरे वंश

आपला मूळगाव दापोली तालुक्यातील कोळथरे आहे असे सांगणारी मंडळी बदलापूर, अनगाव, त्र्यंबकेश्वर व पुणे या चार ठिकाणी कोळथऱ्याहून पांगली. कोळथऱ्याचा हा वंश वेळंब वंशाचा भाग असावा असे दिसते; कारण वेळंबचे ओक या नावाचे खाते त्र्यंबकेश्वरच्या वे. फडके यांच्या खतावणीत आहे. त्यात " आनंदराव नारायण अजे हरी, चुलत बंधू राघो व पांडू–गाव वेळंब–कोळथरे " असा एक लेख आहे. तशाच प्रकारचा उल्लेख घृष्णेश्वरच्या वे. राजाराम भट पैठणकर यांच्या खतावणीत " आनंदराव नारायण, अजे हरी बाळाजी कोळथरे–अंतगाव–पुणे पेठ शनिवार " या लेखात आहे. तसेच " नारो हरी, अजे राघो नारायण, बंधू चिंतो हरी, पुत्र विश्वनाथ व आनंद " इत्यादी उपाध्यायांकडील नामावल्यांवरून आनंदराव नारायण हे कोळथरे अनगाव या वंशात ७ व्या पिढीत बसतील ( वं. ३·५ अ ), व म्हणजे त्याचे चुलत बंधू राघो व पांडू हेही जमते. हे आनंदराव नारायण वेळंबच्या वंशावळीत आठव्या पिढीत येतील व चौथ्या पिढीतील नारो हरी हे कोळथरे वंशाचे पहिले पुरुष असावेत.

ह्या नारो हरींचा नातू ( कोळथरे वंश ) केसोबा सन १७०६ मधे त्र्यंबकेश्वरी स्वतंत्रपणे आला असावा असे त्याचे स्वतःचे लेखावरून वाटते. ( लेखांक १४५ ). यावरून अंदाज केल्यास नारो हरी हे सन १६८८ च्या भालेराईच्या ( ले. ५९ ) काळात ४०–५० वर्षे वयाचे असावेत. त्यांचा पुतण्या विसो केशव ( वं. ३·१ अ ) भालेराईस मिळाला होता व त्याने भाऊबंदांची हलाखी केली व वेळंब गाव उजाड पाडला होता ( ले. ४ ). भालेराईची ही धामधूम अंजनवेल सुभ्यातच ( गुहागर तालुका ) होती म्हणून नारो हरी हे आपली मुले-माणसे घेऊन तो सुभा सोडून उत्तरेस दाभोळ सुभ्यात ( दापोली तालुक्यात ) कोळथऱ्यास जाऊन राहिले ( नकाशा क्र. २ ) व तेथे लहानशी शेतीवाडी केली. सन १७६९, १७७५ व १७८२ मधील पहाणी खर्ड्यास बालाजी ओक व राघोबा ओक अशी कोळथरे वंशांतील तिसऱ्या व चवथ्या पिढीच्या पुरुषांची नावे

लागलेली आढळतात. ( ले. १३५ व १३८ ) या बागायतीची देखभाल सन १७६९ ते सन १७८२ या वर्षी खांबेटे व छत्रे यांच्या निसबतीने होत होती यावरून त्या काळात ओक कोळथरे सोडून गेलेले होते. सन १८११ मधील जमीन पाहणीत कोळथऱ्याच्या शेत कुडेरे तळपाट्या या नावाने ओळखल्या जाणाऱ्या जमिनीला नारो गणेश ओक व गणेशभट ओक ही पुणे शाखेतील ओकांची ( वं. क्र.३.६ ) नावे असून लागवड सोमण व खांबेटे यांचे निसबतीने होत होती. पुणे शाखेतील वामन नारायण ओक यांचे दि. १४ नवंबर १९०४ चे मृत्युपत्रात ही शेते स्वतःच्या मालकीची म्हणून नमूद केलेली आहेत. ( ले. १३६ ).

## बदलापूर शाखा

कोळथऱ्याहून खरवईस ( बदलापूरजवळ ) व अनगाव येथे कोळथऱ्याच्या दोन शाखा जाण्यास मुख्यतः एकच कारण होते. ते म्हणजे सन १७१९ मधे कान्होजी आंगरे यांनी कल्याण–भिवंडीचे ठाणे बाजीरावाकडे दिले ( कुलाबकर आंगरे, ले. ढब्बू वकील, पृ. ३७६ ) व त्या प्रांताची लावणी व आबादी व्हावी म्हणून बाजीरावांनी स. १७२९ व स. १७३७ मधे आज्ञापत्रे काढली होती ( ले. १३७ ) त्या प्रांतात जाण्यास लोकांना प्रवृत्त करण्याकरिता जमिनी विनामूल्य देऊन पहिली पाच वर्षे साऱ्यात सवलती दिल्या होत्या. म्हणजे त्या काळच्या शब्दांत इस्ताव्याने जमिनी दिल्या होत्या ( ले. १३९ ). अशा मंडळीत मुरुडकर जोशी, मालगुंडकर जोशी, अष्टेकर जोशी, भिडे, घैसास, पटवर्धन, दाबके, वैशंपायन, वैद्य जोशी, अचवल ही ब्राह्मण कुटुंबे बदलापूरच्या आसपासच्या ( ले. १४० ). गावांना गेलेल्यांत आढळतात. तेथील देवांनाही दिव्याच्या तेलासाठी नेमणुका दिल्या होत्या. ओक मंडळी कोळथऱ्याहून खरवईस आली त्याचप्रमाणे त्यावेळेस कोळथऱ्याची काही अन्य कुटुंबेही कोळथरे सोडून खरवईस आली. त्यांत नारायण भट वैशंपायन व नारायण जोशी कोळथरेकर ही नावे आहेत. त्यांच्या नावावर सन १७५० व १७७५ मधे कोळथऱ्यास जमीन होती (ले. १३५) व सन १७८० च्या सुमारास खरवईस होती (ले. १४०). रामभट वैशंपायन कोळथरेकर हेही सन १७४० त बदलापूरकडे आलेले होते ( ले. १४० ). अनगाव वीरेश्वर देवस्थानास अभिषेककर्ते म्हणून सन १८१६ मधे केशव जोशी कोळथरेकर असे नाव आढळते ( ले. १४९ ). या कल्याण भिवंडीकडील नवीन वसाहतीच्या काळात ओक कोळथरे सोडून सन १७३१ ते सन १७४१ च्या दरम्यान केव्हातरी खरवईस आले असावेत; कारण कृष्णाजी रघुनाथ हे मार्गशीर्ष शके १६५२ मधे ( म्हणजे सज १७३०–३१ मधे) त्र्यंबकेश्वरास गेले होते, तेव्हाच्या लेखात ते आपला गाव कोळथरे प्रांत पंचनदी देतात व शके १६६४ मधे म्हणजे सन १७४२–४३ मधे त्याचे वडील राघो बल्लाळ आपल्या त्र्यंबकेश्वरीच्या लेखात गाव कोळथरे सुखवास खरवई देतात. (लेखांक १४५ ). सन १७३१ ते सन १७४२ या अवधीत ओकांनी कोळथरे गाव सोडला व राघो बल्लाळाचा वंश खरवईस आला. ( वं. क्र. ३.३ अ व आ व ३.४ )

या नवीन वसाहतीच्या प्रदेशात खरवई, बेलवली इ. बदलापूरच्या आसपासच्या गावांत काही जमिनी दाबके कुटुंबांना मिळाल्या होत्या. ( ले. १४० ). त्यांपैकी बाळाजी महादेव दाबके यांची कन्या कोळथरे वंशापैकी केसो कृष्ण यांना दिली होती (ले. १४२). बाळाजी दाबके यांना पेशव्यांनी खरवईस जमीन इनाम दिली होती. खरवईचे गोपाळ केशव, भिकाजी केशव, बाळाजी केशव यांचे बाळाजी महादेव दाबके मातामह होते म्हणून खरवईच्या दाबक्यांची जमीन गोपाळ केशवना दाबक्यांकडून बक्षीस मिळाली. ( ले. १४२ ). खुद्द गोपाळ केशवनी सन १८०६ मधे खरवईतील दीड बिघा जमीन इस्ताव्याने मिळविली होती ( ले. १३९ ). बाळाजी महादेव दाबके यांना खरवईच्या जमिनीची सनद बाळाजी बाजीराव पेशवे यांनी दिली होती, यावरून त्यांना ही जमीन सन १७४१ ते १७६० चे दरम्यान मिळाली होती. इतर दाबक्यांनाही जमिनी मिळाल्या होत्या. सन १७८४ मधे चिमणाजी बल्लाळ दाबके यांच्याकडे मौजे बेलवली येथील जमीन होती ती त्यांना इंग्रजांचे दंग्याअगोदर म्हणजे सन १७८० पूर्वी मिळाली होती. ( ले. १३९ ). सन १७७६ मधे अंबाजी गोपाळ दाबके दी ।। यशवंतराव गंगाधर यांना खरवईची जमीन मिळाली होती. ( १४३ ). ज्यांच्या दिमतीस दाबके होते ते यशवंतराव गंगाधर तथा दादाजी गंगाधर हे अहिल्याबाईचे दिवाण किंवा फडणीस होते. ( पुणे अखबार भाग २ हैद्राबाद सरकार, पृ. १३७ व १५४ ).

केसो कृष्ण यांचा विवाह दाबक्यांच्या कन्येशी कधी झाला याचा अदमास त्र्यंबकेश्वरच्या लेखांवरून करावा लागतो. केसो कृष्ण यांचा स्वतःचा त्र्यंबकेश्वरी लेख शके १६८८ म्हणजे सन १७६६–६७ चा असून त्यांचे चुलत्यांचा त्याच वर्षी पौष वद्य पक्षातला लेख आहे. या दुसऱ्या लेखात केसो कृष्णचा उल्लेख केसोपंत असा आहे ( ले.१४५ ) त्यावरून सन १७६६–६७ मधे केसो कृष्ण प्रौढ होते व त्यांचा विवाह सन १७३१ ते १७४१ दरम्यान झाला असण्याचा संभव आहे. ओकांचे खरवईला येण्याचे कारण दाबके–ओक सोयरीक हेही असू शकेल.

खरवईला आल्यानंतर ओकांनी शेतीबरोबरच सावकारी सुरू केली असे केसो कृष्णच्या मुलांच्या वाटण्या झाल्या त्यातील कर्जाऊ दिलेल्या रकमा, गहाणाचे तारण दागिने व जमिनी यांच्या याद्यांवरून दिसते. सावकारीमुळे त्यांनी खरवई ह्या खेडेगावी राहण्याचे सोडून दीड दोन मैलांवरील बदलापूर या कसब्याच्या गावी स्थलांतर केले. बदलापूर हे त्या काळी मोक्याचे ठिकाण होते. सन १७३७ मधे चिमाजी अप्पा सैन्य घेऊन बदलापुरास राहिले होते. ( वसईची मोहीम–केळकर ). सन १७८१ मधे सरदार पानसे गाडदसुद्धा बदलापुरास राहिले होते ( ऐ. लेखसंग्रह–भाग ७; पृ. ३५६२ खरे-शास्त्री ). दि. १–१–१७४८ ला सरदार रामचंद्र हरी पटवर्धन हे बदलापूरच्या मुक्कामास होते. तेथून ते पेणेस गेले ( Peswas Commitments on west coast vol. 24 पत्र क्र. २१ ). अशा महत्त्वाच्या व कसब्याच्या बदलापूर गावी ओक सन १८०१ मधे किंवा त्याआधी थोडे दिवस राहावयास आले असे त्र्यंबकेश्वरच्या लेखनांवरून

दिसते. (ले. १४५). शके १७५७–५८ म्हणजे सन १८३५ च्या ओकांच्या जमाखर्चात पेंढाऱ्यांनी दोन दागिने व सोने नेले ते खर्चात टाकल्याचे श्री. नानासाहेब चापेकर यांना आढळले ( बदलापूर, आमचा गाव, पृ. ३५३ ) म्हणजे पेंढारी आले त्यावेळी ओकांनी बदलापुरास स्थलांतर केलेले होते. यावरून पेंढाऱ्यांच्या भीतीने खरवई सोडून ओक बदलापुरास आले हे अनुमान चुकीचे वाटते.

खरवईस आलेल्या राघो बल्लाळांचे दुसरे चिरंजीव दामोदर भट हे खानदेशात भडगाव येथे गेले व त्यांचे चिरंजीव भडगाव शेजारी पद्मालय म्हणून देवस्थान आहे तेथे होते असे तीर्थोपाध्यायांकडील नामावलीवरून दिसते. त्यानंतर यांचे वंशजांचा ठावठिकाणा कळला नाही. दामोदरभट भडगावी होते त्याच वेळी सिद्रस ओक महाजन (प्रकरण ५) यांचेपैकी सदाशिव भिकाजी व कृष्णाजी भिकाजी यांचेही वास्तव्य भडगावी होते असे त्र्यंबकेश्वरच्या लेखावरून कळते. हा योगायोग काय आहे हे कळण्यास साधन नाही.

**त्र्यंबकेश्वर शाखा** ( वं. क्र. ३.४ )

खरवईस आलेल्या राघो बल्लाळांचा तिसरा मुलगा अंताजी हा साष्टीहून सन १७६५ मधे त्र्यंबकेश्वरी आला होता. अरबीसमुद्र व ठाणे-वसई खाडीनी वेढलेला प्रदेश साष्टी म्हणून ओळखला जात असे. या अंताजीचा मुलगा अप्पाजी हा पेशव्यांचे चाकरीत होता. त्याला बरोबर दहा माणसे देऊन त्र्यंबकेश्वर व कुशावर्ताचे रखवालीस सन १७५८ मधे पाठविले होते व त्यांच्या वंशजांकडे ती कामगिरी सन १८६१ नंतरही चालू होती ( लेखांक १४४ ). अशा तऱ्हेने हा वंश त्र्यंबकेश्वरी वाढला. त्या पिढीतील दत्तात्रय निळकंठ हे दत्तक जाऊन विष्णु विनायक झाले. ते पी. डब्ल्यु.डीत असून सन १९७२ मधे वैतरणा धरणाकडे कामावर होते व अविवाहित असल्यामुळे त्यांचा वंश त्यांचेबरोबर संपला. ही मंडळी आपणास दीक्षित म्हणवीत व त्र्यंबकेश्वरी उपाध्ये वृत्तीने राहात, असे वे. मू. विश्वनाथभट केशवभट फडके कळवितात. पण त्यांची वंशावळ मिळाली नाही. उपाध्येपणाच्या वह्यांवर शके १६४१ (सन १७१९) मधे रामभट, सन १७६९ मधे बाळंभट व १८१३ ते १८३६ मधे रावजी ओक अशी नावे आहेत. विष्णु विनायक यांचे जनक पिते निळकंठ गंगाधर यांचे नावापुढे फडणीस लावलेले आढळले. अप्पाजी अनंतचे वंशज त्र्यंबकेश्वरचे फडणीस म्हणून आपणास म्हणवू लागले असे दिसते.

अंताजी राघो खरवईहून साष्टीस गेले, त्यांचे एक चिरंजीव म्हणजे अप्पाजींचे बंधू जगन्नाथ हेही त्र्यंबकेश्वरला होते असे घृष्णेश्वरच्या तीर्थोपाध्यांयाकडील उताऱ्यावरून दिसते. अप्पाजींचे एक बंधू पाडुरंग हे कल्याणास गेले. त्यांच्या वंशजांपैकी कृष्णाजी त्र्यंबक व त्यांची मुले–नातवंडे कल्याणास आहेत.

**पुणे शाखा** ( वं. क्र. ३.६ )

कोळथऱ्याहून खरवईस आलेल्या राघोबा बल्लाळ यांचे वंशज बदलापूर, त्र्यंबकेश्वर,

कल्याण येथे वर लिहिल्याप्रमाणे गेले; तर राघो बल्लाळांचे बंधू केसो बल्लाळ यांचे वंशज पुणे व अनगाव येथे गेले. केसो बल्लाळ यांचा सन १७०६ मधे त्र्यंबकेश्वरास उपाध्यायांकडे लेख आहे. त्यांचे चिरंजीव बल्लाळ यांचे नावावर कोळथऱ्याची जमीन सन १७७५ व १७८२ मधे होती ( ले. १३५ व १३८ ). पण बाळाजी त्रिंबक छत्रे यांचेकडे ती होती यावरून त्यावेळी ते कोळथरे सोडून गेले असावेत. पुण्याचे वंशापैकी शंकर वामन यांनी सन १९२२ मधे केलेले टिपणात केसो बल्लाळ हे पानसे यांचे तोफखान्यात सेनापती होते अशी माहिती दिली आहे. यशवंतराव पानसे हे सन १७५५ मधे सावनूरच्या लढाईत तोफखान्याचे प्रमुख झाले असे फाळके लिखित शिंद्यांच्या इतिहासाची साधने–सावनूर वृत्त पान १३९ वर दिले आहे. केसो बल्लाळ सन १७०६ मधे त्रिंबकेश्वरला गेले होते यावरून सन १७५५ मधे ते ७५ वर्षांचे असावेत व म्हणून त्या वयात ते तोफखान्याचे सेनापती राहण्याचा संभव कमी वाटतो. केसो बल्लाळाचे पुत्र बाळाजी केसो सेनापती असण्याचा संभव आहे. यांचे चिरंजीव गणेशपंत यांचा घृष्णेश्वर उपाध्यायांकडे लेख आहे. त्यात वस्ती अंनगाव कल्याण आहे. हे पेशवे सैन्यात होते. यांनी पुण्यात घर केले असावे. सन १८०० मधे होळकरांनी पुणे लुटले त्यात यांचे सर्वस्व गेले असे शंकर वामन यांचे टिपणांत आहे. ( होळकर दंगा सन १८०२). गणेश बल्लाळ आपल्या चार मुलांना घेऊन सन १७७८ मधे त्र्यंबकेश्वरास आले होते. सन १७९० मधे शनवारात गणेशपंतांचे घर पे. द. पुणे जमाव रुमाल १७० च्या खानेसुमारीला लागले आहे. सन १८१८ च्या खानेसुमारीला ओंकारेश्वराचे बाजूस गणेशपंत वोक खण १० दीड मजला तिघई असे त्याचे वर्णन आहे. या घरास पूर्वी २१९ शनवार असा घर क्रमांक होता. सन १९६१ च्या पानशेत प्रलयात ते घर पडले. गणेशपंतांपासून ही मंडळी पुण्यास राहू लागली. गणेशपंतानी संन्यास घेतला. त्यांचे चिरंजीव नारायण हे इंग्रज अमदानीत मामलेदार होते, असे शंकर वामन ओक यांनी तयार केलेल्या माहितीपत्रकात दिले आहे. पण शंकररावांचे पुतणे श्री. गोविंद नारायण हे सांगतात की, त्यांच्या आजीनी दिलेल्या माहितीप्रमाणे नारायण गणेश यांचे जरतारीचे दुकान पुण्यात होते ते जळाले व तो धक्का बसून नारायणराव वारले–आणि हेच खरे असावे. कारण पेशव्यांचे कारकीर्दीतील सन १७७३ च्या ३८ कापडव्यापाऱ्यांच्या यादीत नारोबा नाईक ओक हे नाव आहे (ले. १४७). तसेच पे. द. पुणे जमाव रुमाल १७४ मधे बुधवार पेठेतील उदमी लोकांच्या यादीत नारोबा नाईक वोक यांचे नाव स. १७८१ व स. १७८८ मधे आढळते. त्यांचेकडून प्रतिवर्षी रुपये चार भाडेपट्टी वसूल केल्याचे आढळते; पण सन १८०६ मधे १५३ सिंपी मलगीवाले उदमी लोकांच्या यादीत त्याच घरावर त्रिंबक नारायण वोक यांचे नाव आहे. पण प्रस्तुत नारायणरावांना त्रिंबक मुलगा आढळत नाही. हे नारायणराव आपले वडील व बंधूसमवेत सन १७७८ मधे त्रिंबकेश्वरी गेले होते (ले. १४५). त्यांनी द्वितीय विवाह म्हातारपणी केला होता असे श्री. शंकर वामन यांनी केलेल्या टिपणात नमूद आहे. शिवाय असेही दिले आहे की, नारायणरावांच्या द्वितीय

संबंधाच्या पत्नी बाळंतिणींची सुटका करण्यात वाकबगार होत्या व लोकांच्या फार उपयोगी पडत असत. त्यांचा मुलगा वामन यास लहानपणी अपस्माराचे झटके येत. त्यावरील उपायांपैकी एक उपाय म्हणून ओकांनी बांधलेले त्यांच्या वाड्याच्या हद्दीतील श्रीरामाचे मंदिर व भोवतालची मोकळी जागा दान दिली व वामनचे अपस्मार झटके थांबले. वामनचा जन्म सुमारे सन १८३५ च्या आसपासचा असावा. कारण त्यांनी सन १९०४ मधे केलेल्या व्यवस्थापत्रात ( ले.१३६ ) त्यांचे त्यावेळेचे वय ७० वर्षांचे होते असे लिहिले आहे. यावरून त्यांच्या लहानपणी देऊळ दान केले तो काल सन १८४०-४२ चा येतो. या काळात घरांना क्रमांक नव्हते. पुण्याची नगरपालिका सन १८५० नंतर अस्तित्वात आली व सन १८६२ मधे घरांना क्रमांक देण्यात आले. त्यावेळी ओकांचे घराला २१९ शनवार पेठ हा क्रमांक मिळाला व शेजारच्या दान दिलेल्या राममंदिराला २१८ क्रमांक मिळाला. हे २१८ क्रमांकाचे देऊळ व त्याभोवतालची मोकळी जागा सन १८९२ मध्ये सीताराम मोरेश्वर जोशी धंदा जोशीपणाचा यांनी ज्यानकीबाई गुपचुपांना विकली ( लेखांक, १४६ ). त्यात चतुःसीमा दिल्या आहेत त्यावरून ही जागा ओकांच्या घराला लागून पश्चिमेस, दक्षिणेकडील बोळापासून म्हणजे सांप्रतच्या तांबे बोळापासून उत्तरेच्या ओंकारेश्वर रस्त्यापर्यंत होती. खरेदीनंतर थोड्याच दिवसांत हे देऊळ व मोकळ्या जागेपैकी उत्तरेचा पट्टा सन १८९३ च्या रजिस्टर्ड दानपत्राने श्री. बालशास्त्री आगाशे यास दान दिला. दक्षिणेकडील गुपचुपांच्या जागेकडे ओंकारेश्वर रस्त्यावरून जाण्यास ओकांचे घराचे बाजूस पाच फुटांचा मार्ग ठेविला होता. ही गुपचुपां-कडील मोकळी जागा सन १९०६ चे आसपास आगाशे यांनी खरेदी केली व तेथे राहण्याच्या खोल्या बांधल्या. पूर्वीचे ओकांचे राममंदिर आगाशे राममंदिर म्हणून ओळखले जाऊ लागले.

नारायणरावांचे थोरले पुत्र हे धार्मिक वृत्तीचे साधेभोळे होते. ओंकारेश्वराच्या स्नानसंध्या करण्याच्या व पाणी भरण्याच्या घाटावर जज्जसाहेबांची मुले महार असामींना घेऊन फिरतात, मासे मारतात असा अर्ज शनवार पेठेतील काही लोकांनी सन १८४४ मधे सरकारात केला होता त्यावरील सह्यांपैकी एक सही विष्णु नारायण वोक द ।। खु ।। अशी आहे. विशेष म्हणजे कंपनी सरकारनी दाद घेतली ( ले. १४६ अ ). या घटनेवरून असेही दिसते की सन १८४४ पर्यंत तरी ओंकारेश्वर घाटाजवळ पाणी भरण्यायोग्य व घाटावर बसून स्नानसंध्या करता येईल इतके मुबलक पाणी मुठा नदीला होते. विष्णु नारायणना एक मुलगी होती. मुलगा नव्हता. वामन नारायणना ११ अपत्ये झाली. यांचे वंशज पुण्यात निरनिराळ्या ठिकाणी राहात आहेत.

**अनगाव शाखा** ( वं. क्र. ३.५ )

कोळथऱ्याच्या केसो बल्लाळांचे नातू कोळथरे सोडून अनगाव येथे गेले व त्यांपैकी गणेश बल्लाळ यांनी पुण्यात घर केले तरी कोळथऱ्याहून प्रथम ते अनगावला गेले असे

तीर्थोपाध्यायांकडील लेखावरून दिसते ( ले. १४५ ). कोकण कल्याण भिवंडी प्रांत आंगरे याजकडून बाजीराव बल्लाळ पेशव्यांनी घेतला व त्या प्रांतात लावणी करण्याकरिता ( ले. १३७ ) धर्मादाय किंवा सवलतीने जमिनी दिल्या त्यानुसार कोळथऱ्याची एक शाखा खरवईस गेली व दुसरी अनगावास ( भिवंडी ) गेली. बाजीराव बल्लाळांकडून विश्वनाथ भट ओकांना सन १७३९ मधे दोन बिघे जमीन मिळाली होती.( ले. १४८) व त्यांचे पुतणे बाळंभट यांनाही दोन खंडी भाताची किंमत दरसाल दिली गेली होती. ( ले. १४८ अ ). त्यामुळे ते व त्यांचे चारही बंधू अनगावास गेले. सन १८१८ मधे विश्वनाथभटाचे नातू गंगाधर भट, पांडुरंगभट बिन बाळंभट यांचे पुत्र अप्पाभट व केशवभट बिन निळकंठभट यांच्या नावे भात खर्ची पडले आहे. ( ले. १४९ ). हा खर्च कासीपंत ओकांमार्फत झाला. हे कासीपंत म्हणजे गंगाधरभटाचे बंधू काशिनाथ रामचंद्र असावेत. अनगावच्या श्री वीरेश्वर देवासही नैवेद्याकरिता व नंदादीपाकरिता नेमणूक होती ती केशव पांडुरंग ओक यांचे हस्ते खर्ची पडली आहे. ( ले. १४९ ). हे केशव म्हणजे अप्पाभटच असावेत. अप्पाभटाचे चुलत चुलते रघुनाथ चिमणाजी हे सन १७७४ मधे अनगाव येथे होते; कारण कुळगावकर ( मुरुडकर ) जोसी यांचे नंतरच्या एका खात्याचे हस्ताक्षर रघुनाथ चिमणाजी ओक मु। अंतगाव यांच्या दस्तुरचे आहे. ( ले. १५० ). त्यानंतर हे राघो चिमणाजी पुण्यात तपकिरीचा धंदा करीत. सन १८२०, १८२१, १८२४ व १८२५ मधे राघो चिमणाजी वोक तपकीरवाले याजकडून उदीम पट्टी वसूल होत होती असे शनवार पेठच्या जमाबंदीच्या गोषवाऱ्यावरून कळते. ( पे. द. जमाव पुणे प्रांत रुमाल १७० ) या १४ तपकीरवाल्यांच्या नावात रामचंद्रपंत वर्तक हेही एक नाव आहे व या वर्तकांचा तपकिरीचा कारखाना आजही पुण्यात शनवारात आहे. राघो चिमणाजी यांना मुलगा नसावा म्हणून तपकिरीचा धंदा त्यांचेबरोबरच संपला असावा.

# प्रकरण पंधरावे

# बागबुरोंडीकर ओक

वरसईचे ओक, सांगलीचे फडनीस, कुरुंदवाडकर ओक, इटगीचे ओक इ. मंडळींचा पूर्वज बाळाजी कृष्ण होय. त्र्यंबकेश्वर येथील वे. बाळकृष्णभट घैसास यांचेकडे या वंशातील मंडळींचे लेख आहेत. ते आपले गाव वेळंब नंतर बागबुरोंडी असे लिहितात. अलीकडील काळात बागबुरोंडी हे नाव महाराष्ट्रातील कोणत्याही खेड्याला असलेले आढळत नाही. बुरोंडी म्हणून दापोली तालुक्यात समुद्राचे बाजूस एक गाव आहे. तेच गाव बागबरोंडी म्हणून ओळखले जात असावे.

त्र्यंबकेश्वरी असलेल्या लेखांपैकी चार लेखांतील अवश्य तेवढा भाग पुढील-प्रमाणे आहे:

१. कृष्णाजी नारायण, अजे बाळाजी कृष्ण, बं. गोविंद व रामाजी, बागबुरोंडी हल्ली आंबेगाव.

२. बापूजी शिवदेव, चु. बं. महादेव केशव, गोविंद व कृष्णा व रामा व श्रीधर व सदाशिव गणेश, बागबुरोंडी हल्ली अंबेगाव, प्रांत लोहगड.

३. पांडुरंग गोविंद, आजे नारो, चु. कृष्णाजी व रामाजी, बं. हरी व नारायण, बागबुरोंडी वेळंब, हल्ली पुणे.

४. रमो भ्र. त्र्यंबक केशव, आजेसासरे महादेव, पुत्र केशव, वेळंब हल्ली इटगी, तुंगभद्रातीर ता. शिरहट्टी.

वेळोवेळी लिहिले गेलेल्यापैकी वरील चार लेखांवरून वंशावळ क्र. ६ च्या ४ वंशावळी तयार होतात व या वंशाचा पूर्वज बाळाजी कृष्ण ठरतो. बागबुरोंडीच्या पूर्वीचा गाव वेळंब दिला आहे. शिवाजीच्या अगर त्यापूर्वीच्या कालावधीतील इतर भाऊबंदांची पूरक नावे वेळंब वंशावळीत न मिळाल्याने या बागबुरोंडीच्या वंशाचा दुवा वेळंब वंशाशी जोडता आला नाही.

पुणे जिल्हयातील लोणावळयाजवळील लोहगड किल्ल्याला मोक्याचे ठिकाण

म्हणून बाळाजी बाजीरावाचे कारकीर्दीत महत्त्व होते. लोहगडाशी संबंधित व्यक्तींची वस्ती किल्ल्याच्या पायथ्याजवळ असलेल्या अंबेगाव या गावी असे. बागबुरोंडी वंशापैकी चौथ्या पिढीतील बापूजी शिवदेव व कृष्णाजी नारायण यांचे वास्तव्य अंबेगावला होते असे त्र्यंबकेश्वरच्या लेखावरून दिसते. बापूजी शिवदेव याचे चिरंजीव गंगाधर बापूजी (वं. क्र. ६·४) यांची मिरजेच्या पटवर्धनांकडे फडणीस म्हणून नेमणूक झाल्यामुळे व पुढे मिरजेहून सांगली विभक्त झाल्यावर ती शाखा सांगलीचे ओक फडणीस म्हणून सांगलीत आहे. चौथ्या पिढीतील केसो महादेव यांनाही फडणीसी मिळाली होती. याच चौथ्या पिढीतील सदाशिव गणेश हे अंध होते व कुरुंदवाडचे सरदार नीळकंठ त्र्यंबक पटवर्धन यांच्या पत्नी भवानी बाईसाहेब यांचे ते मामा होते. भवानीबाईसाहेबांनी त्यांना कुरुंदवाडला आणले व त्यांचे मुलगे कुरुंदवाडकरांच्या तैनातीत होते. ही शाखा कुरुंदवाडचे ओक म्हणून चालू झाली. (वं. क्र. ६·३). गोविंद नारायण या चौथ्या पिढीतील गृहस्थाची शाखा वरसईचे ओक (वं. क्र. ६·२) म्हणून ओळखली जाते. केसो महादेवाचे दोन चिरंजीव पुण्यात व एका चिरंजीवाची शाखा इटगी ता. धारवाड (वं. क्र. ६.१) येथील म्हटली जाते. या चार शाखा सन १७६५ ते १७७५ चे दरम्यान विभागल्या असाव्यात.

या वंशातील वरसई शाखेपैकी राघो घरी हे पेशव्यांकडे पागा-पथकाचे सरदार होते. त्यांच्या मृत्यूनंतर येसाजी हरी शिलेदार झाले. ते सांगोल्याच्या लढाईत मारले गेले. त्यांच्या वंशजाचे नाव तिसऱ्या प्रतीच्या सरदारांच्या यादीत होते. फडनीस हे नाव दुसऱ्या एका शाखेला मिळाले; कारण त्यांचे पूर्वज गंगाधर बापूजी हे मिरजकर पटवर्धनांचे पहिले फडनीस म्हणून पेशव्यांनी नेमले होते. गंगाधर बापूजींचे चुलत बंधू केसो महादेव यांची नेमणूक नाना फडणविसांनी बाजीरावाचे तैनातीस केली होती. कोपरगावास आनंदीबाई नजरकैदेत असता तिचे बरोबर व बाजीरावाबरोबर केसो महादेवचे पुत्र जगन्नाथ केशव असत. जगन्नाथ केशव यांचे बंधू परशराम केशव हे दंडा-राजपुरी व रायगड भागांत मामलेदार होते. आणखी एक बंधू त्र्यंबक यांना चिंतामण आप्पासाहेब पटवर्धन यांनी हैदर व टिपूच्या बंदोबस्ताकरिता तुंगभद्रेच्या काठी इटगी येथे ठेविले होते. कुरुंदवाडच्या शाखेपैकी दोघे कुरुंदवाडकरांचे रिसालदार होते. अशा तऱ्हेने चारही शाखा पेशवाईच्या सेवेत होत्या.

## **वरसईकर ओक** (वं. क्र. ६.२)

वरसई ता. चिमणखल हे गाव पेण तालुक्याच्या ईशान्य भागात आहे. वरसईपासून पाऊण एक मैलावर, नदीच्या पलीकडे मौजे वाशिवली आहे. वाशिवलीला सन १७७७ मधे गोविंदभट वोक यांचे नावावर दरबिघा रु. ५ प्रमाणे ५।= आकाराची जमीन होती असे पे. द. पुणे जमाव रु. १६४१ मधील नोंदीवरून दिसते. सन १७९४ मधे गोविंदभट वोक गुा नारोपंत वोक यांच्याकडे नक्त रु. १६८–हालहशील १५।।। जमा

झाल्याची तसेच सन १८०४ मधे त्याच गावी गोविंदभट वोक याजकडून जमा वसूलबाकी १५।।। झाली अशा नोंदी पे. द. पहाणी खर्डा ता. पनवेल, जि. कुलाबा रुमाल ५ मधे आढळतात. तर रुमाल ६३ मधे गोविंदभटाकडून रु. ६ जमा आढळतात. मौजे वरसई ता। चिमणखल पो। साकसे येथील १८०० मधील घरवण टिपणात गणेशपंत वोक याचे नावे पहाणी खर्डा, ता० पनवेल रुमाल १ मधे आढळते. यावरून वस्ती वरसई व जमिनी मौजे वाशिवलीच्या हद्दीत होत्या व ओक वरसईला सन १७९७ पूर्वी आले असे अनुमान निघते. गोविंदभट नारायण हे बागबुरोंडी वंशावळ ६.३ मधे चौथ्या पिढीत येतात. या गोविंदभटाचे नातू राघो हरी हे पेशव्यांच्या दप्तरखात्यात कारकून होते व त्याबद्दल त्यांना वार्षिक नक्त रु. २५० व कापडासाठी रु. १६ मिळून २६६ मिळत असत. (लेखांक ५९). याप्रमाणे रक्कम सन १७७१ ते १७८८पर्यंत प्रतिवर्षी खर्ची पडल्याची नोंद पे. द. घडणी रुमाल ३०० मधे असून सन १७९० मधे चाकरीस बंधू अशी टीप आहे शेवटची नोंद पुढीलप्रमाणे आहे–राघो हरी वोक कारकून नि।। दप्तर येकबर्जी मशार निल्हे मृत्यू पावले सबब चाकरीस गुमास्ता परभारे पो। छ ५ माहे जिल्काद यास मोईन सन इहिदे व सन इसने तिसैन दुसाला नक्त व कापड × × × वेतनाचा ऐवज पावला रु. ५३२ –सन १७९१ व सन १७९२ या दोन वर्षांची मोईन दिली अशी ही नोंद आहे. पेशव्यांची स्वारी दसऱ्याचे सीमोल्लंघन करून वाड्यात आल्यावर लोकांनी त्यांना नजरा केल्या त्या यादीत सन १७८३–८४ मधे रु. २ व सन १७८७–८८ मधे रु. ५ राघो हरी वोक शिलेदार यांनी दिल्याचा उल्लेख रा. ब. वाड संकलित सवाई माधवरावांच्या रोजनिशीत आढळतो. खरे शास्त्र्यांच्या ऐ. ले. सं. भाग ८ पृ. ४२३८ वर विठ्ठलराव पांडुरंग पटवर्धन याचे लग्नाची निमंत्रणे करावयाची त्या गृहस्थांच्या नावांची यादी असून त्या व्यक्तीस मायना काय लिहावयाचा हे त्या त्या नावापुढे दिले आहे. राघो हरी ओक यांचे नावापुढे स्वामी गोसावी पो। नमस्कार असा मानाचा मायना आहे.

राघो हरीना पागा-पथकाची सरदारी मिळाली होती व त्यांच्या मरणानंतर ती त्यांचे धाकटे बंधू येसाजी हरी यांचेकडे चालू राहिली असे लेखांक १५३ वरून दिसते. येसाजी हरी हे सांगोल्याचे लढाईत पडले असे वर्तमान परशरामभाऊ पटवर्धनांनी कळविल्याचे त्यांचे दि. २३–२–१७९४ चे पत्रावरून माहीत पडते (खरेशास्त्री, ऐ. ले. सं. ९ पृ. ४६७८ ) येसाजी हरी हे कित्तुरच्या लढाईत पडले त्यावेळी त्यांचे कनिष्ठ बंधू गणेश हरी त्यांचेबरोबर त्या स्वारीत होते. गणेश हरीच्या नावाने पागापथकांची सरदारी पुढे चालू राहावी म्हणून पेशव्यांकडे केलेली भलावणी लेखांक १९१ मधे आहे. येसाजी हरी लढाईत सरकारचे कामास आले म्हणून त्यांच्या कुटुंबाचे बेगमीस ३०० रुपये आकाराची जमीन इनाम करून दिलीच होती ( लेखांक १५२ ). याखेरीज पागा-पथकाच्या बेगमीस येसाजी हरी यांना सन १७९२ मधे बेळगाव कर्नाटककडील अमरगोल व इतर काही गावे दिली होती ( लेखांक १५५ ) ती पागेचे सरदार म्हणून गणेश हरी याजकडे चालू ठेविली होती. इंग्रज सरकारनी ती जप्त करून त्या ऐवजी गणेश

हरींना त्यांच्या हयातीपर्यंत वार्षिक रु. १५०० देण्याचे मुक्रर केले ( लेखांक १५३ व १५५ ) इ. स. १८४७ मधे गणेश हरीच्या मृत्यूनंतर ते पेन्शन ओघानेच बंद झाले. ( लेखांक १५४ ). गणेश हरीचे ज्येष्ठ चिरंजीव हरी गणेश वडिलांचे अगोदर वारले होते. त्यास विष्णु हरी म्हणून पुत्र होता. गणेश हरीचे कनिष्ठ चिरंजीव नारो गणेश व विष्णु हरी हे चुलते-पुतणे एकत्रातच राहात होते. म्हणून नारो गणेश यांनी गणेश हरीची नेमणूक आपले नावे चालू करावी असे सरकारला विनंतीपत्र पाठविले (लेखांक १५३). यावेळी हे कुटुंब पुण्यास बुधवार पेठेत राहात होते. लेखांक १५५ प्रमाणे रु. ७५० चे वार्षिक तहाहयात पेन्शन विष्णु हरी याचे नावे दिले गेले.

## फडणीस ओक ( वं. क्र. ६.४ )

दक्षिणेतील हैदर इत्यादी शत्रूंच्या बंदोबस्तासाठी म्हणून पेशव्यांनी सरदार पटवर्धनांना मिरजेस बसविले. त्यांना शिबंदीच्या खर्चासाठी २४ लाखांचा मुलूख देऊन त्याखेरीज त्यांचे कुटुंबाचे निर्वाहासाठी निराळे उत्पन्न दिले होते. त्याचा यथायोग्य विनियोग होतो की नाही हे पाहण्याकरिता पेशव्यांचे तर्फे गंगाधर बापूजी ओक यांची फडणीस म्हणून पेशव्यांनी नेमणूक केली होती. गंगाधर बापूजींचा सन १७६४ ते सन १७७७ पर्यंतचा सरदार पटवर्धन व त्यांचे पोतनीस यांचेशी झालेला पत्रव्यवहार वासुदेव वामनशास्त्री खरे यांनी त्यांच्या ऐतिहासिक लेखसंग्रहात छापला आहे. गंगाधर बापूजींना रु. ७०० ची पथक फडणिशी तैनात मिळत होती व त्याखेरीज तीनशे रुपये साऱ्याची जमीन मौजे वांवढळ ता। वनखळ, तालुके नेरळ, प्रांत कल्याण ( हल्लीच्या कुलाबा जिल्हयाचा खालापूर तालुका ) येथील दिली होती ( लेखांक १५८ ). याच गावची काही जमीन गंगाधर बापूजींचे चु. चु. बंधू केसो महादेव यांना पागाफडणिशीबद्दल मुशाहिरा म्हणून दिलेली आढळते ( लेखांक १५६, १५७). इ. स १८०० मधे पटवर्धन सरंजामाची वाटणी होऊन मिरज व सांगली अशीं दोन संस्थाने झाली तरी दोहोकडील पथक फडणीशी गंगाधर बापूजींच्या वंशाकडे चालू होती. सन १८२१–२२ मधे फडणीस ओक कुटुंबाच्या वाटण्या होऊन थोरले गंगाधर शिवाजी यांनी सांगलीच्या फडणिशीचे व धाकटे रामकृष्ण शिवाजी यांनी मिरजेच्या फडणिशीचे काम पाहावे असे ठरले. तैनात व जमिनीचे उत्पन्न निम्मेनीम वाटून घेत. पुढे काही कारणाने मिरज फडणिशीचे काम सुटले व एकच सांगलीची फडणिशी राहिली म्हणून सन १८४८ मधे ओक फडणीसांना आपल्या स. १८२१–२२ च्या वाटणीच्या व्यवस्थेत बदल करावा लागला. नव्या व्यवस्थेप्रमाणे जमीन पूर्वीप्रमाणेच निम्मेनिम वाटून घेण्यात आली व फडणिशी कारभार थोरल्या म्हणजे गंगाधर शिवाजीच्या शाखेकडे दिला. फडणिशीबद्दल मिळणाऱ्या रकमेपैकी कारभार पाहणाऱ्या म्हणजे गंगाधर शिवाजीच्या शाखेला एक हजार रुपये जादा देण्यात आले व धाकटया म्हणजे रामकृष्ण शिवाजीच्या शाखेला त्यांच्या हिश्शाची रक्कम बैठी तैनात म्हणून मिळावयाची असे ठरले.

सांगली फडणिशीबद्दल त्यांना पुढीलप्रमाणे रकमा मिळत असत.

| रु. | आ. | प. | |
|---|---|---|---|
| ६०० | ० | ० | तैनात |
| ९३५ | ८ | ० | पालखी |
| ४४ | ५ | ० | शागिर्द शिपाई |
| ४९ | ८ | ० | मशालजी |
| ३५ | ० | ० | अब्दागीर |
| २४ | ० | ० | मशालीस तेल |
| ७८ | ० | ० | चंदी व वैरण घोड्याकरिता |
| १५८२ | १३ | ० | कारकुनी बाब |
| एकूण ३३४९ | २ | ० | |

थोरल्या शाखेपैकी बाळाजी गंगाधर यांनी संन्यास घेतला होता. त्यांनी संन्यास घेण्याचे ठरविल्यावर आपल्या पाठीमागे काय व्यवस्था व्हावी हे सन १८५४ मधे लिहून ठेवले होते. (ले. १५८ अ) व त्याप्रमाणे त्यांनी गोळे घराण्यातील आपल्या मुलीच मुलगा दत्तक घेतला व त्याचे नाव गंगाधर ठेविले. संन्यास घेतल्यानंतर त्यांना पालखीतून त्यांचे वडिलांनी पेठ भागात बांधलेल्या मुरलीधराच्या देवळात आणले तेथे ते दि. ४-१-१८६० ला समाधिस्थ झाले. त्यांची समाधी देवालयाचे आवारात शेजारीच बांधलेली आहे. श्रीमंत तात्यासाहेब पटवर्धन यांच्या दिनचर्येत ही हकीकत सविस्तर दिलेली आहे. (ले. १५८ अ).



थोरल्या शाखेत गंगाधर बाळाजी हे गोळे घराण्यातून दत्तक घेतलेले होते. त्या दत्तकाला सरकारी मान्यता मिळाल्यामुळे फडणिशी कारभार त्यांचेकडे चालू राहिला, परंतु त्यांचे चिरंजीव बाळकृष्ण गंगाधर (मृत्यू ६–४–१८९२) यांना औरस मुलगा नव्हता म्हणून त्यांच्या विधवा पत्नी सरस्वतीबाई (मृत्यू ५–७–१८९२) यांनी गोळे घराण्यातलाच दत्तक घेतला व ते गणेश बाळकृष्ण झाले. त्यांचे चिरंजीवांनी या बाबतीत पुरविलेली वंशावळ पृ. ७७ वर दिली आहे.

गणेश बाळकृष्ण या दत्तकास सरकारी मान्यता मिळाली नाही म्हणून फडणिशी कारभारास वारस कोण याबद्दल बाळकृष्ण गंगाधरची सापत्न माता विरुद्ध धाकट्या शाखेपैकी शिवाजी रामकृष्ण व श्रीपाद रामकृष्ण यांच्यात वाद उत्पन्न झाला व प्रदीर्घ चाललेल्या सरकारी चौकशीनंतर धाकटी म्हणजे रामकृष्ण शिवाजीची शाखा वारसदार ठरली. ( वं. क्र. ६·४ ). यावेळेपर्यंत फडणिशीचा कारभार पाहण्याचे ओकांना कारण उरले नव्हते. म्हणून फडणिशी तैनातीपैकी निम्मी रक्कम म्हणजे रु. १६७४–९–० फक्त ओकांना मिळावयाची असे ठरले. यापैकी रु. ७४९ काही जमिनींच्या साऱ्यापोटी सरकार आपणाकडे जमा करून घेई. रु. ७५१ थोरल्या शाखेचे शेवटचे फडणीस बाळकृष्ण गंगाधर यांच्या सापत्न माता लेडी राधाबाई यांच्या पोटगीखर्चास त्यांस देत व उरलेले रु. ३७४–९–० धाकट्या शाखेस मिळत. याखेरीज जमिनीपैकी निम्मे जमिनी धाकट्या शाखेकडे व निम्मे राधाबाईकडे होत्या. धाकट्या शाखेपकी एकचतुर्थांश हिस्सा धारण करणाऱ्या भाऊबंदांना कर्ज झाल्यामुळे ते कर्ज फिटेपर्यन्त संस्थानांनी त्या सर्व जमिनी स्वतःकडे वहिवाटीस ठेवून घेतल्या व थोड्याच दिवसांत सन १९२६ साली त्या खालसा केल्या. त्यास कारण देण्यात आले की फडणिसी कारभाराकरिता त्या जमिनी दिल्या होत्या, तो कारभार आता राहिला नाही म्हणून जमिनी ओकांकडे ठेवण्याचे कारण नाही. त्यावेळचे फडणिशीचे कर्ते पुरुष श्री. शंकर पांडुरंग ओक हे ट्रेझरी ऑफिसर म्हणून संस्थानच्या नोकरीत असून सुद्धा या अन्यायाविरुद्ध संस्थानशी सुमारे वीस वर्षे झगडले व त्यांनी त्या जमिनी परत मिळविल्या. या खटल्याकरिता फडणिशीचा इतिहास श्री. शं. पां. ओक यांना मांडावा लागला. त्यांचेकडून मिळालेल्या माहितीवरूनच हा फडणिशीचा इतिहास लिहिला आहे. धाकटी शाखा फडणीस ओक म्हणून व थोरल्या शाखेत गोळे घराण्यातील दोन पुरुष दत्तक आल्यामुळे त्यांना गोळे ओक म्हणून सांगलीत ओळखतात.

या घराण्यातील मंडळी आपले गाव आडिवरे सांगतात; पण त्यास आधार मिळाला नाही. या घराण्यात गोपाळकृष्णाची उपासना विशेषत्वाने आढळते. आद्य फडणीस गंगाधर बापूजी यांचे चिरंजीव शिवाजी गंगाधर यांनी गोपाळकृष्णाचे ( मुरलीधराचे ) एक उत्तम देऊळ सांगलीच्या पेठ भागात बांधले, ते अजून सुस्थितीत आहे व तेथे गोळे ओक वंशाची वस्ती आहे. गाव भागातील ओकांची थोरल्या शाखेकडे चालत आलेली जागा सिटी हायस्कूलच्या शिक्षण संस्थेने सन १९२० मध्ये विकत घेतली आहे. ती संस्थाही त्या वास्तूत गोकुळ अष्टमीस गोपाळकृष्ण उत्सव साजरा करते. या गल्लीस पूर्वी ' फडणीस

गल्ली ' म्हणत असत. आता ' सिटी हायस्कूल गल्ली ' म्हणून ओळखतात. या गल्लीतील धाकट्या शाखेचे घरातही गोपाळकृष्णाचा उत्सव होतो. या जागेत रामदास पंचायतनापैकी आनंदमूर्ती राहात होते अशी आख्यायिका आहे. म्हणून आनंदमूर्तींच्या पादुका स्थापन केल्या आहेत.

## धानोर–सोनगाव शाखा

केसो महादेव यांच्याकडे स. १७७६ ते स. १७७८ च्या दरम्यान पागेची तैनात होती असे लेखांक १५६, १५७, १५८ व १५९ वरून दिसते. सन १७७७ मधे पटवर्धनांचे लष्करातून मौजे ढालगाव तालुके मिरज येथे ते रोखा घेऊन आले होते त्यासाठी भोजनखर्च व अन्तस्थ खर्च पडला आहे ( लेखांक १६० ). पेशव्यांचा गाडदी मारेकरी महमद इसफ यास आणावयास यांना नागपुरास पाठविले होते ( लेखांक १६१ ). सन १७९५ चे सुमारास यांची नेमणूक नाना फडणिसाकडून बाजीरावाचे तैनातीस झाली होती असे गो. स. सरदेसाई, कृ. पां. कुलकर्णी व या. मा. काळे संपादित ऐतिहासिक पत्रव्यवहार पृ. २९३ वरील लेखांक ३१६ वरून दिसते. या केसो महादेव यांची बाग कोपरगावास होती व आनंदीबाई कोपरगावास नजरकैदेत असताना त्या बागेत ती वारंवार जात असे ( पहा : आनंदीबाईची दिनचर्या–पे. द. निवडक कागद खंड ४, पृ. ८०, ८६ व ८८ ). केसो महादेवांचे चिरंजीव जगन्नाथ केशव ( वंशावळ ६·२ ) हे या अवधीत आनंदीबाईबरोबर व बाजीरावाबरोबर ठिकठिकाणी गेले होते ( सदर आनंदीबाईची दिनचर्या, पृ. ६१, ६९ व ८० ); सन १७८८ मधील ही हकीकत आहे. जगन्नाथ केशव आजे महादेव व त्यांचे बंधू त्र्यंबक केशव हे त्र्यंबकेश्वरला धानोर–सोनगाव येथून गेले होते. ही गावे राहुरी तालुक्यात एकमेकांस लागून असून कोपरगावपासून सुमारे १५ मैलांवर प्रवरा नदीकाठी आहेत. ( नकाशा क्र. ४ ).

जगन्नाथ केशव यास कंपनी सरकारातून पेन्शन मिळत होते. ( लेखांक १६२ ). दुसऱ्या बाजीरावाचे वेळी स. १८०६ मधील पुण्यातील प्रतिष्ठित लोकांची यादी डे. क. रुमाल, १५५ मधे आहे त्यात जगन्नाथ केशव यांचे नाव आहे. पे. दप्तरातील पुणे जमाव रुमाल १७४ मधे सन १८१२ व सन १८१५ मधील पुण्याच्या घरांच्या पाहणीत जगन्नाथ केशव यांचे घर सोट्या म्हसोबाजवळ दाखविले आहे. त्याच रुमालात रस्त्यात पडवीची छपरे घातली त्यांची यादी नावनिशीवार दिली आहे त्यात सदाशिव पेठेत अप्पाजी पंत सहस्रबुद्धे ( यांची कोपरगावला आनंदीबाईकडे नेमणूक होती ) यांचे अमदानीत जगन्नाथ केशव यांनी छप्पर घातल्याचा उल्लेख आहे.

## तळे–राजपुरीचे मामलतदार

जगन्नाथ केशव यांचे बंधू परशराम केशव यांचे घर सोट्या म्हसोबा रस्त्याला कुंभकोण स्वामींचे मठाअलीकडे सन १८१८ चे घरपहाणीतील पे. द. तील त्याच

रुमालात म्हणजे रुमाल १७४ मधे आढळते. यांची सून राधा इचा त्र्यंबकेश्वरी लेख आहे ( लेखांक १६३ ). त्यातही वास्तव्य सोटया म्हसोबाजवळ असे दिले आहे. सन १७५५ मधे पेशव्यांनी तुळाजी आंग्रे याजकडून अंजनवेल घेतली. त्यानंतर तेथे जे मामलेदार झाले त्यांत सन १८०६ मधे परशराम केशव हे १३ वे मामलेदार एक वर्ष होते ( ऐ. टिपणे भाग ६ पृ. ३८ ). त्यानंतर त्यांना तळयाची मामलत मिळाली ती सन १८०८ मधे परशराम केशव ओक, वास्तव्य पुणे यांनी मामलतीवर "चढ बोलाने पंच्चावन हजार रुपये सरकारात द्यावयाचा करार केला" सबब आवटी म।। निल्हेकडून मामलत दूर करून सन तिसा मयातैन व अलफ अव्वल साल प।। श्रीमंत बाबासाहेब याही ओक म।।निल्हेकडे मामलत सांगितली ( ले. १६४, १६५ ) पण पुढील वर्षी गंगाधर बाळकृष्ण मराठे वास्तव्य पुणे याही ओक म।।निल्हे यावर सवीस हजार रुपये चढ कबूल केला तेव्हा येक्याशी हजार बेरीज झाली याशिवाय अंबे फणस....मिळून एकंदर सरकारची बेरीज लाख रुपयेपर्यंत द्यावयाचा करार केला यामुळे व बाबासाहेबांची कृपाही फार आहे, यावरून मामलत सांगितली. ( ले. १६५ ). त्याबद्दलची पेशव्यांची आज्ञा आहे. ( लेखांक १६८ ).

सप्टेंबर सन १८०८ मधे परशराम केशव ओक यास प्रांत राजपुरी ( म्ह. मुरुड जंजिरा ) येथील मामलत मिळाली ( ले. १६४ ). त्यासाठी व पालखी मशाल इत्यादीसाठी सालिना रु. २३१० वतनाची नेमणूक होती. ( लेखांक १६९ ). मामलतीच्या कारभाराकरिता परशराम केशव सुभ्याच्या गावी जाऊन राहिलेले नव्हते. त्यांचेतर्फे कोणाची तरी कारभारी म्हणून नेमणूक होत असे. राजपुरी व तळे यांचे शेजारील अंबोली गावचे केळकरांची कारभारी म्हणून दोन-तीन वेळा नेमणूक झाल्याचे उल्लेख आहेत. या नेमणुकी पेशव्यांचे संमतीने होत. त्यांपैकी गंगाधर त्रिंबक भट यांचा कारभार का दूर केला व त्याने पैशाचा भरणा केला याबद्दल नोंद आहे ( लेखांक १६६ ). परंतु परशराम केशव नंतर गं. बा. मराठे मामलेदार झाले तेव्हा पुन्हा गंगाधर त्रिंबक भट ह्याची नेमणूक झाली ( ले. १६५ ). सन १८१० जून २१ ते दिवशी रा. विसाजीपंत केळकर कारभारी नि।। परशराम केशव सुभेदार याही ताकीद केली की दुदांडी शिवराई खुर्दा कोणी घेऊ नये. जुना शिवराई बारीक खुर्दा द्यावा घ्यावा.... अष्टमीपासून उत्तरेस दुदांडी खुर्दा चालत आहे ( लेखांक १६७ ). सन १८११ मधे परशराम केशवकडील राजपुरीची मामलत समाप्त झाली ( लेखांक १६८ ). एकूण २ वर्षे २ महिने ७ दिवस याचेकडे मामलत होती ( ले. १६५ ). त्यानंतर त्यांचेकडे सन १८११ पासून रायगड महालाची ( किले लिंगाणासुद्धा ) मामलत होती. ( पहा नकाशा क्र. ३ ) तेथील इमारतीची काही दुरुस्ती त्यांचे कारकीर्दीत झाल्याचे खर्च आहेत ( ले. १७० ). त्या तालुक्यातील वतनदारांच्या देण्याघेण्यासंबंधीचा सन १८१४ मधील अजमास परशराम केशव यांचेकडे पेशव्यांकडून आलेला आढळतो. (ले. १७१). अन्तस्थाचा भरणा म्हणून चाळीस हजार रुपये परशराम केशव यांनी सन १८१३ च्या

ज्येष्ठ, आषाढ, श्रावण व भाद्रपद या चार महिन्यांत मिळून पेशव्यांकडे केला (ले. १७२). दोघा व्यापाऱ्यांच्या देण्याघेण्यासंबंधी चौकशी करण्याचे काम सन १८१४ मधे परशराम केशवना सांगितले होते. त्या प्रकरणाची हकीगत त्रिंबकजी डेंगळे यांना सांगण्यास ते गेले होते (ले. १७३ ). सन १८१५ मधे रायगडची मामलत परशराम केशवकडून काढून दुसऱ्यास देण्यात आली ( ले. १७४ ) . सन १८१४-१८१५ मधे सुमारे दोन महिने त्यांचेकडे नेरळ तालुक्यातील कुडेगावची कमाविस होती ( लेखांक १७५ ). सन १८१३ मधील तपशीलवार खर्चात नंदादीप वगैरे उत्सवाचा खर्च आहे व रु. १००० परशराम केशव ओक यास शागिर्दपेशासुद्धा दिल्याचा खर्च आहे. ( लेखांक १७६ ). सन १८१३ ते १४ मधे परशराम केशवचे पुत्र नारो उर्फ बळवंत होते ते सोलापूरचे तिसरे असिस्टंट कलेक्टर ए. बी. वार्डन यांचे मराठी मुनशी म्हणून नोकरी करीत होते. तेथून त्यांनी १४ डिसेंबर १८४३ ला जॉन वॉर्डन सेशन्स जज्ज व दक्षिणेतील सरदारांचे पोलिटिकल एजंट यांना विनंतीपूर्वक अर्ज करून सरंजाम पुन्हा चालू करावा, सरंजामी गावावर त्यांचा वारसा हक्क चालत असल्याचे कागदपत्र दाखविण्यास ते तयार असल्याबद्दलचा अर्ज केला होता ( ले. १७७ ).

## इटगी शाखा ( वं. क्र. ६.१ )

परशराम केशवचे एक बंधू त्र्यंबक केशव सांगलीकर पटवर्धनांचे सरदार म्हणून तुंगभद्रेच्या तीरावर इटगी येथे राहिले. त्र्यंबकेश्वरच्या लेखात " वास्तव्य इटगे मूळगाव वेळंब देतात ( पहा प्रकरण १५ आरंभ ). दक्षिणेकडील शत्रूंना उत्तरेस पटवर्धनांच्या मुलुखात येण्यास इटगे गावाजवळ तुंगभद्रा ओलांडण्यास सोपे होते. त्यांच्या बंदोबस्तासाठी त्र्यंबक केशव यांना तेथे ठेविले. त्यांचे चिरंजीव केशव त्रिंबक यांना चिंतामणराव पटवर्धनांच्या बहिणीची मुलगी दिली होती. तिचे नाव कुसाक्का; तेथे भुईकोट किल्ल्यात राहात असत. तेथ चिंतामणराव पटवर्धन ४ मार्च १८४७ ला केशवराव ओकांकडे मेजवानीस गेले होते. तेव्हा विहिरीचे पाणी ओढून काढण्याची अडचण त्यांचे लक्षात आली म्हणून त्यांनी शागिर्दाकरिता नेमणूक ओकांना दिली ( ले. १७८ ). दुसऱ्या दिवशी स्वारी पुन्हा ओक यांचे घरी गेली तेव्हा त्यांचे समोर काही खेळ झाले. ( ले. १७८ ). सन १८४९-५० मधे त्यांना सरदार पटवर्धन यांनी काही जमीन दिली होती ( ले. १७९ ). हे कुटुंब सन १८७५ पर्यंत किल्ल्यात राहात होते. पुढे त्यानंतर गावात वाडा बांधून राहू लागले. केशव त्रिंबकची सरदारी, त्यांचे सर्वात धाकटे पुत्र जगन्नाथ केशव यांचेकडे आली. जगन्नाथ केशवना कंपनी ( इंग्रज ) सरकारातून वर्षासन रुपये ८३५ पेन्शन मिळत असे ( ले. १६२ व १६२ अ ) त्यांना मुलगा नव्हता म्हणून पश्चात त्यांच्या पत्नींनी इ. स. १८९१ मध्ये आपल्या थोरल्या दिराचा म्हणजे त्र्यंबक रावजीचा मुलगा ' हरी ' दत्तक घेतला. या हरींना सुद्धा औरस मुलगा नव्हता; म्हणून त्यांनी त्यांच्या जनक घरचे भावाचा मुलगा रंगनाथ यास १९२३ साली

दत्तक घेतले. ते हल्ली त्यांच्या इटगीच्या घरात राहातात. इतर वंशजांपैकी बरेच जण पुण्यात राहातात.

## कुरुंदवाडकर ओक ( वं. क्र. ६·३ )

कुरुंदवाडकर ओक म्हणवून घेणाऱ्या वंशाचा प्रारंभ सदाशिव गणेश यांचेपासून झाला. कुरुंदवाडचे सरदार नीळकंठ त्रिंबक पटवर्धन यांच्या पत्नी भवानीबाईसाहेब यांचे सदाशिव गणेश हे मामा म्हणून भवानीबाईसाहेबांनी त्यांना कुरुंदवाडास आणून आपल्या आश्रयास ठेवले व सरकारी वाड्याजवळ वाड्याच्या उत्तरेस त्यांना घर दिले, अशी माहिती कुरुंदवाड ओक घराण्यापैकी डॉ. शंकर रामचंद्र ओक, एल्. एम् ॲण्ड एस्. यांनी सन १९१५-१६ मधे लिहिलेल्या " संसारवृक्ष " या आत्मचरित्रपर स्वतंत्र चरित्रग्रंथात दिली आहे. या ग्रंथाच्या टंकलिखित दोन-चार प्रती असून त्या कुरुंदवाडकर ओक कुटुंबातील काही व्यक्तींच्या संग्रही आहेत. या ग्रंथात सन १९१० पर्यंतचा त्या वंशाचा इतिहास असून कुटुंबातील संबंधित व्यक्तींचे व त्या काळच्या सामाजिक परिस्थितीचे भरपूर वर्णन आहे. पण पहिले पुरुष कुरुंदवाडास कधी आले हे त्यात दिले नाही. मिरजेचे खरेशास्त्री यांच्या ऐ. ले. संग्रहातील काही उल्लेखांवरून त्याचा अंदाज ठरविता येतो. ऐ. ले. संग्रह मासिक अंक ४ पृ. ११३ वर भवानीबाईसाहेबांना सन १७६२ च्या अक्टोबरमधे मूळ पाठविले असा उल्लेख अहे. लग्नानंतर प्रथम मुलीला माहेरहून सासरी आणण्याकरिता मंडळी पाठवीत त्या औपचारिकास मूळ म्हणतात. ऐ. ले. संग्रह पृ. ९८६ व ९९१ वर उल्लेख आहे की " सौ. मातुश्री आकाबाई उभयता सुना सौ. भवानीबाई व सौ. रमाबाई यांच्यासहित कृष्णा-वारणा संगमावर अनुष्ठानाकरिता आल्या होत्या " यावरून भवानीबाईचे लग्न जरी स. १७६२ मधे झाले तरी सन १७६५ पर्यंत त्या मुखत्यार नव्हत्या. सन १७७१ मधे त्यांचे पती नीळकंठराव हैदराबरोबरच्या लढाईत मारले गेले. त्याच्या आगेमागे सदाशिव गणेश कुरुंदवाडला आले असावेत.

डॉ. शंकरराव ओक यांच्या ' संसारवृक्ष ' या ग्रंथात बागबुरोंडीहून त्यांचे पूर्वज गुहागरास आले व नंतर कुरुंदवाडला आले असे दिले आहे. पण गुहागरास गेल्याबद्दलचा पुरावा मिळत नाही. बागबुरोंडीहून यांचे पूर्वज पुणे व आंबेगाव प्रांत लोहगड येथे होते असे तीर्थोपाध्यायांकडील पुढील उताऱ्यावरून दिसते.

१ बापूजी शिवदेव, अजे बाळाजी–पुणे–बागबुरोंडी

२ भवानीबाई भ्र. महादेव बल्लाळ, दीर सदाशिव व बापूजी, पुत्र केशव, नातू जगन्नाथ व त्र्यंबक व परशराम—पुणे.

३ बापूजी शिवदेव, चु. बं. महादेव व केशव व गोविंद व कृष्णा व रामा व श्रीधर व सदाशिव गणेश—बागबुरोंडी हल्ली आंबेगाव प्रांत लोहगड.

सदाशिव गणेश यांचे दोघेही नातू कुरुंदवाडकरांकडील फौजेत होते. सदाशिव गोविंद हे स. १८४६ मधे त्र्यंबकेश्वरी गेले होते. त्यांच्या तेथील लेखात " सरकार पदरी स्वारी

पागेची असे " असे स्वतःच्या लेखात लिहून ठेविले आहे. दुसरे नातू गणेश गोविंद हे कुरुंदवाडकरांच्या पदरी रिसालदार होते असे ' संसारवृक्ष ' या ग्रंथावरून कळते. या वंशापैकी कित्येक मंडळींनी त्र्यंबकेश्वरच्या लेखात " वतन बागबुरोंडी " असे लिहिले आहे. सदाशिव गणेश यांनी सन १८४६ च्या आपल्या लेखात " वतन बागबुरोंडी खोत " असे लिहिले आहे. त्यावरून त्या वंशाकडे बागबुरोंडीची खोती होती असे दिसते.

बागबुरोंडीकर ओक मंडळी सरदार पटवर्धन घराण्याशी बरीच जोडलेली होती असे वरील हकीगतीवरून दिसते. केसो महादेव यांचे तीनही चिरंजीव उत्तर आयुष्यात काही काळ मिरजेत राहात होते असे लेखांक १६३ मधील क्र. २ च्या उपाध्यायांच्या लेखावरून दिसते. मिरजेचे पहिले सरदार गोविंद हरी यांनी सन १७६५ मधे स्वतःच्या चिरंजीवास लिहिलेले एक पत्र खरेशास्त्री यांच्या ऐ. ले. संग्रह पृ. ९६७ वर छापले आहे, त्यात हरीपंत वोकास म्हणजे गंगाधर बापूजींच्या चुलतभावास त्याच पत्रात स्वतंत्र मजकूर लिहून गोपाळ गोविंद अवसान सोडतील त्यास धीर देत जाण्याची विनंती केली आहे व चिरंजीव गंगाधर बापूजीस आशीर्वाद लिहिले आहेत. हरीपंताचे चिरंजीव येसाजी हरी कित्तूरचे लढाईत पडले हे दुःखद वृत्त परशरामभाऊ पटवर्धनांनी आपल्या चुलत भावास खास पत्राने कळविले ( खरेशास्त्री ऐ. ले. सं. ९ पृ. ४६७८ ). यावरून सरदार पटवर्धन व बागबुरोंडीकर ओक यांच आपुलकीचे संबंध असावेत.

# प्रकरण सोळावे

# नरवणकर ओक

**मोकदम ओक** ( वं. क्र. ७.४ )

नरवण हा गाव पालशेतच्या दक्षिणेस सुमारे ८ मैलांवर हेदवीनजीक आहे. ओक या गावचे मुकादम म्हणजे पाटील होते. त्र्यंबकेश्वरला सन १७८८ चा लेख पुढीलप्रमाणे आहेः– रामचंद्र केशव, अजे विश्वनाथ हरी, चुलते नारोपंत व महादेवभट, बंधू लक्ष्मणभट, चु. बं. गोविंद विष्णु, पुत्र बाळ ॐक मोकदम नर्वण असा आहे. यातील केशव विश्वनाथ यांची एका तंटयात मोकदम म्हणून सन १७६७ मधे साक्ष झाली होती (ले. १८०). त्यात त्यांनी आपली उमर वर्षे २८ सांगितली यावरून केसो विश्वनाथ यांचा जन्म सन १७३९ चा ठरतो, व त्यांचे अजोबा हरी सन १७०० पूर्वी जन्मलेले असावेत. केशव विश्वनाथ यांना वर्षाचे सहा रुपये मोईन (मोबदला) सन १७७७ मधे दिल्याचा उल्लेख आहे. (ले.१९). त्याचप्रमाणे १७७९ मधेही आहे. मशारनिल्हे ओक हे पांगारवणे म्हणून एका ठिकाणावर आपला हक्क सांगत, पण ते सोमणांचे ठिकाण ठरल्यामुळे त्यांनी हक्क सोडून दिल्याबद्दलचे सन १७७३ चे एक पत्र आहे (ले. १८०). नरवणच्या जोशीपणाच्या वृत्तीबद्दल खरे यांचा तंटा सन १७६६ चे सुमारास होता, त्या संबंधात काही ग्रामस्थ व केशव विश्वनाथ मोकदम नरवणकर यांना सुभेदारांनी अंजनवेलीस बोलावून घेतले होते असा उल्लेख खरे कुलवृत्तांतात पृ. ५४ वर आहे. केशव विश्वनाथ हे गृहस्थ वृत्तीने गरीब व कोणाशी कजिया न करणारे होते व त्यामुळे त्यांच्या जमिनीवर इतर लोक हक्क सांगून बळकावीत असत. तशाच पैकी एका कामात त्यांची दाद लावण्याकरिता त्यांचे भाऊबंद वे. शा. सं. बाळदीक्षित बिन गणेश दीक्षित वोक मुकादम मौजे नरवण यांना काशीहून सन १७८४ मधे पेशव्यांना पत्र लिहावे लागले ( ले. १८१ ). या पत्रावरून दीक्षित ओक हे नरवणचे ओकांपैकी हेही निश्चित म्हणता येईल; हे बाळदीक्षित व त्यांचे बंधू गोपीनाथ दीक्षित व नारायणभट दीक्षित हे काशीस राहात होते, म्हणून

त्यांना कासीकर म्हटले तर सकारण होईल; पण पेशव्यांचे खर्चात त्यांचा उल्लेख महाड-कर काशीकर असा का केला आहे याचा उलगडा होत नाही. (ले. १८२).

केशव विश्वनाथ यांचे पुतणे राघो महादेव यांनी अंजनवेलच्या आपटे–मंडलिक यांजकडून सन १८११ मधे तोरडया गहाण ठेवून दहा रुपये कर्ज घेतल्याचे आढळते (ले. २१४). यावरून त्यावेळच्या व्यवहाराची कल्पना येते. यांचेपैकी एक वंश नरवण येथे आहे व बरेच वंशज पुण्यात आहेत.

तीर्थोपाध्यायांकडील वह्यांत नरवण मूळगाव सांगणारी आणखी मंडळी आहेत. ती गिम्हवणे, मोहोपाडा, अवळस, नागोठणे अशा ठिकाणी त्या त्या वेळी होती; पण त्यांचा संबंध, मुकादमांच्या वंशावळीशी किंवा एकमेकांशी लागेल अशी माहिती उपलब्ध झाली नाही.

**दीक्षित ओक** ( वं. क्र. ७.६ )

दीक्षितांचे यात्रा केल्याबद्दलचे लेख घृष्णेश्वराला तीर्थोपाध्याय वे. राजारामभट पैठणकर यांचेकडे आहेत. त्यांपैकी चार लेख पुढीलप्रमाणे आहेत :

१. बाळकृष्ण दीक्षित, पिता गणेश दी., आजे बाळ दीक्षित, बंधू गोपीनाथ दीक्षित व हरीराम दीक्षित व नारायण दीक्षित, चुलते विश्वनाथ दीक्षित ओक, हल्ली मु॥ पुणे.

२. गणेश दीक्षित, केशव दीक्षित, कृष्ण दीक्षित–वाराणसी

३. गोपीनाथ दीक्षित, गणेश दीक्षित, केशव दीक्षित, कृष्ण दीक्षित–वाराणसी दुर्गाघाट.

४. यमनाबाई भ्र. महादेव दीक्षित, सासरे रामचंद्र दीक्षित, गोपीनाथ दीक्षित व बाळ दीक्षित व विश्वनाथ दीक्षित, नातू विश्वनाथ दीक्षित—वाराणसी दुर्गाघाट.

या लेखांतून प्रत्येक व्यक्तीला दीक्षित हे उपपद लावले आहे. यावरूनही प्रत्येक व्यक्ती यज्ञ करीत होती असे म्हणावयाचे की काय ? यांचे वंशज मात्र यज्ञ न करता दीक्षित ओक म्हणवू लागले. वर दिलेल्या तीर्थोपाध्यायांकडील लेखांपैकी दुसऱ्या क्रमांकाचा लेख लिहिणारे गणेश दीक्षित हे आपले वास्तव्य दुर्गाघाट वाराणसी असे देतात. त्यांच्या हल्लीच्या एका वंशाजाचा पत्ता 'K R ९/३६ गणेश दीक्षित लेन, दुर्गाघाट वाराणसी ' असा आहे. यावरून गणेश दीक्षित ओक यांचे नावावरून त्या आळीला गणेश दीक्षित लेन हे नाव प्राप्त झाले असावे. बाळदीक्षित बिन गणेश दीक्षित यांच्या पत्राप्रमाणे (ले. १८१) त्यांचे वडील नरवणहून परागंदा होऊन वाराणसीस गेले. ऐतिहासिक पत्रात वडील हा शब्द ' वाडवडील ' या अर्थीही वापरलेला आढळतो. म्हणजे बाळ दीक्षितांचे वडील गणेश दीक्षित परागंदा झाले की त्यांचे आजोबा केशव दीक्षित परागंदा झाले हे निश्चित ठरवता येत नाही.

पण गणेश दीक्षित हे सन १७५८–५९ चे अगोदर परत पुण्यास आले होते व त्यांचा उल्लेख काशीकर असाच केला होता. नानासाहेब पेशवे डायरी खंड २ रा यावरून माहिती मिळाली की छ १३ जमादिलावल तिसा खमसेन मया व अलफ (दि. ११–१–१७५९) रोजी नानासाहेब पेशव्यांनी पुण्यास पेशव्यांचे त्रिस्थळीचे उपाध्येपण पुण्यात आलेले कासीकर प्रयागवासी ब्राह्मण आणून मनसुबी करून वझे यास दिले व देवधरांचा दावा रद्द केला. त्या साक्षीदारांत एक नाव गणेश दीक्षित वोक कासीकर असे आहे. या गणेश दीक्षितांचे पुत्र गोपिनाथ दीक्षित यांचा जन्म १७२७ चा आहे. (ले. १८४). यावरून त्यांच्या वडिलांचा परागंदा होण्याचा काळ, इतर ओकांप्रमाणे भालेराईचा सन १६८८ हा असावा. सन १७६४ च्या जानेवारीमध्ये गोपिनाथ दीक्षित यांना आश्रित म्हणून खर्चास रुपये व होन दिलेले आढळतात (ले. १८५). व पुढे त्याच वर्षी म्हणजे सन १७६४–६५ मधे तेवढया ऐवजाचा प्रथम एकसर नंतर साकुर्डी ( ले. १८६ ) गाव इनाम दिला (ले. १८७) व सन १७६६–६७ मधे मोकासा हक्कही दिला ( ले. १८८). गोपिनाथशास्त्री हे मोठे विद्वान शास्त्री होते. श्रौत व स्मार्त या दोन्हीमध्ये गोपिनाथ शास्त्र्यांनी ग्रंथनिर्मिती केली व ती पंडितमान्य होती. त्यांचा ‘ संस्कार-रत्नमाला ’ हा ग्रंथ त्यांनी सन १७६५ मधे पुरा केला. व “ गोपिनाथ भट्टी ” या नावाने तो ओळखला जाऊ लागला (ले. १८४). हे पेशव्यांचे आश्रयास राहात होते व पेशव्यांना वेळोवेळी सल्ला देणाऱ्यांत एक असत. सदाशिवभाऊंच्या तोतयाला शासन देणाऱ्या पंचात रामशास्त्री प्रभुणे, हरिपंत फडके इत्यादींसमवेत गोपिनाथशास्त्री दीक्षितही होते. (ले. १८९). तसेच सवाई माधवरावांच्या मुंजीच्या मुहूर्ताची वाटाघाट करताना रामशास्त्र्यांनी गोपिनाथ शास्त्री यांना बोलाविले होते (ले. १९०). सन १७७२ मधे त्यांना वार्षिक रु. १५०० तैनात ( मोबदला ) मिळत असे. त्यातून साकुर्डी इनाम गावचा वसूल व श्रावणमासाची दक्षणा रु. ५०० वजा करून बाकी रक्कम रोख दिली जाई. (ले. १९१). याखेरीज पागोटे, कापड, गूळ, साखर, मसल्याचे जिन्नसही दिलेले आढळतात (ले. १९२). गोपिनाथ शास्त्र्यांच्या मरणापूर्वी त्यांना वार्षिक रु. १५०० ऐवजी रु. २००० तैनात देत असत (ले. १९५). गोपिनाथ शास्त्र्यांना याखेरीज वेळप्रसंगी दक्षणा व दान मिळत असे. रमाबाई पेशवे सती गेल्या त्यावेळी त्यांनी आपले दागिने दान केले. त्यावेळी गोपिनाथ शास्त्र्यांना १२१ मोती असलेली मोत्यांची माळ व नथ दान मिळाली होती (ले. १९३). सन १७९१–९२ मधे एका अनुष्ठानाबद्दलही त्यांचे नावे रक्कम खर्च पडली आहे (ले. १८२). सन १७९५ मधे गोपिनाथ शास्त्री यांचा मृत्यू झाला. त्यांचे क्रियेचे खर्चाकरिता त्यांचे चिरंजीव धुंडिराज दीक्षित यांना १००० रुपये दिले होते (ले. १९४) व त्या वर्षी गोपिनाथ शास्त्र्यांना मिळणारी तैनात धुंडीराज दीक्षितांना दिली गेली( ले. १९५ व १९६ ). त्या वर्षीपासून तैनात त्यांचे नावे झाली. गोपिनाथ शास्त्र्यांचे हयातीतच धुंडीराज शास्त्री साकुर्डी येथे प्रतिवर्षी गणेशचतुर्थीला होम करीत
पत्रविल[illegible] शवे यांजकडून काही जिनसा त्यांचेकडे साकुर्डीस पोचविल्या जात
व त्यांचे बंधू गोपीनाथ [illegible]

असत ( ले. १९७ ). सन १७८६ पासून सन १७९१ पर्यंत प्रत्येक वर्षी त्या जिनसा पोचविण्याबद्दलच्या आज्ञा पेशवे दप्तरात मिळतात. धुंडीराज दीक्षितांचे नंतर साकुर्डी गाव त्यांचे चिरंजीव गोपाळ दीक्षित बिन धुंडीराज दीक्षित यांचेकडे चालत होता (ले. १९८) व वर्षासनही त्यांचे नावावर होते (ले. १९९).

पेशवे दप्तरातील जमाव पुणे प्रांत रुमाल १७० मधे पुण्यातील घरांची पेठवार खानेसुमारी व घरपट्टीच्या वसूल बाकीच्या याद्या आहेत. सन १७८०–८१ च्या खानेसुमारीत शनवार पेठेत नदीकिनाऱ्यापासून ४ थे घर म्हणजे यज्ञेश्वर दीक्षितांचे घराशेजारी गोपिनाथ दीक्षित यांचे घर ५ खणी चौक दुमजली तिघई अशा वर्णनाचे घर होते. सन १७९९–१८०० चे खानेसुमारीचे वेळी त्याची नोंद "गोपिनाथ दीक्षित खण ५ दुमजली वहिवाट गोपाळपंत रानडे करतात" अशी आहे. गोपाळ विनायक रानडे यांनी हा वाडा दोन हजार रुपयांस गहाण लावून घेतला होता ( ले. २०० ) व म्हणून त्या वाड्यात रानडे राहावयास आले. रानडे कुलवृत्तांतात हा वाडा शामजी बाबाचा म्हटला आहे; यावरून शामजी बाबाचे वतीने हा गहाणव्यवहार झाला असावा. या शामजी बाबाची समाधी दीक्षितांचे वाड्यासमोर भिडे यांचे वाड्यात आहे. घरपट्टीच्या वसूल बाकीच्या यादीवरून गोपिनाथ दीक्षितांचे वाड्यास घरपट्टी नव्हती. दीक्षितांनी गहाण सोडवून घेतले असले पाहिजे. त्यांचे वंशजांपैकी प्रो. अण्णुभाऊ दीक्षित यांचे वेळी स. १९२९ मधे तो वाडा दीक्षितांकडून विकला गेला.

गोपिनाथशास्त्री यांचे बंधु बालशास्त्री दीक्षित ह्यांना सन १७७०–७१ च्या पूर्वीपासून वर्षासनाची नेमणूक होती. १७७०–७१ मधे वर्षासन त्यांना काशीतील पटातून दिले गेले होते ( ले. २०१ ) व पुढील पाच वर्षे ते द्यावयाचे राहिले होते. थकबाकी रु. ११२५ देऊन पुढे प्रतिवर्षी रु. २२५ देण्याबद्दल पेशव्यांची दि. २२–३–१७७९ ची आज्ञा होती (ले. २०१). पण तेही दिले गेले नाहीत, व त्यापुढील आठ वर्षांचे वर्षासनही देण्याचे राहिले. ही गोष्ट उत्तम न केली अशाबद्दलचे पेशव्यांचे पत्र ( ले. २०२ ) आहे. त्याच पत्रात सन १७८४–८५ च्या सर्व थकबाकीचे रु. २९२५ व पुढे प्रत्येक वर्षी रु. २२५ बाळदीक्षितांना काशीत पोचते करण्याबद्दलची आज्ञा आहे. सन १७७९ पर्यंत बाळ दीक्षित काशीत राहात होते. सन १७८६ च्या अनुष्ठान खर्चात बाळदीक्षितांना पवमान म्हणून अभिषेक केल्याबद्दल प्रतिदिनी एक रुपायाप्रमाणे रु. २१० दिल्याचे आढळते. (ले. २०३). सुमारे ७ महिने त्यांनी अभिषेक केला. तो नरनारायणाचा अभिषेक करण्यास ते पुण्यात आले असावेत. सन १७९३ मधे त्यांनी नागपुरावरुन काशीस परतण्याचे योजिले होते ( ले. २०४ ). बाळ दीक्षितांना काशीपटातून वर्षासन मिळत होते. त्यांचे वंशज लक्ष्मण दीक्षित (बाबा) महादेव दीक्षित यांना काशीनरेशाकडून ते वर्षासन काही वर्षांपूर्वीपर्यंत चालू होते असे त्यांचे पुतणे श्री. राजाभाऊ मुकुंद दीक्षित हे कळवितात. गोपिनाथशास्त्री यांचे आणखी एक बंधू नारायण दीक्षित हेही सन १७९०–९१ मधे जपासाठी होते ( ले. १८२ ). पण त्यांचे नाव पेशवे दप्तरात

इतरत्र आढळले नाही. चौथे बंधू रामचंद्र दीक्षित हेही प्रथम काशीतच राहात असत. पेशव्यांनी त्यांना सन १७८९ मधे दोनशे रुपयांचे वर्षासन दिले व ते वर्षासन दीक्षितांना श्रीत (काशीत) पोचते व्हावे अशी आज्ञा काढली होती (ले. २०६). सन १७८५ मधे ते अहिल्याबाई होळकरांकडे गेले होते (ले. २०९). तेथून ते परत काशीस गेले असावेत. पुण्यास ते सन १७९६–९७ चे सुमारास आले असावेत. कारण सन १७९७–९८ मधील थोर पंडितांच्या श्रावणमास दक्षणेच्या यादीत त्यांचे नाव आढळते. (ले. २०७ ). तसेच वसंत पूजेच्या निमंत्रित शिष्ट ब्राह्मणांच्या यादीतही त्यांचे नाव आहे. (ले. २०८). सन १८०१ मधे श्रीमंत बाजीरावसाहेबांच्या इष्टीचे पौरोहित्य रामचंद्र दीक्षितांनी केले. कुरुंदवाडकर पटवर्धन त्या इष्टीस उपस्थित होते व त्यांनी मिरजेस लिहिलेल्या पत्रात दीक्षितांबद्दल गौरवोद्‌गार काढले. ( ले. २१० ). ते पुण्यास असेपर्यंत त्यांचे वर्षासन श्रीमंतांनी वाढवून रु. ६०० केले होते ( ले. २१० अ ). पुढे रामचंद्र दीक्षित सन १८१९ च्या श्रावणात मृत्यू पावले. त्यावेळी त्यांचे चिरंजीव महादेव दीक्षित तथा दाजी दीक्षित पुण्यातच होते व ते पण विद्वान थोर शिष्टांत मोडत होते. त्यांना सिऊबाई बोकील यांनी त्यांच्या इनाम जमिनी त्यांना मिळवून दिल्याबद्दल दोनशे रुपयांचे वर्षासन करून दिले होते (ले. २११). ते वर्षासन पुणे मुक्कामी त्यांचे घरी पोचविले जाईल असे त्यांच्या सन १८१९ च्या पत्रात लिहिले आहे. यावरून दाजी दीक्षित पुण्यासच राहात होते. त्यांना कंपनी सरकाराकडून मासिक रु. २५ मिळत होते ( ले. १६२ ) व तिसऱ्या प्रतीच्या सरदारांच्या यादीत त्यांचे नाव होते ( ले. १६३ ). यांचे वडील रामचंद्र दीक्षित यांना वर्षासन रु. २०० पेशव्यांकडून मिळत असे ( ले. २०६ ). त्यापेक्षा जास्त पेन्शन दाजी दीक्षितांना कंपनी सरकार देत होते. दाजी दीक्षितांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नी मैनाबाई यांनी दाजी दीक्षितांचे पेन्शन त्यांच्या स्वतःकडे चालू राहावे म्हणून सन १८३५ मधे केलेल्या विनंतीपत्रात ( ले. २१२ ) रामचंद्र दीक्षितांना म्हणजे मैनाबाईच्या श्वशुरांना पेशव्यांकडून वार्षिक रुपये २५०० मिळत होते असे दिले आहे. त्या पत्रावर झालेल्या आज्ञेत दाजी दीक्षित, पुण्याचे पेन्शनर असा त्यांचा उल्लेख आहे. मैनाबाईंना त्यांच्या यजमानांचे वार्षिक तीनशे रुपयांचे पेन्शन ऐवजी वार्षिक शंभर रुपयांचे पेन्शन चालू झाले ( ले. २१२ ).

सन १८४९ मध्ये पुण्यात ब्राह्मणवर्गाने मद्यपानाविरुद्ध चळवळ जोराने चालविली होती. ‘ मद्यप्राशन विनाशक मंडळी ’ या नावाने एक संस्था स्थापन करण्यात आली होती. त्या मंडळीचे सरपंच म्हणून मोर दीक्षित ओक होते असे मुझुमदारकृत पुणे शहराचा इतिहास या पुस्तकात आहे. पण या मोर दीक्षितांची अन्य माहिती मिळाली नाही. पण सन १७८५ मधे मोरो जनार्दन ओक मालगुंडकर ( लेखांक २०३ ) यांनी त्रिकाल पूजा केली ( इत्यादी ) तेच हे मोरशास्त्री सन १८४९ मधे ‘ मद्यप्राशन विनाशक मंडळी ’ चे सरपंच असावेत.

**गिम्हवणे ओक** ( वं. क्र. ७.५ )

गिम्हवण्याच्या ओक मंडळींचे त्र्यंबकेश्वरच्या उपाध्यायांकडे लेख आहेत त्यात त्यांनी आपला मूळगाव नरवण सुखवास किंवा हल्ली गिम्हवणे असे लिहिले आहे ( ले. २१३ ). यावरून नरवण सोडून ही मंडळी गिम्हवण्याला आली असे ठरते. तीर्थोपाध्यायांकडील उताऱ्यावरून गिम्हवणे वंशावळ बनविली आहे. ( वंशावळ क्र. ७·५ ). त्यातील ५ व्या पिढीतील वासुदेवभट ओक यांचे नाव पेशवे दप्तरातील दक्षिण कोकण रुमाल क्र. २९८ मधे गिम्हवण्याच्या सन १७५७–५८ च्या हिशोबात एकूण ५२ घरांच्या घरपट्टी यादीत आढळते. त्यांचे आजोबा रामभट यांचा त्र्यंबकेश्वराच्या फडके गुरुजींच्या वहीतील लेख रामभट बाळंभट–पुत्र नारायण–गिम्हवणे असा व वासुदेवभटाच्या वडिलांचा घैसास गुरुजींच्या वहीत–बाळंभट रामभट, अजे बाळकृष्ण केशव, बंधू गोविंद व नारायण–नरवण ह. गिम्हवणे असा आहे. यावरून रामभटापासून म्हणजे अंदाजे सन १७०० पासून ही मंडळी गिम्हवण्यास राहण्यास आली असावी. गिम्हवण्याच्या दक्षिणेस असलेल्या बुरोंडी गावी किंवा त्याच्या दक्षिणेस असलेल्या कोळथरे गावी ओक मंडळी त्याच सुमारास आली होती व तो काळ भालेराईच्या दंग्याचा होता. विसो केशव ओक त्या दंग्यात होते. त्यांनी आपल्या भाऊंबदांचे हाल केले. विसो केशवचा मोर्चा नरवणकडेही वळला होता ( ले. ६ ). नरवणचे मुकादम दीक्षित ओक हे परागंदा होऊन काशीस गेले ( ले. १८१ ). त्याप्रमाणे नरवणचे एक कुटुंब गिम्हवण्यास गेले. तिसऱ्या पिढीतील रामभटाचा लेख गिम्हवण्याचा आहे. ते प्रथम गिम्हवण्यास गेले व त्यांनी तेथे जमीन संपादन केली व त्या जमिनीच्या पुढे त्यांच्या वंशजात वाटण्या झालेल्या आढळतात. पेशवे दप्तरातील रत्नागिरी जिल्ह्याच्या पहाणी खर्ड्यात रुमाल क्र. २७ मधे सन १८०६ मधे जिरायत व वरकस जमिनींना व १८११ मधे शेत जमिनींना अशा तीन याद्यांत ओकांची पुढीलप्रमाणे नावे अनुक्रमे तीन ठिकाणी आहेत.

१. तातंभट, भाऊभट, चिंतामणभट, रामचंद्रभट, परशरामभट
२. तातंभट, बाळकृष्णभट, चिंतामणभट, रामचंद्रभट, परशरामभट
३. तातंभट, केशवभट, चिंतामणभट, रामचंद्रभट, परशरामभट

यातील तातंभट, चिंतामणभट व रामचंद्रभट ही चुलत घराण्यातील नावे आहेत. भाऊभट हे नाव तातंभटाचे बंधू मोरोबा यांचे आहे. ( ले. २१३ पैकी १० ). बाळकृष्णभट हे तातंभटाच्या पहिल्या बायकोचे पुत्र होते. ( ले. २१३ पैकी १५ ). त्यांचे नावावर जमीन करून दिली असावी. तिसऱ्या खेपेस म्हणजे सन १८१८ मधे भाऊभटाऐवजी त्यांचे बंधू केशवभटाचे नाव लागले आहे. परशरामभट हे नाव वंशावळीत आढळत नाही पण तेही चुलत घराण्यापैकी असावेत. जमिनीवरही चुलत घराण्यातील मंडळींची नावे लागली आहेत. त्यावरून वडिलार्जित जमीन वाटली गेली असली पाहिजे व तसे असेल तर जमीन संपादन करणारे रामभट असले पाहिजेत व हे प्रथम गिम्हवण्यास आले असा

कयास आपण या प्रकरणाचे आरंभी केलाच आहे.

गिम्हवणे वंशावळीतील ११ व्या पिढीचे श्री. प्रमोद गणेश ओक ( जन्म सन १९५० ) यांचे अजोबा महादेव काशिनाथ यांनी सन १९०८ मधे काही टिपणे आपल्या आप्तांविषयी करून ठेविली होती; त्यावरून श्री. प्रमोद यांनी माहिती पुरविली; त्यात परशराम हे नाव आढळते. माहितीचा गोषवारा पुढीलप्रमाणे : आरंभी त्यानी लिहिले आहे की, महादेव, बल्लाळ, बापू ही नावे आठवतात पण ते कोणाचे कोण हे माहीत नाही.

' पालशेत येथून बल्लाळ यांच्या पत्नी परशराम व सदाशिव या आपल्या दोन लहान मुलांसह गिम्हवणे येथे आल्या व तेथील खोत गोखले यांजकडून ठिकाण मागून घेऊन तेथे मुलांसह निर्वाह करू लागल्या. परशराम व सदाशिव हे विभक्त राहात असत. घरातील अर्धा हिस्सा सदाशिवचे मुलांना सन १८८५ मधे विकावा लागला. सदाशिव हे शिकलेले व हुशार कारकुनांपैकी एक होते. त्यांना करंजाणे हा गाव खोती होता. ( पहा नकाशा क्र. २ ) परशरामला चार मुलगे होते. त्यांपैकी गोविंद आणि गणेश हे अविवाहित होते व केळशीस कोणाच्या तरी आश्रयाने भिक्षुकी करून आयुष्य घालविले. तिसरे विठ्ठल. त्यांना पुत्र नव्हता. चवथे नानुअणा हेही भिक्षुकी करीत व महाडचे बाजूस कोणाचे तरी आश्रयाने राहात ' अशी व इतर सदाशिवच्या वंशापैकी त्यांच्या स्वतःच्या पुरेशी माहिती आहे. चुलत घराण्याविषयी नाही. या माहितीपैकी सदाशिवचा वंश वंशावळ क्र. ७·५ आ मधे आला आहे. परशरामचा आला नाही. किंवा त्यांच्या वंशजांची म्हणून जी नावे दिली आहेत तीही तीर्थोपाध्यायांकडील वह्यांत आढळली नाहीत. गिम्हवण्यास, ओक नरवणहून आले म्हणून पालसेतहून गिम्हवण्यास आले हे व ७ वा वंशाप्रथम गिम्हवण्यास आला ही माहिती इतर जुन्या कागदोपत्रीच्या माहितीशी विसंगत वाटते. ६ व्या पिढीतील ओकांकडे मालकीच्या जमिनी होत्या तेव्हा त्यांच्याचपैकी एकाच्या मुलांना खोताकडून जागा मागून घेऊन गुजराण करण्याचा प्रसंग विपरीत वाटतो. काशिनाथ सदाशिव यांच्या जन्मापूर्वीची हकीगत स्मरणातून लिहिली तीही कोणाच्या तोंडून ऐकलेली असेल व अचूक नसण्याचा संभव वाटतो. त्र्यंबकेश्वरच्या वंशावळीतील सदाशिवच्या एका भावाला चार मुलगे होते. त्यांपैकी गणेश याचा उल्लेख लेखांक २१३ पैकी १८ व २७ मधे आढळतो. ही परिस्थिती श्री. प्रमोदच्या माहितीतील परशरामशी थोडीफार जुळती आहे.

## प्रकरण सतरावे

# हेदवी ओक ( वं. क्र. ७.२ )

हेदवी वंशाचा विस्तार फार मोठा आहे. त्या वंशापैकी तिसऱ्या पिढीतील विठ्ठल कृष्ण व विसाजी महादेव व चौथ्या पिढीतील बापूजी बाबजी व गोविंद बल्लाळ यांची नावे सन १७७२–७३ मधे मौजे हेदवीच्या शेतजमिनीला लागलेली आढळतात ( पेशवे दप्तर रत्नागिरी जिल्हा पहाणी खर्डा, रु. ६१ ) दुसऱ्या पिढीतील केशवभट नारायण, महादेवभट नारायण व कृष्णंभट नारायण यांच्या मुलानातवंडांची ती नावे आहेत- कदाचित नारायणनी त्या जमिनी संपादन केल्या असतील व त्यांच्या तीन मुलांत त्या जमिनी वाटल्या गेल्या असतील व त्यांचे नंतर त्या मुलांच्या वंशजांकडे त्या सन १७७२ ७३ मध्ये आल्या. यावरून नारायणनी जमिनी संपादण्याचा काल सन १७०० चे आस. पासचा येतो. इतर ठिकाणी विखुरलेल्या वंशांच्या पहिल्या ज्ञातपुरुषाचा काल हाच येतो.

हेदवीमधे समुद्रकाठी उमामहेश्वराचे देऊळ आहे ते ओकांनी बांधलेले आहे. आहिल्याबाईकडून एक मोहरांचा हंडा देऊळ बांधण्याकरिता मिळाला, त्यातून हे देऊळ बांधले असे हेदवीच्या दहाव्या पिढीतील श्री. गजानन शंकर रा. हेदवी ( जन्म १५–७ –१९३४ ) हे सांगतात. तो रिकामा हंडा अजूनही श्री. गजाननरावांकडे आहे. ओक हेदवीत भूमी संपादन करून स्थायिक झाल्यावर सन १७५० ते १७८० चे दरम्यान म्हणजे आहिल्याबाईचे काळात हे देऊळ बांधले असावे. ज्या ज्या गावी ओक स्थायिक झाले त्या त्या गावी ओकांनी देऊळ बांधले असे सर्वसाधारणपणे आढळते ( पहा प्रकरण २१ वे ). रिकामा हंडा श्री. गजाननरावांकडे आहे, त्यावरून त्यांचे पूर्वजांपैकी विठ्ठल कृष्ण याने देऊळ बांधले असावे. त्यांचे नाव सन १७७२–७३ मधे हेदवीच्या शेतजमिनीला लागलेले आहे व तेही एका ठिकाणी विठ्ठल कृष्ण गु।। जगन्नाथ म्हणजे जगन्नाथचे वतीने विठ्ठल कृष्ण असे आहे. हे जगन्नाथ हेदवीच्या ओकात आढळले नाहीत. कदाचित ते अहिल्याबाईकडून धन घेऊन आले असावेत व विठ्ठल कृष्णनी देऊळ बांधले असेल व म्हणून रिकामा हंडा विठ्ठल कृष्णच्या वंशजांकडे राहिला किंवा रामचंद्र दीक्षित ओक

हे सन १७८५ मधे आहिल्याबाई होळकरांकडे गेले होते ( ले. २०९ ). यांना कदाचित तो हंडा मिळाला असेल व तो त्यांनी हेदवीस देऊळ बांधण्याकरिता दिला असावा. कारण त्यांचे वतन हेदवी होते व हेदवीस लागून असलेले नरवण हे त्यांचे गाव होते. रामचंद्र दीक्षितांचे चिरंजीव दाजी दीक्षित यांनी आपल्या नावापुढे वतन हेदवी असे लिहिले आहे व या दाजी दीक्षितांना होळकर दरबारी मान होता ( ले. २११ ). यावरून रामचंद्र दीक्षितांना सन १७८५ मधे धनाचा हंडा मिळाला असण्याचा संभव आहे व त्याचा उपयोग आपल्या वतनाच्या गावी देऊळ बांधण्यासाठी केला असावा किंवा अहिल्याबाईंनी देऊळ बांधण्याकरिताच ते धन दिले असावे.

ज्या विठ्ठल कृष्णचे नाव सन १७७२–७३ मध्ये हेदवीमधील शेतजमिनीला इतर भाऊबंदांबरोबर लागलेले आहे, त्यांना चार पुत्र होते. त्यांपैकी तिघांना पुत्र होते. ते विठ्ठल कृष्णचे ७ नातू एकत्र होते. व त्यांच्या देण्याघेण्याचा व्यवहार एकत्रात होता. अंजनवेलचे आपटे व अचवल यांचेशी देण्याघेण्याचे व्यवहारात ( ले २१४ ) एकमताने वागत होते. काशिनाथ परशराम ओक यांचे नावे पडलेल्या रकमेचे व्याज चुलत बंधू बच्याजीपंताकडून जमा झाले आहे. वेंकाजी विनायक ओक यांचे खाती त्यांचे नावावर पडलेल्या रकमेच्या पोटी त्यांचे भाऊ बाळाजीपंत यांजकडून रक्कम जमा आहे. एवढेच नाही तर चुलतबंधू धोंडो गणेश यांचेकडूनही जमा आहे. हा व्यवहार शके १७३६ ते शके १७४६ म्हणजे सन १८१४ ते १८२४ या अवधीतला आहे. ज्यांच्याशी हा पैशाचा व्यवहार ओकांचा होता ते आपटे हे नारो महादेव मंडलिकांचे मुखत्यार दिवाण होते. वेंकोजी विनायक व बाळाजी विनायक ओक हे सन १८१९ ते सन १८२३ मध्ये नारोपंत मंडलिकांचे खासगीचे कारकून होते व त्यांचेकडे मंडलिकांकडील कुलकर्णी वतनाचे काम सोपविलेले होते ( ले. २१५ ). नंतर त्या दोघांकडून हे काम काढून घेतले म्हणून नाराज होऊन त्यांनी सन १८२३ मध्ये एका श्री. फगरे या गृहस्थांना उभे करून कोर्टातून कुलकर्णी वतन आपटयांच्या अपरोक्ष फगरे यांचे नावे लावून घेतले व फगरे यांनी वतनाचा ताबा सुद्धा सन १८१५ मधे मिळविला होता.

वर उल्लेखिलेले बाळाजी विनायक यांचे नातू हे मराठीतील प्रसिद्ध लेखक विनायक कोंडदेव ओक ( १८४० ते १९१४ ) हे होत व बाळाजी विनायकांचे चुलत बंधू काशिनाथ परशराम यांचे नातू वामन दाजी ( १८३५ ते १८९७ ) हेही मोठे लेखक होऊन गेले. जे लेखन कोणी वाचणार नाही व ज्या लेखनापासून कोणाच्या ज्ञानात भर पडणार नाही असे लेखन करण्यात समर्थ लेखकांनी आपले श्रम व वेळ व्यर्थ घालवू नयेत अशा मजकुराचे एक पत्र लिहिले होते ते या इतिहासाचे आरंभी ‘ कालापव्यय ’ या शीर्षकाखाली दिले आहे.

वरील पिढीचे जनक विठ्ठल कृष्ण यांचे बंधू बल्लाळ हे सन १७७३ मधे ह्यात नसावेत म्हणून त्यांचे चिरंजीव गोविंद यांचे नाव त्या वर्षी शेतजमिनीला लागले आहे. गोविंद बल्लाळचे बंधू विष्णु बल्लाळ यांचे वंशापैकी अनंत विष्णु व त्यांच्या पुढील

पिढीतील केशव विनायक यांनी तीर्थोपाध्यायांकडील वह्यांत गाव हेदवी हल्ली शिर्टी असे लिहिले आहे. शिर्टी गाव कोल्हापूर जिल्ह्याच्या शिरोळ तालुक्यात कृष्णा नदी-काठी व कर्नाटकच्या सीमेवर आहे. तरीपण ओकांनी लिहिलेले गाव शिरहट्टी असावे. कारण नवव्या पिढीतील मुरलीधर बाळकृष्ण यांच्या पत्नी पद्मावतीबाई यांचेकडून जी या मंडळीची वंशावळ मिळाली त्यात शिरहट्टी असे गावाचे नाव लिहिले आहे. शिरहट्टी पूर्वी सांगली संस्थानात मोडत होते. सांगलीचे पटवर्धनांनी इटगीस जशी ओकांची स्थापना केली ( पहा प्रकरण १५ ) त्याच कामासाठी इटगीच्या उत्तरेस २१ मैलांवर शिरहट्टीस काही मंडळी ठेवली; त्यात या ५ व्या ६ व्या पिढीतील ओक मंडळीचा समावेश असावा.

तीर्थोपाध्यायांकडील हेदवीचे ओक या खतावणीत आणखी एक वंश घातलेला आढळतो ( वंशावळ ७·१ ). त्यापैकी कृष्णाजी नारायण ( बल्लाळ ), अजे नारायण, पुत्र नारोपंत, नातू बापूजीपंत असा एकच लेख हेदवी गाव सांगणारा आहे. त्यानंतर नारो कृष्ण, अजे बल्लाळ यांचा लेख हल्ली वास्तव्य हरणई असा आहे. व त्यापुढील पिढयांनीही आपली गावे हर्णै, कल्याण, पेण, आगाशी इ. लिहिली आहेत. नारो कृष्ण यांच्या नावा-वर दापोली तालुक्यातील दाभोळ व गिम्हवणे येथे बागायत जमीन होती ( ले. ११६ ). व त्यातील माड-पोफळीच्या संख्येवरून बागायतीस सुरवात होती. खरे कुलावृत्तान्तात पृ. ५२ व पृ ६० वर एका दाव्यातील साक्षीदार म्हणून नारो कृष्ण वोक यांचा सन १७६५–६६ मधे उल्लेख आहे. ते मु।। सुवर्णदुर्ग ( म्ह. हरणई ) येथे होते व त्यावेळी ६० वर्षांचे होते असे साक्षीत सांगतात. ते नारो कृष्ण हे ह्याच हेदवी कुळातील नारो कृष्ण असावेत. कल्याणच्या सुभेदारांच्या कागदात श्री. नानासाहेब चापेकर यांना ( पेश-वाईचे सावलीत ) नारो कृष्ण ओक हे नाव आढळले, तेही याच हेदवीच्या नारो कृष्णांचे असावे. काय संदर्भात ते नाव त्यांना आढळले हे त्यांनी दिले नाही. सन १७६४ मधे माधवराव पेशव्यांनी नारो कृष्ण यांना सुवर्णदुर्ग येथे एक पत्र त्या प्रांतातील काही बंदो-बस्ताबद्दल लिहिले होते. ( लेखांक २१७ ). हेदवीचे नारो कृष्ण हेही सुवर्णदुर्गला होते. कदाचित तेच सुवर्णदुर्गला अधिकारी असावेत व म्हणून कल्याणच्या सुभेदारांच्याकडे त्यांचा उल्लेख आला असेल; नारो कृष्ण कोल्हटकर हे अंजनवेलला स. १७५४ मधे सुभेदार होते असे श्री. ढब्बू यांच्या कुलाबकर आंग्रे या पुस्तकात पृ. ३७६ वर आहे. सुवर्णदुर्गला पेशव्यांनी लिहिलेले पत्र नारो कृष्ण कोल्हटकर यांचे नव्हे; ते नारो कृष्ण ओकांनाच लिहिलेले असावे. दुसरे एक नारो कृष्ण ओक कारकून नि।। दप्तर असा उल्लेख केलेले ओक हे बोरवाडी वंशात आहेत ( प्रकरण ९ वंशावळ २·३ ).

हेदवीला शेत जमिनीला स. १७७२–७३ मधे ओकांची नावे होती. पण त्या आधीच्या पिढयांपैकी कोणी मंडळी उडुपी प्रांतातील उडुपी, आंजार व सुब्रम्हणी येथे गेली. या वंशातील गणेशभट परशरामभट यांचे लेख घृष्णेश्वर व त्र्यंबकेश्वरला अनुक्रमे पुढील-प्रमाणे आहेत :

घ्: गणशभट, भाऊ गोविंदमट व कृष्णंभट व नरसिंह भट, पिते परश्राम भट, आजे बापूभट, सु. आंजार प्रांत उडुपी.

त्र्यं. : गणेशभट परश्राम भट आजे बापूभट, बंधू गोविंदभट व कृष्णंभट व नर्शिभट पुत्र हरिभट व केशव भट ओक हली उडुपी सुब्रम्हण शके १६७६

काशीबाई भ्र. हरी, सा. नर्शी, चु. दीर बाळंभट, ह. उडपी सुब्रम्हणी.

यावरून गणेशभट व त्यांचे चिरंजीव हरी हे उडुपी प्रांतात सुब्रह्मणीला राहावयास गेले असे दिसते, सुब्रह्मणी अथवा पुण्यगिरी हे ठिकाण उडुपीच्या अग्नेयेस ५६२६ फूट उंचीवर आहे असे म्हैसूर व कुर्गच्या गॅझेटिअरमधे आहे. सुब्रह्मण्याचे म्हणजे ब्रह्मदेवाचे देवस्थान असावे. नर्शिभट सुब्रह्मणीला होते की नाही याचा स्पष्ट उल्लेख नाही. पण या नर्शिचे चिरंजीव बाळंभट अथवा बाळाजी नरसी वोक ( ले. २१२ ) हे पेशव्यांचे पदरी होते. त्यांचा उल्लेख हरकारा ( २२० ) व कारकून शिलेदार ( २२१ ) असा केलेला आहे. हरकारे हे सरदारगिरी करून सरकार काम करतील तसे शत्रुराज्यात जागजागी आपली माणसे ठेवून बातम्या आणतील अशी प्रतिष्ठेची जागा. वकिलाच्या खालोखाल त्यास मान होता अशी माहिती मराठेकालीन समाजदर्शन सं. शंकरराव जोशी सत्कार-समिती पृ. १५६–१५७ वर दिली आहे. शिलेदार म्हणजे स्वतःचा घोडा ठेवून लढणारा घोडेस्वार असा खुलासा रा. ब. साने यांनी भाऊसाहेबांच्या बखरीत केला आहे. बाळाजी नरसी यांच्याकडे अशी महत्त्वाची कामे होती. ते वैद्यखान्याकडे होते. राधाबाई पेशवे यांजकडे ( म्ह. सन १७५३ पूर्वी ) या बाळाजी नरसीनी चार माणसे देऊन २२ ओझी वैद्यखान्याची पाठविली होती ( ले. २१८ ). ही कोणत्या गावाहून कोणत्या गावाला याचा उल्लेख असता तर विशेष माहिती मिळाली असती. नाना फडणीसांना गोविंद शिवराम खाजगीवाले यांनी इंग्रजाकडून मिळालेला चहाचा एक जस्ती डबा नजर केला तो ( औषध म्हणून ? ) वैद्यखान्यात जमा करण्याकरिता बाळाजी नरसी वोक याजकडे दिला ( ले. २१९ ) ही गोष्ट स. १७५१ ची असावी. कारण त्यावेळी इंग्रज वकील पेशव्यांकडे आला होता व गोविंद शिवराम मार्फत त्यांचेशी बोलणे झाले होते. बाळू ओक हरकारा हे लढाईच्या कामगिरीत मरण पावले असावेत. कारण सन १७६६मधे बाल पर्वेशी म्हणजे लढाईत पडलेल्या व्यक्तीच्या मुलाचे पालनपोषणास दिलेली वार्षिक रक्कम रु. ४५ खर्ची पडली होती ( ले.२२० ), त्याचप्रमाणे सन १७७७ चीही दिलेली आढळते ( ले. २२१ ). स. १७८५ मधे मात्र ही रक्कम जान परवेशी म्हणजे स्वतः-करिता अशी मदत बाळू वोक याच्या स्त्रीस ( इतलाख ) रोख दिली गेली आहे. ( ले. २२२ ) यावरून त्याचे अपत्य त्यावेळी मृत्यू पावले होते असा तर्क चूक होईल अ रे वाटत नाही.

## प्रकरण अठरावे

# बामणोलीकर ओक

बामणोलीकर ओकांपैकी गणेश कृष्ण यांनी ओंकार नाव लावण्यास सुरवात केली (प्रकरण ४) व बामणोलीकर ओंकार हा वंश सुरू झाला. मूळ पालशेतच्या ओक वंशाचे तीन गट झाले. ( ले. ११); त्यांपैकी एका गटात (१) ब्रह्मवणेकर, (२) सिदरस (प्रकरण ५) (३) कोतळूककर ( प्रकरण ६ ) व (४) ब्राह्मणुलीकर असे चार वंश झाले. बामणोलीला तीर्थोपाध्यायांकडील वह्यांत ब्राह्मणोली किंवा ब्राह्मणवली असे रूप वापरले आहे. त्याचा अर्थ ब्राह्मणांची आळी असा होतो व बामणोलीपैकी श्री वासुदेव गजानन ओक (ज.१४-१०-१९१०) सांगतात की बामणोलीत कित्येक दिवसपर्यंत सर्व घरे ब्राह्मणांचीच होती. या ओक वंशाच्या गटापैकी ब्रह्मवणेकर व सिदरस हे पालशेतचे महाजन होते. कोतळूककर हेही पालशेत महाजनांपैकीच होत. (प्रकरण ६). बामणोलीकर-ही पालशेतपैकीच होते म्हणून तेथील ओकांचे पुरातन देवळाची दुरुस्ती बामणोलीकरांनी व शिवणकरांनी करणे हे त्यांचे कर्तव्य आहे, अशा मजकुराचे पत्र इ. स. १७८३ मधे शिवण्याचे बाजी बल्लाळ ओकांनी चिंतामण नाईक ओक ( म्हणजेच चिंतामण बाबूजी ओंकार ) यांना लिहिले होते (लेखांक १३). बामणोलीकर व शिवणकर हा एकच वंश आहे. बामणोली गुहागर तालुक्याच्या उत्तरेस आहे तर शिवणे दक्षिणेस आहे. पालशेतच्या ओकांना सन १५५० चे सुमारास देशमुखी मिळाली. त्यांचे सरंजामास जी आठ गावे त्यांना मिळाली (ले. ३) त्यांपैकी शिवणे येथे एक राहिले व बामणोली, वाघीवरा येथे दुसरे राहिले. (ले. ३). बामणोली व वाघीवरा ही दोन गावे एकमेकांस लागून आहेत व गावठाणात अंतर एक किंवा सव्वा कि. मी. असेल. वाघीवरा गाव शास्त्री नदीच्या मुखा-जवळ आहे, म्हणून जास्त महत्त्वाचे आहे. १९६१ च्या गणनेप्रमाणे वाघीवऱ्याची लोक-संख्या बामणोलीच्या लोकसंख्येच्या सव्वापट आहे. ओंकार आपल्या आडनावापुढे "खोत मौजे बामणोली व वाघीवरे तो। हवेली तालुके अंजनवेल व देसाई ता। मजकूर" असा उल्लेख करतात (ले. २२८). देसाई म्हणजेच देशमुख. ओकांना हमजाबादच्या साडेचार

महालांची देशमुखी होती. त्यात अर्धा हवेली हमजाबाद असा महाल होता. सन १७५७–५८ मध्ये गंगाधर बापूजी ओंकार ब्राह्मणोलीकर यांनी आपण देशमुखीत भागीदार आहोत असा दावाही केला होता (प्रकरण १० वे).

## बामणोलीचे खोत ओक

बामणोलीच्या खोतीत चार हिस्से होते; त्यांतील दोन हिस्से किटोबा श्रीपती व नारोबा श्रीपती या दोन शिवनकरांचे व उरलेले दोन एक गणोबा नाईक (जे पुढे ओंकार नाव लावू लागले) यांचा व दुसरा गणोबा नाईकांचे भावाचा म्हणजे ज्यांचे वंशज बाळाजी हे कल्याण प्रांती अनगावला गेले होते (वं. क्र. ५.६) त्यांचे हिश्शाचा. शिवणकरांपैकी नारोबा श्रीपती यांचा हिस्सा त्याने महानुष्ठाने केली त्या कर्जाचे फेडीसाठी गणोबांचे वडील कृष्णाजीबाबांना लिहून दिला म्हणजे विकला ही हकीकत गणोबा नाईक काशीस राहात असता त्यांनी महादो हरी शिवणकराचे पत्रास लिहिलेल्या उत्तरात कळविली होती (ले. १५). नारोबा श्रीपतीच्या भावाचा म्हणजे किटोबाचा हिस्सा किटोबा कडेच राहिला. किटोबा हे नाव विठोबा या नावाचे दुसरे रुप आहे, असे मोडकांच्या कुलवृत्तांतातील पृ. ४९ वरील एका ऐतिहासिक कागदपत्रावरून दिसते. त्याप्रमाणे शिवनकरांच्या वंशात जो पहिला पुरुष विठोबा (वंशावळ क्र. ५.२) दाखविला आहे तो किटोबा श्रीपती होता व त्याचे नातू महादो हरी शिवनकर यांना गणोबा नाईकांनी पत्र लिहिले त्यात किटोबा नाईकाचा हिस्सा मान्य केला आहे (ले. १५). गणोबा नाईक काशीत राहात होते तेव्हा ओंकार हे आडनाव लावण्यापूर्वी बामणोली खोतीत गणोबा नाईकांचा स्वतःचा व नारोबा श्रीपतीनी त्यांना लिहून दिलेला मिळून ½ हिस्सा गणोबा नाईकांचा, ¼ हिस्सा त्यांच्याच चुलत घराण्यातील बालाजीचा व ¼ महादो हरी शिवणकरांचा असे होते.

या चुलत घराण्यातील कल्याण प्रांती अनगावला राहणाऱ्या बालाजी ओकांचे भाऊ कृष्णाजीपंत यांना गणोबा नाईकांचे चिरंजीव बाबूजी गणेश यांनी सन १७५० मध्ये हिशोब पाठविले होते. (ले. २२३). यावरून अनगावकडे असणाऱ्या बामणोलीच्या ओकांच्या हिश्शाची वहिवाट बाबूजी गणेश ओंकार स्वतःच्या अर्ध्या हिश्शाबरोबर करीत होते. सन १७६५ मध्ये बाबूजी गणेश ओंकार यांनी अनगावच्या लक्ष्मण बाळाजी ओकांना पत्र लिहिले (ले. २२४) त्यावरून त्या वर्षाचे आधी बामणोलीच्या सर्व हिश्शाची वहिवाट लक्ष्मण बाळाजी अनगावकराकडे होती ( ले. २२५). ती त्या वर्षी म्हणजे सन १७६५ पासून शिवन्याचे भास्कर गणेश ओकांकडे सोपविली. त्या पत्रावरून असेही आढळते की, त्या सुमारास बामणोली खोतीत दोनच निम्मे निम्मेचे हिस्सेदार होते. यावरून गाणोबा नाईकांनी पूर्वी मान्य केलेला शिवणकरांचा ¼ हिस्साही बामणोली अनगावकडील ओकांकडे आला होता. शिवण्याच्या भास्कर गणेश ओकांनी म्हणजे महादो हरीच्या पुतण्यांनी ओंकारांच्या अर्ध्या हिश्शाची वहिवाट कार्तिक–मार्गशीर्ष महिन्यात

मिळविली व पौष महिन्यात अनगावच्या हिश्शाची वहिवाट करणारे लक्ष्मणपंत बाळाजी यांचे चुलत–पुतणे नारो रामचंद्रना पत्र लिहून अनगावकरांच्या निम्या हिश्शाची वहिवाटही आपणाकडे सोपविणे सोईचे होईल असे भास्कर गणेश यांनी आपले चुलत पुतणे केसोपंतांबरोबर पत्र देऊन सुचविले (ले. २२६). अनगावकडील लक्ष्मण बाळाजी ओकांनी ओंकारांच्या पत्राप्रमाणे (ले. २२७) निम्म्या हिश्शाची वहिवाट सन १७६६ मधे सोडली. पण स्वतःच्या निम्मे हिश्शाची वहिवाट शिवणकरांच्या मागणीप्रमाणे त्यांच्याकडे सोपविली की नाही, हे समजले नाही. पण, यानंतर सुमारे ५०–५५ वर्षांनी शिवण्याचे बाजीपंत ओकांनी बामणोलीत भात पिकविण्याचे ठरविले त्यास मोरो चिंतामण ओंकार खोत मौजे बामणोली यांनी आपली संमती दिली (ले. २२८). माघ व।। ५ शके १७३८ ला बाजीपंत ओकांनी दावा केला की, बामणोली खोतीत ·।।· हिस्सा ओंकारांचा ·।· फक्त अनगावकरांचा व ·।· आपला म्हणजे शिवणकरांचा आहे. हा शिवणकरांचा दावा हाणून पाडण्यासाठी ओंकारांचा व अनगावकर ओक यांचा करार झाला होता (ले. २२९ ).

भास्कर गणेश शिवणकर यांनी बामणोलीच्या खोतीतील ओंकारांचे हिश्शाची वहिवाट मिळविली होती; तरी त्यावेळी शिवण्याच्या खोतीचा हिस्सा त्यांच्याकडे होता. भास्कर गणेश यांचे वडील गणेश हरी व चुलते केसो हरी, महादाजी हरी व विठ्ठल हरी या चौघा भावांत शिवण्याच्या खोतीची वाटणी झाली होती व त्याप्रमाणे ( वंशावळ ५.२) त्यांच्या मुलांपैकी भास्कर गणेश, गोविंद केसो व दामोदर महादाजी व बाजी बल्लाळ ही नावे खोत शिवने म्हणून सन १७७३ व सन १७८४ ला लागलेली आहेत. (पहाणी खर्डा जि. रत्नागिरी रुमाल क्र. अनुक्रमे ५९ व २६). या चार शिवणकर ओकांपैकी बाजी बल्लाळ यांनीच सन १७८३ मधे बाबूजी नाईक यांचे चिरंजीव चिंतामण नाईक ओक यांना पालशेत देवालयाबद्दल पत्र लिहिले होते (ले. १३). या बाजी बल्लाळांचे स्थान उपलब्ध वंशावळीत जोडता आले नाही; पण नाशिकच्या दाते उपाध्यायांच्या वहीत सौ. अंबा भ्र. बल्लाळ बाजी, आजेसासरे बल्लाळ, पुत्र रामचंद्र व कृष्ण, रा. पुणे सदाशिव असा एक लेख आहे बाजी हे नाव विठ्ठल हरीचे नातू धोंडो यांचे रूढ नाव असावे, म्हणजे वरील लेख त्यांचे सुनेचा असावा. शिवाय शिवण्याच्या खोतीची वाटणी ज्या चार जणांत झाली त्यांच्यापैकी तिघांच्या मुलांची नावे पहाणी खर्ड्याला स्पष्टपणे दिसतात. उरलेले चौथे नाव बाजी बल्लाळ हे विठ्ठल हरीच्या वंशातील असले पाहिजे असे ओघानेच येते व या बाजीपंत दादा ओकांनी बामणोलीच्या खोतीत हिस्सा सांगण्याचा विचार दाखविला म्हणून ओंकारांचा व अनगावकर ओकांचा करार झाला होता. (ले. २२९). त्याप्रमाणे बामणोलीचा हिस्सा शिवणकरांना मिळाला की नाही ते समजले नाही; पण शिवण्याच्या भास्कर गणेशांचे पणतू गोपाळ विठ्ठल यांनी तीर्थोपाध्यायांकडील आपल्या लेखात सहीपुढे खोत बामणोली असा हुद्दा लिहिलेला आहे व विशेष म्हणजे या सुमाराच्या व नंतरच्या शिवणकरांच्या पिढ्यांनी तीर्थोपाध्यायांकडे आपले गाव बामणोलीच सांगितले आहे.

**ओंकार शाखा :**

ओंकार हे नाव धारण करण्याच्या अगोदरपासून ओकांचा काशीत मालकीचा वाडा होता. बाबूजी नाईक ओंकारांच्या मातुश्रींनी सन १७४९ व १७५० चे सुमारास काशीहून बाबूजी नाईकांना पत्रे लिहिली होती (ले. २३० व २३१) त्यांत घरास दुरुस्ती करणेस सात हजार रुपये खर्च येईल असे सुचविले आहे. घर फार जीर्ण झाले आहे, एक भिंत पडली आहे इत्यादी मजकूर त्या पत्रातून आहे. वाडा ओकांनी विकत घेतला होता. कारण गणोबा नाईक यांनी महादो हरी शिवणकर यांना सन १७३५ चे सुमारास पत्र लिहिले ते काशीहून ओक या नावानी लिहिले आहे व आम्ही लवकरच पुण्यास येत आहोत असे त्या पत्रात आहे. तसे ते दक्षिणेत आले असले पाहिजेत. त्र्यंबकेश्वर व घृष्णेश्वर ( वेरुळ ) येथे त्याच वेळचे त्यांचे लेख आहेत. त्यांच्या पत्नी दुर्गाबाई यांच्या सन १७४९ च्या पत्रात त्या लिहितात की, " आलियास सात आठ साल भरली. तुमचे काही सुखसमाचार नाही; याजकरिता चिंता लागली आहे " ( ले. २३२ ). यावरून गणोबा नाईक व दुर्गाबाई सन १७४२ चे आसपास पुन्हा काशीस गेले असावेत. ओंकारांचे कारकून रामाजी महादेव ओक यांचे सन १८३८ चे एक पत्र आहे ( लेखांक २३३ ) त्यात त्यांनी आपले वयास ६५ वर्षे भरत आली असे लिहिले आहे. म्हणजे त्यांचा जन्म सन १७७३ च्या आसपासचा ठरतो व हे रामाजी महादेव आपल्या दुसऱ्या दोन पत्रांत ( लेखांक २३३, व २३४ ) लिहितात की गणोबा नाईकापासून तुम्हापर्यंत म्हणजे बाबासाहेब ( चिंतामण मोरेश्वर ) ओंकारांपर्यंत पाच पिढया पालन केले. यावरून रामाजी महादेवाच्या जन्मानंतर म्हणजे सन १७७३ नंतर गणोबा नाईक हयात होते. पण बाबूजी नाईकांची पत्रे त्यांच्या पत्नी दुर्गाबाईच काशीहून लिहीत होत्या. गणोबा नाईक बहुत अशक्त झाले आहेत असे दुर्गाबाई आपल्या सुनेस एका पत्रात लिहितात ( ले. २३१ ). दुर्गाबाईच्या पत्रावरून असे दिसते की, त्यांचे चिरंजीव बाबूजी नाईक आपल्या वडिलांची वास्तपुस्त घेत नसत. गणोबा नाईकांना पिलाजी जाधवाकडून ( यजमानाकडून ) दोनशे रुपये वर्षासन मिळत होते. ( लेखांक २३० व २३२ ). ते काशीस पाठवून देण्याविषयी दुर्गाबाईंनी बाबूजींकडे मागणी केली होती. गणोबा नाईकांना काशीत खर्च भागविण्यास अडचण पडत होती असेही दुर्गाबाईच्या पत्रावरून दिसते. गणोबा नाईकांनी आपल्या चिरंजीवांचे म्हणजे बाबूजी नाईकांचे नावच टाकले होते की काय हे कळत नाही, पण दुर्गाबाईंनी मात्र बाबूजींना पुत्रधर्म नाही इ. चिडून लिहिले होते.

ओंकारांकडील तीर्थोपाध्यायांकडील लेखात काशीचा पत्ता दुर्गाघाट असा दिला आहे. पण १९७४ मध्ये मी ( लेखक ) काशीस गेलो होतो तेव्हा ओंकारांचे उपाध्याय जे पटवर्धन ( पोतनीस विठ्ठल मंदिराजवळ, दुर्गाघाट ) याचेकडे चौकशी केली, त्यांचे सांगण्याप्रमाणे ओंकारांचा वाडा 'बिबिया हटी', दत्तु दीक्षित पानगावकर यांचे घराजवळ होता. वे. नारायणशास्त्री पाळंदे यांचेकडून हेच कळले. तो वाडा विकला गेला. पूर्वी हा

भाग दुर्गाघाटांत मोडत असावा.

गणोबा नाईकांना दोन मुलगे होते. त्यांपैकी धाकटे वैजनाथ हे काशीस आपल्या आईवडलांजवळ असत; व त्यांच्याच नावाने काशीतील वाडा विकत घेतला होता. त्यांच्या पत्नीचे नाव जानकी. घृष्णेश्वर ( वेरुळ ) येथील उपाध्याय राजारामभट पैठणकर यांचे वहीत लेख आहे तो असा : " बाबूजी नाईक, भाऊ परश्राम नाईक, पिते गणेश नाईक, अजे कृष्णाजी नाईक, पुत्र गंगाधर नाईक व चिंतामण नाईक उपनाम ओक, सु. वाराणसी दुर्गाघाट – भावजयी जानकीबाई भ्र. परश्राम नाईक व सून जयंतीबाई – ब्राह्मणोली. " वैजनाथ यांचेच पाळण्यातले नाव परश्राम असावे. बाबूजींचे नाव सदाशिव होते.

गणोबा नाईकांचे ज्येष्ठ पुत्र सदाशिव तथा बाबूजी नाईक हे थोरले बाजीराव पेशवे यांचे कारकीर्दीत प्रसिद्धीस आले. पेशव्यांचे सरदार पिलाजी जाधव यांच्या आश्रयाने ते जाधवांच्या गावी पुण्याजवळील वाघोलीस राहात होते. त्यांचे वडील गणोबा यांनी नाशिकचे उपाध्यायांकडे आपले गाव वाघोली दिले आहे. तेथे त्यांचे घर होते, दुकान होते व व्यापार होता व ते सावकारीही करीत. त्यांनी थेऊर येथे चिंतामणीजवळ राहून अनुष्ठान केले, व श्रीकृपेने त्यांचा व्यापार व सावकारी धंदा बराच वाढला व त्यामुळे मोठमोठ्या लोकांशी त्यांचे निकटचे संबंध येऊ लागले. पिलाजी जाधवराव हे आपल्या घरचा विश्वासू कारभारही त्यांस सांगू लागले. नागपूरकर भोसले इ० सरदार लोक व खुद्द पेशवे यांच्याकडे सावकारी संबंधात त्यांना बराच मान होता. सावकारी व व्यापारधंद्यात लोकांकडूनही कर्जाऊ पैसे घ्यावे लागतात, त्याप्रमाणे बाबूजी नाईकांनी ९००० रुपये एकोत्रा व्याजाने वासुदेव जोशी मुरुडकर यांचेकडून सन १७४३ मध्ये घेतल्याची एक नोंद आहे ( लेखांक २३४ ). बाबूजी नाईकांच्या पत्नीचे नाव वाराणसीबाई. ( ओंकार वही पृ. ३५ नाशिक उतारा नाव उमा ). बाबूजी नाईक जोशी बारामतीकर यांची ती बहीण होती. बाई फार साध्वी होती. काशीतील संन्यासी त्यांच्या पायापडत असत असे सांगतात. यांना दोन मुलगे. थोरले गंगाधर बाबा तथा गंगाराम व दुसरे चिंतामण; व आवडाबाई नावाची बहीण होती. ही सरदार रास्ते यांना दिली होती. ती मुलगी रघुनाथरावांची बायको व्हावी असे चिमाजी अप्पांचे मनात होते व रास्त्यांना ती न देता रघुनाथासाठी राखून ठेवावी अशी मातोश्री राधाबाईंची इच्छा असल्याचे पत्रही बाबूजी नाईकांना सन १७४० मध्ये लिहिले होते; व बाबूजी नाईकांचे मेव्हणे बारामतीकर यांचीही मदत त्या कामी घेतली होती. ( लेखांक २३५ ). ओंकारांची पेशव्यांशी ही सोयरिक झाली नाही. पण पुढे सन १७४५ मध्ये पेशवे घराण्यातील मुलगी ओंकारांची सून झाली. चिमाजी अप्पा पेशवे डिसेंबर १७४० मध्ये वारले त्यावेळी त्यांची मुलगी बयो एक महिन्याची होती. तिची आई सती गेली होती. तिचे चुलते थोरले बाजीराव तिच्यासाठी उत्तम स्थळ पाहात होते. त्यात पिलाजी काका जाधव यांचे जवळही ते त्याबद्दल बोलले होते. त्यांनी बाबूजी नाईक ओंकारांचे ज्येष्ठ पुत्राचे स्थळ सुचविले. त्याप्रमाणे बाजीराव पेशव्यानी बाबूजी नाईकांना विनंती केली होती. लग्नाचे

ळी बयाबाई ४।। वर्षांची होती. तिचे लग्न गंगाधर बाबूजी नाईक ओंकार यांचेशी १४ एप्रिल सन १७४५ रोजी झाले. लग्नासाठी शनवार वाड्याजवळ पेशव्यांचा वाडा होता तो जानवशासाठी ओंकारांना दिला होता व पुढे तोच ओंकारांना आंदण दिला. त्या वाड्यांत ओंकारांचे वंशज आजही राहात आहेत. बयाबाईचे सासरचे नाव पार्वतीबाई होते. यांचे संसार बेगमीस भाऊबीज म्हणून फुलंब्रीकडील ५००० रुपयांची नेमणूक पेशव्यांनी दिली. पानपतचे युद्धाचे आधी त्या काही अपत्य न होता स्वर्गवासी झाल्या. गंगाधर बाबूजींचा दुसरा विवाह श्रीमंत नानासाहेब पेशवे यांनी पांडुरंगराव भोगले देसाई यांचे मुलीशी करून दिला. तिचे नाव जयंतीबाई ठेविले. लग्नानंतर पंधरा सोळा दिवसांनीच गंगाधर बाबूजींना बऱ्हाणपुरास पेशव्यांनी पत्र पाठवून पानिपतचे लढाईवर बोलावून घेतले; पण तेथून ते परत आले नाहीत. जयंतीबाई त्यानंतर होत्या. नागपूरच्या भोसल्यांकडून गंगाधर बाबूजींना मजमूची मुतालिकी वार्षिक ५००० ची मिळाली होती ( ले. २३६ ). बाबूजी नाईकांची सावकारी व व्यापार चालू होता. ठिकठिकाणाहून ते प्रत्येक वर्षी कापड, धान्य, तूप वगैरे पुण्यास व वाघोलीस आणीत त्यास जकातमाफी, रात्रीच्या मुक्कामाचे पहारे, नदीपार करण्यास मदत इत्यादी मिळावी अशी पेशव्यांची वेळोवेळीची आज्ञापत्रे सन १७८० पासूनची आहेत. ( लेखांक २३७ ).

बाबूजी नाईकांचे कनिष्ठ पुत्र चिंतामण बाबूजी यांचा जन्म सन १७३६ चे सुमारास झाला. यांना पेशव्यांचे दिवाण खंडेराव नीळकंठ रास्ते यांची बहीण केली होती; तिचे नाव सगुणाबाई होते. चिंतामण बाबूजी आश्विन शु।। ७ शके १७१० मध्ये दि. ६-१०-१७८८ ला स्वर्गवासी झाले. त्यांच्या पत्नी सती गेल्या. योगायोग असा की त्याच दिवशी दुपारी त्यांचे वडील बाबूजी नाईक आपल्या वयाच्या ८२ व्या वर्षी निवर्तले व त्यांच्या पत्नीही सती गेल्या. चिंतामण बाबूजींनी रुपये ६०,००० ला आरूण गावची कमाविशी मिळविली व तेथे गोपालजीचे मंदिर बांधले. त्याच्या पूजा, नैवेद्य, नंदादीपाकरता जमीन नेमून दिली होती ( ले. २४३ ). तसेच सुरतेजवळील उरपाड महालाचीही कमाविसी त्यांनी मिळविली व मौजे दुधड येथील मोकासा अंमल जहागीर मिळविला ( ले. २४१ ). त्यांच्या मृत्यूचे वेळी त्यांना ( १ ) गणपतराव वय १६ व ( २ ) मोरेश्वर वय १२ ( ३ ) विनायक व ( ४ ) विश्वनाथ तथा भिकाजी असे चार मुलगे होते. वडिलांचे मृत्यूनंतर पाच-सहा वर्षांनी गणपतराव वारले व त्यांची पत्नी सेनापती हरीपंत तात्या फडके यांची मुलगी दुर्गाबाई ही पुढे ६ महिन्यांनी वारली. विश्वनाथ तथा भिकाजी हेही लग्न होऊन एक दोन वर्षांत मरण पावले. मोरेश्वर दादासाहेब हे परम गणपती भक्त होते. त्यांनी थेऊरास अनुष्ठाने केली. तेथे नदीकाठी गणेश योगी स्वामींची समाधी आहे. त्या स्वामींची पुण्यतीथ मोरेश्वर दादा करीत असत. त्यास मदत म्हणून गोपाल रामचंद्र पटवर्धन जमखिंडीकर प्रतिवर्षी पंधरा रुपये पाठवीत असत. पुढे सन १८३७-३८ साली मौजे ढवळपुरी ( पारनेर तालुका ) येथील १५ रु. आकाराची जमीन त्या खर्चाकरिता इनाम दिली ( ले. २४७ ). मोरेश्वरदादा बरेच वेळा

समाधी लावून बसत असत. घरचा कारभार विनायकपंत नाना करीत. दादासाहेब यांचा पहिला विवाह कृष्णंभट केळकरांच्या मुलीशी झाला. तिचे नाव उमाबाई तथा जिजीबाई. मोरेश्वर दादासाहेब सन १८४४ मध्ये राजूरच्या गुजर देव पद्मालयाला जाण्यास निघाले; पण औरंगाबादेस टकले यांच्या वाड्यात राहात असता तेथे आपला काळ जवळ आला आहे असे त्यांच्या ध्यानात आले तेव्हा त्यांनी वयाचे ८२–८३ व्या वर्षी संन्यासाश्रम स्वीकारला. त्यांना औरंगाबादेजवळ सातारे येथे समाधी द्यावी असे ठरून दुसरे दिवशी उजाडताच ते समाधिस्थ झाले ( आषाढ वद्य ३० शके १७८० म्हणजे ९–८–१८५८ ) नंतर त्यांची पालखी वाजत गाजत औरंगाबादेहून ५–६ कि. मी. अंतरावरील सातारे येथे गणपतीचे देवळानजीक आणली; तेथे त्यांना समाधी दिली. असेही सांगतात की त्या समाधीच्या पूजा नैवद्यास काही व्यवस्था आहे.

ओंकारांचे एक कारकून रामाजी महादेव ओक म्हणून त्यांच्या चुलत घराण्यापैकी होते. फुलंब्रीकडील सरदेशमुखांकडे ओंकारांना संसारबेगमीस पाच हजारांची नेमणूक होती. पेशव्यांनी ही नेमणूक चिमाजी अप्पांच्या मुलीचा विवाह गंगाधर बापूजी ओंकाराशी झाला त्यावेळी ओंकारांना भाऊबीज म्हणून निजामाकडून देवविली होती ( ले. २३८ ). त्याचे व्यवस्थेकरिता रामाजी महादेव औरंगाबादेस होते. फुलंब्री गाव औरंगाबादेच्या उत्तरेस सुमारे २६ कि. मी. अंतरावर आहे. तेथील उत्पन्नापैकी काही रकमेची अफरातफर झाल्यामुळे मोरो चिंतामण व विनायक चिंतामण ओंकार यांनी त्यांना सन १८२४ मध्ये कामावरून दूर केले ( लेखांक २३८ व २३९ ) पण त्याला अन्नवस्त्रास म्हणून काही नेमणूक दिली ( ले-२४० ). रामाजी महादेव याजकडून एक लक्ष पस्तीस हजारांचा हिशेब आला नाही असे स्वतः रामाजींनी आपल्या सन १८२३ च्या पत्रात मान्य केलेले दिसते. त्याच पत्रावरून ( लेखांक २४४ ) समजते की गैरव्यवस्थेबद्दल मोरो चिंतामण व त्यांचे पुतणे गंगाधर विनायक व बळवंत विनायक या चुलते-पुतण्यात असंतोष उत्पन्न झाला व म्हणून सन १८२३ मध्ये चुलते व पुतणे विभक्त झाले ( निरनिराळे वैश्वदेव केले म्हणजे जेवणे निराळी होऊ लागली ). सन १८३२ मध्ये या दोघा पुतण्यांनी इंग्रज गवरनरला पत्र लिहून फुलंब्री नेमणुकीतील आपला हिस्सा चुलते मोरो चिंतामण यांचेपासून अलग करून मागितला ( लेखांक २४१ ). व ती नेमणूक त्यांच्या वंशजांकडे अजून चालू आहे. रामाजी महादेव यांनी ओंकारांच्या कुटुंबीयांना वेळोवेळी पत्रे लिहून आपली मनःस्थिती कळविली आहे ( लेखांक २४४ ) ते ओंकारांचे काम दोन तीन पिढया तरी पाहात असावेत, व शीघ्रकोपी असावेत. या रामाजी महादेव यांचे आजोबा कृष्णाजी केशव यांना वार्षिक रुपये ४०० ची नेमणूक होती. ती सन १७६६ मध्ये माधवराव बल्लाळ पेशवे यांनी कमी करून २५० रुपये केली ( लेखांक २४८ ). रामाजी महादेव यांचे वडील महादेव कृष्ण हे थेऊरास बाबूजी नाईक गणपति अनुष्ठानाकरतां गेले त्यावेळी थेऊरास होते. व पुढेही तेथेच राहिले. त्र्यंबकेश्वरी ते थेऊराहून गेले होते. त्यांचे थेऊरास व पुण्यास हरिहरेश्वराचे बोळात अशी घरे होती. पेशवे दप्तरातील जमाव पुणे प्रांत रुमाल क्रमांक १७० मध्ये

शनवार पेठेतील घरांच्या सन १७९९ च्या खानेसुमारीत अप्पाबळवंत चौकापासून सरकारचे लक्कडखान्यापर्यंतच्या रस्त्यावर श्रीधर हरेश्वराचे देवालयाजवळच्या घराला ' नारो त्रिंबक सोमण हल्ली बहिवाट रामाजी आपा ओक करितात ' असे नाव आहे हेच ते घर असावे. व रामाजीपंतांच्या मृत्यूनंतर ती दोन्ही घरे विकावी असे रामाजी महादेवाच्या पत्नीनी–लक्ष्मीबाईंनी औरंगाबादेहून पुण्यास ओंकारांना लिहिले होते. तशी एक दोन पत्रे माधवराव ओंकार यांचे संग्रही आहेत. लक्ष्मीबाईंचे माहेर महाडला होते.

## प्रकरण एकोणिसावे

# अखेरचे पेशवे व ओक

भारत इतिहास सं. मंडळाच्या शके १८३५ च्या ( सन १९१३ च्या ) इतिवृत्तात पृ. ४२१ वर वि. का. राजवडे व पां न. पटवर्धन यांनी पुढील माहिती दिली आहे—

‘ दुसऱ्या बाजीरावाने भट घराण्यातील तीन मुलगे दत्तक घेतले—नानासाहेब, दादासाहेब व बाळासाहेब. त्यांतील मधले दादासाहेब मरण पावल्यावर त्यांची बायको रोहिणीबाईसाहेब यांनी वेणगावच्या भट घराण्यातील पांडुरंग यास दत्तक घेऊन नाव रावसाहेब ठेवीले. त्यांचे लग्न ओकांच्या घराण्यातील रमाबाईसाहेब नावाच्या मुलीशी झाले. नानासाहेब नेपाळात पळून गेले पण रावसाहेब ग्वाल्हेरीकडे गेले. त्यांना इंग्रजांनी पकडून श्रावण व।। १० शके १७८४ रोजी ब्रह्मावर्त येथे राजवाडे यांच्या घरासमोर फाशी दिले. त्यांचे कुटुंब रमाबाईसाहेब इंग्रजी हद्दीत होत्या. त्यांचाही भयंकर अंत झाला असे ऐकिवात आहे. कसा ते माहीत नाही.’

या रमाबाईसाहेब कोणत्या ओक घराण्यातील ह्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला पण माहिती मिळाली नाही.

काशीत गणपती देव पंचांगकर्ते धनधान्येश्वर, रतन फाटक, यांचेकडे भिकू ओक यांची मुलगी दिली आहे असे कळले. म्हणून त्यांची दि. २ डिसेंबर १९७४ ला काशीत त्यांचे घरी जाऊन गाठ घेतली. बाई सुमारे ६५ वर्षांच्या असाव्यात. त्यांना त्यांच्या चुलत्यांची, आजोबांची किंवा इतर भाऊबंदांपैकी कोणाचेही नाव माहीत नाही. पण पुढे त्यांनी सांगितले की त्यांचे आजोबा पंजोबा कोणीतरी नानासाहेब पेशव्यांकडे आश्रयास होते व त्यांच्याबरोबर ते नेपाळ इत्यादी ठिकाणी जाऊन काशीत येऊन राहिले व भिकू ओक यांचे सासुरवाड ब्रह्मावर्तचे मराठे यांचेकडे होते अशी माहिती त्यांनी दिली.

काशीत राममंदिर ब्रह्मघाट येथे श्री. नागेश्वर नारायण ओक राहातात. ते अविवाहित असून एकटेच राहातात. त्यांना त्यांचे आजोबा, पंजोबा यांची माहिती नाही. पितृत्रयीचा उच्चार करण्याचे प्रसंगी ते केशव, गोविंद अशी कोणती तरी नावे घेतात. त्यांची आजी

किंवा पणजी ब्रह्मावर्ताहून पळून येऊन काशीत राहिली. नागेश्वरांचे आजोळ दामोदर सोमण यांजकडे होते. नागेश्वरांचें एक बंधू वासुदेव कुर्डुवाडीस होते तेही अविवाहित आहेत. इतर तीन बंधू दत्तात्रय, हरिहर व बाळकृष्ण हे काशीत वारले. सर्वही अविवाहित होते.

ब्रह्मावर्तास फाशी गेलेल्या रावसाहेब पेशव्यांच्या पत्नी रमाबाईसाहेब या ओक घराण्यातील होत्या. त्यांच्या आश्रयाने त्यांची आई, बंधू इत्यादी कोणी राहात असावेत व रावसाहेबांना फाशी दिल्यावर ब्रह्मावर्ताहून पळून येऊन काशीत राहिलेला वंश रमाबाईसाहेब यांच्या माहेरचा असण्याचा संभव आहे.

रमाबाईसाहेब यांच्या माहेरच्या ओक घराण्यापैकी आणखी एका व्यक्तीचा ठाव-ठिकाणा मिळतो. ग्वाल्हेरचे सुभाधिकारी आत्माराम चिंतामण देवधर यांच्या पत्नी दुर्गाबाई या ओक घराण्यातील होत्या व ते ओक घराणे पेशव्यांचे नातलग घराणे होते. सन १८५७ नंतर दुर्गाबाई इंदुरास आश्रयास आल्या असे देवधर कुलवृत्तान्तात दिले आहे. सन १८५७ नंतर इंदूरसारख्या संस्थानात आश्रयास जावे लागले त्यावरून त्या दुर्गाबाई-सुद्धा रमाबाईसाहेब यांच्या माहेरच्या घराण्यापैकी असाव्यात. आत्माराम चिंतामण यांचें जन्मवर्ष कुलवृत्तान्तात दिले नाही. पण त्यांच्या नातवाचा जन्म सन १८९० चा दिला आहे. त्यावरून अदमास केल्यास आत्माराम चिंतामण यांचा जन्म सन १८४० चा असावा. त्यांचे लग्न सन १८५७ च्या उठावानंतर व सन १८६२ पूर्वी रमाबाईसाहेबांनी या आपल्या माहेरच्या ओकांच्या दुर्गाशी करून दिले असावे. रावसाहेब पेशव्यांना इंग्रजांनी पकडण्या पूर्वी ते ग्वाल्हेरीकडे पळून गेले होते असे श्री. पटवर्धन व श्री. राजवाडे यांनी प्रसिद्ध केलेल्या माहितीत आहे. सन १८६२ नंतर रमाबाईसाहेबांना परागंदा व्हावे लागले.

## प्रकरण विसावे

# आद्य महाविद्यालयाचे आद्य प्राचार्य ओक

भा. इ. सं. मंडळातील पांडोबा दप्तरातून श्री. य. न. केळकर यांनी श्रावणमासातील दक्षण मिळविणाऱ्या मंडळींची एक यादी उतरून घेतलेली मला त्यांनी दिली, त्यात ओक नावे पुढीलप्रमाणे आढळली :

' हिशेब श्रावणमास दक्षणा सालाबादप्रमाणे पोतातून दिल्ही ई।। आक्टोबर तागाईत फेब्रुवारी सन १८१९ पुणे मुक्कामी

............

रु. ४७५ व्यंकट राघवाचार्य ओक

रु. १२५ नृसिंहाचार्य ओक

तसेच गुरुजी गणेश त्र्यंबक बापट, एम्. ए. यांनी सन १९५० मधे ' विश्रामबाग वाड्याचा इतिहास ' म्हणून एक पुस्तक प्रसिद्ध केलेले मला माझे स्नेही श्री. शामराव निळकंठ ओक यांनी वाचावयास दिले; त्यात पुढीलप्रमाणे माहिती आहे :

मुंबई सरकारने ता. ६ अक्टोबर इ. स. १८२१ ला दसऱ्याच्या मुहूर्तावर विश्रामबाग राजवाड्यात संस्कृत कॉलेजची स्थापना केली. राघवाचार्य रामानुज ह्या पंडिताला कॉलेजचा पहिला प्रिन्सिपाल होण्याचा मान मिळाला. राघवाचार्य कॉलेजचे प्रिन्सिपाल असून न्यायशास्त्राचे प्रोफेसर म्हणून काम करीत असत. त्यांचा पगार दरमहा रु. १५० होता. प्रिन्सिपाल म्हणून दरमहा ९० रु. व न्यायशास्त्राचे प्रोफेसर म्हणून दरमहा ६० रु. असे एकूण १५० रु. मिळत. (पहा : लेखांक २६४)

कॉलेजचे प्रिन्सिपाल राघवाचार्य इ. स. १८३५ पूर्वी एकदा सात महिन्यांची रजा घेऊन " व्यंकोबास " गेले होते नंतर १८३५ त ता. ७ सप्टेंबर रोजी त्यांनी सरकारला कळविले की, काशीयात्रेस जाण्यासाठी आपणास रजा मिळावी व आपल्या जागी आपल्या चिरंजिवांची —नरसिंहाचार्यांची नेमणूक करावी. रजा मंजूर झाली परंतु सरकारने त्यांच्या चिरंजिवांची नेमणूक न करता अनंताचार्य यांची नेमणूक त्या

जागी केली. पुढे २३ नोव्हेंबर इ. स. १८३८ रोजी राघवाचार्य मृत्यू पावले. कै. राघवाचार्य यांनी कॉलेजचे पहिले प्रिन्सिपाल म्हणून १८ वर्षे काम केले. इ. स. १८३६ त राघवाचार्य काशीस गेले. त्या रजेच्या मुदतीत पहिल्या तीन महिन्यांत त्यांच्या पगारात ¼ कपात करावी व पुढे ते रजेवरून परत येईपर्यंत दरमहा ½ कपात करावी असे ठरले. यामुळे बचत झालेल्या रकमेपैकीं ¼ रक्कम राघवाचार्यांना द्यावी असे ठरले होते. इ. स. १८३५ मधे राघवाचार्य प्रथम रजेवर गेले त्या मुदतीत ॲक्टिंग प्रिन्सिपाल म्हणून त्यांचे चिरंजीव नरसिंहाचार्य यांची नेमणूक झाली होती.

पुण्याच्या विश्रामबाग वाड्यात स्थापन झालेल्या संस्कृत कॉलेजशी कोणत्याही कारणाने संबंध आलेल्या इतर काही सद्गृहस्थांची यादी याच गुरुजी बापट यांच्या पुस्तकात दिली आहे, त्यात संस्कृत कॉलेजचे पहिले प्रिन्सिपॉल म्हणून राघवाचार्य रामानुज यांचे नाव आहे व क्र. ३३ ला नरसिंहाचार्य ओक असे नाव आहे. नरसिंहाचार्य हे राघवाचार्यांचे पुत्र म्हणजे संस्कृत कॉलेजचे पहिले प्रिन्सिपॉल राघवाचार्य हे ओकच होते. हीच ओकांची दोन नावे सन १८१९ च्या श्रावणमास दक्षणा मिळविणारांच्या यादीत आढळतात. राघवाचार्य रामानुज ह्याचा अर्थ रामाचा धाकटा भाऊ रघुनाथ असा धरला तरी ओकांचे वंशावळीत तसे नाव सापडले नाही ही दुःखाची गोष्ट होय. व अशा प्रसिद्ध व विद्वान पुरुषाचा वारसा सांगणारे त्यांचे कोणी वंशजही आढळले नाहीत. किंवा नृसिंहाचार्य ओकांचेही कोणी मिळाले नाहीत.

फरेजरनी सन १९०२ मधे लिहिलेल्या डेक्कन कॉलेजबद्दलच्या पुस्तकात माहिती सापडते की नरसिंह शास्त्री ओक हे पूना कॉलेज सुरू झाले त्या वर्षी म्हणजे सन १८५१ मधे पूना कॉलेजमधे विद्यार्थी होते व पुढे ते धारवाडच्या हायस्कूलचे मुख्याध्यापक होते.

सन १८३६ च्या सुमारास नरसिंहाचार्य ओक म्हणून जे विद्वान गृहस्थ संस्कृत कॉलेजमधे (पाठशाळेत) प्राध्यापक होते व राघवाचार्यांच्या सात महिन्यांच्या रजेच्या मुदतीत ज्यांनी प्रिन्सिपॉल म्हणून काम केले होते तेच हे फरेझरच्या पुस्तकातील नरसिंहशास्त्री ओक असावेत. सन १८५१ मधे संस्कृत कॉलेजचे रूपांतर पूना कॉलेजमधे झाले त्यात विद्यार्थ्यांचे तीन गट होते. (१) संस्कृतचे विद्यार्थी (२) इंग्रजीचे विद्यार्थी व (३) नॉर्मल विद्यार्थी म्हणजे ट्रेनिंगकरिता आलेले शिक्षक. पुढे या तिसऱ्या गटांचे पर्यवसान ट्रेनिंग कॉलेजमधे झाले. (फरेझर). या तिसऱ्या गटात नरसिंहाचार्य सन १८५१ मधे असावेत. यांच्याप्रमाणेच कृष्णशास्त्री चिपूळणकरही सन १८५७ मधे पूना कॉलेजचे विद्यार्थी होते. सर एडविन अर्नोल्ड पूना कॉलेजचे प्रिन्सिपॉल म्हणून सन १८५७ मधे रुजू झाले तेव्हा त्यांच्या ४०० विद्यार्थ्यांत त्यांना केरूनाना छत्रे व कृष्णशास्त्री चिपळूणकर हे दोन अति हुशार ब्राह्मण विद्यार्थी आढळले. त्याआधी कृष्णशास्त्री हे संस्कृत कॉलेजचे विद्यार्थी होते व नंतर त्याच संस्थेत पंडित ( प्राध्यापक ) म्हणून काम करीत होते. त्यांनाही ट्रेनिंगचे विद्यार्थी म्हणून पूना कॉलेजमधे राहावे लागले व त्यानंतर ते पूना

कॉलिजमधे संस्कृत शाखेचे मुख्याध्यापक झाले. तर नरसिंहाचार्य ओक धारवाड हायस्कूलचे मुख्याध्यापक होते. संस्कृत कॉलिजमधे शिकविणाऱ्या पंडितांना सन १८५१ नंतरच्या शिक्षणक्रमासाठी थोडा काळ शिक्षण घ्यावे लागत असावे.

## प्रकरण एकविसावे

# ओकांची देवालये

ओक मंडळींनी ज्या गावी प्रथम वस्ती केली तेथे त्यांनी आरभांलाच देवालय बांधले असे आढळून येते.

ओकांना पालशेत गाव इनाम मिळाला, पण काही कालाने कोकणात मुसलमानी अंमल झाला, त्यावेळी ओक गाव सोडून गोकर्ण महाबळेश्वरकडे गेले. तेथून परत पालशे-तला आले व तेथील ब्रह्मवणे भागात राहिले या ब्रह्मवणे भागात वड आहे त्याला ओक मानाचा वड मानतात. याच भागात ओकांनी देऊळ बांधलेले आहे. देऊळ ६ हात लांब रुंद आहे. दगडी भिंती असून वर गिलावा आहे. छप्परही असेच बांधकामाचे असून चारी भिंतींकडे उतरते असून मध्यावर टोकदार झाले आहे. देवळात केशवाची मूर्ती काळ्या दगडाची सुमारे १ मीटर उंचीची आहे. मूर्तीच्या उजव्या खालच्या हातात पद्म, वरच्या हातात शंख व डाव्या खालच्या हातात गदा व वरच्या हातात चक्र आहे. मूर्तीच्या पायाचे बाजूला त्याच दगडात कोरलेल्या मूर्तीच्या गुडघ्याइतक्या उंचीच्या उजव्या हाताचे खालच्या बाजूस मारुती व डाव्या बाजूला लक्ष्मी कोरलेली आहे. केशवाच्या मूर्तीचे डोक्यावर पंढरपूरच्या विठोबाच्या मूर्तीसारखा उभट टोपीसारखा मुगुट कोरलेला आहे. पालशेतचे ओक महाजन या देवाचा उत्सव रामनवमीला करतात. मूर्ती उभी आहे, त्या शिलापाटाच्या समोरच्या कडेवर दोन ओळींत पुढील मजकूर आहे. ‘ स्वस्ती श्री शके १५६६ तारणनाम संवत्सरे फाल्गुन शुक्ल सप्तमी, शनि रोहिण्या श्री केशवस्य प्रतिष्ठा विद्वत महाजन नुकुल भानाजी नागनाथ प्रभुणा श्रीकृष्णा प्रणवस्तु. ’ प्रतिष्ठा पन्नाचा दिवस २२ फेब्रुवारी सन १६४५ येतो व त्या दिवशीचे नक्षत्रवार जमतात. मूर्तीचे छायाचित्र यासोबत छापले आहे.

पालशेतला आलेले कुटुंब ओक गावाहून आले याचा उहापोह प्रकरण तीनमधे केला आहे. त्या गावी ग्रूप कॅप्टन ( निवृत्त ) दा. मा. ओक मुद्दाम जाऊन आले व तेथील पोस्टाचे शिक्के मिळविले त्याची पक्व प्रतिकृती :




हा गाव सध्याच्या आंध्र प्रदेशात कुर्नुल जिल्हयात आहे. त्या गावी चेन्ना केशवचे प्राचीन देवालय आहे व म्हणून कदाचित त्या गावाहून आलेल्या कुटुंबांनी आपल्या स्थायिक व्हावयाच्या नवीन गावीही केशवाच्या मूर्तींचीच स्थापना केली असावी. चेन्नाचा अर्थ सुंदर किंवा गोड असा आहे.

मूर्ती पंढरपूरच्या बिठोबाच्या मूर्तींसारख्याच काळ्या पाषाणाची असून डोक्यावरील मुकुटही बिठोबाच्या मूर्तींसारखाच आहे. विठोबाची मूर्ती भानुदासाने अनागोंदीहून आणली असे सांगतात. अशाच टोपीवजा उभट मुकुट असलेल्या मूर्ती तिरुपती, महाबलीपुरम्, विजयनगरचा विठ्ठल स्वामी, व अहोबलम् येथे आहेत. पंढरपूरची हल्लीची विठोबाची मूर्ती मध्ययुगीन अगर प्राचीन नसावी. मूळ मूर्तीला मुसलमानांकडून धोका पोचल्यावर ही बसविली असावी व ही विजयनगरच्या कृष्ण देवरायाने विजयनगरास नेलेल्या व तेथील विठ्ठलस्वामीच्या देवळातील मूर्तींसारखी करून भानुदासास दिली असली पाहिजे. पालशेत येथील देवळातील मूर्तींही मुसलमानांनी नष्ट केल्यावर ही दुसरी तशीच बनवून बसविली असावी व मूर्तींच्या शिल्पावरून ती दक्षिणेतील शिल्पाकृती असावी. ओक विजयनगरहून आले म्हणून त्यांनी बसविलेल्या मूर्तींची धाटणी दाक्षिणात्य असावी.

हेदवी येथे ओकांनी बांधलेले उमा महेश्वराचे देऊळ समुद्रकिनारी आहे. अहिल्याबाई होळकरीण हिच्या आश्रयास असलेल्या ओकांनी हेदवीस येऊन हे देऊळ बांधले. अहिल्याबाईनी असे देऊळ बांधण्याकरिता मोहरांनी भरलेला हंडा त्यांना दिला होता असे सांगतात. तो रिकामा हंडा हेदवीस श्री. गजानन शंकर ओक यांचेकडे आहे. देऊळ बांधण्याचा काळ सन १६७०–१७८० या सुमाराचा येईल. ( पहा प्रकरण १७ वे ).

मळणला ओकांचे हरेश्वराचे देवालय आहे. गर्भगृहाचे बाहेरील कोनाड्यात एक शिलालेख आहे. त्यापुढे देवाची मूर्ती असल्यामुळे सोवळे नेसून मूर्ती बाजूला करून तो वाचावा लागतो. मळणचे श्री. का. के. ओक यांनी तो शिलालेख पुढीलप्रमाणे असल्याचे सांगितले. श्री गणेशायनमः शके १६७१ सुवासीनाम्न संवत्सरे सप्तमी तिथौ रोहिणी दिवसनक्षत्रे कन्या स्थिते देवगुरौ प्रतियोगे एवं तिथौ मूळ नक्षत्रे ओक नाम महादेव दाजीसुत

अप्पाजी श्री हरेश्वर पुनः प्रतिष्ठा मळण ग्रामे कार्तिक शुद्ध दशमी। अप्पाजी महादेव ओक यांनी सन १७४९ मधे हरेश्वराची पुन्हा स्थापना केली. अप्पाजी महादेव (आनंदीबाई पेशव्यांचे चुलते) यांचे आजोबा वेळंबहून प्रथम मळणास राहावयास आले, तेव्हा त्यांनी हरेश्वराची स्थापना प्रथम केली असावी व अप्पाजी महादेवांवर त्यांची पुनः स्थापना करण्याचा प्रसंग आला असे दिसते.

मळणशेजारी एक टेकडी आहे तिला भानोबाचा डोंगर म्हणतात. या डोंगरावर पौषातल्या कोणत्या तरी शुक्रवारी सर्व मळणकर आपापली शिदोरी घेऊन भोजनास जातात. भानोबा हे डोंगराचे नांव व पालशेतच्या केशवाच्या मूर्तीखालील लेखात उल्लेखिलेला भानाजी नागनाथ यांच्या परस्परसंबंध असावा असे वाटते. भानाजी हे एखाद्या साधुसंताचे नाव असावे.

कोळथऱ्याच्या ओकांपैकी एक शाखा खरवईहून बदलापूरला स्थायिक झाली. तेथे त्र्यंबकेश्वराचे देवालय सन १८०९ मधे कल्याणचे गोखले यांनी बांधले (लेखाक २५०). कल्याणच्या गोखल्यांनी हे बदलापुरास का बांधले हे कळत नाही. गोखले व बदलापुरास स्थायिक झालेले ओक यांचा काही आप्तसंबंध असावा व ओकांचे बदलापूरला आगमन झाल्यानंतर सुमारे १० वर्षांनी ओकांचे वतीने हे देऊळ बांधले असावे. कारण ओकांच्या इतर घरोटीच्या वाटणीत या त्रिंबकेश्वराचा उल्लेख पुढीलप्रमाणे ओकांचे कागदपत्रात आढळतो; 'सखाराम गोविंद व नारायण गोविंद मिळून हिस्सेदार, १ व महादाजी भिकाजी हिस्सेदार १ विभक्तपणाची यादी चैत्रशुद्ध १ शके १७८५ रोजी आम घरोटीचे मिळकतीची वाटणी' या शीर्षकाखाली यादीत बाब ११ वी; "बदलापूर येथे श्री त्रिंबकेश्वराचे देवालय आहे त्याचा उछाव करणे व मोडतोड वगैरे करणे ती उभयतांनी करावी. परंतु उभयता निमेनिम करण्यास कबल नाही याजकरिता महादाजी भिकाजी यांनी श्रीचा उछाव वगैरे करावा व श्रीचे देवाचे पाठीमागे पश्चिम बाजूस देवळाची वहिवाटीची जागा आहे तिची वहिवाट महादाजी यांनी करावी. सखाराम गोविंद यांनी जागा घेऊ नये." ज्या वाटणीपत्रात वरील परिच्छेद आहे ते वाटणीपत्र स्टॅम्प कागदावर लिहिलेले असून दि. ५ मे सन १८६५ वैशाख शुद्ध १० शुक्रवार शके १७८७ हा दिवस घातला असून ६ मे ला रजिस्टर झाला. त्यापूर्वी बाळाजी केशव व गोविंद भिकाजी यांच्या वाटण्या होण्याच्या काळात (सन १८३९) शके १७६१ च्या अधिक ज्येष्ठात त्र्यंबकेश्वरच्या उत्सवाचा खर्च रु. ४१।.॥ गोविंद भिकाजी यांचे नावे म्हणजे सन १८६३ च्या वाटणीपत्रातील पहिल्या हिस्सेदाराचे वडिलांचे नावे मांडला होता.

कोळथऱ्यापैकी दुसरी एक शाखा पुण्यास स्थायिक झाली त्यांनी शनवारपेठेत सन १७९० मधे घर केले व राममंदिर बांधले त्याबद्दल सविस्तर माहिती प्रकरण १४ कोळथरे वंश पुणे शाखा यात आली आहे. ते हल्ली आगाशे राममंदिर म्हणून ओळखले जाते.

कोळथऱ्याहून अनगावास गेलेल्या ओकांचेही वीरेश्वर म्हणून देवस्थान अनगावास असावे. त्याच्या श्रावणमासातील अभिषेकाकरिता पेशव्यांकडून सन १८१६ मधे अभिषेक

करणारे केशव जोशी कोळथरेकर यास व दैनंदिन नैवेद्य व नंदादीप याजकरिता वार्षिक नेमणूक केशव पांडुरंग ओक यांचे नावे होती ( ले. २५१ ).

कोतळूकला शंकराचे लहान दगडी देऊळ आहे. ते कोतळूकचे धोंडो बाबजी ओक यांनी बांधले असे म्हणतात. हा काळ सुमारे सन १७५० चा असावा.

वेळंबला देशमुखांचे देऊळ म्हणून ओळखले जाणारे श्री वेतेश्वराचे देऊळ आहे. देशमुखीचा हिस्सा कोणी जरी विकत घेतला तरी त्याबरोबर या देवळाच्या मालकीत सुद्धा विकत घेणाराला मालकी हक्क प्राप्त होतो असे वेळंबचे श्री. पु. वि. देवधर सांगतात. देवालयासमोर देवधरांनी बांधलेली एक व ओकांनी बांधलेली एक अशा दोन दीपमाळा नंतरच्या काळातील आहेत.

कुलाबा जिल्हयातील मेढयाजवळील अवचितगडची मामलत ओकांकडे काही काल होती ( प्रकरण ९ वे ) ती मंडळी मेढयास राहण्यास आली तेव्हा त्यानी तेथे वाळकेश्वराचे मंदिर व पाण्याचा तलाव बांधला असे त्यांचे वंशज श्री. विष्णु गणेश, रा. खेतवाडी, मुंबई हे कळवितात.

## प्रकरण बाविसावे

# बदलापूरचें ओक

कोळथरे गाव सोडून खरवईस आलेले राघो बल्लाळ यांचा जन्म शके १६०६ (म्ह. स. १६८३-८४) चा असावा. कारण त्यांचा पुतण्या राम केसो (वं. क्र. ३.५/अ) याचा त्र्यंबकेश्वरी लेख शके १६४० चा (स. १७१८) आहे. त्यावेळी तो १६ वर्षांचा आहे असे धरले तर त्याचा जन्म सन १७०२ येतो व त्याच्या वडिलांचा केसो बल्लाळांचा जन्म निदान सन १६८५ असला पाहिजे. राघो बल्लाळ हे केसो बल्लाळांचे थोरले बंधू कल्पून त्यांचा जन्म स. १६८२-८३ येईल. धाकटे बंधू असले तर जन्म वर्ष सन १६८६-८७ येईल. त्यांचा शके १६६४ (सन १७४२) मध्ये त्र्यंबकेश्वरी लेख आहे (ले. १४५), त्यावेळी त्यांचे तीनही मुलगे त्यांचे बरोबर होते. यावरून राघो बल्लाळांचे आयुर्मान ६० वर्षांचे आसपास असावे.

राघो बल्लाळांचे थोरले चिरंजीव दामोदरभट हे खरवईहून भडगाव (खानदेश) येथे राहावयास गेले. शके १६९९ (स. १७७७) चा त्यांच्या पत्नीचा लेख वेरूळचे तीर्थोपाध्याय गोविंद बाबुराव विठरखेडे यांचे वही क्र. ११।४५ मध्ये राधाबाई भ्र. दामोदरभट पुत्र बाळंभट व श्रीकृष्णभट-पद्मालय सु. भडगाव असा आहे. पद्मालय हे भडगावचे बाजूस गणपतीचे देवस्थान आहे. त्याच सुमारास पालशेतचे सिद्रस ओक (प्रकरण ५) हे भडगावकडे होते. शके १६६६ पूर्वी (स. १७४४) पालशेतचे कानिटकरही भडगावला होते. भडगावला गेलेल्या दामोदरभट कोळथरेकर ओक यांच्या दोन पिढयांनंतरच्या वंशाचा मागमूस तीर्थोपाध्यायांकडील वह्यातही आढला नाही. राघो बल्लाळांचे दुसरे एक पुत्र अंताजी हे साष्टीस म्हणजे ठाण्याकडे गेले, त्यांचा वंश अनगाव (ता. भिवंडी, जि. ठाणे) येथे आहे व दुसरी शाखा त्र्यंबकेश्वरी वाढली (प्रकरण १४).

राघो बल्लाळांचे तिसरे पुत्र कृष्णाजी रघुनाथ हे बदलापूरच्या ओकांचे आद्य पुरुष. यांचा लेख त्र्यंबकेश्वरला शके १६५२ (सन १७३०) चा आहे. त्यावेळी त्यांचे

वय १६ वर्षांचे धरले तर त्यांचा जन्म सन १७१४ येईल. त्यावेळी ते कोळथऱ्याहून त्र्यंबकेश्वरला गेले होते. त्यानंतर त्यांचे नातू बाळाजी केशव व भिकाजी केशव यांचे बरोबर अनुक्रमे शके १७३५ ( सन १८१४ ) व शके १७४७ ( सन १८२६ ) मधे त्र्यंबकेश्वरला गेले होते. लेखात स्वतःची माहिती, अजोबांचे व इतर नातलगांची माहिती देतात. पण या दोन नातवांच्या लेखात सा. न. वि. वि. असे लिहिल्यानंतर ' आमचे आजे व बंधू....आम्ही यात्रा करून ' असा मजकूर आहे. म्हणजे यात्रेत त्यांचे अजोबा बरोबर होते. यावरून राघो बल्लाळ यांचे आयुर्मान ११२ वर्षांपेक्षा जास्त होते असे दिसते. यांच्या पत्नीचे नाव रखमाबाई असे त्यांचे चिरंजीव त्र्यंबक कृष्ण यांचे शके १७७६ ( सन १८५५ ) च्या त्र्यंबकेश्वरच्या लेखावरून कळते. केसो कृष्ण व त्र्यंबक कृष्ण हे कृष्णाजी रघुनाथांचे दोन मुलगे. पैकी त्र्यंबक कृष्णना मुलगा नव्हता. बदलापुरकर ओक हा केसो कृष्ण यांचाच विस्तार आहे. केसो कृष्ण यांचा लेख त्रिंबकेश्वरी शके १६८८ ( सन १७६६–६७ ) मधील आहे. त्यानंतर त्यांचे नातू विश्वनाथ बल्लाळ यांनी त्रिंबकेश्वरास नारायण नागबली हा विधी पुत्रप्राप्तीकरिता केला तेव्हा त्यांच्याबरोबर शके १७७७ ( सन १८५५ ) च्या दिवाळीपूर्वी एकदा व काशिनाथ बल्लाळ यांनी आपल्या मुलांच्या मुंजी शके १७८२ मधे त्रिंबकेश्वरी केल्या त्यावेळीही त्यांचेबरोबर केसो कृष्ण होते ( ले. १४५ ) होते. यावरून केसो कृष्ण हे शतायुषी होते असे अनुमान निघते. केसो कृष्णना गोदूबाई नावाची एक बहीण असावी व विधवा होऊन ती माहेरी राहत असावी. शके १७४७ मधे त्या गंगाप्रदक्षणेस गेल्या त्यावेळी त्यांना दोन पुतळ्या दिल्या होत्या त्याचा रु. ३४ खर्च पडला आहे. शके १७६१ अधिक महिना होता त्याप्रीत्यर्थ वाणासाठी खर्च आहे त्यापैकी एक वाण गोदूताईचे असा गोदूचा उल्लेख ताई म्हणून बाळाजी केशव यांच्या जमाखर्चात केला आहे. यावरून ती बाळाजी केशवची बहीण असावी. शके १७६८ च्या खर्चात गोदूबाईच्या उत्तरकार्यास रु. ८०॥≡। व वर्षश्राद्धासाठी १२।≡॥ खर्च केला आहे; तेथे गोदूबाईचा उल्लेख अनुक्रमे ती॥ गंगाभागिर्थी व ती॥ मातोश्री असा केला आहे. ज्यष्ठ बहिणीस मातोश्री संबोधण्याचा परिपाठ होता. म्हणून गोदूबाई ही बाळाजी केशवची थोरली बहीण व केसो कृष्णची मुलगी असावी.

गोपाळ केशव हे आपल्या त्रिंबकेश्वरच्या लेखांत आईचे नाव भागिरथी लिहितात. ( ले. १४५ ) भागिरथीबाईचे माहेर दाबक्यांकडे ( ले. १४२ ). या भागिरथीबाईंच उल्लेख त्यांचे कनिष्ठ पुत्र बाळाजी केशव यांच्या जमाखर्चात आढळतो. शके १७४५ मधे त्यांना तोडे व तोरडया केल्याबद्दल रुपे खर्च पडले आहे व शके १७६६–६७ मधे त्यांना रु. १० तसलमात म्हणजे खर्चण्यास दिले होते असे उल्लेख आहेत ( ले. २५२ ).

गोपाळ केशव यांच्या त्रिंबकेश्वरच्या शके १७२३ च्या लेखावरून त्या चार बंधूंचा ज्येष्ठतेप्रमाणे ( १ ) जनार्दन ( २ ) गोपाळ ( ३ ) भिकाजी ( ४ ) बाळाजी असा क्रम लागतो. हे चौघेही भाऊ त्र्यंबकेश्वरला गेले होते त्यावेळी त्यांनी आपली वस्ती बदलापूर असे लिहिले आहे. चौघेही एकत्रात राहत होते.

जनार्दन केशव हे सन १८०१ मधे त्र्यंबकेश्वरला गेले होते. त्यांना मुलगा नव्हता व पत्नीचे नावही मिळाले नाही. त्र्यं. लेखांत त्यांना जनार्दनभट म्हटले आहे. गोपाळकेशव यांना त्यांच्या आजोळकडून खरवईस काही जमीन मिळाली होती व काही त्यांनी सन १८०६ मधे पेशव्यांकडे विनंतीकरून मिळविली व लावणीयोग्य केली ( लेखांक अनुक्रमे १४६ व १३१ ). यांना दुर्गा नावाची एक मुलगी फक्त होती. ती गणेशबाबा चाफेकरांना दिली होती. हिचे सासरचे नाव रखमा. ही बदलापूरचे कै. नानासाहेब ( नारायण गोविंद ) चापेकरांची आजी. ( जीवन–कथा ले. नानासाहेब चापेकर पृ. ३ ). या चार भावांपैकी पहिल्या दोघांना मुलगे नव्हते. तिसरे भिकाजी केशव यांना गोविंद, केशव व महादेव तथा दाजी असे तीन मुलगे होते असे त्यांच्या त्रिंबकेश्वरच्या शके १७४७ च्या लेखावरून दिसते. यांपैकी केशव याचे व्यवहारात कोंडो असे नाव असावे या कोंडोबांचे लग्न वदप ( कर्जतचे पूर्वेस ४ मैल )चे मोरोपंत मेहेंदळे यांचे मुलीशी शके १७५८ च्या ज्येष्ठ मासी झाले. त्यावेळच्या लुगडयांचा व नंतरच्या सणवार प्रसंगी आलेल्या आहेरांचा उल्लेख ( ले. २५२ ) बाळाजी केशव याच्या शके १७५८–५९ च्या जमाखर्चात आढळतो. शके १७६१ मधे लग्नाकरिता वदपाहून भाजी बदलापुरास आणली होती. या कोंडोबांना कोंडूअप्पा म्हणत असत.

शके १७५८ नंतर कोंडू अप्पा फार दिवस जगले नाहीत असे दिसते. कारण शके १७५९ पासून उरलेले दोघे बंधू गोविंद भिकाजी व महादेव भिकाजी आणि त्यांचे चुलते बाळाजी केशव यांच्यामधे वितुष्ट येऊन त्याचे पर्यवसान शके १७६१ मधे चुलते-पुतणे विभक्त होण्यात झाले. त्यात कोंडूअप्पांचा उल्लेख नाही. महादेव भिकाजी यांना दाजी म्हणत असत. त्यांचे लग्न शके १७५० मधे झाले. त्यावेळी त्यांचे वडील भिकाजी केशव हयात नसावेत. कारण बाळाजी केशव यांच्या जमाखर्चात "शके १७५० ज्येष्ठ शु।। ४ः ६ चांदी वजन ६ तोळे चिरंजीव दाजीचे लग्नात तोडे करावयास घेतली" असा उल्लेख आहे. भिकाजी केशव शके १७४७ च्या फाल्गुनात त्रिंबकेश्वरास गेले होते. त्यांच्या पत्नीचे नाव रमा होते असे गोविंद भिकाजी यांच्या शके १७७३ च्या त्रिंबकेश्वरच्या लेखावरून कळते. त्या महादेव भिकाजींच्या लग्नाच्यावेळी हयात होत्या. महादेव भिकाजी यांच्या पत्नीचे नाव उमा होते ( पहा त्रिंबकेश्वर लेख ( ले. २४५; ) पुरुषोत्तम महादेव यांचा शके १८०६ चा ). शके १७५५–५६ मधे सौ. उमाचे तोरडयास घागऱ्या ३० लाविल्या असा खर्च पडला आहे. शके १७५९ मधे विभक्त होण्याचे वेध लागले होते म्हणून त्या वर्षीच्या बाळाजी केशवच्या जमाखर्चात सौ. उमा, गोविंद भिकाजी व त्यांचा मुलगा सखाराम यांच्या दागिन्यांचा खर्च स्वतंत्र गटाने दाखविलेला आढळतो ( ले. २५२ ). शके १७५६–५७ मधे सखारामास तोडे केले तो खर्च बाळाजी केशव यांच्या सुनांसाठी केलेल्या खर्चाबरोबरच लिहिलेला आढळतो. महादेव भिकाजी शके १७८२ मधे पुतणे नारायण गोविंद बरोबर त्रिंबकेश्वरास गेले होते.

बाळाजी केशव म्हणजे प्रस्तुत लेखकाचे पंजोबा हे बदलापुरकर ओकांच्या एकत्र

कुटुंबाचे प्रमुख होते. शके १७६१ मधे त्यांचे पुतणे गोविंद भिकाजी व महादेव भिकाजी हे त्यांचेपासून विभक्त झाले. बाळाजी केशव यांच्या शके १७५६ ते शके १७७३ पर्यंतचे जमाखर्चाचे काही कागद उपलब्ध झाले. त्यात त्यांचे पुतण्यास व पुतण्यांच्या मुलास दागिने केल्याचा खर्च आहे. आमचे पंजोबा बाळाजी केशव यांचेपासून सावकारी निमित्त कल्याणाशी संबंध चालू होता. शके १७५७ मधे कल्याणास त्यांचा ।-। खर्च पडला आहे. कोर्टकचेरीचे बाबतीत रामचंद्र महादेव ओक वकील वस्ती कल्याण हे नेहेमीचे कल्याणातील आमचे वकील होते. याशिवाय नारायण जनार्दन पटवर्धन वकील व गांगल वकील यांचेकडेही अधूनमधून काम दिलेले आढळते. बदलापूरहून कल्याणास आमचे पंजोबा घोडीवरून शके १७६१ च्या जेष्ठ व।। ६ ला गेल्याचे खर्चावरून दिसते. त्यानंतर व।। ६ स कोडतातील कामाचा बराच खर्च पडला आहे. बरोबर आपले चिरंजीव विश्वनाथ यास घेऊन गेले होते. त्यावेळी विसूचे वय २१ वर्षांचे होते. कारण विसूचा जन्म शके १७४४।४५ पूर्वीचा म्ह. शके १७३९।४० चा असावा असे, त्याला शके १७४५ च्या फाल्गुनात घागऱ्या व शके १७४९ मधे तोडे केले यावरून वाटते. विश्वनाथ म्हणजे आमचे चुलत आजोबा यांचेवर आमचे पंजोबांनी देण्याघेण्याचे व्यवहारही सोपविण्यास सुरवात केली होती. शके १७५९ मधे सावकारीत गहाण म्हणून घेतलेली तारणे गोविंद भिकाजीनी विसूचे हवाली केली होती व पंजोबा शके १७६१ मधे कल्याणास गेले होते त्यावेळी काही रोख रक्कम आमचे चुलत आजोबांचे म्हणजे विसूचे करवी सखाराम गंगाधर पिंपळखरे यांजकडे दिली. होती. सखाराम गंगाधर पिंपळखरे हे आमच्या पंजोबाचे वेळी कल्याणामधील सर्व व्यवहार पाहात असत. त्यांचेकडे सावकारीचा वसूल जमा होत असे. शके १७६१ च्या अधिक ज्येष्ठात आमच्या पंजोबांनी आपली वस्तवाणी या पिंपळखरे यांच्या घरी ठेविली होती अशी जमाखर्चात नोंद आहे. ( ले. २५४ ). पंजोबानी पंधरा रुपये ब्राह्मणांना दान करण्याकरिता कल्याणास पाठविले होते. ब्राह्मणांची नावे कळविली होती, त्यात एक नाव पांडुरंग भट ओक हे अनवधानाने घातले गेले होते. ती चूक दुरूस्त करावी म्हणून बाळाजीपंत काकांना अपत्येसमान गंगाधर बल्लाळ पिंपळखरे मु।। कल्याण ( लेखांक २५३ ) यांनी दुसरे चांगले भिक्षुक सुचविले. यावरून गंगाधर बल्लाळ व सखाराम गंगाधर पिंपळखरे अशा दोन पिढ्यांकडे आमच्या पंजोबाचे वेळेपासून कल्याणातील सावकारीचा व इतर पैशाच्या देवघेवीचा व्यवहार सुपूर्त केलेला असे. पंजोबांजवळून त्यांचे पुतणे विभक्त झाले त्यावेळी अवश्य तेव्हा सखाराम गंगाधर पिंपळखरे व रामचंद्र महादेव ओक वकील यांनी तिन्हाईत या नात्याने काही तंटे मिटविण्यास सहाय्य केल्याचे आढळते. सावकारीत ओकांकडे काही दागदागिने तारण ठेवलेले होते ते मोडण्याचे काम माघ शु।। १० शके १७६० ते फाल्गुन शु।। ५ शके १७६१ पर्यंत चालू होते. बदलापूरचे राहाते घर दक्षिणोत्तर १० खण व पूर्व-पश्चिम अंदाजे ३० ते ३५ फूट होते. त्यापैकी उत्तरेकडील अर्धा भाग आमचे पंजोबांकडे आला. माडीवर जाण्याच्या जिन्याचे काही अडचणींमुळे माजघरातील दुसऱ्या वाट्यातील

एक खण जागा पंजोबांच्या वाट्यास घालावी लागली. इतर तीन बाजूंना मोकळी जागा होती. घराच्या पूर्वेकडील जागा उत्तर व दक्षिण अशा सम पट्ट्यात विभागून घराच्या उत्तर व दक्षिण भागास जोडण्यात आली. घराचे उत्तर अंगाची जागा गोविंद व महादेव या दोन बंधूंकडे व पश्चिमेची जागा आमचे पंजोबांकडे राहिली. विहीर समाईक ठेविली. विहीर सर्वस्वी आमचे पंजोबांचे हद्दीत आली. त्या विहिरीवर दुसऱ्या हिस्सेदारांना जाण्यास वाट मिळावी म्हणून विहिरीच्या पूर्व कडेजवळील थोडी जागा पंजोबांच्या जागेतून त्यांना दिली. विहिरीपलीकडे ओढयाच्या कडेला संडास होते; त्यास जाण्यास उभयतांना वाव मिळावा म्हणून तेथेही हद्दीत थोडी मुरड घालावी लागली. समाईकापैकी पंजोबांच्या वाट्यास आलेल्या घराच्या पश्चिमेकडील मोकळया जागेच्या पलीकडे पश्चिमेस श्री. आचवल यांची जागा पंजोबांनी विकत घेऊन आपली हद्द जोशी यांचे घरापर्यंत वाढविली. गोविंद भिकाजी व महादेव भिकाजी यांनीही आपल्या वाटणीस आलेल्या जागेचे दक्षिणेस असलेले शिधोरे यांचे घर विकत घेऊन हद्द ओहोळापर्यंत वाढविली व त्याच्या ईशान्य बाजूचे कुंभाराचे घर विकत घेतले. शेतजमिनीच्याही वाटण्या झाल्या. वाटण्या झाल्यावर काही थोडे वादग्रस्त मुद्दे राहिले होते ( ले. २५५ ). तेही सोडवले गेले असावेत. मुरबाड तालुक्यातील मौजे पाटगाव येथील बाग, जमीन इ. गोविंद व महादेव या बंधूंच्या वाट्यास दिले. कल्याणातील घराबाा त्यात मुद्दा आहे. ते कोणते घर हे समजले नाही. पण ते घर म्हणजे आमचे वडील व आम्ही राहात होतो ते नव्हे हे निश्चित. कारण तेथील घरे लिमये व कानिटकर यांजकडून आमच्या चुलत आजोबांनी शके १७७४-७५ मधे म्हणजे या वाटणीनंतर सुमारे १५ वर्षांनी घेतली. भांडी, कपडे, दागिने व रोख रक्कम यांचा हिशोब होऊन भाद्रपद व॥ १ शके १७६४ ला दोन याद्या झाल्या ( ले. २५६ ), त्यावरून आमच्या पंजोबाना रु. ३३७८०।-॥ चा ऐवज मिळाला व दुसऱ्या वाटणीला रु. ३३६२५।-॥ चा ऐवज आला. त्यात कोंडूच्या लग्नाचे वेळी शके १७५७ मधे वदपच्या मेहेंदळयांकडून आलेला हुंडाही पुतण्यांच्या हवाली केलेला दिसतो. ज्यावेळी सोन्याचा भाव १६ रुपये तोळा होता त्याकाळी प्रत्येक वाटणीस तेहेतीस हजारांपेक्षा जास्त आले यावरून आजच्या किंमतीचा अंदाज करावा लागेल. याखेरीज बदलापूर व इतर ठिकाणी गावोगावी खरीप व वरकस जमिनी, अंब्यांची झाडे होती त्याच्याही वाटण्या झाल्या. बदलापूरला येण्यापूर्वी ओक ज्या खरवई खेड्यात आले तेथील अंब्याची झाडे समाइकात ठेविली व ती तशी बरीच वर्षे होती. त्या झाडांचे आंबे आम्ही उतरवून आणत असू व त्यांची वाटणी प्रत्येक वर्षी होत असे.

शके १७५९ मधे गोविंद भिकाजी यांनी तारणे विसूचे हवाली केली असा उल्लेख वर आला आहे. त्या तारणांची यादी ९ पाने ( अर्धा बंद = १ पान ) आहे. त्या यादीत इतर नावांबरोबर गोविंद बल्लाळ अचवल वस्ती खरवई नारायण रघुनाथ शिदोरे ही दोन नावे आढळतात. त्यांचेकडून काही दागिने तारण घेऊन कर्ज दिले होते. या गोविंद बल्लाळ अचवलांची जागा आमच्या पंजोबांच्या वाटणीचे घराचे हिश्शास लागून होती ती पंजोबांनी

घेतली. श्री. नानासाहेब चापेकर यांनी बदलापूर या पुस्तकात ही जागा नारो गोविंद अचवल याजपासून म्हणजे गोविंद बल्लाळाचे चिरंजिवापासून घेतली असे म्हटले आहे. नारो गोविंद अचवल यांचे वास्तव्य पेण येथे असे व त्यांना जलमार्गाच्या दलालीचे वतन आंगरे यांनी दिले होते. ( ले. २५७ ). त्यांना पुत्र नव्हता ( पहा वंशावळ सन १९३६ मधे गो. ग. आचवल यांनी छापलेली ). तसेच नारायण रघुनाथ शिधोरे यांची तळयाच्या उत्तर काठावरची अंब्याची झाडे ओकांनी लिलावात घेतली आणि गोविंद व महादेव भिकाजी यांनी शिदोरे यांचे घर त्यांच्या हिश्शाच्या दक्षिणेस होते ते घेतले व शिदोरे ब्रह्मावर्तास निघून गेले ( ' बदलापूर '–चापेकर ) आमच्या चुलत आजोबांच्या म्हणजे विश्वनाथ बल्लाळ यांचे जमाखर्चात शके १७७४ च्या भाद्रपद वा।। ७ ला एक कागद ब्रह्मावर्तास पाठविला त्याचे हशीलाचा खर्च अर्धा आणा पडला आहे. तो कागद शिदोऱ्यांनाच पाठविला होता काय हे न कळे ( ले. २५८ ).

आमचे पंजोबा बाळाजी केशव शके १७७२ मधे वारले. शके १७७३ च्या ज्येष्ठ शु।। ७ स त्यांच्या वर्षश्राद्धाचे दिवशी पाव तोळे वजनाची सोन्याची पवित्रके ब्राह्मणास दिली म्हणून चार रुपयांचा खर्च पडला आहे. शके १७७२।७३ च्या खतावण्या पंजोबाच्या नावच्या आहेत व शके १७७३।७४ च्या आमच्या चुलत अजोबांच्या नावे ते ज्येष्ठ पुत्र म्हणून झाल्या. पंजोबांना बाबा म्हणत. आमच्या पंजीचे नाव अन्नपूर्णाबाई होते असे आमच्या आजोबांच्या म्हणजे काशिनाथ बल्लाळ यांच्या पौष वा।।२ शके १७७० च्या त्रिंबकेश्वरच्या लेखातील 'मातोश्री सौ. अन्नपूर्णांबाई' या व त्यांच्याच शके १७८२ फाल्गुन शु।।६ च्या लेखातील ' मातोश्री अन्नपूर्णांबाई ' या लेखावरून स्पष्ट होते ( ले. १४५ ) शके १७७४ च्या अधिक आश्विन महिन्यात प्रतिदिनी यज्ञोपवीत ब्राह्मणास दिले त्याबद्दल ।।·। खर्च पडला आहे. शके १७५३-५४ मधे सौ. अन्नपूर्णास जोडवी केली असाही खर्च आहे. पंजोबांना विश्वनाथ व काशिनाथ असे दोन पुत्र व पाच कन्या होत्या. या सर्वांची लग्ने पंजोबांच्या हयातीत झालेली होती. मुलींपैकी ( १ ) वारूबाई ही ठाणे जिल्हयातील शहापूरजवळील माहुलीच्या गोडबोल्यांकडे दिली होती. तिच्यासाठी खर्च पडले आहेत ते : शके १७६४-६५ वारूबाईस सोन्याची राखडी. शके १७६८-६९ रु. ९४।≈। चि. सौ. वारूस पारवतीच्या पाटल्या दिल्या त्या ब ।। वजन ५।।।≈। दर १५।।। =शके १७७१ वारूबाईस नथीस मोती ३. ( शके नीट समजला नाही ) सौ. वारूबाईचे मुलास पुतळी व सुंकली सोन्याची व वाळे रुप्याचे अशा खर्चाच्या चार नोंदी मिळाल्या ( २ ) मनूबाई ही हिंगणघाटच्या जोगळेकरांकडे दिलेली होती. तिच्या जोडव्याबद्दल शके १७६४।६५ मधे रु. ५।।।–।।। व शके १७७१–७२ मधे सौ. मनूबाईचे नथीस सोने लागले. खेरीज विसूचे भिकबाळीची उंची मोत्ये २ मोठाली नथीत घातली ती, असा खर्च आहे. शके १७८५–८६ मधे आमचे आजोबांचे कारकीर्दीत " चिरंजीव सौवती मनुबाई जोगळेकरीण हल्ली वस्ती करजगाव " असे खाते होते ( ले. २५९ ). करजगाव मावळ तालुक्यात कामशेतच्या उत्तरेस ३–३।। मैलावर आहे. आमच्या आजोबांकडील खात्यावर

सौ. मनुबाईमागे चिरंजीव शब्द असल्यामुळे ती आजोबांपेक्षा लहान असावी. ( ३ ) ठकू तथा ठमाबाई ही मोहपाडयाच्या पळनीटकरांकडे दिली होती. शके १७६५–६६ मधे सौ. ठमाबाईच्या गर्भादान समयी अहेर, शके १७६६–६७ मधे सौ. ठमाबाईस मुगडया, शके १७६७।६८ मधे सौ. ठमाबाईस बाळंतविडयावर पुतळी, असे खर्च आहेत. शके १७७४।७५ च्या फाल्गुनात सौ. ठमाबाईस आणावयास मोहोपाडयास पाठविला त्यास खर्चास ८=। खर्च पडला आहे. २४ किमी म्हणजे त्याकाळच्या शब्दांत ८ कोस लांब आहे. चौथी वेणू ही डहाणूस परांजपे यांचेकडे दिली होती. शके १७६७ त आश्विनात वेणूस घालावयास सोन्याच्या वाकी ५।=।।। तोळयाच्या दर १७ प्रमाणे केल्या होत्या व १७७० त वेणूस सुंकली २, गेंदास व फुलास ( डोक्यातील दागिने ) केले होते. शके १७७१ त तिचे लग्न झाले व म्हणून ५। – ।। चा " साल गु।। वेणूबाईचे लग्नात" असा शके १७७२ मधे सोन्याबद्दल सर्च पडला आहे. लग्नापूर्वी वर्ष दीड वर्षच आधी वेणूबाईचे नाक टोचले असावे म्हणून शके १७७० मधे तिला सुंकली केली होती. शके १७७४–७५ मधे ती माहेरी आली असावी. त्यावेळी तिला आषाढात साडी दिली त्याबा। २।। रुपये खर्च आहे व त्याच फाल्गुनात तिला पोचवावयास बाळा दिला त्याबा। ·।≋।।खर्च पडला आहे. लग्नानंतर तीन वर्षांनी तिला साडी दिली यावरून त्यावेळी ती लहान होती; लुगडे नेसण्याइतकी मोठी नव्हती, आमच्या पंजोबांनी या आपल्या चार मुलींना शके १७५८ मधे रु. ४ भाऊबीजेची ओवाळणी घातली असा खर्च आहे. शके १७७३ च्या आश्विन शु।। १ ला म्हणजे मातामह श्राद्धाबद्दल तीलोदक सुद्धा प्रत्येकी ८=, दक्षणा चिरंजीव नथु, सखाराम गोडबोला व अप्पा जोगळेकर याजकडून आमचे चुलत आजोबांनी देवविली होती. गोडबोले व जोगळेकर हे अनुक्रमे वारुबाई व मनुबाई यांचे मुलगे व त्या मुलांचे मातामह म्हणजे आईचे वडील बाळाजी केशव यांच्या श्राद्धासाठी दिले होते. तिसरा चिरंजीव नथु हा ठमाबाई पळनिटकरचा मुलगा असावा. मातामह श्राद्धासाठी त्याचेकडून ब्राह्मणास दक्षणा देवविली त्यावेळी तो काहीतरी महिन्यांचाच वयाने असावा. त्याच वर्षीच्या कार्तिकात चि. नथुस शिवकवच व रामरक्षा इ०चा अंगारा सायंकाळी लावल्याबद्दल नारायणभट तेलंग यास दिलेली ·।· दक्षणा खर्च पडली आहे. यावरून ठमाबाईला हाच पहिला मुलगा झाला असे दिसते. शके १७६७।६८ मधे तिच्या बाळंतविडयावर म्हणून खर्च पडलेला वर उल्लेख केला आहे त्यावेळी तिला कन्या झाली असावी. शके १७७४–७५ मधे कार्तिकात रु. १ खण हिरवा जरीकाठी मनूबाईस असा खर्च आहे.

आमच्या पंजोबांच्या मृत्यूनंतर शके १७७३ मधे सर्व कारभार त्यांचे थोरले चिरंजीव विश्वनाथ यांचेकडे आला. यांचा जन्म शके १७४० च्या सुमाराचा होता, असे अनुमान याआधी वर केलेच आहे. त्यांना आमचे आजोबा काशिनाथ हे एकच बंधू होते. त्यांचा विवाह शके १७५६ मधे झाला. तो १४ व्या वर्षी झाला असे मानले तर त्यांचा जन्म शके १७४२ मधे झाला असावा. चारी बहिणी या दोघांच्या पाठच्या

असव्य.त. आमच्या चुलत आजी वसईच्या गोडबोले यांचेकडील व त्यांचे नाव पार्वती होते व त्या सन १९०३ पर्यंत हयात होत्या. आजी दुर्गा या भिवंडीचे बाळकृष्ण मोरेश्वर गोरे यांच्या कन्या औंडुताई या होत. यांचे चुलत भाऊ ती. वासुदेव पांडुरंग गोरे हे आमच्या वडिलांचे व चुलत्यांचे मामा म्हणून नेहेमी येत असत. चुलत आजोबा व आजोबा यांच्या वयात फारसे अंतर नसल्यामुळे जमाखर्चात आजोबांचा उल्लेख कित्येक वेळा काशिनाथ तात्या असा केलेला आहे. यांच्या पहिल्या मुलीही साधारण वर्षाच्या अंतरानी होत्या. आमच्या चुलत आत्या अक्का जोशी यांचे दिवाळसण शके १७७४–७५ मधे झाले त्याच वर्षी फाल्गुनात आमच्या भिकूआत्यांचे लग्न झाले, आमच्या क्र. २ च्या गोदुआत्या भावे यांच्या लहानपणी त्यांना शके १७७२ मधे डूल केले. त्याचे पुढच्या वर्षी क्र. २ च्या चुलत आत्या सखू आत्यास नथीचे सुंकले केले व शके १७७४–७५ मधे गोदीस, सखीस व साळूस (आमची क्र. ३ ची आत्या) यांना छिटाचे अंगरखे करविले त्याबा। शिलाई ।· खर्च पडली आहे. अशा या सख्ख्या व चुलत बहिणी पाठोपाठच्या होत्या.

आमचे चुलत आजोबा विश्वनाथ यांना अक्का, सखू, सई व चिंगू अशा चार मुलीच झाल्या. अक्का या पावसकर वासुदेव भाऊ जोशी यांस दिल्या होत्या. त्यांचे घर पुण्यात पांजरपोळ बोळात होते. या जावयांना शके १७७४ मध्ये दिवाळसणासाठी बदलापुरास आणले होते. (ले. २६०) त्यावरून ह्यांचे लग्न १७७३–७४ मधे झाले. त्यावेळी अक्का आत्याचे वय ८ वर्षांचे मानले तर तिचा जन्म शके १७६५ चा येतो. शके १७७४ च्या फाल्गुन महिन्याच्या अखेरीस आमची चुलत आजी माहेरी वसईस बाळंतपणाकरिता गेली होती. त्यावेळी त्यांना चौथी मुलगीच झाली. म्हणून पुत्रप्राप्तीकरित त्यांनी शके १७७७ च्या आश्विनात त्रिंबकेश्वरी जाऊन नारायण नागवली हा विधी केला होता. पण त्यांना मुलगा झाला नाही. यापूर्वी शके १७७५ मध्ये कोळथऱ्यापैकी कल्याणास असलेले बळवंत पांडुरंग ओक यांनी व आमचे दत्तक चुलते विष्णू अण्णा यांनीही हा नारायण नागबलीचा विधी केला पण कोणासच पुत्र झाला नाही. आमच्या चुलत आजोबांनी शके १७७७ मधे म्हणजे सन १८५६ च्या आखेरच्या दोन तीन महिन्यांत नारायण नागबली विधी केला व त्यानंतर पाच सहा वर्षांत अदमासे सन १८६० मधे ते वारले. त्यापूर्वी काही दिवस अगोदर त्यांनी आमचे एक सख्खे चुलते विष्णुअण्णा यांना दत्तक घेतले (ले. २६१). विष्णु अण्णांच्या कुंडलीवरून त्यांचा जन्म शके १७७८ च्या माघ महिन्यातील म्हणजे सन १८५७ च्या आरंभीचा निघतो. ते दत्तक गेले त्यावेळी त्यांचे वय ३ वर्षांचे होते. चुलत आजोबांचे वय मृत्युसमयी ४० वर्षांच्या आसपास होते. इतक्या लहान वयात त्यांनी दत्तक घेतला तो बहुधा ते आजारी झाले असावेत व त्यातून ते उठणार नाहीत अशा परिस्थितीमुळे दत्तक घेण्याची त्वरा केली असावी. आमचे आजोबा शके १७८२ च्या फाल्गुन महिन्यात त्रिंबकेश्वरी गेले होते त्यात त्यांचा क्र. ३ चा मुलगा विष्णु दत्तक गेल्यामुळे त्याचा उल्लेख पुतण्या विष्णु असा केला आहे. चुलत

पंजोबांनी चार मुलींच्या जन्मानंतर मुलगा दत्तक घेतला त्यामुळे चार बहिणींचा तो मानाने धाकटा भाऊ झाला तसाच वयानेसुद्धा सर्व बहिणींपेक्षा लहान होता. थोरली बहीण अक्का जोशांकडे दिली होती. त्यांचे पांजरपोळाच्या बोळातील जुने घर विकून त्यांची नातवंडे पंतवंडे पुण्यातच निरनिराळ्या ठिकाणी राहून लहान मोठे उद्योग चालवीत आहेत. एक नातू माधकृष्ण मिलिटरी इंजिनिअरिंग सर्व्हिसमधे नोकरीस होता त्याचा मुलगा भारतीय हवाई दलात असता लढाईत त्याचा ठावठिकाणा नाहीसा झाला. क्र. २ ची सखूआत्या ही भावे यांना दिली होती. त्यांना रावसाहेब हे टोपण नाव होते. त्यांचा मुलगा लग्न होऊन थोड्याच दिवसात वारला म्हणून त्यांचा वंश पुढे चालू नाही. त्यांची सून ही लिमयांची मुलगी होती. त्यांना मुलगी, मथू म्हणून होती ती भिडे यांचेकडे दिली होती. तिलाही मुलगा नाही. क्र. ३ ची सई आत्या ही घनवटकरांकडे दिली होती. क्र. ४ ची बहीण चिंगुआत्या या विनायक वासुदेव खरे पोलीस इन्स्पेक्टर यांना दिल्या होत्या. सासरचे नाव सरस्वती. यांचे घर मुंजाबाच्या बोळात शंकराचार्यांचे मठाचे बाजूस होते. यांचा मुलगा आपत्यहीन वारल्यामुळे तो वंश खुंटला.

पेशवाईमधे कागदपत्रे, सनदा इत्यादींवर मुसलमानी दिन, मास, वर्ष यांचा वापर होत होता. मुसलमानी अमलाचा प्रभाव इतका दृढमूल होता की इंग्रजांचे राज्य येऊन पन्नास पाऊणशे वर्षे झाली तरी ती कालगणना खासगत कागदोपत्री अनुसरली जात होती. आमचे चुलते वामन काशिनाथ यांच्या कारकीर्दीपर्यंतच्या म्हणजे इ. स. १८७७ पर्यंतच्या तरी खतावण्या मुसलमानी सुहूर वर्षाबरोबर बदलल्या जात होत्या. सुहूर वर्ष ज्येष्ठात बदले म्हणून आमच्या खतावण्या ज्येष्ठ मासापासून ज्येष्ठ मासापर्यंत असून त्यावर शके १७९८–९९ अशी कालगणना दाखविली आहे. आमच्या आजोबांच्या कारकीर्दीतील जमाखर्चातील काही उतारे ( ले. २५८ ते २६३ ) पाहाता काही मनोरंजक गोष्टी आढळून येतात. त्यांनी आपले जावई वासुदेव भाऊ जोशी व त्यांच्या घरची मंडळी यांना पुण्याहून बदलापुरास जाण्याकरिता शके १७७४ (म्ह. सन १८५२) मधे बैलगाडी पाठविली होती. त्यास चार रुपये भाडे दिले होते. त्या काळी पुण्याकडे जाण्यास आगगाडी झालेली नव्हती. फक्त ठाणे व मुंबई यामधे आगगाडी सुरू झालेली होती व शके १७७४ च्या फाल्गुनात ( सन १८५३ च्या मार्च महिन्यात ) आमचे चुलत आजोबा व आणखी कोणी दोघेजण ठाण्याहून ‘ आगगाडीने ’ मुंबईस गेले व दोघेजण परत आले त्याचे एकूण १॥–॥ हशील खर्च पडले आहे. ठाण्यास जाण्याकरिता कल्याणची तर म्हणजे खाडी ओलांडण्यास होडीचे हशील व ठाण्याची तर अशा दोन खाड्या ओलांडण्यास. ·॥–॥। खर्च पडले आहेत. आमच्या चुलत आजी वसईस गेल्या त्या डोलीतून ( साध्या मेण्यातून ) गेल्या. आमचे आजोबा काशिनाथ तात्या मुंबईस गेले त्यांनी घोड्याची गाडी जाताना व येताना केली त्याबद्दल २॥८॥। गाडीचा खर्च व शिवाय तरीचा खर्च आहे. यावरून घोड्याची गाडी ठाण्यापासून मुंबईपर्यंत केली होती असे दिसते. चुलत आजोबा हे त्यांचे कारभारी रामचंद्र बल्लाळ चोळकर यांना बरोबर घेऊन

भिकू आत्याचे लग्न ठरविण्यास पौष वा।। शके १७७४ ला पुण्यास गेले तेही बैलगाडीने गेले होते व तो खर्च भिकू आत्याचे लग्नखाती खर्च टाकला. भिकूबाईस स्थळे पाहण्याकरिता म्हणजे वरसंशोधनाकरिता वसईस, रोहयास व मुंबईस कारकून माणसे पाठविली होती. खासे कोणी प्रारंभीच्या चौकशीकरता जात नसत. प्रवासात जेवण्याचा प्रसंग आला तर डाळ तांदूळ विकत घेऊन सोवळयांनी जेवण तयार करीत. पुण्यास गेले होते तेव्हा व्याही पावसकर जोशी यांचेकडे आमचे चुलत आजोबा उतरले होते. पण त्याकाळी चाल होती की, मुलीला मुलगा होईपर्यंत तिच्या सासरी तिच्या वडिलांनी जेवावयाचे नसे म्हणून "। ☰ भोजनखर्च धोंडोपंत बाबा जोशी याजकडे जेवण्याचे नवते सबब डाळ, तांदूळ, तूप व कणिक व एकादसीचे फराळाचे सामान वगैरे पैसे १९" खर्च टाकला आहे. हे सामान आणून जोशी यांचेकडे दिले की ते स्वतः शिजवून जेवले की तेवढी किंमत जोशांना दिली हा उलगडा होत नाही. यात पैसे १९ असा खर्च म्हटला आहे पण रेघांनी तो । ☰ असा दाखविला आहे. काशिनाथ तात्या घोडागाडीने मुंबईस गेले होते तेव्हा ८३८७ भोजनखर्च व ८३८२ उतार मिळून झालेला खर्च । =।।। असा रेघांत लिहिला आहे. त्यात पहिली उभी रेघ चार आणे आडव्या दोन रेघा म्हणजे दोन आणे व पुन्हा उभ्या तीन रेघा म्हणजे ३ पैसे अथवा ९ पै हे जसे जमते तसे वरील १९ पैशाच्या रेघी मांडणीत जमत नाही किंवा त्याच खर्चात पंचाग ३ पैसे, विडयाची पाने १० पैसे इ० रेघी लिहिले आहेत ती पद्धत नेहेमीसारखी नाही. अन्य बाबींचा खर्च रेघी लिहिला आहे त्यासही हीच पद्धत आहे. चुलत आजोबांचा पुण्याचा प्रवास व तेथील रहाणे पौष व।।८ ते माघ शु।।४ मिळून १०-११ दिवस होतात. त्या मानानी खर्च अगदीच थोडा लागलेला दिसतो. मोठ्या माणसांचे कपडे मांजरपाटाचे असत. धोतरेही 'मांजरपाट नेसावयास' असा खर्च आहे. एकादी रेशीमकाठी धोतर जोडीही प्रसंगविशेषी नेसण्यास घेतल्याचा खर्च आहे. फारसे लांबरुंद नसलेले मांजरपाटाचे पंचे घरी नेसत असत मांजरपाठधोतरास १। = व पंचास ·। = ते ·।।≡। खर्च पडला आहे. रेशीमकाठी धोतर जोडी ५८= खर्च आहे. बायकांची लुगडी वगैरे जमा दाखवीत असत त्यात अहेर म्हणून आलेल्या लुगडयांची व पागोटयांची नोंद असे यापैकी लुगडी वापरावयास काढली तर धडतीस दिले असा त्याचा खर्च दाखविलेला आहे. मुलांना छीट ( पुढे त्याला चीट म्हणत ) कापडाचे अंगरखे केले होते. भिकुबाईचे लग्न झाल्यावर तिला प्रथम ( म्ह. पावणाबरोबर ) सासरी जावे लागले त्यावेळी तिच्या बरोबर तिची आत्या सौ. मनुबाई गेली होती जावयांसाठी खाऊकरिता ·।· तिच्या बरोबर दिले होते. लग्नात मुलगी अशीच लहान असल्यामुळे, नव्या मंडळीत ती रुळेपर्यंत व तिला संभाळून घेण्याकरिता अशी पाठराखीण पाठविण्याची पद्धत होती. भिकूबाईचे लग्नात सकाळी व रात्री कलावंतिणीचे गाणे बजावणे नाच्या पोऱ्याचा नाच, त्यांना बक्षिशी ( दौलत ज्यादा ) यास सात रुपये फक्त खर्च पडला आहे. लग्नात ५२० रुपये हुंडा दिल्याचा खर्च आहे. ( ले. २६३ ). आपले कारभारी व एक शास्त्री यांचे करवी ते व्याही गोविंदशास्त्री फाटक यास दिले.

फाल्गुनात लग्न झाले व पुढे तीन महिन्यांत व्याही गोविंदशास्त्री फाटक वारले त्यावेळी दुखवटयाचा अहेर म्हणून तांबडा रास्ता व पागोटे दिल्याचा खर्च आहे. बाई मंडळीचा जमाखर्चात उल्लेख ओकीण, सानी असा केला आहे. चुलत आजी वसईस माहेरी गेली तिच्या मुलास खेळवावयास राघो गडी पाठविला होता. येथ मुलास याचा अर्थ मुले असा आहे. त्यावेळी आजीस मुलगा नव्हता; मुलीच होत्या. म्हणून लहान मुलास खेळवावयास या अर्थी तो शब्द आहे. शरीरास कोठे गळू झाले असल्यास त्यातील अशुद्ध रक्त काढून टाकण्यास जळू नावाच्या एक प्रकारच्या किडीचा उपयोग करीत. हवा न भरलेल्या रबरी फुग्यासारख्या बोटापेक्षा जरा लहान किडी पालापाचोळयात असतात; त्या पकडून काही लोक आणीत. शरीराच्या दुखणाईत भागावर ठेवली की ती आपल्या तोंडांनी भोक पाडून रक्त शोषून घेण्यास लागते व शेंगेसारखी फुगते. तिच्या तोंडावर हळद टाकून ती सोडवावी लागते. ती सुटून पडली की ती दाबून तिच्यातील रक्त पिळून टाकता येते. जळू भोक पाडते ते कळत सुद्धा नाही; पण ती सुटल्यावर भोक दुखते व जळू लागल्याचे कळते. काही रानात चालणाराच्या पायावर उडी मारून जळवा चिकटतात. अशा जळवा काशिनाथ तात्यांनी लाविल्या त्याबद्दल खर्च पडला आहे. आजोबांचे कारकीर्दीत शके १७७४।७५ मधे बदलापूरपासून १॥-२ मैलांवरील सोनिवली गावी ऊस लावला होता त्याचे रु. ४८॥ उत्पन्न जमा आहे याच वर्षी बदलापूरच्या त्रिंबकेश्वरास रुद्रावर्तन केल्याचा खर्च आहे. ज्या भिक्षुकाकडून हा करविला त्याचे नाव नारायण भट तेलंग असे लिहिले आहे. तेलंग हे आडनाव ब्राह्मणात नसावे. तेलंगणातून येणाऱ्या ब्राह्मणांना तेलंगी ब्राह्मण म्हणून संबोधीत असत. त्या अर्थी नारायण भट तेलंगा अशा शब्दप्रयोगाएवजी तेलंग हा शब्द वापरलेला असावा. द्रवीड, कानडा अशीही नावे जमाखर्चात आढळतात. चुलत आजोबा व आजोबा यांचे कारकीर्दीत कल्याणास घरे विकत घेण्यात आली. सावकारीच्या येणे रकमेच्या मोबदल्यात बहुतेक घेतलेली होती. आमचे वडील व आम्ही राहात होतो त्या, पाराच्या दोन घरे पश्चिमेस असलेल्या, घराच एक भाग लिमये यांजकडून त्यांना दिलेल्या कर्जापोटी सन १८५० मधे विकत घेतला. लिमयांच्या घराचा काही भाग कानिटकरांनी घेतला होता तोसुद्धा याचे नंतर थोडयाच दिवसांत खरेदी केला. ( ले. २६२ ) आमच्याकडील जमाखर्चांत त्याचा उल्लेख कानिटकरवाले व लिमयेवाले घर असा केलेला आहे. सन १८६१ मधे दगडु तेली यांचे घर विकत घेतले ( ले. २६१ ) व सन १८६९ मधे म्यु. घ क्र. ९१५ हे आजोबांनी शंकर महादेव सोनार याजकडून रु. ८५० स. घेतले. आमच्या आईचे आजोबा गणपतराव तात्या जोशी यांनी कल्याणास त्यांच्या पाराजवळील घराच्या पूर्व बाजूच्या दरवाज्यावर बंगला बांधला, त्यास कर्ज काढावे लागले होते ते फेडण्यासाठी गणपतराव तात्यांनी काशीनाय बल्लाळ ओक बदलापूरकर याजपासून रु. ७००० कर्ज काढले होते, त्याची फेड होईना. गणपतराव तात्या जोशी मृत्यू पावले व सावकार काशिनाथ बल्लाळ म्हणजे आमचे आजोबाही निवर्तले म्हणून आमचें एक चुलते कृष्णाजी काशिनाथ यांनी गणपतरावांच्या

कुटुंबावर रु. ८००० चा दावा लावला. त्यावेळी अदालत नाशिकास होती तेथे दावा लावला व कर्जवसुलीसाठी झालेल्या लिलावात त्या बंगल्याच्या दक्षिणेकडील अर्धा भाग रु. १०२६ त आमचेकडे सन १८८० साली आला. त्यापूर्वीच आमचे मातामह ( आईचे वडील ) घरातील सावत्रपणामुळे आपल्या वडिलांपासून म्हणजे गणपतराव तात्यांपासून विभक्त होऊन निराळे राहात होते. कल्याणातील घरांची सुधारणा किंवा वाढ करण्याच्या कामास कारखाना म्हटले आहे. या कामावर देखरेख आजोबांचे कारभारी रामचंद्र बल्लाळ चोळकर याजकडे होती. सखाराम गंगाधर पिंपळखरे यांचेप्रमाणेच कल्याणातील काही कारभार आमच्या आजोबांचे मावस भाऊ केशव रामचंद्र फडके यांजकडे असे. त्यांनी लग्नकार्य प्रसंगी कल्याणाहून जिनसा खरेदी करून बदलापुरास पाठविलेल्या आढळतात. दूधही कल्याणाहून खरेदी करून नेले होते. या जमाखर्चात बगुमावशीस देहनगी किंवा अहेर दिल्याचा खर्च आहे. या आमच्या आजोबांच्या मावशी. त्या विनायकराव पिंपळखरे यांना दिलेल्या होत्या; पण त्यांचा सखाराम गंगाधर पिंपळखरे यांचेशी संबंध नाही. सन १८८५ मधे आमचे चुलते कृष्णाजी काशिनाथ यांनी कोर्टाकरवी घर क्र. ९ आळी २५ व घर क्र. ७६५ ही घरे घेतली. घर क्र. ३७ आळी क्र. ६ हे घर जमशेटजी करसेटजी व इतर यांजकडून चुलत्यांनी त्याच वर्षी रु. ३००० स विकत घेतले.

## प्रकरण तेविसावे

# आमचे चुलते व वडील

आतापर्यंतचा इतिहास जुन्या कागदपत्रांच्या आधारे लिहिला आहे. या प्रकरणात आमचे वडील व चुलते यांचे स्वभावचित्रण व थोरपणा आम्हा भावा बहिणींच्या आठवणी-तून व परिचितांच्या लेखनावरून लिहिला आहे. त्यावेळच्या गोष्टी काहीशा कल्पित असाव्यात अथवा कल्पनेने त्या रंगवून भडक केलेल्या असाव्यात अशी शंका आताच्या काळात यावी, इतका तो सुमारे ७५–१०० वर्षांपूर्वीचा काळ वेगळा होता. त्या काळच्या ऐतिहासिक व सामाजिक स्थितीत व १९७६ च्या स्थितीत महदंतर पडले आहे.

आमचे घराणे ठाणे जिल्हयातील त्यावेळच्या प्रमुख घराण्यांत मोडत असे. फार मोठी जमीनदारी व सावकारी यामुळे जिल्हयातील धनाढ्य घराण्यांत बदलापूरकर ओक घराणे मोडत असे. आमच्या थोरल्या चुलत्यांना कृष्णशास्त्री चिपळुणकरांची मुलगी दिली होती; एक आत्या सार्वजनिक काकांची सून होती. आमचे आजोळही कल्याणचे प्रसिद्ध सुभेदार महादाजी कृष्णराव जोशी ( पहा : सुभे कल्याण ले. गोडबोले ) यांचे घराण्यात. डॉ. आनंदीबाई जोशी आमच्या आजोळच्या घराण्यातील. असे आमचे घराणे प्रतिष्ठित होते.

आमचे आजोबा काशिनाथ तात्या वारले तेव्हा आमचे थोरले चुलते वामनराव व कृष्णाजी उर्फ कुशाभाऊ हे वयाने लहान होते व दोघेही अल्पायुषी ठरले. परंतु त्या अवधीतही त्यांनी चाळीस गावांत मिळून तीनशे खंडीची उत्पन्नाची जमीन संभाळली व पूर्वापारची फार मोठी सावकारी केली.

आमचे थोरले चुलते वामनराव यांना कृष्णशास्त्री चिपळुणकरांची मुलगी दिली होती. ओकांकडील तिचे नाव रखमा होते. वामनराव अगदी तरुण वयात म्हणजे वयाचे २३–२४ वे वर्षी पुण्यास श्वशुरगृही सन १८७५ चे सुमारास निवर्तले व त्यानंतर अवघ्या एक वर्षाने त्यांच्या पत्नी वारल्या व पाठीमागे तीन वर्षांची मुलगी मनकर्णिका उर्फ मनुताई होती. तिचे संगोपन बदलापुरास आमच्या चुलत्यांनी उत्तम प्रकारे केले.

१. ( इ. स. १७३२ )

सकु १२२३ म्हणजे इ. स १३०१. असाच नागनाथाचा उल्लेख पालशेत येथील ओकांचे देवालयात इ. स. १६४५ मध्ये स्थापन केलेल्या केशवाचे मूर्तीखाली आहे.

ओंकार संग्रह
श्री माधवराव ओंकारांचे कृपेने ]

[लेखांक १३

पौ. चैत्र वद्य ४ शके १७०५ शुक्रवार सन[१] ११९५ ( असल बा नकल )

तिर्थस्वरुप राजमान्य राजश्री चिंतामण नाईक ओक दादा वडीलांचे सेवेशी अपत्ये बाजी बलाल वोक सिवने चरणावरी मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना माघ व. १३ पावेतो वडीलांचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थीत असे विशेष आपणाकडून फार दिवस पत्र येऊन कुशलार्थ कलत नाही तरी असे न करावे सदैव पत्र पाठवून सांभाल करावे यानंतर इकडील वर्तमान तरी मूळ गांव ओकांचा पालसेत तेथे मुलपुरुषाचे हातचे देवल श्री लक्ष्मी केशवाचे आहे. त्यास बहूत दिवसी देवल याजकरीता जिरणोद्धार करावयाचा आहे. त्यास दोन हजार रुपये लागत आहेत त्यास गुदस्ता जोशी वगैरा पालसेतकर बांधणार होते. परंतु जागा ओकांची आणि तुमचे आमचे मूळ पुरुषानें बांधीले आणि आपले जागे यांत दुसरे याणे बांधावे हे ठीक नाही. याजकरीता आपणास लिहीले आहे तरी देवालय बांधावे आपण देशात दोहोचोहो जागा वाडे बांधोन किर्ती केल्यात म्हणून परभारे ऐकतो त्यांस कोकणात आपले वतनावरी कांही कामकाज असावे याजकरीता वडीलास लिहिले आहे तरी पालसेतचे देवालय जुने आहे ते व कांही मौजे बामणोवली येथे कांही सेत असे दोहो ठिकाणी कांही बेंदीस्त असावी आपणास मी लेकराने विस्तारे ल्याहावे सारखे नाही परंतु मुल गांव पालसेत येथे देवल वडीलाचे आहे ते दुसरेयाने तुम्ही आम्ही वोक असौन बांधावे हे ठीक नाही करीता विस्तारे लिहीले आहे आपणाकडे देवजी किरीस्ताव पाठविला आहे याजबरोबर काय तो सालजाब लिहून पाठवावा मीच पुणीयासी येईन पेशजी येकदोन वेळा पत्रे लिहिली होती. उत्तर आले कीं, तुम्हीच देसी यावे. आपण श्री महायात्रा जावयाचा मजकूर ऐकला याजकरीता माणूस पाठविला आहे याजबरोबर उत्तर आले पाहिजे देवल कोसलोन देव पाण्यानें भिजतो याजकरीता देवलाचे काम झाले पाहीजे. आपणास नारळ २ पाठविले आहेत घेऊन उत्तर पाठवावे. बहुत काय लिहीणे शेवेसी श्रुत होय हे विनंती.

---

१. पोंच दि. १७-२-१७८४

[ ओ...१६ ]

ओंकार संग्रह
श्री. माधवराव ओंकारांचे कृपेने } [लेखांक १४

श्री

श्री गणपती व नारायणेश्वर

वेदशास्त्र संपन्न राजमान्य राजश्री विश्वनाथ भट बोपदेव भट अग्निहोत्री खरे गुहागरकर स्वामी गोसावी यासी विद्यार्थी कृष्णाजी केशव खोत वोक मौजे बामणोलीकर याचे नमस्कार विनंती उपरी तुम्ही आपणाजवली पालसेतामध्ये वेदमूर्ती राजश्री काशी जोसी यांचे घरी पुसिलेत की तुम्ही वृद्ध जाहालेत अशास तुमचे गावीचे उपाध्येपण वृत्ती आमचे आजे रामचंद्र अग्निहोत्री त्यापासून आम्ही चालवितो अशास राजक्रांतीमुळे आमचे कागदपत्र होते ते सर्वही गेले याकरिता उपाध्येपणाची कैसी ठाबकी आहे ती सत्यपूर्वक वडिलाचे वच्यन स्मरोन पत्र लिहोन देणे त्याजवरुन येणेप्रमाणे स्थिति असे पूर्वी गावामध्ये आमचे तीर्थरुप केसो वामन १ किटोबा श्रीपती १ व नारोबा श्रीपती १ व शिवनीकर नारोबा व केसोबा व गणोबा व रामजी हे चवघे भाऊ ऐसे हे गावी होते ते समई गावीची खोती चालऊन होते कार्यप्रयोज्यने होत असती तेव्हा मनास आला तो बोलाऊन उपाध्येपण चालवीत असत आपुले गावीचे ऐसियासी तुमचे आजे रामचंद्र अग्निहोत्री त्यांचे आजे बोपदेव भट त्यासी बोरगावकर खोत याही उपाध्येपण आपले गावीचे वृत्ती करुन मिरास दिल्हे त्यापासून चालवयास ते असती ऐसियहास आमचे वडील बोरगावी जाऊन वेदमूर्ती रामचंद्र अग्निहोत्री यासी गावात बोलाऊन आणून आपले गावीचे उपाध्येपण वृत्ती उदकपत मिरास पुत्रपौत्री करुन दिल्हे, असे त्यावरी आमचे गावामध्ये नारोबा श्रीपति याणे महारुद्र ११ केले व श्री. याची प्रतिष्ठा गावामध्ये केली व अश्वत्थ उद्यापन[1] केले व लक्ष होम २ दोनी ऐसी महा अनुष्ठानें केली ती सर्वही बोपदेव अग्निहोत्री याही चालविली त्यापासून अजिपर्यंत चालत आले असे येणेप्रमाणे आपणास ठावके असे हे लिहिले सत्य शके १६३७ मन्मथ नाम संवत्सरे आषाढ वद्य १३ त्रयोदसी रविवार[2] साक्ष–कासी ज्योतिसी बालभट अग्निहोत्री व्यास लेखक बाल जोसी पालसेतकर
कृष्णाजी केशव खोत

---

१. Catalogus Catalogorum, author, Theodor Aufrecht Alphabetical register of Sanskrit works and authors यात अश्वत्थ उद्यापन = The ceremony of raising a bank of earth round an अश्वत्थ असा अर्थ दिला आहे.

२. इ. सन १७१५.

ओंकार संग्रह
श्री. माधवराव ओंकारांचे कृपेने ] [ **लेखांक १५**

श्री गणपतिवरद ईश्वरनारायणे

श्रीविश्वेस्वरजयति

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री महादो हरी वोक
सिवणकर खोत मौजे बामणोली स्वामीचे सेवेसी

पो। गणोबानाईक वोक खोत बामणोली वास्तव्य श्री कासी सा। नमस्कार विनंति येथील क्षेम ता। चैत्र शुध्ध १ पावेतो क्षेम असो विशेष आपण वो। राजश्री सदाशिव भट खरे बाणेश्वरकर तुमचे उपाध्ये याजबराबर पत्र पा। ते आम्हास पावले त्यात मा।र मौजे बामणोलीचा लि। तो कलला चिरंजीव बालाजीपंत वोक कल्याण प्रांताहून येऊन खोती करणार त्यास मौजे मजकूरपो। तक्षिमा चार पो। येक तक्षीम तुमची तीन तक्षिमा आमच्या तपसील आमची येक व श्रीपतीची येक व बालाजीची येक त्यापो। श्रीपतिचा लेक किटोबा श्रीपति व नारोबा श्रीपति याणी महाअनुष्ठाने गावी केली त्यास ब्रह्मस्व जाहाला ते आमचे वडिलानी दिले व किटोबा व नारोबा यांचे संगतीचा मार्ग आमचे तीर्थरुप कृष्णाजीबाबा याणी केला ते वेळेस नारोबाने पत्र तुमचे वडिलाचे साक्षीनसी लिहून दिल्हे ते तुमचे वडिलाजवळ असल अथवा आम्हाजवल असेल हे न कले आम्ही देसी आलियावर चौकसी करून पाहोन आपणाकडे पाठवितो वडील चालत आल्याप्रमाणे चालावे तुमचे उपाध्ये पत्र लिहिले आहे. त्यावरून कलेल बहुत काय लिहिणे हे विनंति.

o—o—o

ही नकल सिवणकर याणी खालतून पाठविली असे

पे. द. को. जमाव ५४८ ] [ **लेखांक १६**

ईजतमाहा इस्माईल अलि हवलदार व कारकून ता। हमजाबाद मामले दाभोळ ......सुहुर सन तिसा मिया व अलफ[1] ता। मजकूरचे वतनदार यांचे खासगत वाडी याचे झाप कदीम पालक होते हली सरकारी वसूल होत असत ते पालक देविले पाहिजेत म्हणोन हरोजीराव अंतोजीराव दळवी सुभेदार याणी अर्ज केला त्यावरून खातिरेस आणून मेहेरबान होऊन झाप सालमजकुरापासोन पालक देविले असत. झाप सुमारे ३४६५

( वेलदूर, गुहागर, वेळणेश्वर, अडूर, हेदवी, नरवण इ. गावाच्या झापा बाही आहेत )

..........................................................................................

१. इ. स. १७०९

पालसेत माड ५०५ येकूण दर ५ प्रो २५२५ पैकी पालक तिसरी तक्षीम झाप सुमार ८४१.

| | | | |
|---|---|---|---|
| विश्वासराव व प्रतापराव विचारे ............. | महादेव सिद्रस महाजन माड ७५ येकूण झापा ३०५ पो पालक झाप सुमार १२५ | अन्ताजी नारायण कुलकर्णी | केसो विश्वनाथ व हरी अप्पाजी महाजन माड सुमारे १४० झाप .....७०० पैकी पालक झाप २३३ |

केसो कृष्ण मुकादम

................

येकूण ३४६५ झाप पालक देविले असत. साल मजकुरापासोन सदरहूप्रमाणे जमाबंदीस बाद होऊन बाकी जमा धरून वसूल घेत जाणे पा। हुजुरखान खुशमहमद जजानी सिवाजी अफराद छ२१ र.लाखर.......

पे. द. को. जमाव रु. ५५१
व द. कोकण रु. २९८

**लेखांक १७**

श्री

नकल कारकीर्द कानोजी आंगरे सरखेल—जाबता मोईन वतनदार वगैरा महाला-निहाय सुभा मामले दाभोळ सु॥ समान अशर मया व अलफ[1] कुलाबे याचे हुकामी जमीदार रुजू जाहाले यावर मोईन मुकरार केली असे बेरीज

| | |
|---|---|
| सरकार दुतर्फा पोमोईन सालिना–रु. | रयते निसबत देणे मुशाहिरा गाव कुलकर्णी मोईन |
| ... ... ... ... .... .... | .... .... .... .... ... .... |

देशक मोईन माहाले निहाय रु.

| | | |
|---|---|---|
| तर्फ जाफराबाद | ५१५ तर्फ हमजाबाद | |
| .... ... ... ... .... | | १२५ हिरोजी चव्हाण देशाई तकदमे मोईन |
| ... ... .... .... ... | | ... ... .... .... ... .... |
| | | .... ... ... ... .... ... |

वतनदार कारभारी आगर गावहुतवार गावा तकदमे मोईन

.... ... .... ...

.... ... ... ...

... ... ... ...

७१ मौजे पालशेत–३० विचारे

१. सन १७१७–१८

२४ महाजन
१५ केसो विश्वनाथ
$\frac{९}{२४}$ कृष्णाजी केशव
१७ मुकादम–१० केसो कृष्णाजी
$\frac{७}{१७}$ हिवर्डे

पे. द. को. जमाव ५४८ ] [ **लेखांक १८**

अजतमाहा शेख हसन हवलदार व कारकून ता॥ हमजाबाद

सुभा दाभोळ बिदानद सु॥ समान असरीन मिया व अलफ[१] बद्दल खर्च देणे मोओीन मुकरार हक वतनदार तालुके मजकुराचे माचे बाबे अर्जदास्त सु॥ छ १५ साबान सन सबाची पाठविली त्यावरून देशक वतनदार गावगन्ना ता॥ मजकूर मोईन मुकरार बद्दल सालेसाल येऊन सनदेबद्दल कसाला पडतो तो साहेब कामाचा बंद होतो तरी वतनदारावरी मेहेरबान होऊन येकंदर नातीक सनद देविली पाहिजे म्हणोन लिहिले वतनदार मजकूरी अर्ज केला त्याजवरून खातरेस आणून वतनदारावरी मेहेरबान होऊन मोईन मुकरार बामोजी सन सबावबाली जदीद मोईन मुकरार करुन जातीक सनद वजीब सनसमान साल मजकूरापासोन मोईन पा। हुजूर रसानगी जबाजी ईभ्राम तानाजी अफराद

| | | | |
|---|---|---|---|
| नक्त | रु. १४८॥ | भात कैली | ५ खंडी |

देशक ता॥ मजकूर सालिना रु. ११४

| | |
|---|---|
| येसाजी वलद सूर्याजी चव्हाण कोकणराव व देशमुख सालिना भात कैली खंडी ५ | नारो रुद्र तांबे मोकादम ता। मार यासी नगद रु. ३२॥ |

वतनदार कारभारी ता॥ मजकूर यासी नक्त रु.

| कसबे गुहागर | मौजे पालसेत | मौजे वेलणेश्वर | मौजे नरवण |
|---|---|---|---|
| ७॥ परचुरे महाजन | १२॥ .... विचारे | ...... | ४ लिंगो नारायण खोत. |

---

१. सन १७२७–२८

७।। परचुरे महाजन    ७।। केसो विश्वनाथ महाजन    .... ...    ३।। गोविंद भिकाजी व बाबाजी जोगदेव महाजन
७।। विंझे महाजन
७।। गोले महाजन    ४।। कृष्णाजी केशव वोक महाजन    ... ...
५ राघो रखमांगदेव विसाजी महादेव व महादो हरी मुकादम    ५ हरी केशव मोकादम
    ३।। शंकराजी केशव व विसू दिवेकर ... ...

३५    ३३

मौजे अंजनवेली    मौजे तवसाल    मौजे हेदवी
दामाजी हरी व नारो दामोदर    .... ...    २।।– विसो महादेव व दामाजी बल्लाळ
महाजन    रु. ७।।    ... ...
मौजे वेलदूर ... .... महाजन    १।।।– महादाजी नारायण व जिवाजी नारायण महाजन
रु. २
मौजे असगोली नारो रुद्र महाजन    ३।।– किटो गणेश मुकादम
मोईन नक्त    रु. १।।।

८।

एकूण भात कैली खंडी पांच व नगद रु. एकशे साडेचालीस व भात खंडी पाच खुद सेत धारापैकी अज मजकुरापासोन आदा करीत जाणे ( वगैरे .... ) छ १४ सवाल नक्कल कर्दे अण्णाजी कृष्ण अंबडेकर मोकादम मौजे पालसेत ह. भोगूर प।। नाशिक मुकाम पुणे शके १७०३ प्लवनाम संवत्सरे फाल्गुन व।। ५

सदरहूप्रमाणे अस्सल पत्र राघो बल्लाळ तांबे मोकादम मामले हमजाबाद...याज-पाशी असे ते पत्र बालाजी रघनाथ कानिटकर मौजे पालसेत महाजन याणी पाहिले आहे म्हणून माार

पे. द. दक्षिण कोकण घडणी रु. ४२१ ]    [ **लेखांक १९**

राजमंडळ

स्वारी राजश्री पंतप्रधान    सु।। सबा सबैन[1]

जमा साल मजकूर ता।। अंजनवेल वसूल जमा परभारे ब।। हिशब महाल माार

१. इ. स. १७७६–७७

खटपटे वतनदार सालिना मोईन बा। नेमणूक साल गुदस्त ४०४ रु.

११७ कसबे गुहागर

... ... ...

... .... ...

९७ मौजे पालसेत

२५ .... .... विचारे

१५ .... कानिटकर

१२ परशराम बल्लाळ वोक

१० .... .... दिवेकर

... ... ... ... ...

... ... ... .... ...

९७

१३ मौजे नरवण

७ नारो गोविंद महाजन दि। बापूजी कृष्ण

६ केसो विश्वनाथ मोकादम

१३

———

( वरीलप्रमाणच खर्च सु। तिसाचा[२] आहे. )

इ. स. १७७८ जमावसुलाचे हिशोबात मोईन बा। नेमणूक ४०४ रु.

मौजे पालसेत

२५ कानोजीराव विचारे

१० रामाजी नारायण दिवेकर मुकादम

१५ राघो केशव कानिटकर महाजन

१२ परशराम बल्लाळ ओक महाजन

२५ .... ... .... .... ... कुलकर्णी

१० बाबाजी हरी आंबडेकर मुकादम

९७

मौजे अडूर

१० बाजीराव विचारे

७। विसाजी केशव कानिटकर

७। सिवजी नारायण भावे कुलकर्णी

२५

वरीलप्रमाणे सु। सलास समानीन[३] शके १७०४ ची आहे.

---

२. इ. स. १७८९–९०

३. इ. स. १७८२–८३

पे. द. द. को. रु. ४३१ ] [ **लेखांक २०**

श्री

तकरीर करीजा मौजे कोतलिक....तकरीर करता काना महार कदीम मिरासदार मौजे मजकूर ह. वस्ती मौजे नरवण सु॥ खमस अशर मया व अलफ[1] पाहाणीदार बालाजी खाडिलकर वर्तक का॥ अंजर्ले...आपणास पुसले......( सिर्के यास घालवून साने खोती करु लागले वगैरे ) मग नारोपंत साने आपणास गावी घेऊन गेले. दोन वर्षे आपण गावी होतो. तो अंजनवेल हबशाने घेतली[2] ते फिसरतीमधे नारोपंत साने कल्याणास गेले त्यास आपण मौजे म॥री होतो तो बाबाजी नारायण वोक खोती चालवू लागला त्यास आपण बोलिलो कि गांव सान्याचा त्यावरून वोक बोलले किं सान्यांचा म्हणतोस तरी तुझे आंगी गवत बांधून जाळीन, त्या दहशतीने आपण नरवणी येउन राहिलो, त्यावरुन बालाजीराम वर्तक याही आपणास पुसिले कि वोक हे त्या गावीचे काय ते हकीगत. वोक हे पुरातन पालसेतचे माहाजन मिरासदार तेथून मौजे मजकूरचा कोड किरवले येथे हरबाजी वोक येऊन राहिले त्यास सोबतीस कुलबी असामी तीन ठेविले. ( १ ) काना खडमडा ( १ ) रामा गोरीवक ( १ ) बहिरवकर सदरहु तिघे कुणबी व हरबा वोकाकडे किरवलेमधे ठेविले आगरवाडी करून राहिले येसी हकीगत आहे त्याउपर सान्याची अवस्था दिवसे दिवस क्षीण होत आली गावचा कारभार न उरके येसे जाहाले अन्नावस्त्रास कठीण जाहले मग सहजच वोक खोती करू लागले साने याची खोती राहिली त्यास हुदत अबदुलखान सीवजीने कबजा केला त्या पासून कमाविसी गांवची वोकाकडेस चालली त्याउपरी आपणास पुसिले...सांगितले गावाचा अष्टाधिकार...( वगैरे सर्व सान्याचे ) आपणास उमर वरसे नव्वद जाहाली असेत.... हे तकरीर सही छ १२ रबिलाकर[1] स्वदस्तुर पाट रंग भिकाजी खोत कर्दे...साक्षी... ...( नरवणचे )

..........

श्री

तकरीर करीना मौजे कोतळीक....तकरीर करता काना महार बिन सुकवटी कदीम मिरासदार मौजे मजकूर हल्ली मौजे नरवण....सुमा खमस अशर मया व अलफ[1] आपणास पुसिले गाव सोडून का रहातो आपण...पहिले कटकटेहून गाव टाकून येथे आलो कटकट कोणते ? त्यास...राजश्री संभाजीराव सिर्के याणी आपला गाव म्हणून जोराजारीने येउन गावी राहिले राजश्री नारो महादेव साने मौजे कापरे ता. हवेली...त्यानी सिर्केस पुसिले...इतर गाव आमचा....मग सुभेदाराकडे...सिर्के

---

१. नवंबर १७१५.

२. सन १६९८

यास गावावरून बाहेर घातले. आपण नरवणीस होतो. नारोपंत गावी येऊन गेले दोन वर्से होते अंजनवेल हबशाने घेतली ते फिसरतीमध्ये नारोपंत साने कल्याणास गेले त्यास आपण मौजे मजकुरी होतो तो बाबाजी नारायण वोक खोती चालवू लागला त्यास आपण बोलिलो गाव सान्याचा...जाळण्याचा दम दिला म्हणून नरवणला राहिलो.... वर्तकाने पुसिले...बोलिलो वोक पुरातन पालसेतचे महाजन मिरासदार मौजे मा।रचा कोड करिवल येथे हरबाजी वोक येऊन राहिले.

पे. द. द. को. रु. ४३१ ] श्री [ **लेखांक २१**

आज्ञापत्र समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री माधवराव पंडीत प्रधान ता... मौजे कोतलिक ता. वेलंब तालुके अंजनवेल सुभा दाभोळ सुहुरसन इहिदे समानीन मया व अलफ [1] शके १७०२ शार्वरीनाम संवत्सरे नारो वासुदेव व विसाजी केशव साने खोत मौजे मजकूर यानी हुजूरकडे पुणें येथील मुक्कामी येउन विनंती केली कि मोजे मजकूर येथील खोती पुरातन वतनी आमची असता भास्कर बाबाजी वोक कज्या करू लागले सबब त्यांची व आमची मनसुबी सन सीत सितैन मया व अलफ [2] चे साली हुजूर पडली तेव्हा त्याणी व आम्ही तकरिरा व फुरसीसांची उत्तरे व राजिनामे लेहून देऊन जामीन दिल्हे आणि आपआपले साधकाचे कागदपत्र आणून दाखविले ते पाहून उभयता पासून साक्षीदाराचे मान्यतेची यादी लेहून घेऊन त्याप्रमाणे सडया घ्यावयास सरकारातून बालाजी निळकंठ कारकून यांस श्री कऱ्हाटेश्वर मौजे नांदिवडे ता. सैतवडे तालुके रत्नागिरी येथे पाठविले त्यांनी श्रीचें देवालई साक्षीदारास प्रथकाकारे पुरसीसा करून सडया लेहून घेतल्या त्या ज्याच्या त्यानी श्रीचे पिंडीवरून उचलून दिल्या त्या वगैरे कागद सरकारचे दप्तरी आहेत ते पाहून मनसुबीचा फडशा जाला पाहिजे. म्हणून त्याजवरून हरदु जणाच्या तकरीरा व फुरसीसांची उत्तरे व साधकाचे कागदपत्र व साक्षीदाराच्या सडयातील सारांश याजवरून हुजूर पंचाइत मते मनास आणिता केसो हरी सावरकर मोकादम मामले हमदाबाद वगैरे पंधरा असामीचें सडीत खोती वोकाची वतनी म्हणून लिहिले त्यातच आबाजी विचारे खोत मौजे पोमेंडी ता. मा।र व रामाजी नारायण दिवेकर मोकादम व भास्कर जोसि बिन रघुनाथ जोशी मौजे पालसेत ता. गुहागर व केसो हरी सावरकर सरमोकादम व सुर्याजी चव्हाण कोकणराव देसाई मामले हमशाबाद व बोपाजी बिन रामभट खरे धर्माधिकारी ता. गुहागर या साहा आसामीनी वोकांचे वडील पासेताहून आले म्हणून लिहिले. पो॥. जाजती केसो हरी सावरकर

---

१. इं. स. १७८०–८१, २. इ. स. १७६५–६६,

यानी सान्याचा घरबंद गावी आहे व आबाजी विचारे यांनी शिवाजी महाराज यांचे पहिले आमदानीपासून वोक खोती करतात. केसो महादेव वोक पालसेताहून आला. त्यापासून भास्कर बाबाजी पावेतो पाच पुरुष जाले व सान्याचा घरबंद गावी आहे. म्हणोन लिहिले आहे व हरी गोरिवला कुणबी कोतळीककर व धोंडया बिन लखमा व भिक्या बिन कान्हा बाबा बिन संभ्या महार हे तिघे वोकांचे वेळेस उपरी गावात येऊन राहिले या चौघांनी सान्याचे घरबंदावर फनसाचे झाड होते ते भास्कर बाबाजी तोडू लागला ते समयी वतनदाराचे झाड म्हणोन गावकरी यांनी मना केले असता बळेच तोडिले म्हणून लिहिले आहे पो। ज्याजतीत तिघा माहारानी वोकांची घरे आहेत ते जागा गावीक म्हणोन लिहिले आहे व राणोजी बिन साबाजी सुर्वे खोत मोजे झोमडी ता. वेलंब यांनी हरबाजी केशव वोकापासून वोक खोती करु लागले म्हणोन लिहिले आहे व रंभाजी बिन बापूजी चव्हाण खोत मौजे मढाल व राम सालवी बिन कृष्ण सालवी खोत मौजे जामसूत व धर्माजी बिन रामजी खांब्या वतनदार कुनबी मौजे पांगारी ता। मार हे चौघे भोवरगावचे यांनी खोती वोकांची म्हणून लिहिले ते अलिकडील भोबवटयावरुन असे सिद्ध झाले येणें प्रमाणे पंधरा असामीचा मजकूर या खेरीज दहा आसामीनी वोकांचे वडील पालसेताहून आले पो। अप्पाजी रूद्र काटदरे खोत मौजे सीर व खंडोजी बिन बाजी नलवडे खोत मौजे पाल व रुद्रभट बिन दत्तात्रय भट आवरेकर व मालजी बिन राम सालबी कुंभार व दादजी बिन गोंदजी बांदवटा....या नऊ असामीनी हरबाजी केशव वोक पालसेताहून आला त्यापासून भास्कर बाबाजी पावेतो च्यार पुरुष जाले व अंनतभट बिन बापूभट आचार्य आवरेकर यानी केसो महादेव वोक पालसेताहून आला त्यापासून भास्कर बाबाजी पावेतो पाच पुरुष जाले म्हणोन लिहिले आहे पौ। जाजती म्हतोजी भेंकराव.... या तिघानी हबशानी अंजनवेल घेतली तेव्हापासून वोक खोती करू लागले व कृष्ण सालवी याणे साने परागंदा झाल्यापासून वोक खोती करतात व वोकांची घरे आहेत ते जागा तेली व सोनार यांची व गोपाल सेट सेनार व बालाजी सीगवण या दोघानी ही वोकांची घरे आहेत ते जागा तेली व सोनार याची आहे म्हणून लिहिले येणेप्रमाणे दाहा आसामींचा मजकूर व पूर्वी बालाजीराव वर्तक सुवर्णदुर्गाहून मामले मजकुरी पाहाणीस आले त्यावेळेस सडया जाहल्या त्यापैकी सात सडया अस्सलच हाली सान्याजवळ आहेत त्यास सदसष्ट वर्षे जाली त्यात वरील पंधरा आसामी पो। केसो हरी सावरकर याचे वडील दादो कृष्ण सावरकर व आबाजी विचारे याचे वडील गणोजी विचारे यानी व किटोबा गणेश मोकादम मौजे हेदवी ता. गुहागर व....येकूण सात असामीनी पष्टच पुरातन वतनी खोती सान्याची वोकास संबंध नाही देवाची पालखी वगैरे खोतीचे मान सान्याचे म्हणोन लिहिले पो।......याणी हरबाजी केशव वोक पालसेताहून आला म्हणोन लिहिले आहे व या सात सडया पो। किटो गणेश याची येक सडी...व या दोन सडया भास्कर बाबाजी वोक त्यांचे मातोश्रीचे बंधू बालाजी निळकंठ जोगळेकर महाजन मौजे हेदवी याचे बिकलमाच्या आहेत ते अक्षर त्यांचे पुत्र भिकाजी बल्लाळ जोगळेकर या कज्या संमधे

वोकास वर्तणुकेस जामीन आहेत त्यानी पाहून आपले तीर्थरुपाचेच दस्तुर खरे म्हणोन लेहून वदल्हे व वोकानीही आपले वडील पालसेताहून आले म्हणोन तकरीरेत लेहून दिल्हे तेव्हा पिंधरा असामीनी वतनी खोती वोकांची म्हणोन लिहिले ते प्रमाण नव्हे व कोणीकोणी सडीदारानी फुलगावी घर वोक व मान वोकांकडे चालत आले म्हणौन लिहिले तेही चालत्या भोगवटयावरून लिहिले असे घडते व वोकांनी तीन कौल आपले साधकाचे दाखविले ते अलिकडील यावरून पहाता वतनी खोती वोकांची असे सिद्ध होत नाही ते खोटे भांडण भांडले त्यास मौजे मजकूरचे खोती विसी अर्थाअर्थी संबंध नाही, ..... घनवटकरांनी आपली कन्या सान्याचे घरी दिली होती तिजकरिता घनवटकरानी येक पाट सान्याचे दाराजवळ आणिला. श्रीमंत कैलासवासी शिवाजी महाराज यांचे वेळेस महादाजी नारायण सानें खोती करित असता हरबाजी केशव ओक पालसेताहून आला. त्यास किरवाल कोड मौजे मजकूर येथे सान्यानी जागा देऊन ठेविला. व वोकास सान्यानी बागेवर चाकर ठेविले व खोतीची मुतालकी सांगितली होती व श्रीमंत कै. ताराबाईसाहेब यांचे कारकिर्दीस ... पुढे सानें परागंदा झाल्यावर बाबाजी नारायण वोक खोती करू लागला. त्यावर कांही दिवसी रामाजी नारायण साने गावी आले त्यास वोक खोतीवसी कज्या करू लागले. पुढे सुवर्णदुर्गाहून बालाजी राम वर्तक पहाणीस आले त्याजपाशी रामाजी नारायण साने यांनी खोतीचे वर्तमान .... त्यांनी पुरसीसा सडया घेतल्या. त्यास खोती सान्यांची वोकांचा संबंध नाही. म्हणून लिहून दिल्हे. परंतु फडशा न जाला. वोक खोती करीतच होते. त्यापैकी निमे खोती सिदी सैद याने हबशाचे कारकिर्दीस केली. त्याचे व वोकांचे न बने सबब वोक परागंदा होऊन जैगडी गेले मागे हजारदार खोत खोती करत होते. गावास तोटा येऊ लागला तेव्हा सिदी सात हबशी यांनी सानेला दिला वतनदार म्हणोन नरसो महादेव साने यांस कापन्याहून आणून निमे गांव त्याचे स्वाधीन केला. सिदि सात खोती करीत होता.... पुढे आंग्रे यांनी अंजणवेल घेतली त्यावेळेस भास्कर बाबाजी वोक येऊन खोती करू लागले तेव्हां त्याची व वासुदेव नारायण साने याची मनसुबी अंजनवेलीस पडली तेथे ज्या सडीदारानी सान्याची खोती असी साक्ष दिली त्याजबर जबरदस्ती जाली, फडशे झाला नाही. तेव्हा सान्यानी आपले जागेवर घर बांधनवयाची चिट्टी घेतली, परंतु वोकांनी कजिया केला यामुळे घर बांधले नाही. वोक खोती करीतच होते. सान्यानी पत्र सनसलास ईशरीन मया व अलफचे[३] दाखविले (पत्र नवे त्यावर मागील सन घातला. असे वोक म्हणाले) सैद अबदलाच्या मुखे तीन महिन्यानी पुरवून देवू. न देऊ तर हजार रुपये गुन्हेगारी सरकारात देऊ म्हणून भास्कर बाबाजी वोक यानी समान सितैन मया व अलफ छ ७ रजबी[४] हुजूर कतबा लिहून दिला. त्याप्रमाणे चौकशी करीता पुरवणी झाली नाही. तेव्हा पत्र प्राचीन खरे यावरून पाहता मौजे मारची पुरातन वतनी खोती सान्याची

---

३. इ. स. १७२२–२३, ४. ता. २९ नवंबर १७६७,

वोक खोटे झाले....सरकारातून निवाडा पत्र करुन देवुन हे आज्ञापत्र सादर केले असे....

दादो कृष्ण सावरकर याचे पत्र ( वरील कजियाचे संदर्भात ) मौजे कोतळीक हा गाव पूर्वी कोतापूर शहर होते ते मोडिले पुढे गाव वसला त्याचे नाव कोतळूक ठेविले, तेथील खोती सान्याची. हरबाजी केशव ओक पालसेताहून आला तो किरवाल कोडात राहिला. साने वोक यांची सोयरिक जाली पुढे सान्यानी वोकास चाकर ठेविले भालेराईत साने मोडकळीस आले खोती वोक करू लागले. सिक्र्यानी गाव घेतला तेव्हा बाबाजी नारायण वोक यासी नारो महादेव साने याणी बरोबर नेऊन पंत अमात्य याजकडून... गाव दूर करविला.

अबाजी विचारे याचे सडीत-शिवाजी महाराजांचे अमदानीपासून वोक खोती करीत आले त्यांची नावे केसो महादेव वोक पालसेताहून आला त्याचा लेक हरबाजी केशव त्याचा लेक नारो हरी त्याचा लेक बाबाजी नारायण-त्याचा लेक भास्कर बाबाजी अजमासे सव्वाशे वर्षेपर्यंत वोक खोती करीत आले म्हणून भास्कर बाबाजी वोक याणी तकरीर व पुरसीसांची उत्तरे लिहून दिली त्यातील खुलासा मामले हमजाबाद येथे अजम वोकांचे खोतीचे देहे बीतपसील.

| किता | किता |
|---|---|
| १ कसबे वेलंब | १ मौजे पांगारी |
| १ मौजे कोतळीक | १ मौजे मळण |
| १ मौजे सिवने | १ मौजे बोरगांव |
| १ मौजे बामणोली | १ मौजे जानवले |
| ४ | ४ |

एकूण आठ गांव आमचे पुरातन वतनी परंतु कोणत्या पुरुषास कोण गांव कोणे कारकीर्दीत कसा प्राप्त जाहला हे व मूळ पुरुषापासोन वडिलांची नावे ठाऊक नाहीत. पो।। मौजे कोतलीक आमचे अलिकडील पुरुषाची नावे महादोबा वोक याचा पुत्र केसोबा याचे पुत्र वडील रामाजी त्यास संतान नाही दुसरे हरबा याचे नारोबा याचे आपण भास्कर बाबाजी...सिदीसातचे जमेना म्हणून आपला बाप बाबाजी नारायण परागंदा होऊन मौजे नांदिवडे ता।। सैतवडे येथे राहिला ( कौल आला परत यावे आपण लहान म्हणून सेणवी यास मुशाहीरा देऊन ठेविले )... आपले पणजे यासी पुत्र चार ...... नारोबा वडील दुसरे कृष्णाजी याजकडे कोंड कीरवले कुडियाट-तिसरे पुत्र बालाजी याजकडे कोंड ताबा सडकुडीयाट चवथे विसोबा याजकडे कोंड भरकाडे ढेप जमिन ... आठगांव वोकाचे याचा मुळ पुरुष पालसेताहून आला आख्या आहे आमचे चुलत आजोबा कृष्णाजी यानी दरीचा बाग केला पाणि गांवचे जमिनीतील आहे जामसूदचे आणिले नाही........छ ७ रमजाने सनइहिदे लमानित भाद्रपद[५] मास. ꣸ ꣸

---

५. ता. ७ नवंबर १७८०.

जमाव द. को.
रु. ४५७ ]

[ **लेखांक २२**

## साने वोक खोतीचा तंटा

साने–नारो गोविंद यासी पुत्र गोविंद नारायण याचे पुत्र १ नारो गोविंद १ केसो गोविंद–नारो गोविंद यास पुत्र महादजी नारायण, विश्वनाथ नारायण, चिमणाजी नारायण, याचे नकल. महादजी नारायण यास पुत्र १ नारो महादेव, १ नरसो माहादेव, १ गणेश भट याचे नकल. नारो महादेव यास पुत्र वासुदेव नारायण, रामाजी नारायण व लक्ष्मण नारायण याचे नकल. वासुदेव नारायण याचे आपण १ नारो वासुदेव, १ दत्तो वासुदेव, केसो गोविंद याचे पुत्र राघो केशव–चितल्याचे भाचे–चितल्यास संतान नाही सबब मौजे कापरे ता।। हवेली हमदाबादची खोती भाचास दिली. राघो केशव यांचे पुत्र १ कृष्ण भट, १ केशव भट, उभयतांचे नक्कल. विश्वनाथ नारायण यास पुत्र सहा पैकी पाचांचे नकल. केशवभट यांचे आपण १ विसाजी केशव, १ भिकाजी केशव. नरसो महादेव यास पुत्र १ सदाशिव नरसो, १ विठ्ठल नरसो– यांचे पुत्र सदाशिव नरसो याचे पुत्र कापऱ्यात आहेत नारायण भट त्याचे नाव १ विठ्ठल नरसी याचे पुत्र कृष्णाजी विठ्ठल कल्याण प्रांती आहेत. अिदील शहाचे कारकीर्दीस आपले पणजे नारो गोविंद खोती करीत होते. श्रीमंत कै. सिवाजी महाराज याचे अमलात आपले आजोबा महादजी नारायण साने खोती करीत होते. त्यासमयी हरबाजी केशव वोक पालसेतास होते त्याचे घरावर दरोडा पडला. ते आपले सोअिरे यास्तव त्यास आणून कीरवळ कोंड मौज मजकूर येथे कुंभार सालवी याचे वतनी जाग्यावर ठेविले ....... पुढे परीच्या बागेवर नारो हरी वोक यास चाकर ठेविले त्यास मुशाहिरा साल रु. २५ व गलाखंडी १ या प्रमाणे घेवुन चाकरी करीत होता त्याचा लेक बाबाजी नारायण यानेही दहापांच वर्षे चाकरी केली पुढे भालेराअी[1] जाहली - - - पुढे हबसी याने अंजनवेल घेतली.[2] ते समअी नारो महादेव साने यांणी बाबाजी नारायण वोक यास गावावर ठेवून आपण भाऊबंद सुद्धां कल्याण प्रांतास गेले. पुढे हबसी याचा कौल जाहला तेव्हा मौजे कापरे ता. हवेली येथील निमे खोती आपली सान्याची सबब तेथे येऊन राहिलो. रामाजी नारायण साने कोतळूकास गेले. तेव्हा बाबाजी नारायण वोक यांनी खोती विसी तंटा केला. त्याप्रसंगी राघोबा नाईक दर्वे वोकांचे आप्त भीड दरबारी. यास्तव साक्षीदारास खोड्यात घातले ते कुणबी जिवंत आहेत. त्यास रूबरू आणून फुरसीस करावी - - - - सड्या माहाराच्या त्यातील मजकूर खोती सान्याची असा आहे. सिदी सैद यानें खोती केली यामुळे वोक परागंदा होऊन जैगडास गेले. खोतीत तोटा येउ लागला. - - - - वतनदार खोत कापऱ्यास आहेत. म्हणोन दिद्दी सात हबसी यानी सन तिसा अशर मया व अलफमध्ये रोखा करून केसो विश्वनाथ व नरसो महादेव

१ इ. स. १६८८, २ इ. स. १६९८,

यासी नेऊन ....तुम्ही निमे गांव तक्षीम करून मराठे दरबारचा ऐवज सव्वा दोनसे रुपये देणे....जंजिरे राजपुरीस जाऊन गांव दरोबास्त आपणाकडे करून घेतला....हबसी याचा अंमल अठेचालीस वर्षे होता ते समयी बाबाजी नारायण वोक याणी काही दिवस खोती केली व काही दिवस गाव उजाड होता....भास्कर बाबाजी वोक याणी तकरीर व पुरसी-सांची उत्तरे लिहून दिल्ही त्यातील खुलासा मामले हमदाबाद येथे आम्हा वोकांचे खोतीचे देहे बी तपसील.

| कित्ता | कित्ता |
|---|---|
| १ कसबे वेलंब | १ मौजे पांगारी |
| १ यौजे कोतलुक | १ मौजे मलण |
| १ मौजे सिदने | १ मौजे बोरगाव |
| १ मौजे बामणोली | १ मौजे जानवले |
| ४ | ४ |

एकूण आठ गाव आमचे पुरातन वतनी परंतु कोणत्या पुरुषास कोण गांव कौणे कारकीर्दीस कसा प्राप्त जाहला हे वडील पुरुषापासून वडिलाची नाहे ठाऊक नाहीत. पो।। मौजे कोतळूक आमचे अलिकडिल पुरुषांची नावे महादोबा वोक याचा पत्र केसो महादेव याचे पुत्र वडील रामाजी केशव त्यास संतान नाही दुसरे हरबाजी केशव याचे पुत्र नारो हरी याचे पुत्र बाबाजी नारायण याचे आपण भास्कर बाबाजी यापमाणे खोती यवंशपरंपरागत चालत आली सिद्दी सात ३याचे अंमलात आम्ही खोती करीत असता सिद्दी सैद हुनावरी याणी निमे तक्षीम केली याचे आपले न जमे याजकरिता आपला बाप बाबाजी नारायण परांगदा होऊन मौजे नांदिवडे ता।। सेतवडे येथे राहिला गांव हबशा-कडे पाचसात साल होता. सिद्दी सात व सिद्दी शेख हुनावरी याचा पेच पडला. गाव उजाड. पंतप्रतिनिधी खाली उतरले.४ ...पुढे सिद्दी वडेल याचे अमलात आपणास कौल पाठविला आपण लहान म्हणून पांडुरंग शेणवई नेमिला ५-७ वर्षे चालविला ( पुन्हा तंटा व तह ) खोती करीत राहिलो. आपले पणजे हरबाजी केशव वोक खोती करीत असता सान्याचा वडील देवरुखाहून आला म्हणोन आपले आजीने सांगितले त्याचे नाव काय व कोठील वतनदार ठाऊक नाही. आमचे वडिलाजवळ जागा राहावयासी मागितली त्यास आपले पणजे रामाजी केशव याचे घरवंदावरी सान्यास जागा दिली तेथे दाहावीस वर्षे होते तेथून मौजे कापरे येथे गेले.

आपले पणजे यासी पत्र चार एकत्रात होते काही दिवसी विभक्त जाहले घरे फुल गावातच होती कीर्दीस्तव केत दिलाने जमीन वाटुन घेतली फुलगावी नारो हरी वडील पुत्र याजकडे भात जमीन अदमासे वीस बिघे दुसरे पुत्र कृष्णाजी हरी याजकडे कोंड किरवल कुडयाट जमीन चार पाच बिघे व बागाईत बिघा दीड बिघा तिसरे पुत्र बालाजी हरी

३ सुमारे इ. स. १७२५, ४ इ. स. १७३२

याजकडे कोंड तांबसडा कुडीयाट जमीन सात आठ बिघे चौथे पुत्र विसो हरी याजकडे कोंड भरकाड ढेप जमीन नाही या प्रमाणे चौघानी वाटून घेतली व वरकस जमीन अजमासे घेतली असे आपल्या आजीने सांगितले कोंडास खोत आमचे खेरीज दुसरा नाही. अंजनवेल सरकारात घेतली[1] तेव्हा आपण तेथें होतो. तुलाजी आंगरे याचे कारकीर्दीस वासुदेव नारायण साने खोतीचे काजेयास उभे राहिले......सरकार अमल जाल्यावरी सन सबा खमसैन मया व अलफेचे साली[2]रामाजी महादेव पण्यास आले होते तेव्हा वासुदेव नारायण साने त्याजवळ उभे राहिले. पुण्यात होते त्यांच्या सडया घेतल्या. त्यावर सन तिसा खमसेन मया व अलफ[3] साली साने याने शके १३६८ या शकातील[4] पत्र चिमाजी माणकर याचे वेळेस अंजनवेलीस दाखवून मनसुबीस उभे राहिले.

रघुनाथभट आचार्य साक्ष : कोतळूकचे नाव पूर्वी सुरल कोतापूर होते तेव्हा नानल खोत होते पुढे सुरल गाव अलाहिदा जाला. कोतापूरचे कोतळीक जाले. नानलाने कोतळीकची खोती सान्यास दिली. नानल सुरलची खोती करीत होते.

पे. द. द. को. रुमाल ४३१ व रुमाल ६५३ ] राजमंडळ सुमासीत [ **लेखांक २३**

..........दफाते पत्रे छ१५ रविलाखल[5] मुा पुणे
.........( येथे एक पत्र व त्याखाली हे दुसरे )

छ १५ रविलाखल[6] मुा पुणे विसाजी केशव साने व भास्कर बाबाजी वोक याचा मौजे कोतळूक ता. वेलंब सुभा दाभोळ तालुके मार येथील खोती विसे कजिया लागोन मनसुबी हुजूर पडली आहे त्या सान्याजवळ खोतीचे साधकाचा कागद शामलाचा आहे तो अकलीडला.......तीन महिन्यांनी खरे करून देतो नाहीतर......म्हणून भास्कर बाबाजी याणी सन समान सितैनात[7] कतबा लिहून दिल्हा......मुदत टळून नऊ वरसें जाहली ......यास्तव मौजे मारचे खोतीचे वतन सरकारात जप्त करून हे सनद तुम्हास सादर केली असे.

---

१. इ. स. १७५२, २. इ. स. १७५६-५७, ३. इ. स. १७५८-५९,
४. इ. स. १४३६,
५. व ६. ता. १३-८-१७७५.
७. इ. स. १७६७.

पे. द. द. को. रुमाल ४३१ ] [ **लेखांक २४**

श्री.

जमा अैवज माहालपोते स्वारी राजश्री पंतप्रधान कमाविस हरकी बाा नारो वासुदेव व त्रिसाजी केशव साने याचा व भास्कर बाबाजी वोक याचा मौजे कोतळीक ता ।। वेलंब तालुके अंजनवेली येथील खोती कजिया होता त्याचा फडशा होवुन साने सर जाले. सबब सान्याकडे हरकी करार केली ते जमागु ।। माहादाजी बल्लाळ कारकून सिलेदार १००१ रु. येकूण येक हजार येक रुपया पोता जमा असेत जाणिले छ १३ रविलावल सु।। समानीन मया व अलफ[1]

पे. द. द. को. ६५३<br>...द. को. ४२१ ] [ **लेखांक २५**

राजमंडळ

स्वारी......छ १ माहे रजब तीसा सबैन मया व अलफ[2] दफाते पत्रे मौजे कोतळीक ता....येथील खोतीविसी साने व वोक याचा कजिया लागला होता त्याजहून मौजे मजकूरची जप्ती सरकारातून करून जप्तीचे कामकाजास सिवाजी घोडेदेवकर यास हुजूरुन पाठविले आहेत. त्यास भास्कर बाबाजी वोक याणे बाणकोटास जाअुन तेथून मौजे मजकुरावर स्वारी घालून गाव जालिला याजमुळे कीर्दीची खराबी होवून गावाकडे बाकी रु. १६३ येकशे त्रेसष्ट रुपये राहिले त्याजकरिता तुम्ही कारकुनास तगादा लाविला आहे म्हणून.......बाकी राहिंले आहेत ते तुम्ही तालुके मजकूरचे हिसेबी नुकसान खर्च लिहून जप्तीचे कारकूनास तगादा न लावणे म्हणोन कृष्णाजी विश्वनाथ याचे नावे सदन

पे. द. द. को.<br>कमाल ४२१ ] [ **लेखांक २६**

राजमंडळ

स्वारी राजश्री पंतप्रधान सु।। समानीन मया व अलफ[3] जमा सालमजकूर ता अंजनवेल नि।। त्रिंबक कृष्ण छ २४ सफर[3] माघमास दफाते पत्र

---

१. ता. २० मार्च १७८० ३. ता. १ मार्च १७८०

२. ता. २६-७-१७७८

नारोबा वासुदेव व विसाजी केशव साने याचा व भास्कर बाबाजी वोक यास मौजे कोतळूक ता. वेळंब......खोती विसी कजिया......मौजे मजकूरचे वतन सान्याचे वोक पालसेतकर यास सान्यानी आणून किरवाल कोडात ठेविले पुढे काही दिवसी खासगत बागेचे कामावर चाकर ठेविले,......साने रोजगारास जावू लागले तेव्हा वोकास आपले तर्फेने गावी खोतीचे कामकाज सांगोन ठेविले पुढे राज्यक्रांतीमुळे सान्ये व वोक परागंदा जाहले मागे गावची खोती हबसी वगैरे वाधेकरी करीत गेले अलिकडे बाबाजी नारायण व भास्कर बाबाजी वोक खोती करू लागले......खोती सान्याची.......खरी...... वोकास पंचाईतीने समजाविले त्याप्रमाणे न वर्तोन गैरहजीर होवून कुटुंबासुद्धा इंग्रजाचे तालुक्यात पळोन गेले......जप्ती मोकळी करून सान्याचे हवाली करणे.......

ᔕ ᔕ

पे. द. द. कों रु. ४२३ ]
,, – रु. ६५५ ]

[ **लेखांक २७**

राजमंडळ

इहिदे मयातन व अलफ[२] शके[१] १७२२

स्वारी रा......सुभा इहिदे समान सितैन[३] जमा साल मजकूर तालुके अंजनवेल निसबत बाळकृष्ण बापूजी दफाते पत्रे–छ १९ सफर ऊर्फ आषाढमास[३] भिकाजी बल्लाळ वोक खोत मौजे कोतळूक ताा वेलंब सुभा दाभोळ तालुके मजकूर यानी हुजूर येवून विदीत केले......मौजे मजकूर वगैरे गाव आठ मामले हमजाबाद सुभे मजकूर येथील खोतीची वगैरे वतने पुरातन आम्हा वोकांची आम्हाकडे चालत आली आहेत. त्यापैकी मौजे कोतळूक येथील खोती आमचे निपणजे हरबाजी वोक याजकडे चालत असता सान्याचा वडील कसबे देवरुख येथून मौजे मजकूरी आला त्यास हरबाजीने आपले वडीलभाऊ रामाजी याचे घरवंदाची जागा वोस पडली होती त्या जाग्यावर राहावयास जागा दिल्ही तो तेथे दाहावीस वर्ष राहून परागंदा जाहला त्याचे वंश वासुदेव नारायण सान्ये यानी तुळाजी आंग्रे याचे कारकीर्दीत[४] येवून मौजे मजकूरचे खोतीविसी आम्हासी कजिया करू लागला......त्याची मनसुबी......आम्ही खरे जालो सान्ये खोटे जाले तेव्हा साने विजयदुर्गास जातो म्हणोन गेले ते विजयदुर्गास न जाता सातारियास पलोन गेले....नंतर तीन वेळा कजिया केला...त्याची आमची मनसुबी श्रीमंत कैलासवासी थोरले माधवराव साहेब याजपाशी सरकारात पडली याजकरिता रामशास्त्री यानी आम्हा

---

१. इ. स. १८०० २. इ. स. १८००–०१
३. ता. १६–७–१७६७ ४. इ. स. १७४५

अुभयता वाद्यांच्या तकरिरा व पुरसिसा घेअुन......श्रीकरूटेश्वरदेव मौजे नांदिवड तालुके रत्नागिरी याचे देवालयी घेवून त्यावरून....वतन आमचे खरे जाहले...तेव्हा सिवाजी केशव सान्ये महायात्रेस निघोन गेले...आम्ही वतन चालवीत आलो असता श्रीमंत कै॰ मातुश्री गंगाबाजी साहेब किल्ले पुंरदरास गेली तेथे सखाराम विश्वनाथ साने याचे आधिपत्य होते....गैरकावा समजावून...खोती चालवू लागले सबब तेव्हापासून आम्ही कुटुंबासुद्धा परागंदा होवून इंग्रजाचे मुलकांत राहिलो तेथे आजपर्यंत वीस बावीस वर्षे तिकडेच राहून जीवमात्र रक्षण केले आहेत. सान्ये याचे हिमायतीपुढे आमची दाद लागली नाही.....सान्ये याने सन अिहिदे समानीनात[1] खोतीविसी पत्र करून घेतले... जंजिरा राजपुरी येथील खुर्दखत सन सलास अशरीन मया व अलफचे[2] सान्यानी आणून दाखविले....पुरंदरचे गडबडीत ते हबशापासून मागील सन घालून करून घेतले या प्रमाणे पुरसन देअु असे भास्कर बाबाजी वोक याने कबूल करून त्याची पुरवणी वोक याच्याने जाहली नाही तेव्हा प्राचीन पत्र खरे....वोक खोटे जाहले....तुलाजी आंग्रे व रामाजी महादेव याजपाशी मनसुबी पडली तेथे वोक हिमायती करू लागले याजकरिता त्याचे भयामुळे तीनही वेळा खुर्दखत दाखविले नाही असे साने पुरसीसेत लिहून देतात त्यास येकादे वेलेस वोकांची जबरदस्ती साने म्हणते तर त्याचे बोलणे प्रमाण वाटते तीनही वेला वोकांची जबरदस्ती...पत्रात विसाजी केशव साने याचे नाव आहे...सदरहू पत्रास ७७ वरसे होतात. पत्र जाहाले त्याकाळी विसाजी केशव सान्ये याची दाहा वर्षेची उमर होती असे वोक म्हणतात. त्या काली विसाजी केशव याचा बाप जिवंत होता विसाजी दहा वर्षांचे पत्र घ्यावयास जंजिरे यास जातील असे घडत नाही...हिजरीसन ११३४ व आरबी सन सलास अशरिन भया व अलफ...या दोहोत दोन वर्षांची तफावत पडते... खुर्दखत मागील सन घालून नवीन करून घेतले......खोतीचे वतन मानपान कानुकायदे असतील ते सुद्धा भिकाजी बल्लाळ वोक याजकडे चालवणे.......

पे. द. द. को. रु. ६५२ ] [ **लेखांक २८**

राजमंडळ रोजकीर्द

स्वारी राजश्री पंतप्रधान छ ८ माहे सवाल इहिदे सबैन मया व अलफ[3]

दफाते पत्रे

भिकाजी बल्लाळ खोत मौजे कोतळूक ता॥ वेलंब तालुके अंजनवेल यानी हुजूर विदित केले की आपल्यास बहिरवगडकडून सिक्र्याजी वतनदार सबब भात केली साडे

१. इ. स. १७८०–८१, २. इ. स. १७१२–१३

३. ता. २५–१–१७७१;

तिसेरी खंडी येक सन इहिदे सितैनात[1] सनद करून देऊन को। वेळंब पो। देविले त्यास सन समानात[2] किल्ला सरकारात आल्यापासोन चालत नाही तरी स्वामीनी कृपाळ होऊन चालविले पाहिजे म्हणोन त्याजवरून भात केली साडेतिसेरी खंडी १ यैक करार करून देऊन हे सनद सादर केली असे तरी सिर्क्याचे अमलात सदरहू भात येक खंडी पावत आल्याप्रा देत जाणे म्हणोन कृष्णाजी विश्वनाथ ता। अंजनवेल यास      सनद १

पे. द. द. को. रु. ६५४ ]      [ **लेखांक २९**

राजमंडळ

स्वारी राजश्री पंतप्रधान      छ२५ रजब समान समानीन मया व अलफ[3]

विसाजी केशव साने याने विनंती केली कि ... येक गाव नूतन इनाम करून दिल्हा पाहिजे म्हणून त्याजवरून मनास आणता ....... मौजे कोतळूक ता। वेलंब तालुके अंजनवेल हा गाव दरोबस्त देखील हवसी पटी कुलबाब कुलकानू हली पटी व पेस्तरपटीखेरीज हकदार व इनामदार करून जलतरु तृणकाष्ट पाषाण निधी निक्षेपसहित नूतन इनाम थास सालमजकुरा पासोन नूतन इनाम .... पुत्रपौत्रादी वंशपरंपरेने इनाम चालवणे ....

पे. द. द. कों. रु. ४३१ ]      [ **लेखांक ३०**

सु।। अर्बा मयातैन व अलफ[4]

अखंडित लक्ष्मी......रा. रा. रघुनाथ त्रिंबक गोसावी याजकडे सेवक बाजीराव रघुनाथ प्रधान — नमस्कार, सु।। अर्बा मयातैन व अलफ[5] मौजे कोतळूक...हा गाव...विसाजी केशव याजकडे इनाम चालत होता. ते मृत्यु पावले. त्याचे पुत्र सखाराम विश्वनाथ सरकार अपराधी सबब मौजे मजकूरचा सदरहू अंमल सालमजकुरी रा० खंडेराव निळकंठ याजकडे बंडवाले याचे बंदोबस्ताकरिता.......ठेवण्याची आज्ञा जाहली.

---

१. इ. स. १७६०–६१;      २. इ. स. १७६७–६८.
३. ता. २ मे १७८८.      ४ व ५. इ. स. १८०३–०४.

अुभयता वाद्यांच्या तकरिरा व पुरसिसा घेअुन......श्रीकरूटेश्वरदेव मौजे नांदिवड तालुके रत्नागिरी याचे देवालयी घेवून त्यावरून....वतन आमचे खरे जाहले...तेव्हा सिवाजी केशव सान्ये महायात्रेस निघोन गेले...आम्ही वतन चालवीत आलो असता श्रीमंत कै. मातुश्री गंगाबाजी साहेब किल्ले पुंरदरास गेली तेथे सखाराम विश्वनाथ साने याचे आधिपत्य होते....गैरकावा समजावून...खोती चालवू लागले सबब तेव्हापासून आम्ही कुटुंबासुद्धा परागंदा होवून इंग्रजाचे मुलकांत राहिलो तेथे आजपर्यंत वीस बावीस वर्षे तिकडेच राहून जीवमात्र रक्षण केले आहेत. सान्ये याचे हिमायतीपुढे आमची दाद लागली नाही.....सान्ये याने सन अिहिदे समानीनात[1] खोतीविसी पत्र करून घेतले... जंजिरा राजपुरी येथील खुर्दखत सन सलास अशरीन मया व अलफचे[2] सान्यानी आणून दाखविले....पुरंदरचे गडबडीत ते हबशापासून मागील सन घालून करून घेतले या प्रमाणे पुरसन देअु असे भास्कर बाबाजी वोक याने कबूल करून त्याची पुरवणी वोक याच्याने जाहली नाही तेव्हा प्राचीन पत्र खरे....वोक खोटे जाहले....तुलाजी आंग्रे व रामाजी महादेव याजपाशी मनसुबी पडली तेथे वोक हिमायती करू लागले याजकरिता त्याचे भयामुळे तीनही वेळा खुर्दखत दाखविले नाही असे साने पुरसीसेत लिहून देतात त्यास येकादे वेलेस वोकांची जबरदस्ती साने म्हणते तर त्याचे बोलणे प्रमाण वाटते तीनही वेला वोकांची जबरदस्ती...पत्रात विसाजी केशव साने याचे नाव आहे...सदरहू पत्रास ७७ वरसे होतात. पत्र जाहाले त्याकाळी विसाजी केशव सान्ये याची दाहा वर्षेची उमर होती असे वोक म्हणतात. त्या काली विसाजी केशव याचा बाप जिवंत होता विसाजी दहा वर्षांचे पत्र घ्यावयास जंजिरे यास जातील असे घडत नाही...हिजरीसन ११३४ व आरबी सन सलास अशरिन मया व अलफ...या दोहोत दोन वर्षांची तफावत पडते... खुर्दखत मागील सन घालून नवीन करून घेतले......खोतीचे वतन मानपान कानुकायदे असतील ते सुद्धा भिकाजी बल्लाळ वोक याजकडे चालवणे.......

पे. द. द. को. रु. ६५२ ] [ **लेखांक २८**

राजमंडळ रोजकीर्द

स्वारी राजश्री पंतप्रधान छ ८ माहे सवाल इहिदे सबैन मया व अलफ[3]
दफाते पत्रे

भिकाजी बल्लाळ खोत मौजे कोतळूक ता॥ वेलंब तालुके अंजनवेल यानी हुजूर विदित केले की आपल्यास बहिरवगडकडून सिक्याजी वतनदार सबब भात केली साडे

१. इ. स. १७८०–८१, २. इ. स. १७१२–१३
३. ता. २५–१–१७७१;

तिसेरी खंडी येक सन इहिदे सितैनात[1] सनद करून देऊन को॥ वेळंब पो॥ देविले त्यास सन समानात[2] किल्ला सरकारात आल्यापासोन चालत नाही तरी स्वामींनी कृपाळ होऊन चालविले पाहिजे म्हणोन त्याजवरून भात केली साडेतिसेरी खंडी १ यैक करार करून देऊन हे सनद सादर केली असे तरी सिर्क्याचे अमलात सदरहू भात येक खंडी पावत आल्याप्रा देत जाणे म्हणोन कृष्णाजी विश्वनाथ ता॥ अंजनवेल यास      सनद १

[ लेखांक २९

पे. द. द. को. रु. ६५४ ]

राजमंडळ

स्वारी राजश्री पंतप्रधान      छ२५ रजब समान समानीन मया व अलफ[3]

विसाजी केशव साने याने विनंती केली किं ... येक गाव नूतन इनाम करून दिल्हा पाहिजे म्हणून त्याजवरून मनास आणता ....... मौजे कोतळूक ता॥ वेलंब तालुके अंजनवेल हा गाव दरोबस्त देखील हक्सी पटी कुलबाब कुलकानू हली पटी व पेस्तरपटीखेरीज हकदार व इनामदार करून जलतरु तृणकाष्ट पाषाण निधी निक्षेपसहित नूतन इनाम थास सालमजकुरा पासोन नूतन इनाम .... पुत्रपौत्रादी वंशपरंपरेने इनाम चालवणे ....

[ लेखांक ३०

पे. द. द. कों. रु. ४३१ ]

सु॥ अर्बा मयातैन व अलफ[4]

अखंडित लक्ष्मी......रा. रा. रघुनाथ त्रिंबक गोसावी याजकडे सेवक बाजीराव रघुनाथ प्रधान — नमस्कार, सु॥ अर्बा मयातैन व अलफ[5] मौजे कोतळूक...हा गाव...विसाजी केशव याजकडे इनाम चालत होता. ते मृत्यु पावले. त्याचे पुत्र सखाराम विश्वनाथ सरकार अपराधी सबब मौजे मजकूरचा सदरहू अंमल सालमजकुरी रा॰ खंडेराव निळकंठ याजकडे बंडवाले याचे बंदोबस्ताकरिता.......ठेवण्याची आज्ञा जाहली.

---

१. इ. स. १७६०–६१;   २. इ. स. १७६७–६८.
३. ता. २ मे १७८८.   ४ व ५. इ. स. १८०३–०४.

पे. द. द. कों. रु. ६५५ ] [ **लेखांक ३१**

राजमंडळ

स्वारी राजश्री पंतप्रधान छ२२ रजब अर्बा मयातैन व अलफ[1]

दफाते पत्रे

मौजे कोतळूक ता। वेलंब तालुके अंजनवेल हा गाव विसाजी केशव साने याजकडे इनाम होता तो सालमजकुरी खंडेराव निळकंठ याजकडे बंडवाले यांचे बंदोबस्ताकरिता जदीद स्वार ठेवण्याची आज्ञा जाली त्यांचे बेगमीबद्दल करून दिल्हा आहे तो त्याजकडून दूर करुन साल मजकुरी मौजे मजकूर हा गाव बाळकृष्ण गंगाधर याजकडे जातीचे तैनातेत बद्दलमुशाहिरा करून दिल्हा त्यास गावची बेरीज रु. ८६७।।।० आठशे पावणे अडसष्ट रुपये तैनातेत धरावयाचा करार करून हे सनद सादर केली असे तरी मौजे मजकूरचा अंमल याजकडे चालवून आकार तालुके मजकूर येथील हिशोबी खर्च लिहीत जाणे म्हणून हरी रघुनाथ मामलेदार मौजे मजकूर यांचे नावे सनद १

ത ത

पे. द. घ. रु. ३७५ ] [ **लेखांक ३२**

खमस सितैन मया व अलफ[2]

.........मौजे केतकी, मौजे बिवली व मौजे करंबवणे ता। हवेली हमजाबाद तालुके मा।र येथील खोती केतकर व भितेकर यांचे तंट्यात जप्त करून भास्कर बाबाजी ओक यास कमाविस सांगितली.........

ത ത

पे. द. द. को. रु. ४३१ ] [ **लेखांक ३३**

छ२९ जमादिलाकर सु।। सीत सबैन[3] मु।। पुणे

.......मौजे केतकी मौजे बिवली व मौजे करबंवणे ता। हवेली हमजाबाद तालुके मा।र येथील खोतीची वतने-तंट्यात......तिन्ही गावाची खोत्यांची वतने सन खमस सितैनात अमानत करून भास्कर बाबाजी ओक यास कमाविस सांगितली......अमानत आहेत त्या मोकळया करून.......सन खमस सितैना पलिकडे महादाजी केतकर याजकडे चालत होती त्याप्रमाणे.......चालतील. ത ത

---

१. ता. ८-११-१८०३ २. इ. स. १६६४-६५.

३. ता. २७-८-१७७५.

पे. द. द. को. रु. ६५२ ] [ लेखांक ३४

राजमंडळ

स्वारी राजश्री पंतप्रधान छ २३ रमजान इसने सबैन मया व अलफ[1]

दफाते पत्रे

केशव नाईक सरदेसाई मामले प्रभावली व सुभा दाभोळ याणी हुजूर पुणियाचे मुकामी येऊन विदीत केले की दाभोळ सुभापैकी ता। वेलंब व ता। सावर्डे व ता। चिपळोण या महालाचे काही गाव बादरे मोकासी व कोकणराव चव्हाण व कासेकर सुर्वे व कोकरेकर दळवी व भास्कर बाबाजी ओक याचे निसबतीस आहेत त्या गावचा सरदेशमुखीचा हक द्यावयासी दिक्कत केली होती त्याचा सालगुदस्ता पेशजीच्या कागदावरून फडशा करून तुळाजी आंगरे याचे आखेरीपर्यंत चालत आले त्याप्रमाणे हक आम्हाकडे चालवावयासी सुभास व रयतेस हुजरून पत्रे दिली ती घेऊन सुभा अंजनवेलीस गेलो तो सरसुभेदार कर्नाटकात गेले......हक दिला नाही तो देवणे म्हणोन कृष्णाजी विश्वनाथ यास

चिटणीशी पत्र १

पे. द. पुणे जमाव १३४ ] श्री [लेखांक ३५

बक्षिसनामा शके १६९७ मन्मथनाम संवत्सरे माहे माघ शु।। १ रविवार[2] ते दिवशी रा. खंडो गणेश इ।। बालाजी वोक माहाजन पालसेत हल्ली वस्ती कसबे पुणे यास सुभानराव बिन यशवंतराव सितोले देशमुख प्रांत पूणे सन ११८५ कारणे लेहून दिधले ऐसे जे आपला व मावाबांदाचा कजिया येशवंराव याचे वोटीत आम्हास घातले याचा पुत्रपणाचा होता. तो सालमजकूरी सरकारातून येशवंतरावाचे लेक आम्ही खरे होऊन देशमूखीचे वतन पैकी वाटीयाचे अैवजी मौजे मूढे व मौजे येल्हवडे सेरी सुद्धा तूर्त नेमून देउन सनदा गावास व पुत्रपणाचे निवाडपत्र सरकारातून करुन दिल्हे त्यास आम्ही तुम्हापासून सरकारचे नजरेस व दरबारखर्चास अैवज घेतला वगैरे कितेक कामाकाजा- मुळे तुम्ही आम्हास उपयोगी पडला म्हणून आपण तुम्हास खूशरजाबंदीने बागाकरिता जमीन जिराअित आपले वतन देशमखीचे व दौलत समंधे पुरातन बाबुराव याचे वडील संताजी बावा व आपले वडील येशवंतराव बावा एकत्र होते ते समयीची वाटणी देशमुखी समंधे पुरातनची आहे त्यापैकी मौजे पाशाणे ता. हावेली प्रांत पुणे येथील जमीन वगैरे निंमे बाबुराव व निमे आपन त्यापैकी आपला बाग खेरीज करुन जिराअित जमीन बिघे

१. ता. ३०-१२-१७७१

२. ता. ३१-१-१७७६

१५ पंधरा तुम्हास बाग करावयास् व कुरण पैकी गवत पुले सुमारी ५००० पांच हाजार निघे अैसी जागा देऊन मौजे पाशाणे पैकी वाटणी न सुटे तर मौजे येल्हवडे नवे व पेशजीची झुरसीगावी या दो गावापैकी आपले गावापैकी जिराअित जमीन बाग होअील अैसी सुमारे २० वीस देउ जो पावेतो आपले वतन आहे तो पावेतो आपन तुम्हास जमीन दिल्हे असे मधे आपले वंशसीचा कोणी खलेल करील त्यास आपण निवारू आपले कुळस्वामीची शपथ असे जमीन तुमचे स्वाधीन करून देउ स्वारी याचा वैवट बिगारीचा तगादा तुम्हास नाही. सुखरूप तुम्ही विहीर पाडून बाग करून वंशपरंपरेने उपभोग करावा तीही गावापैकी जमीन तुम्ही घ्याल त्याचे पत्र करून देउ, सही निशाणी ⊃ हस्त अक्षरे गोपाल शारंगधर बाबले कुळकर्णी का॥ कोलगाव प्रां. कर्डे मु॥ मजकूर पत्रावर साक्ष विठ्ठल सेठ तुमकर पेठ शनवार क ॥ पुणे.

ꣲ ꣲ

पे. द. घडणी रु. ३९९ ] [ **लेखांक ३६**

राजमंडळ

स्वारी राजश्री पंतप्रधान सु॥ समानीन[1]

महादाजी खंडेराव वोक छ२९ जिल्हेज[1] मशारनिल्हे यांचे तांदूळ खंडी ७ सात खेरीज फिर्गाण कोकणातून खरेदी करून पुण्यास आणतील त्यास आणू देणे जकादीचा तगादा न करणे दस्त १.

सदरहू दस्तक सालाबाद खंडो गणेश याचे नावे होते ते मृत्यू पावले सबब साल मजकुरा पासून त्याचे पुत्राचे नावे करार करून दिल्हा असे.

ꣲ ꣲ

पे. द. घडणी रु. ४२१ ] [ **लेखांक ३७**

राजमंडळ

स्वारी राजश्री पंतप्रधान सु॥ सलास सबैन मया व अलफ[2]

जमा झडती तसलमात खंडो गणेश याजकडे प॥ नासिक येथील मामलत अव्वल साली होती त्याचा जमाखर्च पुढील मामलत राघो नारायण याजकडे जाहली त्या हिशोबी ....... खंडो गणेश याच्या हिशोबाचा फडशा होणे आहे........

ꣲ ꣲ

---

१. ता. ७–१–१७८०

२. इ. स. १७७३

पे. द. जमाव कोकण प्रांत १६४१ ] [ **लेखांक ३८**

सिलकबंद खासगत राजश्री माहादाजी खंडेराव वोक सुा समान समानीन मया व अलफ माहे मोहरम ऊर्फ आश्वीन मास ई।। श्रु।।१ भृगुवासर ताा वद्य ३० भृगुवासर शके १७०९ प्लवंगनाम संवत्सरे[1]

जमा रु.

१०० हकदारी देशमुखी ताा नाते ताा
रायगड पोा सालगुदस्ताचा ऐवज
येणे त्यापैकी गुा लक्ष्मण मोरेश्वर
गोरेगावकर.
सिवाय जमा

२६ माडे वाडा पेठ सदाशिव
२ श्रु।।१५ गु।। गंगाधरभट
खण२ माहे२ द. म. ·।।·
प्रमाणे
२४ वा।। ५ बुधवार गु।। बालाजीपंत
लिमये खण सुमारे ८
दर ·।।· प्रोा
येकूण रु. ४८ पोा निमे

२६
१ वाा१ येरवडे याचे सेतविकले
रु. ५०० त्याचा विसारा
गुाजोगु माली

खर्च रु.

१८–। अधिक श्रावणमास गु।। भाऊ
८ = गोवऱ्या ८८२ दर ८–
८ = मेंडी ८८२दर ८–
( इत्यादी )
८–। सेठीस खर्चास
३०० वा।। ८ देविले लक्ष्मणभट दिवेकर
याकडोन रु।। कोरे चांदवड गुा
बळवंतराव हाा भाऊ अंबेगावास
न्यावयाकरिता
५०० वा।। ८ दविले बापूजी नाईक भोकरे
याजकडोन गु।। बळवंतराव रु।।
चांदवड रवाना अंबेगाव ताा
कृष्णाजी बल्लाळ मराठे रोख.
उसनवार मोरोबाचे देणे
३८।।। अधिक श्रावणमास
२१ परशराम विठ्ठल वोक गुा
सीवापा नेजुरकर

६७।।। ≡। इमारत वाडा पेठ सदाशिव
खाते–वगैरे मजुरी–गवंडी व बेलदार,
फरसबंदी, सुतार, अरेकस
१। कीता खाते चाल खण सुमार २
दर ।।= प्रोा गु।। बळवंतराव रवाना
माणकापूर हस्ते हरी गोविंद फाळके
श्रु।। १

---

१. दि. १२-१०-१७८७ ते ९-११-१७८७

१।। मातोश्रीबाईकडे
।= अधिक श्रावण ते भाद्रपदमास गु।।
मोरोबा माहे मजकूर
।· श्रु ॥३
४=श्रु. ७
।· श्रु. १०
।· व।। २
।· व।। ११
१।।

सिलकबंद खासगत माहादाजी खंडेराव वोक सुा तीसैन मया व अलफ माहे रबिलावल ऊर्फ मार्गशीर्ष मास शके १७११ रौप्य नाम संवत्सरे[1] जमाखर्च

जमा रु.

५१ श्रु।। २ बुधवार
५० बापूजी नाईक भोकरे हस्ते
गोविंद शामराज घरखर्चा-
करिता आणले चांदवाड छापी सुलाखी
१ भाडेवाडा सदाशिव पेठ गु।।
व्यंकप्पा तेलंग हस्ते महादु माली
।।· रोख ।।· खुर्दा

सिलकबंद.........माहे सफर ऊर्फ कार्तिक मास[2] शके १७११

| जमा | रु. | खर्च | रु. |
|---|---|---|---|
| १८ श्रु।।११ भृगुवासर | | | |
| १६ बाळाजी खंडेराव वोक गु।। महादाजी गोपाळ काळा नि जोग मशारनिल्हे याजकडे कर्ज येणे त्याजपो।। चांदवड छापी सुलाखी | | १ नाशीकची माकण गंगोदकाची भरून आणली त्याजबरोबर ब्राह्मण आला त्यास धर्मादाय | |
| २ भाडे वाडा सदाशिव पेठ गु।। त्रिबकपंत देशपांडे...फडशा माहे मजकूरपर्यंत | | ।।· वृद्धेश्वरास | |
| | | २२ लुगड्याबा।। रोख दिले घरात बायकास गु।। गोविंदपंत ९ गोपिकाबाई | |

१. १८-११-१७८९ ते १६-१२-१७८९
२. १९-१०-१७८९ ते १०-११-१७८९

९ राधाबाई

४——

देणे रु॥ ९ पो॥ आ॥ लुगडे १

रु. ५ बाकी

७॥ उदककुंभ ती॥ मातोश्री आकाबाई

दररोज १ प्रो॥ दर '।' प्रो॥ रोजवार

... ... ... ... ...

... ... ... ... ...

अस्सल बमोजीब नकल

श्री

कसबे गु॥ राजश्री महादाजी खंडेराव वोक सरकार राजश्री रुस्तुमराव शीर-फुन्मुलुक सु॥ इसने तिसैन मया व अलफ

६०८३५ ब॥ हिसेब भालेराव पोसरे याणी करून दिल्हा त्याज-प्रमाणे

.... ... ... ....

... .... .... ....

२४०० खासे कोणी माहाली आलियास पालखी ब॥ द्यावया...त्यास रामचंद्र खंडेराव दोन वर्षे माहाली होते त्यास दरसाल रु. १२०० प्रो॥ एकूण दो सालचे

... .... .... ...

.... .... .... ...

श्री

झाडा खासगत राजश्री महादाजी खंडेराव वोक सु॥ इहिदे तिसेन मया व अलफ शके १७१२ विरोधीकृत नाम संवत्सरे महे शाबन चैत्र मास

.... .... .... ...

वा॥ १४ रविलाकर

... .... ... ...

२॥ खा॥ धर्मादाय सोमवती ब॥

... ... ... ....

... ... ... ...

वा॥ ३० भौमवासर

४८=॥ श्राद्धाकडे ती॥ मातोश्रीचे

... ... .... ...

राजश्री महादाजी खंडेराव वोक सु।। सलास माहे मोहरम भाद्रपद मास शके १७१४

व।। ८ शुक्रवार

... .... ... ...

... .... .... ...

१०० राजारामभट सडे त्रिंबककर याचे वर्षासनाब।। ह।। कृष्णराव गंगाधर वोक नासिककर नासिकास अंताजी शंकर याजकडून देविले ते म।।रनिल्हे यास पावले नाहीत स।। रोख पुण्यात दिल्हे.

व।। ९ रविवार

४८=।। पक्षास दक्षणा वगैरे

४ ब्राह्मणास व पिंडास

८=।। तीलोदकास

४८=।।

८= भोजन दक्षणा

व।। १२ गुरुवार

८≡। धर्मादाय ब्राह्मण आसामी १५ येकूण

मार्गशीर्ष

श्रु. १४ मंगळवार

१ बक्षीस खर्च चि. सौ. दुर्गाबाईस डोली पा। त्यास भोई यास भोई नि।। काले

८— पाने विडयाची व तपकीर मिळोन गु।। बापू

१५ मुलास औषधाबद्दल वैद्यास

॥· तोटी कारंज्याची

१० लुगडी सगुणेस २

शु।। १५ बुधवार

जमा

रु.

६० देशमुखी तालुके रायगड गु।। लक्ष्मण मोरेश्वर म।।रनिल्हे यास मक्ता दिला आहे त्या पो। साल गुदस्त सालचा मक्ता रु. २०० पो। वसूल आले ....................रु.

९० कि।।

५० कि।। श्रावण व।। ३० शके १७१५

१४०

बाकी येणे ते विठ्ठलभट मेहेंदळे यास दिल्हे

व॥ २ शुक्रवार

१ देणे भोई नि॥ बाबुराव पासलकर चि. सौ. दुर्गाबाईस आणावयास पो। खा। ईनाम गु॥ रघुनाथ गोविंद जमा कोलगाव पो।

मार्गशीर्ष मास शके १७१४

व॥ ६ भौमवार

| जमा | रु. | खर्च | रु. |
| --- | --- | --- | --- |

... .... ... ...

... ... .... ...

२०५ पो। .... बारसी मौजे चिखरड
येथील सरदेशमुखी बा॥ गु॥ गोविंदराव
कृष्ण काळे बा॥ रसीद

फाल्गुन शु॥ ११ गुरवार शके १७१४

या दिवशी मुंजीकडे पुण्यहवाचन वगैरे खर्च

फाल्गुन व॥ १ भौमवार

१॥ धर्मादाय ग्रहण खर्च
(म्हैस उंट बारसीहून आले त्याचे वाट खर्चास निरनिराळया दिवशी व सारवानाला इनाम रु. ४ खर्च )

फाल्गुन मास शके १७१४

पाषाणहून बाभळी तोडणे आणणे वगैरे खर्च आहे.

व॥ ५ मंदवार

१८= बालाजीपंत शागीर्द आमंत्रणे करणार
मुंजीस ठेविला रोज ३ दर ।=

८ पेंड बैलास पनवेलीस जाताना दिल्ही.

१०८।॥।=॥ पितांबर जनानी ५४८≡, ५४॥≡॥

१५९॥– लुगडी गावची

... ... ... ...

... ... ... ....

८। औषधे मुलास

फाल्गुन व॥ १२ मंदवार

... .... .... ...

२ वाटखर्चास उंट व तट्टू अंबेगावी तांदूळ आणा-
वयास पो। त्यास तुरणी ब॥ गु॥ रामा लगड

खर्डा लाभ पेठ भगवंतपूर को। बारसी सु॥ सन १२०२ माहे ज॥कर उर्फ माघ मास चौथाई सेहपण जत्फी पो। हिस्सा.

सु॥ सलास माहे रा॥वल कार्तिक मास शके, १७१४

शु॥ ९ बुधवार

२४ सिका १८—॥। बटा रु. २४ सिका खरेदी केले
त्यास दर ४॥। प्रो। रु.

शु॥ ११ शुक्रवार

३। चातुर्मासचे व्रतउद्यापनाब॥ धर्मादाय
१। गंगाबाई १ आवडीबाई १ रमा-
बाई /३।·

२० धर्मादाय देणे विठ्ठलभट मेहेंदळे
हरीहरेश्वरास अभिषेका ब॥

व॥ २ बुधवार

८॥ कापूर आवडीबाई व गंगाबाईकडे

व॥ १० गुरवार

१॥— मेजवानी गोविंदराव भगवंत यास सो।
भाजी वगैरे गु॥ बापू

५० देणे लुगडयाब॥ घरात बायकास दर १०
प्रो। पाच जणीस गु॥ बापुजीपंत घारे चांदवड

॥= खो॥ दूध गाईचे गोपकाबाईचे मुलास गु॥
दावजी पाषाणहून आणीत असतो
( पूर्वीही असा खर्च आहे )

कार्तिक मास शके १७१४ व॥ ३० बुधवार

॥= जोडा चर्मी बळवंतराव दादा यास गु॥ खुद

सु॥ अर्बा तिसैन माहे रजब माघमास

श्रु॥ ७ गुरवार

१।·॥ गोवऱ्या (पुला)वरून आणविल्या दरहजारी
·।·॥ प्रो।

श्रु १४ गुरवार

५० बारसीचे वर्षासनाब॥

व॥ ३० मंदवार

१५ हरिपंत फालके यास आंबेगावाहून सौ. सत्यभामा माई पुण्यास रहावयास आली तेव्हा समई खर्चास ता॥

सिलक बंद खासगत राजश्री माहादाजी खंडेराव वोक सु॥ अर्बा तिसैन माहे साबान फाल्गुन मास श्रु॥ ६ भृगुवार

जमा रु. खर्च रु.

८ हरीपंत फालके भाडे शनवार पेठेतील घर ग॥ भुणगा वोतारी

श्रु॥ १४ शुक्रवार

५ गु॥ केशवभट पेठे भाडे सदाशिव पेठेतील घर खण२ दर१ प्रो॥ माहे ११ रु. ११ पो॥ वसूल पेशजी६ बाकी हल्ली हस्ते खुद्द

वा॥ ८ सोमवार

१॥= दुर्गाबाईचे वोटीस समान ( साखर, खोबरे जिरे शहाजिरे धने दालचिनी )

वैशाख व॥ ११ भौमवार

२५ भाडे वाडा सदाशिव पेठेतील गु॥ सदाशिवपंत कावळे खण ४ दरमाहे रु. २ प्रो॥ माहे १४ येकूण रोख हस्ते बापू केतकर चांदवड

१॥ भाडे वाडा सदाशिव पेठ पुढील फड-ताळाचे खण२ दर ॰।॥॰ प्रो॥ सोनारास दिल्हे होते त्याची मु॥ माहे १॥ येकूण हस्ते अजमीरखान.

सिलकबंद......शके १७१५ सु॥ अर्बा तिसैन माहे जिल्हेज ऊर्फ आषाढमास

श्रु॥ १३ रविवार

॰।॥॰॥ सहावी पूजेस ब्राह्मण ७ वगैरे

व॥ १ बुधवार

१६॥ वाट खर्चास उंटे बारसीहून आली त्याग गु॥ रवकोजी नाईक व बाळू न्हावी

१ मु॥ टाकडी सोमवार कडबा

१ गवत ॰।॥॰ मसाला कणीक गूळ हळद अफू मंगळवार कोढेज ( कोसेज )

१ बुधवार जित्ती गवत.

४ गुरवार खानवटे ( २ गवत२ नदीउतार
३। भृगुवार करकुंभ ( गवत १।। हरभरे
·।।।· मसाला )
२।। मंदवार येवत ( १।। हरभरा, वैरण )
० ता।। कित्तूर दी।। खलोजी नाईक हस्तें
खुद्द खर्चास

आषाढ व।। ५ मंदवार
व।। ६ रविवार ( येथे कित्तूरचा खर्च बराच आहे.
व।। ७
व।। ८ व।। १०

अर्बा तिसन मया व अलफ पौष मास शके १७१५
शु।। १ गुरवार
श्रु।। २ शुक्रवार

१२३०५ गु।। सदाशिव चिमणाजी हुमजाबादे-
हून हुंड्या पाठविल्या ४
व।। १३ बुधवार
१।।। इनाम भोई वगैरे सान्ये याजकडील
दुर्गाबाईस पुण्याहून घेऊन आले सबब

मार्गशीर्ष व।। ६ इंदुवार
५ चि. सौ. गोपिकाबाईस न्यावयाकरिता तट्टू
भाड्याचे केले त्यास वगैरे

आश्विन श्रु।। ४ अर्बा तिसैन
४।। भाडे वाडा सदाशिव तेलंग ब्राह्मण
१ भाडे वाडा सदाशिव पोा फडताल
–भाद्रपद मास

आश्विन व।। १२ गुरवार शके १७१५
५० धर्मादाय देणे कोंडभट ती।। मातुश्री कडुबाई
कासीस जाता आहे त्याबद्दल

सुमा मयातेन माहे रजब ऊर्फ मार्गशीर्ष मास शके १७२१ खर्च
श्रु।। ११ मंदवार गंगोबाचे अब्द पुरीत श्राद्धाब।।
( व वर्ष श्राद्धाकडे इतर खर्च आहे )
श्रु।। १२ बुधवार
श्रु।। १४ सोमवार
वा।२ शुक्रवार
८।।। मजुरी न्हावी हजामती ब।। ८।। बळवंतराव दादा

८। गणोबा

८– औषधे गणोबाास गालगुंडे जाहली त्यास

२ बाळकृष्ण पंतोजी चि. गणोबास लिहावयास सांगत होता

त्याजबद्दल आषाढ ते आश्विन माहे ४ रु.'।. प्रमाणे ब॥

खुद मार्गशीर्ष व॥ ३० गुरवार

१० खाते कापड

७ धोतरजोडा बळवंतराव दादा यास

$\frac{३}{१०}$ धोंगडी पांढरी आसनाची तात्यास

यादी रामचंद्र खंडेराव ओक याजकडून क॥ पाबल येथील साल मारचे सरकार भरण्यास ऐवज घेतला तो सुमा इहिदे अशर मयातैन अलफ

१६८० कार्तिक व॥ १ परभारे कासिनाथ नीळकंठ याजकडे देविले

ते हस्ते श्रीधरपंत जोशी गु॥ तानसेट सोनार

रु १७०० पो॥ २० बाकी

४७६ कार्तिक व॥ १३ परभारे कासिनाथ निळकंठ याजकडे

६५० ८≡॥ मार्गशीर्ष शु॥ १३ परभारे देणे कासिनाथ निळकंठ नानेल

... ...

३१७।. मार्गसीर्ष व॥ १ देणे पोता त॥ गणेश रामचंद्र

ओक गु॥ आबा नदवीकर

खतावणी- कार्तिक शु॥१ शके १७१९ ते आश्विन व॥ ३० शके १७२०

वाटखर्च पौष व॥ ११ उंटे बारसीस गेली

फाल्गुन ३० माणकापुरास जाता येता

उत्तरकार्य चिरंजीव बाळकृष्ण चैत्र व॥१३ ता। १२ लाकडे गोवऱ्या प्राणोतकर्माचे समयी धर्मादाय

चि. सौ. दुर्गाबाई प्रसूत जहाली श्रावणमास पाने विड्याची औषधे वेलची

जायफळे जायपत्री केशर डिंक खारीक खोबरे

फालगन व॥ ३०

४ ६॥। खाते मोती गुजारत बळवंतराव ओक

० ० ०

खंडेराव रंगनाथ सु'। समान तिसैन मया व अलफ. शके १७१९ को॥ पुणे याचे घर नारायण पेठेत त्याची दुरुस्ती खर्च

३॥। भाडे गु॥ भाऊभट देव याचकडे पडवीच्या खोल्या

६ भाडे वाड्या पे॥ गु॥ देवजी वगैरे कारकून माडीबद्दल

रा. ब. लाड दुसरा बाजीराव रोजनिशी ] [ लेखांक ३९

सन १७९५-९६ ] -

रुस्तुमराव पांढरे शरीफन्मुलुक दिम्मत फत्तेसिंग भोसले याजकडे फौजेचे बेगमीस सरंजाम सन इसने तिसैनात करार करून दिल्हा त्यास सरकारचे नजरेचा वगैरे ऐवजाचा भरणा व चाकरीचा जिमा मशारनिल्हेनीं गणपतराव जिवाजी व महादाजी खंडेराव याकडून हुजूर करविला त्या कराराप्रमाणे ऐवज फिटेपर्यंत सरंजामाचा वसूल उभयता मशारनिल्हेकडे देणे म्हणून चिटणीसी पत्रे १४ परगणे देगटनूर प ।। कारेमुंगी प ।। तर्फ कोडलवाडी, प ।। लोहगाव प ।। नारायण खेड प ।। कवळास प ।। बाराहळी प ।। खडके प ।। बोधन प ।। जालालपूर, प ।। कल्याण निमे -

पे. द. जमाव कोकण प्रांत रु. १६४१ ] [लेखांक ४०

यादी गणपतराव जिवाजी ( जोग ) व महादाजी खंडेराव ( वोक ) यांचे कर्ज पांढरे याजकडे येणे ते मृत्यू पावले त्यास पुत्र नाही व ऐवज न फिटे स ।। सरकारात नजर घेऊन सनदा आमचे नावी करून देण्याविसी बंदोबस्ताची कलमे : सनदा-महालास

१ पो॥ देगचूर
१ पो॥ कारेमुगी
१ ता॥ कोडलवडी वगैरे देहे ११
१ पो॥ खडके
१ पो॥ बरादली
१ पो॥ कल्याण
१ मौजे राहिवरे व कुमटे पो॥ वरवल
  २ मोकादमास
  १ जमीदारास
१ तो॥ भासवाडे मामले कौलास येथे सायेर साल गु॥ पावेतो चालत होते सालमजकुरी मोगलाईतून बंद जाहली सो॥

१०

१ उभयताचे नावे कि पांढरे याजकडे तुमचा ऐवज बहुत आणी मध्ये देणार कोणी नाही सा॥ त्याजकडील सरंजाम तुम्हाकडे सांगितला असे तरी सरकार चाकरी करून सरंजामाचे माहालाची दखलगिरी करीत जाणे म्हणोन

११

७ ताकीदपत्रे मोगलाईकडील वकिलास व मूसदी यास कि पांढरे याजकडून सरंजाम दूर करून गणपतराव जिवाजी व महादाजी खंडेराव याजकडे सांगितला आहे तर अमल याजकडे देवीत जावे म्हणोन

१ सोयरा अवधूत १ मुशुरान्मुलुक १ शमन्मुलुक
१ कियानतमुलुक २ पो॥ हायेचे कमाविसदारास
१ सिताराम राजाराव १ ता॥ कोडलवडी वगैरे देहे ११
१ पो॥ कारेमगी
२ मौजे राहिवासे कुमटे
४

१ कोनेर हरी १ पो॥ देगवूर १ पो॥ खडके १ पो॥ बरादली
१ राजे अनारडी देसाई ता॥ भासवाडे मामले कोलास यास की सायेर खुदामत चालत आली आहे त्याप्रमाणे अमल देणे म्हणोन ३
७

२ पो॥ जलालपूर येथील जमिनदार व नबाबकडील अमील जबरदस्तीने अमल पाच वर्षे देत नाही त्याजविसी
१ जमीदार यास सनद
१
२ अमील यास पत्र

बंदोबस्ताविसी कलमे

रा॥ शाहाजी भोसले यांची आमची आदावत पडली आहे स॥ त्याजकड चाकरी करणार नाही हुजुरान आज्ञा होईल तिकडे करू— कलम १

पांढरे याजकडील माहाल धौश्याचे पुट्यात गेले आहेत ते सर्वांचे सोडिलियास सोडावे कलम १

आमचा ऐवज ९०००० अजमासे पांढरे याजकडे येणे त्यास सरंजामाची व व्याज-सुद्धा फडशा जाहलियाखेरीज घालमेल करू नये कलम १

यादी माहादाजी खंडेराव याजकडील
ऐवज पांढरे शेरिफन्मुलुक याचे चौथाईबाबत—जमा रु.
३११२॥ खालसा
२३६२॥ ता॥ जलालपूर
३३७॥ सन ११९६ वा॥
२०२५ सन ११९७ ते सन ११९९ पावेतो
२३६२॥ दरसाल रु. ६७५ प्रमाणे

७५० ता। नेवली पा। बरादली सन ११९६
ते सन ११९९ साल ३ दर रु. २५० प्रो
३११२॥

३९९०० सरवडीलपनग पो। कारेमुगी
२४०० सन ११९६ ते सन ११९७
३७५०० सन ११९८ ते सन १२०१ साल
४ दरसाल रु. ९३७५ प्रो।
३९९००

८३२८१॥ सरदारुन्मूलूक
१३७२७॥ ता। खडके बरादली
१६७५॥ सन ११९६
१२०५२॥ सन ११९७ ते सन १२०१
साल ५ दरसाल २४१०॥ प्रो।
१३७२७॥

५०१०० पो। देगचूर
५०० सन ११९७
१२४०० सन ११९८
१२४०० सन ११९९
१२४०० सन १२००
१२४०० सन १२०१
५०१००

१२२८॥ मौजे रोहिवरे कुमटे पो। वरवल
सन ११९६ ते सन १२०१ साल
६ दरसाल २०४॥। प्रो।

१८२२५ ता। कोडलवडी
२२५ सन ११९६
१८००० सन ११९७ ते १२०१
साल ५ दरसाल ३६०० प्रो।
१८२२५

८३२८१॥

१२६२९३॥

पो। वसूल रु.

१००० मा। दत्तोबा नाईक बडिडूग हरजागा पानगल मि. कार्तिक व॥ ३० सन १२००

८३१५ सरबुलुखजंग पो। कारेमुगी मा। जनार्दनपंत परभारे वसूल रु. ९३१५
२०००० हरजागा पानगल चिटी श्रीमंत राजश्री बापूसाहेब मा। विठ्ठल बाबा
२४००० पो। अलदगूजोटी वरात त्रिमलराव अमील याजवर
१८००० मा। सदाशिव चिमणाजी
६००० बापूसाहेब हरजागा पुणे येथें सन १२०३ साली
२४०००
५०००० मा। गोविंदराव अण्णा हरजागा पुणे येथे सन १२०३ साली
१०००० हरजागा बेदर सन १२०३
५००० जिवाजीपंत अमील निलगेकर
५००० मा। नंदुलाल सावकार
१००००
१०२४॥= रसिदा तालूकेत निघाल्या वसुलाब॥
८५५॥= खडकेबराहली येथील सन ११९७ साली
१६९ मा। तिमाराव हरी अमील
१०२४॥=
बाकी रु. ११८९३॥= रुजवात माधवराव मूरार
२५५० सीवये हिसेबीकडील घेतले नाहीत.

पे. द. Agent's file No. 9] [ लेखांक ४१

To No. 56 of 1828

William......esq.

Secretary with the Hon. the Government
Sathara

Sir,

(Report on a letter from Collector of Poona on the petition of Ganesh Ramchandra Oke )

The Petitioner's father was a Daftar karkoon during the marhatta Govt. and continued in the same situation for two years under the commissioner in the Dekhan when he was pensioned

as a " British……." His son served one year as a karkoon in the Daftar under the British govt.

There are two kinds of pensions in the Dekhana–

पे. द. Agent's file No. ७. ] [ **लेखांक ४२**

No. 4809 Bombay castle

Political Department 11th March 1842

Sir,

I am directed by Hon· the Governor-in-council to transmit for your information copy of a letter from the collector of Poonah dated the 18 the ultimo No. 299 reporting the death on 13th of the same month of Ganesh Ramchandra Oak No. 410 of the Poona Pension list who enjoyed an annual stipend of Rupees ( 600 ) six Hundred which has lapsed to Govt. since that date.

I have etc.
Secretary to Govt.

To

The Agent for sirdars in Deccan.

[ **लेखांक ४३**

ऐतिहासिक पत्रव्यवहार संपादक गो. स. सरदेसाई, कृ. पां. कुलकर्णी, या. मा. काळे पृ. १७३ ले. २०८ भारतवर्ष २.५२ ( डेक्कन कॉलेजमधील कागद ) ] शके १७०२ मार्गशीर्ष वा॥ १४ ता. २४-१२-१७८० विनंती सेवक गणेश बल्लाळ सा. न. विज्ञापना तागाईत छ २७ जिल्हेज पावेतो सुखरुप…… असो विशेष– ( मेस्त्र सिवील मंगरूळ होनावर तालचिरीकडे जावयास आज जहाजावर चढेल नंतर हैदरकडे…..मेस्त्र टामसहाम तोहीं विलायतेस…. )

सदर ग्रंथ पृ. १७५ ले. २१२ ( भा. व. २.५१ ) ] शके १७०३ वैशाख शुद्ध १२ ता. ५-५-१७८१ पो॥ छ १४ जमादिलावल इहिदे समानीन वैशाख

सेवेसी आज्ञाधारक गणेश बल्लाळ ओक ता॥ जंजिरे उंदेरी चरणावरी मस्तक ठेवून शि. सा. न. विज्ञापना तागाईत छ १० जमादिलावल पावेतो सेवकाचे व तालुके मजकूरचे वर्तमान यथास्थित असे विशेष. मुंबईतील बातमी वसई अर्नाळा बेलापूर कल्याण उरण वगैरेची बातमी....पाच मुर्दे गोणत्यात बांधोन पांढरे कातडीचे बुडालेले येऊन जंजिरे मजकूरचे बंदरी लागले आहेत मुंबईतील आहेत....सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

ꣳ ꣳ

पे. द. संनिका S. R. २१।६ क्र. १३०२९ ] [ लेखांक ४४

पो॥ छ ३० जमादिलावल सन॥ इहिदे ( १७८१ ) समानीन ज्येष्ठ

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी आज्ञाधारक गणेश बल्लाळ वोक ता॥ जंजिरे उंदेरी चरणावरी ( इ. मायना वरील प्रो॥. ) विशेष स्वामीचे आज्ञापत्र छ १५ जोावलचे सादर जाहले तेथे आज्ञा की गाडदी असामी १०६ येकशेसाहा दिमत सैद अहमद नामजादीस आहेत ते राजश्री राघो विश्वनाथ याजकडे कल्याणास जलदीने रवाना करणे म्हणोन आज्ञा. आज्ञेप्रो॥ गाडदी.......रवाना सेवेसी श्रुत होय हे विज्ञप्ति.

ꣳ ꣳ

[ लखांक ४५

राजमंडळ सन अर्बा समानीन

( १७८४ )

स्वारी राजश्री पंतप्रधान खर्च दुबेर्जी तालुके राजमाची नि॥ ... मामलेदार परभारेपैकी छ ३० रजब... तालुके मजकूर नि॥ मा॥रनिल्हे येथील लोकांची घरे व सेते तालुके अवचितगड येथे आहेत त्यास सेत सनद सन इसने प्रमाणे साल गु॥ सन सलास समानीनची रसानगी याद २५ रु.

२५ पंचवीस रुपये तालुके अवचितगड नि॥ गणेश बल्लाळ व हरी गणेश याजकडून किले मा॥रहून लोकांची वस्ती जाबता नावनिसींवार येईल त्याप्रमाणे खुद सेतचे धान्यापैकी पावते करणे म्हणोन लिहून दिले....... रु.

ꣳ ꣳ

[ **लेखांक ४६**

राजमंडळ सु॥ इसने समानीन
( १७८२ )

स्वारी राजश्री ....... खर्च येकबेर्जी किले राजमाची
दफाते पत्रे. छ १ जमादिलाकर येथील लोकांनी साल गु॥ इंग्रजांचे लढाईत चाकरी केली सबब इजाफा वगैरे करार करून दिल्हा त्याविसी कलमे

... .... .... गणेश बल्लाळ फडणीस किले मजकुरास
... ... .... आत्फागिऱ्याची नेमणूक ... रु.
५० आत्फागिऱ्या आसामी १ येकूण सालिना रु.
२० आत्फागिऱ्याचे सामाना बा॥ येक साल आड शिरस्ते प्रमाणे रु.
———
७० सत्तर रुपये करार केले असे
पाववीत जाणे

पे. द. उ. कोकण रुमाल १४७९ ] [ **लेखांक ४७**

राजमंडळ अर्बा समानीन
( १७८४ )

खर्च किल्ले राजमाची बा॥ मु॥ दरकदार व कारकून

... ... ... ....
... .... ... ...

गणेश बल्लाळ फडनीस सबनिसीकडील आ॥ ४ ऐन १ व पोर्गे ३

येकूण आदा बेरीज
अन्न... १५६।।।= रु. वजनी तेल दिवटीस पो ८१८५
... ... ... ( इतर नावे ४ आहेत )

पे. द. द. कोकण रु. ४३० तर्फ गुहागर ] [ **लेखांक ४८**

तालेबंद तफावत तालुके उंदेरी नि॥ महादाजी कृष्ण सन समान[1] व सन तिंसा

---

१. स. १७७७-७८ पण हे सलास म्ह. १७७२-७३ असावे.

सबैन[1] वगैरे येकूण सात साला व तुटमुदत सन समानीन[2] ....... जमेत व खर्चात तफावत ... ... ...

६६४३८॥ दरकदार व कारकून याजकडे लागू जाले ते

... ... ... .... ....

... ... ... ... ...

३०८।=॥ गणेश बल्लाळ ओक

२०० रदकर्ज सन इहिदे

१०८।=॥ सन इसने दरकार खर्च वगैरेपैकी

३०८।=॥

... ... .... .... ...

३६५॥ जनार्दन नारायण ओक

... .... ... ...

( वगैरे २९ आसामींकडून )

पे. द. उ. कोंकण रु. १४७९ ] [ **लेखांक ४९**

सु॥ सीत समानीन[3]

राजमंडळ

खर्च येकबेर्जी किलेनिहाय तालुके राजमाची नि॥ रामराव नारायण झडती किले हाय...किल्ले मजकूरचा बद्दल मुशाहिराखेरीज मु॥ तहबेल सुद्धा

गणेश बल्लाळ फडनीस सबनीसीकडील यासी

दादो बल्लाळ ,, कारखानिसीकडील यासी

राघो बल्लाळ सभासद नक्त रु. १३३/–

राघो गणेश नक्त रु. ५४।–

पे. द. उ. को. २१७ ] तालके बिरवाडी येथील मामलत सन १७७४ मधे महादाजी गणेश याजकडील दूर करोन पुन्हा पेशजीप्रमाणे नारो अप्पाजी यास सांगितली. नंतर बाबुराव पासलकर व भास्कर गणेश नंतर बाबुराव पासलकर व विश्वनाथ भास्कर व सलास समानीन मया व अलफ[4] मधे गणेश बल्लाळ व हरी गणेश यास सांगितली.

---

१. स. १७७८–७९ २. इ. स. १७७९–८०

३. १७८५–८६ ४. सन १७८२–८३

पे. द. द. को. रु. ६५४ ] [ **लेखांक ५०**

राजमंडळ

खमस समानीन मया व अलफ[1]

स्वारी राजश्री ...... अवचितगड व बिरवाडी येथील मामलत गणेश बल्लाळ व हरी गणेश याजकडे होती ते दूर करून ...... ( सनसलास समानीन छ १९ सव्वाल[2] मधे गणेश बल्लाळ व हरी गणेश यास दिली होती )

ഗ ഗ

जमाव रु. १६९६ ] श्री [ **लेखांक ५१**

राजश्री कमाविसदार वर्तमान भावी पा। अकोले गोसावी यास श्रीमंत बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार व असिरवाद सु॥ सबा खमसेन मया व अलफ[3] वे॥ राजश्री निळकंठ भट बिन बाळंभट उपनाव वोक शाखा तैतिरीय सूत्र हिरण्यकेशी वास्तव्य को। नासिक याणी हुजूर क्षेत्र पंढरपूर येथील मुक्कामी येऊन विनंती केली किं आपणास पूर्वीपासून मोगलाई अमलात पो। मजकूर पो। ऐन मालावर दररोज रु. १ येक याप्रमाणे पावत होता त्यास पो। मजकूरचा अंमल सरकारात जाहल्यापासून रुपया दररोज चालत नाही ऐशास स्वामीनी कृपाळू होऊन पेशजीची पत्रे आपणाजवळ आहेत ती व जमीदार पो। मजकूर याचा दाखला मनास आणोन सदरहू येक रुपया दररोज पो। मजकूरचे मालापो। करून दिल्ली या नासिक क्षेत्री राहोन स्नान संध्यादी षट्कर्मे आचरोन कुटुंबाचा योगक्षेम करून राजश्री स्वामीस व स्वामीचे राज्यास अभीष्ट चिंतून सुखरूप राहो म्हणोन याजवरून व पूर्वील कागद व जमीदाराचा दाखला मनास आणून भटजी थोर सत्पात्र क्षेत्र मजकुरी वास्तव्य करुन स्नानसंध्यादी षट्कर्मे आचरोन आहेत याचे चालविल्या श्रेयस्कर जाणोन याजवर कृपाळू होऊन यास पो। मजकुरी मालपो। रोज दररोज रु. १ करार करून दिल्हा असे तरी सनद पेवस्तागिरीपासून साल दरसाल रोज रु. १ येक पावीत जाणे प्रतिवर्षी नवीन पत्राचा आक्षेप न करणे या पत्राची प्रति लिहून घेऊन हे पत्र भटजीजवळ भोगवटयास परतोन देणे जाणिजे छ ३० रविलाकर[3]–आज्ञा प्रमाण.

ഗ ഗ

[ **लेखांक ५२**

श्री

यादी निळकंठभट नाशिककर यास वर्षासनाची नेमणूक राजुराकडे दरसाल रु.

---

१. सन १७८४–८५ २. दि. २०-९-१७८२.

३. दि. २१-१-१७५७.

१७७ आहे त्यास सु॥ सबा तिसैन मया व अलफ ता॥ सन सीत तिसैन परियेंत[1] बाकी देणे

रु.
४५७। = सन समान समानीन परियेत[2] बाकी
१७७ सन तिसा समानीन[3]
१२३९ सन तिसैन ता॥ सन सीत तिसैन[4] साल ७ रु. १७७ प्रो॥

१८७३। =

रुपये
३५० सन तिसनात पावले
२५० सन इसनेत पावले
८८॥ सन खमसात पावले–आबा गोळे यास पावले सादुरली पो।

६८८॥

बाकी ११८४॥। = रुपये

तपसील

४४२॥ अबा गोळे याचा कर्जाऊ येवज खंडभट वोक याणी देणे त्याचे रदकर्जात निमे वर्षासनाचा येवज लावून दिल्हा दी॥ पत्र सन इहिदे तिसैन छ १ रजब हस्ताक्षर गंगाधर भट वोक दरसाल रु. ८८॥ प्रो॥ ई॥ सन इहिदे ता॥ सन सीत तिसन साले ६ ये॥ रु. ५३१ पैकी सन खमस तिसैनात येक सालचे पावले गोळे यास यास रु. ८८॥ बाकी येवज गोळे यास पाववाचा सबब रु.

७४२। = ऐन बाकी रु.

११८४॥। =

१. दि. ४-६-१७९६ ते ४-६-१७९७ २. स. १७८७-८८
३. स. १७८८-८९ ४. १७८९-९० ते १७९६

खाते पान ५२ नं. २० ]

**[ लेखांक ५३**

श्री

यादी वर्षासनवाले लोक को। नासिक सु।। सन सीत सलासीन मयातेन व अलफ सन १२४५ फसली ता. १४ माहे जुलई सन १८३५...आषाढ व।। ५ रोज मंगळवार शके १७५७ आत्माराम भट बिन निळकंठ भट वोक हे हाली वर्षासनाची वहिवाट करणारे बाळंभट बिन गोविंदभट वोक हे वर्षासन संपादन करणारे याचे नावे मोगलाई कारकीर्दीतील सनदा होत्या त्या गहाळ जाल्यानंतर पेशवे कारकीर्दीत निळकंठ भट बिन बाळंभट वोक यास बाळाजी बाजीराव प्रधान याणी कमाविसदार वर्तमान भावी पो। अकोले याचे नावे सनद करून दिल्ही की सदरहू मोगलाई कारकीर्दीतील कागदपत्र व जमेदार याचा दाखला पाहून वो। राजश्री निळकंठ भट वोक याजला पो। मजकूरचे मालपैकी दररोज रु. १ येकची सनद करुन दिल्ली आहे हे चालवणे म्हणोन सु।। सबा खमसेन मया व अलफ छ ३० रविलाकरची[१] करून दिल्लेली पाहून इंग्रेजीत आत्माराम भट बिन निळकंठ भट वोक याचे नावे तो। अकोले माहामवर मुकरार रु. १६ ची सनद करुन दल्ली यासी वारसदार

४ आत्माराम भट बिन निळकंठ भट वोक हे संपादन करणारे याचे नातू आहेत.

१ खुद्द आत्मारामभट
२ पुतण्या राजारामभट बिन खंडभट
  २ खुद्द राजारामभट
  १ स्त्री आंबाबाई
१ भावजई राधाबाई कोम सखारामभट वोक

४
० लग

४

सदरहू प्रो। वारसदार आहेत याखेरीज आणखी कोणी नाहीत लिहून दिल्हे सही तारीख मजकूर

१ सही आत्मारामभट बिन निळकंठभट ॐ क वस्ती नासिक दस्तुर खुद्द

---

टीप : सही बालबोधीत आत्मारामभटाचे हस्ताक्षरात पे. द. तील कागदावर आहे.

१. दि. २१-१-१७५७.

पे. द. घडणी रू. ३०० ] [ **लेखांक ५४**

राजमंडळ

राजश्री पंतप्रधान सु॥ सबा समानीन[१]

खर्च ब॥ मु॥ नारो कृष्ण वोक कारकून नि॥ दप्तर येकबर्जी-परभारे छ ७ साबन[१] यास मोईन सन समानीनची नक्त व कापड आखाचे अडीच पट्टा प्रमाणे नक्त

३५० ऐन नक्त
४० कापड आख १०० ये॥
३९०

ता॥ धोंडजी काका व पुताजी साबला खिदमदगार नि॥ जवाहीरखाना याचे तसलमातीस कारकूनाचे वाटणीबद्दल ऐवज खर्च पडला आहे. त्याप्रमाणे देविले.

( वरीलप्रमाणे मोइन खर्च सन १७६६ ते १७९० मुदतीत प्रत्येक वर्षी आहे )

[ **लेखांक ५५**

Selections from Satara Raja's and Peshwas diaries III Balaji Bajirao Peshwas Vol. I. by G. C. Lad Page 374 - 1750 - 61

कोकणातून हर एक जागाहून तांदूळ खरेदी करून एक खेप पुण्यास आणतील त्यास आणू देणे.

( पूष्कळ नावे त्यात एक) नारो कृष्ण वोक खंडी १

पे. द. पूणे जमाव रु. १३० ] [ **लेखांक ५६**

यादी कारकून नि॥ दप्तर नेहेमी कुटुंबसुद्धा पुण्यात राहतात त्यास घरे बांधावयास जागा सु॥ सलास सबैन मया व अलफ[३]

१ — — — —
१ — — — —
१ — — — —
१ नारो कृष्ण वोक
१ — — — —

आसामी ६५ दर वीस प्रो॥ पासष्ट आसामीस देणे

( वीस हात रुंद व वीस हात लांब जागा ? )

१. दि. १७८७–८८ २. दि. २५-५-१७८७

३. दि. १३-६-१७७२ ते दि. ३-६-१७७३

पे. द. घडणी रुमाल ३०० ] [ लेखांक ५७

राजमंडळ

स्वारी राजश्री पंतप्रधान सु॥ समाने सबैन

खर्च व॥ मु॥ नारो कृष्ण कारकून नि॥ दप्तर-दफाते-पत्रे छ २६ सफर[1] मु॥ पुणे मौजे बोरवाडी त॥ निजामपूर प्रांत राजपुरी येथे नवे घर बांधणार त्यास घराचे शाकारास पैसे सुमारे ५०० पाचशे त॥ निजामपूर पो॥ येक साल देविले असे तरी देणे म्हणोन गोविंदराव व चिमाजी माणकर यांचे नावे छ ५ सफर[2] रोज यादी सनद

पहाणीखर्डा रत्नागिरी जिल्हा.

पे. द. रुमाल ४३ ] [ लेखांक ५८

पाहाणी खर्डा बागायेत क॥ दाभोळ ता॥ पंचनदी प्रांत जंजिरे सुवर्णदुर्ग सु॥ खमस सबैन मया व अलफ - नवकीर्द जमावणी सालेवार

नारो कृष्ण वोक रोपे लावणी सन सलास सबैन[4] ठिकाण बोरीबांकर रोपे ३ याशिवाय आनंदराव रामचंद्र व रामाजी हरी निंबाळकर व इतर बरेच भंडारी बागायत दार आहेत.

नावनिशी कलारंग साल मजकुरी ऐन जाजंती पेड नारळ माड

| | पेड सु | रोपे | बारदार | नारळ |
|---|---|---|---|---|
| नारो कृष्ण वोक | ३ | ० | ३ | ० | ० |

पहाणी खर्डा बागायत मौजे गिम्हवणे ता॥ जालगाव प्रांत जंजिरे सुवर्णदुर्ग सुभा खमस सबैन मया व अलफ[3] ठिकाणे नि॥ वार

नारो कृष्ण वोक झिटे २०
१ रोपा
५ पोफळी
यास रुजु गु॥ सन तिसा सितैन[5]
नारळ माड रोपा १ पोफळी पेड रोप २५

मौजे चिखलगाव ता. जालगाव प्रांत जंजिरे सुवुर्णदुर्ग सु॥ खमस सबैन मया अलफ[5] ठिकाण घरवाडी बाळाजी केशव टिळक फक्त आहेत यात १७५० ते ६० माफी.

---

१. दि. २६-३-१७७८ २. दि. ५-३-१७७८ ३. सन १७७२-७३
४. दि. ५-६-१७७४ ते १०-६-७५ ५. सन १७६८-६९

### लेखांक ५९

रा. ब. वाड–सवाई माधवराव रोजनिशी पृ. २८ वरील उतारा

रोजकीर्द छ५ रबिलाखर सुर सन खमास सबैन मया व अलफ[1] खासुदगीचे पोटात देणे कारकून निसबत दप्तर यास सन अर्बा सबैनची मोईन रसानगी पट

| खाते | इसमाचे नाव | ऐन | दिवट्या अफ्तागिऱ्या | नक्त | | कापड | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पालखी | एकूण | आंख | रुपये | |
| येकबर्जी | नारो कृष्ण वोक | ३५० | ० | ० | ३५० | १०० | ४० | ३९० |
| दप्तर | रघो हरी वोक | २५० | ० | ० | २५० | ४० | १६ | २६६ |

### [ लेखांक ६०

वेळणेश्वर गावच्या हक्काचे प्रमाण–चापेकर कुलवृत्तांत पृ. २१ वरून

चव्हाण ओक देशमूखी हक्क : ( १ ) घरपट्टी व वण ह्या वसुलाखेरीज नक्त वसुलावर दर रुपयास अर्धा आणा (२) गल्यावर दरखंडीमागे अर्धामण ( ३ ) सुपारी दरमणी दीड आण्याप्रमाणे ( ४ ) नारळ शेकडा पाव आण्याप्रमाणे.

### [ लेखांक ६१

वेळणेश्वरातून सन, १८२७ मधील. चापेकर कुलवृत्तान्त पृ. ५ व ११.

१३०६ चव्हाण ओक देशमुखी
३॥८९ नक्त बाब हकदारी
२०६४ सायर ६९
१॥२५ लँडरिवीनू ५०
३॥८९
७॥२४ गला कैली २२॥·॥·॥
५॥८९ प्रा। गला कैली १५०४॥·।
१॥।३५ वरी हरीक ७।१०। ०३॥= दरखंडीस १० प्रो ।
७॥२४

1. दि. १५-६-१७७४

१॥९३ हकदारी प्रो॥

ऽ३० सुपारी ऽ॥।. दरमणी ऽ३७॥ प्रो॥

१॥६३ सुपारी नारळ १०५७५ दर हजारी ऽ६२॥ प्रो॥

१॥९३

१३ऽ६

पे. द. कोकण जमाव ५४८ ] [ **लेखांक ६३**

श्री

पटीहक देशमुखी हक कोकणराव चव्हाण देसाई मामले हमजाबाद गावगन्ना तो॥ गुहागर प्रांत किल्ले गोपाळदुर्ग सु॥ अर्बा खमसेन मया व अलफ गाव

| | | | |
|---|---|---|---|
| किता | | किता | |
| ०।०। प्रा। | गुहागर | ऽऽ२॥ | मौजे साखरी खुर्द |
| ऽ३ऽ१॥ | मौजे पालसेत | ऽ॥१॥ | मौजे साखर त्रिशूळ |
| ऽ२॥१॥ | मौजे अडूर | ऽऽ१ | मजेर वक |
| ऽ१ऽ१॥ | मौजे हेदवी | ऽऽ२ | मजेर पिंपळवट |
| ऽ२।०॥। | मौजे नरवण | ऽऽ॥ | मौजे तेटले |
| ऽ॥१॥ | मौजे आवरे | ऽ॥।१॥ | मौजे उबराट |
| ऽ।१॥ | मौजे साखरी बुद्रुक | ऽ१।·॥ | मौजे असगोली |
| ऽ१ऽ॥। | मौजे वेळणेश्वर | ऽ१। | मौजे पालपेणे |
| ०॥।१॥ | | ऽ४॥·॥। | |

१ऽ१ऽ॥।

येकूण गला येक मण पाऊण पायली देविला असे तरी वसूल देणे छ११ साबान अखेर.

पे. द. कोकण जमाव ५५१ ] [ **लेखांक ६४**

श्री

यादी गावगन्ना महालानिहाय पो॥ ऐवज वसूल पो॥ वजा करून अनामत जमा वी॥ केसो कृष्ण टिळक नि॥ चव्हाण वोक देशमुख सु॥ इसने मयातेन व अलफ

ता। सावर्डे त॥ वेळंब ता। चिपळूण ता। हवेली ता। गुहागर व जकात चिपळूण ( मौजेवार जमेचे आकडे आहेत )

तेरीज येकंदर २ रु.

२१।॥≡॥ ता। वेळंब २१८≡॥ ता। सावर्डे ३४ ता। चिपळूण ५॥०। ता। हवेली १॥= ता। गुहागर ५५ जकात चिपळूण येकूण रु. १३९।--।

पे. द. को. जमाव ५५१ ]

**[ लेखांक ६४ अ**

| यामले हमजाबाद : तर्फ | अजदेहे | कसबा | देहे | येनमौजे | मजरे | जोडगाव | देहे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ता। वेळंब | ७५ | ० | ९२ | ५८ | १ | १६ | ३३ |
| ता। सावर्डे | ५६ | ० | ५९ | ५३ | ० | ३ | ६ |
| ता। गुहागर | २२ | ० | २४ | २० | ० | २ | ४ |
| ता हवेली | २० | १ | २३ | १७ | ० | ३ | ६ |
| ता। चिपळूण | ५३ | ० | ६४ | ४६ | ० | ७ | १८ |
| ता। हेळवाक | २४ | ० | २४ | २४ | ० | ० | ० |
| | २५० | १ | २८६ | २१८ | १ | ३१ | ६७ |

**[ लेखांक ६५**

ऐतिहासिक दंतकथा व गोष्टी–भाग२ लेखक द. वि. आपटे १९२५ पृ. ४१

भालेराई : संभाजीच्या वधानंतर रूपाजी व बाबाजी भोसले या नावाचे दोघे बंधू या बेबंदशाहीच्या काळात प्रमुखपणे वावरत होते. हे भाला मारण्याचे कामात पटाईत असल्यामुळे शिवाजी महाराजांच्या कारकीर्दीत त्यांना भालेराव असा किताब मिळाला होता. त्यांनी हा दंगा नेटाने चालविल्यामुळे महाराष्ट्रात औरंगजेबाचे ठाणे बसू शकले नाही. त्यावेळेपासून भालेराई हा शब्द अंदाधुंदी या अर्थी वापरतात. हिंदू मुसलमान सर्वांनी जाळपोळ व लुटालूट करण्याचा सपाटा चालविला. कित्येकानी आपल्या भाऊबंदांची मुलाबाळासुद्धा कत्तल करून त्यांची वतने बळकाविली.

पे. द. द. को. रुमाल ६५१ ] [ **लेखांक ६६**

राजमंडळ रोजकीर्द

स्वारी राजश्री दादा छ१९ रविलाखर खमस सितैन मया व अलफ[1] दफाते पत्रे १/३ सकराजी केशव याचे नावे पत्र की, गोपाल रामचंद्र व हरी महादेव वोक देसाई याणी कसबे नासिक पो।। मजकूर येथील मुकामी हुजूर येवून विनंती केली की, मामले हमदाबाद तरफा पांच सुभा दाभोळ येथील देशमुखी निमे गंगाजी बावाजी व सूर्याजी येसाजी चव्हाण मराठे यांची व निमे आपली हरदू जणांची वतनपत्रे निरनिराली पातशाही आहेत. व वतनाचा भोगवटा शामलाचे कारकीर्दीपावेतो अविछीन्नपणे उभयतांचा चालत आला शामलाची कारकीर्द जालीयावर जाउन रुजू व्हावे तो दहशत भारी दंड-खंड बहुतास केले याजमुळे रुजु न जाहलो म्हणून वतन जप्त केले उपरांत काही एका दिवसा रुजु होवून अर्ज केला तेव्हा ते काली चालला नाही पुढे अंजनवेल तालुका दरोबस्त तुलाजी आंग्रे याजकडेस हस्तगत झाला[2] ते समयी हरदुजणानी वतनाचा अर्ज केला परंतु लोभावर त्यांनी दृष्टी देवून चालविले नाही. अलीकडे सदरहू तालुका दरोबस्त सरकारात आला तेव्हा आपण उभयता पुण्याचे मुक्कामी येवून कैलासवासी नानासाहेब याजजवळ अर्ज केला की, आपले मामले मजकूरचे वतन देशमुखीचे वतन उभयताचे प्राचीन शामलाचे कारकीर्दीपावेतो चालत होते शामलाने व आंग्रे याने चालविले नाही. हल्ली स्वामी कृपाळू होवून आपले वतन व कागदपत्र पु।। ने भोगवटीयाचे मनास आणून वतने चालते करावे त्यावरुन सरकारात हरदूजणाचे .... दाखले पाहून प्राचीन वतनदार खरे धानास आणून निवल माफीक उभयता पासून नजर घेवून वतनात चालते करावया-च्या सनदा करुन द्यावयाची आज्ञा जाली. आज्ञे प्रमाणे सनदा झाल्यावर सिके करावे तो गंगाधर बाबूजी बाह्मणोलीकर याणी सरकारात विनंती केली की, आपण वोक, वोकाचे वतनाचा विभागी आहे आपला विभाग जो होईल तो देववावा मग सिके करावे ऐसा जाहला अडथळा केला त्याजवरून त्यास आज्ञा सरकारची जाहली की, तुमचा हिस्सा वतनात आहे. तर विभागीपणाचे भोगवटीयाचा दाखला आणून हुजूर समजाविणे मनास आणून आज्ञा केली जाईल मा।र निल्हेने आणून पुरवावे ते गोष्ट त्यापासून जाली नाही. पुढे श्रीमंत राजश्री भाउसाहेब हिन्दुस्थानात मोहिमेस गेले पत्रे तैसिच सरकाराचे दप्तरी राहिली....पुढे दिवसेदिवस गडबडच जाहली हल्ली स्वामीनी कृपाळू होवून पेशजी वतन मोकळया केल्याच्या सनदा तयार होवून दप्तरात राहिल्या आहेत. त्याजवर सिक्के करुन घ्यावे म्हणून विनंती केली त्याजवरुन गोपाल रामचंद्र व हरी महादेव वोक हरदु-जण हे राज्यातील सेवक एकनिष्ठपणे चाकरी श्रम साहस बहुत केले पुरातन मादबर हे जाणून याजवर कृपाळू होवुन मामले मजकूरचे देशमुखीचे वतन मोकळे करून उभयताचे

---

१. १५-१०-१७६४ २. सन १७४५

वतनापत्रावर स्थापना करावयाची आज्ञा करून हे पत्र सादर केले असे तरी निमे वोक व निमे चव्हाण खुदामत प्रमाणे मामलेदारास ताकीद करून वतन चालते करणे सदरहू देशमुखीचे हक्क सरकारात जमा आहेत ऐसीयास इतर तालुके याचे जमीनदाराची हके सरकारात जमा आहेत. आणि हल्ली त्याची वतने चालत आहेत त्यास हक त्याचे हिश्याप्रमाणे करार करुन देवून कडे याचे वतन चालते करुन हक दरसाल पावीत जाणे म्हणून पत्र १ राजश्री दादा छ१९ राखर[1] दफाते पत्रे सकराजी केशव याचे नावे पत्र २

चव्हाण मराठे याचे वतन मामले हमदाबाद तरफा पाच सुभा दाभोळ येथील देशमुखीचे वतन मोकळे करून राजश्री शकराजी केशव यास आज्ञापत्र सादर केले आहे तर सरसुभातून तुम्हास पत्र सादर करतील त्याप्रमाणे वोक चव्हाण याजकडे याचे वतन चालते करून हक दरसाल पावीत जाणे म्हणून पत्र ३

पे. द. द. को. रुमाल २९८ ] [ **लेखांक ६७**

श्री

यादी सुभा दाभोळ देसाओ व देशकुलकर्णी याचा हक सरकारात जप्त आहे त्यापैकी......चव्हाण कोकणराव व वोक देसाओ मामले हमदाबाद याचा भाऊपणात लढा आहे यामुळे याचा हक्क...मोकळा झाला नाही त्यास हल्ली आनंदराव चव्हाण याणी सरकारात विनंती केली की आम्हास व वोकात...कजिया आहे तो पुढे समजून घेऊ परंतु हक चालता करुन द्यावा हे सर्वाचे विचारे जाहले आहे तरी त्यावरुन कारले देशकुलकर्णी व फडके देसाओ याचा हक परभारा रयत निसबत त्याजकडे चालत आहे त्या प्रमाणे चव्हाण कोकणराव व वोकदेसाओ मामले मजकूर याचा हक रयत निसबत त्याचकडे चालता करुन सरकारची नजर हाली याजपासून घ्यावयाची करार केले.

४००१ किता
५०० किता
४५०१

साडेचार हजार येक रुपये नजरेचे करार केले हे सदरहुच्या पत्रावर सिका जाहला म्हणजे सरकारात घ्यावे येणेप्रमाणे करार करावे.

संमत

छ १७ रजब भाद्रपद सन सीत सबैन[2]

१. १५–१०–१७६४

२. दि. ३–९–१७७५ भाद्रपद वा ४ शके १६९७

द. को. रु. ६५३ ] [ **लेखांक ६८**

राजमंडळ रोजकीर्द

स्वारी रा. पंतप्रधान छ १९ जिल्हेज सीत सबैन मया व अलफ[1] दफाते पत्रे मुकाम पुणे वि।। जनार्दन अप्पाजी

चव्हाण कोकणराव देसाअी व वोक देसाअी मामले हमजाबाद ता।। पाच सुमा दाभोळ ता।। अंजणवेल यापैकी आनंदराव चव्हाण कोकणराव देसाअी याणी हुजूर पुण्याचे मुकामी येवून विदीत केले की, शामलाचे कारकीर्दी अगोदर देशमुखीचा हक परभारा रयत कडोन आमचा आम्ही घेत होतो तो शामलाने मना करुन आपण वसूल घेवून त्याअैवजी काही आम्हास देत असे तेवढेच घेवून होतो. त्याप्रमाणे आंग्रे याचेही कारकीर्दीत चालत आले. अलिकडे सरकारचा अंमल झाल्यावर भाअुबंदीच्या कजियामुळे सरकारातून आम्ही काहीच घेत नाही त्यास पेशजी श्रीमंत कै. नानासाहेब यांचे वेळेस दाभोल सुभाचे सरदेसक मिलोन परभारा हक चालता करावयासी विनंती केली तेव्हा सरकारात नजर साऱ्यापासून तीन हजार रुपये घेतले हक्क कारभार चालता करावयाचा मा। जाहला होता परंतु सनदा होवून चालता जाहला नाही. त्याजवर श्रीमंत कै. माधवराव साहेब याजपासी विनंती केली त्यांनी पेसजीचे दाखले मनास आणून हक परभारा रयते-निसबत चालता कराविसी सनदा द्यावयाची आज्ञा केली त्यापैकी मोडक देसाअी मामले जाफराबाद व कार्ले देसकुलकर्णी यांच्या सनदा जाहल्या आमची सनद भाअुबंदीच्या कजीयामुळे राहिली मोडक व कार्ले सनदा....फडके याचा हक मान्य जाहला...हली आमच्या साऱ्या भाअुबंदाच्या मते हक चालता करुन घ्यावा या प्रमाणे ठराव जाहला आहे तरी ( कार्ले व फडके ) त्याप्रमाणे आमचा चालता करावा म्हणून, त्याजवरून मनास आणता दामोल सुभांचे देसकाचा हक सरकारात जप्त आहे त्याप्रमाणे सरकारातून देसकास मोअिनी देतात बाकी सरकारात राहतो त्याविसी देस्कानी तीर्थस्वरुप कै. माधवरावसाहेब याजपासी विनंती केली ( कार्ले फडके चालता झाला ) ( आमचा ) भाअुबंदीमुळे चालता जाहला नाही......त्यावरून चव्हाण देसाअी व वोक देसाअी मामले मजकूर याजवर कृपा होवून...तो मोकळा करून तुम्हास हे पत्र तुम्हास सादर केले......... रयताकडून देत जाणे....चव्हाण व वोक देसाई यांचे इनामती व इसाफत गाव आहेत. त्याच्या सनदा व पत्रे मागील पाहून....त्याप्रमाणे चालविणे...म्हणून कृष्णाजी विश्वनाथ ता।। अंजनवेल यांचे नावे छ ५ सव्वालेची[2] चिटणिसी पत्र–१

............( येथे जमाखर्च दिला आहे )

..............

येकूण चार हजार पाचशे एक रूपया सदरहूप्रमाणे आनंदराव चव्हाण व बालाजी-राव चव्हाण कोकणराव देसाई व गोपाळ रामचंद्र बेलंबकर वोक देसाई याणी विठोबा नाईक रास्ते याजकडून सरकारचे वतनास देवविले........ते जमा असत छ २५ जिल्हेज.[3]

१. दि. १०-२-१७७६ २. दि. २९-११-१७७५ मार्गशीर्ष शु।। ७ शके १६९७
३. दि. २८-१-१७७६.

पे. द. को. जमाव ५४८ ] [ **लेखांक** ६९

श्री

अखंडित लक्ष्मी अलंकृत रा. रा. कृष्णाजी विश्वनाथ गोसावी यासी सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सु॥ सन सीत सबैन मया व अलफ[१]

चव्हाण कोकणराव देसाई व ओक देसाई मामले हमजाबाद तर्फा पाच सुमा दाभोळ तालुके अंजनवेल याचा हक सरकारात जप्त आहे तो मोकळा हुजरून करून तुमचे नावे सनद सादर आहे त्याअन्वये सरसुभाहून ताकीद सादर आहे त्याप्रो। याचा हक रयत निसबत चालवून याजकडे देत जाणे. साल मजकुरी बेहडयास सहरहू हकाचा येवज नेमणूक करुन दिल्ही नाही यास्तव हकाचा येवज द्यावयास दीमत कराल तर न करणे हुजूरचे सनदेप्रमाणे हकाचा येवज देणे याएवजी तुमचे बेहेडयास येवज कमी होईल सबब याजकडून कर्ज रु. १५०० पंधरासे अखेर साली घ्यावयाचे करार करुन तुम्हाकडे देविले असेत. तर सदरहू येवज अखेर साली याजपासून घेऊन कर्ज जमा धरणे. जाणिजे छ ६ जिल्हेज[१] पो॥ हुजूर.

पे. द. को. जमाव ५४८ ] [ **लेखांक ७०**

श्री

यादी ... ... .... १ चव्हाण कोकणराव देसाई व वोक देसाई मामले हमजाबाद सुभा ( इत्यादी ) याचा हक भाऊबंदीच्या कजियामुळे सरकारात जप्त होता तो सन सीत सबैनात[२] मोकळा करून परभारा रयतेकडून याचा हक यास देविला असे तर तालुके मजकूरपैकी चिपळूण महालाचे गावापैकी चौथाई तक्षीम तुम्हाकडे आहे त्याचे जमाबंदीवर याचे हक ऐनजिनसीस दरखंडीस अदमण व नक्त बाबेस दर रुपयास अर्धा आणा प्र॥ हकाचा शिरस्ता आहे तो याचा यास परभारा रयतेकडून देखील जकातीवर हक आहे तो घेवावा म्हणोन राजश्री परशराम पंडित प्रतिनिधी यांचे नावे पत्र.

---

१. दि. २८-१-१७७६ माघ शु॥ ८ शके १६९७

२. इ. स. १७७५-७६

[ लेखांक ७१

भा. इ. सं. मंडळ स्वीय ग्रंथमाला क्र. ७५ संभाजीकालीन पत्रव्यवहार. व्हॉल्युम ३१ जमाव सेक्शनमधील कागद नं. १३८ पृ. ११३ को. रु. ५२९ सन १७७७ ची यादी.

यादी चव्हाण कोकणराव देसाई व वोक देसाई मामले हमजाबाद सुभा दाभोळ तालुके अंजनवेल याचे देशमुखीचा हक सरकारात जप्त आहे तो सन सीत सबैना[1]पासून मोकळा करून याचा यास परभारा रयताकडून देणे म्हणोन सनद सादर जाहली ...... ... कै. नानासाहेब यांचे वेळेस चव्हाण व वोक देशमुख व सिर्के यांचा कजिया झाला ते वेळेस कान्होजी आंगरे यास दर खंडीस आदमण प्रो॥ करार करुन सनदा दिल्या ( अपूर्ण )

पे. द. दक्षिण कोकण ४२१ ] [ लेखांक ७२

राजमंडळ

सु॥ सबा सबैन मया व अलफ[2] दफाते पत्रे छ २९ रवि लावल[2] .... ... चव्हाण कोकणराव देसाई व वोक देसाई मामले हमजाबाद सुभा दाभोळ तर्फा पाच तालुके मजकूर याचे देशमुखीचा हक सरकारात जप्त ... तो साल गुदस्ता सीत सबैनापासून मोकळा करून याचा यास परभारा रयतेकडून देणे म्हणून पत्र ... ... ( शिर्के याची भानगड ) म्हणून पेशजीच्या पत्राप्रमाणे इसाफत व इनामत गाव आहेत ते मोकळे न करता परभारा रयताकडून हक सदरहू अंजनवेल देशमूख मजकूर यास घेणे म्हणोन म॥ निल्हे याचे नावे छ २१ रविलावल[3] सनद–१

पे. द. द. को जमाव ४२२ ] [ लेखांक ७३

ता॥ अंजनवेल सलास समानीन मया व अलफ[4]

राजमंडळ

स्वारी रा. पंतप्रधान सु॥ खमस ... ता॥ अंजनवेल नि॥ त्रिंबक कृष्ण खर्च

---

१ इ. स. १७७५–७६ २. दि. १०-५-१७७६

३. १८-५-१७७६ ४. इ. स. १७७६

बा। चव्हाण कोकणराव देसाई व ओक देसाई मामले हमजाबाद तालुके मजकूर याचा हक सरकारात जप्त होता तो सन सीत सबैनात[१] मोकळा करून हुजरून परभारा रयते-कडून देविला परंतु पावला नाही. सरकारात वसूल आला त्याप्रमाणे सन अर्बा व सन सबासबैन दुसाला

सनसमानात खर्च लिहून दिल्हा. जकातीकडून सन तिसापासून ऐवज सरकारात आला त्यापैकी जकातीकडील हिसेब पाहून व्यंकोजीराव याजकडे बाकी येणे त्या पै॥ खर्च.

... .... ... ....

... ... .... ...

पे. द. को. जमाव ५५१ ] [ **लेखांक ७४**

श्री

श्रीमंत राजश्री गंगाधरपंत तात्या सुभेदार अंजनवेल. स्वामीचे सेवेसी सेवक चव्हाण कोकणराव देशमुख व वोक देशमुख तो। मजकूर रामराम व नमस्कार विज्ञापना ऐसीजे. ता। मजकूर येथील देशमुखीचे हकाचा यवज आपण सरकारात वसूल आणला होता तो आमचा आम्हास परत दिला तो आम्ही भरून पावलो मिती माव व॥ ९ शके १७३२ प्रमोदनाम संवत्सरे[२] बहुत काय लिहिणे हे विज्ञापना

श्री. शंकर विष्णु ओक रा. वेळंब यांचेकडून ] [ **लेखांक ७५**

( याचे आरंभी वेळंबकर ओक वंशावळ दिली आहे )

मी दत्तात्रय गोविंद ओक देशमुख जात ब्राह्मण धंदा नोकरी उमर वर्षे सुमारे ३६ रा॥र वेळंब प्रतिज्ञा करून लिहून देतो की सदरी वंशावळ लिहून दिली आहे ती खरी आहे. मी देशमुखीतील वतनदार आहे. रत्नागिरी तुकडीतील पोट तुकडी ता। चिपळूण, खेड, संगमेश्वर व पेटा गुहागर यातील दरोबस्त देशमुखीचे वतनाप्रैकी पाव आणा८८३ रामकृष्ण विठठ्ल ओक देशमुख याजकडून तारीख २१-७-१९२० रोजचे बेचन पत्रा

---

२. स. १७८२–८३     २. दि. १७-२-१८११

आधारे मी व गणेश कृष्ण ओक देशमुख या दोघांनी ११०० अकराशे रुपयास बेचन घेतले आहे. पुराव्यासाठी बेचन पत्र हजर केले आहे तरी त्यात लिहिलेले गावाचे वतन रजिस्टरास रामकृष्ण विठठ्ल ओक देशमुख याचे असलेले नाव कमी होऊन त्या ठिकाणी बेचन पत्राप्रमाणे मी व गणेश कृष्ण ओक देशमुख या दोघांची नावे दाखल व्हावी असे माझे म्हणणे आहे. हे लिहून दिले सई तारीख ३-५-२२

१ दत्तात्रय गोविंद ओक देशमुख दस्तुर खुद

समक्ष
सही इंग्रजी
महालकरी

उतारा तयार करणार
वी. रा. भिडे

उतारा रुजू पाहिला २७-१०-२३
सही इंग्रजी

महालकरी
★ जिल्हा रत्नागिरी ★
पेटा गुहागर

खरी नक्कल
सही इंग्रजी
महालकरी

पे. द. को. जमाव ५४८ ]

[ **लेखांक ७९**

पौ॥ शके १७२१ मार्गस्वर[1] वद्य १

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गोपाळपंत ओक देसाई स्वामीचे सेवेसी पोष्य केसो रंगनाथ निंबकर खोत माहाजन मौजे धोपावे ता। गुहागर साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल ता।। मार्गसीर्ष[2] शु।। १३ पावेतो वर्तमान यथास्थित असे विशेष तीर्थस्वरूप राजश्री सिवाजीपंतदादा याणी आपणास पत्र पाठविले आहे राजश्री कोकणराव चव्हाण देसाई याणी मौजे मजकूरचे बाग श्री गोपालदेव संस्थान मजकूर यासी इनाम देऊन पत्रे करून दिल्ही आहेत त्याप्रमाणे स्वामीनी कृपा करून आपणही हक्काचे इनाम-पत्र करून देऊन चालते करावे धर्मकृत्य श्रेयस्कर आहे आपली कीर्त राहील. हक्काचे इनामपत्र व रा. केसो कृष्ण टिळक कारकून आपले निसबतीने हक्काचे वसुलास आहेत

---

१. दि. २८-११-१७९९. २. दि. १७-११-९९

टीप : या पत्रात उल्लेख आहे ते केसो कृष्ण टिळक हे लोकमान्य टिळकांचे पंजोबा. जन्म सन १७७८, चिखलगावचे खोत.

त्यासही निराळे पत्र देऊन हक्क देवाकडे चालते करावे पावणेच्यार रुपये पावेतो दरसाल आकार होतो गाव लहान आहे नारल येक व पोफळे सुमार पंचवीस व म्हाळुंगे दोन सेवेसी पाठविली आहेत बहुत काय लिहावे लोभ करावा ही विनंती.

भा. इ. सं. मं. त्रैमासिक वर्ष ७ ] **[ लेखांक ७७**

गोखले व फाटक रास्ते यामधील फारकत पत्र जं. शं. ना. जोशी : आनंदराव रास्ते यास पुंडलीक नारायेण फाटक[१] लिहून दिल्हे फारकत : शके १७०६ क्रोधीनाम सवछरे १ श्रावण शु॥ ६ मुक्काम वाई सु॥ खमस समानीन मया व अलफ तेरीख छ५ रमजान १ हे फारकत

लि ॥ सही हस्ताक्षर गोपाळ पुंडलीक

साक्ष

१ वासुदेव नाईक रास्ते
१ गोपालदादा देशमूख वोक
१ बापूजी मोरेश्वर थिटे
१ विनायकराव रास्ते
१ बळवंतराव वैद्य

**[ लेखांक ७८**

श्री. जगन्नाथ त्रिंबंक ओक–वेळंब यांचे संग्रहीचा
२५-१–१८१७ चा ]

शिवचरण
तत्पर रामचंद्र
महादेव
निरंतर

कौलनामा स्वारी राजश्री रामचंद्र महादेव सुभेदार अंजनवेल ता॥ सदाशिव गोपाळ वोक खोत कसबे वेळंब ता॥ मजकूर देशमुख तालुके मजकूर मामले हमजाबाद सुभा दाभोळ सुरू सबा अशर मयातेन व अलफ[२] तुम्ही सुभा येऊन विनंती सेली की कसबे मजकुरी ठिकाण नाळे येथे जंगल गर्क नालेगर्क जमीन आहे म्हणोन सन इसन्ने अशर मया तैनातात

१. दि. २३-७-१७८४.
२. गोपिकाबाई पेशवे यांचे सोयरे पहा ले. ८१.
१. दि. २५-१-१८१७

माजी मामलेदार राजश्री येसाजी पवार याजकडे सुभा जाऊन विनंती केली जे साल मजकुरीं सरसुभाची सनद नक्ती शिरस्ते याची छ१० सवालची सुभा सादर जाहली आहे कीं जंगलगर्क व पऱ्ह्यागर्क व दर्यागर्क व नदीगर्क व कातळवट व डोंगरालगत जमिनी आहेत त्या जमिनीत झाडझाडोरा तोडून खुंट बेट खणोन खाचखळगे उंच-सखल आहेत त्यात डोंगराची माती भरणी घालोन श्रम सहासे करावी तर पैका मुबलक खर्च होतो आणि पिके कमी याजमुळे ऐन जिनसी दस्तबाबती हकदार सुधा सरकार दस्ताची उगवणी होऊन आंगसुटका होत नाही ऐसियासी सुवर्णदुर्ग व कल्याणप्रांती मेहनत व पिकाचा अजमास आकार पाहोन माफी इस्तावा लावून...आज्ञा जाहल्यास...जमीन तयार करू म्हणोन विनंती केली त्याजवरून छ १४ सफरची आज्ञा सादर केली कीं शेत तयार झाल्यावर सुभा विदित करून कारकून व काटकर नेऊन जमिनीची मोजणी व खर्चाच अजमास करून...माफी इस्तावेयाचा कौल सादर केला जाईल म्हणोन त्याजवरून जंगल-गर्क व पऱ्ह्यागर्क जमिनीस कस्त मेहनत करून...किरिस्ताव याजकडून चिरेबंदी दुमाली बांध वगैरे दगडी पुरणीचे बांध घालून...तयार करोन...जगन्नाथ मोरेश्वर कारकून व काटकर पाठवून....मोजणी व खर्चाचा आदमास आणिल. ते जमीन : ठिकाण नाले देऊली कुडयाट तयार ८३।।।=।। ५० ३१ ८१८३। ३१ १५ एकूण ८५८।।। व तयार होणे८१।-।। ३० १७, ८११ २९ १८, ८१।=।। २६ २१ एकूण ८३।।। ३।।। ( दोन्ही मिळून ) ८८।।। ४।। यासी चतुःसीमा...उत्तरेस मळण व कौंढर काळसूरची सीमा...मोजणी.... नक्त आकार ( खर्च ) रु. १८२१ व शेत तयार होणे...मिळून २०२१...शिरस्ता आहे त्याप्रमाणे साल मजकोर पासोन सनसीत सलासीन मयातेन व अलफ पावेतो माफी साले वीस भरलियावर हकदार बाबती सुधा दर बिघा रु. १ सन सबा सलासीन

१। सन समान सलासीन

१।।- सन तिसा सलासीन

१।।।= सन आर्बैन

२।। सन इहिदे आर्बैन

प्रा। करार करून देऊन कौल सादर केला असे तरी उमेदीने बांधबंदिस्त करून शेत महामुरा करणे. माफी इस्तवा भरलियावर सरकारदस्ताची उगवणी नख्ती शिरस्ता दरबिघा हकदार बाबती सुधा नख्त रुपये तीन प्रो। देऊन कौलासिवाय...सुखरूप रहाणे जाणिजे छ७ रबिलावल मोर्तबसुद

पे. द. Agent's file No. 9 ] [ **लेखांक ७९**

The agent for the sardars in Deccan sends on 24Th January 1849 to the chief Secretary to the Government of Bombay a list

of about 62 individuals who are dead and were included in the list of priviledged persons of the Deccan and Southern Maratha Country prepared in 1941–42.

| No. in 1842 list | Name | Remarks |
|---|---|---|
| 178 | Harreepant Oke | This person is not dead but his[1] name is entered 76 of clase III of the revised list of priviledged persons lately submitted to Govt.[2] The collector of Poona States that the date of death of this person cannot be traced. |
| 247 | Laxmibai Oke | The Ag. Collector of Poona States that the date of death of this lady cannot be traced. |

पे. द. अहमदनगर जमाव रुमाल १९०६ ] [ **लेखांक ८०**

यादी इनामचिटा पो॥ नासिक–सु॥ तिसा अशर मयातेन व अलफ[1]
फसली १२२८.

६५ मौजे पिंपळगाव मोर
३५ हकदार पासोडी मोकादम बिघे ३५ दर १ प्रो॥
१५ धर्मादाय कृष्णराव गंगाधर वोक बिघे १५ दर १ प्रो॥
१५ इनाम हडोला हडकी बिघे ४० मक्ता रु. ९०
६५

मौजे पिंपळद
१८ धर्मादाय जिरायत
३ हरभट मुळे बिघा १ दर ३ प्रो॥
१५ कचोपंत वोक बिघे १५
१८ १६

१ ते २ मूळ प्रतीत हरीपंताच्या अहवालातील पहिल्या चार ओळी खोडल्या आहेत.

मौजे सावली जिरावत

.... ... ... ...

२० बाळ दीक्षित बिघे २० दर १ प्रो।

मौजे चुचाले

७५ धर्मादाय कचो रामचंद्र वोक

जिराइत ७५ बिघे दर १ प्रो।

यादी पो। नासिक पौ इनाम व सरंजामास गाव व अमल व जमिनी आहेत. सु।। तिसा अशेर मायतेन व अलफ सन १८१८ इसवी[1]

बाकी जाहागीर इनाम

... ... ... .... ...राजेबहाद्दर

.... ... ... .... .... ...रास्ते

६०१।।। मौजे पिंपळगाव बहुला माधवराव

गंगाधर वोक याजकडे ७३२।।।≡ रुपये

पौ वजा मोकासा बाबाजी महादेव

नि।। दाभाडे याजकडे १३१८≡ रुपये.

बाकी............................रुपये

४४७ मौजे चिचोली मोरो माधवराव पेठे

याजकडे जाहागीर बाबती सरकारात अमल

यादी इनामी गाव माहाल पो। नाशिक सु।। तिसा अशर मयातैन व अलफ[1]

२८ आजी इनामी

.... ... ... ...

... ... ... ....

१ मौजे शिलापूर धोंड जोसी

७ मोकासी

१ .... .... ... ...

१ ... ... .... ...

१ मौजे पिंपळगाव बहुला वोक

यादी मोगलाई पौ व स्वराज्यात आवली पासोन अखर कारकीर्दीपर्यंत पो। नासिक येथे मामलेदार सनदी जाले ते दरयेक मामलेदार यानी किती साल वहिवाट केली ते

१ सन ११६० ( मुसलमान )[2]

१ ... ... .... .... ,,

१ ... ... ... ... ,,

---

१. दि. ६-६-१८१८ ते ३१-१२-१८१८ दरम्यान

२. मुसलमान मामलेदार दि. २५-५-१७५० ते ५-६-१७५३

पेशवाई कारकीर्द अमल झाला

२ बालाजी महादेव वोक सन ११६२ अखेर
साल ता। सन ११६३ अखेर साल पावेतो[1]
साले दोन

१ बाळाजी महादेव वोक सन ११९४ अवल[2]
साल अखेर साल मोरो विनायक दी।।
पटवर्धन नासिककर

१ .... ... ... ... ...

१४ सन ११९५ अव्वल साल धोंडो महादेव जोसी
अखेर साल कृष्णराव गंगाधर वोक नासिककर
ता। सन १२०८ पो[3] साल सुमारी १४

यादी इनाम जमिनी व वर्षासने व इनामी सरंजामी गाव व अमल हली दुमालद. याजकडे चालत आहेत त्याजबा। वगैरे

१ मौजे चुचाले
कचोराम वोक बिघे ७५ यासी दाखले
पेशवे कारकीर्दीतील.

१ प्रा। टिके गावकरी यानी दिल्हे
त्याचा चकनामा सन १२२५ चैत्र[4] शु।। १३ बिघे १६।।

१ प्रा। टिके भातरण्यास मोकादम यानी
सन १२०८ फणुस दिले ते बिघे ४

१ प्रा। टिके १६८५ जेष्ट[5] शु।। ६ चे
मितीचा चकनामा बिघे १२

२ जमीन झाडे बिघे १५
१ सन ११९६
१ सन १२२५
―――
२

१ दाखला लागत नाही ते बिघे ४२।।
―――
७५

---

१. सन १७५३-५४
२. सन १७८४-८५
३. सन १७८६ ते १७९९
४. दि. १०-४-१८१६
५. दि. १६-६-१७६३

१ कुरण कचो रामचंद्र याजकडे बिघे २५०
यासी दाखले पेशवे कारकीर्दीतील
१ माधवराव बल्लाळ याची सनद
छ३ सफर सु।। इसने सितैन मया व अल फ[1]
२ जमीन झाडे १ सन फसली ११९३ बिघे २५०
१ सन १२२५ फसली बिघे २५०
२

३

| कसबे नाशिक | बी।। आकार बिघे | यादी दाखला सन ११७९ इनाम झाडा |
|---|---|---|
| १ ... .... ... | | |
| २ .... ... ... | | |
| ३ .... .... ... | | |
| ४ वलवंतराव कृष्ण वोक | २० | २० |

सन १२४४ फसली[2] नाशिक पैकी आपले वतन दुसरे कोणास विकले त्याब।। रिपोर्ट ......१६ जुलई१८३४ इ।

१ मौजे पिंपळगाव भावला ( दुमाला सरकती गाव ) तेथील कृष्णाजीराव वोक निमेचे पाटील याणी आपले निमे पौ। दोन चाहूर पाटील.......... घुणे चाहूर येक व चांदोजी पाटील काक३ चाहुर१ एकूण दोन चाहूर पाटिलकी फरोक्त केली त्याचे महजर होऊन सरदेशमुखीची मोहोर जाली आहे. मौजे पिंपळगाव भावाला १२३० फसलीचे[3] हिशोबावरून वळवंतराव कृष्ण ओक याजकडे शराकती

इनामी सरकारात घ्यावयाचा वसूल
मोकासा अमल ७०८१०८२
पोतदी मख्ता ३
७३८१०८

१. दि. ३-९-१७६१
२. सन १८३४-३५
३. सन १८२०-२१

### [ लेखांक ८१

पराग मासिक संपादक य. न. केळकर, ग. ना. जोशी, व डॉ. मो. गं. दीक्षित P.h. D. वर्ष १ अंक ११ ऑगस्ट १९४८ पृ. ९ पेशव्यांचे नातलग किती व कोण ? लेखक य. न. केळकर. पुण्याचे मोरो विश्‍वनाथ भावे यांचे संग्रहातील कागद चि. माधव विनायक भावे याजकडून मिळालेले. सवाई माधवरावांचे पहिले लग्न माघ शुा १ शके १७०४ ता. १०-२-१७८३ ला केशव नाईक थत्ते यांची कन्या रमाबाईबरोबर झाले. रमाबाई मृ. शके १७१४. नाना फडणीसाने प्रत्येक समारंभाचे कार्यक्रम व तपशील कसोशीने ठरविले होते.

१ श्री

यादी लग्नाचे समारंभास सोयरे मंडळी बोलवावयाची सुरु सलास सममानीन मया व अलफ मार्गशीर्ष[1]

१२ मातुश्री राधाबाई थोरली यांची सोयरी ( बाळाजी विश्‍वनाथ यांची बायको )

१
१३

८ कंटोरेकर बर्वे-आठ असामीस लग्नचिटया मात्र पाठवाव्या.
१ हरी जिवाजी बर्वे वाा निंब यास पालखी व घोडे १
१ धोंडोपंत जोशी वाा गोवित्रीकर....घोडे १
२ अवळसेस १ केसो विष्णुदातार हावलदार यास घोडे १

१२

१ रामचंद्र अनंत यास घोडी २
१ बाईचे मावसभावाचे पुत्र घोडे १
नारायण जोसी माखजणकर थोरले

१३

१ मातुश्री अनुबाई घोरपडे ( बाळाजी विश्‍वनाथाची कन्या ) यास पालखी१ व घोडी ४
८ मातुश्री ताईसाहेबा कडील ( थोरल्या बाजीरावाची बायको ) सोइरी असामी
१ मातुश्री रखमाबाई चासकर यास पालखी १
३ पाटणकर यास चासेस घोडी ३
१ ... ... ....
१ .... .... ...
१ ... .... ....        मनोहर खेड

१. दि. ७- १२-१७८२ ते दि. ३-१-१७८३ मार्गशीर्ष महिना

१ अमृतराव बल्लाळ जोसी जुनरास आहेत त्यास पालखी १ व घोडे १

८

१६ मातुश्री गोपिकाबाई याजकडील सोइरी

१२ रास्ते १ पुंडलीक नाईक फाटक १ कोंडो जिवाजी गाडगीळ पालखी१ घोडी २

१ अप्पाजी बर्वे यांची स्त्री सावित्रीबाई मातुश्री बाईची बहीण कोटरेकर यास पालखी१ घोडी २

१ यज्ञेश्वर दीक्षित भागवत टोकेकर यास पालखी१ घोडे १

१६

१२ सौ. पार्वतीबाई याजकडील ८ पेणेस कोल्हटकर इत्यादी...

१० सौ. रमाबाईची सोइरी ( यात गराडयाचे जोसी मावसभाऊ आहेत )

१२+१ सौ. आनंदीबाई कडील सोइरे

१ नारो रघुनाथ ओक यास मातुश्रीस मळण तालुका अंजनवेल येथे आहेत. त्यास पालखी१ व घोडे १

२ रामाजीपंत व हरीपंत ओक राघोपंतांचे बंधू नासिकास आहेत त्यास घोडी२ पालखी १

१ अप्पाजीपंत ओक याची स्त्री पुण्यात आहेत. सौ. बाईची चुलती हल्ली राघोपंत ओक याचे घरी आहेत.

१ विसाजीपंत मामा कानिटकर मौजे पालसेत ताा ग्वाहागर ता. अंजनवेल येथे आहेत त्यास घोडे १

१ सदासिवपंत परांजपे मेव्हणे श्री त्रिंबकेश्वरी आहेत त्यास घोडे १

१ येसाजीपंत चोळकर याची स्त्री सौ. बाईची बहीण यास घोडे मौजे जाबसूद ताा अंजनवेल घोडे

१ केसोपंत चापेकर आतेचे लेक वेळणेस्वरास आहेत त्यास घोडे १

१ बाळाजीपंत टिळक आतेभाऊ मौजे चिखलगाव ताा सुवर्णदुर्ग येथे आहेत त्यास घोडे १

१ चिंतोपंत सोमण आतेभाऊ नासिकास आहेत त्यास घोडे १

१ धोंड जोसी पालसेतकर घोडे १

१ सदाशिवपंत कानिटकर घोडे १

१ त्रिंबकपंत कानिटकर रामचंद्र केशव यांचे पुत्र घोडे

१३

सोइरे मंडळी लग्नसमारंभास आलेत्यांच्या बायका सुाा सलास समानीन मया व अलफ

... ... ...

.... ... ...

१७ नि।। सौ. आनंदीबाई

२ नारो रघुनाथ ओक व मातुश्री यशवदाबाई १ सौ. स्त्री ।२

४ रामाजी महादेव ओक१ सौ. स्त्री२ सौ. सुना १ सौ. भाची चितोपंत यांची स्त्री

३ रामचंद्र केशव कानिटकर२ मातुश्र्या१ सौ. सून

२ मातुश्री अन्नपूर्णाबाई, अप्पाजीपंत वोक याची स्त्री १ खासा १ मातुश्री अन्नपूर्णबाई ।२

३ गोविंद गोपाळ बर्वे यांच्या सौ. सुना

३ कुटुंब शास्त्री१ सौ. स्त्री२ सौ. सुना ।३

१७

यादी चिट्या पोचवावयाच्या ता। जिवाजी रघुनाथ छ ९ रा

१ धोंडभट जोसी पालसेतकर बिऱ्हाड राघोपंत ओक याचे घरी

१ येसाजीपंत चापेकर बिऱ्हाड राघोपंत ओक याचे घरी

१ सदाशिव रघुनाथ कानिटकर लोहकरीण म्हातारी जोगीसरीचे जवळ

१ विसाजी नारायण कानिटकर यांचे पुत्र

भोजनास बोलवावयाचे छ$_{१०}$ रा

१ रामाजी महादेव ओक आप्पाजीपंत ओक याचे घरी

... .... ...

... .... ...

२ मेघशाम बल्लाळ जोशी १ खासा १ पुत्र

४ दाजी श्रीधर जोसी १ खासा २ पुत्र १ पुतण्या ।४

२ नारो कोंडदेव गाडगीळ १ खासा १ कारकून

[ **लेखांक ८२**

ऐ. सं साहित्य खंड ४ दुसऱ्या बाजीरावाचे स्वारीचा ताळेबंद पान ४९

भा. अि. सं. मंडळ त्रैमासिक वर्ष २३ तिसरा अंक माघ वा। ९ शके १८६४ चा पा. ४१ दुसऱ्या बाजीरावाच्या स्वारीचा ताळेबंद ( श्री. य. न. केळकर– कै. स. ग. जोशी संग्रहातील ) ले. १९ शके १७३८ कार्तिक शु।। ५ इ. १८१६ आक्टोबर २५

ताळेबंद माहाल जामदारखाना खासगी स्वारी राजश्री....पंतप्रधान स्वारी रजन्नु अि।। जिल्काद अश्वीन मास तागाइत छ ३ जिल्हेज कार्तिकमास शके १७३८ धातनाम संवत्सरे सु।। सबा अशर मयातैन व अलफ[1] जमा रू. झाडा नाणेवार सुमारी स्वारी जुन्नर सुमार.

८२५ बरोबर नाणे नेले.

४४ असनवार मोहोरा जमा सुमार

१० यशोदा आजीबाई वोक पो।। मोहोरा शेटशाओ

३४ परशराम खं. राहतेकर पो। शिवनेरी येथे घेतल्या

४ दिली सिका

३० शेटशाओ

३४

४४

८६९

इनाम कमिशन रुमाल ७१ ] [ लेखांक ८३

मातुश्री ताई वोक यांचे गाव

१ मौजे पाडली तर्फ खेड सरकार जुन्नर मोकासाखेरीज करून जातीस सरंजाम रु. १०३१

२ मौजे वडगाव पो। नासिक या गावाची कमावीस त्याबाबत खासगीकडून १००० रुपये

१ शिवाय संसारखर्चास पालखी वगैरे बाब २०००—१००० ताई वोक यांचे नातू गंगाधर नारायण वोक याचे नावे सनद आहे.

पे. द. घडणी रुमाल ४९१ ] ( लेखांक ८४

श्री

यादी महालानिहाय पैकी गावची बेरीज सु।। इसने मया तैन व अलफ[1]

२९२५ मौजे वडगाव पो। नासिक येथील दरोबस्त अमलाखेरीज

१. दि. २३-९-१८१६ ते १५-१०-१८१६

२४०० जहागीर बाबती व सरदेशमुखीचा अमल गणपतराव विष्णू गद्रे याजकडे ब॥ मुशाहिरा होता त्याची बेरीज रु.
५२५ मोकासा केसो आबाजी हिंमत दाभाडे याजकडे

२९२५

मौजे मजकूर हा गाव मोकासा सुद्धा सरकारात जप्त आहे.
१०३१ मौजे पाडली ता। खेड प्रा। जुन्नर येथे मोकासा खेरीज करून दरोबस्त अंमल कृष्णराव महिपत साठे याजकडे ब॥ मु॥ आहे. त्याची बेरीज रु.

३९५६

एकूण तीन हजार नऊसे छप्पन रुपयांचे बेरजेचा सदरहू दोन गावचा अमल पेशजीचे अमलदार याजकडून दूर करून साल मजकुरापासून गंगाधर नारायण वोक कारकून सिलेदार याजकडे ब॥ मु॥ करार करून देवुन गावची बेरीज लि। प्रो। तीन हजार नऊसे छप्पन रुपये बा॥ मु॥ करून दिली येविसी सनदा पत्रे

१ ... .... ...
१ ... .... ....

एकूण सात सनदापत्रे देणे. छ २० रविलावल आषाढमास सन इसने मयातैन.[१]

पे. द. घडणी रुमाल ५२२ ]

## [ लेखांक ८५

यादी गंगाधर नारायण वोक. १ मौ. चिंबली ता। चाकण प्रां। जुन्नर हा गाव भास्कर काशिनाथ याजकडे होता त्याला रुकार येऊन कमाल बेरीज लिहून आणावयाची आज्ञा जाहली परंतु शोध पाहाता मौजे पाडली ता। खेड प्रां। जुन्नर हा गाव कृष्णाजी महिपत साठे याजकडे सरंजामास आहे त्याची कमाल बेरीज १००० रु.

१ मौजे वडगाव पो। नाशिक हा गाव गणपतराव विष्णु गद्रे याजकडे सरंजामास होता त्याची जप्ती हाली नासिक सुभ्याकडे आहे त्याची कमाल बेरीज २४०० रु.

पैकी येक देहे नवीन कुंजीर याजकडे सरंजामास दिल्हा बाकी दोन देहे येकून बेरीज कमाल ३४०० रु.

सोलासे रुपयाचे भरतीस पुणे सुभ्याकडील मौजे कोलवडी अथवा मौजे वडकी दोहोपैकी सरकार वसुली नेमून देवावा.

---

१. दि. १-८-१८०१ आषाढ व॥ ७ शके १७२३.

श्री

यादी गंगाधर नारायण ओक याजकडे ब।। मु।। महालानिहाय पैकी गाव आहेत तेथील कमाल आकारावर दसक रयत निसबत कर सदे रु. १० प्रो। व पाटील कुळकर्णी वगैरे याचे ब।। मुशाहिऱ्याचा इनामसुद्धा येक साल ऐवज सरकारात घ्यावयाचा तो पेशजी सन इहिदे समानिनात[1] घेतला त्याप्रमाणे सु।। सलास मयातैन व अलफ[2]

१९० मौजे पाडली ता। खेड तालुके चास येथील कमाल आकाराखेरीज मुकासा १०२५।।।

... .... ... ...

... ... ... ...

४२२।।। मौजे वडगाव पो। नासिक येथील कमाल खेरीज मोकासा

... ... ... ....

६१२।।।

[ लेखांक ८६

पेशवे दप्तरातून निवडलेले कागद खंड ३२ उत्तरकालीन पेशवे कौटुंबिक रहाणी पृ. ५८ लेखांक १०८ २६–८–१७९९ :—

यादी जिन्नस वसईहून र।। पुणे

सु।। मयतैन व अलफ [3] छ २४

रो। लावल श्रावण वद्य १० इंदुवासरे. सुमार:

| | ई अजसुमार | केळी | नारळ | सुपारी | पाने | महाळुंगे |
|---|---|---|---|---|---|---|
| बाबासाहेब | ८०७ | १०० | ५ | २०० | २०० | २ |
| अप्पासाहेब | ८०६ | १०० | ५ | २०० | २०० | १ |
| रावसाहेब | ८०६ | १०० | ५ | २०० | २०० | १ |
| इतर ४ गृहस्थ | ... | ... | ... | ... | .... | .... |
| | ३९२४ | ४५० | २० | ९५० | २५०० | ४ |
| सो। यसूने पो। | | | | | | |
| सौ. वहिनी बाई | १७६ | २५ | १ | ५० | १०० | ० |
| सौ. सीताबाई | १५० | २५ | ० | २५ | १०० | ० |

१. दि. ५–६–१८८० ते ९–६–१८८१

२. दि. ३–५–१८८२ ते १७–६–१८८३

३. दि. २६-८–१७९९

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ताई वोकीण | ९५ | २० | ० | २५ | ५० | ० |
| काकूबाई | ९५ | २० | ० | २५ | ५० | ० |
| श्रीमंत बापूसाहेब | १४५ | २० | ० | २५ | १०० | ० |
| सौ. गुजाबाई | ९५ | २० | ० | २५ | ५० | ० |
| | ४६८० | ५८० | २१ | ११२५ | २९५० | ४ |
| नारोपंत चक्रदेव | २०१ | ५० | ० | ५० | १०० | १ |
| | ४८८१ | ६२० | २१ | ११७५ | ३०५० | ५ |

पे. द. घडणी रुमाल ३९९ ] [ **लेखांक ८७**

राजमंडल

स्वारी रा. ... ... ... .... सरंजाम नि ॥ रामाजी महादेव वोक सुमा सलास[१] दफाते-पत्रे — — छ १९ जिल्हेज[१] राघो नारायण कमाविसदार पो॥ नासिक यास सनद कि मौजे चिचोले पो॥ मजकूर हा गाव अप्पाजी माहादेव वोक याजकडे कमा-वसीने पेशजी पासून आहे त्यास ते मृत्यु पावले सबब त्यांचे बंधू रामाजी महादेव ओक याजकडे मौजे मजकूर हा गाव पेशजी प्र॥ कमाविसीने करार करून हे सनद सादर केली असे तरी जमाबंदी सरसुभातून करुन देतील त्याप्रमाणे अैवज घेत जाअुन कमा विसीचे कामकाज याचे हाते घेत जाणे फडफर्मास बेडबेगर व कुरण मौजे मजकूरचे सुदामत याजकडे चालत असेल त्याप्रमाणे चालवणे म्हणोन

सनद १ – रसानगी यादी ...

पे. द. पुणे जमाव रुमाल १६९६ ] [ **लेखांक ८८**

श्री

सिका

पारसी लिहिले आहे.

चकनामा राजश्री रामाजी महादेव व राजश्री अप्पाजी महादेव अुपनाम वोंकार गोत्र वासिष्ट सूत्र हिरण्यकेशी वास्तव्य जनस्थान पे॥ नासिक सरकार संगमनेर सुमा

१. दि. १-७-१७६३

सलास सितैन मया व अलफ [1] सन ११७२ यासी देवजी पाटील व गंगाजी पाटील मौजे चुचाले पो॥ म॥ र कारणे चक करुन दिल्हा अैसाजे मौजे म॥र सरकारातून तुम्ही विजारा करुन घेतला गावावर सर्व प्रकारे मायावाद धरला त्यास तुम्हास फुले व तुलसी व शाकभाजी करावयासी आम्ही आपले स्वसंतोसे अिनाम बिघे १२ बारा दिधला त्यास गावाजवळ माहाराचे सेत होते त्यापैकी बिघे १२ बारा तुम्हा कारणे घेवून त्याचे अैवजी माहारास ओजाफी बिघे ३ तीन अेकूण बिघे १५ पंधरा नासिक वाटेवर माहाराचे रजावदीने जे सेत मागितले ते देअुन माहाराची समजोती करुन दिधली मग महाराबाबद गावाजवळील बिघे १२ तुम्हास बाग करावयास जागा दिधली तेथे तुम्ही चितास येअील तैसी विहीर नवी खणून बांधून बाग सुखरुप करणे बागात फुले तुलसी व शाकभाजी वगैरे कलेल ते करणे आम्ही आपले राजीरजावदीने तुम्हास अिनाम दिधला असे तुम्ही लेकराचे लेकरी अिनाम वाहून अुपभोग करणे सदरहू जमिनीचा चक करून दिधला मुकरा बिघे २५ (अस्पष्ट) भुजोदोरी २ भुजादोरी ६।१२ मुकरे बिघे बारा असे हमशाअी पश्चमेस वोहल वाहत आहे पूर्वेस गावाची खळवाडी उत्तरेस वडाचे झाडमडोवर दक्षिणेस महाराचे सेत हडोक सदरहू बिघे १२ बारा जमीन तुम्हास चकनाम करुन दिधली असे सुखरूप वाहून खात जाणे यासी आपण अंतर करु तर आपणास आपले पूर्वजांची सेपत असे हा चकनामा लेहून दिधला तारीख ४ माहे जिल्काद जेष्ट सुद्ध ६ बुधवार[1] शके १६८५ सुनमल नाम संवत्सरे

नि॥ नांगर बि॥ भगवंत धोंडाजी कुलकर्णी मौजे म॥ र

पे. द. पुणे जमाव रुमाल १६९६ ] [ **लेखांक ८९**

श्रीशंकर

चकनामा राजेश्री त्रिंबक रामाजी उपनाम वोंकार गोत्र वासिष्ट सूत्र हिरण्यकेशी वास्तव्य जनस्थान पो॥ नासिक सरकार संगमनेर सु॥ तिसा तिसैन [मया व अलफ[2] सन १२०८ यासी सटवाजी पाटील व लक्ष्मण पाटील व जावजी पाटील व बहिरजी पाटील मेंहडे मौजे चुचाले प्रो॥ म॥र कारणे चकला करून दिल्हा ऐसिजे मौजे म॥र सरकारा तून बहुत दिवसी तुम्हाकडे आहे गावावर सर्व प्रकारे मायावाद धरला त्यास तुम्हास भात करावयास आम्ही आपले संतोष इनाम बिघे ४ च्यार बिघे दिल्हा असे [त्यास तेथे तुम्ही चित्तास येईल तैसे विहीर खणून भात वगैरे कलेल ते करणे आम्ही आपले रजावदीने तुम्हास इनाम दिल्हे असे तुम्ही लेकराचे लेकरी इनाम वाहून उपभोग घेणे सदरहू

---

१. दि. २०-३-१७६३

२. दि. १९-४-१७९९

जमिनीचा चक करून दिल्हा यासी हमशाई पूर्वेस वोहोल वोहोलाचा वरला काठ तुमचा दक्षिणेस आमराई पश्चमेस त्रिंबक मार्ग व उत्तरेस बांध व गावची वाट येणे प्रमाणे सदरहू बिघे च्यार जमीन तुम्हास चकनामा करून दिल्हा असे सुखरूप वाहून खात जाणे यासी आपण अंतर करू तर आपणास आपले पूर्वजाची शपत असे हा चकनामा लिहून दिल्हा सई मिती शके १७२१ सिद्धार्थी नाम संवत्सरे चैत्र शु।। १४ चतुरदसी गुरवर
निशाणी नांगर बि।। सदासीव राम कुळकर्णी मौजेम।।र

पे. द. पुणे जमाव १६९६ ] [ **लेखांक ९०**

श्री

चकनामा राजश्री कचोराम ई।। महादाजीपंत उपनाम ओंकार गोत्र वासिष्ट सूत्र हिरण्यकेशी वास्तव्य क्षेत्र जनस्थान यासी गणजी पा।। वल्लद बावूजी पा।। व अप्पाजी पाटील वलद सटवाजी पा। व हयेबत पा। वलद लक्षुमण पा।। व विठुजी पा। वल्लद कृष्णाजी पा।। व निंबाजी पा।। वा।। जावजी पा।। मेपडे समस्त मोकादम मौजे चुचाले प्रो। नासिक सरकार संगमनेर खुज्येस्ते बुनियाद सु।। सीत आशेर मयातेन व अलफ[1] सन१२२५ कारणे चकनामा लिहून दिधला ऐसिजे तुमचे कर्ज मौजे मजकुराकडे मोकदमीवर व आसामीवर रुपये हरहुम यादी कुळकर्णी याचे हातची मु।। रुपये १३४६ अक्षरी तेरासे सेताळीस येणे त्याची व्याज मुद्दल करिता हिशेब मुबालक जाहला द्यावयासी ताकद नाही. आणि तुमचा आमचा वडलोपार्जित घरोबा तुम्हापासून बंडात व काळात वगैरे उवयोग बहुत जाहाला उतीर्ण तो व्हावे ऐसे आमचे सर्वत्रांचे मानस बद्दल आपल्यापासी मिनत माना नातवणी बहुत दाखवून या ऐवजाबद्दल इनाम येणे प्रमाणे

८ टिके १ कानवोहळ नूजिक बिघे आठ याची हद महदुम पूर्वेस कानवोहळ दक्षिणेस बारभाईचा मळा पछमेस निंबाजी पाटील याचे दोन बिघे सेत आहे ते उत्तरेस आंबाडवट नजीक बहिरजी पा। याचा मळा सदरहु हद नाहदुद असे या ठिकाणास कानवहळचे पाणी महिन्यात तीन रोज दाहादाहा रोजानी घेत जावे तुम्हास पेशाजी दिल्हा आहे त्यात अगर हल्लीचे इनामात कलेल तेथे लिग प्रो। घेत जावे.

८।। टिके १ गावचे पश्चिमेस पाटसरीचे ओहळाचे पार बिघे साडे आठ यासी चतुःसीमा पूर्वेस वोहळ पलिकडे गाव दक्षिणेस तुम्हास पूर्वी इनाम दिल्हा आहे तो पश्चमेस त्रिंबक मार्ग व गायराण उत्तरेस वरला वोहळ येणेप्रमाणे हद महदुप असे

१६।। यूकूण सा।डे सोळा बिघे जमीन इनाम सदरहु रुपया ऐवजी तुम्हास करार करुन

१. दि. १०-४-१८१६

दिल्ही आसे तरी तुम्ही आपले लेकराचे लेकरी वउश परंपरा विहीर वगैरे कारकीर्द कळेल तैसी करुन सदरहु जमिनीचा उपभोग घेत ( ५.१० शब्द फाटले आहेत ) करील त्याला पूर्वजाची शपथ असे सरकार साऱ्याची वगैरे कस्सा तुम्हाकडे नाही कोणी मोजाइम जाल्यास त्याजला आपण निवारत करीत जाऊ व सारादोरा देणे पडल्यास आम्ही देऊ तुम्हास उपसर्ग होऊ देणार नाही. सदरहु ऐवजाची खते पत्रे कुलकर्णी याचे हातचे यादीबरहुकूम आपण माघारी घेतली असेत कदाचित आमचे वौसी कोणी या टिक्याविसी हिला हरकत करु लागल्यास ई॥ पासून व्याज मुदल वेतनाचा फडशा करुन देईल हा चकनामा लिहून दिल्हा सही तेरीख छ ११ माहे जा॥वल ऊर्फ चैत्र सुद्ध १३ बुधवार शके १७३८ धातनाम संवत्सरे.

नि॥ नांगर                    बी॥ मोरो महादेव कुळकर्णी गु॥ जिवाजी बेकाजी

मौजे मा॥र

साक्ष १ कान्होजी वा॥ बजाजी नाईक धोगडेकाली मौजे मा॥र

१ वाल्हार वा॥ त्रिंबक पा॥ माहर मौजे मजकूर

पे. द. पुणे जमाव रुमाल १६६९ ]                    [ **लेखांक ९१**

श्री

इनामपत्र शके १७२९ प्रभवनाव संवत्सरे[1] माहे चैत्र शु॥ १ ते दिवशी राजश्री कचोपंत बिन रामाजीपंत इब्न माहादाजीपंत वोक खोत मौजे मळण तरफ वेलंब तालुके अंजनवेल हल्ली वस्ती को॥ नासिक मामले गुलशम बंद सरकार संगमनेर यासी विश्राम वलद लक्ष्मण पा॥इ॥ नागोजी पा॥ व भिवजी पा॥ वा॥ लोवजी पा॥इ॥ भवान पाटील खाडबाहले व नारोजी पा॥ वा॥ अबाजी पा॥इ॥ दावजी पा॥ बेस्तेकर मोकदम मौजे पिंपळद पो॥ नासिक सन' १२१६ कारणे इनामपत्र लिहून दिल्हे ऐसिजे आम्ही तुम्हापासून शके १७२५ पंचवीसाचे सालात ऐवज घेऊन मौजे मा॥रचे कुळास तगाईस वगैरे रुपये २५० अडीचसे दिल्हा त्यास हली व्याज हिसेब करता ऐवज मुद्दलसुद्धा मुबलख होतो द्यावयासी तो ठिकाण नाहीं कुळे गावची बंडामुळे काहीं परागंदा जाहली व काही मेली तुमचे देण्यास तो थार काहीच नाही समसंगत कुळाची मिनतमाना करुन सदरहू व्याज मुद्दल रुपयाचे ऐवजी तुम्हास मौजे मा॥र पो॥ जमीन नुतन इनाम करुन दिल्ही...ई॥ बिघे सुमार पंधरा

---

१. दि. ९-४-१८०७

वर। बिघे तपसील ५ आवणे भातचटी बिघे सुमार
२॥ तरफ खडबादले कराचे आसामी ब॥ टिकी दोन वझ्याचे महलपो। यास चतुःसीमा..........
२॥ ता। बोझेकर सिनगार याचे आसामी-बद्दल नासिक वाटेवर टिकी सुमार चार यासी चतुःसीमा.........

५

१० माल बिघे जिराइत सुमारी
५ तर्फ खड बाहले कराचे आसामी पो।
५ ,, मोझेकर मालगावकर याचे आसामी

१०

१५

सदरहू पंधरा बिघे जमीन तुम्हास पैक्याचे ऐवजी आम्ही आपले स्वसंतोषे दिल्ही असे......हे इनामपत्र लिहून दिल्हे सही नि॥ नांगर
बी॥ रामराव मल्हार ओढुरकर कुळकर्णी मौजे मा॥र
साक्षी——-चार——व महाराची.

पे. द. पुणे जमाव रुमाल १६९६ ]

[ **लेखांक ९२**

श्री

अखंड लक्ष्मी अलंकृत रा. रा. मोरो विनायेक व त्रिंबकराव सदाशिव कमाविसदार पो। नासिक गोसावी यास शेवक माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार. सु॥ इसने सितैन मया व अलफ[1] राजश्री अप्पाजी महादेव ओक यास मौजे चुचाले पो। मजकूर हा गाव म॥रनिल्हे कडे साल गु॥ सरकारातून कमाविसीनें दिल्हा आहे त्यास मारनिल्हे याणी हुजूर येऊन विदित केले की मौजे मजकूर हा गाव पेशजी वकिलाकडे होता त्याणी गावात कुरण केले आहे त्यास वकिलापासून गाव सरकारात घेतल्याबर येक दोन वर्षे गाव सरकारात कुरणासुद्धा लागला. साल गु॥ गाव आपणाकडे कमाविसीने देविला त्यास मौजे मजकूरचे कुरण आपणाकडे कमाविसदार देत नाहीत यास्तव हली कुरण

१. दि. ३-९-१७६१.

आपणाकडे देविले पाहिजे म्हणोन त्याजवरून याचे चालविणे जरूर जाणोन मौजे मारचे कुरण मारनिल्हेकडे देणे छ३ सफर आज्ञा प्रमाण मोर्तब असे.

पे. द. पुणे जमाव रुमाल १६९६ ] [ **लेखांक ९३**

श्री

सरकार कुंपणी इंग्रज बहादुर कयेफियेत बामोजी मोकादम मौजे चुचाले पो नासिक सु।। अशरीन मयातेन व अलफ सन १२२९ फसली[1] कारणे कयेफयेत लिहून दिल्ही येसिजे कचो रामचंद्र वोक याजकडे मौजे मारचे कुरण मामुल पासून चालत आहे व ते कुरणाची जमीन कसी आहे आणि त्याजकडून गावास उपद्रव लागतो किंव कसे हे नीट लिहून देणे म्हणोन आज्ञा त्यास मौजे मारचे कुरण डोंगर अंगास नीरस जमीन आहे जमेखेरीज कुरण मारनिल्हेकडे पंचावन सत्तावन वर्षे मामुलपासून चालत आहे गावास उपद्रव याजकडून काही येक नाही हे कयेफियेत लिहून दिल्ही सही नि।। नांगर बी।। मोरो महादेव गु नि।। जिवाजी वेंकाजी कुळकर्णी मौजे मार

गोहीः रामचंद्र देशमुख धोंगडे पो मार अमृतराव बलवंत देशपांडे पो मार

कपतान हनरि<br>पाटंजर साहेब<br>बहादर कलक<br>टर आमदानगर

ईजत असारगीर माजी केशव कादार पो नासिक बाफीयतबाबंद अज तर्फ कपतान हनरी पाटंजर साहेब बहादुर कलेक्टर सुभे अमदानगर मालुम बाहदरी विलायेते दि. ११ मेची आर्जदास्तब मौजे चुचोले पो मजकूर येथील मोकदम याची कैफिरेत नागरबीमल मानसी घेऊन नकल पाठविली की कचो रामचंद्र वोक याजकडे मौजे मजकूर कुरण डोंगरआंगास निरस जमीन आहे जमेखेरीज कुरण मारनिल्हेकडे पंचावन सत्तावन वर्षे मामुलपासून चालत आहे त्याजपासून गावास उपद्रव काही येक नाही म्हणोन त्याजवरुन हुकूम केला जातो जे तुम्ही कैफियते पाठविली ती तहकिल असले तरी हली चुचाले येथील कुरण जमेखेरीज मारनिल्हेकडे मामुल चालत आल्याप्रो चालवणे जाणिजे व तारीख ८ माहे जून सन १८२० इसवी.

१. दि. ६-६-१८१९ ते ५-६-१८२०.

श्री. य. न. केळकर संग्रहातून ] [ **लेखांक ९४**

दु. बा. खाते जमाखर्च

सीत अशर मयातेन १७३८ जमादिलाखर वैशाख[1]

५२५ सरकारातून पालख्या व दिवटया व अपतागिऱ्या वगैरे नेमणूक

त्यात ५० आजीबाई ओक

५० कचोमामा ओक

गो. ग. आचवल टिपणे पेशवे दप्तरातील निवडक कागद खंड २२ ] [ **लेखांक ९५**

१६३२ तीर्थरुप गंगाभागिर्थी अन्नपूर्णाबाओी आजी ओक हिला दिल्हे (१६-२-१८०७)
छ७ जिल्हेज माघ शु।। ९ शके १७२८

६५५० मातोश्री आनंदीबाओीचा श्राद्ध दिवस फाल्गुन वा। ११ (२-५-१८०७)
ते दिवशी खर्च छ२३ सफर चैत्र वा। ११ शके १७२९

४०० त्रिंबकराव मामा ओक मृत्यु पावले सबब क्रियेबद्दल (२-१-१८०८)
देविले छ३ जिल्काद पौष शु।। ४ शके १७२९ समान मयातेन

५००० काकू आजी ओक मृत्यु पावली सबब क्रियेबद्दल १-२-१८०८
छ११ जिल्हेज समान मयातेन मोहरम ऊर्फ फाल्गुन, माघ शु।। १२ शके१७२९

१०० त्रिंबकराव मामा ओक यांचे सांवत्सरिक श्राद्धाबद्दल त्यांच्या मुलास दिले
माघ शु।। ३ शके १७३० ( १८-१-१८०९ )

श्री. माधवराव ओंकार संग्रह ] [ **लेखांक ९६**

नारायणेश्वर श्री

स्वस्ति श्री शके १६३५ विजयनाम संवत्छरे फाल्गुन शु।। त्रयोदशी सोमवासर तदिनी राजश्री वेदमूर्ती विश्वनाथ भट बोपदेव भट अग्निहोत्री खरे गुहागर धर्माधिकारिणी यासी कृष्णाजी केशव व रा। हरी केशव व बालाजी हरि वोक खोत मौजे बामणोलकर याही पत्र लिहून दिल्हे ऐसाजे तुमचे आजे रामचंद्र अग्निहोत्री यास आमचे वडिलांनी आमचे गावीचे उपाध्यपण मिरासवृत्ती करुन दिल्ही त्यापासून आज-

१. दि. १८-४ ते २७-५-१८१६.

तागाईत चालत आहे त्यास अलीकडे श्रीची पुन्हा प्रतिष्ठा आम्ही मागती केली त्ये समई तुम्हास आम्ही ढाकली शेतचे चौढ ३ तीन तुम्हास उदमपंत करुन दिल्हे मिरास वृत्ती करून दिल्ही याचा तुम्ही उपभोग पुत्र पौत्री करीत जाणे याचा राजभाग जो पडेल तो आम्ही दिवाणास देऊन यास आमचे वंशपरंपरेने पुत्रपौत्री चालवीत जाऊ हे लिहिले सही

यास साक्ष

१ कृष्णाजी केशव खोत मौज बोरगांव — परशराम वइगणकर सहस्रबुधे १

१ नारो माहादेव खोत मौजे बोरगांव

हस्ताक्षर कृष्णाजी हरी खोत मौजे मा।र

कृष्णाजी केशव — हरि केशव — बाळाजी हरी

रामाजी हरि खोत मौजे आबरेवाडी ॥ वहिवली ता। हवेली सु। सन सलास

श्री. दि. रा ओक यांचेकडून सन १७८९ — [ **लेखांक ९७**

श्रीगजानन

अजस्वारी राजश्री त्रिंबक कृष्ण सुभेदार तालुके अंजनवेल ता। कमाविसदार मौजे बोरगाव ता। हवेली हमदाबाद सुम। तिसा समानीन मया व अलफ[1] वो। लक्ष्मण जोसी मौजे मा।र याणी सुभा येऊन विदित केले की माहादाजी बल्लाळ खोत मौजे मा।र याणी आपली कुंपण चाळीस पन्नास हात ग्वाही दिली असता तोडिली व हुताशनीची पुजा खोतानी करावी आपण गावचे वृत्यांसी आम्ही सांगावी ते आम्हास न बोलाविता नारायण भट जोगळेकर वा। मौजे गोधले याजकडून सांगविली म्हणोन त्याजवरन

मसाला — रुपये

२५ माहादाजी बलाल खोत मौजे मा।र याणी ग्वाही मोडून कुंपण तोडिली व वृत्यांसी जोसी यासीं न बोलाविता इतर ब्राह्मण बलाऊन होळीची पुजा केली सबब

१० नारायेण भट जोगलेकर वस्ती गोधले याणीं पुजा सांगितली सबब

३५

येकूण पस्तीस रुपये दीमत अरमरकरी सीपाई पाठविले आहेत यासी आदा करून जलद सुभा रवाना करणे जाणिजे छ २३ माहे जमादीलाखर[1]

मोर्तब

खुद्द

१. दि. २१–३–१७८९

श्री. दि. रा. ओक यांचेकडून
सन १७९० ]

[ **लेखांक ९८**

श्री

यादी वो। राजश्री लक्ष्मण जोसी बोरगावकर मौजे बोरगाव ता। हवेली हमजाबाद तो। अंजनवेल सुमा तिसैन मया व अलफ[1] आमचे वृत्तीचा मानपान पूर्वापार चालत आला असता आलिकडे माहादाजी बलाल वोक खोत मोजे मार याणी खटला करुन मानपान चालो देत नाही

कलमे

१ आमचे प्राचीन घरटयाजवळ आंबे यांची झाडे वडिलांचे हातची आहेत त्यापौ। आम्हास न पुसता दोन झाडे मातबर ईरसाल होती ती लोकास होडयास दिली

१ श्री ग्रामदेवताचे मुखवठे रुप्याचे हाली नवे केले त्याचे उद्यापन आम्हास न कलविता वो। नारायेणभट जोगलेकर वस्ती गोधले यास आणोन दिल्हे

१ श्री देवाची पालखीचा मानपान पूर्वापार खोताचे घरी गेली—याजवर आमचे घरी येत असता साल मजकुरी साणेवरून पालखी खोतानी आपले घरी आणोन तीन महिने ठेऊन तेथून डागल्या कुणबी याचे घरी ठेविली तेथून खोतानी आपले घरी अणिली नंतर आषाढ वद्य पक्षी पालखी देवलात नेत वेलेस आमचा मान न दिल्हा सबब आडवे जाऊन ग्वाही दिली नावनिसी तपसीलवार

१ खोतास
३ खांदकरी पालखीचे कुणबी
१ हरशेट तेली
१ खंडु सिवगणा
१ रामाजी डागल्या
―――
३
―――
४

सदरहु नावनिसीवार घरापासून देवलात नेत तो पर्यंत प्रथक प्रथक आसामीस तीन तीन वेला ग्वाही दिली असता नेली

―――
४

१. दि. २३-७-१७८९

सदहु लिहिल्या प्रौ। खरे करुन न देऊ तर सरकारचे गुन्हेगार हा कतबा लिहून दिल्हा सई छ २९ माहे सवाल

मोर्तब
खुद्द

श्री. दि. रा. ओक यांचे कडून
सन १७९०

[ **लेखांक ९५**

श्री

जबानी मानाजी बिन रामाजी म्हापलेकर उमर वर्षे ४५ वतनदार कुलबी मौजे बोरगाव त॥ हवेली हमजाबाद तो। अंजनवेल सुमा तिसैन मया व अलफ[१] लिहुन दिल्हे ऐसिजे वो। राजेश्री हर जोसी बोरगावकर याचा व गोपालभट ओक खोत मौजे मजकूर याचा मौजे मजकूरी जमीन जुमला व भुईभाटले घर घरवंद याचा कजिया पडिला येविसीची हकीगत श्री ग्रामदेवतेच्या देवालई सत्योत्तरे लिहून देणे म्हणोन आज्ञा त्याजवरुन सत्योत्तरे लिहून दिल्हे ऐसिजे बोरगावकर जोसी याचा मौजे मजकुरी घरघरवंद व भुईभाटले वगैरे जमीन जुमला व मानपान पुरातन काय त्यास आपले वडील हपसी याच्या दंग्यामुले परागंदा होऊन वरघाटी वरण खोऱ्यात गेले तिकडे काही येका दिवसी आपला बाप मृत्यु पावला तेव्हा आपण दोहो वर्षाचा होतो गावात आलो ते समयी आटनव वर्षांचा होतो आपल्यास हकीगत काही सांगितले नाही आलिकडे जोसी गावात आल्यावर देवाची पालखी पहिला मान खोताकडे गेल्यावर दुसरा मान पालखीचा जोसी याजकडेस जातो तो आपण पाहतो सदरहु आपल्यास ठाऊक होते. ते लिहून दिल्हे सही २३ जिल्हेज[१]

मोर्तब
खुद्द

( अशी त्याच दिवशीची जबानी रामाजी बिन माहादाजी डागल्या कुणबी व वतन-दार उमर वर्षे ४५ व कृष्णाजी बिन धर्मोजी म्हापलेकर कुलबी उमर वर्षे ८० वतनदार मौजे बोरगाव याची अशा दोन जबान्यात आपणास ठाऊक नाहीं असे आहे )

---

१. दि. १४–९–१७८९

श्री

जबानी चांगा म्हार बिन बाला म्हार उमर वर्षे ७५ वतनदार मौजे बोरगाव ताा हवेली हमजाबाद तालुके अंजनवेल सुहुर सन तिसेन मया व अलफ[१] लिहून दिल्हे असीजे वो राजश्री हर जोसी बोरगावकर याचा व गोपालभट ओक--खोत मौजे मजकूर याचा जमीन जुमल्याविसी कजिया आहे त्यास जोसी याचा घरघरवंद व जमीन जुमला व मानपान लिहून देणे म्हणोन आज्ञा त्याजवरून कलमे बीतपसील

जोसी याचापुरातन घरवंद सतखटे उगीत आहे घरवंदापासून खाली ढावली नदीपर्यंत पछमेकडल्या अंगास दुसरा घरवंद कोणाचा नाही परंतु ही जमीन जोसी याची कि नव्हे हे आपणास ठाऊक नाही घरवंदाच्या पूर्वेस वेतालाच्या चोढयापर्यंत जमीन जोसी याची पछमेस घरापासून रात-नबाव विसा पंचविसा हातावर आहे

कलम १

दुसरा घरवंद जोसी याचा मुलगावात आहे परसू परडे व फणस आंबे आहेत त्या ठिकाणी खोताचे वगैरे घरवंद ब्राह्मणाचे आहेत ती जमीन पूर्वी म्हाराची म्हणून वडील सांगत कलम १

मुळगावच्या घरातून गेले ते चिवेली पाच हवेलीस जाऊन राहिले

कलम १

जोसी याचे कुरण गवताचे वलावलटा भराडे येथे सारे गावकरी यांचे आहे तेथे याचे नसे चौघे लावल गवत काढीत याप्रो जोसीही काढीत

कलम १

बोरगावकर जोसी याची वृत पुरातन दुसरा वृत्यांसी जोसी व उपाध्य आपणास ठाऊक नाही व वडिलानी सांगितले नाही

कलम १

( जबानीचे तिसरे पान गहाळ )

भात जमीन

१ वेतालाचा चोढा सतरवटात अदमासे अडीच पांडपावेतो आहे

१ मुलगावात दारसेत अदमासे दाहा अकरा पांड एक चोढा आहे त्यापैकी सेताचा सडा अजमासे सवा पांड पावेतो जोसी याचा बाकी......त्यास हद नाही होती ती मोडली कलम १

२

सदरहू दोहो जागा भात जमीन आपणास ठाऊक होती ती लिहून दिल्ही सदरहू सेताची अर्धेली खोतास जोसी याणी दिल्ही नाही व खोतानी घेतली नाही

कलम १

जोसी याचे मानपान खोताचे मागून सीमगेयाची पालखी व साहाणे याचा विडा व जागराचे पोवते व दिवालीचा दिवा कलम १

वरकस जमीन भाटले याची कलकीच्या मालावर करीत त्याची अर्धेली जोसी याणी खोतास दिल्ही नाही व खोतानी घेतली नाही यासिवाय जमीन जोसी याची आपणास ठाऊक नाही।

कलम १

मुलगावात घरवंदाजवळ आंबे खोत याणी खारवी यास दिल्हे त्यापैकी येक आंबा जोसी याचा व येक खोताचा

कलम १

दि. रा. ओक यांचे कडून ] [ लेखांक १००

( याचा पहिला बंद गहाळ )

२

गेले तेव्हा मी आपल्या खांद्यावर पालखी घेऊन देउलात गेलो कलम १

जोसी याणी आमचे कुरनात भाटले घेतले त्यास आम्ही द्वोही दिली म्हणोन आमचे सेतात येऊन सारचे सेतमीस द्वोही दिल्ही ( येथपर्यंत मोडीत आहे पुढील लिखाण बाल बोधीत गोपाळभट खोत याचे हातचे ) याप्रमाणे हकिकत असे सदरहु लिहिल्याप्रमाणे खरे करून देऊ हे लिहिले सही चंद्र २९ शाबान[1] सहिचे अक्षे खुद गोपाळभट ओक खोत मौजे बोरगाव

मोर्तब
खुद्द

ᔕ ᔕ

दि. रा. ओक यांचेकडून
सन१८०९ ] [ लेखांक १०१

श्री गजानन

ता।। कमाविसदार मौजे चिवली ता।। हवेली तालुके अंजनवेल सु।। तीसा मयातैन व अलफ[2] चवाण वोक याजकडे ऐवज येणे त्यास पौ। मौजे मजकुरचे हिश्शा पौ। देविले ते गु।। मोरो महादेव ओक रुपये ११।।= येकूण साडे अकरा रुपये दोन आणे समसंगी पोता जमा असत जाणिजे छ १८ मोहरम[2]

सील

ᔕ ᔕ

श्री. दिनकर रावजी ओक यांचेकडून ] [ लेखांक १०२

श्री

राजश्री नारायणराव बाजीराव बिन दौलतराव

सिर्के खोत मौजे चिवली गोसावी यास

श्री. गोविंद गणेश कान्हेरे वहिवाटदार नि।। केसो जनार्दन कान्हेरे गाहाणदार मौजे मजकूर रामराम विनंती विशेष मौजे मजकूरची वहिवाट आम्ही करतो त्यास तुमची दरोबस्त गावाची सोलावी तक्षीम व खुद धारा आहे त्याचे सरकार हिशाचा ई।।

---

१. दि. १४-५--१७९०

२. दि. ५-३-१८०९

( इस्तकबील ) सन खमस सलासीन ता। ( तागायत ) सन आबेन[१] साहा साला उलगत करून घेतला आहे सदरहू तक्षिमेचे व धान्याबद्दल व खोती पैकी दुबारसारी सेताचे भोत्या बाबद वगैरे उत्पन्नासुद्धा देण्याघेण्याचा फडशा करून दिल्हा व घेतला सदरहू बाबत आमचा तुम्हाकडे व तुमचा आम्हाकडे अर्थाअर्थी संबंध राहिला नाहीं. मिती श्रावण वद्य १० शके१७६२ सन इहिदे आबेन[२] हे विनंती दस्तुर बालाजी मोरेश्वर ओक खोत मौजे बोरगाव

साक्ष — सही गोविंद गणेश कान्हेरे दस्तुर खुद

१ वासुदेव गोविंद मेहेंदले
रा. मौजे बोरगाव दस्तुर खुद

पे. द. पुणे जमाव रुताल १६९६ ] [ **लेखांक १०३**

श्री

शके १६७४ आंगिरा नाम संवत्सरे जेष्ठ शु।। १ ते दिवशी रा.... बालाजी महादेव वोक को।। नासिक मामले गुलशमबंद सरकार संगमनेर सुभे खाजस्ते बुनियाद यास जगजीवन राव पवार वा।। मलोजी पवार मोकादम... पा। वलद रंगाजी प।। को। मा।र सन[३] हाजर ११६१ कारणे लिहून दिल्ही ऐसिजे तुम्ही भले ब्राह्मण सत्तक्षेत्री राहाता त्यास दादो देवजी गु।। मुकादम व्यंकाजी चिमणाजी कुलकर्णी को।। मा।र यानी विदीत केले की इथले ब्राह्मण तीर्थवासी रहातात याची वासना आहे जे भूमी को।। मा।री इनाम आपणास देतील तर आपण तेथे विहीर करून तुलसी पुष्पे व आबे केली वगैरे करू ऐसे विदीत केले ते मनास आणून—२० बिघे जमिन उत्पन्न होईल ते वंशपरंपरा खाणे जमिनीचा हकबंदी बी तपसील पूर्व पश्चिम दोरी ४८३ उत्तर-दक्षिण दोरी ४।।१।। बिघे २०

सदरहू जमीन तुम्हास इनाम मिरास करून दिघली असे सुखे तुमचे मनास येईल ते लावणे या जमिनीची हदमहादुप पूर्वेस वोहोल पश्चिमेस सेत कान्हू—कर वगैरे मुजरी उत्तरेस खाली जमीन पडील दक्षिणेस जोडसेत पाटील वाबंद सरीलाटुमामाली येणे प्रमाणे मिरास तुम्हास करून दिल्ही असे सुखे लेकलेकरी खाणे सही नि।। नांगर तारीख छ २९ माहे जमादिलाखर[३] सके १६७४ ज्येष्ठ शु।। १ – दस्तखत व्यंकाजी चिमणाजी कुलकर्णी को।। मा।र....

१. दि. ३–६–१८३४ ते दि. २७–५–१८४० २. दि.२२–८–१८४०
३. दि. ३–५–१७५२

पे. द. पुणे जमाव रु. १६९६ ] [ **लेखांक १०४**

श्री

राजश्री बालाजी माहादेव अुपनाम वोक गोत्र वासिष्ठ शाखा तैतीर्य हिरण्यकेशी आपस्तंब वस्ती मौजे बोरगांव ता. वेलंब सुभा प्रांत दाभोळ हली वास्तव्य को॥ नासिक गोसावी यास सेवक बालाजी बाजीराव प्रधान नमस्कार सु॥ सीत खमसेन मया व अलफ[1] दिल्हे अिनाम पत्र अैसिजे तुम्ही हुजूर कसबे पुणे मुक्कामी येअुन विनंती केली कि आपणास को॥ नासिक पो मार सरकार संगमनेर सुबे खोजीस्ते बुनियाद येथे पूर्वी मोगलाअी अमलात अिनाम बिघे –२० वीस होती यास हल्ली मोगलाअी अमल सरकारात जाहला आहे अैशास आपण पुरातन स्वामीचे राज्यातील सेवक श्रम-सहास बहुत कुटुंब वछल आहो योगक्षेम चालला पाहिजे याजकरिता स्वामींनी कृपाळ होअून सदरील वीस बिघे जमीन अिनाम करार करुन दिल्ही पाहिजे म्हणून त्याजवरुन मनास आणून तुम्ही पुरातन राज्यातील सेवक स्वामीस सेवा येकनिष्टपणे केली तुमचे चालवणे आवश्यक म्हणून तुम्हावर कृपाळू होअुन को॥ मा पो जमीन बिघे २० वीस अिनाम करार करुन दिल्ही असे तरी सदरहू वीस बिघे जमीन तुम्ही आपले दुमाला करून घेअुन तुम्ही व तुमचे पुत्र पौत्रादी वंशपरंपरेने अिनाम अनभवून सुखरुप रहाणे जाणिजे छ १२ सफर[1] आज्ञा प्रमाण लेखन सीमा

पे. द. पुणे जमाव रूमाल १६९६ ) [ **लेखांक १०५**

श्री

राजश्री बाळाजी माहादेव अुपनाम वोक गोत्र वासिष्ठ शाखा तैतीरय सूत्र हिरण्य-केशी आपस्तंब वा॥ मौजे बोरगाव ता॥ वेलंब सुभा प्रांत दाभोल हल्ली वास्तव्य कसबे नासिक गो॥ यास सेवक बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार सु॥ सीत खमसेन मया व अलफ[1] दिल्हे इनाम पत्र अैसिजे तुम्ही हुजूर पुणे येथील मुक्कामी येअुन विनंती केली कि मौजे पिंपळगाव भावले पो॥ नासिक सरकार संगमनेर सुभे खुदस्तेबुनियाद येथील पूर्वी मोगलाअी अमलात आम्हास दोन तक्षिमा जाहागीर अिनाम चालत होती त्यास हली मोगलाअी अंमल सरकारात जाला आहे. अैसियास आपण स्वामीचे राज्यातील पुरातन सेवक श्रम साहास बहुत केले कुटुंबवछल आहो योगक्षेम चालत नाही यास्तव स्वामीनी कृपाळू होवून मार येथील जाहागिर मोगलाअी अमल दरोबस्त अिनाम देअुन चालविले पाहिजे म्हणोन त्याजवरोन मनास आणोन ...... चालविणे अवश्य म्हणोन तुम्हावर कृपाळू होअुन मौजे मार येथील जाहागिर

---

१. दि. १७--११--१७५५

मोगल ...... तुम्हास अिनाम करार करून दिल्हा असे तरी तुम्ही तुमचे ...... अनुभवून सुखरुप रहावे जाणिजे छ १२ सफर[1] आज्ञाप्रमाण मोर्तब.

पे. द. घडणी रुमाल ३९९ ] [ **लेखांक १०६**

श्री

सु॥ तिसा सितैन मया व अलफ[2]

यादी बालाजी माहादेव वोंकार याजकडे पूर्वी सरकारातून

| | |
|---|---|
| पो॥नासिक त्रिंबक येथील | मौजे अिंदोरे पो। दिंडोरी हा गाव |
| पोतदारी मोगलाअी अमलाची पोतदारीचा | मुकासा बदल बेरीज ३१५॥। |
| हक मोगलाईत चालत होता त्याप्रमाणे १ | जागीर दोन हिसे ४॥ बाबती दरोबस्त. |
| | १४१ सरदेशमुखी दरोबस्त. |
| | ११८१३ फौजदारीतील हिशाची |
| | ६५९॥। सासे पावणे साठ रू. तैनातेत दिल्हे होते त्याना चालत होते. |

येणेप्रमाणे पोतदारी व गाव चालत होता. तीर्थस्वरुप राजश्री दादासाहेबांचे खासगी समाप्ति जाल्यापासून चालत नाही हाली माहाल सरकारात ठेविले बालाजी महादेव याणी सरकार चाकरी फार केली ते मृत्यु पावले त्यांचे नातू माधवराव गंगाधर आहेत त्याचे नावे दोन्ही माहालांची व पोतदारी व मौजे मजकूर पेशजी प्रमाणे करार करून दिल्हा असे चालविणे म्हणोन कमाविसदारास व गावास व जमीनदारास पत्रे व सनदा देणे

पे. द. पुणे जमाव रुमाल १६९६ ] [ **लेखांक १०७**

श्री

अखंड लक्ष्मी अलंकृत राजमान्य रा. खंडो गणेश का।दार पो। नासिक गोसावी यास

---

१. दि. १७–११–१७५५.

२. सन १७६८–६९

सेवक माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार तिसा सितैन मया व अलफ[1] पो॥ मजकूर येथील मोगलाई अमलाची पोतदारी गंगाधर बल्लाळ वोंकार याजकडे पेशजी सरकारातून होती त्यास पो॥ मजकूर तीर्थस्वरुप राजश्री दादासाहेब याजकडे खाजगीस महाल दिल्हा तेव्हा पोतदारी मा॥रनिल्हेकडे चालली नाही. हली गंगाधर बलाल मृत्यु पावले सबब राजश्री माधवराव गंगाधर याजकडे पोतदारी मोगलाई अमलाची पेशजी प्रमाणे करार करुन हे सनद सादर केली असे तरी पोतदारीचा हक्क जागिरीचे अमलावर पेशजी रयत निसबत घेत होते त्याप्रमाणे घेऊन आकार होईल त्यापैकी निमे येवज सरकारात घेऊन बाकी निमे यैवज मा॥रनिल्हेस देत जावा जाणिजे छ १० जमादिलावल[1] आज्ञाप्रमाण लेखन सीमा

## लेखांक १०८

रा. ब. गणेश चिमणाजी वाड संकलित बाळाजी बाजीराव पेशवे रोजनिशी भाग २ पान १७० सरकारानी वेळोवेळी कर्ज घेतले त्याबद्दल दप्तरी माहिती मिळाली ती—

| धनकोचे नाव | कर्जाची रक्कम | व्याज |
|---|---|---|
| .................... | ............. | .......... |
| .................... | ............. | .......... |
| बाळाजी महादेव ओक (सन १७४९-५०) सफर १८ अदमासे | ५००००० | १.०० |
| .................... | ............. | .......... |
| गंगाधर बल्लाळ ओक इहिदे सितैन मया व अलफ जमादिलावल २४ ( सन१७६०-६१ ) | २८६८६१ | १.०० |
| .................... | ............. | .......... |
| गंगाधर बल्लाळ ओंकार सव्वाल ६ इहिदे सितेन मया ब अलफ (सन १७६०-६१) | ७५००० | १.०० |

---

१. दि. २२-९-१७६८

[ **लेखांक १०९**

रा. ब. गणेश चिमणाजी वाड संकलित बाळाजी बाजीराव पेशवे रोजनिशी भाग २

(इ. स. १७५४-५५)
खमस रुमसेन मया व अलफ[1]
ज० लाखर ३

बाळाजी महादेव ओक यांचे नावे सनद की वे० मू० राजश्री दादंभट धर्माधिकारी यांचे घरी चोरी झाली त्यावरून भटजींनी येऊन तुम्हास सांगितले कि चोरीचे ठिकाण लावून ऐवज आमचा एक हजार रुपयाचा गेला आहे तो आमचे आम्हास देववावा. त्यावरून तुम्ही चोरीचे ठिकाण लावून ऐवज एक हजार रुपयांचा गेला होता तो आणवून सरकारची चौथाई रु. २५० घेऊन बाकी साडेसातशे रुपयाचा ऐवज देत होता म्हणून भटजींनी येऊन विदीत केले त्यावरून सदरहू अडीचशे रुपये चौथाई माफ केली असे तरी भटजीचे नावे अडीचशे रुपयांचा धर्मादाय खर्च लिहून सदरहू एक हजार रुपयांचा ऐवज दागिने वगैरे जे असेल ते पावते करून पावलियाचे कबज घेणे म्हणोन सनद १

पे. द. पुणे जमाव रुमाल १६९६ ]

[ **लेखांक ११०**

श्री

रा. वि. रा. रा. विठ्ठल सिवदेव स्वामी गोसावी यास पो. बालाजी बाजीराव प्रधान न० विनंती उपरी येथील... जाणे विशेष पो॥ नासिक येथील पोतदारी वतनी राजश्री बालाजी महादेव वोक यास दिल्हे असता चावेरी व सायखेडे येथील पोतदारी तुम्हाकडील विठ्ठल त्रिंबक व खंडोजी कजंले यास देत नाहीत म्हणोन विदीत जाले त्यावरून हे पत्र लिहिले असे तरी त्यास ताकीद करून पोतदारी दरसदे ·।· निमे रयत निसबतीने जमाबंदी सिवाय पेशजीचे सनदे प्रमाणे देणे वारंवार बोभाटा न ये ते करणे जाणिजे छ१९ जिल्हेज सु॥ समान खमसेन मया व अलफ[2] बहुत काय लिहिणे.

श्री.

(२) अखंडित लक्ष्मी अलंकृत रा. रा. मोरो विनायक व त्रिंबक सदाशिव कमाविसदार पो॥ नासिक गोसावी यास सेवक बालाजी बाजीराव प्रधान नमस्कार सुमा सबा खमसेन मया व अलफ रा. बालाजी महादेव वोक याणी ....... पोतदारी ........ त्यास देत जाणे...ताकीदीने वसूल करुन वगैरे

श्री

(३) आज्ञापत्र रा. पंतप्रधान ता॥ मोकदमानी दुमाले गाव पो॥ नासिक सु॥ सबा खमसेन मया व अलफ पो॥ मा॥रचे पोतदारीचे वतन राजश्री बालाजी महादेव ओंकार यास पेशजी करुन देऊन (·।· वगैरे).... दुमाले गाव ५६ पो॥ २४ याणी

---

१. दि. १७-३-१७५५. २. दि. ४-९-१७५७

मसाला रुपया प्रमाणे दिल्हा व दरसदे ·।।· प्रमाणे काही गावानी वतनदारास वसूल दिल्हा वरकड गावानी वसूल दिल्हा नाही सबब....ताकीद पत्र...३२ गावाची यादी ( यात सावरगाव आहे, पिंपलद, वडगाव, गंगापूर सिलापूर, वोढ चावेरी सायेखेडे वगैरे आहेत) येणे प्रमाणे ३२ गावांनी मसाला दिल्हे नाही तरी सबब हली या कामास सैदबाखे व भारतसिंग सलाअीत पो। आहेत यास मसाला दर गावास रु. ५ प्रमाणे रु. १६० देविले आहेत आदा करणे जाणिजे छ ३२ शाबान[1] आज्ञा प्रमाण.

श्री. सिका

( ४ ) अजम स्वारी रा. मोरो विनायक व त्रिंबकराव सदाशिव कमाविसदार पो। नासिक ता।. मोकद देहाय प्रां. मजकूर सु।। सबा खमसेन मया अलफ सन ११६६ प्रो। मजकुरी वतनी पोतदारी रा. बालाजी महादेव यांचेकडे आहे साल गुदस्ता व तिगस्ता पासून पोतदारी देहाय मा।रीहून पावत नाही म्हणून श्रीमंताचे आज्ञापत्र.... पोतदारी पावती करणे तर... ·।।· प्रो। घेवून हजर येणे बि।। ता।।

१ मौजे येकमेर    १ मौजे वोढ

१ मौजे सिलापूर    १ कदलगाव

४

सदरहू प।। कुळकर्णी हुजूर येणे याजला हरकत जालिया मुलाहिदा होणार नाही. जाणिजे छ ५ माहे जिल्काद

मोर्तब
सुद्द

( ५ ) ( ५६ गावची यादी आहे. ) त्याचा वसूल सुरळीत येत नाही. म्हणोन रा. बालाजी माहादेव वोक याणी सुमा सबा खमसेन मया व अलफ मधे हुजूरा विदीत केले.... म्हणोन.

श्री

( ५ ) यादी बालाजी महादेव ( वोंकार ) सु।। सीत खमसेन मया व अलफ

प्रांत बुंदेलखंड येथील पोतदारी वतनी ...पेशजी करून दिल्ही आहे त्याप्रमाणे येवज सुरळीत पावत नाही·

.... ... ... ...

तरी जरूर जाणून त्यास येवज साल दरसाल पावणे म्हणून

पो। नासिक येथील पोतदारी रयेत देखील जकाती......दिल्ही आहे...सुरळीत पावत नाही......ताकीदपत्रे व जासूद जोडी येक देऊन यैवज दप्तरी पो-ताकीद पत्रे जासूद जोडी

---

१· मे १७५७

श्री

( ६ ) झाडा सरंजामी गाव वगैरे नि॥ बालाजी महादेव वोंकार सुहुर सन तिसा खमसेन मया व अलफ...रुपये ।

| | |
|---|---|
| कमाविसीने आहे सबब लिहू नये | १२४१ पो॥ नासिक पौ॥ हा हिसबे सन सबा मौजे पिंपलद वतन पैकी गाव दिल्हा कुल आकार १५५१ वजा मुकासा रु. ३१० |

८८१ मौजे पिंपलगाव भावक पो॥. नासिक येथील जागीर व बाबती सरदेशमुखी भेस्ता सो॥ मुकासा...रु.

... ... ... ....

... ... .... ....

६५९॥। मौजे अिंदोरे प॥ दिंडोरी येथील यैवज हा॥ सनद छ १९ जा॥वल सन तिसा हा॥......

पे. द. पुणे जमाव रु. १६९६ ] [ **लेखांक १११**

श्री

राजश्री मल्हारजी होळकर गोसावी यांसी सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य रा· बालाजी बाजीराव प्रधान असिर्वाद उपरी येथील कु.......

विशेष पो॥ नासिक येथील पोतदारी वतनी रा. गंगाधर बल्लाळ वोक याची आहे. त्यास तुम्हाकडील मौजे आडगाव पो॥ मा॥र येथील इस्तक बिल सन पेवस्तगिरी पासून रयत निसबतीने जमाबंदी शिवाय दर साले रुपये ·॥· निम प्रमाणे पोतदारीचा अैवज मा॥निल्हेस झाडली पावता करणे व मागील बाकी सालोसालची राहात आली असेल तेही झाडीयानिशी देवावी येविशी निक्षून ताकीद करावी· रा॥ छ २१ जमादिलावल सुमा तिसा खमसेन मया व अलफ[१] बहूत काय लिहीणे हे आशीर्वाद मुरतब सुद सिका

श्री.

राजश्रीया विराजित रा. रा. नारो शंकर स्वामी गोसावी यांस पो॥ बालाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ... ... ... विशेष नासिक येथील पोतदारी वतनी रा. गंगाधर बल्लाळ वोक यांची आहे. त्यास तुम्हाकडील पो॥ मा॥रचे देहे ६ सहा येथील इ॥ सनद पैवस्तगिरी पासून रयेत नि॥तीने जमाबंदी शिवाये दर साले

१. दि. २१-१-१७५९·

रुपया आर्धा निमे प्रमाणे पोतदारीचा ऐवज मा।रनिल्हेस झाडून पावता करणे व मागील बाकी सालोसालची रहात आली असेल तीही झाडयानिशी देणे येविषयी फिरोन बोभाट येऊन देणे जाणिजे छ २१ जमादिलावल सु।। तिसा खमसेन मया व अलफ[1] बहुत काय लिहीणे ही विनंती

श्री

राजश्रीया विराजित रा. रा. त्रिंबकराव विश्वनाथ स्वामी गोसावी यासी पो। बालाजी बाजीराव प्रधान ( वरील पत्राप्रमाणे ) गंगाधर बल्लाळ ओक यांची आहे त्याज मौजे साकूर व जलालपूर व वडगाव पो। मा।र येथील इ।। सनद ( मजकूर वरील पत्रा-प्रमाणे ) छ २१ जमादिलावल सु।। तिसा खमसेन मया व अलफ[1] बहुत काय लिहिणे ही विनंती

श्री

राजश्रीया विराजित रा. रा. विठ्ठल सिवदेव स्वामी गोसावी यांस पो। बालाजी बाजीराव प्रधान ( वरील पत्राप्रमाणे ) त्यांस तुम्हाकडील मौजे चादोरी व साठेखेड पो। मा।र येथील इ। ( वरील पत्राप्रमाणे )

श्री

अखंडित लक्ष्मी अलंकृत रा. रा. विसाजी हरी कमाविसदार पो। नासिक गोसावी यांस सेवक बालाजी बाजीराव प्रधान नमस्कार सुमा तिसा खमसेन मया व अलफ[1] पो। मा।रची पोतदारी वतनी रा. गंगाधर बल्लाळ वोक यांस रयते नि।।तिने जमा बंदी शिवाये सरकार हसिला शिवाय दर सदे ·।।· निम प्रो। करार करून दिली आहे. त्या बामोजीबा तुम्ही पो। मा।र जकात सुद्धा दरसदे निमये या।प्रो। मा।रनिल्हेचे तोाने पोत-दारीचे कामकाजावरील कारकून राहीले त्यांचे हाते पोतदारीचे कामकाज घेऊन जो ऐवज पोतदारी आकारले त्या प्रो। निम्मे सरकारात जमा करीत जाणे व निम्मे ऐवज साल दरसाल मा।रनिल्हेस देत जाणे व जकात पो। मागील बाकी राहीली असेल ते झाडूनसी देणे ये विसीची फीरोन बोभाटा येऊ न देणे जाणिजे छ २१ जो।वल[1] आज्ञा प्रमाण

श्री

अखंडित लक्ष्मी अलंकृत रा. रा. विसाजी हरी कमाविसदार जकात संगमनेर गोसावी यांसी सेवक बालाजी बाजीराव प्रधान नमस्कार. सुमा समान खमसेन मया व अलफ[2] पो। नासिक येथील पोतदारी रा. गंगाधर बल्लाळ यांजकडे आहे त्यांस ( वरील प्रमाणे निम्मे वगैरे ) आहे. त्यांस साल गु।। सन साबाचे वतन आकारले ते दरोबस्त

---

१. दि. २१-१-१७५९.     २. ८-५-१७५८

कर्ज पट्टीहाटीबा। सरकारात घेणे व सालमाार सन समानापासून आकार होईल त्याप्रमाणे निमे ऐवज माशारनिल्हेस साल दर साल पाववित जाणे बाकी निमे ऐवज राहील तो सरकारचे हीशेबी जमा करीत जाणीजे छ २९ शाबान[1] आज्ञा प्रमाण.

श्री

अखंडित लक्ष्मी अलंकृत रा. रा. मोरो विनायक व त्रिंबकराव सदाशिव कमाविसदार पो। नासिक गोसावी यांसी सेवक बालाजी बाजीराव प्रधान नमस्कार सुमा समान खमसेन मया व अलफ[1] गंगाधर बल्लाळ ओक यांस ( पोतदारी बद्दल मजकूर वरील पत्रा पो ) दिल। आहे. त्यांस साल गु।। सन सबाचा आकार होइल ( बाकी वरील पत्रा प्रमाणे ) जाणिजेछ २९ शाबान[1] आज्ञा प्रमाण सिका ( आणखी एक पत्र त्याच दोघाना सुमा सितैन मया व अलफ सन समानच्या आकारा बदल पत्र छ ५ साबानचे[2] )

पे. द. घडणी रुमाल ४९१ ] **[ लेखांक ११६**

श्री

यादी नि।। माधवराव गंगाधर वोक व कृष्णराव गंगाधर वोक.

मौजे पिंपळद प्रो। नासिक हा गांव पेशजी श्रीमंत कैलासवासी नानासाहेब यांनी पालखीचे सरंजामास मौजे मजकूर पो। एक हजार रुपये सेवकास देवीत होते. अलिकडे श्रीमंत राजश्री दादासाहेब यांजकडे जागिर सरंजामास गेली तेव्हापासून पालखीचे सरंजामाचा ऐवज प।वत नाही. त्यांस हाली कृपाळू होऊन परगणे नासिक व वणदिंडोरि या तिही महालापैकी एक हाजार रुपयाचा गांव नेमून द्यावयाची आज्ञा झाली पाहिजे.

( १ ) राघो नारायण कर्वे यांजकडे पांच हजार रु. कर्ज येणे आहे. तो ऐवज वसूल करून देवावा यांसी सरकारचे पत्र व दोन ढालाईत देववायाची आज्ञा......

( १ ) विसाजी हरी यांजकडे बाकी .... वसूल करून माधवराव गंगाधर यांजकडे पावता करणे म्हणून याद्या...

पे. द. पुणे जमाव रु. १६९६ ] **[ लेखांक ११७**

श्री

आज्ञापत्र राजश्री पंतप्रधान ता। मोकादमानी देहे पो। नासिक

---

१. दि. ८-५-१७५८ २. दि. २३-३-१७६०.

| | |
|---|---|
| १ मौजे ... | १ मोजे ... |
| १ मौजे ... | १ मौजे ... |
| ...... | ...... |
| ........ | ....... |
| १५ | १५ |

येकूण दुमाले गाव तीस सुमा इहिदे सबैन मया व अलफ[1] राजश्री माधवराव गंगाधर वोक यानी विदीत केले कि पो। नासिक येथील पोतदारी दुमाले गावसुद्धा सरकारातून आपलेकडे आहे त्यास पोतदारीचा हक जमाबंदीसिवाये रयतेनि।। पेशजीपासून पावत आहे ऐसे असता सदरहूचा पोतदारीचा हक सन अर्बा सितैनापासून पावत नाही येविसी ताकीद जाली पाहिजे म्हणून त्याजवरून हे आज्ञापत्र सादर केले असे तरी मोगलाई अमलापासून खुदामत पोतदारीचा हक पावत आला असेल त्याप्रमाणे सन तिसा सितैन व सबैन दुसालाचा राहिला असेल देणे व पुढे सालदरसाल खुदामती चालत आल्याप्रमाणे देत जाणे छ३ माहे जिल्हेज[1] रा।। हूजूर.

श्री

अखंडित लक्ष्मी अलंकृत रा॰ रा. माधवराव गंगाधर गोसावी यासी सेवक माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार सुमा इहिदे सबैन मया व अलफ[2] पो। नासिक येथील पोतदारीचे काम मोगलाई अमल सरकारात आल्यावरपासून तुम्हाकडे चालत आहे त्यास पोतदारी पो। निम ऐवज सरकारात घ्यावयाचा करार करून निमे ऐवज तुम्ही घेणे याप्रमाणे करार असे त्यास अलिकडे पो। मा।र पो। गाव दुमाल इनाम सरकारातून दिल्हे आहेत त्याचा ऐवज येत नाही म्हणोन विदीत केले ते त्यावरून हे सनद सादर केली असे तरी वरकड गाव प्रो। पोतदारीचा ऐवज घ्यावयाचा करार करून तुम्हास आज्ञा केली असे गाव बी।।

| | |
|---|---|
| १ मौजे सिवेनमली नि।। बाळकृष्णशास्त्री | १ मौजे बाजाले नि।। दिनकर भट टुलु |
| १ मौजे गंगावरे नि।। पांडुरंग दीक्षित | १ मौजे सिगावे नि।। रामचंद्रजी |
| १ मौजे दासेगाव नि।। सैद बुऱ्हाण | १ मौजे आनंदवली नि।। सरकार |
| | १ मौजे आवली नि।। व्यंकटभट रुईकर |
| ३ | ४ |

---

१. दि. २०-३-१७७१

२. दि. २२-३-१७७१

येकूण सात गावचे पोतदारीचा ऐवज पो॥ मा॥रचे वरकडा गावाप्रो॥ जमा करून निमे ऐवज सरकार सुभा पावता करून निमे तुम्ही घेणे जाणिजे छ५ जिल्हेज[1] पा॥हुजूर लेखन सीमा

मोर्तब
सुद्द

श्री

ता॥ मोकादम देहाये पो॥ नासिक देहे सुमारी
१ गंगापूर १ मौजे बेलगाव ढगा १ मौजे वाडिवरे १ मौजे मुरंबी
१ मौजे देवळाली १ मौजे जारबोरी / ६

सुहूर सन इहिदे सबैन मया व अलफ[2] पो॥ माधवराव गंगाधर वोक यानीं हुजूरचे मुकामी येऊन विदीत केले कि प्रो॥ मा॥री पोतदारीं सरकारातून वतनीं पेशजीं पासून आम्हाकडे आहे त्यास दरसदे रु. ॥॰ अर्धा जमाबंदीसिवाय रयत नि॥ पोतदारीचा हक आहे त्याप्रो॥ आपणाकडे हली चालत नाही त्यास ताकीद करून पेशजीपासोन खुदामत चालत आल्याप्रमाणे पोतदारीचा हक चालते करावे म्हणोन त्यावरोन हे आज्ञापत्र सादर केले असे तरीं पेशजी पासून खुदामत....दरसेकडा ॥॰ निम जमाबंदी सिवाय रयत निसबत चालत आल्याप्रमाणे मा॥रनिल्हेकडे साल मा॥रापासोन साल दरसाल चालते करणे जाणिजे छ२१ जिल्हेज.[2]

श्री

आज्ञापत्र राजश्री पंतप्रधान ता॥ मोकादमानी देहायेदेखील दुमाले गाव पो॥ नासिक व पो॥ त्रिंबक सु॥ इहिदे सबैन मया व अलफ[3] रा. माधवराव गंगाधर वोक याणी हुजूर विदित केले कि हरदु महालाचे दुमाले गावसुद्धा पोतदारीं वतन सरकारातून पेशजीपासून आहे त्यास पोतदारीचा हक जमाबंदी सिवाये दर सदे ॥॰ अर्धा रयत नि॥ पावत आहे अलिकडे दोन्हीं महाल श्रीमंत राजश्री दादासो॥ यांचे खासगीकडे होते ते समयी पोतदारी चालली नाही सांप्रत सरकारात महाल आल्यावर पूर्ववतप्रमाणे आमचीं पोतदारी आम्हाकडे करार करून दिल्ही असता दुमाले गावकरी सन तिसा सितैन पासून पोतदारीचे हकाचा ऐवज देत नाहीत धटाई करतात तरीं ताकीद जाली पाहिजे म्हणोन ऐसियासी हे कार्याचे नसे हलीं हे आज्ञापत्र सादर केले असे तरीं पोतदारीचा हक रयत नि॥ खुदामत चालत आल्याप्रो॥ दुसालाचा राहिला असेल तो मा॥रनिल्हेस देणे व पुढे साल दरसाल पूर्ववतप्रमाणे देत जाणे येविसीचा फिरोन बोभाट येऊ न देणे आल्यास कार्यास येणार नाही जाणिजे छ १० जमदिलावर[3] आज्ञाप्रमाण.

---

१. दि. २२–३–१७७१ २. दि. ७-४-१७७१
३. दि. ३०-९-१७७०

श्री

राजश्रीया विराजित रा. रा. रेणका अनाजी गोसावी यास शेवक माधवरा व बल्लाळ प्रधान नमस्कार उपरी येथील....जाणे विशेष पो। नासिक येथील पोतदारी वतनी राजश्री माधवराव गंगाधर याची असे (सनदा सादर जाल्या आहेत...) तरी तुम्ही ताकीद करून पोतदारीचा ऐवज जासुदाचे गुजारतीने साल गु॥......देतजाणे......छ २४ रविलाखर[1] सुमा इसने सबैन मया व अलफ बहुत काय लिहिणे.
( याचप्रमाणे पत्रे त्याच तारखेची )

१ अखंड लक्ष्मी अलंकृत रा. रा. धोंडो दत्तात्रय गोसाबी यास
१ हरिभक्त परायण राजश्री रघुनाथ......आज्ञाप्रमाण लेखन सीमा
१ राजिश्रिया विराजित रा. रा. सिवाजी विठ्ठल स्वामी गोसावी यासी... बहुत काय लिहिणे......
१ रा. खंडेराव पवार गोसावी यासी ...... आसिरवाद उपरी येथील कुशल .... जाणे विशेष......बहुत काय लिहिणे

मोर्तब
सुद

१ राजश्रीया विराजित त्रिंबक सिवदेव स्वामी.......नमस्कार विनंती.......जाण .......विशेष......)

[ **लेखांक ११८**

**Nagpur affairs Vol. I by Tryambak Shankar Shejawalkar, Poona 1954 edition** पान १८१ रु. नं. ८८ फा. नं. १४ पत्र नं. ३९ २४ जानेवारी १७८३

श्री

पो॥ छ३० सफर सन सलास समानीन माघमास[2]— श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी सेवक सदाशिव राम कृ. सा. न. विज्ञापना येथील कुशल तागायत छ३० सफर यथास्थित असे विशेष स्वामीनी श्रीमंत राजश्री रावसाहेब यांच्या लग्नाचे आमंत्रण राजश्री सेनाधुरंधर यास करून राजश्री सेना सुभा सहित सहकुटुंब न्यावयासि लग्नपत्रे देऊन राजश्री माधवराव गंगाधर यास पाठविले ते काल छ१९ रोजी दोन प्रहरा येथे येऊन पोहोचले. मा॥निल्हे यास आणावयास सेनासाहेबसुभा व सेनाबहादूर पुढे दोन

---

१. दि. ६-८-१७७१ २. दि. ३-२-१७८३

कोस जाऊन भेटून घेऊन शहरात आले. वाड्यात सेनाधुरंधर यांची भेट करविली. लग्नपत्रे आज्ञेप्रमाणे सर्वांची याणीं प्रविष्ट केली. पत्रे वाचून बहोत संतोषास पावले ... ......सेवेसी श्रुत होय सेवकास अमंत्रणाचे लग्नपत्र पावले वाचून पाहून सनाथ जाहालो हे विज्ञापना.

ᔕ ᔕ

पे. द. घडणी रुमाल ३९९
शके १७०८

[ **लेखांक ११९**

राजमंडळ

स्वारी राजश्री पंतप्रधान सुमा सबा समानीन[१] सरंजाम नि॥ माधवराव गंगाधर वोक दफाते पत्रे छ२२ रजब[१] मा॥निल्हे याणी हुजूर येवून विदीत केले कि कसबे नासिक येथे आमचा बाग आहे त्यास पो॥ मजकूर येथील नासरडीचे वोढयाचा पाट चालत आहे त्यापैकी सेरीकडे वगैरे पाणी जात आहे. त्यापैकी वाटणीप्रमाणे येक प्रहर पाणी द्यावयाची आज्ञा जाली पाहिजे म्हणोन त्याजवरून सदर वोढयाचे पाटाच्या पाण्याप्रो॥ येक प्रहर सातवे रोजी पाणी मा॥निलेचे बागेस द्यावयाचा करार करून हे सनद तुम्हास सादर केली असे तरी वरकड इमामदार सेरी वगैरे यांचे थोडे थोडे पाणी उणे करून बोभाटा न येता मा॥निलेस देणे म्हणोन कृष्णराव गंगाधर का॥दार पो॥ नाशिक याचे नावे, / सनद १ / सदरहु अनवणे मोकादम व कुळकर्णीकडे सनद १ मजकूर याचे नावे आज्ञापत्र.

ᔕ ᔕ

सवाई माधवराव पेशवे रोजनिशी
रावबहादुर वाड पान २३९
समान समानीन मया व अलफ सन
१७८७-१७८८

[ **लेखांक १२०**

कृष्णराव गंगाधर यांचे नांवे सनद की तुम्ही विनंतीपत्र पाठविले ते प्रविष्ट जाहले परगणा नासिक येथे साल मजकूरी मघाचा पर्जन्य पडला अलीकडे आज पावेतो पर्जन्य नाही. ब्राह्मण अनुष्ठानास लाविले आहेत. महरगता बहुत जाहली आपत्तीपुढे रयतेस आधार नाही साल गुदस्ताचे जमा वसूल होऊन बाकीचा वसूल घ्यावयाचा त्यास

---

१. दि. २१-५-१७८६.

खरीफाचे पीक गेले आहे याजकरीता आपत्तीची चौकशी करावयाविषयी आज्ञा जहाली पाहीजे म्हणून लींहीले त्यास परगणा मजकूर येथील आपत्तीची चौकशी करावयाविषयी सर्वोत्तम शंकर यांस आज्ञा केली असे तरी त्याजकडील कारकून व तुम्ही मिळून गांवगन्ना कुळारगवार आपत्तीची चौकशी करून जाबता हुजूर पाठविणे समजोन फडशा केला जाईल म्हणून सनद १.

संदर्भ लेखांक १२० प्रमाणे
पान ३१५ सन १७८८-८९

[लेखांक १२१

तिसेन समानीन मया अलफ मोहरम २३ खासा स्वारी सन समानीनात कसबे नासिक प्रो मजकूर येथे गेली होती. ते समई कृष्णाजी गंगाधर कमावीसदार प्रे॥ मजकूर यांचे विद्यमाने खर्च जाहला त्यापैकी जिन्नसाचा तोटा व लाकूड फाटे व शिदा बेगारी यांस वगैरे कीरकोळ खर्च जाहला त्याबद्दल पट्टी दुमाले वगैरे गांवावर करून ऐवज घ्यावयाचा करार केला आहे त्यास तुम्हाकडे प्रो मजकूर पैकी गांव आहेत. त्याजवर रुपये ३१४३ तीन हजार एकशे त्रेतालीस रुपये पट्टीची वाटणी घातली आहे तरी ................रुपये मारनिल्हेकडे देणे.

१ ) त्रिंबकराव अमृतेश्वर याजवर पट्टी.

..................................

१ ) माधवराव गंगाधर याजकडे मौजे पिंपळगांव आहे त्याजवर रु. १६ सोळा रुपये येविशी.

..................................

१ ) कृष्णराव गंगाधर याजकडे कमाविसदार परगणे नासिक यास कीं देहे सहासष्ट वर रुपये १३८७ पट्टी घातली आहे.

ती वसूल घेणे म्हणोन २३ सनदा.

वाड सवाई माधवराव रोजनिशी
पा. १३६ तिसैन समानीन मया व अलफ
जिल्काद २ सन १७८८-८९

[लेखांक १२२

कसबे नासिक येथे सिंहस्थाचे यात्रेचा वगैरे बंदोबस्त जाला पाहिजे या करिता निसबत राघो विश्वनाथ आसामी १०० शंभर पाठविले आहेत. तरी कसबे मजकूरी

याजपासून चाकरी घेऊन याना गावात व गावाबाहेर राहील तिचा बंदोबस्त चांगला करणे म्हणोन कृष्णराव गंगाधर कमाविसदार परगणे नाशिक याचे नावे सनद १

ऐ. लेख संग्रह- वासुदेव वा. खरे
पृ. ५७२१- पत्र क्र. ४५८०

[ लेखांक १२२ अ

मार्गशीर्ष व॥ ११ शके १७२०, २ जाने. १७९९ पै. छ. २८ रजब सन तिसा तिसैन विज्ञापना ता॥ छ २४ रजब गुरवार रा. दौलतराव शिंदे याजकडील पलटणे खानदेशात बायांकडील यशवंतराव यांचे पारिपत्याकरिता पाठवली होती. त्यास यशवंतराव नाशकाकडे आले. पलटणे खानदेशात होती ती वऱ्हाडात जाऊन दंगा करू लागली. भोसले याजकडील रा. विठ्ठलपंत यानी फौज घेऊन येऊन पलटणे घेरली आहेत. इकडे येऊ देत नाहीत. याप्रो॥ बातमी आली आहे. श्रीनाशिक क्षेत्रास भारी उपद्रव केला. रा. माधवराव ओक कमाविसदार याणी पहिल्याने पंधरा हजार रुपये दिले असता फिरोन तगादा लावला. तेव्हा पळोन गेले नंतर हल्ली त्यांचे वाड्यास पठाणानीं खणत्या लावल्या आहेत मोठा अनर्थ मांडला आहे....... पठाणानी अमर्यादा मांडली आहें. बायकांचा आब घेतात. शेदोनशे बायकानी प्राणत्याग केले. आणखीही प्रलय मांडला आहें. श्रीमंताचे दौलतीपासून दक्षणेत या प्रकारचा अनर्थ जाहला नव्हता. ईश्वरी इच्छा प्रमाण! सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

संदर्भ ले. १२२ प्रमाणे ]

[ लेखांक १२३

श्री

हजर आसार पांडुरंग केशव कमाविसदार पो॥ नाशिक सलामहू कप्तान हनरी पाटंजर सो॥ बहादूर सुभा अहमदानगर सलाम आंकी कृष्णराव गंगाधर वोक वास्तव्य को॥ नाशिक यांचे कारकून....... अर्ज केला जे आपले यजमानाचे वडील बालाजी महादेव यांस मोगलाई अमलापासून...... त्या दाखल्यावर श्रीमंत बालाजी बाजीराव प्रधान यांनी सनदा दोन छ. १२ माहे सफर सन सित खमसेनच्या करून दिल्या त्या चालवणे बाबतः १ मौजे पिंपलगांव भावले पो॥ मा॥ हा गांव मोगलाई अमलादरोबस्त खेरीज हाकदार व इनामदार व मोकासा करून बाकी जाहगीर अमल इनामी

१ ) का॥ मा॥र पौ॥ जमीन बिघे २० वीस इनाम/२

असिस्टन कलेक्टर आदालत तुकडी नाशिक सु॥ खमस अशरीन मयातैन व अलफचे पत्राने ( कृष्णराव गंगाधर वोक याने विदीत केले...... आमची वतनी पोतदारी ...... दरशदे ·।।· आठ आणे आहे इ॥ पासून सन १२२७ फसली परीयंत वहीवाट एकसाहा चालत आली आहे....... इ. ) कसीकाय चालत आली आहे ते तपशीलवार लिहून पाठविण्याब॥ देशमुख, देशपांडे, पो। नासिक यांस छ. १२ माहे ऑगस्ट सन १८२४ इ. त्यावरून देशमुख देशपांडे कळवितात कृष्णाजी गंगाधर वोक यांजकडे सन १२२६ फसली परियेत सरकार अजमासास गावगन्ना जागीर हिश्शास दर सदे आठआणे प्रमाणे आकार माारनिल्हेचे नावे खर्च पडून कमाविसदाराकडून पावत गेले जकाती कडील वहिवाटींचा दाखला आम्हाकडे नाही.

खिजमतीस रोष न होई हे अर्ज

पे. द. पुणे जमाव रु. १६९६
नंबर १९

[ **लेखांक १२४**

श्री

सरकार कुंपणी इंग्रज बाहदुर कैफियेत पो। कृष्णराव गंगाधर वोक वास्तव्य को। नासिक सन १२३४ फसली कारणे कैफियेत लि॥ दिल्ही ऐसिजे सरकारातून हुकूम की इनाम जमीन तुम्हाकडे वहिवाटीस आहेत. त्यास त्याचे फर्मान व सनदा व चकनामा वगैरे काय असतील ते सरकारात समजावे व तुमची कैफियेत लिहून द्यावी त्याज वरून कैफियेत लिहून दिल्ही जे आमचे इनाम संपादक बाळाजी महादेव वोक त्याचे पुत्र गंगाधरपंत वोक त्याचा पुत्र मी इनाम जमीन कसबे माारी जिराईत जमीन बगजरसमी बिघे २० वीस वौश परंपरा एकसाहा चालत आहे. त्यांचे वहीवाटीस व भोगवटीयांस सनदा व चकनामा वगैरे हजर आहेत. तो। १ मुकदम को। माार जगजीवनराम पवार वलद मलोजी पवार व दादा पा। वा। रंगोजी पा। कोठवले यांजकडे आमचे इनाम संपादक बाळाजीपंत याणी जाऊन विदीत केले की को। मजकूरी आपल्यास कांही इनाम करून दिल्यास बाग फुले तुळशी करू म्हणोन त्याजवरून पा। माारनिल्हे यानी इनाम मि॥ ज्येष्ट शु॥ १ सन ११६७ फसलीस चकनामा करून दिला तो १ श्रीमंत बाळाजी बाजीराव प्रधान यांनी बाळाजी महादेव यांचे नांवे छ १२ सफर सुभा सित खमसेन मया व अलफची सनद करून दिल्ही ती १ सरकार कुंपणी कलेक्टर सो॥ बाहादूर यांचा हुकूम लागदार यांचे नांवे को। मो। पो। इनाम २० बिघेचे ते माहे अकटबर सन १८१८ इसवी. ३ सदर येणे प्रो। कागद पत्र इनाम जमीनीचे आम्हा पाशी आहेत. त्याच्या नकला अलहिदा दिल्या आहेत. सदरहु जमीनीचा भोगवटा आज

पर्यंत चालत आला आहे. त्यासी विभागी दुसरे कोणी नाही. हे कैफियेत लिहून दिल्ही सही मिती आश्वीन व॥ ४ मंगलवार शके १७४६ ता।रणनाम संवत्सर सन १८२४ इसवी वर लिहील्या प्रमाणे.

सही कृष्णाजी गंगाधर हस्ताक्षर खुद.

[ **लेखांक १२५**

| |
|---|
| कपतान हनरी<br>पाटंजर साहेब<br>बाहादर कलक<br>टर आमदानगर |

ईजत आसार गिरमाजी केशव कमाविसदार पो। नासिक बाफियेत बाबंद अजतर्फ कपतान हनरी पाटंजर साहेब बाहादुर कलकटर सुभे आमदानगर सुभा इहिदे अशरीन मयातैन व अलफ कृष्णराव गंगाधर वोक नासिककर याजकडील कारकुनाने हुजूर येऊन अर्ज केला किं आमचे यजमानाची भावजई लक्ष्मीबाई वोक इणे सरकारात खोटी याद समजावून जाहागिरीचा गाव मौजे पिंपळगाव पो। मा।र पो। अडीचशे रुपये बाई घेते आम्हाला वसुल येत नाही व बाईने आम्हास फैसल्याचा कागद पंचाचे साक्षीनसी करून दिल्हा असता तटकारिते आम्ही पंचइतीस राजी आहो म्हणोन त्याजवरून हुकूम केला जातो जे मौजे मजकूराचा वसूल वोक उभयताकडे देऊ नये वसूल घेऊन अमानत ठेवणे आणी लक्ष्मीबाईस कागद पत्र सुद्धा हुजूर पाठवून देणे रा॥ ते दि. १७ माहे येप्रल सन १८२१ इसवी

सही इंग्रजी .................
कलेक्टर

[ **लेखांक १२६**

श्री

सरकार कुंपणी इंग्रज बाहादूर ता॥ मुकादम मौजे पिंपळगाव भावक पो। नासिक सु॥ खमस असरीन मयातैन व अलफ कृष्णराव गंगाधर वोक ते ता १० माहे फेबरवारी सन १८२५ इसवीस कैलासवासी जाहले त्यास पेशजी गिरमाजी केशव माजी कमाविसदार यांचे नांवे ते ता. ३ माहे फेबरवारी सन १८२१ इसवीचा हुजूरातून हुकूम सादर जाला आहे. तालुके मा।र दुमालेगांव जागिर वगैरे अमल दुमालदाराकडे आहेत त्याज

पैकी कोणी मुख्य दुमालदार मयत झाला असता तेच वखती त्याज कडील अमल अनत करणे म्हणोन त्याज वरून हे चिट्टी सादर केली असे तरी मौजे मा।र येथील जागीर व सरदेशमुखी व बाबतीचे अमलासुद्धा जप्ती केली असे तर वोकाचे इलाखदार यांजकडे सदरहू अमलाची दखलगिरी न देता गांवचे कागदपत्र साल मा।र वहीवाटीचे घेऊन पाटील कुलकर्णी सुद्धा ठाणे मजकुरी येणे जाणिजे ते ता. २३ माहे फुबरवारी सन १८२५ इसवी. मोर्तबसुद

[ **लेखांक १२७**

श्री

इजत असार बाळाजी हरी कारकून निसबत हुजूर कचेरी कामगारी तालुके नासिक अजतर्फ मेस्तर बॉइडसाहेब बाहादुर फश्ट असिस्टन कलेक्टर अदालत तुकडी नासिक सुहूर सन सीत अशेरीन मयातैन व अलफ राधाबाई कोम कृष्णराव गंगाधर वोक वस्ती कसबे नासिक याणी हुजूर अरजी दिल्ही त्यांत मतलब की आमचे भ्रतार जिवंत असताना दत्त मूल घ्यावा ऐसा नेम चौघाचे विचारे संकल्प करून उदक सोडले नंतर घरधनी मृत्यू पावले इनामगांवची सरकारातून आमानी झाली त्यास मेहरबानगी करून दत्त पुत्र घेण्यास व इनाम गांव आमानी केला ते मोकळे करून वहीवाट चालू करण्यास हुकूम देवीला पाहीजे म्हणून या बाबे पेशजी कलेक्टर साहेब बाहादुर यांजकडून अलिशान चापलीन साहेब बाहादुर यांजकडे लिहून गेले त्यांचा हुकूम ते ता. २५ माहे मे सन १८२५ इसवीचा आला.........( त्यांत दत्त घेऊन घर जिंदगी व इनाम चालवणे ) इनाम मोकळी करून वहीवाट कृष्णाजी गंगाधर वोक यांचे स्त्रीकडे चालवणे जाणिजे ता. २४ ऑगष्ट १८२५ इसवी.

सही इंग्रजी

श्री [ **लेखांक १२८**

सरकार कुंपणी इंग्रेज बाहादूर महाल कचेरी नासिक पावती राधाबाई कोम कृष्णराव गंगाधर वोक वा। का। नाशिक सन १२३५ फसली कारणे पावती लीहून दिल्ही ऐसीजे कीं आमचे घरधनी मयत झाले स।। .............. गांव आमानत होता तो व मौजे मा।रचा वसुल सन १२३४ फसली पो। सरकारात अमानी रु. ५५ ।।=

पंचावन्न रुपये दहा आणे पा। होता. तो बि।। बाळाजी हरी कारकून नि।। हुजूर कचेरी.... यांनी गांव व ऐवज आमचे हवाली केला. तो आम्हास पावला मि।। श्रावण व।। १ शके १७४७ पार्थिव नाम संवत्सर हस्ताक्षर बापूजी नारायण खालगांवकर नि।। म।। निल्ले

[ **लेखांक १२९**

यादी राधाबाई कोम कृष्णराव गंगाधर वोक वास्तव्य कसबे नाशिक दुमालदार हशम शके १७५१ विरोधी नाम संवत्सरे वैशाख व।। ४ ते दि. २२ माहे मे सन १८२९ इसवीस मृत्यू पावली सबब बाईचे कुटुंबाची मनुष किती व भाऊबंद कोण कोण आहेत व त्याजला कुल येकात उत्पन्न कायेगाव अथवा अमल कोणते सबबी करता कोणी कधी दिल्हे आणि हाली वहिवाट कोणते सनदावरून चालत आहे. त्या असल सनदा पाहून त्याच्या नकला सुधा चौकशी सुरू सन तिसा अशरीन मयातैन व अलफ सन १२३८ फसली ते दि २३ माहे मे सन मजकूर कलमे बीतपसील

१ ) बाईचे कुटुंबातील मनुष्य १ दत्त पुत्र नामे बलवंतराव यास कृष्णराव गंगाधर मृत्य झाल्या नंतर ते दि २९ माहे आगस्ट सन १८२५ ईसवीस सरकारचा हुकुम ......... जाहला त्यावरून शके १७४८ जेष्ट शु।। १४स दत्त घेतला ते हली कायम बलवंतराव कृष्ण आहेत. उमर वर्षे १२.१ सौ।। यमुनाबाई बलवंतराव यांचे कुटुंब उमर वर्षे ८/२

१) बाईचे घर जिंदगी वृत्ती उत्पन्नास भाऊबंद कोणी वारसदार नाही दशाहतील भाऊबंद मात्र आहेत.

१) कुल येकूण उत्पन्न ( आकडे दिले आहेत. )

१) असल सनदा अन्वये नकला कागद बी।।

१) मौजे पिंपळगाव भावक येथील मोगलाई अमलात दोन तक्षिमा जाहागीर इनाम चालत होती हली दरोबस्त अमल सरकारात आला सरकारनी कृपाळू होऊन पेशजी चालत आल्या प्रमाणे सनद जाली पाहीजे त्याजवरून बालाजी बाजीराव प्रधान याणी सनद सरीजे हकदार व इमामदार करून.........करार करून दिल्हा ते सनद छ १२ सफर सु।। सीत खमसेन मया व अलफची

१ ) कसबे नासिक येथे इनाम जमीन बिघे २० वीस दिल्याची सनद बालाजी बाजीराव प्रधान याची छ१२ सफर सु।। सीत खमसेन मया अलफची

१ ) मौजे पिंपळनेर पो।। दिंडोरी येथे नूतन बागास जमीन बिघे २५ देऊन बालाजी महादेव वोक याचे नावे सनद बालाजी बाजीराव याची छ१७ सवाल सु।। सलासीन मया व अलफ

२ ) हल्ली वहिवाट चालविण्या संबंधी ( १ मौजे पिंपळगांव भावक इनाम चालवणे ब॥ पाटंजर साहेबाचा हु॥ २३ अक्टो. १८१८ चा )

१ ) राधाबाईचे नावे चालविण्याचा बॉईड साहेबाचा हु॥ २९ ऑगष्ट १८२५ चा

१ ) मौजे पिंपळनेर येथील इनाम जमिनी प्रकरणी सरकारचा हुकूम सापडत नाही सबब दखल बाब बाईचे सांगण्यावरून

१ ) दखलबाब वहिवाट चालत नाही सबब कलमे.

१ ) पोतदार पो॥ नासिक व पो॥ त्रिंबक व प्रांत बुदलखंड वतनी

१ ) मौजे इंदोरे पो॥ दिंडोरी हा गाव ब॥ मु॥ ऐवजी

श्री

[ लेखांक १३०

वसुल बाकी मौजे पिंपळगाव भावक पो॥ नासिक हा गाव खेरीज मोकासा करून जाहागिरदार राधाबाई कोम कृष्णराव गंगाधर वोक वास्तव्य कसबे नासिक याजकडे चालत होता. त्यास शके १७५१ वैशाख व॥ ४ ते दि. २२ माहे मे सन १८२९ इसवीस बाई मृत्यू पावली सबब तालुके नासिक येथून ते दि. २३ माहे मे सन १८२९ इसवीस गावची अमानी होऊन मौजे म॥र येथील वसूलबाकी समजण्याविसी हुकुम जाला त्यावरून सुभा तिसा अशेरीन मयातेंन व अलफ सन १२३८ फसली कुल जमा रु. ( यापुढे जमेच्या तपसीलाचे आकडे ) जमा ६०३। = वसूल ५५०॥।· बाकी ५२॥ = यापैकी खर्च ८९॥ येन मोकासा ५॥ चाहोत्रा ५६ गावखर्च सदरहु वसुल बाकी लिहून दिल्ही आहे त्यात रूजवात तफावत जाल्यास सरकारचे गुन्हेगार तारीख ते दि. २४ मे सन १८२९ इसवी

ह॥ अनंदराव मल्हार कुळकर्णी मौजे मजकूर

नि. नांगर

( असे ५–७ महीन्याचे जमा-खर्चाचे आकडे आहेत. )

[ लेखांक १३१

पुरसीस बळवंतराव कृष्ण वोक मोकादम पाटील व जागीरदार व त्र्यंबक बळवंत गु॥ कुळकर्णी मौजे पिंपळगाव भावक तो॥ नासिक सन १२६९ फसली ता. २० अक्टोबर

सन १८२८ इसवी ( सवाल जबाब जहागिरीब।। कागदोपत्री पुराव्याब।। ) यावर सह्या १ सही बळवंतराव कृष्ण ओक मोकादम पाटील व इनामी जागीरदार मौजे मजकूर दस्तुरी खुद १ सही त्रिंबक बळवंत गु।। कुळकर्णी....

गोपाळराव कृष्ण मामलेदार

## [ लेखांक १३२

उइलम स्त्राट बाइड साहेब इस्कोयर बाहादुर आगटिंग कलेक्टर सुभे अमदनगर ईजत असार मोरो बळवंत कमाविसदार तालुके नासिक बाफियेत हषद परवीक बळवंतराव कृष्ण वोक यानी हनराबल गवेनर बडे साहेब बाहादुर यांचे हुजुरातीत अर्जी गुजराविली त्याचा तरजुमा इग्रेजीत इंग्रेजी तारीख १९ जनवारी सन १८२९ ईसवीचे खताबराबर हुजुर आला त्यात मज मुलकी पो।। नासिक व पो। त्रिंबक येथील जमाबंदीवर पोतदारी वतनाबद्दल हकदार सदे।।· प्रो। आमचे पणजे याजकडे पेशवे यानी करून दिल्हे त्या प्रो। खालसा गावाबद्दल निमे व दुमाले गावाबद्दल नमेनुम प्रो। मिलत आले येणे प्रो। वहिवाट......काही कागदाच्या नकला ता. २३ माहे जुलई सन १८२९ इ. खताबरोबर सरकारात गेल्या त्याचा जबाब तारीख १५ आगस्त सन १८२९ इसवीस हुजूर आला त्याजवरून हुकूम केला जातो जे बळवंतराव कृष्ण वोक यांजकडे साल म।।रा पासून पो। म।।रचे पोतदारी वतनाबाबत दर साल रु. ८५ पंचाऐंशी साल अखेर आल्यावर....... नेऊन देत जाऊन......१ माहे ऑक्टोबर सन १८२९ इ. मु. सन १२३९ फसली

## [ लेखांक १३३

कपतान हेनरी दडास राबइनसन साहेब बाहादूर कलेक्टर सुभा अहमदनगर इजत असार मोरो बलवंत कमाविसदार तो। नासिक......बळवंतराव कृष्ण वोक वा।। नासिक याणी हुजूरात अर्जी दिल्ही की मोजे पिंपळगांव पो। नासिक हा गांव वडलोपार्जित आम्हास इनाम वंश परंपरा चालत आहे. आमचे तीर्थरूपानी दत्तपुत्र घेण्याविशी सरकारात खत........जबाब आला तो तीर्थरूपाचे शरीरी बेआराम यास्तव मातोश्री राधाबाई यांस अंतकाल समई......दत्त पुत्राचा शोध करून घेण्यास दिवसगत लागल्यामुळे गांवची सोडचिठ्ठी राधाबाईचे नांवे झाली. राधाबाईनी मजला दत्तपुत्र विधानपूर्वक करून घेतले माझे नांवे गांव चालविणेविशी सोडचिठ्ठी व्हावी ती तशीच राहिली साल

मारी देव आज्ञा झाली......कमाविसदाराने गांवची अमानी करून सनदा वगैरेच्या नकला नगरास अर्जासोबत रवाना केल्या......मुलकी नंबर ३ ता. ११ माहे जून सन १८२९ इ. चा रिपोर्ट......हुकूम केला जातो जप्ती मोकळी करून बळवंतराव कृष्ण वोक यांचे सुपूर्त करून देऊन......ता. ३ माहे अकटबर सन १८२९ इ.

सही ( इंग्रजी )

## लखांक १३४

सरकार कुंपणी इंग्रेजबहादुर वि॥ कपतान हनरी डडास राबइनसन सो। बाहादुर कलेक्तर सुभे अहमदनगर पावती पो। बळवंतराव कृष्ण वोक जाहागिरदार मौजे पिंपळगाव भावक पो। नासिक वास्तव्य कसबे नासिक सन १२३९ फसली कारणे पावती लिहून दिल्हीं ऐसिजे......आमची मातोश्री राधाबाई कोम कृष्णराव वोक याचे नावे......होता त्यास मातोश्री राधाबाई सालमजकुरी देव आज्ञा जाहली....यास्तव त्याजवरून...आमचा गाव पिंपळगाव भावक आमचे सुपूर्त केला तो आमचा आम्हास पावला ही पावती लिहून दिल्ही सही ते ता. २८ अक्टंबर सन १८२९ ईसवी

साक्ष

सही बळवंतराव कृष्ण वोक दस्तुर खुद

१ माधवराव अंबादास कुळकर्णी
मौजे भांबोरी वगैरे पो। म॥र

१ विसाजी लक्ष्मण कुळकर्णी
मौजे सिवड पो। नासिक.

## [ लेखांक १३५

पे. द. पहाणी खर्डा, रत्नागिरी जिल्हा. रु. क्र. ४३

पहाणी खर्डा बागाईत मौजे कोळथरे ता॥ पंचनदी प्रांत जंजिरे सुवर्णदुर्ग सु॥ खमस सबैन मया व अलफ

नि॥ धोंडभट खांबेटे ठिकाण केळकर--नारळ....पोफळी.....

घरवाडी--राघोबा वोक

| नारळ माड | पोफळी पेड |
|---|---|
| १०, १५, १००, ९०, २०, १५ | १२, १२, ११, २२ |
| ३०, २०, ८०, ५०, २५, ५० | बारदार पेड ८, १२ सुपारी ०।८ |
| २५, २०, ३०. | गैरबारदार १ |

पेड १५ येकूण नारळ सुमार ५८० उमेदवार ३

| | | |
|---|---|---|
| | १२ | |
| पाडा पे॥– | ०१ | ००१॥ |
| | १३ | ०।९॥ |

यास रुजू गु॥ सन तिसा सितैन

| नारळ माड | सुपारी पेड | | |
|---|---|---|---|
| बारदार १५ | बारदार पेड | ६ | ८ |
| नारळ ७३० | गैरबारदार | ३ | ८ |
| | | ९ | ८ |

पानवेली २५

नि॥ बाळाजी त्रिंबक छत्रे–ठिकाण....दातार...नारळ इ.

ठिकाण घरवाडी बाळाजी वोक

| नारळ माड | | | झीट... | |
|---|---|---|---|---|
| बारदार १००, ५, ८०, ७०, ३०, | | | झाप | उडीणी |
| ५०, ९०, १००, १५, ५ | | | १ | १ बारदार |
| पो। | | | | |
| पेड बारदार | १० | नारळ ५२५ | | २ रोपे |
| गैरबारदार | १ | ० | | १ उमेदवार |
| मयत | ४ | ० | | ४ |

यास रुजू गु॥ सन तिसा सितैन

| नारळ माड | | उडीणी |
|---|---|---|
| बारदार पेड १४ | नारळ ४९० | १ बारदार |
| झीट १ | | २ रोपे |
| १५ | ४९० | १ उमेदवार |
| | | ४ |

बोटखत बागाईत पहाणी कुलारगवार मौजे कोळथरे ता॥ पंचनदी प्रांत जंजिरे सुवर्णदुर्ग सु॥ खमस सबन मया व अलफ

नि॥ धोंडभट खांबेटे

| नारळ माड पेड | अजपेड | गैरबारदार | झीटे | बारदार | येकूण नारळ |
|---|---|---|---|---|---|
| ठिकाण केळकर | ८ | ० | २ | ६ | १२५ |
| घरवाडी | १५ | ० | २ | १३ | २०५ |
| ठिकाण राघोबा वोक | १५ | ० | ० | १५ | ७६५ |
| | ३८ | ० | ४ | ३४ | १०९५ |

नि॥ बाळाजी त्रिंबक छत्रे

ठिकाण दातार २७ ... .... ... .... ... ... .... ... ... १०५०

ठिकाण बाळाजी वोक ११ ... .... ... .... ... .... ... ... .... ५२५

ठिकाण नारायण जोसी कोळथरेकर ... ... ... ... ... ... ...

ठिकाण नारायणभट वैशंपायन .... .... ... ... .... .... .... ...

.... ... .... ... .... .... ... ...

पे. द. पहाणी खर्डा रुमाल क्र. ४६

पहाणी खर्डा बागायत मौजे कोळथरे ता। पंचनदी ता। जंजिरे सुवर्णदुर्ग सु॥ इसने समानीन मया व अलफ छ १५ जिल्काद[1]

ठिकाण बाळाजी वोक निसबत कृष्णाजी बल्लाळ छत्रे

| नारळ माड बारदार | झिटे | उटिणी |
|---|---|---|
| ३०, ७५, ५०, ६५, १५, ६० | १ | २ बारदार |
| येकूण बारदार ७ नारळ ३९५ | | १ उमेदवार |
| झिटे १ | | ३ |
| ८ | | |

यास रुजू गुदस्त सन खमसैन

| नारळ माड | | उडिणी |
|---|---|---|
| येकूण बारदार १० | ५२५ | १ बारदार |
| झिटे १ | | १ उमेदवार |
| ११ | | २ रोपे |
| | | ४ |

घरवंडी राघोबा वोक निसबत बाबुराव राम गोडबोले

| नारळ बारदार | सुपारी पेड |
|---|---|
| | बारदार गैरबारदार |
| १०, २५, ३५, ७५, १०, २० | .... ... .... ... ... |
| १०, १०, २५, ३०, १०, २० | ... ... ... ... .... .... |
| ५, ५, १५ | पेड |

१. दि. २-११-१७८१.

येकूण बारदार १५ नारळ ३०५　　　बारदार　११　　१६
　　　　　　　　　　　　　　गैरबारदार　२
　　　　　　　　　　　　　　　　　　१३

यास गुदस्त सन खमसैन

नारळ माड बारदार १५　　　　सुपारी पेड
　　नारळ ५८०　　　　　　.... ... ... ...
　　　　　　　　　　　　.... ... .... ...

ठिकाण नारायणभट वैशंपायन नि॥ कृष्णाजी बल्लाळ छत्रे

... ... ... ... .... ... ... ...

ठिकाण वैद्य व वोक वि॥ कृष्णाजी बल्लाळ छत्रे

... .... .... ... .... .... ... ...

( याच वर्षीची तेरीज बागायती यात बाळाजी वोकचे नाव आहे. )

श्री. य. ना. वैशंपायन
B. E. यांचेकडून

[ **लेखांक १३६**

रोज नंबर २

सन १९०५ चे फेब्रुआरी महिन्याचे १ ले तारखेस दोन प्रहरी २।३ चे दरम्यान हवेली रजिस्ट्रारचे कचेरीत आणून दिले.

सही इं. वामन नारायण ओक

फी ... ... ...
　... एकूण २८१५
सही इं. ... जां. सबरजिस्टर

श्री शंकर प्रसन्न

व्यवस्थापत्र श्री शके १८२६ कार्तिक शु॥ ७ सोमवारी तारीख १४ माहे नोव्हेंबर सन १९०४ रोजी मी वामन नारायण ओक रा. शहर पुणे पेठ शनवार धंदा पेन्शनर व्यवस्थापत्र लिहून देतो ऐसाजे माझे वय सुमारे सत्तर वर्षाचे आहे तरी पण कोणत्या वेळेस काय होईल याचा नेम नाही करता मजजवळ स्थावर जंगम इस्टेट असल्याबद्दल तपशील......

.... ... ... ... ... ... ... ... ... ... .... ... ...

... ... .... ... .... ... ... ... ... .... .... ... ...

तुकडी रत्नागिरी पोट तुकडी कापदापोली जिल्हा रत्नागिरी येथे मौजे कोळथर या गावी जमीन मिरासी सर्व्हे नं. २९ पोट नंबर ४।५ गुंठे १७ आकार ६८८ व सर्व्हे नं. २८ पोट नं. २।३।४ एकर १७॥ गुंठे आकार २८७ या सर्व इस्टेटींचा मी पूर्ण मालक आहे ... ... ... ...

ता. १ माहे फेब्रुआरी सन १९०५

साक्षी ... ... ... ....

पे. द. प्रांत अजमास उत्तर कोकण रु. ६४९ ] [ **लेखांक १३७**

राजमंडळ रोजकीर्द

स्वारी राजश्री पंतप्रधान सु॥ तिसा अशरीन मया व अलफ छ ११ र॥ लावल[१] रवासुदगी

मौजे कुळगाव ता॥ चोण प्रां। कल्याण हा गाव खराब आहे. तेथील वस्ती आबानी करावयाची आज्ञा वासुदेव जोसी यास सांगितली त्यास मौजे मजकूरची आबानी झाली म्हणजे पहिले वरसी दिवाणधारा माफ केला दुसरे वर्सापासून ता॥ मजकूरचे गावगन्ना जे बेरीज बसत असेल त्याप्रमाणे दमाचा वसूल घ्यावा म्हणून सदन—१

राजमंडळ रोजकीर्द

स्वारी राजश्री पंतप्रधान सु॥ सबा सलासीन मया व अलफ छ १२ रजब[२] दफाते पत्रे

कोकण प्रांतींचा तह होऊन कौल देऊन मुलकाची लावणी करणे बी तपसील :

| | |
|---|---|
| गाव लागले असतील ते वजा करून खराब गाव असतील ते निवल कुणबी यास खोती देऊन लावणी करणे कलम—१ | चौकिल्याचे पेटास मोहतर्फी कुले व भुसारी व वोढे दामबाजार बसला जकात हसील याचा तपसील येणे प्रो। |
| दर माहालचे गोली येतील त्यास महसूल येक साला माफ असे कलम—१ | १ परमुलकी येतील त्यास दुसाला माफ<br>१ आपले मुलुकातील येतील त्यास निमे<br>२ दुसाला माफ |

१. दि. ४-१०-१७२९ २. दि. ५-११-१७३६

पे. द. पहाणी खर्डा
जि. रत्नागिरी रुमाल ३८ ]

[ **लेखांक १३८**

... .... ... ... .... ... ... .... ... ...

इसने सबैन मया व अलफ[1]—मौजे बुरोंडी
शेत जमिनीवर गोविंदभट सोमण व धोंडभट खांबेटे आहेत.

मौजे कोळथरे ता।। पंचनदी प्रांत जंजिरे सुवर्णदुर्ग सु।। इसने सबैन मया व अलफ

भात जमिनीवर नावे गोविंदभट सोमण, आघारकर, दांडेकर, दातार, जोशी इ० महादाजीपंत वोक नि।। बाळाजी छत्रे–उनाळी सेत.

रघोबा वोक नि।। धोंडभट खांबेटे.

... ... ... ... ... .... ... .... ...

बी कलम राघोकृष्ण नि।। कारले देशकुळकर्णी

[ **लेखांक १३९**

" बदलापूर–आमचा गाव " ले. ना. गो. चापेकर मुद्रण शके १८५५ पृ. ३५४

सु. सन १२०६ श्री इ. सन १८०५

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गोपाळ केशव ओक गोसावी यासी शेवक नारायणराव रामचंद्र नमस्कार सु।। सीत मयातैन व अलफ तुम्ही सुभा राजमाचीचे मुक्कामी येऊन विनंती केली की मौजे खरवई ता।। चोण येथे बांधण उशास कुलगावचे सीवेनजीक कास जमीन लागवड अजमासे दीड बिघा आहे. त्याची बंदीस्त केली–यास चालीस पन्नास रुपये लावील्यावर भात सेतजमीन तयार होईल त्याची कौल दिल्ही-यास बंदीस्त करू त्याजवरून आबादीवर नजर देऊन कौल येणेप्रमाणे.

कास जमिनीचा धारा इ।। सन सीत ता।। सन अशर साले ५ पाच साले दर बिघा दीड प्रा।.

इस्तवा दर बिघा २ सन इहिदे अशर
३ सन इसने
४ सन सलास

तीन साले इस्तावा पुरल्यावर साल दरसाल दर बिघा चार रुपयेप्रमाणे देत जाणे.

---

१. सन १७७१-७२

एकूण पाच साले दर बिघा दीड रुपयाप्रमाणे व पुढे सन इहिदे दर बिघा रुपये दोन व सन इसने दर बिघा रुपये तीन व सन सलास दर बिघा रुपये चार प्रमाणे उगवणी सालाचे सालात करीत जाणे कौल असे जाणिजे छ २२...... मोर्तबखुद.

ഗ ഗ

पे. द. उ. को. रु. १४७९ ] [ **लेखांक १४०**

राजमंडल

सु॥ सबा समानीन जमा सालमजकूर ता॥ राजमाची वसूल जमा परभारे खेरीज मुशाहिरा इमाननती

तर्फ चोण प्रांत कल्याण

| | |
|---|---|
| १०७७॥≡ | सदाशिव विश्वनाथ जोशी मुरुडकर याजकडे मुगाव |
| ११५०८≡ | जयराम जोसी मुरुडकर याजकडे मौजे अंबेशीव |
| ९६५८= | बालजोसी मालगुंडकर मौजे कुळगाव |
| ५ | देवस्थान श्री खंडेश्वर वास्तव्य मूळ डोंगर |
| ५११ | रामाजी हरी भिडे मौजे राहाटवडे |
| | वैसास माणकिवली, पटवर्धन वालिवली |

हरजोसी अरेकर बदलापूर पे॥ जमीन, दाबके मौजे बेलवली, वैशंपायन खरवई, नारायण जोसी हल्ली नातू भास्कर जोसी व॥ खरवई, बापू जोसी वैद्य व॥ खरवई, अचवल खरवई इ.

ഗ ഗ

पे. द. उ. कों. रुमाल १४७९ ] [ **लेखांक १४१**

राजमंडल सु॥ खमस शके१७०६

धर्मादाय ब्राह्मणास ता॥ चोण पैकी नेमणूक होती त्यास तालुके मा॥र इंग्रजाचे दंग्यामुळे उज्याड जाहली सबब सन इसने समानीनचे अजमासास नेमणूक वजा केली आहे त्यास साल मजकुरी इस्ताव्याब॥ आकार जमेस आला सबब नेमणूक प्रमाणे

| | | नक्त रु. | गला कैली भात |
|---|---|---|---|
| भीक जोसी यास मौजे वालवली पे॥ जमीन बिघा १॥ | | १२॥ | ० |
| नीळकंठभट अचवल यास मौजे वालवली पे॥ जमीन बिघा १॥ येकूण | | ३॥। | ० |
| महादाजी नारायण पटवर्धन यास " " " " बिघे ८२ येकूण | | ५ | ० |
| बालभट घैसास मौजे माणकोली पो। भात सेत जमीन बिघा १ | | | |
| येकूण दुतर्फादर ५ प्रो | | ५ | ० |
| हरजोसी अरेकर यास कसबे बदलापूर पैकी भात सेत जमीन | | | |
| येकतर्फा दर २॥ प्रमाणे बिघे ८२ येकूण आकार | | ५ | ० |
| चिमणाजी बल्लाळ दाबके यास मौजे बेलवली पैकी | | ५८॥। | |
| २५ भातसेत जमीन बिघे ८५ दुतर्फा दरबिघा ५ प्रो। | | ० | |
| ३३॥। घरवण ३॥। घरटयाचा कर घरे ५ दर ०॥।. प्रो। | | ० | |
| ३० वण म्हैसी ३० दर १ प्रो। | | ० | |
| ५८॥। ३३॥। | | | |
| चिंतामण भट वैशंपायन वस्ती खरवई पुत्र नारायणभट यास | | ० | ०॥।=॥ |
| भास्कर जोसी वस्ती मौजे खरवई यास | | ० | ०॥।=॥ |
| राघो जोसी याचे पुत्र बापू जोसी वैद्य यास | | ० | ०॥।=॥ |
| | | ९० | २॥।=॥। |

भीमेश्वर वस्ती खरवई ता॥ चोण यास दीपा बद्दल तेलाची नेमणूक आहे परंतु दंग्यामुळे ...... त्यास तर्फेची वसाहत होऊन लागवड जहाली यामुळे देवास दीपास तेल नेमणूक प्रो। वजनी

वजन पके ८।३६

श्री० य. न. केळकर खाजगी संग्रह [ **लेखांक १४१ अ**

मुरुडकर जोसी यांचे कडील फेरिस्त खात्यापैकी

शके १६६८ क्षयनाम संवत्सरे

२००० रामभट वैशंपायन कोळथरेकर द. म. द. शे. रु. १॥

बी॥ कृष्णाजी बापूजी मुरूडकर मिती कार्तिक शु॥ १०

[ **लेखांक १४२**

श्री काशिनाथ प. ओक बदलापूरकर वस्ती दादर मुंबई यांचे संग्रहातून एक कसरीने खाल्लेला बंद.

....श येक.... बालाजी केशव... गोविंद भिकाजी यांचे बोलणे खलती न पडता सदरहूचा हिस्सा घ्या ( द्या ) वयास मान्य... आले त्या सदरहू खतामध्ये खरेदी खते वगैरे दस्तऐवज असेल ते बालाजी केशव याने आपले जवळ ठेवावे. या घरात गोविंद भिकाजी उभयता ...... वारसा नाही. आपले हिश्शाचे रुपये ४००॥ च्यारशे रुप्ये आठ आणे सुर्ती बालाजी केशव याजपासून घ्यावे ...... या गावपैकी बालाजी महादेव दाबके भिकाजी केशव व बालाजी केशव यांचे मातोश्रींचे तीर्थरूप याजला पेशव्यानी .... बिघे जमीन धर्मादाय दिल्हेली पुढे ...... ची स्त्री आनंदी ....... दाबकी यानी बक्षीस देऊन त्याचे पत्र गोपाळ केशव ओक याचे नावे माजी राज्यात करून ... न जमिनीची सनद बाळाजी बाजीराव पेशवे याचे नावची सनद होती ते हवाली केली. याजप्रो। सदरहू जमिनी .... धान्याचा आकार रु. २५ ...... सरकारातून पेशवाई अमलात व इंग्रजी राज्यात मजुरा पडत आले अलिकडे भिकाजी ( अपूर्ण )

पे. द. उत्तर कोकण रु. १४७] [ **लेखांक १४३**

राजमंडल

स्वारी........सुमा सीत सबैन[1] शके १६९७ जमा सालमा।र तालुके राजमाची नि।। रामराव नारायण दफाते पत्रे छ २९ माहे जिल्हेज[1] माघमास आबाजी गोपाल दाबके दी॥ यशवंतराव गंगाधर[2] यास मौजे खरवई तर्फ चोण प्रांत कल्याण तालुके मा।र पैकी जमीन बिघे ८५ पडीत खराबा आजपावेतो वहिली नसेल ती नूतन इनाम करून घ्यावयाचा करार करून हे सनद तुम्हास सादर केली असे तरी..........सनद १ रसानगी यादी

राजमंडल

शके १६९८ अधिक भाद्रपद–आबाजी गोपाळ दाबके यास खरवई पो। जमीन देणे बाबत पुन्हा पत्र–" कधी लागवड जाहली नाही असी तो मिळावयाचीच नाही सबब पडीत डोंगराखालील बंदिस्त जाहली नाही असी असेल ती पाहोन.............देणे "

---

१. दि. २०–२–१७७६

२. यशवंतराव गंगाधर ऊर्फ दादाजी गंगाधर–आहिल्याबाईचे दिवाण किंवा फडनीस ( पुणे अखबार भा. २ हैद्राबाद कारभार पृ. १३७ ते १५४ )

ऐति. संकीर्ण साहित्य खंड ५ ले. ४५ ] [ **लखांक १४४**

श्री. त्र्यंबकेश्वर संस्थानचे वर्तणुकीची माहिती शके १६८० चैत्र व॥ ३ सन १७५८ एप्रिल २५ श्री शाहू नरपति हर्षनिधान बाळाजी बाजीराव प्रधान.......येणे प्रमाणे दाहा कलमापैकी श्री त्र्यंबकेश्वरची ५ व श्री कुशावर्ताची ५ करार करून याचे खबरदारीस अप्पाजी अनंत कारकून व दहा माणूस हमशाकडील पाठविले असे...... याणी रखवाली बंदोबस्त राखावा.

ले. ५० शके १७८२ माघ शु॥ ९ सन १८६१ फेब्रुआरी १९............या खालील खलासा पत्र १ अप्पाजी अनंत याचे आडनाव ओक असोन त्याचे वंशाकडे अद्याप पावेतो कारकुनाची आसामी आहे.

ऐ. टिपणे भाग ६ पृ. ४२ ( मेणवली दप्तर)

( या पत्रात हल्ली येथे ओंकारेश्वरास अथवा शिवासन्निध पूजा करतो असा मजकूर आहे म्हणून हे पत्र पुण्याहून लिहिले असावे. )

सेवेशी अप्पाजी अनंत ओक नि॥ श्री त्रिंबकेश्वर विज्ञापना ..........चंद्रशेखर बाण यावर उदगयन जाहल्यावर चंद्र उदय होतो.......इ. आज्ञा झाल्यास श्री त्रिंबकेश्वरास जाईन..........सेवकांचे काही स्वकीय कार्य आहे..........

वे. केशवभट वामनभट फडके<br>तीर्थोपाध्याय त्रिंबकेश्वर ] [ **लेखांक १४५**

॥ श्री ॥

वही नं. पान नं.

४ ४५ ° शके १६४० विलंबनाम संवत्सरे पौष शुध ६ ते दिनी राम ओक यांचा पिता केसोबा ओक आजा बाळाजी ओक बंधू बाळाजी ओक गाव कोळथरे उपाध्यिक दिल्हे.

१२ ६ ° शके १६५२ साधारण नाम संवत्सरे मार्गशीर्ष शु. १३ ते दिवशी लिखीतं कृष्णाजी रघुनाथ आजे बाळाजी चुलते केसोबा बंधू अनंत व दामोदर उपनाव वोक गांव कोळथरे प्रां. पंचनदी आपले श्रीचे तीर्थ पुरोहीत भिकंभट फडके आपल्या वंशीचे येतील ते तुम्हास मानतील.

१९ ३८ ° लिखीतं राघो बल्लाळ आजे नारोबा पुत्र कृष्णाजी व अंताजी व दामोदरभट उपनाव ओक गांव कोळथरे सुखवास खरोली प्रां. कल्याण आपले श्रीचे तीर्थउपाध्ये वे. भिकंभट फडके पूर्वापार असे. आपण यात्रा करून

लिहून दिल्हे. पांडुरंगभट फडके याजजवळ लिहीले असे ते रद्द हे लिहीले. शके १६६४

२८ २२ ° लिखीतं दामोदरभट ओक कोळथरेकर पिते राघोबा आजे बाळाजी बंधू अंताजी भावनाम संवत्सरे तीर्थपुरोहीत भिकभट फडके यात्रा करून लिहून दिल्हे असे शके १६७६

२८ ४३ ° वेदमूर्ती राजश्री भिकंभट फडके स्वामिचे सेवेसी विद्यार्थी-त्र्यंबक कृष्ण आजे रघुनाथ चुलते अंताजीपंत व दामोदरभट बंधू केसो कृष्ण चुलत बंधू आपा व पांडुरंग व जगन्नाथ व नारायण मातुश्री रखमाबाई आपण श्रीक्षेत्री यात्रा करून वडीलांची लिहीली पाहून तीर्थउपाध्येपण तुम्हास दिल्हे. ओक गांव कोळथरे हल्ली वस्ती खरवई. पाडुरंग भटापाशी लिहिले आहे ते रद्द असे पूर्वापार उपाध्ये तुम्हीच आहा हे लिहिले. शके १६७६ भावनाम संवत्सरे फाल्गुन व॥ १३

॥ श्री ॥

वही नं. पान नं.

३३ ११ ° शके १६८७ पार्थीवनाम संवत्सरे पौष व॥ ५ ते दिवशी वे. राजश्री भिकंभट फडके यांसी विद्यार्थी अंताजी रघुनाथ आजे बाळाजी पुत्र अप्पाजी व पांडुरंग व जगन्नाथ व नाना पुतणे कृष्णाजीचे मुलगे केसोपंत व त्र्यंबक दामोदरभट याचे पुत्र बाळंभट व श्रीकृष्ण उपनाव ओक कोळथरेकर ह. साष्टी आपण सिंहस्थ यात्रा करून वडिलांचे लेख पाहून लिहून दिल्हे.

३४ ११ ° लिखीतं केसो कृष्ण ओक कोळथरेकर ह. वस्ती मौजे खरवई शके १६८८ व्ययनाम संवत्सरे. श्री त्र्यंबकेश्वरी यात्रेस आलो होतो. यात्रा करून उपाध्येपण दिले असे.

३६ २२ ° लिखीतं राधाबाई भ्रतार दामोदरभट पुत्र बाळंभट व श्रीकृष्णभ. उप०ओक कोळथरेकर चैत्र शु. ८ शके १६९९

३९ ११४ ° लिखीतं श्रीकृष्णभ· पिते दामोदर आजे रघुनाथभट बंधू मोरेश्वरभट उपनांव ओक गांव कोळथरे ह. व. भडगांव आपण श्री त्र्यंबकेश्वरी यात्रेस येऊन पूर्वील वडिलांचे लिहिले पाहून तीर्थउपाध्येपण वे. मू. रंगभट फडके यांस लिहून दिल्हे असे आपले वंशीचे येतील ते तुम्हास पुजितील हे लिहिले १६९१ हेमलंबीनाम सवंत्सरे पौष शु. ४ शुक्रवार.

३८ १३ ° लिखीतं गणेश बल्लाळ ओक आजे केसो बल्लाळ बंधू महादाजीपंत व सदाशीवपंत व पुत्र भास्करपंत व पांडुरंगपंत व जनार्दन व नारायण मौजे कोळथरे ता. पंचनदी प्रां. दाभोळ हल्ली वस्ती पुणे आपण श्री त्र्यंबकेश्वरी

यात्रा करून पूर्वील वडीलांचे लेख पाहून तीर्थउपाध्येपण वे. राजश्री चिंतामणभट फडके यांस दिले असे शके १६९९ हेमलंबीनाम संवत्सरे माघ शु. ७ सौम्यवासरे

श्री

वही नं पान नं

४६ २५ ° लिखितं जनार्दनभट ओक बंधू बाळाजीपंत पिते केशवपंत आजे कृष्णाजीपं. वोक गांव कोळथरे हल्ली वस्ती कसबे बदलापूर आपण श्री त्र्यंबकेश्वर यात्रा करून पूरविलिखीत पाहून लिहून दिल्हे असे शके १७२३ दुर्मती नाम संवत्सरे

४७ ८ ° वे. मू. राजश्री यज्ञेश्वरभट फडके वास्तव्य श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर स्वामिचे सेवेसी विद्यार्थी गोपाळ केशव ओक आजे कृष्णाजीपंत बंधू ति. जनार्दनभट व चि॰ भिकाजीपंत व बाळाजीपंत मातोश्री भागीरथीबाई सा. न. वि. वि. आम्ही श्री त्र्यंबकेश्वरी यात्रा करून वडीलांचे लेख पाहून तुम्हास पुजिले. शके १७२३ दुर्मतीनाम संवत्सरे मार्गशीर्ष शु. ११

श्री. आगाशे यांचे संग्रहीचा ] [ **लेखांक १४६**

खरेदीखत दि. १५-१०-१८९२

खरेदी घेणार ति. सौ. मातोश्री ज्यानकीबाई भ्र. रामचंद्र विष्णु गुपचुप रा. पेठ शनवार-खरेदी देणार सिताराम मोरेश्वर जोशी रा. शनवारपेठ धंदा जोशीचा. पूर्वी आमच्या मातोश्री गंगाबाई भ्र. मोरेश्वर जोशी ह्या व आम्ही आपलेपाशी असोन तुम्ही आमचा सांभाळ करीत होते व आपली मातोश्री शके मजकुरी भाद्रपद शु॥ ८ रोजी कैलासवासी होते समयी त्याने आम्हास असे सांगितले की वर लिहिलेली खुली जागा चि. सौ. जानकीबाई यांची मुलगी XXX ची वडील बहीण आहे सबब तिने आजपावेतो आपला समाचार घेऊन आपला संभाळ............सबब तिजला बक्षीस द्यावी पण मातोश्री कैलासवासी जाले कारणाने त्यास उत्तरकार्य करण्यास मजपाशी काही नाही करिता मी तुमचे भ्रतार याजपासून कर्ज १०० रुपये घेतले आहेत व मजला दुसऱ्याचे देणे रु. ७५ पाऊणसे जाले याजकरिता तुम्हास रुपये दोनसे सुर्ती घेऊन....

( लांबी रुंदी दिलेली नाही )

चतुःसीमा : पूर्वेस शंकरराव ओक यांचा वाडा
दक्षिणेस सरकारी बोळ
पश्चिमेस आरोळे यांची जागा
उत्तरेस ओंकारेश्वराकडे जाणारी पूर्वपश्चिम सडक

खुली जागा त्यातील रामाचे देवळासह खरेदी दिली

‘ पराग ’ मासिक वर्ष १ अं. ३ पृ. ४१ ]
ले. वि. सि. चितळे–रायरीकर दप्तर
श्री. य. न. केळकर यांचेकडून ]

[ **लेखांक १४६ अ**

श्री ता. ३१ आगस्ट १८४४

आर्जी नं. ३२८

कुंपणी सरकारास

अर्जी ब॥ समस्त ब्राह्मण पेठ शनवार आळी ओंकारेश्वर लगत शहर पुणे सन १२५४ फसली अर्ज करतो जे श्री ओंकारेश्वरानजीक नदी किनारा घाट व पाणी भरावयाची व स्नानसंध्या करावयाची जागा आहे तेथे आजमासे आठदाहा दिवसापासून दोन आ॥ साहेब लोक येतात ते माजी ज्यइज्य मारियटसाहेब यांचे चिरंजीव आसे ऐकण्यात आहे ते दररोज दोन प्रहर दिवसापासून रात्र पडेपर्यंत नदी–किनारा व देवालय व घाट व बाग यात फिरून बरोबर माहार आजमासे आठदाहा आसामी घेऊन देवालयातून फिरतात व पाणी भरावयाची श्रानसंध्या वगैरे होण्यास हरकत होती आणि आमचे श्रानसंध्येचे घाटावर्ती माहारसुद्धा बसून नदीतील मासे मारतात आणि अशा ठिकाणी थुंकून खराबा करतात यामुळे ब्राह्मण लोकास स्नानसंध्येची व पाणी भरावयाची फार हरकत होती व रस्त्यातून कुत्री व पोळ माहार याजकडून मारविण्यासाठी धोंडे मारितात यामुळे रस्त्यातून बंदी ते निघून जाई तोपर्यंत होत आहे व देवालयात कोणी कधीही इंग्रज अंमल जाल्यापासून साहेब लोक गेले नाहींत आसे असून हे दोन आसामी माहारसुद्धा देवालयात सिरतात यामुळे आमचे जातीधर्मास फार विरुद्ध आहे असा गहजब याणी केल्याचा मजकूर फौजदार साहेब यास जाहीर करता फौजदार याणी सिपाई याजबरोबर सांगून पाठविले आसे असून ते सांगणे न ऐकता आम्हा लोकास फिर्याद केल्यामुळे ज्यास्ती शिवीगाळ केली नंतर फौजदार यास पुन्हा आर्ज करिता ते खुद्द येऊन त्याजला ताकीद देऊन अस्तमानपर्यंत सिपाई बंदोबस्तासाठी बसविला तो सिपाई गेल्यानंतर पुन्हा घाटावरून देवालयात येऊन अनेक तऱ्हेने बोलोन गेले व दुसरे दिवशी म्हणजे ता. ३० आगस्ट या रोज येऊन माहार लोक घोड्यासुद्धा देवालयाचे दारात उभे केल्यामुळे आमचे जातीधर्माप्रमाणे जाण्याची बंदी आली व पूर्ववत प्रो॥ साहेब लोक देवालयात जात येत आहेत सबब अर्ज केला आहे तर नदीतील मासे व रस्त्यावरील कुत्री व पोळ मारीत आणि देवालयात व घाटावर वगैरे वालवंट व बागात न न जाईत असा आमचे जातीधर्मा प्रो॥ सरकारानी मेहेरबानी करून देण्याविसी सरकार मुकत्यार आहे.

१ सिवरामभट चित्राव १ भाऊ जोसी पंचनंदीकर १ रामचंद्र बापूजी केळकर १ दिवाकर जोसी पंचनदीकर,...... १ विष्णु नारायण ओक द॥ खु॥ १ विठ्ठल रामचंद्र भावे दि॥ रामचंद्र रघुनाथ लेले– इ. १९ सहया.

फौजदार शहर पुणे यास

येक सिपाई अर्जदार लिहितात तेथे साहेब लोक यास न येऊ देण्याकरिता

रखवालीस ठेवून तेथे ते येतील तर त्यास हु।। नाही म्हणोन मनाई करावी आणि न ऐकतील तर तेच वेळेस आम्हास जरूर रपोट करावा ता. ३१ आगस्ट सन १८४४ इ.

सही इंग्रजी.

ல ல

[ **लेखांक १४७**

A list of cloth merchants of the Peshwa in 1773

1,................

2,...................

34 Naroba Naik Oka.

ல ல

पे. द. अजमास उ. कोकण रुमाल ६४९ ] [ **लेखांक १४८**

रोजकीर्द

राजमंडल

स्वारी राजश्री पंतप्रधान सु।। तिसा खमसेन मया व अलफ

छ १३ रविलावल[1]–खासुदगी

धर्मादाय वेदमूर्ती राजश्री विश्वनाथ भट वोक यास मौजे अंतगाव ता। सोनाळे प्रांत भिवंडी येथील जमीन बिघे ८= देविली असे तर साल मजकुरापासून सदरहू जमिनीचा आकार होईल तो वेदमूर्तींचे नावे साल दरसाल खर्च लिहीत जाणे म्हणोन चिरंजीव राजश्री बालाजी बाजीराव यास पत्र १

ல ல

पे. द. द. कोकण रुमाल ६५५ ] [ **लेखांक १४८ अ**

छ१ माहे साबान सु।। तिसैन मया व अलफ[2] दफाते पत्रे

---

१. सन १७५९. पण चिरंजीव बाळाजी बाजीराव यास हे पत्र आहे. यावरून बाजीराव पंतप्रधानांचे ते पत्र आहे. म्हणजे सन १७४० पूर्वीचा हवा. तिसा खमसेन ऐवजी तिसा सलासिन म्ह. सन १७३९ धरावा. तो येतो दि. २०-६.१७३८.

२. दि. १६-४-१७९०

वे. पांडुरंगभट वोक वस्ती मौजे अंतगाव ता। सोनाळे प्रांत कल्याण भिवंडी यांचे तीर्थरूप बाळंभट वोक यास धर्मादाय व इतलाख दोन खंडी भात पावत होते त्यास ते मृत्यु पावले सबब त्यांचे नावे ( पांडुरंगभटाचें नावे )......... पेशजीप्रमाणे देत जाणे.

पे. द. कोकण जमाव रुमाल ५५० ] [ **लेखांक १४९**

महाल पोते खाजगत रोजखर्डा श्री गणपतराव बल्लाळ सुभेदार प्रां। कल्याण भिवंडी तेरीख १७ रोज मिती आषाढ व।। ४ मंदवासर[1] शके १७३८ ......... मु. कल्याण

..........................................................................

..........................................................................

साबान महिन्याचे रोजमुऱ्याबद्दल सन साबानचे द्यावयाचे ते.

४० ता। सोनाळे निसबत त्रिंबक मोरेश्वर म।।रनिल्हे याजकडे ता। म।।र येथील सालमजकूरचा ऐवज येणे त्याच्या मुदती लाऊन दिल्या आहेत त्यापो। भाद्रपद अखेर मुदतीचे बद्दल देणे धर्मादाय ब्राह्मणास प्रांत कल्याणकडे ऐन जिन्नस भाताची नेमणूक आहे त्याचे किंमती ब।। सालमजकुरी द्यावयाचे ते

१५ पांडुरंगभट वोक याचे नावे नेमणूक आहे त्या पो। हल्ली म।।रनिल्हेचे पुत्र अप्पाभट यास

१५ विश्वनाथभट वोक याचे नावे नेमणूक आहे त्यापैकी म।।रनिल्हेचे नातू गंगाधरभट वोक यास

१० केशवभट वोक याचे नावे नेमणूक आहे त्यापैकी.

४०

सदरहूप्रमाणे वरात सजा कुरुंद ता। म।।र येथील सालमजकुरीऐवजी देविले ते.

..........................................................................

४० खरेदीखर्चबद्दल देणे धर्मादाय ब्राह्मणास सालाबाद प्रांत कल्याणाकडे येन जिन्नस भाताची नेमणूक आहे त्याचे किंमतीबद्दल सालमजकुरी द्यावयाचे ते ब।। यादी मखलासीची.... रुपये

१० केशवभट बिन निळकंठभट नेमणूक भात खंडी १ पो।

१५ पांडुरंगभट बिन बालंभट वोक नेमणूक भात खंडी २ पो। हल्ली म।।रनिल्हेचे पुत्र अप्पाभट वोक व।। अनगाव यास

१५ विश्वनाथभट बिन बालंभट वोक यांचे नावे भात खंडी २ नेमणूक आहे त्याप्रो। हल्ली म।।रनिल्हेचे नातू गंगाधरभट वोक व।। अनगाव यास

४०

---

१. दि. १३-७-१८१६

सदरहूप्रमाणे ऐवज तो॥ सोनाळे येथील सालमजकूरचा ऐवज येणे त्यापैकी भाद्रपदअखेर मुदतीचे ऐवजी देविला ते ब॥ वरात कासीपंत वोक सन १८१६ चे खर्चात अंदगावच्या श्री वीरेश्वर देवस्थानास श्रावण मासाचे अभिषेकानिमित्त द्यावयाचे ते अभिषेककर्ते केशव जोसी कोळथरेकर यास

६ नक्त नेमणूक

५ ब्राह्मणास दक्षणा

·।।।· देवास पूजेस साहित्याबद्दल

·।· तुरीची डाळ नैवेद्यास कैली ८४१

६

[ १।।· ।।। ऐन जिनसी नेमणूक त्याब ॥

१८=। भात तूप।=।]

( याचप्रमाणे कल्याणच्या शंकरास व हनुमानास-सुंदरभट पाटे यास )

४७८– खर्च देवस्थान हुजूरविल्हे श्री वीरेश्वर संस्थान मौजे अंदगाव–सालाबाद नैवेद्याची नंदादीपाची नेमणूक आहे त्याप्रो॥ सालम॥रचे द्यावयाचे ते परभारे ता॥ सोनाळे येथील साल मजकूरपैकी जमा धरून खर्च चिंचवड छापी

१७८– भातसर–नैवेद्यास दरमहा तांदुळ सडीक कैली ८।।।१ प्रो॥ बारमाही— दरखंडीस रु. १३॥ प्रमाणे

३० नंदादीपास तेल दरमाहा वजन पके ८।५ प्रो॥ बारमाही वजन येकूण पके ८४॥ यास ८८६ प्रो॥

४७८–

सदरहू रुपये भाद्रपद अखेर मुदती ऐवजी द्यावे म्हणोन वरात तसलमात केशव पांडुरंग वोक.

य. न. केळकर खाजगी संग्रह मुरुडकर जोसी कुळगाव ] [ **लेखांक १५०**

वासुदेव जोशी मृत्यु पावल्यावर त्याचे नावची खाती वाटली गेली त्यापैकी जयराम जोशीचे खात्यापैकी—

६. शके १६९६ ज्ययनाम संवत्सरे[1] आश्वीन व॥ १ रिणको नाम मलाजी शेलार बि॥ कान्होजी शेलार व॥ मौजे डोंगरस्ते प्रांत पाऊलबेकर व्याज दर सदे सवाई प्र॥ बी॥ रघुनाथ चिमणाजी ओक मु॥ अंदगाव

१. दि. २०-१०-१७७४

पे. द. सं. नि. का. रु. ३
पु. ५ पत्र १४८१३

[लेखांक १५१

श्री

सेवेसी महादाजी अनंत सां नमस्कार विज्ञापना ता.........पावेतो स्वामीचे कृपावलोके करून शेवकाचे व फौजेचे वर्तमान यथास्थित असे विशेष येसाजी हरी वोक कट्टीचे लढाईत सरकार कामास आले ते स्वामीस पेशजीच विनंतीपत्र लिहिले आहे. त्यांचे बंधू रा. गणेश हरी हाली स्वारीत आहेत चाकरीचे उपयोगी आहेत पागेचा सरंजाम दीडशे पावणे दोनशे घोडे आहे पागेची निघा येसाजी हरी वोक व गोविंद हरी करमरकर पागेचे फडनीस याणी चांगली करून कारखाना चांगलाच राखला परंतु काल-वेल आली तेव्हा अशी गोष्ट जाहली येसाजी हरी यास सहा महिन्याचा पुत्र आहे तेव्हा भाऊ थोर चाकरीचे उपयोगी आहेत त्यांचे नावे पागेची सरदारी चालवून वस्त्रे घ्याव-याची आज्ञा जाहलीयास देईन. पागेत माणसे सरनौबत वगैरे फार चांगली आहेत याज-करिता विनंती लिहिली आहे ही मान्य होऊन उत्तर यावयाची आज्ञा जाहली पाहिजे पुढे दुसरे येथे आहेत याजपासून सेवकास चाकरी घेतली पाहिजे सेवकाने फार विनंती ल्याहावी ऐसे नाही उत्तर द्यावयाची आज्ञा जाहली पाहिजे सेवेशी श्रुत होय हे विज्ञापना

[लेखांक १५२

श्री

अखंडित लक्ष्मी अलंकृत रा. रा. भास्कर लक्ष्मण लागदार पो साकसे गोसावी यास सेवक बाजीराव रघुनाथ प्रधान नमस्कार सु॥ मयातेन व अलफ[1] गणेश हरी ओक पागा यांचे बंधू येसाजी हरी यास पागा व चिमणाजी हरी करमरकर फडणीस पागा मजकूर यांचे बंधू गोविंद हरी यास पागेकडील फडनिशी पेशजी होती त्यास उभयता सन अर्बा तिसैनात कित्तूरचे लढाईत सरकार कामास आले सबब त्यांचे कुटुंबाचे बेग-मीस नूतन इनाम जमीन आकार. रु.

३०० गणेश हरी यास
१५० चिमणाजी हरी यास
४५०

येकूण च्यारशे पन्नास रुपये आकाराची जमीन उभयतास साल मजकुरापासून द्यावयाचा करार करून हे सनद तुम्हास सादर केली असे तरी पो मजकूर येथे याचे

१. दि. ११–९–१७९९

सोईचे गावी सदरहू आकाराची जमीन नेमून देऊन आकार याचे नावे पो॥ मजकूरचे हिशेबी इनाम रु. लिहीत जाणे आणि जमिनीची चतुःसीमेची मोजणी जाबता लिहून हुजूर पाठवून देणे त्या प्रो॥ भोगवटीयास इनामपत्रे करून दिल्ही जातील जाणिजे छ १० र॥कर[1] आज्ञाप्रमाण सिका लेखन सीमा

## [ लेखांक १५३

रा. ब. गो. स. सरदेसाई यानी पेशवे दप्तरातून निवडलेल्या कागदापैकी काही ऐतिहासिक कुटुंबे या खंडात कागद क्र. १८ दि. ६-५-१८२१ चे पुढील पत्र छापले आहे. पत्राचे शेवटी पत्रलेखकाची म्हणून हीच तारीख दिली आहे. पण पत्रातील मजकुरावरून ती १८५१ असावी. नेमणूक चालू ठेवण्याबद्दलचे ते पत्र पुढीलप्रमाणेः

मे. एज्यंट साहेब बहादुर जि. दक्षिण यादी नारो गणेश वोक रा. कसबे वरसई प्रांत साकसे जि. ठाणे शहर पुणे पेठ बुधवार घर ख॥ करणे याद देतो ऐसाजे. आमचे चुलते रात्रो हरी हे पूर्वी पेशवे सरकारचे दप्तरात कामावर होते. मर्द माणूस हुशार पाहून पागा पतकांची सरदारी दिली. व ते वारले त्यांचे कनिष्ठ बंधू येसाजी हरी यांचे नावे सरकारनी पागापतकाची सरदारी चालविली लहान मोठी कामे यथाशक्त्या घडली नंतरचे कित्तूरचे लढाईत खासे येसाजी हरी व फडनीस गोविंद हरी करमरकर सरकार कामास आले. उमयेतासही पुत्र नाहीं यामुळे उमयेताचे बंधूंचे नावे इनाम जमीन बिघे पंचेचाळीस साडे च्यारसे रुपये आकाराची करून दिल्ही ती रु॥

३०० जमीन बिघे ३० गणेश हरी वोक यांचे नावे
१४० जमीन बिघे १५ चिमणाजी हरी करमरकर याचे नावे
४५२

येणेप्रमाणे आकाराची नेमून दिल्ही ती आजपर्यंत चालत आहे आमचे चुलते येसाजी हरी लढाईत गुदरलेनंतर कनिष्ठ बंधू गणेश हरी म्हणजे आमचे तीर्थरूप यांचेकडे पागापतकांची सरदारी दिल्ही ती पेशवाईअखेर चालत होती. पागेकडे गाव पाचच्यार होते XXX हा गाव सहा हजारांचा लढाईअखेर चालत होता नंतर सरकारनी गाव घेऊन नेमणूक दर सालिना रु. १५०० पंधराशे सन १८२० सालापासून चालू केले ते सन १८४६ पावेतो जि. पुणे येथील खजिन्यातून मृगसालास एकवेळ पावत होते नंतर आमचे वडील गणेश हरी हे तारिख २ मे सन १८४७ साली वारले त्यास पुत्र दोघे वडील हरी गणेश हे तीर्थरूप असतानाच अगोदरच दोन वर्षे वारले त्यास पुत्र येक त्याचे नाव विष्णु

---

१. ११-९-१७९९

हरी याचे वय सुमारे पंचवीस वर्षांचे आहे व आम्ही नारो गणेश दुसरे. आमचे वय सुमारे चालीस बेतालीस वर्षांचे आहे व आम्हासही पुत्र आहे याप्रो आम्ही व आमचे पुतणे विष्णु हरी यांचे मातोश्रीसुद्धा सर्वत्र येके ठिकाणीच आहोत वडील गणेश हरी वारले त्याचे पाठीमागे हयात तारखेपर्यंत आम्हास सरकारी ऐवज दिल्हा पुढे आमचे मुलाबाळांचे चालवणे सरकारकडेसच आहे आम्हास सरकारचे कदमाशिवाय आश्रय नाहीं सबब आज परियंत वडिलांचे सरकारनीं चालविले त्याप्रोाच चालवून प्रतिपाल करणार सरकार समर्थ आहेत व आम्हास येक पुत्र त्याचे नाव धोंडो नारायण याचे वय सुमारी बारा तेरा वर्षांचे आहे. ऐसियास आमचे पुतणे विष्णु हरी व आम्ही सर्व येके ठिकाणीच आहोत. यास्तव पूर्वीप्रमाणे नेमणूक आमचे नावे सरकारनी चालविलीं असता आम्ही आपसातील हिशांचा बोभाटा सरकारकडेस येऊ देणार नाही. ही यादी लिहून दिल्ही सही ता. ६ मे १८२१ इ. सही नारो गणेश वोक यांचे तर्फे कारकून नारो चिमणाजी करमरकर.

From Agent's file list No. 9 ] [ लेखांक १५४

No. 3638 of 1847 Political Dept.

From : A. Malet, Chief Secretary to Govt. of Bombay
To : Collector of Poona. Dated 25th September 1847

Sir,

I am directed by The Governor in Council to acknowledge the receipt of your letter dated 11th inst No. 1971 reporting the death of Ganesh Hurry Oak No. 26 of The Poona Pension list who was in receipt of an amount of Rupees Fifteen Hundred per annum and to inform that his pension having been a life grant, should be resumed from the day following the death of the deceased.

Bombay Castle }
25th Sept. 1847 }

I have the honour
× ×
Chief Sec.

From agents file list No. 9 ] [ **लेखांक १५५**

A report :- The Village of Amergole ( Belgaum Carnatic ) was given in 1792 to Visajee Hurree Oke for Paga expenses.

Gist of another report : Mr. Elphinstone included the name of Ganesh Hari in the list of Jageers under the head, " Paga Chiefs " because... received his Jageer from Bajirao, his brother had it from Madhaorao the younger with several other villages... His village was zupted by More Dixit some months before the war... to receive Rs. 1500/- pecuniary pension for life.

Report by the Asst. Inam Commissioner by his letter No. 1934 dated 16th April 1853 :- The Statement submitted to the Govt. by the Ag. Agent on 15th Sept. last proposes to grant arrears of Rs. 3652-11-1 and an annual pension of Rs. 750/- during the life of Vishnoo Harree the grandson of Ganesh Hari Oke.

पे. द. द. कीं. रु. ६५३ ] [ **लेखांक १५६**

राजमंडल ( सन १७७७ )

छ १० माहे रजब समा सबैन मया व अलफ ( समा ऐवजी सबा असावे ) केसो महादेव पागा याजकडे बद्दल मुशाहिरा मौजे वावडल ताा वनखल प्रांत कल्याण हा गाव सालगुदस्त करार करून ... ... सनद सादर जाहाली त्यास तोतयाचा दंगा जाहला पुढे गाव लुटला गेला सबब ... साल मजकुरापासोन गाव याचे नावे बद्दल मुशाहिरा करून दिल्हा. याचा आकार रु. ८५९ पौ वजा ..... ...

[ **लेखांक १५७**

राजमंडळ

स्वारी छ २६ सफर समान सबैन मया व अलफ[१] दफाते पत्रे

पागा दिंमत केसो महादेव याजकडे मौजे वावडल ताा वनखळ हा गाव बाा मुशाहिरा फड फर्मासी सुद्धा दिल्हा आहे .... त्यास तुम्ही किल्ल्याचे कारसाईचा तगादा न

१. दि. २६-३-१७७८

करणे ... ... फिरोन बोभाट येऊ न देणे म्हणोन रवा सावंत भोसले व .... .... याचे नावे चिटणिसी पत्र १

पे. द. घ. ५२२ ] [ **लेखांक १५८**

यादी गंगाधर बापूजी वोक याजकडे सुमा सलास सबैन मया व अलफ[1]

६० ता॥ वनखळ ता॥ नेरळ येथील द×क मा॥निल्हेचे नावे चाकरीस शिवाजी गंगाधर

३०० मौजे वांवडल...तालुके नेरळ पो॥ सेत सनद

७०० वामनराव गोविंद याचे पथकाची फडणीसी मा। निल्हेचे नावे

१०६०

३३१ सेत सनद मौजे पाडली समंत कोरेगाव प्रां। वाई पो॥ मा॥निलेस जमीन बिघे १० यो॥ आकार गमकेली ·।॥· १॥ १॥ दर खंडीस रु. ४० प्रो॥

तात्यासाहेब सांगलीकर दिनचर्या ]
श्री. य. न. केळकर यांचे कृपेने ] [ **लेखांक १५८ अ**

३१-१२-१८५४

फडणीस यांची प्रकृती अतिशय बिघडली आहे परिणाम आपला नीट नाही असे मनात आणून चौघांचे विचारे शांतमख करावा असा विचार करून दानधर्म व व्यवस्था घरची वगैरे करून याद केली आहे. त्यात तपशील

१ दानधर्म केला तो व देहनगी दिल्ही ते

१ यात गोप्रदान पाच रुपये प्रो॥ उदक सोडून शंभर असामी ब्राह्मणास स्वहस्ते दिले

१ दोन गोप्रदाने प्रत्यक्ष घरच्या गाई व म्हसी दक्षणा येकंदर विषय पन्नास प्रो। दिले

१ सुखशय्या विषय दोनशे पर्यंत दिला

१ ब्राह्मणास घर बांधणेबद्दल दोनशे रुपये व दाहा पात्रांची भांडी भिकंभट मराठे यास दिल्हे

१. सन १७७२–१७७३.

१ तांब्याची घागर व रुप्याच्या पाच वाट्या व रुप्याचे ताट असे दक्षिणासहित व रुप्याचे तबक चौफुला देवपूजा इत्यादी सर्व स्वहस्ते दिले

१ श्री गोपाळकृष्णाचे संस्थानाबद्दल नेमणुकी खर्च आहेच त्याची व्यवस्था पूर्वीच जाहली आहे परंतु आणखी चार हजार रुपये सावकारीत ठेवून त्याचे व्याजात कारण लागेल तसा खर्च बाळंभट तोरो यानी करावा.

१ गोविंदपंत पालेकर–३०० व जनोबा रानडे–२०० गोविंदपंत घारपुरे १५० इत्यादी घरची मंडळी यास सदरहूप्रमाणे रोख दिले गडी माणसास दाहा पंधरा पाच असे रोख दिले. यमाजी गडी यास शंभर दिले

१ घरजिनगानींचा ... .... ... ... वसूल जनोबा रानडे यानी करून सर्व घरची व्यवस्था आपले पत्नीचे अनुमते करावी

१ आपले पोटी दोघी कन्या आहेत त्यास एक हजार प्रो॥ रोख दिल्हे

१ आपले पोटी पुत्रसंतान नाही सबब श्रीमंत रा. यजमान तात्यासो॥ यास विनंती करून मर्जी देणेची असल्यास आपली कन्या विठाबाई गोळे यांचा पुत्र लहानपणापासून जवळ बाळगिला सात वर्षाचा आहे त्यास द्यावा. सापत्न चुलते बाबा फडनीस ओक आहेत त्याजविसी आपले अंतःकरण चित्त शुद्ध नसलेबद्दल त्याचे येथील मूल घेणे नाहीं येविसी जसी मर्जी असेल तसी आज्ञा व्हावी म्हणोन याद करून खाशाकडे पाठविली आहे वगैरे सर्व व्यवस्था आपले हाते लिहून येवून ठेविली आहे नहून मुलगा मूल घेणे नाही. पाठीमागे जसी मर्जी असेल तसे होईल. पत्नीने महायात्रेस जावे असे लिहून यादीत दिल्हे.

दि. २ जानेवारी १८६०

१ फडणीस याणी व्यवस्थेचा कागद करून यजमान याजकडे पाठविला आहे त्याचा विचार होत आहे. परंतु त्यांचे चुलते बाबा फडणीस ओक याणीही यजमानास विनंती केली कीं आम्ही सख्खे जवळचे असोन आमचा मुलगा न घेता कन्येचा पुत्र घेणे नीट नव्हे म्हणोन वगैरे केली आहे. परंतु खाशानी बाईसाहेब व भाऊसाहेब व पदरच्याचे विचारे असे ठरविले की येविसी शास्त्रार्थ मिरजेहून वगैरे शास्त्री जमवून लिहून आणवावा. असे होऊन लिहून आणविले त्यात कन्येचा पुत्र न घ्यावा असे काही लावले नाही व बाबा फडणीस याविसी अंतःकरण नीट नाही व फडणीस याचा हेतू पुत्र घेणे तो नातवासच घ्यावा, त्याजवरून विचार केला की फडणीस हे दौलतीपासून बेहड्याचे तैनातदार व दरकदार व योग्यता मोठी त्यास समय प्राप्त जाहला त्याचा हेतू पूर्ण व्हावा हेच चांगले म्हणोन आज तिसरे प्रहरी खासा व भाऊसाहेब व बाईसाहेब व पदरचे सर्व लोक व शास्त्री पंडीत याचे विचारे नातवास मांडीवर बसवून मुखात साखर घालून त्यास वस्त्रे खाशानी दिली. मुलाने मानाची सनगे खाशास भाऊ-साहेबास व बाईसाहेबास दिली. विडे दिले. नंतर ब्राह्मणमंडळीनी फडणीसा-

कडून संकल्प करून दत्तविधानपूर्वक पुत्र घेतला. सवीस साखरविडे होऊन मग सर्व मंडळी परत आली. यजमान यानी फडनीस याचा हेतू पूर्ण केला.

दि. ३ जानेवारी १८६०

फडणीस याचा हेतू होता त्याप्रमाणे काल यजमानानी पुत्र दिल्हा व संन्यास घेणेची परवानगीही घेतली होती व पत्नीचीही परवानगी घेतली आहे त्याप्रो। आज पहाटेस प्रहर रात्रीस उपदेशपूर्वक आतुरसंन्यास घेतला. आज दिवस उजाडलेवर प्रहर दिवसास घरातून मेण्यात बसऊन वाजतगाजत त्यांचे हेतूप्रमाणे श्री गोपाळकृष्णाचे देवालयात मंडपात आणून स्वामीस ठेविले आहेत. अन्न घेत नाहीत. फक्त उदक मात्र केव्हातरी घेतात.

१ आज बापू लागू मामलेदार मिरजमहाली गावगन्ना पहाणीचे निमित्ताने पाहण्यास गेले होते त्यास पत्र येण्याविसीं गेल्यावरून आज अस्तमानीं आले. श्री स्वामीस वंदन करून दोन घटका बसोन आले. आता विनाकारण कोणाशीं भाषण नाही. ईश्वरी लक्ष लागले आहे. सर्वत्र मंडळी इष्टमित्र येऊन पाहून जात आहेत. मोठीं कीर्तीची गोष्ट जाहली आहे.

दि. ४ जानेवारी १८६०

फडणीस स्वामी मुखाने कृष्णाय वासुदेवाय म्हणत असता सायंकाळीं दोन घटका दिवसास आज एकादशी पुण्य दिवस त्या समयास समाधिस्त जाहले. सर्वांचे विचारे श्रीचे देवालयात उत्तरेचे बाजूस फळझाडे आहेत तेथे भूमी समाध करावी असे ठरून त्याठिकाणी यथाविधी समाध दिली.

श्रीमंत बाईसाहेब फडणीस स्वामीचे पत्नीचे समाचारास जाऊन आल्या. सांत्वन केले त्यानी कीर्तीचा प्रकार केला. श्रीचे देवालय व धर्मशाळा व अन्यत्र ठिकाणी दोन तीन धर्मशाळा वगैरे पुण्यकृत्ये त्यानी केली

दि. २८ मे १८६०

गंगाधरपंत आबा ओक फडणीस यास बळवंतरावजी फडणीस यानीं आपले मांडीवर दत्त घेतला होता. आज दत्तविधान विधीपुरस्कर झाले कारण शु॥ १२ त्या मुलाची मुंज करणार आहेत सबब विधान आज केले. गोपिनाथदादा वगैरे विद्वान मंडळी आली होती.

दि. ३१ मे १८६०

गंगाधरपंत आबा फडणीस याची मुंज आज झाली गोपिनाथदादा वगैरे शास्त्री मंडळी आली होती.

दि. २० डिसेंबर १८६०

साल मजकुरीं नव्या गावात पेठ व ब्राह्मण आळी अशी एकंदर रस्त्यास सडका घरवाल्याकडून आपआपल्या हद्दीप्रमाणे ताकीद सरकारातून करवून गटारेसुद्धा

बांधविल्या. हे काम चिंतामण नारायण परभू फौजदार यास सांगितले होते भाद्रपद मासापासून ... ... अजून काम चालले आहे.

दि. २२ जानेवारी १८६१

ब्रह्मीभूत बळवंतराव फडणीस यांचे वर्षश्राद्ध आजचे आज जाहले.

पे. द. उ. कोकण १४७ ] [ **लेखांक १५९**

छ ९ शाबान भाद्रपद मास ( शके १६९८ )[1] मौजे वावडोळ ता। वनखळ तालुके मा।र हा गाव सालमजकुरापासोन केसो महादेव पागा याजकडे तैनातेत ब॥ मु॥ करार करून दिल्हे असे त्याचा आकार रु. ८५९ पो। वजा नेहेमी नेमणुकीचा ऐवज द्यावयाचा तो मा।रनिल्हे देतील ते

३०० गंगाधर बापूजी नि॥ पांडुरंगराव गोविंद
६० शेत सनदा सालाबाद प्रा।

खरेशास्त्री ऐ. ले. संग्रह पृ. २८९८ ] [ **लेखांक १६०**

श्री

माघ व॥ शके १६९८ मार्च पंधरवडा सन १७७७ इ.

यादी लष्कर पायमल्ली खर्च मौजे व कर्यात ढालगाव सुरु सन सब्बा सब्बैन

| | |
|---|---|
| कि॥ मसाला व रोखे | १२ पागेस चंदी |
| २०० बामोजी व रोखा | १०।= ......... |
| १० जाजती खेडेस म्हणून घेतले | १२॥= ......... |
| | २०॥ .......... |
| | २॥=। |
| १०० मसाल्याचा ऐवज......(इ.) | २८=॥ केसोपंत यासी भोजनखर्च |
| १२ मसाल्याचे राऊत ५ असामी | ·।= गहू कैली ८८१॥ दळणावळसुद्धा |
| | ·॥· तांदूळ ८८१ |
| ३७ अंतस्थ खुद्द केसोबा ओक | ·॥· सुपारी पक्के ८८१। |
| | ८–॥ डाळ तुरीची ८८॥ |

१. दि. २३-९-१७७६

५ ओलास्वाध्याय त्याब॥ मोरोपंत यास ·।।· पाने सुमारी १०००

८☰ सोले वजन पक्के ८८३।

४॥– किरकोळ खर्च दाणे गहू पाने वगैरे

खरेशास्त्री ऐ. ले. सं. पृ. २४३० ] [ लेखांक १६१

२६ नवंबर १७७५ इ० शके १६९७

जिवाजी रामचंद्र याचे गंगाधररावास ( पटवर्धन ) पत्र मार्गशीर्ष शु॥ ४ रविवारचे धुळयाहून.

" श्रीमंत राजश्री दादासाहेब सोनगडच्या अलिकडे ......... आल्याची बातमी आहे.........महमद इसफ गाडदी यास राजश्री केसोपंत ओक आणावयास नागपुरास ( मुधोजी भोसले याजकडे ) गेले होते ते त्यास घेऊन ( धुळयास ) आले. सवेच दुसरे दिवशी पाच पाट काढून डोईवर शेंदूर तेल घालून उंटावर बसवोन शेणमार करून तोफेच्या तोंडी देऊन उडविला........"

( पुरंदरच्या पायथ्याजवळ नेऊन मारावयाचा बेत होता. पृ. ६४३६ ऐ. ले. सं. तेथे पटवर्धन होते. )

श्री. य. न. केळकर संग्रह
१ मंडळ पांडोबा दप्तर ] [ लेखांक १६२

२ सातारचे राजदप्तरदार दाजीबा जोशी ]

कंपनी सरकारातून पेन्शन पावते त्या आसाम्यांचा सूड इसने अशरीन मयातेन व अलफ ( त्यापैकी ओक मंडळी )

द. सा. ८३५ जगन्नाथ केशव ओक द. म. रु. ६९।६६

,, ,, २४०० बापूजी रघुनाथ ओक द. म. रु. २००

,, ,, १५०० गणेश हरी ओक द. म. रु. १२५

---

टीप : ओलास्वाध्याय = गावकरी ओलीस म्हणून लष्करच्या लोकांच्या स्वाधीन केले त्यांच्या पोटास

ढालगाव–मिरज तालुक्यात ईशान्य कोपऱ्यात आहे.

,, ,, २४०० रामचंद्र खंडेराव ओक द. म. रु. २००
,, ,, ३०० दाजी दीक्षित ओक द. म. रु. २५

पे. द. Agents's file No. 9 ] [ लेखांक १६२ अ

The Collector of Poona by his letter No. 581 of 3rd Nov. 1830 calls for information from the Agent in charge of the Poona Deckhun relative to the pension granted to Jugannath Casso.

इ. सं. मं. अहवाल शके १८३८ पृ. ७६
सरदार लोकांची यादी- गो. वि. आपटे ] [ लेखांक १६३

तिसऱ्या प्रतीचे सरदार— ( त्यापैकी ओक मंडळी )

| | |
|---|---|
| दाजी दीक्षित ओक | हरीपंत ओक |
| गणेश हरी ओक | गणेश रामचंद्र ओक |
| दिनकरराव ओक | लक्ष्मीबाई ओक |
| मोरो चिंतामण ओंकार | |

तीर्थोपाध्यायांकडील उतारे. ] [ लेखांक १६३ अ

१ राधा भ्र० नारो सासरे परश्राम बाबा अ. सा. केशव दीर केशवचे बळवंत, बाबजी व विसाजी हे इटगी येथे पुत्र माधव व विनायक नातू विष्णु महादेव व केशव चु. पुतणे दिनकर हे शिर्टी येथे सासू उमा—पुणे सोटया म्हसोबानजीक–इटग प्रांत बेळगाव शहापूर.

२ राधा भ्र. नारो परश्राम चु. सा. त्र्यंबक व जगन्नाथ मिरज येथे पुत्र विनायक व महादेव नातू विष्णु व केशव सा. उमा—पुणे सदाशिव, इंदोर, मिरज, बागबुरोंडी.

३ सौ. सरस्वती भ्र. विनायक बळवंत दीर महादेव ऊर्फ अप्पाचे, विष्णु व केशव–पुणे सदाशिव बागबुरोंडी.

४ गोपिका भ्र० केशव ऊर्फ भाऊराव सासरे विश्वनाथ केशव पुत्र गुरुनाथ व वसंत सासू उमा–इडग ह० पुणे सदाशिव पेठ देशमूखवाडी नरसिंहासमोर

पे. द. दक्षिण को. जमाव रु. ६५५ ] [ **लेखांक १६४**

राजमंडळ

स्वारी राजश्री पंतप्रधान छ २९ माहे जमादिलाखर सुमा तीसा मयातेन व अलफ. प्रांत राजपुरी येथील मामलत नारो गोविंद याजकडील दूर करून सालम॥रीं परशराम केशव याजकडे सांगितली येविसी.

भा. इ. सं मं. ऐतिहासिक संकीर्ण साहित्य खंड ३ ] [ **लेखांक १६५**

तळे प्रांत राजपुरी येथील सुभेदार झाले ते सावंजी कुमाजी देशमुख मामले तळे यांचे बखरीवरून. सदरहु मुलुख मराठयांकडे आल्यावर इ. स. १७३३ पासून सुभेदार नेमण्यात आले त्यांचे सुभ्याखाली माहाल येणेप्रमाणे

१ मामले तळे
१ प्रा॥ घोसाळे
१ तो॥ निजामपूर
१ तो॥ गोरेगाव
॰॥॰ तो॥ गोवेले.

४॥

सदरहु मामलतीच्या अमलाखाली चार किल्ले नेहेमी आहेत येणेप्रमाणे

१ किले तळागड
१ किले मानगड
१ किले घोसाळगड
१ किले विश्रामगड

येकूण साडेचार महाल सुभ्याखाली अमलात आहेत त्यास सुभेदार जाले येणे प्रो। आसामी

( स. १७३३ पासूनच्या मामलेदार ( सुभेदार ) कारकीर्दीचे वर्णनानंतर )

परशराम केशव ओक वास्तव्य पुणे याणी मामलतीवर चढ बोलाने पंचावन्न हजार रुपये सरकारात द्यावयाचा करार केला. सबब आवटी म॥रनिल्हेकडोन मामलत दूर करून सन तिसा[१] मयातैन व अलफ अवल सालप॥ श्रीमंत राजश्री बाबासाहेब यांही ओक म॥रनिल्हेकडे मामलत सांगितली. उपरांत ओक याही तर्फेने दुसऱ्यास मक्त्याने मामलत देऊन तळयास सुभ्यावर रवाना केले येणेप्रमाणे

१ विसाजी लक्ष्मण बाबा केळकर वास्तव्य आंबोली तो॥ सुवर्णदुर्ग यास पाठविले ते सन तिसात[२] आश्वीन मासी तळयास आले त्याजकडोन प्रथम भाद्रपद मासी मोरोपंत जोग कारकून सरकारच्या सनदा घेऊन आले होते व ओकांचीही सनद जमीदारास आणिली.

---

१. सन १८०८ २. सन १८०८ सप्टें–अक्टो.

१ गंगाधर त्र्यंबक तात्याभट वास्तव्य पुणे याणी छ ११ साबान[१] सन अशरची सनद ओक यांची जमीदारास घेऊन आपले तर्फेचे कारकून रामचंद्र जनार्दन आठवले व श्रीधरपंत मोघे दोघे जण तळयास पाठविले ते छ १६ साबान[२] भाद्रपद व॥ ४ सौम्यवासरी सायंकाळी दाखल जाले उपरांत आश्विनमासी सन म॥रीच तात्या भटही खुद आले.

१ पुन्हा विसाजी लक्ष्मण बाबा केळकर याहीच मामलत करून ओक यांची सनद छ ४ सवाल[३] सन आशरची घेऊन रवाना केली ती छ २० जिल्काद[४] सन मा॥र मार्गशीर्ष व॥ ७ तळयास मोरोपंत घेऊन आले. पुढे माहे म॥रीच बाबाही आले. भटाकडे मामलत जाली होती परंतु घोसाळगड व मानगड दोन किले केळकर याजकडे होतेच. हाली सालीम मामलत फिरोन केली ती छ ७ सवाल[५] कार्तीक शु॥ ९ सन इहिदे अशरपर्यंत म॥रनिल्हेकडे चालली उपरांत मराठे याजकडे जाली. केळकर यानी महाडची मामलत केली तिकडे निघोन गेले.

परशराम केशव यांचे मामलतीत इ॥ भाद्रपद[६]मास सन तिसा तागायत कार्तिक मास सन इहिदे[६] पावेतो सदरहु' लिहिल्याप्रमाणे तीन कारकीर्दी जाल्या याची मुदत २८२८७ दोन वर्षे दोन महिने सात रोज.

आपल्यास[७] हुजूरची सनद व ओक मामलेदार पुण्यास आहेत त्यांची सनद ऐशा दोन सनदा आल्या होत्या त्या...इ.

१ गंगाधर बाळकृष्ण मराठे हाली वास्तव्य पुणे याही ओक म॥रनिल्हे यावर सव्वीस हजार रुपये चढ कबूल केला. तेव्हा येक्याऐंशी हजार बेरीज जाली याशिवाय आंबे व फणस यांचे लावणी बाबद वर्गणी वगैरे खर्च मिळून एकंदर सरकारची बेरीज लाख रुपयेपर्यंत द्यावयाचा करार केला. यामुळे व बाबासाहेबांची कृपाही[८] फार आहे यावरून मामलत सांगितली...इ.

...पुढे इंग्रजांचे सरदार येऊन मुलुक काबीज केला. किले घेतले तळागड व घोसाळगड चैत्र शु॥ द्वादशी मंदवारी शके १७४० बहुधान्य नाम संवत्सरे सन समान आशर मयातैन व अलफ इंग्रज बाहादुर यांचे निशाण चढले....

( या एकूण कारकीर्दी सन १७३३ ते सन १८१८ ह्या ८५ वर्षातील आहेत. )

---

१. सप्टं २२ स. १८०९ २. सप्टं. २७ स. १८०९

३. नोव्हें. १३ स. १८०९ ४. २९ डिसें. स. १८०९

५. नोव्हें. ५ स. १८१०. ६. सप्टें. स. १८०८ ते नोव्हें. स. १८१० पर्यंत.

७. बखर लेखक सावंजी कुमाजी देशमुख मामले तळे यास—

८. गंगाधर बाळकृष्ण याना बाजीरावानी आपली मेहुणी, रास्ते यांची कन्या, दिली. बाजीरावाचे साडू झाले ( मराठे कुलवृत्तांत पृ. १४९)

पे. द. को. जमाव रुमाल ४३२ ] श्री [ **लेखांक १६६**

यादी प्रांत राजपुरी येथील मामलत परशराम केशव याजकडे सरकारातोन आहे. त्यानी आपले तर्फेनें मामलतीचे कामकाज सालमजकुरी गंगाधर त्रिंबक भट यास सांगितले होते त्यास रयतेचे गिले पडल्यामुळे त्याचे व याचे न जमे सबब भट याजकडून कामकाज दूर केले याविसी फडशाची सु ।। अशर मयातैन व अलफ. कलमे : साडेत्र्यासी हजार रुपयाची निशा साल मा।री भट यानी वोक यास दिल्ही त्याप्रो। भट यानी भरणा केला. रु.......... हमीखर्च..........

ꣳ ꣳ

सं. साहित्य खंड ३ भा. इ. सं. मंडळ त्रैमासिक पौष १८६० ] [ **लेखांक १६७**

इ. स. १८१० जून २१ ते दिवशी रा. विसाजीपंत केळकर कारभारी नि।। परशराम केशव सुभेदार याही ताकीद केली कि दुदांडी शिवराअी खुर्दा कोणी घेऊ नये जुना शिवराअी बारिक खुर्दा द्यावा घ्यावा ....... अष्टमीपासून उत्तरेस दुदांडी खुर्दा चालत आहे.

ꣳ ꣳ

पे. द. को. जमाव रुमाल ६५५ ] [ **लेखांक १६८**

राजमंडळ

स्वारी छ २९ माहे जमादिलावल अिहिदे अशर मयातैन व अलफ (सन १८११) प्रांत राजपुरी मामलत परशराम केशव याजकडे होती ते दूर करून गंगाधर बाळकृष्ण याजकडे

ꣳ ꣳ

पे. द. द. कों. रु. ४२५ ] [ **लेखांक १६९**

ताळेबंद ऐन नक्त बा। मु।। हशम सुभा प्रांत राजपुरी नि।। परशराम केशव सु।। सन तीसा मयातैन व अलफ इस्तकबिल छ १० रा।।खर रविलाखर[1] आवलसाल तागाईत छ२० साल मजकूरचे आकारास

---

१. सन १८०८-१८०९.

२३१० परशराम केशव मामलेदार सालमजकुरी मामलत सांगितली बा। सनद छ २९ जमादिलाखर... छ२० रजब[1] वेतनाची नेमणूक व्हावी त्यास सालमजकुरचा अजमास झाला नाही सन इसने मयातैनचे[1] अजमासा समानी मामलेदार यात नेमणूक वेतनाची वगैरे आहे त्याप्रमाणे आदा जाहला तेः

| आसामी | ऐन | पोर्गे | भोई | मोईन | रोजमुरे | |
|---|---|---|---|---|---|---|
| १४ | १ | ३ | १० | १९८२ | २०८ | यो। आकार |

१९८२ मोईनाचा आकार खेरीज

  १२८२ खुद व पोर्गा येक एकूण तीन आसामीची मोईन सालिना

  ७०० पालखीचे भोई आ। १० येकूण मोईन

  ———

  १९८२

११० तैनात अकरमाही पागे आ। २ येकूण रु. ११ प्रमाणे रोजमुरे ११ येकूण खर्च शिरस्ता...

१८ तेल दिवटी बा। सालिना वजन पल्ले ८२। येकूण रु. ८८५ प्रमाणे नक्त नेमणूक

२०० पालखी व अत्फागिराचे सरजामास येक सालाआड पावतात त्यास साल मजकुरी मामलत सांगितली सबब

———

२३१०

ऐ. संकीर्ण साहित्य खं. ३ रायगडावरील सिंहासनाची व इतर व्यवथा. ले. शं. ना. वत्सजोशी पृ.१८१–१८२

## [ लेखांक १७०

हिशेब इमारत खर्च किले रायगड तो। मजकूर नि।। परशराम केशव सु।। इसने अशर मयातैन व अलफ[2]. राजवाडयाचे वासे व साट कुजोन् इमारत जाया जाली व हवलदाराचे घर कुजोन जाया जाहाले स।। नीट करावयास खर्च जाहला ते.... रु।

( तपशील आहे )

———

१००४।।=

---

१. दि. ७–११–१८०१ ते २७–११–१८०१

२. इ. स. १८११.

हिशोब कारसाई[1] किले रायगड ता। मजकूर नि।। परशराम केशव सु।। इसने आशर मयातैन व अलफ इ।। अवल साल ता।। अखेर साल जमा साल मा।र सुमारी सु।।

४६७८७ पेंढे
७१४८५ गवत
५६२५ पानभारे सायली
१४७१० चुडी
३१३६ वोंडे ( म्ह. ओंडे )
५२५ दोरगुंडे
१४२२६८

( पुढ तपसील आहे )

किले रायगड तो। मा।र
नि।। परशराम केशव.

झडती
सु।। अर्बा अशर[3]

खर्च तहवेल[2]

नगारखाना श्रीमंत कै. शिवाजी महाराज यांचे तख्ताजवळ ठेविला त्यास खर्च दरसाल रु।

........................

८०० नगारखाना
६२।। कुणबिणी
३२६।।।=।। इमारत खर्च
२०० ऐन
२ पोर्गे
१४१६५।।

रुजू मुशाहिरा
इत्यादी

१००० परशराम केशव किलेदार यास शागीर्दपेशा सुधा
इतर मोईन खर्च

..............................

पे. द. को. जमाव रु. ५४८ ]

[ **लेखांक १७१**

श्री

यादी तालुके रायगड निसबत परशराम केशव वोक सुमा अर्बा अशर मयातेन व अलफ[3]

---

१. कारसाई–गडावर गस्तवाल्याच्या चुडीसाठी लागणाऱ्या चुडी, पेंढा गवत इत्यादी रयतेकडून कर रूपाने जमा. २. कुणबिणी इत्यादीसंबंधी.

३. इ. स. १८१४.

तालुके मजकुरी सरकारी बेहड्याअन्वये वसूल यावयाचा तो वगैरे अजमास

४८५७।-।। सरकारी अजमासास अैन जिन्नस जमाबंदीचा आकार जमेस आहे त्याप्रमाणे मामलेदार यानी दस्ती भात जमिनी लागवड असता त्याचा दस्त बाद घालून सुटी दिल्हया व जमिनीस खराबे लावून कौल घेतले याजमुळे सरकारचे नुकसान जाले त्याचा आकार ज्या ज्या साली जसा कमी पडला त्या सालापासून वसूल येणे त्याचप्रमाणे साल मजकूरचा आकार गला केली कमीदस्त खंडी २७१ ।॥-॥.११ आकार ६७९६ ।॥-।॥ रुपये पैकी वजा सन अर्बा अशरात वसूल घेतला ते रु.। १,९३९॥=। बाकी येणे यादी नावनिसीवार अलाहिदा आहे.

६०९।॥≡ ता। ॱनाते येथील जमीदार याचे हक व इसाफत सरकारात बहुत दिवस जप्तीस जमेस असता त्याची मोकळीक सुभाहून सालगुदस्ता सन सलास अशर मयातैनात पांडुरंग लक्ष्मण केलकर याणी करुन जमीदार यासी पत्रे करुन दिल्ही व हक व अिसाफत त्याजकडे चालविली त्यास पेशजी प्रमाणे वसूल यावयाचा तो साल मजकूरचे वहिवाटी अन्वये रु. १००० .......वगैरे अन्य...

१००० तुमाजीराव दुदुसकर मौजे पार्ले ता। बिरवाडी याणी सुतक असता लग्ने केली त्याची चौकसी करून दुदुसकर याचे भाउबंदाच्या जबान्या घेतल्या पुढे सारौष करून गुन्हेगारी घ्यावयाची तो दुदुसकर देकन पुण्यास येउन वोकाकडून चौकसीची मनाई करविली त्यासंमंधे अजमासे

| किता | | कलमे |
|---|---|---|
| १ | ........ | ... |

रा. ब. वाड. दुसरा बाजीराव रोजनिशी ]

## [ लेखांक १७२

( १८१३-१४ ) सन अर्बा अशर मयातैनात खाशाकडील खाजगी अंतस्थाबद्दलचा ४०,००० तालुके रायगड नि॥ परशराम केशव याजकडे सालगुदस्ता सन सलास अशर मयातैनचा अैवज घ्यावयाचा करार केला. सालमजकुरी भरणा केला ते जमा. गु॥ परशराम आबाजी सोमण ७३२५ जेष्ट मास, १३६७५ आषाढ, ११,००० श्रावण व ८००० भाद्रपद एकूण रु. ४०,०००

पेशवे दप्तर ४१ मराठी राज्याचे अखेरचे दिवस पत्र ७८ ] [ **लेखांक १७३**

त्रिंबकजी डेंगळे यास आप्पाजी सातारकडील हकीगत लिहितो २०।१२।१८१४ संदुकी दालवाला याजपासोन नारायण सेठ यानी दीडसे रुपये घेतले होते त्याचे चौकसी-विसी रा. परशरामपंत वोक यास आज्ञा जाहाली. त्याणी चौकसी करून सेटे महाजन याचे साक्षीनिशी जबानी घेउन सेटजीस समजाविले त्यावरून......दालवाला यास किल्यावर घेउन गेले. ...जिमेदार याजपासून दीडसे रुपये घेतले हे वर्तमान श्रीमंत महाराज छत्रपति स्वामी यास कलले रागे भरले-सेटजीने ऐकिले नाही. आज्ञा आम्ही पुण्यास लिहू–तिलगुळाची पत्रे श्रीमंत बाबासाहेब यास जावयाची मसुदे तयार त्यात लिहिले आहे की दालवाल्याचा मजकूर परशरामपंत वोक समजून गेले आहेत ते सांगतील.

ಲ ಲ

पे. द. द. को. रुमाल ६५५ ] [ **लेखांक १७४**

राजमंडल

स्वारी... छ २ माहे जिल्काद सु॥ खमस अशर मयातैन व अलफ[1] दफाते पत्र–तालुके रायगड पो। किल्ले रायगड[2] हुजूर खासगीकडे येऊन बाकी तो। मजकुरीची मामलत महाल व किल्ले लिंगाणासुद्धा सन इहिदे अशर मयातैनात[3] परशराम केशव याजकडे सांगोन सनदा जाहाल्या पुढे किलेदारी ही सरकारचे आज्ञेने मशारनिल्हेकडे सांगितली त्यास हली तालुके मजकूरची मामलत किले रायगड व लिंगाणा व महाल सुद्धा परशराम केशव याजकडून दूर करून साल मजकुरी मकाजी जाधव याजकडे सांगितली.

ಲ ಲ

पे. द. द. को. रुमाल ६५५ ] [ **लेखांक १७५**

छ २७ जिल्हेज अर्बा अशर मयातैन व अलफ[4]

मौजे कुडे[5] ता। वाजे ता। नेरल येथील कमाविस बापूजी चिमणाजी कडील दूर करोन साल मजकुर परशराम केशव याजकडे सांगितली.

ಲ ಲ

---

१ दि. ६-१०–१८१५.

२ किले रायगडमध्ये कोट पाचाडचा अंतर्भाव आहे. तर्फ रायगडमध्ये किले लिंगाणा, किले रायगड व महाड ता॥ आहे. पे. द. ३१ ले. १५१ पहा.

३ सन १८११.

४ दि. २१-१२ १८१२. ५ मौजे कुडे तालुका माणगाव जि. कुलाबा

[ लेखांक १७६

छ ५ माहे सफर सुमा खमस अशर मयातैन व अलफ[१] मौजे कुडे ता। वाजे तालुके नेरळ येथील कमाविस परशराम केशव याजकडे होती ते दूर करून साल मजकुरी धोंडो विश्वनाथ याजकडे सांगितली.

Agent's file No. 9 ] [ लेखांक १७७

To

John Warden Esquire
Sessions Judge & Political agent
for the Sardars of the Deccan
Poona

The humble memorandum dated 24 th December 1843 of Balwantrao Parashram Oke inbabitant of Poona but at present resident of Sholapur, serving as a maratha Munshee to A. B. Warden Esquire, 3rd asst. Collector and Magistrate of Sholapur, most respectfully showeth ( regarding Govt. orders restoring saranjams ).... that he has good claims for establishing his rights of ownership of a saranjamee village ........ ready to show documents to establish his claims to the saranjam– etc.

In answer to the above memorandum the agent informed on 28-12-1843 ...... Enquiry is to ascertain the antiquity of the saranjams actually granted on the occupation of the British Government and to continue them on principals laid down ...... etc. etc.

भा. इति. सं. मंडळ त्रैमासिक वर्ष ४५
दिनचर्या श्रीमंत चिंतामणराव पटवर्धन ] [ लेखांक १७८

फाल्गुन व॥२ छ१६ रविलावल गुरुवार दि. ४-३-१८४७ मु. इतगे ता। शिरहट्टी तुंगभद्रातीर–

---

१. दि.१७-१-१८१५

स्वारी चार घटका दिवसास पांडरगडयाहून निघाली. इटग्यास प्रहर दिवसाचे सुमारे आली ती प्रथम केशवराव भाऊ ओक यांचे घरी गेली. तेथे मेजवानी झाली. केशवराव ओकांचे कुटुंब मोठे. घरात विहीर आहे परंतु पाणी ओढावे लागते सबब त्यास शागिर्दाची नेमणूक सिरटी महालाकडून करून दिली. रात्रौ इटग्याचे राम अवतारी याजकडून खेळ करविला. स्वारीचा मुक्काम. शिरगट्टयाहून इटगे कोस एक.

छ१७ रविलावल फाल्गुन व॥३ शुक्रवार संकष्टी चतुर्थी मु. बनिकोप तो। शिरटी. खासा स्वारी गावात ओक यांचे घरी गेली अप्पासोाचे भेटीस वे. रा. जगन्नाथ शास्त्री यांचे पुतणे आले होते. त्यास संभावना दिली. गावात माकडे धरणारा व सर्प धरणारा वाणी आहे त्याने काल एक सर्प ( धामण ) आणिली होती व एक माकड आणले होते त्यास घटकाभर खेळविले त्यास एक रुपया दिला रात्रौ खेळ रामअवतारी करविला. त्यास बिदागी दिली. स्वारी मुक्काम मजकुरी आली तेव्हा शिरस्त्याप्रमाणे वगैरे नजर दिली गावाचे कोष्टी वाणी वगैरे याणी गावगुंडाचा खेळ दोन घटका सुमारे खाशापुढे केला. स्वारीचा मुक्काम इटग्याहून बनिकोप कोस च्यार.

श्री. रंगनाथ हरिपंत ओक
रा. इटगे ता. शिरहट्टी, धारवाड यांचेकडून

**[ लेखांक १७९**

श्री

मौजे इटगे इलाखा रामदुर्ग. इनाम गावच्या इनाम पत्रकात जात इनाम संबंधी हुजूर काम नं. ९ नाव दाखल केशव त्रिंबक ओक यांचे नावे जमिन खर्च पडली सर्व्हे नं. ५३ एकर २१ गुंठे १४ आकार रुपये २७ उपभोगकर्ता जगन्नाथ केशव ओक कैफियत ऐसीजे.

१. जगन्नाथ केशव ओक जात ब्राह्मण वय ३९ धंदा लेखन गाव इटगे.

२. सदर जमीन माझे वडील केशव त्रिंबक ओक याना श्रीमंत चिंतामण अप्पासाहेब सांगलीकर यानी छ१५ माहे जमादिलावल सु. खंसन मय्यातैन व अलफ शके १७७२ म्हणजे सन १८५० इसवी मधे पुत्रपौत्रादी वंशपरंपरा चालविण्याच्या शर्तीने दिले आहे.

सदर इनाम देण्याचे कारण श्रीमंत कै. अप्पासाहेब यांच्या बहिणीची मुलगी आमच्या मातोश्री कुसाबाई या होत. श्रीमंत अप्पासाहेब स्वारी इटगेस आलेवेळी इनाम जमीन होन ८ आकाराची देऊन चक्कबंदी लिहून पाठविणेसाठी शिरहट्टी तालुके मामलेदार बाळकृष्ण केशव लागू यांना कळविल्याप्रमाणे चक्कबंदी नेमून दगड रोवून जमीन दिली ती आजपावेतो आहे. सदर जमीन संपादणारे आमचे वडील मयत होवून अदमासे १७ वर्षे जाहली. शके १७८६–८७ आश्विन व॥ २

आमच्या वडिलांच्या पोटी पाच मुलगे. वडील त्र्यंबकपंत ऊर्फ रावजी हयात आहेत. दुसरे बळवंतरावजी मयत असोन त्याच्यापोटी विष्णू, धोंडोपंत, पांडुरंगपंत, यशवंतराव असे आहेत. तिसरे वेंकटराव याना चुलते जगन्नाथ याना दत्तक दिले आहे. चवथे विश्वनाथपंत मयत यांचा मुलगा केशवराव सध्या बेळगाव येथे राहतात. पाचवा मी. माझ्या ताब्यात जमीन असलेने माझे नाव दाखल व्हावे तारीख १८ माहे जानेवारी १८८२.

सही : जगन्नाथ केशव ओक

माधव विष्णू स्टेट कारभारी रामदुर्ग.

—०—

इटगे गाव निजाम, विजयनगर, सांगली, रामदुर्ग, पुन्हा सांगली याचेकडे होते. पुढेदिलीन झाले. दिलेल्या जमिनीच्या हद्दीवर लावलेले दगड आजही आहेत. असे श्री. रंगनाथ हरीपंत ओक मु. इटगे हे २७–७–७४ चे पत्राने कळवितात.

पे. द. द. कोकण रुमाल ४२९ ] [ **लेखांक १८०**

श्री मसुदा—तालिक

वेदमूर्ती राजश्री बाबादेव भट व गोविंदभट सोमण नरवणकर स्वामीचे सेवेसी
विद्यार्थी केसो विश्वनाथ वोक मुकादम नरवण ता। गुहागर सा. नमस्कार वि. वि.
ठिकाण पांगारवणे आपण खात होतो त्यास गावकरी यांच्या सडी साक्षीने आपला दाखला न पुरे तुमचे वतनी खरे येसे पंचाचे ठरोन तुमचे हवाला जाहले त्याजवरून हे पत्र तुम्हास लिहून दिल्हे असे सदरहू ठिकाणास आम्हास अर्थाअर्थी संबंध नाहीं मिती शके १६९५ ज्ययनाम संवत्छरे श्रावण श्रु॥ ४ सु॥ खमस सबैन मया व अलफ[1] छ २ माहे जमादिलाकर[1]

—०—

१. श्रावण शु॥ ४ शके १६९५ विजयनाम संवत्सर सु॥ अर्बा सबैन छ ३ रविलाखर म्ह. इंग्रजी दि. २३–७–१७७३. व श्रावण शु॥ ४ शके १६९६ छ ३ जमादि लाखर खमस सबैन मया अलफ म्ह. इंग्रजी दि. ११ ऑगस्ट १७७४. याप्रमाणे पत्रातील मसलमानी सन व तिथी यांचा मेळ बसत नाही.

याच रुमालात एका वैद्याचे तंटा निवाडा कागदात साक्षीदारामध्य केसो विश्वनाथ ओक मुकादम उमर वर्षे २८ छ १० रमजान माघ मास सन सबा सितैन मया व अलफ[१] ही माहिती आहे.

ю ю

पे. द. द. कोकण रुमाल ४२२ ] [ **लेखांक १८१**

राजमंडळ

स्वारी राजश्री पंतप्रधान सुमा खमस समानीन–दफाते पत्रे छ २२ जिल्हेज[२] कार्तिक मास वे. शा. सं. बाल दिक्षीत बिन गणेश दिक्षीत वोक मुकादम मौजे नरवण ता॥ गुहागर सुभा दाभोळ तालुके अंजनवेल यानी हुजूर येऊन विदीत केले की मौजे मजकुरी आपली वतनी ठिकाणे सेते आहेत त्यास आमचे वडील तेथून परागंदा होऊन श्री वाराणसीस गेले तेथे राहात आहो मागे गावी आमचे भाऊबंद केसो विश्वनाथ राहातात ते गरीब कोणासी कजिया सांगावयाचे सामर्थ्य नाही हे जाणोन सांप्रत आमच्या जमिनी काही लोकानी घेतल्या आहेत व काही निर्वेध चालतात त्यास हयातखान मुसलमान संगमेश्वर प्रांते होता तो मौजे मजकुरी येऊन आठ दहा वर्षे राहिला आहे तो आम्हा-कडील व दुसरे येक दोघाकडील सेताविसी कजिया करुन कृष्णाजी विश्वनाथ याजवळ सुभा जाऊन फिर्याद केली त्याणी सही साक्ष पाहून मुसलमानास ताकीद केली सेत ज्याची त्याजकडे चालतात असे असता साल मजकुरी मुसलमान मजकूर याने सुभा गैरवाका समजावून वतनदाराची सेते जप्त करावी म्हणोन छ ११ साबानची[३] चिठ्ठी घेतली ती आश्विनमासी सेते कापावयाचे वेलेस आणुन दाखविली यास्तव आमचे भाऊबंद व वरकड सेती ज्याकडे आहेत ते सुभा गेले परंतु तेथे काही मनास न आणीत व सेताची मोकळी चिठ्ठी न देत याजकरिता जप्तीची चिठ्ठी गावास आली ती घेऊन हुजूर आले आहेत तरी मनास आणून सेते व ठिकाणची मोकलीक करुन मुसलमान मजकुरास हुजुर आणून फडशा केला पाहिजे...... व केसो विश्वनाथ मुकादम व हरी चिमणाजी महाजन याजकडे ....... आहेत ते येणे प्रमाणे जप्त करविली....... भरल्या पिकावरून जप्त केली हे ठिक न केले. हाली हे पत्र सादर केले असे तरी सुदामत सेते व ठिकाण ज्याकडे चालत आली आहेत त्याजकडे चालविणे व मुसलमान मजकूर यास हुजूर पाठवून देणे–नावे चिटणीसी पत्र १

ю ю

---

१. दि. १०-२-१७६७ २. दि. ६ नवंबर सन १७८४.
३. दि. ३०-६–१७८४ आषाढ शु॥ १२ शके १७०६

पे. द. घडणी रुमाल १५ ]

[ **लेखांक १८३**

शके १७१४ मधील अनुष्ठान खर्च सलास सितैन
गोपिनाथ दीक्षित महाडकर कासीकर
सुरु खमस तिसैन छ १४ रोज माहे सफर
नारायण भट दीक्षित महाडकर कासीकर यास
मध्यंसुक्त जपाच्या आवृत्ती १०० प्राा संख्या २०७००
सु।। तिसा माहे जमादिलावल छ २३
मातुश्री यशोदाबाअी ओक अनिष्ट ग्रह शांती.
अर्बा माहे जमादिलावल छ ३०
निाा राजश्री राव–बाळंभट ओक
३३४।। वैशाख शु।। २ बुधवार जप २२३००० दक्षणा दररोज रु. १।। प्रमाणे २२३ दिवसाचे–
व पळिपंचपात्री, गोमुखी, आसन, धोतरजोडी, रुद्राक्षाची माळ इ. साहित्य

ऐ. संकीर्ण साहित्य खंड ३
पृ. २२२ ले. शं. ना. वत्सजोशी ]

[ **लेखांक १८४**

गोपिनाथ दीक्षित ओक हे फार मोठे विद्वान व एकाधिक यज्ञानुष्ठाते होऊन गेले. त्यानी सत्याषाढऋषिप्रणीत श्रौतसूत्रावर ज्योत्स्ना हया नावाची उत्कृष्ट आणि विद्वन्मान्य अशी टीका लिहिली. या सूत्राचे पाढे २९ आहेत, त्यापैकी ७, ८, ९ व १० या चार पाढयांवरील टीका या गोपिनाथ दीक्षितानी लिहिली. आणखी अनेकानी इतर पाढयांवरील टीका लिहून सर्व पाढयांवरील टीका पूर्ण केली. दुसऱ्या एका स्वतंत्र ग्रंथाचे समाप्तीस जोडलेल्या हयांच्या उल्लेखात त्यानी वाजपेय, चातुर्होत्र, सर्वतोमुख, पौण्डरिक, काठक इत्यादी यज्ञ केल्याचे सांगितले आहे. हयांचा स्वतंत्र व श्रेष्ठ असा ग्रंथ 'संस्काररत्नमाला' हा आहे. हा निबंधग्रंथ असून स्मार्त आहे म्हणजे श्रौत व स्मार्त या दोन्हींमध्ये दीक्षितांची ग्रंथकृति पंडितमान्य आहे. संस्काररत्नमालेसच गोपिनाथ भट्टी हे अपर नाव आहे. हा ग्रंथ त्यानी शके १६८७ श्रावण व।। ४ सोमवारी समाप्त केला. यास प्रथम एकसर नंतर त्याच्याबद्दल साकुर्डी हा गाव इनाम होता. त्याच्या वडिलांचे नाव गणेश दीक्षित. गोपिनाथ दीक्षितांची जन्मकुंडली प्रो. अण्णुभाऊ दीक्षित हयांच्याकडे मिळाली.

जन्मकाल: संवत् १७८४ शके १६४९ पिंगल संवत्सरे आषाढ कृष्ण १४ गुरौ घटी ४७ पळे ५९ सह अमावस्या नक्षत्र आर्द्रा घटी ३६ पळे ३० सह पुनर्वसू भुक्त घटी १६ पळे ३४ सह हर्षण योग वर्तमान चतुष्पाद करणं एवं पंचांग शुद्धौ, वृषभ लग्ने

नक्षत्र नाम कोंडदेव चतुर्थ गोपिनाथ व्यावहारिक नाम. (आईबापांच्या नावाची जागा कोरी)

जन्मकुंडली




पे. द. घडणी रुमाल १५ ] [ **लेखांक १८५**

राजमंडळ

स्वारी राजश्री दादा सु॥ आर्बा सितैन[1]

खर्च धर्मादाय आश्रीत गोपिनाथ दीक्षित

पोता पैकी

माहे सव्वाल[1] रु.

३०० छ[1] ४ रोज खर्चास रसानगी यादी असे.

परभारे पैकी

रु. ३०० प॥ पिपलनेर हरी बल्लाळ पैकी]

रु. ३०० नरसो येशवंत पैकी

४९० होन १४० दर ३॥ प्रमाणे

१० नक्त

५००

८००

अेकूण आठसे रु.

१. ता. ६-४-१७६४ चैत्र शु॥ ५ शके १६८६

पे. द. घ. रु. १५ ]

## [ लेखांक १८६

राजमंडळ

स्वारी राजश्री पंतप्रधान सु॥ आर्ब सितैन[1]
खर्च बा॥ मु॥ आश्रीत गोपीनाथ दीक्षित
दफाते पत्रे

छ २९ रमजान[1] मुक्काम पुणे वि॥ राजश्री बालाजी जनार्दन फडणीस यास तालुके मजकूर पो॥ च्यारसे रूपयाचा गाव इनाम द्यावयाचा करार करून देवून हे सनद तुम्हास सादर केली असे तरी सदर च्यारशे रुपयाचा गाव नेमून देवून हुजुर लेहून पाठविणे म्हणोन जाधवराव सदासिव लागदार फुटगांव तालुके चास याचे नावे छ१ रमजानी सनद मौजे येकसर प्रांत वाओी हा गाव पहिला अिनाम दिला होता त्यास तो गांव सरकारात ठेवून तालुके मजकूर पो दिल्हा असे. पहिली अिनामपत्रे आहेत ती घ्यावी व नवीन द्यावी. येणे प्रमाणे करावे.

पे. द. घडणी रुमाल १५ ]

## [ लेखांक १८७

राजमंडळ

स्वारी राजश्री पंतप्रधान सुहुर खमस सितैन[2] ब ॥ मु ॥ आश्रित गोपिनाथ दीक्षित ब॥ हिशोब ता॥ चास साल म॥कुर पैकी मशारनिल्हे यास साल गु॥ येक गांव चारसे रुपये आकारचा अिनाम नेमून द्यावयाची आज्ञा याजकरता साल गु॥ गांवचे अैवजी च्यारसे रुपये दिल्हे साल मजकूर मौजे साकुर्डी ....पैकी नेमून दिल्हा त्यास ते गांवचा आकार रु. ४३७ त्यास जाजती आकार होओील तो सरकारात वसूल घ्यावा. या प्रमाणे करार होता परंतु पेस्तर सालीचे हिसेबी नवे कमाविसदारास सदरहू सदतीस रुपये जाजती आकाराचे कलम नेहमी खर्च नेमून दिल्हे आता साल मजकूरी सदतीस रुपये सुद्धा खर्च मु॥ ह. खर्ची

४०० बा॥ मु ॥
३७ जसनती आकाराचेप्रमाणे
———
४३७

मौजे सागुरडी ता॥ वाडे.

---

१. दि. २-४-१७६४ चैत्र शु॥ १ शके १६८६ २. इ. स. १७६४–६५

पे. द. घडणी रुमाल १५ ] [ **लेखांक १८८**

राजमंडळ

स्वारी रा. पंतप्रधान सुहुर सबा सितैन[१] साकुर्डी मोकासा यशवंतराव ठोसर याचा दूर करून तो सुद्धा दीक्षित याजकडे दिला व साकुर्डी दरोबस्त अिनाम झाला.

ऐ. लेखसंग्रह–खरेशास्त्री
पान २४६६, १८ डिसेंबर स. १७७६ अि.] [ **लेखांक १८९**

तोतयाची चौकशी सुरू झाली तीत रामशास्त्री, गोपीनाथ दीक्षित, हरिपंत फडके बाबूजी नाअीक बारामतीकर वगैरे पंच होते. सर्वानुमते तोतया खोटा ठरल्यावर त्याची धिंड काढून...देहांत शासन देण्यांत आले.

ऐतिहासिक टिपणे भाग ६
मेणवली दप्तर पान ५८ ] [ **लेखांक १९०**

सवाअी माधवरावाच्या व्रतबंधाच्या मुहुर्ताची वाटाघाट करताना रामशास्त्री प्रभुणे यांनी गोपिनाथ दीक्षित प्रभृती शिष्ठ व ज्योतिषी बोलावून निर्णय घेतला.

( चैत्र वा॥ ११ चे पत्र )

पे. द. घ. रु. १५ ] [ **लेखांक १९१**

राजमंडळ

स्वारी राजश्री पंतप्रधान सुहुर अिसने सबैन[२] खर्च बा॥ मु॥ आश्रीत गोपीनाथ दीक्षीत ओक माहे साबान[१] छ २५ रोज यास

---

१. सन १७६७

२ दि. ३–१२–१७७१ कार्तिक वा॥ १२ शके १६९३

रु. ५६३ साल मजकूरची मोअीन
रु. १५०० पंधराशे पो।। वजा खर्च
४३७ मौजे साकुर्डी ता। वाडे ता।। चास हा गांव
अिनाम आहे त्याचा आकार खर्च
५०० श्रावण मासाची दक्षिणा

———

९३७ साल मजकुरी पावले
बाकी रसानगी यादी खर्च

पे. द. घ. रु. १५ ] [ **लेखांक १९२**

राजमंडळ

श्री. राजश्री पंतप्रधान सु।। आरबा[१] खर्च बा। मुशाहीरा गोपिनाथ दीक्षित आश्रीत जामदारखानापैकी छ. २५ रविलाखर[१] अिस रोजची........ खिजमतगारास...येणे प्रमाणे ३ ग....

२२।। तिवट १
५३८= जापूर समनी

———

७५।।=

पुन्हा वरीलप्रमाणे बा। मुशाहिरा म्हणून अुद, साखर, गुळ, जिरे, मिरी, हळद हिंग, चिंच वगैरे जिनसा ८१। ७८३।।। च्या खर्ची गोपीनाथ दीक्षित नावे.

पे. द. निवडलेले कागद गो. स. सरदेसाअी ३२
अुत्तरकालीन पेशवे कौटुंबिक रहाणी ] **लखांक १९३**

नं. १९२– १०–८–१७७३ झडती–महाल रत्नशाळा सु।। सलास स्वारी पंतप्रधान...खर्च खेरीज मु।। धर्मादाय किता माहे सोवल छ ११ रोज अखेर कै. सौ. रमाबाई याणी छ २१ साबाणी सहगमन समयी आपले नि।। दागिने वाटिले ते

१. दि. १४–८–१८०३

हाली खर्च रसानगी मखलासीची याद छ २० जा।।वल सन आर्बा सबैन देणे ब्राह्मणास जडाव दागिने २ देणे गोपिनाथ दीक्षित यासी—

१ माळ मोत्याची बा। खा।। गु।। दामोदरदास पो।।

३७१०

मोत्ये सुमारी १२१

१ नथ रासकर्दन पो।। यो।। शा।

२ मोत्ये जोडी थोर

१ पाचमणी

——

२ ३

पे. द. घडणी रुमाल १५ ] [ लेखांक १९४

राजमंडळ

स्वारी राजश्री.............सु।। खमस

खर्च बा। मु।। धुंडीराज दीक्षित गोपिनाथ दीक्षित यांचे पुत्र परभारे पैकी छ १६ माहे सफर गोपिनाथ दीक्षित यास श्रावणमासाची दक्षणा व गाव मिळोन दोन हजार रुपये तैनात आहे. त्यास ते मृत्यु पावले सबब त्यांचे तैनात सदरहु प्रो। साल मजकुरापासून करार करून दिली मा।रची तैनात पेशजी प्रो। र।। हिसेब

.......................................

१००० क्रियेबद्दल तैनात खेरीज

पे. द. घडणी रुमाल १५ ] [ लेखांक १९५

राजमंडळ

धुंडीराज दीक्षीत गोपी. दी. पुत्र

सुहूर खमस छ. ७ माहे सफर गोपी. दी. यास श्रावण मासाची दक्षिणा व गांव मिळून दोन हजार रुपये तैनात आहे. त्यास ते मृत्यु पावले सबब त्याचे नावे तैनात सदरहू प्रा। साल मजकूरापासोन करार करुन दिली. मा।रची तैनात पेशजी प्रमाणे या हिसोबी खर्च

२०० श्रावण मासाची दक्षिणा
५०५ मौजे साकुर्डी ता। वाडे प्रां। जुन्नर हा गांव अिनाम आहे त्या बा।
१२९५ रोख हुजरून घ्यावे
——
२०००

पैकी वजा———
२०० श्रावण मासाची दक्षिणा पावली. ते
५०५ मौजे साकुर्डी हा गाव अिनाम आहे।
——
७०५ बाकी साल मा। रीची राहीली १२९५ राहिली.

पेशवे दप्तर ] [ **लेखांक १९६**

श्री

धुंडीराज दिक्षीत वोक आश्रीत यास मोअीन सालिना साल गु। प्रमाणे सालमजकुरी सुमा अिसने मयातेन अलफ[1]——रु.

५०५ अिनाम गाव मौजे साकुर्डी ता। वाडे प्रां। जुन्नर येथील आकार मोकासा सुधा
१५० दक्षणा श्रावणमासची
१३४५ सरकारातून घ्यावेत
——
२०००

दोन हजार रुपये छ. २६ मोहरमी[1] पावले असेत.

पे. द. घडणी रुमाल १५ ] [ **लेखांक १९७**

राजमंडल

स्वारी राजश्री पंतप्रधान सु। सबा समानीन[1]

खर्च ब। मु। आश्रित रो। धुंडीराज दीक्षित ओक
दफाते पत्रे

---

१. दि. ९–६–१८०१ अधिक ज्येष्ठ व। १३ शके १७२३

छ १८ माहे सव्वाल[१] यांचे घरी गणेश चतुर्थीस होम बेत असतो त्यास

जिन्नस सुमारी

५०० केळी पिकली
२०० ऊस
५ केवडयाची पाने

७०५

एकूण सातशे पाच सुमारी देविली असे तरी तालुके शिवनेर येथील मक्त्यापैकी दीक्षितांचे घरी मौजे साकुर्डी ता॥ वाडे येथे पोचवून देणे म्हणोन बालाजी महादेव यास सनद १

पो॥ रुबरु

वरील प्रमाणे पत्रे इहिदे तिसैन[२] पर्यंत प्रत्येक वर्षी आहेत.

पे. द. इनेक्स १३ पान ९ ] [ **लेखांक १९८**

मौजे साकुरडी तालुका खेड. सन १२६० फसलीचे हिशोबावरून गाव गोपाळ दीक्षित बिन गोपिनाथ दीक्षित ओक याजकडे चालतो... सर्व इनाम दुमाला फैसल नं. २२९ तारीख २६ अक्टोबर सन १८५७

पे. द. एजंट फाईल नं. ९ ] [ **लेखांक १९९**

No. 330 of 1843

To

P. Stewart Esq. Collector of Poona

Sir,

In reply to your ............ regarding the Varshasan claimed by Gopal Dixit Bin Dhoonderaz Dixit Oak the arrears created by Mr. Goldsmith's enquiries having caused the delay that has occurred.

१ ता. २३-७--१७८६ श्रावण व॥ ४ शके १७०८
२ इ. स. १७९१

य. न. केळकर संग्रह
मंडळ पांडोबा दप्तर ]

[ **लेखांक २००**

गोपाळ विनायक रानडये यांचे शामजीपंतबाबास पुण्याहून माघ व।। ७ भृगुवासरचे ( पो छ १९ रविलावल )[१] त्यातील एक कलम.

१ आम्ही लिमये यांचे घरातील बिऱ्हाड सोडून वे. रा. गोपिनाथ दीक्षित ओक यांचा वाडा शनवारात रा. बळवंतराव नेने यांचे वाडयाशेजारी सांबाचे देवालयासमोर नदीचे काठी वाडा आहे तो दोन हजार रुपयेस गहाण लावून घेतला आहे. वाडा चांगला थोर आहे. तेथे रहाण्यास गेलो तुम्हास कळावे. सदरहू दोन हजारास वाडा गहाण ठेवला. त्यास मुदत तीन वर्षांची आहे. हजार रुपयास व्याज ।।।।= हजार रुपये बिन व्याजी घरास भाडे नाहीं.

पे. द. पुणे जमाव रु. १६९६ ]

[ **लेखांक २०१**

श्री

रा. वि॰ रा. रा. बाळाजी गोविंद स्वामी गोसावी यासी पंत. माधवराव नारायण प्रधान नमस्कार विनंती उपरी येथील.... लिहिणे विशेष वेदशास्त्रसंपन्न राजश्री बाल दीक्षित वोक हे श्री वाराणसीस राहतात. त्यास वर्षासन श्रीकासीतील वर्षासनाचे पटात सन इसने सबैनचे[२] पावले आहे. त्या अलिकडे वर्षासन इ।। सन सलास सबैन ता।। सन सबा सबैन[३] पा॰च साल दरसाल रु. २२५ प्रमाणे ११२५ सवा अकरासे रुपये प्रमाणे बुंदलखंड येथील अैवजी साल गु।। तुम्हाकडून देविले होते ते पावले नाही. सबब हली सदरहू सवा अकरासे रुपये पेसजीचे ( वरातें ) प्रमाणे साल मजकूर सन तिसाचे रसदेचे अैवजी देविले असेत तरी पावते करून कबज घेणे व पुढे सन सबान सबैना[४] पासून दर साल रु. २२५।– सवादोनशे द्यावयाविसी पेसजी सनद सादर जाली आहे. त्याप्रमाणे सदरहू सव्वा दोनशे रुपये प्र।। माारचे रसदेचे अैवजी भटजीस पावते करीत जावे मजुरा पडतील जाणिजे छ३ रा।लावल सुमा तिसा सबैन मया व अलफ.[५]

---

१. १८१५-१८१६
२. १७७०-७१; ३. १३-६-१७७२ ते ४-६-१७७७
४. १७७७ ५. ता. २२-३-१७७९

पे. द. घडणी रुमाल ३९९ ] [ लेखांक २०२

राजमंडळ शके १७०७

स्वारी...... सुमा सीत समानीन[1] सरंजाम नि।। वे. बाल दीक्षित बिन गणेश दीक्षित वोक वास्तव्य क्षेत्र कासी...... दफाते...... पत्रे

छ १९ मोहरम[1] मानिल्हेयास वर्षांसनाची नेमणूक नेहमी प्रांत बुंदेलखंड पैकी आहे त्या ब।। आकार रुपये......

११२५ अि।। सन सलास सबैन ता।। सन सबा सबैन दरसाल रु. २२५ प्रमाणे [पांच साला वरात सन समान सबैनात दिल्ही आहे.[2] त्या ब।।

१८०० अि।। सन समान सबैन ता।। सन खमस समानीन[3] नेमणुकेप्रमाणे येवज पावला नाही त्याचा आठ साला आकार

२९२५

येकूण दोन हजार नउशे पंचवीस रुपये तुम्हाकडून रसदेचे येवजी देविले असता पावले नाहीत ही गोष्ट उत्तम न केली या उपरी सदर प्रमाणे यैवज वेदमूर्तीस कासीत पावता करणे साल म।।चे रसदेचा येवज तुम्हाकडे करार होईल त्यात मजुरा दिल्हा जाईल बेदिकत यैवज पावता करणे साल मजकुरा पासून वर्षासनाचे सव्वा दोनशे रुपये क्षेपनिक्षेप श्री काशीत पावते करीत जाणे म्हणोन बाळाजी गोविंद याचे नावे-सनद १ रसानगी यादी.

पे. द. घडणी रुमाल २९० ] [ लेखांक २०३

राजमंडल

स्वारी राजश्री पंतप्रधान सु।। सबा सन सीत समानीन मया व अलफ[1]

खर्च ब।। मु।। अनुष्टान खर्च पोतापैकी माहे साबान खर्च

छ १७ रोज[4]

गु।। मोरो जनार्दन वोक मालगुंडकर याणी दररोज त्रिकाल पूजा करून चार हजार दुर्वा वाहिल्या त्यास

३० अबाभट पुराणिक याणी दररोज नमस्कार ५०० घातले त्यास

---

१. ता. २२-११--१७८५; २. सन १७७७-७८

३. सन १७७७--७८ ते सन १७८४-८५

४. दि. २५-६-१७८५.

.........................................................

.........................................................

गु॥ मोरो जनार्दन मजुरी खर्च

५ निंबा थावऱ्या खटपटया

.........................................................

१२४ छ २६ रोज[1] गु॥ मोरो जनार्दन वोकनीस ब॥ यादी। राजश्री रावसाहेब दुस्वप्नशांत्यर्थ शतचंडीचे अनुष्टानास बाबा दीक्षित तुलसी पैठणकर......

.........................................................

सु॥ सबा माहे जिल्काद छ २ रोज

.........................................................

२१० बाल दीक्षित महाडकर नरनारायणाकडे पवमान सूक्ते करून अभिषेक व पूजा दररोज केली त्यास दक्षणा दररोज रु. १ प्रो।

मराठयांच्या इति. ची साधने ]
खंड २२ वि. का. राजवाडे ]

[ **लेखांक २०४**

काळे वकिलाती पत्रव्यवहार भागानगरहून गोविंदराव कृष्ण यांची पत्रे पान ७ लेखांक १२ कार्तिक वद्य १३ शके १७१४ बाळ दीक्षित यांचे पत्राचे उत्तर

वे. शा. सं. बाळ दीक्षित स्वामीचे सेवेसी–पोष्य गोविंदराव कृष्ण सा. न. वि. उपरी येथील कुशल.......विशेष आपण......प्रस्तुत नेम केला ऐसा की येथील सर्वांचा निरोप घेऊन अखेर कार्तिक पर्यंत येथून निघोन तुमचे भेटीस येतो कुटुंब संरक्षण श्री मध्ये होय येविषयीचा विस्तारे मजकूर लिहिला तो सर्व समजला त्यास यंदाच श्रीस जावयाचे मानस असल्यास तिकडील सर्व गुंता उगवल्यावर इकडे येऊन भेट घेऊन जावे श्रीस जावयाचा यंदा अनमान असल्यास इकडे यावयाचे करू नये· आम्हीच तिकडे आल्यानंतर भेटीचा लाभ घडेल कुटुंब संरक्षणाचा प्रकार विस्तारे लिहिला त्यास ध्यानात आहे. सांप्रत असलियासी विस्मरण होणार नाही आम्ही पत्र लिहितो त्याचे उत्तर मात्र येते त्या वेगळे पत्र येत नाही म्हणोन तुम्ही लिहिले त्यास नवल व विशेष काही असल्यास पत्र पाठवावे ते काही नाही आणि प्रकृतीही ठीक नाही ज्वर येत होता नुकताच राहिला आहे. नागपुरास जाण्याची सोय पुण्याहून कि भागानगराकडून हे लिहावे म्हणून

---

१. दि. ४-७-१७८५.

लिहिले त्यास वाटा दोहीकडीलही चांगल्याच परंतु इकडील मार्गाने सोबत मिळणे कठीण असे आहे रवाना छ २६ कार्तिक वा। १३ हे विनंती. रवानगी पत्र डाकेवर छ ५ रजबी.

पान ७९ लेखांक ७९ फाल्गुन शु॥ ७ शके १७१४ ( बाळबोध )

।। वे. शा. सं. बाळ दीक्षित वोक स्वामीचे सेवेसी।। पोष्य गोविंदराव कृष्ण सा। नमस्कार विनंती उपरी...विशेष तुम्ही पत्र पाठविले ते पावले. वेदमूर्ती व्यंकटभट आपले घरी जातात अखेर फाल्गुन पर्यंत आपले घरी रहातील तर राहू द्यावे तोपर्यंत मी येईन म्हणोन लिहिले. त्यास व्यंकटभट आले त्यांनी सांगितल्यावरून वर्तमान कळले त्यांचे म्हणणे की घरास जाऊन वर्षप्रतिपदा करून कुटुंब घेऊन येणार याजकरिता ते फाल्गुन शु॥ ४ स घरास गेले तुम्हास येण्याविषयी पूर्वी लिहिलेच आहे त्रिंबक बाळकृष्ण यास पत्र पावते केले उत्तर आले म्हणजे पाठवून देऊ व्यंकटभट यानी पत्र लिहिले ते पाठविले आहे फाल्गुन शु॥ ७ हे विनंती.

सं. नि. का. S. R. २१।१ ] [ लेखांक २०५

पो। छ २४ जमादिलावल सीत सबैन आषाढ[1]

सेवेसी जनार्दन अप्पाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान ता। छ ३ र॥वल[2] पावेतो येथास्थित असे विशेष श्रावणमासाचे प्रारंभाकरिता वेदशास्त्रसंपन्न राजश्री बाल दीक्षित वोक यासी पाठविले आहेत. तरी आषाढ व॥ येकादसीस रविवारी प्रातःकाली तीन घटकापूर्वी कर्क लग्न आहे ते लग्न साधावयास त्या दिवशीच बावीस घटकापासून तेवीस घटका या दो घटका वृश्चिक लग्न. हे दोन मुहुर्त आहेत यातून जो साधेल तो साधून साल गु॥ अडीचसे रुपये दीक्षितास दक्षणा पावली आहे साल मजकुरी काय द्यावयाचे ते देऊन प्रारंभ करावा या प्रो। शास्त्रीबुवानी ल्याहावयासी सांगितले आहे प्रारंभ करवून उत्तर पाठवावयासी आज्ञा केली पाहिजे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना दीक्षितास अडीचसे रुपये साल गु॥ दिल्हे त्याप्रमाणे सालमाारी अडीचसे दिल्हे पाहिजेत वरकड मा।र आज्ञेप्रमाणे होईल हे विज्ञप्ती

---

१. दि. २३-७-१७७५ शके १६९७ आषाढ व॥ ११

२. दि. ४-५-१७७५ शके १६९७ वैशाख शु॥ ५

पे. द. घडणी रुमाल ३९९ ] [ **लेखांक २०६**

राजमंडळ

स्वारी राजश्री पंतप्रधान.......सुमा तिसा समानीन[१] सरंजाम

नि।। वे. शा. सं. रामचंद्र दीक्षित बिन गणेश दीक्षित ओक वा।। श्रीवाराणसी दफाते छ १३ माहे जमादीलाखर[१] मा।रनिल्हे यास नूतन वर्षाचा साल मजकूरापासोन रुपये दोनशे २०० द्यावयाचा करार करून हे सनद सादर केली असे. तरी प्रांत बुंदेलखंड येथील अैवजी साल मा।रचे दोनसे रुपये दीक्षितास देवून पुढे दरसाल सदरहू प्रमाणे दोनशे रुपये श्रीत देत जाणे. प्रतीवर्षी नवीन सनदेचा आक्षेप न करणे म्हणून बालाजी गोविंद याचे— नांवे सनद १ रसानगी याद

रा. ब. वाड- दुसरा बाजीराव रोजनिशी ] [ **लेखांक २०७**

१७९७–९८ धर्मादाय श्रावणमास दक्षणा विद्यमान

रा. बाबासाहेब

..............रमण्यात

..............वाड्यात

थोर पंडीत

................

................

६६ नि. रामचंद्र दीक्षित ओक काशीकर

भा. इ. सं. मंडळ त्रैमासिक
वर्ष १ ले अंक २ व ३
खाजगीवाल्यांच्या हिशोबाचे मंथन [ **लेखांक २०८**

श्री. ना. गो. चापेकर
पृ. ६२ ६५।= वसंतपूजा छ ८ शिष्ट ब्राह्मणांची
२२ दक्षणा आमंत्रणाचे

---

१. ता. १०-४-१७८९ वैशाख वा।। १ शके १७११

१ .............
१ .............
.............
१ रामचंद्र दीक्षित वोक

महेश्वर दरबारची पत्रे
संग्राहक : द. ब. पारसनीस ]

[ लेखांक २०९

भाग २ पान ९२ लेखांक ११२ – १८ डिसेंबर १७८५ चे केसो भिकाजी दातार यांचे नाना फडनविसास पत्र कलम ४ थे

राजश्री सुभेदार याजकडे कापड रवाना चंद्र २ सफरीस केले त्याजसमागमे वे. शा. सं. राजश्री रामचंद्र दीक्षित ओक यांची रवानगी बाईनी केली. दीक्षित लष्करात गेले कलम १

ऐ. ले. संग्रह भाग १३ खरेशास्त्री

[ लेखांक २१०

फाल्गुन व।। ७ शके १७२२ सात मार्च १८०१ इ. पौ छ २१ सवाल मंदवार अस्तमान फाल्गुन इहिदे मयातैन

बापू बारगुले बरोबर पत्रे चौथ्या दिवशी आली. विज्ञापना ती।। राजश्री गणपतराव काका आल्याचे लिहिले ते कळले. श्रीमंत इष्टीस वै. रा. वैजनाथभट मामा येथे आले होते. मलाही आज्ञा जाली मीही गेलो होतो ब्रह्मत्व वेदशास्त्रसंपन्न राजश्री रामचंद्र दीक्षित वोकाकडे होते. श्रीमंतानी अध्वर्यु प्रयोग केला. अपूर्व दीक्षितांचे कर्म आहे. भाषणसुद्धा तुल्य, बहुत सौम्य. पत्री काय विस्तार लिहू.........हे विज्ञापना

वरील पत्र पुण्याहून मिरजेस रघुनाथराव नीळकंठ ( पटवर्धन कुरुंदवाडकर ) यांचे

श्री. य. न. केळकर संग्रह
त्यांचे कृपेने ]

[ लेखांक २१० अ

यादी ब्राह्मणास वर्षासने व मोईना व दरमहा पेशजी पावले आहेत सु।। तिसा अशर मयातेन व अलफ

सन सबा अशरात खर्च रुपये

२१२३॥ सन सीत अशरचे रुपये

८०० रामचंद्र दीक्षित ओक यास दरमहा वर्षासन मिळोन रू. ६०० दरमाहा रु. ५० प्रमाणे सन इसने मयातेनापासून श्रीमंत बाबा साहेब यानी दीक्षित पुण्यात आहेत ते पावेतो द्यावयाचा करार आहे सन सीत अशरचे

२०० वर्षासन थोरले माधवराव यांचे कारकीर्दीत दीक्षित देशी आले होते त्यास कराराप्रमाणे बुंदेलखंडाकडून देविले होते.

हे ओक दीक्षित सन तिसा अशरात श्रावणमासी मृत्यु पावले त्यांचे पुत्र माहादेव दीक्षित पुण्यात आहेत. विद्वान थोर शिष्ट.

पे. द. पुणे जमाव रुमाल १७४० ] [ **लेखांक २११**

वे. शा. सं. राजमान्य राजश्री दाजी दीक्षित बिन रामचंद्र दीक्षित ओक गोत्र सूत्र हिरण्यकेशी वतन हेदवी ता। अंजनवेल ता। गुहागर स्वामीचे सेवेसी चरणी तत्पर गंगाभागिर्थी सिअुबाअी बोकील सासवडकर साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसिजे आपण थोर सत्पात्र आमचा वंशास कोणी नाहीं. शंकराजी निंबाजी व सिवाजी निंबाजी व सखाराम भगवंत बोकील सासवडकर या त्रिवर्ग बंधूस कोणी नाहीं यास्तव आपण वंश चालोन वंशवृद्धी चालावी म्हणोन प्रयत्न कर्ण्यास उद्योग केला आहे व आमचे गाव प॥ शेवगाव येथे श्रीमंत महार्जी होलकर याणी अिनामपत्रे आम्हास करून दिल्ही आहेत व त्या पत्राचा उपयोग करून आमचा वंशाचा जीर्णोद्धार करून आमचे गाव आम्हास प्राप्त होण्यास आपण साह्य होऊन कागदपत्राचे ठिकाणी लावून गाव सोडविले यास्तव आम्हीं आपले स्वसंतोषे स्वामी शेवा करावी म्हणोन आपल्यास वर्षासन दरसाल मौजे धीवरी व मौजे नादूर येथे रुपये २०० दोनशे वर्षासन करुन दिल्हे आहे तरी जे आमचे तर्फेने कमाविसदार वर्तमान भावीं जो होअील तो देईल आमचा आक्षेप करावयास त्यास कारण नाही यावतकाल आमचा वंशाकडेस गाव अिनाम चालतील तो पावेतो आमचा वंश जो होअील तो चालवील व जो कमाविसदार होअील तो आमचा आक्षेप न धरिता पुणे मु॥ रुपये हुंडारीत तुम्हास तुमचे घरी प्रविष्ट करून पावती घेत जाअील यात अंतर आमचे वंसीचा जो कोणीं होअील तो व कमाविसदार वर्तमान भावी होअील तो करील तरी त्यास श्री मार्तंडाची शपथ व त्याचे कुलस्वामीचीं शपथ व त्याचे मातापित्राची शपथ असे हे वर्षासन पत्र लिहून दिल्हे आहे तरी तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रानी वर्षासन घेऊन आमचे वंशास अभीष्ट चिंतोन व आमचे परलोकास अभीष्ट चिंतोन तुम्ही सुखरूप ऐवत घेत

जावा हे पत्र लिहून दिल्हे असे शके १७४१ प्रमाथी नाव संवत्सरे कार्तिक[१] शु॥ २ हे पत्र आमचा वंशास व वर्तमान व भावी कमाविसदारास दाखवून ऐवज घेत जावा हे पत्र आपणाजवळ भोगवट्यास ठेवावे तुम्हापासी नवीन पत्र किंवा आमचा परवानगीचा उजर धरणार नाही जरकरिता या पत्राप्रमाणे न चाले त्याचे पूर्वजाची शपथ असे हे विज्ञापना. पे. द. प्रांत पुणे जमाव रुमाल १६२२]

सु॥ तिसा अशर मयातैन व अलफची[२] यादी सरंजाम जमिनी वगैरे विषयींची आहे त्यात सखाराम भगवंत बोकील याचे स्त्रीकडे व सुनेकडे १ मौजे बोपगाव, मौजे हिवरे, मौजे चांबली मौजे खानवडी तर्फ वाडेपठार व कोसीत पिंपळे सोनारी या गावच्या जमिनी आहेत शंकराजी निंबाजी बोकील याजकडे हिवरे व बोपगावच्या आहेत.

पे. द. एजंट फाईल नं. १९ ] [ लेखांक २१२

Translation of Memo from Mayenah widow of the late Mahadeo Dixit alias Dajee Dixit bin Ramchandur Oake dated 24th January 1835.

My late father- in-law Ramchandar Dixit was a very learned and religious man in consequence of which the Peshwa's Governmet bestowed on him an allowance of 2500 Rs. per annum. Subsequently on the occassion of the British Government a pension of Rs. 300/- was bestowed on my husband and his name enrolled in the priviledged lists. I now beg to state that he died on the 27th October 1834 and that I am left a destitute female encumbered with the support of the family without the means of settling claims and even struggling for a subsistance. Being thus left without any one to support me I am obliged to petition Government requesting that the principal collector may be intsructed to continue to me the pension from the date of my husband's death ( free translation )

Pol. Dept. No. 206 Bombay castle 3rd March 1835

Sir,

I am directed to acknowledge ....submitting an application

---

१. दि. २१-१०-१८१९ २. सन १८१८ जून ते जून १८१९

from Maynabaee widow of Daji Dixit Oake, a Pnooa pensioner, praying for a pension and to acquaint you that the Rt. Hon. the Governor in Council is pleased to continue to her Rs. One Hundred per annum, agreeably to the amended list of Poona pensions payable by the Principal collector of Poona Agent for the sardars in the Deccan.

I have etc.

Your most obedient Servant
Chief Secretary

तीर्थोपाध्यायांकडील काही उताऱ्यातील नामावल्या-गिह्मवणे ] [ लेखांक २१३

१. बाळंभट रामभट बाळकृष्ण केशव बं. गोविंद व नारायण—नरवण गिह्मवणे.
२. रामभट बाळंभट पुत्र नारायण—गिभोणे
३. नारायण रामभट अजे बाळंभट अग्निहोत्री पुतणे वासुदेवभट व गंगाधरभट—गिभोणे
४. शके १७११ गोपिकाबाई भ्र. वासुदेवभट सासरे बाळंभट अजे सासरे रांभट पुत्र रामचंद्रभट व महादेवभट व सदाशिवपंत व लक्ष्मणभट पुतणे चिंतामणभट चु. दीर गंगाधरभट व बचंभट चु. पुतणे तात्या व केशव गोविंद ॐ क नर्वण ह. गिंभवणे
५. श्रीधरभट बाळंभट अजे रांभट चु. नारायण बं. वासुदेव चु. चु. बं. गंगाधर विनायक—नरवण सु. गिह्मवणे.
६. यशवदा भ्र. नारायण रामभट पुतणे वासुदेव व गंगाधर—गिभोणे
७. रघुनाथ गंगाधर अजे गोविंद रामभट चु. बचंभट बं. विश्वनाथ व केशव व मोरो चु. बं. गोविंद चु. चु. बं. रामचंद्र व महादेव व सदाशिव व लक्षुमण व केशव व तात्या व भाऊ—नरवण गिम्होणे.
८. लक्ष्मण वासुदेव अजे बाळंभट बंधू रामभट व महादेवभट चु. बं. चिंतामण भट.
९. रखमाबाई भ्र. श्रीधरभट पुत्र चिंतामणभट पुतणे रामचंद्रभट व महादेव व लक्षुमण.
१०. चिंतामण श्रीधर अजे बाळंभट चुलते गंगाधरभट व बचंभट चु. बं. रामचंद्रभट व महादेवभट व सदाशिवपंत व लक्ष्मणभट व केशवभट व

तात्या व भाऊ–नरवण—गिभोणे.

११. रघुनाथ गंगाधर अजे गोविंद रामभट चुलते बचंभट बं. विश्वनाथभट व केशवभट व मोरोबा चु. बं. गोविंदभट चु. चु. बं. रामभट व महादेवभट व लक्ष्मणभट चिंतामणभट मातोश्री दुर्गाबाई—नरवण गिभोणे.

१२. लक्ष्मणभट वासुदेवभट अजे बाळंभट बं. रामचंद्रभट व महादेवभट चु. बं. चिंतामणभट—गाव नरवण सु. गिभोणे.

१३. भागिर्थीबाई भ्र. सदाशिवभट सासरे वासुदेवभट दीर रामचंद्रभट व महादेवभट व लक्षुमणभट पुतणे बापूभट व नारायणभट—गिभोणे.

१४. गंगाबाई भ्र. सदाशिव वासुदेव दीर रामचंद्र व महादेव व लक्षुमण पुतणे बापू व नारायण—गिह्मवण.

१५. यशवदा भ्र. सखाराम तातंभट अजे सा. गंगाधर गोविंद दीर गोपाळ चु. दीर विठोबा व गोविंद पुतणे गंगाधर–नरवण गिह्मोणे.

( असाच लेख नाशिकास दाते गुरुजींकडे त्यात सा. दीर बाळकृष्ण नातबिवाडी–गिह्मवण एवढे जास्त आहे )

१६. विष्णु व बाळकृष्ण गोपाळ अजे विश्वनाथ ऊर्फ तातंभट पणजे गंगाधर चु. चुलते गोविंद व विठ्ठल बंधू गंगाधर व नारायण व वासुदेव पु. पुरुषोत्तम—अनगाव कवाड.

१७. लक्ष्मी भ्र. नारायण गोपाळ अजे सा. तातंभट दीर वासुदेव पुत्र जयराम पुतणे पुरुषोत्तम बाळकृष्ण—मुंबई

१८. वासुदेव गोपाळ अजे विश्वनाथ ऊर्फ तातंभट पुत्र गणपती व कृष्णा पुतणे पुरुषोत्तम बाळकृष्ण व जयराम नारायण चु. बं गणपति व विश्वनाथ व सदाशिव व रामचंद्र गोविंद पुत्र दत्तू—गिह्मोणे ह. इटारसी.

१९. कृष्णराव वासुदेव पुत्र भास्कर—इंदोर

२०. श्रीधर केशव अजे गंगाधर गोविंद चु. विश्वनाथ—नरवण गिह्मोणे

२१. सदासिव व गोविंद केशव अजे गंगाधर.

२२. गणेश महादेव अजे काशिनाथ सदाशिव चु. चु. बळवंत रामचंद्र ह. मुंबई माटुंगा

२३. रघुनाथ काशिनाथ अजे सदाशिव बल्लाळ चु. बं. बाळकृष्ण व पुरुषोत्तम रामचंद्र पुत्र नारायण मा. आनंदी–गिह्मोणे ह. मुरबाड

२४. रमाबाई भ्र. शंकर बाळकृष्ण अजे सा. रामचंद्र दीर गोविंद व सिताराम पुतणे सदाशिव गोविंद सा. लक्ष्मी—गिह्मवणे दर्यापूर

२५. विष्णु गोपाळ अजे विश्वनाथ ऊर्फ तातंभट

२६. बाळंभट नारायण अजे रामचंद्र वासुदेव बं. रामचंद्र पुत्र नारायण

२७. गणेश गोविंद अजे केशव बं. हरी व सदाशिव व रामचंद्र चु. बं. शिवराम–बेलापूर–नर्वण गिह्मवणे

२८. बाळकृष्ण गोपाळ अजे विश्वनाथ पणजे गंगाधर विठ्ठल चु. गोविंद चु. बं. विठ्ठल गोविंद बं. नारायण व विष्णु व वासुदेव व गंगाधर पुत्र पुरुषोत्तम–गिह्मवणे

२९. केशव सदाशिव बं. रामचंद्र याचे बाळकृष्ण व पुरुषोत्तम. करंजगाव––गिह्मवणे.

३०. चिमण काशिनाथ अजे चिंतामण श्रीधर चु. बं. बाळंभट व रामभट बिन नारायण––गिह्मवणे.

३१. अन्नपूर्णा भ्र. केशव सदाशिव दीर रामचंद्र पंत यांचे बाळकृष्ण व पुरुषोत्तम–– करंजगाव–गिह्मवण

[ लेखांक २१४

आचवल व आपटे रा. अंजनवेल ]
यांची खतावणी कै. गो. ग. आचावल ]
संग्रहातून श्री। वि. पु. शिंत्रे यांचे कृपेने ]

पान ५. खाते काशिनाथ परशराम ओक हेदवी

जमा

१५ मिती श्रावण व॥ शके १७३८
गु॥ बच्याजीपंत ओक
व्याजाबद्दल १४ ।॥
१०० मिती चैत्र शु॥ १० शके ३९
गु॥ खुद
२५...चांदवड रोख शके ४०
१४०

३०० मिती पौष शु॥ २ शके ३६
भवानाम संवत्सरे व्याज
अर्धोत्रा प्रमाणे करार

.............
.............

सदरहूचा फडशा असे
मिती शके ४६ ज्येष्ट अखेर

पान ७ खाते वेंकाजी विनायक ओक मौजे हेदवी

जमा

५० मि॥ चैत्र व॥ ३ शके ३९ गु॥
बाळाजीपंत. जमाखर्च होणे असे
मि॥ कार्तिक शु॥ ११
२५॥ केसोपंत दादा

२४५॥ ....ज्येष्ट शु॥ ११ शके ३८
भातानाम संवत्सरे व्याज
अर्धोत्राप्रमाणे करार
११७॥– मुद्दल .......

८।। गु।। रावजी                                  व्याज हिशेब होणे पेशजीचा

७ मुगटा सो.

१।। रुमाल

८।।

५ भात खरेदी जेष्ट मास केली .।=

३९

२९ मि।। रोख मार्गशीर्ष शु।। १

१६ रोख

१३ रावजीकडून १८ पो।

२९

५० मि।। आश्विन व।। १० शके ३८

गु।। धोंडो गणेश ओक

फडशा असे मि।। वैशाख मास

शके १७४६

राघो महादेव वोक मुकादम नरवण

१० शके १७३९ मार्गशीर्ष शु।। ५ ऐवजी
गहाण तोरड्या वजन १९।। तोळे रुपे वाईट

बापूजी केशव ओक मौजे मळण

१०० शके १७६१ देणे परभारे
व वासुदेव सदाशिव रानडये यासी पुणे याहून
हुंडी करून देविले ते ती- अंताजीपंत आपटे
याजकडून रानडये याजपासी आम्ही देविले
ते मि।। श्रावण व।। १ रोख त्याजबद्दल
कागदपत्रे

१ लगतपत्र......सबब.......चा खर्च

१ सदरहुविसी दुसरे पत्र

१ हुंडीपत्र भरपाई सुद्धा

३ सदरहू पत्रे असल

खाते मोरो महादेव व त्रिंबक गोपाळ वोक बोरगावकर

२५ मि।। पौष शु।। १ शके ४२ त्रिंबक गोपाळ
वोक मालवणास जाताना ब।। खत

० ......... पेशजी

४० त्रिंबकपंत वोक श्रावण मासी

२५ मोरोपंत वोक
१५ गोपाळपंत
————
४०
१५ शके ३९ वैशाखमास खरेदी गल्या ब।।
१० कार्तिक व॥ १ गु।। अण्णा आचवल याणी दिल्हे.
सदरहूचा हिशब अमंही–शके. ४१ पो।
बाकी रु. २३। पो. पावती
७ शके ४२
१२ शके ४३
३८≡ शके ४४ वरी पो।
————
२२८≡

—०—०

कै. गो. ग. आचवल संग्रह
श्री. वि. पु. शिंत्रे वकील पुणे यांचे सौजन्याने ]

[ **लेखांक २१५**

श्री

सेवेसी अर्जी पांडुरंग गोविंद आपटे निसबत नारो धोंडदेव मंडलीक राहणार गोपाळगड तालुके अंजनवेल ऐसाजे. तालुके मजकूर येथील सरदेशकुळकर्ण व गाव कुळकर्ण ही दोन्ही वतने सरकारात सव्वाशे वर्षे जप्तीस आहेत त्यास वासुदेव गणेश दामले यानी पेशवे सरकारात एक हजार रुपये ( पुढील दोन ओळी फाटल्या आहेत ) होते त्यास सदरहू दोन्ही वतनाचे कामाबद्दल साडेतीन ××× द माझे यजमानानी द्यावयासी कबूल केल्यावरून माझे यजमान धोंडोपंत मंडलीक याणी साडेतीन हजार रुपये रसद पेशवे सरकारात देऊन माझे नावे सनदा बाजीराव रघुनाथ पेशवे याणी सन समान तिसैन मया व अलफचे साली देऊन वासुदेव गणेश दामले याजकडील जप्तीचे काम दूर करून मजकडे जप्तीचे काम सांगितले तेव्हापासून दोन्ही वतनांची वहिवाट आम्ही व आमचे यजमान असे उभयता करीत आलो त्यास साहेबाचे अमलात आमचे यजमानाचे खासगीचा कारकून घारोपंत ऊर्फ वेंकाजी विनायक ओक यासी सन तिसा अशरचे साली दोन्ही वतनाचे काम सांगितले त्याजवरून वहिवाट करीत होते. उपरांत वेंकाजी विनायक ओक याजकडील काम दूर करून आमचे यजमानाचे खाजगीचे कारकून गोपाळ बल्लाळ आपटे व बाळाजी विनायक ओक यासी सालगुदस्ता तालुके मजकूरचे पाचमहालचे काम सदरहू दोन्ही वतनाचे उभयतास सांगितल्यावरून उभयतानी

आपले तर्फेचे कारकून ठेवून दोन्ही वतनाची वहिवाट चालविली त्यास सालमजकुरी बालाजी विनायक याचे तर्फेचे काम दूर करून गोपाळ बल्लाळ आपटे यासी एकट्यासच हली कामे दोन्ही वतनाचे सांगितल्यावरून वेंकाजी विनायक ओक व बालाजी विनायक ओक याजकडील काम काढलेवरून उभयतानी व आणखी पाच असामी व वादी गणेश कासी फगरे यासी मिताफास घेऊन कासी फगरे याजकडून तालुके मजकूर येथील पाच महालचे कारकुनाचे नावे प्रतिवादीची निरनिराळी मतलबाने लाऊन पाच अर्ज्या कोडतात करून हुकुमनामे घेतले ते नंतर तपसीलवार सन १८२३ सालचे माहे सप्टेंबर

२२२२ नंबर वादी गणेश कासी फगरे
प्रतिवादी कासिनाथ परशराम ओक
२२२३ नंबर वादी मजकूर प्रतिवादी धोंडो महादेव करमरकर
२२३८ नंबर वादी मजकूर प्रतिवादी केसो भिकाजी कानडे
२२३९ नंबर वादी मजकूर प्रतिवादी मजकूर
२२५० नंबर वादी मजकूर प्रतिवादी खंडो मोरेश्वर काले

———

येकूण पाच नंबरचे प्रतिवादीने अर्जीप्रमाणे देणे खरे असे जबाब देऊन हुकूमनामे मतलबी करून घेतले त्यास दोन्ही वतनाचे काम माझे व माझे यजमानाचे ताबीन आणि या वतनाबद्दल रसद रुपये ३५०० व दरबारी खर्च रु. १००० येकूण साडेचार हजार रुपये माझे यजमानाने दिल्हे आहेत आणि वहिवाट माझे यजमानाचे तर्फेने चालत आहे असे असता गणेश कासी फगरे याणी मतलबी हुकुमनामे पाच नंबरचे करून घेतले आहेत ते साहेबास जाहीर व्हावे याजकरिता अर्जी केली असे तरी सदरहू दोन्ही वतने माझे व माझे यजमानाचे ताबीन आहेत त्यास हुकूम व्हावा तारीख ३ अक्टोबर सन १८२३

सई पांडुरंग गोविंद आपटे दस्तुर पांडुरंग बाबाजी
साठे निसबत मा।रनिल्हे

सई साहेबाची पांडुरंग गोविंद आपटे बीगर तुम्हा × × × कुलकर्णाचा हक अगोधर पासून जे या दरखास्त कर्णारास जसा देत असतील तसा देत जावा कारण की या दरखास्त कर्णारावर काही हुकुमनामा जाहाला नाही सबब ता. २६ एप्रील सन १८२४

सही साहेबाची इंग्रजी

.........अक्टोबर सन १८२३ रोजी मी जडज्य कोडतात सदरहू वतनाची दरखास्त अर्जी केली त्याजवर साहेबाचा सेरा होऊन मज हुकुम मिलाला की तुजकडे वैवाट चालत आहे त्यास तुजवर हुकुमनामा होई तो पावेतो वतन सोडू नये. चालत आल्याप्रमाणे चालवावे असा हुकुम मिलाला तो मजपासी हजर आहे. असे असता

तारीख १२ मार्च सन १८२४ रोजी रजिस्टर कोडतात फगरे याने दरखास्त अर्जी करोन हुकुमनाम्याच्या ताकीद व सीपाई नेले आणि महालोमहाली गेले हे समजताच मी रजिस्टर कोडतात दरखास्त अर्जी केली त्यास फगरे याजवर अर्जी करावी असे सांगितले त्यास मजकडे वतन चालत असता व मजवर कोणाचा हुकुमनामा जाहाला नसता माझे वतन फगरे यासी द्यावे असा कोडताचा दस्तुर नाही व मज फगरे याजवर अर्जी करावयाचे कारण नाही फगरे याने कोडतातून सिपाई व ताकिदी नेल्यामुळे माझे वतनात हरकत होते याजकरिता साहेब मेहेरबान होऊन पेशजीची माझी दरखास्त अर्जी पाहून मजकडे वतन चालत आल्याप्रमाणे पेशजीचे दरखास्त अर्जावर हुकुम जाहला आहे. त्याअन्वये वतन चालविण्यास हुकुम व्हावा तारीख २२ माहे अप्रिल सन १८२४

इंग्रजी सेरा

सई–वरीलप्रमाणे आपटे यांची

सई साहेबाची

पे. द. पहाणी खर्डा जि. रत्नागिरी रुमाल क्र. ४३ ]

[ **लेखांक २१६**

पहाणी खर्डा बागायेत क॥ दाभोळ ता॥ पंचनदी प्रांत जंजिरे सुवर्णदुर्ग सु॥ खमस सबैन मया व अलफ नवकीर्द जमावणी सालेवार

नारो कृष्ण वोक रोपे लावणी सन सलास सबैन ठिकाण बोरीबांकर–रोपे ३ ( याखेरीज रामाजी हरी बिवलकर इ. बरीच ) नावनिसी कुलारग सालमजकुरी ऐन जाजती पेड कारल माड

| | पेड | सु॥ | रोपे | बारदार | नारळ |
|---|---|---|---|---|---|
| ( बरीच नावे झाल्यावर ) | | | | | |
| नारो कृष्ण वोक | ३ | ० | ३ | ० | ० |

पहाणी खर्डा बागायत मौजे गिम्हवणे ता॥ जालगाव प्रांत जंजिरे सुवर्णदुर्ग सु॥ खमस सबैन मया व अलफ ठिकाणे नावनिशीवार

नारो कृष्ण वोक झिटे २०
१ रोपा
५ पोफळी
यास रुजु गु॥ सन तिसा सितैन
१ नारळ माड रोपा पोफळी २५ पेड रोप

मोडक कुलवृत्तांत
पत्र ३१, पृ. ४७ ]

[ **लेखांक २१७**

अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य राजश्री नारो कृष्ण प्रो। सुवर्णदुर्ग गो। यास सेवक माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार सुहुर सन आर्बा सीतैन मया व अलफ सदाशिव रघुनाथ देशमुख मामले जाफराबाद सुभा दाभोळ याचे देशमुखीचे वतन चालते करून हक खुदामत प्रो। पाववीत जाणे म्हणोन गु॥ तुम्हास सनद सादर केली त्यास त्याचे अग्रवादी त्रिंबक नारायण व नारो राम या उभयतांचे काही नसता मुजाविला होतात तथाप मनसुबीस उभे राहून फडशा करून घ्यावा ते न करता बखेडा करून मालुमाती पत्र नेऊन वतन अमानत करतात परंतु कराराप्रमाणे हुजूर येऊन फडशा करून घेत नाही दोनचार वेळा खोटे जालेच आहेत लटका विक्षेप घालितात याकरिता सदाशिव रघुनाथ हाली हुजूर मौजे गुळसुंदे येथील मुक्कामी येऊन आपले वृत्त निवेदन केले व याचे विसी तुम्ही लिहिले त्यावरून हे पत्र सादर केले असे ऐशास गुदस्ता यास सनदेवरून हकाचे ऐवजी काही पावले आहे त्याचा जमाखर्च करणे आणि याचे वादे मनसुबीस उभे रहात असले तरी त्रिवर्गासही लिहून पाठविणे न्याय होय तो सालम।।रचे हकाचा ऐवज सदाशिव रघुनाथ याजकडे असेल तो तकुब असो देणे पुढे मनसुबीमुळे आज्ञा करणे ती केली जाईल वादे मनसुबीस हुजूर न येत तरी पेशजीचे सनदेप्रमाणे सदाशिव रघुनाथ याचे हातून वतनाची सेवा घेऊन हक पाववीत जाणे जाणिजे र ॥ छ १९ माहे शाबान मया हुजूर.

सिका

भावे घराण्यातील कागद
पराग मासिक नवं. १९४८ वर्ष २ अंक २ ]
श्री. य. न. केळकर यांचे कृपेने

[ **लेखांक२१८**

श्री

पो। छ १७ मोहरम

तीर्थरूप मातुश्री राधाबाई पेशवे[१] सेवेसी अपत्ये त्रिंबकराव विश्वनाथ सा।। नमस्कार विनंती वैद्यखान्याची वोझी २२ बावीस पाठविली आहेत बाळू वोक दि।। वैद्यखाना व नारायण गडकरी सिपाई ब।। दोन आहेत विदीत होय दुसरे दोन येकूण च्यार दिल्हे आहेत.

---

१. राधाबाई मृ. सन १७५३.

रा. ब. पारसनीस यानी केलेल्या नकला
बाजीराव बल्लाळ व बाळाजी बाजीराव कारकीर्द ]
रु. ३०९ Vol. १५ पृ. ७२७

[ **लेखांक २१९**

जमा जिन्नसखाना

जमा कमाविस भेट राजश्री नानास बाबत गोविंद शिवराम[1] नि॥ खासगी याणी च्याहा नजर केला तो जमा गु॥ बालाजी नरसी ओक दिम्मत वैद्यखाना च्याहा वजन पक्के ८८॥।. बरणी जस्ती सुमार १

पे. द. द. कोकण रुमाल ६५१ ]

[ **लेखांक २२०**

राजमंडळ

सु॥ सबासितैन मया व अलफ[2]

हा। देणे. बाळू वोक हरकारा नि॥ वैद्यखाना याचे बायकोस बाल पर्वेसी साल गु॥ची हुजूर पावली त्याप्रो। साल-मजकुरापासून तुम्हाकडून रु. ४५ पंचेतालीस रुपये देविले असेत तरी देणे पंचमाहालचे ऐवजपैकी दरसाल देत जाणे म्हणोन रामाजी माहादेव प्रांत कल्याण यांचे नावे सनद १

पे. द. उ. कोकण रुमाल ७८० ]

[ **लेखांक २२१**

सन समान सबैन मया व अलफ[3]

हिसेब परगणे साकसे तो। नेरळ पो। तर्फा तीन नि॥ भास्कर लक्ष्मण

१०० छ ३० सव्वाल मु॥ पुणे वि॥ जनार्दन अप्पाजी ब॥ देणे बाळाजी नरसी कारकून शिलेदार याचे स्त्रीस बाल पर्वेशी सन सीत सबैना प्रो। सन सबा सबैनची रसानगी यादी म॥निल्हे याजकडून.

---

१. गोविंद शिवराम खाजगीवाले ( लिमये ) इंग्रज, होळकर, निजाम याजकडील वकिलीची कामगिरी. सन १७५९ मधे इंग्रज वकील पुण्यास आले त्यांचेशी बोलणे गोविंदपंताचे मार्फत झाले. मृ. २९-४-१७७२ काळपुळीत ( मध्ययुगीन चरित्रकोश )

२. सन १७६६-६७

३. सन १७७७-७८

पे. द. उ. कोकण रुमाल ७८० ] [ लेखांक २२२

राजमंडल

खमस समानीन सबा व अलफ[1] स्वारी रा.

जमा साल मजकूर पो। साकसे वसूल जमा परभारे बा। हिसेब खेरीज मु।। जान परवेसी—नक्त बाळू वोक हरकारा निसबत वैद्यखाना याचे स्त्रीस इतलाख नेमणूक रु. ४५

ल ल

औंकार संग्रहातून ] [ लेखांक २२३

श्रीगजानन

चिरंजीव राजश्री कृष्णाजी वोंकार याप्रती बाबूजी गणेश वोंकार आशीर्वाद उपरी तुम्ही पत्र पाठविले ते पावले तुम्ही लिहिले की सुभाना बरोबर जाब व हिशोब पाठविणे त्यावरून पा।। ते पावेल तुमचे लिहिल्याप्रमाणे पाठविले आहे रुपया १ ) पा।। आहे चंदनाचे खोड उत्तम घेवून येणे रा ।। वैद्यास पाठविला दाना पा। वैराण तो घेणे सर्व वर्तमान सुभाना सांगता कळो येईल बहूत काय लिहीणे हे आशीर्वाद शके १६७२ आषाढ[2] शु।। ९.

ल ल

औंकार संग्रह ] [ लेखांक २२४

श्री

चिरंजिव राजश्री लक्ष्मणपंत ओक खोत मौजे बामणोली व वाघिवली यांस प्रती बाबूजी गणेश वोंकार आसिर्वाद उपरी येथील कुशल ता।। कार्तिक वा।। २ पावेतो[3] सुखरूप असो विशेष मौजे बामणोली व मौजे वाघीवली ता. हवेली तालुके अंजणवेल हे दोन गांव वतनी खोती निमे तक्षीम तुमची व निमे आमची वडीलोपार्जीत आहे त्याची सर्व वहीवाट तुम्ही करीत आला हली आमचे निमे तक्षीमेचे कामकाज राजश्री भास्करपंत वोक सिवनकर यांजकडे सांगितले आहे. तर निमेची वहिवाट मा।रनिल्हेकडून आमचा अैवज आम्हास पावता करतील निमेची वहीवाट मारनिल्हेकडे चालविल्यास नवदिगर करू नये बहूत काय लिहीणे हे आसिरवाद

---

१. सन १७८४–८५

२. दि. ?-७–१७५०

३. दि. ३०-१०–१७६५

सदरहूचे असल पत्र रा. आपाभटजी वोक अनगावकर याजपासी आहे म्हणोन सांगुन नक्कल दाखविली त्याची नक्कल ही करून घेतली विद्यमान वो।। रा।. महादेवभट वोक अनगावकर आप्पाभट यांचे पुतणे शके १७५० सर्वधारी नाम संवत्सेरे कार्तिक[1] व।। ३ सोमवार.

ओंकार संग्रह ] **लेखांक २२५**

श्री

राजश्रीया विराजीत राजमान्य राजेश्री लक्ष्मणपंत वोक खोत मौजे बामणोली स्वामींचे शेवेशी पो।। भास्कर गणेश वोक सिवनकर सा।। नमस्कार विनंती उपरी येथील कुशल तागाईत मार्गशिर्ष शु. ५ पावेतो[2] सुखरूप असो विशेष मौजे बामणोली व मौजे वाघीवरे ता. हवेली ता. अंजणवेल हे हरदू गांव खोतीने तुम्हांकडे व रा।। बाबूजी गणेश वोंकार याजकडे वडिलोपार्जित वतनी आहेत- ह्याची सर्व वहीवाट तुम्ही करीता साल-मा।।री आम्ही पुण्यास गेलो होतो ते समई ओंकार यांची भेट जाली त्याणी कृपा करून मजकडे त्यानी आपले तक्षीमेचे कामकाज सांगितले. आणि तुम्हास पत्र दिल्हे आहे ते हाली मुदाम आपणाकडे पाठविले आहे मीच येणार होतो परंतु आठच्यार दिवस शरिरास विकृती जाहाली आहे किंचित आरोग्य जाहाल्यावर भेटीन तुमचे तक्षीमेचे काम तुम्ही करावे ओंकार याणी आम्हाकडे निमे काम सांगितले आहे त्याप्रमाणे आम्ही करून मा।।रनिल्हेचा ऐवज होईल तो त्यांकडे पाठवित जाऊ सारोष ओंकार याचे निमे तक्षीमेचा वसूल आम्ही येईतो पावेतो घेवू नये कलावे बहूत काय लिहिणे लोभ करावा हे विंनंती.

सदरहू असलपत्र महादजी नारायण वोक वस्ती आतगाव याजपासी आहे. याची नकल घेतली मि. शके १७५० कार्तिक[3] शु ।। १४

ओंकार संग्रह [ **लेखांक २२६**

श्री

राजश्रीयाविराजीत राजमान्य राजश्री नारोपंत वोक मौजे बामणोली स्वामीचे शेवेसी पो ।। भास्कर गणेश वोक सिवणकर सा।। नमस्कार विनंती उपरी येथील कुशल

---

१. सन १८२८ दि. १३-११

२. दि. १७-११-१७६५ ३. दि. २०-११-१८२८

ता। पौष शु। २ पावेतो सुखरूप असो विशेष आपणाकडून आसिरवाद येवून समाचार कलत नाही. त्यास सविस्तर लिहून पाठवावे यानंतर मौजे बामणोवली व वाघीवरे ताा. हवेली ताा. अंजणवेल हा गांव वतनी तुमचे व वोंकार यांचे निमेनिमे आहे त्यास हली वोंकार याजकडून निमेची वहीवाट राजश्री बाबाजी करंदीकर याकडे आहे त्यास दोन्ही वहीवाटी येक ठिकाणी चालल्यास गावाचा बचाव होईल त्यास चिरंजीव राजश्री केसोपंत वोक याजबरोबर आपणास पत्र पो। आहे त्यास आपली वहीवाटीचे काम आमचे-कडेस सांगावे व पत्राचे उत्तर माारनिल्हेकडे दिल्हे म्हणजे आम्हास पोचते करतील कळावे बहूत काय लिहीणे लोभ करावा हे विनंती.

ओंकारसंग्रह [ लेखांक २२७

श्रीगजानन

राजेश्रीयाविराजीत राजमान्य राजेश्री लक्ष्मणपंत वोक खोत मौजे बामणोली स्वामीचे शेवेशी पो।। भास्कर गणेश वोक खोत सिवणकर सा। नमस्कार विनंती उपरी रोा बाबूजी गणेश वोंकार याचे पत्र आम्हीं तुम्हास निमे गावचे कामकाज त्यांचे तक्षीमेचे आमचे हावाली करावे म्हणोन आणिले त्याजवरून तुम्ही आम्हास काम वोंकार यांचे सांगितले त्याप्रमाणे वोंकार याचे निमे हिश्याचे काम करितो मीती चैत्र शु ।। १० शके १६८८ व्ययनाम संवत्सरे.[1]

साक्ष

१ ) लिहिल्या प्रमाणे म्हातोजी तांबे वस्ती मौजे मजकूर २ ) लि।। प्रमाणे संभाजी कदीव वस्ती मौजे बाघिवरे

३ ) लि।। प्रमाणे हिरनाक महार वस्ती मौजे मजकूर ४ ) लि।। प्रमाणे तान्हाजी किलबीला वस्ती मौजे मजकूर

नक्कल महादजी नारायण वोक वस्ती अनगावकवाड याजपासून घेतली मि. शके १७५० कार्तिक शु. १४ गुरुवार.[2]

ओंकार संग्रह [ लेखांक २२८

श्री

राजश्रीया विराजीत राजमान्य राजश्री बच्याजीपंत आण्णा मोडक मु।। दाभोळ स्वामीचे सेवेसी पोा मोरो चिंतामण वोंकार खोत मौजे बामणोली व वाघीवरे ता।। हवेली

१. दि. ४-५-१७६६ २. दि. २०-११-१८२८

तालुके अंजणवेल व देसाई तालुके मजकूर सा. नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लिहीत जावे विशेष राजश्री बाजीपंत दादा वोक खोत सिवणकर हे साल पेस्तरी खासगत सेत भात मजकुरी करणार आहेत. त्यास चालीप्रमाणे यास सेत-भात करू द्यावे यांचा आपला दुसरा विचार नाही तुम्हास कळावे.

ओंकार संग्रह [ **लेखांक २२९**

श्री

याद मोरो चिंतामण व विनायक चिंतामण वोंकार खोत मौजे बामणोवली व वाघीवरे ता॥ हवेली हमजाबाद तालुके अंजणवेल सुमा तिसा असरीन मयातैन व अलफ[1] वो॥ राजश्री महादेव भट बिन नारोपंत वोक वस्ती अनगांव प्रांत कल्याण याच्रा व आमचा वतनसंबंधे घरगोती समजोतीचा ठराव कलमे बीतपशील...... २.......

( १ ) मौजे बामणोवली व वाघीवरे ता॥ मा॥र यथील खोतीची वतनी पुरातन चालत आली आहे अलीकडे मोडक बैवाटदार यांचे मिलाफाने सिवणकर वोक यानी मोडक यांजपासोन सेत करावयास म्हणोन जमीन मागोन घेवून गावात घरटा बांधून सेत करू लागला आणि खोतीची तक्षीम माझी म्हणोन वारसा सांगतो यास्तव तुम्ही व आम्ही येक विचारे त्यासी वाद सांगून त्यास खोतीचे हिश्यातून बाहेर काढून द्यावा कलम १

( १ ) सिवनकर याचा अितला खोतीतून निघाल्यावर तुमचा व आमचा विभाग पुरातन पासून चालत आला असेल त्याचा दाखला कागदोपत्री वडिलार्जित निघेल त्या-प्रमाणे तुम्ही ब आम्हीं वतनी खोतीची वैवाट करावी कोणी कोणासी प्रतरणा करु नये वाद संबंधे खर्च वेच जसा पडेल तो जसा हिसा मागील कागदोपत्री ठरेल त्या हिश्या-प्रमाणे अुभयतानी द्यावा कलम १ .......कलमे २

येकूण कलमे दोन सदरहू लिहील्या प्रमाणे अुभयतानीं चालावे येणेप्रमाणे करार मिती माघ शु॥ २ गुरुवार शके १७५० सर्वधारी नाम संवत्सरे[1] सन १२१८ मु॥ पुणे हस्ताक्षर परशराम बापूजी जोशी कसबे पंचनदीकर तो॥ सुवर्णदुर्ग
सदरहू प्रौ॥ मान्य मोरो चिंतामण वोंकार हस्ताक्षर
सदाशिव मोरेश्वर वोंकार यासी मान्यता सदर प्रो॥ मान्य महादेव
सदरहू प्रो॥ मान्य विनायक भट बिन नारोपंत वोक
चिंतामण वोंकार दस्तुर खुद. अनगावकर दस्तुर खुद

---

१. दि. ५-२-१८२९

साक्ष
यादी प्रमाणे साक्ष सखाराम परशराम वैद्य महाजन मौजे अंजनवेल व रातसी ता॥. गुहागर तालुके अजंणवेल मुक्काम पुणे दस्तुर खुद अुभयता धनी रुबरी

सदरहू प्रो॥ साक्ष नारो महादेव नाफरे हली वस्ती पुणे दिमत भिलाजी जनार्दन आटोले.

ओंकार संग्रह.

[ लेखांक २३०

श्री

पैवस्ती कार्तिक[१] व॥ ८
शके १६७१

बाबूजी नाअीक वोंकार यास पत्र त्यांचे मातोश्रीचे कासीहून आलेते.

श्रीसहस्त्रायु चिरंजीव विजयीभव मारकंडी यांचे आयुष्य राजश्री बाबूस दुरगाबाअी वोंकार कृतानिक आशिर्वाद अुपरी येथील क्षेम ता॥ आषाढ[२] वद्य १० जानऊन तुम्ही आपुले क्षेम निरंतर लिहीत जावे विशेष येथून दोनीचार पत्रे पाठविली ते पावली असतील त्यास तुम्ही अेकही पत्राचे अुत्तर पाठविले नाही तरी अैसे न करणे सुख पत्रद्वारा सविस्तर लिहीत गेले पाहिजे आलीयास सात आठ भरली तुमचे काही सुखसमाचार आला नाही याज करीता चिंता लागली आहे आपन येथे आलीयासी मनुबाअीने सेदोनीसे रुपये कर्ज केले होते ते दिधले पुढे आपणास खर्चाची बहूत तगचाअी जाली आहे अेक पैशाचा रोजगार चालत नाही. दिवस बहूत कठीण आले आहे अैसीयास कासीचे राहावे लागते जो विचार आहे तो पैकीया वेगळा दिवस चालत नाही अैसीयास येजमानाही दोनसे रुपये देण्याचे नेमस्त केले आहेत तेही सत्वर पाठवून देणे गैइ न करणे पैका आधी आधी पाठवून देणे व घर बहुत जीर्न जाले आहे दक्षीणेकडील अेक पडदा पडला आहे अैसीयास वाड्याचे काम लावाल तरी अिमारतीस काम चालविले जाअील अगर वाडाच कोन्हास देवून टाका म्हनाल तरी तैसेच लिहीणे तुमच्या लिहीण्याप्रमाणे काम केले जाअील तरी आधी लेहून पाठविणे आपण जाते वेलेस सुरजीमधे सेदोनसे रुपयाची वस्तभाव गेली कलले पाहीजे बहूत काय लिहीणे हे आशिर्वाद.

सौ. वज्रचुडेमंडीत सुनबाअीस अनेक आशीर्वाद अुपरी तुम्हीं चिरंजीव बाबूस सांगून आपले त्यास लिहीले आहे त्याप्रमाणे करविने माया लोभ नवा कीजे. हे आशिर्वाद

१. दि. २१–११–१७४९ २. दि. २८---६---१७४९

सेवेसो वैजनाथाने चरणावरी मस्तक ठेवून सा. नमस्कार कृपा लोभ असो देने है विनंती चिरंजीव गंगाराम व चिंतामणी व सौ. आवडी† मनीस * अनेक आशीर्वाद सांगने.

ओंकार संग्रह ] [ **लेखांक २३१**

श्री

श्रीयासह चिरंजिव राजश्री बाबूजी यासी दुर्गाबाअी आशीर्वाद अपुरी येथील कुशल पौष शुद्ध पंचमी[1] मुक्काम काशी जाणून स्वकीय कुशल लेखन करणे तुम्हाकडील पत्र येअुन कुशल वर्तमान सवा वरीस कलत नाही आम्ही येथून तुम्हास पांचसात पत्रे पाठविली परंतु अेकाही कागदाचा जाब आला नाही अपूर्व वाटले फुकाचा कागदही सुखी आहा म्हणून ल्याहाना हा पुत्रधर्म तुमचा आहे की काय या अुपर सविस्तर लीहिणे घर निट करावे लागते जीर्ण झाले हा तपशील तुम्हास पाचसात वेळा लिहीलाच आहे. याअुपर पैका पाठविणे घर नीट करु नाहींतर घराची विल्हे काय करावयाची ते करणे म्हणजे तुम्हास ठाव मिलेल तेव्हा लोकाचे घर राहावयास अुमगू अितके ल्याहा-वयास कारण याच घरात राहावयाचा आडोसा पुरत नाही पैका पाच सात हजार रुपये पाहीजेत त्याची बेगमी करून घ्याल तर नीट करू सौसाराची बेगमी कराल तर तुमची भावजअी भाऊ यांचे सौरक्षण करुन करा तरी त्यांची व घरांची काय विल्हे करायची ते करणे आम्ही आपले संकट तुम्हास घालीत नाही. तुम्ही पुत्र आमचे सौरक्षण जीता करावे म्हणजे अिहलोक परलोक तुम्हास अुत्तम अन्यथा लौकीकांत तुम्हास हांसतील अिस्वराचे पाय धरून तुम्ही जे वर्तणूक करावयाची ते करणे जबानी हरलाला तुम्हास सांगेल. याणे घर अगदी पाहीले आहे सौंसारिकास दाणादुणा द्यावयास रुपया नाही. तुम्ही पाठवाल तेव्हा येथील बेगमी होअील लोभ असो दिजे हे आशिर्वाद.

चिरंजीव दिनानाथाजी[2] यासी आशिर्वाद अुपरी चिरंजीवांचे पत्री लिहीले आहे त्या वरून कलेल बेगमी करून पाठवाल तर येथील घर व सौसार होअील हे आशिर्वाद

---

† आवडाबाई मेहुणपुऱ्यातील रास्ते यास दिली १७४० मधे ही लग्नायोग्य होती. चिमाजी अप्पा पत्रावरून.

१. सन १७४० ते १७५० चे दरम्यान    २. फणसे

* मनाबाई—चिंतामण दादासो॥ ओंकार यांची मुलगी. गोविंदराव बाबा गोखले याना दिलेली–इने शके १७४०–४१ दरम्यान म्ह. सन १८१८ मधे सहगमन केले.

चिरंजीव सौ सुनबाओस आशीर्वाद लिहील्याप्रमाणे घराची व सौसाराची विचाराची तजवीज करणे राजश्री नाओक बहूत आशक्त जाले आहेत तुम्ही एकदा येअुन भेटून जाणे हे आशिर्वाद.

चिरंजीव गंगाराम व चिंतामण व मुलीस आशीर्वाद

ꣻ ꣻ

ओंकार संग्रह ] [ **लेखांक २३२**

श्री

श्री चिरंजीव विजयीभव राजमान्य राजश्री दिनानाथजी फनसे यास दुरगाबाओ वोंकार अनेक आशीर्वाद अुपरी येथील क्षेम आषाढ वद्य १० जानुन तुम्ही आपुले क्षेम निरंतर लिहीत जाने अुपरी आम्ही चिरंजीव बाबूस लिहीले आहे तरी तुम्ही त्यास पत्रार्थ वाचून दाखवून लिहील्याप्रमाणे विचार करून अुत्तर पाठवणे आपण येथे आलीयास दोनीचार पत्रे चिरंजीव बाबूस लिहीली परंतु अेकाही पत्राचे अुत्तर पाठविले नाही तरी त्यास सांगून सुखसमाचार पाठविणे व आम्हास खर्चास यजमानाचे वरसासन आहे ते पाठअुन देने गओी न करणे बहूत काय लिहीने हे आशीर्वाद

ꣻ ꣻ

ओंकार संग्रह ] [ **लेखांक २३३**

श्री गजानन

पौ। शके १७६० मार्गशीर्ष[1] शु १२

शतायु चिरंजीव राजमान्य राजश्री बाबासा। वोंकार यासी प्रती रामाजी महादेव आशीर्वाद येथील कुशल ताा कार्तिक शु ११ पोा तुमचे कृपा व लोभवणेकरून मुा बऱ्हाणपुर येथे चिरंजीव भिअुबाओ जवळ सुखरूप आहे यानंतर तुम्ही पत्र पाठवून समाचार आमचा घेतच नाही कारण मिळून लग्नप्रसंगामुळे असो परंतु माझा वृद्धापकाळ पासष्ट भरत आली भरवसा शरीराचा नाही ती. कैलासवासी गणोबा नाओक व ती. कैलासवासी केसोबा नाओकांची मातोश्री या अुभयता पासून तुम्हापरीयंत पांच पिढया श्रीगजाननाचे कृपेकरून समाचार सर्वस्वी घेअुन पाली ग्रहण केले त्यास स्वामीत्व आपलेकडे सेवकत्व मजकडे याजमुळे आपराध कोटयानकोटी होतच आहेत क्षमा आपण पुस्तदरपुस्त करीत आलात याची लज्या तुम्हा खेरीज दुसऱ्या कोणास नाही ( वगैरे मजूकर आहे)

ꣻ ꣻ

---

१. दि. २८-११-१८३८

श्री. य. न. केळकर यांचे कृपेने
वासुदेव मुरुडकर यांचे फेरिस्त ]

[ **लेखांक २३४**

शके १६६५ रुधिरोद्गारी नाम संवत्सरे[1]

९००० बाबूजी गणेश ओंकार मु॥ घेतले रुपये यासी
व्याज दर माहे दर सदे येकोत्राप्रमाणे देऊ
मिती ज्येष्ठ[1] शु॥ ७ बीकलम खुद.

पे. दप्तर ९ बाजीराव कौटुंबिक
पृ. ९ पत्र क्र. २८ ]

[ **लेखांक २३५**

चिमाजी अप्पांचे सर्व पत्र स्वहस्ताक्षरात. दि. २२-११-१७४० चे,

श्री

आशीर्वाद उपरी रा॥ बाबुजी नाईक वोंकार याची मूल रास्ते यांच्या मुलास देणार म्हणून वर्तमान ऐकिले. त्यावरून रा॥ कृष्णाजी नाईकास व बाबूजी नाईक वोंकार यास मातुश्रीबाईस ती मूल रघुनाथासाठी राहवणे यैसी पत्रे पाठविली आहेत. मूल रास्ते यांच्या मुलास देणार नाहींत रघुनाथाच्या लग्नास तीथ याच कार्यात योजली तर याच कार्या-बरोबर तेही कार्य करावे लागेल जर तूर्त तीथ न योजली तर पुढे लग्न केले तर कार्यास येईल. परंतु मूल चांगली हातची जाऊ न द्यावी यैसा रायाचा सिद्धांत आहे. रा॥ बाबूजी नाईक जोसीहीं मागून येथून येत आहेत ते मूल रघुनाथासाठी राखून ठेवतील. छ ३ जिल्काद रास्ते यांचा मूल येईल त्यास दुसरी मूल योजून लग्न ठरवितील हे आशिर्वाद.

ओंकार संग्रह ]

[ **लेखांक २३६**

दरबार मुलकी डिपार्टमेंटकडे अर्ज केले प्रो। ता. १६ माहे सप्टंबर सन १८८४ इसवी रोजी हुजूर स्वारी लाल बागेत असता अर्जदार विनायकराव बल्लाळ हजर झाले.

अर्जासोबत नपी केलेल्या नकलांचे अस्सल कागद तसदीफ करण्याकरिता तलब केल्यावरून अर्जदारांच्या पूर्वजांकडे श्रीमंत पेशवे सरकार नागपूरचे भोसले पिलाजी जाधवराव व विठ्ठलराव नरसिंह व सिवाजी विठ्ठल विंचुरकर बारामतीकर याजकडून आलेले कागद पेश करून त्याच्या नकला हजर केल्या ते कागद पाहाता यांच्या पूर्वजा-संबंधी दिसून आले ते खाली लिहीत आहे नकला नपी आहेत.

---

१. दि. १९-५-१७४३

पेशवे सरकार श्रीमंत बाजीराव बल्लाळ व बाळाजी बाजीराव व माधवराव बल्लाळ सदाशिव चिमणाजी व विश्वासराव बल्लाळ याजकडून अर्जदाराच्या पूर्वजांचे नावे व पूर्वजांच्या संबंधात लिहिलेले कागद आहेत त्याजवरून ओंकार हे पेशवे सरकारचे आप्त असून त्याजकडे संस्थान नरवर येथील मजमूची आसामी व कन्नड फुलंबरी येथील कमाविसदारी होती व मोहिमेबद्दल दरसाल रुपये ५००० सालिना मिळत होते व दसऱ्याची वस्त्रे याजकडे पाठविली जात असत व हिंदुस्थानचे स्वारीत येण्याविषयी लिहिलेले आहे व याजला लग्नकार्यात आमंत्रणे होऊन आणण्याकरिता पालख्या घोडी जात होती असे कळते रघोजी भोसले साहेब याजकडील कागद आहेत त्याजवरून बिंबाजी भोसले याजकडील मजमूची मुतालिकी सालिना रुपये ५००० ची गंगाधर नाईक याजला दिली असोन मा।रनिल्हेचे स्वार भोसले सरकारच्या नोकरीत होते असे कळते व मौजे पिंपरी परगणे कायरगाव प्रांत वराड येथील मोकासा दरोबस्त याच्या पूर्वजास दिला असे दिसते. पिलाजी जाधवराव व सटवाजी जाधवराव व जोत्याजी जाधवराव व मलोजी जाधवराव याजकडून...नरवर पो। पोहोरी पो। सिवपुरी पो। कुलारस व पो। विज्यापूर येथील पोतदारी मोकासा बाबेच्या आकारापैकी दर सदे रुपये दोन प्रो। करून दिली असोन नरवर प्रांताचे कमाविसदारी याजकडे होती संभाजी जाधवराब व मलोजी जाधवराव हे चिंतामण नाईक ओंकार यास वडिलांप्रमाणे मानीत असत व मशारनिल्हे जाधवराव याजकडून दरसाल रुपये ११५० प्रो। नेमणूक याच्या पूर्वजास मिळत आहे असे दिसते विठ्ठलराव नरसिंह व सिवाजी विठ्ठल विंचुरकर याजकडून पो। अष्टे व सिद्धूर येथील पोतदारीचे काम यांचे पूर्वजांकडे होते असे विषयी कागद आहेत व बाबुराव सदाशिव व पांडुरंगराव बाबुराव बारामतीकर याजकडून लि। कागद आहेत त्याजवरून याच्या पूर्वजाकडे कर्नाटक प्रांताची पोतदार दर सदे १ रु. प्रो। परगणे सुतोडा व परगणे पागरी येथील पोतदारी असल्याचे दिसोन येते आहे येणेप्रमाणे सदरहू कागदातील तात्पर्य आहे इ.... ता. २४ माहे अप्रेल सन १८८५.

बलवंतराव मल्हार फडणीस हुजूर
बलवंतराव अनंत
( जमाबंदी खजिना ) मु. नं. ९

फडणिशीकडील शेरा जावक नं. ४८९

नंबर $\frac{१०५५}{१८८५}$ इसवी

जमाका।। नंबर २१२७

पे. द. घडणी रुमाल ३९९ ]

[ **लेखांक २३७**

शके १७०७ सु॥ सीत[1]

राजमंडल

स्वारी राजश्री पंतप्रधान सरनामा नि॥ बाबूजी नाईक ओंकार साहुकार दफाते पत्रे– छ २२ मोहरम ऊर्फ कार्तिकमास[१] मशारनिल्हे याचे कापड वगैरे जिन्नस खरेदी करून पुण्यास व वाघोलीस आणतील त्यास आणू देणे जकातीचा तगादा न करणे म्हणोन साल गुदस्ताप्रमाणे साल मजकूर दस्तके ५ कापड आणतील त्यास आणू देणे कोणे विसी मुजाईम न होणे वस्तीस रहातील तेथे चौक्या पहारा करणे नदीनाले पार करीत जाणे म्हणोन दस्तक

१ प्रो॥ दस्तक बैलसर ५ पाच नारायण पेठेतून आणतील त्याविसी
१ प्रो॥ दस्तक बैलसर ५ पाच जालनापुराहून आणतील त्याविसी
१ प्रो॥ दस्तक बैलसर ४ चार पैठणाहून आणतील त्याविसी
१ प्रो॥ दस्तक बैलसर २ दोन औरंगाबादेहून आणतील त्याविसी
१ प्रो॥ दस्तक बैलसर ५० पन्नास व उंट नफर १५ पंधरा व घोडी रास पाच कापड वगैरे जिन्नस हिंदुस्थानातून नरवराहून आणतील त्याविसी

५

१ प्रो॥ बैलसर ५० पन्नास खो॥ फिरगाण कोकणातून तांदूळ खरेदी करून आणतील त्या विसी
१ प्रो॥ दस्तक तूप जोडया सुमार १० दाहा खानदेशातून आणतील त्याविसी
१ प्रो दस्तक हरजिन्नस गला कैली खंडी २५ पंचवीस गंगथडीहून आणतील त्याविसी

८ एकूण आठ दस्तके दिली असेत.

( याप्रमाणे दस्तके सन १७७० व नंतरची १६–१७ वर्षांची आहेत. )

ओंकार संग्रह ]

[ **लेखांक २३८**

श्री

अर्जि बा॥ मोरो चिंतामण व विनायक चिंतामण वोंकार सुमा खमस असरीन मयातैन व अलफ पो॥ फुलंब्री येथील सरदेशमुखीकडे आम्हास संसार बेगमीस पांचहजार

---

१. दि. २५-११-१७८५

रुपयाची नेमणूक आहे. त्याप्रमाणे साहेबाणी चालविण्याविसी हुकुम सन १२३१ फसलीत दिल्हा त्याप्रमाणे मोगलाअितून हुकुमाप्रमाणे दुसाला अवजही पावला त्या कामावर आम्हाकडून कारकून रामाजी महादेव औरंगाबादेस मामलेदार यासपासी आहे. त्याणे दोन सालांचा अैवज नेमणुकीचा पदरी पडला त्यात आमच्या हुकुमाखेरीज हजारदोन हजार रुपये तसनस केली. स॥ त्याजकडून काम दूर करून दुसरा कारकून पाठविला आहे परंतु रामाजीपंत याणी आमच्या पत्राप्रमाणे पुण्यास न येता मामलेदारास मिलोन बखेडा करतात. याजकरिता येथून दुसरा कारकून पाठविला आहे. त्याजकडे अैवज सालाबाद प्रमाणे देवून रामाजीपंतास पुण्यास पाठवून देण्याविसी औरंगाबादचे साहेब यांसी ताकीद द्यावयाविसी हुकुम जाला पाहीजे. ( वरती सेरा ) सदरहू मजकूराविसी औरंगाबादेस जावून जाहीर करणे ता. १६ जूलै सन १८२४ सही अिंग्रजी चापलीन

ओंकार संग्रह] [ **लेखांक २३९**

श्री

पौ मिती चैत्र[1] शुध १ शके १७४६
डाकवर आला

राजश्री मोरोपंत व विनायकपंत ओंकार गोसावी यासी अखंडीत लक्ष्मी अलंकृत राजमान्य श्री व्यंकुसा बुलाखीदास जयगोपाल विनंती वि. अुपरी येथील कुशल जाणुन स्वकिये कुशल लेखण करावे विशेष आपण वेदशास्त्रसंपन्न राजश्री आप्पा दीक्षित याचे वि॥ पत्र पाले ते पासून माार कलला राजश्री रामाजीपंत आपले कारकून सालमजकुरी दूर जाले येविसीचे लिहीले ते समजले अैसीयासी आम्ही भागानगरीहून आलोत सरकारचा अंदाजा होणे राहीला आहे तो मागाहून येणार आलीयावर त्याप्रमाणे आपणास लिहीन्यांत येअील सदैव पत्र पाा संतोषवित जावे तुमचेविसी दुकाणीहून व नरसीदास आमचे गुमास्ते यानीही लीहीले होते आंदाजा आल्याप्रमाणे आपणास लिहून पाा कलावे बहूत काय लिहीणे लोभ करावा हे विनंती

ओंकार संग्रह] [ **लेखांक २४०**

श्री गजानन

यादी नेमणूक साल समंधे गुजाऱ्या माफक द्यावे सुमा सित असरीन मयातैन अलफ शके १७४७ कार्तिक[1] शु॥ १

---

१. दि. ३१-३-१८२४

| | |
|---|---|
| खुद मालक | १ कृपानाथ जगन्नाथ फणसे अैन आख ३०० रुपये |
| परभारे पावते | १ उमाकांत आंबादास सुरंगळीकर वेतन खामगांवी आहे रुपये १७५ |
| दिवस नादारी मुळे अन्नवस्त्र द्यावे | १ रामाजी माहादेव वोक अैवज रुपये ४९९ |

Agent's file No. 9
पेशवे दप्तर

[ लेखांक २४१

Memorandum from Moro Chintaman Omkar to Rt. Hon Governor in Council dated Bhyadrawad 2nd Shukla 1754 i. e. 1832 A. D.

I beg to state that when the sister of the late Peshwas Nanasaheb and Bhausaheb was married to my paternal uncle Gangadhar Naik their Highnesses were pleased to grant a nemnook of 5000 Rupees from the parganas of Kunnar & Foolumbry Prant Aurangabad on account of their Babtee and Serdeshmukhi collections to my grand father Babooji Naik Omkar for his and family's support which we enjoyed..........

Moro Ghintaman & Vinayak Chintaman

Gangadhar    Balwant    } between 1834 & 1847

Application by the two nephews Gangadhar and Balwent for their share between themselves on one hand and Moro Chintaman on the other.

---

१. दि. ११-११-१८२५

ओंकार संग्रह
ओंकारांचे कृपेने ]

[ **लेखांक २४२**

श्री
राजाशाहू छत्र
पती हर्ष निधान
बाळाजी बाजीराव
मुख्यप्रधान

आज्ञापत्र समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री बाळाजी पंडितप्रधान ता। मोकदम मौजे खराडी ता। हवले प्रा। पुणे सु।।सन समान अर्बेन मया व अल्फ राजश्री गंगाधर नाईक वोंकार यास मौजे मजकूर पैकी जमीन चावर '।।' निमे देविले असे तरी मा।।निलेनी विहीर खटली आसे तेथे सदरहू निमे चावर जमीन अवलदुमसीम तीही प्रतीची खेरीज अिनामदार नेमून जाणिजे. छ २२ सफर आज्ञाप्रमाण.

लेखन
सीमा

[ **लेखांक २४३**

श्री

श्री
राजाराम नरपती
हर्षनिधान माधव
राव बल्लाळ
मुख्यप्रधान

राजश्री सटवोजी जाधवराव गोसावी यास

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नो। माधवराव बलाल प्रधान आशीर्वाद उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहिणे विशेष बदल देणे राजश्री बाबूजी नाईक वोंकार यास सवसाराचे बेगमीस रुपये ५००० रु। पाचहजार सालाबाद नेमणूक प्रमाणे पावत आहेत त्याप्रमाणे साल मजकुरी करार करून सनद सादर केली असे तरी बाबती

सरदेशमुखीचे अैवजी अखेर हप्तेपावेतो सदरहु अैवज पावता करून पावल्याचे कबज घेणे जाणिजे छ १३ रजब सु॥ सन सलास सितैन मया व अलफ बहुत काय लिहिणें.

| लेखन सीमा |

बार

—०—

श्री

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री गोपाळ बल्लाळ का॥दार प्रो॥ फुलंबरी गोसावी यास सेवक माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार सु॥ इहिदे सबैन मया अलफ राजश्री चिंतामण बाबूजी वोंकार यास पो॥ मजकुरी पोतदारी पेशजीपासून आहे त्याप्रमाणे हाली करार करून हे सनद तुम्हास सादर केली असे तरी मा॥निलेकडील कारकुनाचे हाते पोतदारीची सेवा घेऊन तैनात सालीना पेशजी प्रो॥ रुपये २०० दोनसे रुपये प्रो॥ मजकुर अैवजी पावीत जाणे जाणिजे छ २४ रजब आज्ञाप्रमाण

| लेखन सीमा |

[ **लेखांक २४४**

फार्सी अक्षरे सोनेरी

| शिक्का आलमगीर बादशहाचा फार्सी |

अलमगीर बादशहा याचा फर्मान नबाब निजामलीखान याचे नावे सादर जाहला की मौजे दुधड अनोद परगणे पिंपरी सरकार दौलताबाद सुभे खुजस्तेबुनियाद आवरंगाबाद या गावचा चौथा हिस्सा कदीम अमल आपाजी जाधव याच्या अमलापासोन अिनाम चिंतामण वलद बाबू वोंकार याजला प्रो॥ आहे सांप्रत मा॥नुले येऊन तहकीक अर्ज केले त्याजवरून हा हुकुम तुम्हास लिहिले असे की मौजे मा॥रचा आकार रूपये ७००० सात हजार रुपये मा॥निलेस अिनाम पुत्रपौत्रादि करून वंशपरंपरा चालू करावे तर हा हुकूम

खुबा समजून चालू करावे आणि बनाबजुह मुजाहीम न होणे व फर्मान वगैरे पादशाही काही असलिया हुजूर न करावे आणि |तेथील कामदार लोक असतील त्याणी कोणे विसी उपसर्ग न करणे दरिबाब ताकीद म्हणोन तारीख १४ माहे सबाल सन १४ जुलुसी सु॥ सन खमसेन मया व अलफ हिजरी सन ११८६ फसली ११७९ शके १६९१ अिसवी सन १७६९

बादशाही
मोर्तब

ꣻ ꣻ

पे. द. हिंदुस्थान जमाव रुमाल ८ ] [ लेखांक २४५

श्री

वेदमूर्ती रा. छोटेरामभट बिन भोपाल तुबो भोगार वस्ती राघोगड स्वामीचे सेवेसी चिंतामण बाबुराव ओंकार काादार ताा आरुण प्रांत खेचिवाडा दि॥ श्रीमंत राजश्री पंतप्रधान नमस्कार सु॥ सल्लास समानीन मया व अलफ[1] ठाणे आरुण येथे नूतन श्री गोपालजीची स्थापना केली त्याची पूजा तुम्हास सांगोन नेमणूक करून दिल्ही येणेप्रमाणे

| | |
|---|---|
| मौजे खजुरी पाा देहरी खुर्द येथे जमीन | सोयरपैकी दररोज येक टक्के प्रोा कलम१ |
| बिघे ८२५ सिधी जमीन | नंदादीपास दरमहा तेल....... |
| ८२५ बाणजर जमीन | आरतीचे साहित्य ऊद गुगल विडयाची पाने बत्तासे |
| —— | |
| ८५० | सालिना वस्त्रे देवास दोन करून ध्यावी |
| देवानिमित्य नैवेद्य दररोज नेमणूक तांदूळ कणीक वगैरे | किरकोळ |

सदरहु प्रोा जमीन......वगैरे नेमणूक करून दिल्ही आहे. पूजा करून श्रीमंतांचे राज्यास अभिष्ट चिंतून वंशपरंपरेने........सुखरूप रहाणे. जाणिजे छ २३ माहे रविलावल मोर्तब.

ꣻ ꣻ

१. दि. २६-२-१७८३

[ **लेखांक २४४**

पो फाल्गुन[1] शु॥ १ श्री गजानन प्रसन्न ( असल बा नकल )
शके १७५८

वेदमूर्ती राजश्री लक्ष्मण भट लागवणकर स्वामीचे सेवेसी विद्यार्थी रामाजी महादेव सा॥ नमस्कार विनंती विशेष तुम्हास पत्र लिहीले की वडीलाचे मर्जीचा कल कसा आहे तो लिहून कळवावा. डाकेत पत्र लीहावी पोहोचतात न पावतात जाणून हेतू पुरस्सर आमचे म्हणून लिहीले त्यास आम्ही बेवकूब जाणून विनंतीपत्र लिहीले अथःपर लिहीणार नाही कळावे बहूत काय लिहीणे हे विनंती चिरंजीव बयाबाई व सगुणाबाईस आशीर्वाद. रामचंद्राने स्वेत समई सिळ समुद्रात सोडली ती बुडाली तरली नाही जाणून वडीलाचे क्रोधामुळे या देहाची गती असीच आहे स्त्री कदाचीत मागे राहून फिरता फिरता जवळी आली असता सांभाळ करावा तुमचे वंशात आली ते पेक्षा लाज स्वस्थानास येईल हे आशिर्वाद

पौ. शके[1] १७५९ माहे का॥ श्री गजानन प्रसन्न ( असल ब नकल )
शु. ११

चिरंजीव बयाबाई सहस्त्रबुद्धी व सगुणाबाई वोंकार यासी आशीर्वाद मी इकडे आल्यापासून राजश्री चिटकोपंत बाबास सांगून पत्री मा॥र कळवीलाच नाही. आम्ही व वडील व चिरंजीव राजश्री बाबा त्रीवर्ग आपल्यास सारीखे आहोत. त्रिवर्गात एकमेकांस विरुद्ध अथवा लोभ असला तरी तुम्ही उणे अधीक पहावयाची गरज नाही यांस दाखला कैलासवासी तीर्थस्वरूप सौभाग्यवती सनुणाबाई आजी यासी व तिर्थस्वरूप कैलासवासी आमचे दादा उभयतासी वाकडे असता लोकेशनात आजीबाईनी दादाची आमर्यादा केली नाही हे तुम्हास माहीत नाही म्हणोन लिहीले त्यास तुम्ही चिरंजीव सौ॥वती येसुबाळ यांचे लग्नसमई वो॥ राजश्री लखुनाना आम्ही घेऊन आलो त्यास सांगणे तुमचे व मीही बजावीले की वस्तूलाभ घराची घरस्थिती बरीवाईट ही लखूनानानी पाहावी याचा जीण माझा नाही ऐसे बोललो असता समयास मीच खोटा जालो ब्रह्मसुत्रास उपाय कोनाचाच नाही इकडील मंडळी राजश्री लक्ष्मणराव आणणा थत्ते चिरंजीव सौ. मनुबाई व चिरंजीव राजश्री राजाभाऊ व रामभाऊ व चि. वेणुताई सर्व खुशाल आहेत चिरंजीव सौभाग्यवती येसूस आणावयास पाठविणार आहेत व धाकटी सूनही आणणार आहेत कळावे बहुत काय लिहीणे हे आशीर्वाद.

---

१. दि. ७-३-१८३७
१. दि. ८-११-१८३७

[ लेखांक २४४

मिती अश्विन[1] व॥ ४ शके १७६० श्री गजानन ( असल ब नकल )

राजश्रीयाविराजीत राजमान्य राजश्री समस्त गुमास्ते मंडळी नि॥ वोंकार स्वामीचे सेवेसी

दासानुदास रामाजी महादेव वोक सा॥ नमस्कारभ्य विनंती विशेष जन्मादारभ्य चिरंजीव सौभाग्यवती येसूबाळ यांचे लग्नाचे पूर्वी पर्यंत मंडळीची सेवा करीत आलो अलीकडे वडीलाचा लोभ कमी आणून सर्वांनी एक विचार करून आलोभास प्रवर्तक जाला आसो वडीलांचा आशीर्वाद शिरावर जबरदस्त आहे येणेकरून मनाची खातरी की श्रीगजानन आपल्यास अजीत येऊ देणार नाही जे दिवशी वडीलाचे चरण दृष्टी पडले म्हणजे आलोभ आहे तो दूर होऊन लोभांत आलो असता आपला उपयोग घडणार नाही हे मनाचे धर्म जाणून आहे इश्वरसत्ता उपरी तर मंडळीस अनुभव लौकर येईल मी बेपरवा आहे अजीत येणे तर वडीलास येईल उदरनिर्वाह करणे तर चित्रावती गोळा करून भक्षीन तर निर्वाह आहे तुम्हास पत्रद्वारे कुलवृत्त लिहावयास लज्जाप्राप्त तुम्ही तर येजमानास विनंती वरकर करून मजला घेउन जाऊन चरणी लोळवणे इतका उपकार वडीलांचे आशीर्वाद करून असेलसा वाटतो माझा प्राणोत्करण जाले असता वडीलाचे नेत्रास पाणी येईल त्यांचा रोष व आपला लोभ साम्यतेस नाही येथून उपकार न करावे हे आमचे मनांत वागले कळावे बहूत मिळती पिपीलीका प्राण घेती सर्पा एका त्यास आपण सर्वत्र येजमानांची सेवा करून कुशलरूप असावे हेच मागणे इश्वरासी मागत आहे कळावे बहूत काय लिहीणे हे विनंती

[ लेखांक २४५

शके १७४५ ( अस्सल वरून नक्कल )

श्रीगजानन

तीर्थरूप सौभाग्यवती ताईबाई व जिजीबाई वडीलांचे सेवेसी अपत्ये रामाने चरणावर मस्तक ठेउन साष्टांग नमस्कार विनंती विशेष आलिया दिवसापासोन ताईची पत्रे दोन आली व जिजीबाईचे पत्र येऊन लेकराचा सांभाळ केला नाही. तिर्थरूप रागे भरतात परंतु मातुश्रीस राग कधीही येत नाही ऐसी चाल वडीलोपार्जित असोन माझे प्रारब्धानुरूप मातोश्री चिरंजिवाचा अव्हेर केला याजमुळे पुण्यास येण्यास विलंब आहे परंतु माझ्यानेच

---

१. ७-१०-१८३८

येथे राहाण्यास जाले म्हणोन लाचारीणे येकवेल उभयता वडीलाची भेट घेऊन निरोप मागून उत्तरपंथाची वाट धरावी बरोबर कुटुंब येईलच. ताई आपल्या सही घेऊन जावे इतका कंटाळा मजला माझे शरिराचा आला आहे. लोभ करून पुनरपि वस्तीत आनणे हे मातुश्रीचे लाभाखेरीज नाही यास दृष्टांत कोतीचे हातून पाच मास जरी माणे घेतल्या-खेरीज पोट भरु नये ऐसा कोनता कि मी भोजनास बसून आपण दही वाढतील ते समई माझी तृप्तता आहे च्यातकान्याय भेटीची अपेक्षा आहे बहुत काय लिहिणे हैं विनंती.

ಀ ಀ

ओंकार संग्रह ]

[ लेखांक २४४ ]

श्री गजानन प्रसन्न

आश्विन व॥ २ बधवार[1]
शके १७४५

वडिलांचे सेवेसी अपत्य रामाजी महादेव कृतानेक सा॥ नमस्कार विज्ञापना ऐसीजे वडीली डाकेत पत्रे भाद्रपद व॥ ७ चे अेक व आश्विन शु॥ १ रविवारचे अेक अेकून दोन्ही पत्रे आश्विन शु॥ ९ सोमवारी दोन प्रहरी पावली त्याची उत्तरे विनंती करून लिहिली आहेत· तपशील.

( १ ) ..........................

( १ ) ..........................

( १ ) नानासाहेब आपण ती॥ दादासाहेब व ती॥ सौ॥ मातुश्रींचे पायाची शपथ लिहून पाठविली की, एक क्षण न रहावे त्यास मला तिकडे येण्याची अडचणी बाळगण्यास येणेप्रमाणे आहेत.

१ ) चार पैसे लोकांचे देणे आहेत. तेथे आल्यावर मागतील त्याजला कोठून द्यावे

१ ) बऱ्हाणपूर मुक्कामी आपले आज्ञेखेरीज चार रुपये उचलेले आहेत येवीसी देवराव तात्याणि बहुत मला निशेध केले. याचा विस्तार पत्री कोठवर लिहावा ते रुपये येथे मिळवून नंतर वडीलाचे भेटीस यावे

१ ) एकलक्ष पत्तीस हजार माझे हातून अव्यवस्थ झाले ते समयी माझे मनाचा संकेत की, वडिलाचे काही थोडे बहुत बरेसे जाले म्हणजे वडिलाचे चरणी मस्तक ठेवून मातोश्री व कुटुंब सुद्धा उत्तरपंथास जावे हा संकेत ते समयीचाच आहे परंतु मध्यवर्ती चिरंजीव राजश्री बाबा व बापू यांनी निरनिराळे वैश्वदेव केले ते

---

१. दि. २२-१०-१८२३

समयी उगाच वडिली मजला शब्दांचा गुंता केला ही अडचण जाणून वडिलाचे चरणापासी येवून इ॥ त॥ झालेले वर्तमान त्यानी............

परंपरा कै. ति. गणोबा नाईक याजपासी कै. ति॥ केसोबा नाईक यांची मातोश्री त्यास घेऊन आली त्यापासून आजपर्यंत मजवर लोभ आहे हल्ली दैवयोगे करून कमबकतीमुळे माग घेतली यास वडिलाचा उपाय नाही·

ᔕ ᔕ

पे. द. प्रांत पुणे जमाव रुमाल १६२२ ] [ **लेखांक २४५**

सु॥ तिसा अशर मयातेन व अलफ[1]ची यादी सरंजाम जमिनी वगैरे त्यातील एक–

मोरो चिंतामण ओंकार याजकडे मौजे खराडी तालुका हवेली येथील जमीन बागेकडे व नदी खडवणाचे कुरण मिळोन चावर ·॥· ता. छ १८ आगस्ट[1]

ᔕ ᔕ

साप्ताहिक सकाळ दि. ३-७-१९३४<br>मधील उतारा<br>श्री. चि. बा. ओंकार यांचे कृपेने ] [ **लेखांक २४६**

ओक या आडनावाचे ओंकार कसे झाले हे नानानीं ( गो. स. सरदेसाई ) यानीं सांगितले, पेशव्यांचा संबंध ओक घराण्याशी झाला त्यावेळी ओकांची चेष्टा करावयाची झाली म्हणजे “ अरे ओक, ओक की ” असे म्हणून चिडविले जात असे· ही गोष्ट पेशव्यास वाईट वाटून त्यानीं ओंकार असे चांगले नाव देऊन ते म्हणण्याचा प्रघात पाडला. त्या ओकांचे ‘ ओंकार ’ नावाचे वंशज अद्यापि हयात आहेत·

ᔕ ᔕ

ओंकार संग्रह ] [ **लेखांक २४७**

श्री

राजश्री मोरो पांडुरंग साने कमाविसदार मौजे ढवळपुरी व विठलपुरी परगणे पारनेर स्वामी गोसावी यासी

सेवक गोपाळराव रामचंद्र नमस्कार विनंती उपरी शके १७५९ हेमलंबी नाम संवत्सरे ती॥ राजश्री मोरो चिंतामण ओंकार गोत्र वाशिष्ठ सूत्र हिरण्यकेशी वस्ती

---

१. दि. २१-८-१८१८

कसबे पुणे याणी पेशजी पुण्याचे मुकामी कलविले जे श्री क्षेत्र मोरेश्वरक्षेत्री स्वामीची पुण्यतीथ प्रतिवर्षी करीत आहोत त्यास आपलेकडून काही खर्चाची नेमणूक असावी म्हणोन त्याजवरुन पंधरा रुपये द्यावयाचे ठरले त्याप्रो। काही दिवस नक्त पावत गेले सालमजकुरा-पासून मौजे मजकूर येथे अिनाम धार्मादाय जमीन येकूण चांदवड १५ रुपये

येकूण पंधरा रुपये आकाराची जमीन मौजे मा।र येथे साल मजकुरापासून अिनाम-घर्मादाय देविली असे तरी मा।निल्हेचे दुमाला करून चतुःसीमे बाबता हुजूर पाठविणे म्हणजे अिनामपत्र करून दिल्ही जातील जाणीजे छ १५ रबिलावल अखेरसाल मोर्तब

श्रीगणपती

चिरंजीव राजश्री गंगाधर बापू व बलवंतराव ओंकार यासी प्रति गोपालराव रामचंद्र आशीर्वाद अुपरी येथील कुशल ता।। चंद्र ३१ साबान पावेतो येथास्थित असो विशेष तुम्ही पत्र चंद्र २१ रजबचे पाठविले ते पावले घोडीचे चंदीवैरणी बा।। शंभर रुपयाची जमीन नेमून देण्याविसी मौजे ढवळपुरी व विठलपुरी येथील कमाविसदार यांचे नावे सनद पाठअून द्यावी व श्रीचे पुण्यतिथिबद्दल पंधरा रुपये सालीना पावत असतात ते अलीकडे पावले नाहीत ते पाठविण्याविसी लिहिले तैसियास घोडीचे चंदीवैरणींबद्दल शंभर रुपयाची जमीन नेमून देण्याविसी मौजे ढवळपुरी व विठलपुरी येथील कमाविसदार यांचे नांवे सनद पाठविली आहे त्याप्रमाणे जमीन नेमून घ्यावी श्रींचे पुण्यतिथिबा।। पंधरा रुपयाची जमीन देण्याविसी पेशजी लिहिलेले आहे त्यास पुण्यतिथीचे जमिनींबा। सनद पाठवायाची त्या सनदेत कोणाचे नांव लावावयाचे ते लिहावे म्हणजे पंधरा रुपयाची जमीन मौजे मा।री जमीन देण्याविसी पाठवून देअू बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे आसीरवाद

ती। राजश्री दादा औरंगाबादेजवळील सातार्‍यास आहेत म्हणोन लिहिले त्यास तेथे किती दिवस राहणार ते लिहावे चिरंजीव राजश्री बाबा घरी आल्याचे लिहिले ते कळले

पौ।। शके १७५८ दुर्मुख नाम संवत्सरे चैत्र शुद्ध १३ बुधवार सन १२४५ फसली तारीख १२ जिल्हेज सन १२५१ हिजरी सिवाजीनीं आणिला.

ओंकार संग्रह ] [ **लेखांक २४८**

श्री

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री चिंतामण बाबुराव वोंकार का।दार प्रा। कन्नड फुलंबरी गोसावी यास सेवक माधवराव बलाल प्रधान नमस्कार सु।। सित सितैन मया व अलफ रा. कृष्णाजी केशव वोंकार यांची आसामी हुजूर च्यारसे रूपयाची होती

ती दूर करून च्यारसे पैकी दीडशे रुपये कमी करून बाकी अडीचसे सालिना रुपये २५० अडीचसे पो। मजकुराकडे करार करून हे सनद सादर केली असे तर मा।निल्हेचे हरयेक सेवा घेऊन सालदरसाल अडीचसे रुपये पावीत जाणे महाल मजकुरीचे नेमणुकी सिवाय मजुरा पडतील जाणिजे छ ११ सफर आज्ञाप्रमाण लेखन सीमा

बदलापूर–आमचा गाव
पृ. २२३ लेखक : ना. गो. चापेकर ]

[ **लेखांक २५०**

श्री अंज्यकेश्वर

अखंडित लक्षुमी आलंकृत राजमान्य राजश्री हवालदार ता॥ चोण गोसावी यासी सेवक पांडुरंग रामचंद्र सुभेदार तालुके राजमाची नमस्कार सुमा इहिदे अशर मया।तैन व अलफ[1] का॥ बदलापूर येथे सिवालय नव्हते त्यास सालमजकुरी वे॥ राजश्री सदाशिवभट गोखले वास्तव्य कल्याण याणी देवालय बांधून श्री त्रिंबकेश्वराची स्थापना केली आणि देवास नैवेद्य व नंदादीपाची नेमणूक करून घ्यावी म्हणोन सुभा राजमाचीचे मुक्कामी येऊन समजाविले त्यावरून मनास आणिता भटजीनी शिवस्थापना केली हे राज्यास श्रेयस्कर जाणून देवास नैवेद्याबद्दल भातसेत जमीन का॥ मजकुरी वाघझेपेवर सोनिवली नजीक जमाबंदीखेरीज खराबा बिघे २ दोन बिघे द्यावयाचा करार करून हे पत्र तुम्हास सादर केले आहे. तर सदरहूप्रमाणे जमीन जमीनदार व पाटील यांचे गु॥ नेमून देऊन सालमजकुरापासून सालदरसाल देवाकडे चालवीत जाणे व नंदादीपास तेल दरसाल वजन कचे एक मण पाहिजे त्यास भटजी जमेसिवाय नवा तेली आणून का॥ मजकुरी किंवा हरएक गावी आबाद करतील त्याचे खुंटा पो। देत जाणे या पत्राची नकल ठेऊन स॥ पत्र भटजीजवळ भोगवटियास परतोन देणे जाणिजे छ २१ जमादिलावल[1] बहुत काय लिहिणे.

पे. द. कोकण जमाव
रुमाल ५५० ]

[ **लेखांक २५१**

सन १८१६ चे खर्चात अंदगावच्या श्री वीरेश्वर देवस्थानास श्रावणमासाचे अभिषेकानिमित्त द्यावयाचे ते अभिषेककर्ते केशव जोसी कोळथरेकर यास दिले

६ नक्त नेमणूक

---

१. दि. १७–६–१८१० शके १७३२ ज्येष्ठ शु॥ १५

५ ब्राह्मणास

·|||· देवास पूजेस साहित्याबद्दल

·|· तुरीची डाळ नैवेद्यास कैली ०८१

—

६

१||·||| ऐन जिनसी नेमणूक त्याब||

१८=| भात तूप .|=||

खर्च

४७८– देवस्थान हुजूरविल्हे श्री वीरेश्वर संस्थान मौजे अंदगाव सालाबाद नैवेद्याची नंदादीपाची नेमणूक आहे त्या प्रो। साल म||रचे द्यावयाचे ते परभारे ता|| सोनाळे येथील सालमजकूरपैकी जमा धरून खर्च चिंचवड छापी

१७८–भातसर नैवेद्यास दरमहा तांतुळ सडीक कैली ०|||१ प्रो। बारमाही दर खंडीस रु. १३|| प्रमाणे

३० नंदादीपास तेल दरमाहा वजन पके ०|५ प्रो। बारमाही वजन येकूण पके ०४|| यास ००६ प्रो।

———

४७८–

सदरहू रुपये भाद्रपद अखेर मुदती ऐवजी घ्यावे म्हणोन वरात तसलमात केशव पांडुरंग ओक.

[ **लेखांक २५४**

श्री

यादी खासगत राजश्री बालाजी केशव ओक याणी आपली वस्तवाणी सखाराम गंगाधर पिंपलखरे कल्याणकर याचे घरी ठेविली ती मि|| आधिक ज्येष्ठ व|| शके १७६१ विकारी नाम संवत्सरे

किता दागिने सोन्याचे

१ पाटल्या जोड १

३ वाकी जोड ३

१ मोठा

१ मध्यम

किता दागिने रुप्याचे व मोत्याचे वगैरे

२ बिंदी सौ|वतीची मोत्याची

१ तनमणी मोत्याचा कासीचा

काशीचे दागिने

१ कापजोड १

१ लहान नागमोडीच्या

३

१ कडी जोड १

२ सऱ्या दोन

२ साखळ्या २

१ तिहेरी

१ दुपदरी

२

३ माळा पुतळ्याच्या

१ मोठी पुतळ्या ५०

व मोहोर १ एकूण ५१

१ माळ पुतळ्या २०

व मोहोर एक एकूण २१

१ प्रो। माळ पुतळ्या २०

व कारले १ एकूण २१

३

१ प्रा। माळ पुतळ्याची सौ. ठकीची

पुतळ्या २५ व येक कारले १ एकूण २६

१ जवे जोड येक

१ पेट्या मोत्याच्या

१ मुगड्या मोत्याच्या

१ पाटल्या जोड सोन्याच्या

२ डोकीतील जडावाची दोन

१ माळ पुतळ्याची सोन्याची

पुतळ्या सुमार २२ व मोहोर १

एकूण २३

१ छंद जोड १ सोन्याचे

रुप्याचे दागिन

२ वाट्या

१ चुनाळ

२ गडवा गडवी.

[ लखांक २५६

यादी समाईकाचा ऐवज निगवार मिती भाद्रपद व॥ १ शके १७६४

शुभकृत नाम संवत्सरे

नि॥ बाळाजी केशव ओक

२४६२७।-॥ बा॥ खतावणी समाईकीची

१२९१२।-।॥ शके १७६०-६१

११७१४॥≡।॥ शके १७६१तें६२

रु. १२२४६॥।=॥ पो॥ वजा

५३१॥।=।॥ बाकी

२४६२७।-॥

नि॥ गोविंद भिकाजी ओक

२४८२५॥।. बाकी खतावणी समाईकीची

१२४८२॥।.। शके १७६०-६१

रु. १२५४१।.॥ पो॥ वजा

५८॥.॥ बाकी

१२२९२८≡।॥ शके १७६१-६२

१५०९८≡। शिल्लक समाईकीची
२६१३६।।.।।।
७०४०८– बाा याद दागिन्याची सोने
रुपे मोते सु।। ७०६०।।।=
पोा वजा जव × बा। व चौकडयाचे
सोन्याचे बा। २०।।।– बाकी
२१८।–।। भांडया बा। तांबे पितळसुद्धा
७२। कापडा बा। बदलापुरास व
कल्याणास किंमती ठरल्या ते
१४० बिंदी बा।
१४५ किंमती ठरणेत पितांबर व
शाल
२८।=।। ईस्तादीचे यादीचे
किंमती प्रो
३३७८०।=

रु. १२८२४८=।। पोा वजा
५३१।।।=।।। बाकी
५०।।।. शके १७६२ मार्गशीर्ष मास
२४८२५।।।.
६३९१।.। बा। याद दागिन्याची
सोने रुपे वग़ैरेसुद्धा
६४३०।.। पोा
वजा वाकी बा। ३९ बाकी
१८०० भागीरथीचे दागिन्या बा।
ठराव जाहला ते
२११।≡। भांडी तांबे व पितळ वगैरे
१२६।।।. कापड किंमती बदलापुरास
व कल्याणास ठरल्या ते
३९ वाकी बा।
२५ कापड किंमती ठरणेत
८३।।≡।। लेल्या बा।
१०० वदपचे हुंडया बा।
५ मारनिल्हेचे निसबतीचे खरेदीकडे
कापड आहे पोा
१७।=।। किरकोळ ईस्तादीबा।
३३६२५।–।।

पे. द. अजमास उ. को. रुमाल ६४९ ] **[ लेखांक २५७**

राजमंडल रोजकीर्दी

स्वारी राजश्री पंतप्रधान माहे रबिलाखर छ ५ रोज रवासुदगी इसने सलासीन मया व अलफ

नारो गोविंद आचवल वस्ती कसबे पेण प।। सांकसे प्रांा कल्याण येथील जल-मार्गाचे दलालीचे नूतन वतन करून दिल्हे वतनास हक्क वेपारी जलमार्ग मजकुरी याजवरी कुलमालाची किंमत आकारेल त्यास दर सदे रु. १ येक प्रमाणे करार करून

दिल्हा असे वतन संबंधे दलाल मजकुराचे माथा दुतर्फा शेरणी करार केले रु. ५००
पौ वजा राजश्री सेखोजी आंगरे सरखेल रु. २५० बाकीचे सरकारचे करार केले रु
नि॥ कृष्णराव महादेव वसूल करून हुजूर पाठविणे म्हणून सनद – २५०
यास हुदंती

........................

........................

[ **लेखांक २५८**

खतावणी विश्वनाथ बल्लाळ ओक मु. बदलापूर शके १७७४–७५ खेरीज मुशाहिरा खाते पुरवणी किरकोळ

.।. भाद्रपद शु॥ १५ अंगरखा खुद करविला त्याजबदल शिलाई वफगावकर शिंपी यास

८॥. भाद्रपद व॥ ७ कागद ब्रह्मवर्तास पाठविला त्याचे भिवंडी पावेतो हशील दिले.

.॥– कार्तिक शु॥ १४ नागा तलेकर यास वसईस वर योजने करिता पाठविला त्याबद्दल खर्चास

.॥. कार्तिक व॥ ९ भिकूबाईस वरयोजने-करिता नाना गापे यास रोह्याकडे पाठविले त्याजबरोबर दिल्हे.

१।=। व॥ १४ वि॥ काशीनाथ तात्या ओक खर्च कल्याण मुक्कामी झाला तो.

२८=॥। पौष व॥ ७ मुंबईस गेले त्या ब॥

१॥।. घोड्याची गाडी जाताना व येताना केली त्या ब॥

.।=॥। किरकोळ

८२८७ भोजनखर्च ठाण्यास

८२८२ उतार तरीचा जाताना व येताना

८६८९

.।. आश्वीन व॥ १४ पूर्वी छीट आणले होते त्याचे अंगरखे चिरंजीव नथूस व गोदीस व साळूस व सखीस करविले त्याब॥ शिलाई देणे.

८=। व॥ ३० बापूजीराव यास अलिबागेस ती॥ कासीताईस आणावयास पाठविला त्याचा खर्च जाला तो

८॥ उतार

८॥। पोटखर्चास

८– शहाळी २ पाने विड्याची व पोफळे मिळोन.

.।।. चैत्र शु।। १२ सौ. मनुताई सौ. भिकूबाईचे पावणाबरोबर गेली ते समई खर्च

.।. जावई यास खाऊस

८= काजू घरी आणले.

८= ( अक्षरे लागली नाहींत )

.।।.

.।।. व।। ३० सौ. पार्वतीचे बाळंतपणा- बद्दल गंगाडी सुईणीस दिलेते

फाल्गुन मास

।=। सौभाग्यवती वसईस गेली तेथे मुलास खेळावयास राघो खबडा यास पाठविला त्यास उतार वगैरे

२।।.।। वैशाख व।।६ ठाणे मुंबई व कल्याण मिळोन वैशाख शु।। ४ तागाईत शु।। १३ माहे मजकूर वि ।। खुद

।।-।। उतार तरीचा ठाण्याचा जाता येता व कल्याणचा

१।।-।। भाडे आगगाडीचे जाताना आसामी ३ व येताना २

८।। हेलकरी यास हेल

८=।। बाबा यास जेवणास व फराळास ठाण्यास

८।। आंबे पिकलेले

८== भाजी व नापिकास वगैरे

२।।.।।

८=। व।। १४ सौ. ठमाबाईस आणावयास मोहोपाड्यास पाठविला त्यास खर्चास

८≡। व।। १४ जलवा तात्याने लाविल्या त्याब।।

।≡।। सौ. वेणूस पोचवावयास बाळास दिल्हा त्या ब।।

खतावणी खाजगत रा. विश्वनाथ बल्लाळ ओक मु।। बदलापूर शके १७७४-७५ परिधावी नाम संवत्सरे खेरीज मुशाहिरा खाते पुरवणी धर्मादाय

माहे अधिक भाद्रपद मास

८- मातोश्रीनी दीपदान दिल्हे

.।≡।। काशिनाथाने दीपदानाब ।।

.।।.। मातोश्रीनी दररोज यज्ञोपवीत दिल्हे त्या ब।।

.।= गाईचे दानाब ।।

८-।। उदकले ९ वी चे

।.।। काशिनाथाने मंगळ व शनि सटवीचे

भाद्रपद मास शु।। ७

१।। श्री त्रिंबकेश्वरास रुद्रावर्तन नारायण भट तेलंग याजकडून करविले

| | |
|---|---|
| वा। ३ | ८= दहावीचे ब्राह्मणास |
| आश्विन शु।। १ | मातासह श्राद्धाकडे तीलोदक सुद्धा दक्षणा<br>८= चिरंजीव नथू<br>८= सखाराम गोडबोला<br>८= आप्पा जोगळेकर |
| आश्विन शु।। १३ | श्री त्रिंबकेश्वरास समाईकीचे कागदाचा खटला पडला होता त्यासमयी आषाढ मासीं नवस केला होता तो लघुरुद्र केला त्या बा।। दक्षणा वगैरे |
| कार्तिक शु।। ३ | ।।=।। सौ. पार्वतीने जाडे संक्रातीस...... |
| ×××× ३ | श्री त्रिंबकेश्वर यास मुखवटा गावकरी यानी ....... नाशिकाहून आणविला त्याचे वाटणी बा।। |
| कार्तिक वा।। ८ | ।।।.।। चातुर्मासात सौ. दुर्गाने सिताराम बावकडेस दाणा पाणी घातले त्याचे समाप्तीस भाड्याबा।। व दक्षणा मिळोन<br>।। चि. नथूस शिवकवच व रामरक्षा व... याचा अंगारा सायंकालचा नारायणभट तेलंग याजपासून लाविला त्या बा।। |

खासगत रा. विश्वनाथ बल्लाळ ओक मु।। बदलापूर शके १६७४–७५

| खाते कापड | सुमा सलास |
|---|---|
| १४।। आषाढ वा।। ४ धडवतीकडे. लुगड्या ब।। साल गुाचे दिल्हे | ।|= मांजरपाटी पंचा येक हरवला त्याब।। |
| ८ मातोश्रीस | ।। प्रा। पंचा मांजरपाटी कासिनाथ तात्यास |
| ४ दुर्गास | २।। रास्ता तांबडा सालवटी मातोश्रीस |
| २।। सौ. वेणूबाईस साडी ब।। | २८ ≡ कार्तिक वा।। ३० फलाणीची बंडी कासिनाथाने करविली त्या ब।। |
| १४।। | १।=।। फलाणी वार २ |
| ३।–। अधिक भाद्रपद वि।।खुद कल्याण पो। | ।–।। मांजरपाट वार २ |
| ।।।–। तांबटे छीट वार दोन | ८= मनगीस तांबडे कापड |
| १।= मांजरपाट खुद नेसावयास | ।|= सिलाई बा। |
| १।= मांजरपाट कासीनाथ तात्यास | २८ ≡ |
| ३।–। | |

१।= अधिक भाद्रपद व।। ११ मांजरपाट
जोडा खुद्द नेसावयास ते जमा
केशवराव फडके
भाद्रपद व।। ७ वि।। कासिनाथ
.।। ≡। चिरंजीव सखाराम गोडबोला
यास पंचेजोडी मांजरपाट
कार्तिक व।। ३ रविवार धडवतीस

खर्च झाला ते
१ सौ. वेणूबाईस चोळी जरीकाठी
खण हिरवा येक
५८= रेशीमकाठी धोतरजोडी
खुद नेसावयास

७ कार्तिक व।। ३ शके १७७३
गोविंदा पिंपळखरे याचे बायकोचे
गर्भादानासमयी अहेर श्रावण मासी
कल्याणास केशवराव फडके याजकडे
पाठवून करविला
४ लुगडे मनुबाई जोगळेकरीण
याजकडून घेतले त्या ब।।
३ पागोटे पांढरे जमा विकरी
७

८।।।. शके १७७४ वैशाख व।। ६
गोविंदशास्त्री फाटक वारले
सबब दुखवटयाचे अहेराब।।
४८= तांबडा रास्ता
४।।= पागोटे धनवटी
८।।।

१४८≡।।। वैशाख व।। १४ शके १७७४
चे पौषमासी पुण्याहून कापड
आणले पो। धडवतीकडे खर्च
झाले ते.
३।-।।। तांबडी चंद्रकळा गोमीकाठी
सौ.वतीस
४८- तांबडी चंद्रकळा मातोश्रीस
३।।।. गोमी काठी चंद्रकळा सौ.
दुर्गास
१।।- खण पास्वेल सौ.वतीस व
दुर्गास
१।।. खण सौ.वतीस व दुर्गास
१३८≡।।।

१।।।≡। व।। १४ कल्याणचे कापडा पो।
लुगडे मातोश्रींनी धडवतीस घेतले
त्या ब।।
८।।।-।। व।। १४ कापड खर्च झाले ते
धडवतीस
१ खण हिरवा जरीकाठी मनुबाईस
३।। रास्ता तांबडा साधाकाठी
मातोश्रीस
.।।. ( अक्षरे लागली नाही )
२।।।.।। काळा मु ... सौ. दुर्गास
१८- पासोडी कासीताई सानी यास
८।।।-।।

खा. विश्वनाथ बल्लाळ ओक मु।। बदलापूर शके १७७४-७५ परिधावी नाम
संवत्सरे सुमा सलास

१० माहे जेष्ठ-गणेशकृष्ण लिमये यांचे घर कल्याणचे घेतले. त्यात भाडेकरी रा.
रामसेठ सारंगधर वस्ती कल्याण यास ठेवला आहे त्याने भाड्यापैकी वैशाख मास

शके १७७४ चे महिन्यात रामचंद्र बल्लाळ चोळकर यास कारखान्याचे खर्चास दिले ते बा॥ रसीब

५ मि॥ वा॥ ८
५ मि॥ वा॥ ११
१०

गणेश कृष्ण लिमये कल्याणकर यांचे घर आगवाडा पिछवाडा विहीर वगैरे सुद्धा रा. जयराम सेठ व पांडु जयराम सेठ यास भाडयाने राहावयास दिले

१४ रोख

.॥. पेशजी घर चाळणारास दिले ते

फाल्गुन मास

१ शु॥ ७ गु॥ नाना गोरे भिवंडकर मा॥निल्हेनी चिरंजीव सौ. भिऊबाईचे लग्नात अहेर केला त्या बाबद जमा रु. ५. पो। मा॥ निल्हेस परत अहेराबद्दल दिले रु. ४ बाकी

( या वर्षी सोनवली येथे ऊस लावला होता. त्याचे उत्पन्न रु. ४८॥ )

३०।॥= वा॥ १४ सौ. भिऊबाईचे लग्नसमयी अहेर आला त्या बा॥ कापड खरेदीकडे रुपये लिहून

४॥ हरी वामन जोग कवाडकर
२। पागोटयाचे
२॥ लुगडे हिरवे मोतीचूर काठी
४॥

२ दादा गोडबोले माहुलकर पागोटयाचे

७ सखाराम गंगाधर पिंपळखरे
३ पागोटयाचे
४ लुगडे तांबडे मोतीचूर काठी
७

६८= गोविंद भिकाजी ओक
२॥= पांढरे पागोटे
३॥. लुगडे रुइफुल काठी
६८=

३॥. दादा खडकबाण पागोटे तांबडे
२॥ नथू शेट पागोटे तांबड
२॥ शिवराम हरदास पागोटे तांबडे
२॥ तात्या खडकबाण पागोटे तपकिरी रंगाचे.

[ **लेखांक २५९**

खासगत राजश्री कासिनाथ बल्लाळ ओक मु॥ बदलापूर शके १७८५-८६
राहगिरीनाम संवत्सरे सुमा अर्बा सितेन

खाते चिरंजीव सौ.वती मनुबाई जोगळेकरीण ह. वस्ती करजगाव

२०० ज्येष्ठ शु॥ ९ शके १७८१ गु॥ खुद घरीं जातेवेळी दिले ते
५५ भाद्रपद शु॥ १५ शके १७८३ गु॥ बळवंतराव जोगळेकर
५४॥=॥ रोख
।-॥ उडणावळी ब॥ पुत्र
३९ कार्तिक शु॥ १५ त्रिंबक मुकामी गोपाळ वासुदेव जोगळेकर
यास देण्यास सांगितले ते बाबदेवभट गर्गे याजकडे हुंडी ब॥
येणे तो वामनाजी मोरेश्वर जोगळेकर याचे मार्फत दिले तें
६ माघ व॥ ३० गोपाळ ........ जोगळेकर यास द्यावयाचे ते
पार्वतीवहिनीनी भाद्रपद मासीं दिले ते

———
३००

———————— रु.

खासगत रा. कासिनाथ बल्लाळ ओक मु॥ बदलापूर शके १७९२-९३ सु॥ इहिदे सबन मयातैन

शके १७६४-६५
५।।।-।।। मनूबाईचे जोडव्याब॥
६०।।।-।।। सौ. ठकूबाईचे मुलास वाळे रुप्याचे दिले त्याब॥ रु. ३ व
वाकी सोन्याच्या दिल्या त्याब॥ ५७।।।-।।।
११८॥ वारूबाईस राखडी सोन्याची करून दिली.

( या वर्षी कल्याणचे कोठारात भात टाकले असा उल्लेख आहे.
६१ गाड्या प्रत्येकी अदमासे १३ मण मिळून ७९३ मण=४० खंडी. )

[ **लेखांक २६०**

खाते राजश्री विश्वनाथ बल्लाळ ओक मु. बदलापूर
शके १७७४।७५ परिधावी नाम संवत्सरे सुमा सलास
खेरीज मु॥ खतावणी

खाते चिरंजीव राजश्री वासुदेव भाऊ जोसी

जावई पावसकर यास दिवाळसणास आले
त्याब॥ वगैरे

३७॥≡॥ कार्तिक शु॥ ६
१।≡॥ त्रिंबक कानडा यास पुण्यास आणा-
वयास पाठविला त्या ब॥
१३॥ जाताना सिपायासुद्धा त्रिंबकास
४६॥ येताना जावई वगैरे मंडळी आली त्यास
भोजन खर्च व जाग्याचे भाडे
४ किता खर्चाचे स्मरण नाही म्हणोन त्रिंबकाने सांगितले

६४।

२॥।-।। गु॥ त्रिंबक
२॥-॥। गाडीचे भाडया पो। देणे रु. ४ पैकी पेशजी
खर्च पडला ते १।≡। बाकी रुपये
८- कातगोळया
८- अरगजा
८= तेल चमेली तोळे ३
८॥। पाने विडयाची

२॥।-॥

१५।=॥। कल्याण खर्च जिन्नस वि॥ केशवराव फडके
४ साखर दर ८८४॥ प्रो
८=। नारळ १२ मोठे ९॥
८-। विडयाची पाने पेवे ४
८=। बटाटे ....... ६ दर ८८४
१।=॥ केशर तोळे २।·
८=॥। बदाम ८८१
८=॥ जायेपत्री तोळे २
·।· वेलदोडे
३८= लुगडे जावयाचे बहिणीस
४।-॥ पागोटे जावयाचे भावास
१॥-॥ दारु फटाके फुलबाज्या नळे
चिचोंद्रया वगैरे

१५।=॥।

१५ खुद जावई यास शेला पागोट्याब॥

२ जाता गाडी भाड्याची पांडु बाम याची करून दिल्ली त्यापो॥ देण्याकरिता विनायकपंत भावे याजवळ दिले.

१ जावई वगैरे मंडळीस वाट खर्चास

---

३७॥≡॥।

१।– कार्तिक वा॥ ३ खण सुमार ६ जावई याचे भावजईस व विहिणीस

२ वा॥ ९ जावई यास दिवाळसणास आणले होते त्यास पाठविण्यास पांडुबाम खरवईकर याची गाडी करून पाठविली त्याजब॥ पेशजी दिल्हे बाकी देणे ते २ दिल्हे.

.।. वा॥ १३ देणे झावरा नाहावी यास दिवाळीस अंगास लावण्यास बोलाविला त्याब॥

.।. वैशाख शु॥ ३ चिरंजीव वासुदेव भाऊ जावई यास दिवाळसणास आणिले होते त्यास पोचविण्यास गाडी पांडुबाम याची विसू बाम याचे गुा॥ने ठरविली त्याचे भाड्याबा॥ देणे ती रोख पावली

---

४१॥–॥

खाते हिंग

.॥. पौष वा॥ रुजू शु॥ ८ गु॥ कासिनाथ कल्याणाहून आणिले.

पुरवणी दिपवाळीची ओवाळणी व दइनगी

१३८= वैशाख वा॥ १४ दइनगी जाली ती

६८= गोविंद भिकाजी ओक याचे येथे माघमासी लग्न जाले ते वेळी अहेर केला त्याबा॥

३॥ लुगडे रुइफुली काठी

२॥= पागोट्याचे

---

६८=

७ मोरोपंत मेहंदळे भिऊबाईचे लग्नाकडे अहेराब॥ दिल्हे ते

३ पागोटे पांढरे

४ लुगडे तामडे मोतीचूर काठी

७

---

१३८=

ति. मा. प्र. ओक यांचे संग्रहीचा ]

**लेखांक २६१**

फिर्यादीचा नंबर ३१३ / स. १८५०

दरखास्त नं. १६५ / सन १८६१

**A16121**

| | |
|---|---|
| कल्याण येथील सबजज यांचे कोर्टात विश्वनाथ बळवंत ओक मयत वारीस लेक विष्णु विश्वनाथ अज्ञान पालन करणार चुलते काशिनाथ बल्लाळ ओक रा. बदलापूर | वादी |
| दगडु बीन देवमण तेली रा. बदलापूर ] | प्रतिवादी |

सदरहु वादी मजकूर याणे ता. २७ सप्टंबर सन १८५० रोजी कल्याण येथील मुनसफ यांचे कोर्टात सदरील प्रा।।वादी मजकूर यावर हु।।नामा मिळविला तो अमलात आणण्याकरिता सदरहू प्रा।।वादी दगडू बीन देवमण तेली याची खाली लिहिलेली मिळकत जप्त करून विकण्यात आली आहे.

२९२८= घर कल्याण यथील गंज आळी कवलारी आगवाडया पीछवाडयासुद्धा व घरा खालची जागा व आगवाडयाची जागा यासी चतुःसीमा पूर्वेस रस्ता पश्चिमेस बाजूचे घराकडून दक्षणेस बाळकृष्ण आनंदराव याचे वाडयाकडे मार्ग जातो तो घराचे दक्षिणेस सदरील घराचे भिंतीपलीकडे बाबू न्हावी याचे घर उत्तरेस कोंडू तेली याचे घर दरम्यान बोळ कोंडू तेली याचा व प्रा।।वादी मिळून याचा समाईत

२९२८=

यावरून हे सर्टिफिकिट देण्यात येते की सदरहू कोर्टाचे हु।।वरून कजबे कल्याण येथे ता. २७ सप्टेंबर १८६१ रोजी त्यात त्रिंबक महादेव मराठे वकील याणे रुपयें दोनशे ब्याण्णव आणे दोन २९२८=ची रक्कम भरली नि।।प्रमाणे सदरहू कोर्टांत वरोबर रीतीने भरली आहे. या रकमेस सदरहू मिळकतीतील सदरहू प्रतिवादी दगडू बीन देवमण तेली याचा सर्व दावा व हक्क व संबंध विकत घेतले आहेत.

ता. १९ माहे नवंबर सन १८६३.

....................

....................

विश्वनाथ त्रिंबक मराठे याचे......१९ माहे नवंबर

STAMP
FOUR RUPEES

च्यार रुपये
चार रुपीया
OFFICE

[ **लेखांक २६२**

खतावणी

खाते राजश्री विश्वनाथ बल्लाळ ओक मु॥ बदलापूर शके १७७४–७५
परिधावीनाम संवत्सरे को॥ कल्याण वगैरे सुमा सलास
खाते गणेश रामकृष्ण लिमये व॥ कल्याण

| जमा — रु. | — रु. |
|---|---|
| ५५७।·। वैशाख व॥ १४ मारनिल्हेचे घर ताब्यात घेतले त्याब॥ वगैरे खर्च सुद्धा घरखाते खर्च लिहून जमा रु. | ५५४॥·। बाकी उतार सुर्ती रु. |
| | ४५९।≡॥। जेष्ठ व॥ ८ शके १७६० व्याज दरमहा दर सदे ·॥।· प्रमाणे बाखत ज्येष्ठ शु॥ ७ शके १७६८ रजिस्टर ता॥ १ जून सन १८४६ नंबर ३०२ यासी गाहाण मारनिल्हेचे घर क॥ कल्याण येथील इमला फैला विहीर तारतखाना वगैरे दरोबस्त इमारत व जागा घराखालची व खुली सुद्धा असे |
| | ३७५ मु॥ |
| | ८४।≡॥ व्याज ता॥ आश्विन व॥ ३० शके १७७० |
| ५५७।·। | ४५९≡॥। |
| | २६ किता फिर्यादीचा खर्च कागद वगैरे |
| | ५९॥।– ज्येष्ठ वा॥ ७ शके १७७२ फिर्याद |

नं. १०७ रु. ५०० याची केली त्याचा फडशा ता। १३ एप्रिल सन १८५० रोजी जाला त्याचे खर्चीबा। निवाड-पत्राचे कागदासुद्धा

खासगत राजश्री विश्वनाथ बल्लाळ ओक खतावणी मु।। बदलापूर शके १७७४-७५ परिधावीनाम संवत्सरे को। कल्याण वगैरे सुमा सलास खाते घर को। कल्याण येथील लिमये यांचे घर विकत घेतले त्याबा। व कृष्णाजी बल्लाळ कानिटकर याचे घराबा।

जमा———————————रु. ——————————————————————रु.

( येथे भाडे रु. ४० जमा )
भाडेकरी-जयराम सारंगधर
पानमडी-लिमये घरात
व गणसेठ सोनार कानिटकर
घर खालची जागा रस्त्याकडील

७९३।।= वैशाख शु।। १५ बज्याबा लिमये यांचा निम्मे हिस्सा घराचा नाना कानिटकर याणे घेतलेला मा।रनिल्हे कानिटकर याजपासून पौष व।। १ शके १७७४ रोजी फरोक्त घेतला त्याज बा। सखाराम गंगाधर पिंपळखरे याजकडून देविले ते पिंपळखरे याचे जमा घराचे नावे

१२।।।-। इमारतीस खर्च चैत्रमास शके १७७५ गणेश कृष्ण बा।

१०।।।=। ओमण वासे बहाल, कवले दीडेरी केली एकेरी होती वगैरे कानिटकर ब।।

२८= कवले एकेरी चाळणावळ व ओमणास थाटे

५५७।.। गणेश कृष्ण लिमये यांचे घराब।। (वर गणेश कृष्णच्या खात्यावर फोड दाखविली त्याप्र।। )

२०९।= वैशाख व।। १४ मा।रनिल्हे गु।। कृष्णाजी बल्लाळ कानिटकर व।। कल्याण याजपासून वैशाख व।। ३० शके १७७३ रामभाऊ ओक वकील, दरखास्त, अखत्यार वगैरे

।।≡।। आषाढ व।। १० (रुजू श्रावण) शके १७७३ घर ताब्यात सरकारातून दिल्हे त्याचा कोन वासा, मोरवीची आटण वगैरे दुरुस्ती खर्च सुतार मजुरी, खिळे वगैरे

१।। वैशाख व।। ४ शके १७७४ घर चाळविले ओमण दुरुस्ती

———

५५४।।·।

१ ज्येष्ठ व।। ११ घर कल्याणचे मा।रनिल्हेचे घेतले आहे ते सारंगधर यास भाड्याने दिले ते साल मजकुरी चाळविले त्यास कौले नवीन ५०० दर २ प्रो।

·।।· आगोटीस घर चाळविले त्याब।।

·।· ओमणास थाटे

१ ओमणास थाटे नेले त्याचे भाड्याब।।

———

५५७।·।

घेतले त्यापो। देणे ते कानिटकर याचे हप्त्यास जमा धरून नावे घर

२०७।= ऐन किंमतीब।। देणे रु. १००१ पो। देणे ते

२ कागदाकरिता वगैरे

———

२०९।=

कानिटकर वंश

राघो — वास्तव्य वेळंदूर
|
नारायण — वास्तव्य वेळंदूर
|
बाळाजी — मूळगाव वेळंदूर वास्तव्य कल्याण
|
★ कृष्णाजी " " " "
|
रामचंद्र " " " "
|
गणेश, वामन " " भिवंडीस स्थायिक
|
(वामन यांचे पुत्र:) विष्णु, शंकर, कृष्णाजी दाजी वकील भिवंडी
|
(कृष्णाजी दाजी यांचे पुत्र:) ३ सुभाष, ४ विश्वास, २ विजय, १ गजानन बी. ई. विद्यासागर ओक यांचे जावई ऊ. शाम
|
अविनाश

★ कृष्णाजी बल्लाळ याजकडून लिमये घरापैकी निम्मा हिस्सा विश्वनाथ बल्लाळ ओक बदलापुरकर यानी विकत घेतला. कृष्णाजी बल्लाळ कानिटकर यांचे कल्याणातील रहाते घर म्हणजे त्याजकडून पिंपळखरे यानी घेतलेले पाराजवळील घर होय.

## [ लेखांक २६३

खा।। राजश्री विश्वनाथ बल्लाळ ओक मु।। बदलापूर शके १७७४।७५ परिधावी नाम संवत्सरे सुमा सलास–खेरीज मु।। खर्च खतावणी खाते चिरंजीव सौ।वती भिकूबाईचे लग्ना ब।। खर्च.

फाल्गुनमास शु।। ७

१ सौ. विहिणीस चुडा भरते समई

२।। श्री त्रिंबकेश्वरास लघुरुद्र नवसाचा करविला त्या ब।।

८=।। शु।। १२ सौ. ठकूताई लग्नास आली त्यास उताराबद्दल जाता व येताचे दिडक्या १०

७ शु।। १२ चि. सौ. भिकूबाईचे लग्न फाल्गुन्न शु।। २ रोजी जाले ते समई प्रातःकाली व रात्रीस कलावंतिणी उभ्या केल्या व पोऱ्याचा तमाशा केला त्या ब।। र।। १२ प्रो। परभारे दौलत ज्यादा ब।। पावले रु. ५ बाकी ते जमा दादा खरकबाण

.।।।. श्रु।। १३ देणे परिटास रासन्हाण्याचे पाय घडया ब।। रोख

.।≡ श्रु।। १४ वधूवस्त्रास मांजर पाट गु।। जयराम गंधारे

१।।।= व।। ७ पेशजी लग्नात नारळ १०० फाटक याजपासून घेतले होते त्याब।। दिल्हे हस्ते वामन रावजी गणपुले नि।। फाटक

५ व।। ८ धर्मादाय देणे विष्णुभट साठे

२।। अग्नि विसेद प्रायेचित

.।. रषभ स्थालिपाकाब।। उदक सोडले ते

१।। संवस्कार लोप प्रायेश्चिते चुडे पावेतो

.।।।. आचार्य दक्षणा.

५

५२० व।। १० हुंडया ब।। देणे गोविंदशास्त्री फाटक यास हस्ते गोविंदशास्त्री साठे व रामभाऊ चोळकर रोख सुर्ती

माहे चैत्रमास

.।. श्रु।।४ लग्नात बोलावणी करावयास विसोबा गोसावी यास सांगितली होती त्याब।।

८८≡।।। श्रु।। ५ पेशजी लग्नात केशवराव फडके याणी साखर, बेदाणा, वेलदोडे, दूध इ. जिन्नस पो। त्याब।। ते जमा मारनिल्हे

१। श्रु।। १३ लग्नात त्रिंबकपंत गोखले यास पाण्याचे वगैरे खटपटीचे कामावर ठेविले त्याब।। रोख दिल्हे रु.

वैशाख मास

.।।।. श्रु।। १५ फाल्गुन श्रु।। ४ रोजी दूध आणविले त्याब।। ते जमा पिंपळखरे

८।।।४ पौषमासी पुण्याहून कापड ×× पो। खर्च जाले ते

२।।।– लुगडे गुलाली पिवळे काठी सौ।।वती बगुमावशी पिंपळखरे यास

२।।।– लुगडे पिवळे काठी गुलाली सौ. ठमाबाई पळनिटकरणीस

।।.।।। व।। १४ चि. सौ. भिकूबाईचे लग्न समई सौ. कोंडुबाई गोखलीस वसईहून आणली त्यास वगैरे उतार खर्च झाला तो.

वा।। १४ सौ. भिकूबाईचे लग्न फाल्गुन शु।। २ जाले ते समयी कल्याणहून जिन्नस आ। त्याब।।

( त्यात ६०० नारळ दर १।।= प्रो गहू, डाळ, द्रोण पत्रावळी ७२५ साखरेचे रुखवत, दूध १८ शेर चहा ० - व फाटक यास भाड्याच्या गाड्या ८ त्याचे रु. ७।।, नळे चंद्रज्योती इ. आहेत.)

१३।।= वा।। १४ फाल्गुन शु।। २ शके १७७४ रोजी लग्न जाले ते समई खर्च जाले ते

१ रुपे चांदी जोडवी व विरवल्यास

१०।।।= पुतळ्या दोन कन्यादान दक्षणेस १ व लग्नसमई गळ्यात बांधावयास १ येकूण वजन .।।।१। दर तोला रु. १८ प्रो.

१।। मणी मंगळसूत्रास वजन अदमासे ०१।। सोने दर तोला १४ प्रो।

१३।।=

पुरवणी खाते किरकोळ

५।≡।।. वा।। १४ वैशाख पेशजी पौष वा।। ८ शके १७७४ रोजी पुण्यास खुद व रामचंद्र बल्लाळ चोळकर असे गेलो त्याब।। वाटखर्च जाताना व येतान भोजन खर्च गाडीचे बैलास वगैरे ता। माघ शु।। ४

शके म।।र रु.

२।।≡।। भोजनखर्च डाळ तांदूळ तूप कणीक वगैरे

।= भोजनखर्च धोंडोपंत बाबा जोशी याजकडे जेवण्याचे नवते सबब डाळ तांदूळ तूप व कणिक व येकादसीचे फराळा ब।। वगैरे पैसे १९ खर्च

०-। पंचांग पैसे ३

०=। सुतळ ००। पैसे ६

०≡।। द्राक्षे व पाने विड्याची वगैरे पैसे १०

·।।· दस्तुरी जाताना व येताना

·।· जोशी याजकडे मुलास खाऊ

।।।= पिंजर ऊदकाड्या इ.

५।≡।।।

१। वा।। १४ सौवतीस कल्याणास प्रसूत होण्याकरिता चैत्रमासी पाठबिली ते समई डोलकर यास

।।।=। उतार वसईचा सौवती

।।।-।। सौ व मातोश्री माणसे कल्याणास पाठविली होती त्यास किरकोळ जिनसा वगैरे खर्च जाले पैसे २९ व सुपारी ०= व किता ०-। येकूण

१३॥= वा। १४ सौा प्रसूत होण्याकरिता कल्याणास पाठविली ती चैत्रमासी मातोश्री बरोबर देऊन पाठविली तेव्हा खर्च जाला तो ता। वैशाख मास ( यात पंचमी व षष्ठीपूजन खर्च व इतर आहे. )

२ सौ. वेणूचा नवस पूर्वी वसईस फेडला त्याब।। गडबोले यांचे खाते वैशाख वा। १४

१ सोावतीस वसईस आणावयास शके १७७४ चे ज्येष्ठ मासी पाठविले ते समयी जिन्नस वगैरे आला

२ कल्याण मुक्कामी शके १७७५ चे वैशाख मासी मातोश्रींचे वि।। खच बाळंतपणात जाला ते.

वा. वि. जोशी दप्तर
श्री. य. न. केळकर यांच्या कृपेने ]

[ **लेखांक २६४**

यादी पाठशाले प्रकर्णी कलमे सुरु इसने अशरीन मयातेन व अलफ सन १८२१ इ. माहे अक्टोबर ऊर्फ मोहरम आश्वीन मास
अध्ययन सांगावयास गुरुजींची नेमणूक केली–

३ वैदिक
  १ ऋग्वेदी विठ्ठलभट फाटक
  २ यजुर्वेदी
    .... आपस्तंभ शाखा महादेवभट
    ... माध्यंदिन मेघःशाम फाटक
७ शास्त्री
  १ वैयाकर्ण
  १ अलंकार नाटक अनंताचार्य
  १ न्याय ...
  १ धर्मशास्त्र ...
  १ ज्योतिष ...
  १ वेदांत–राघवाचार्य
  १ वैद्य
  ———
  ७
———
१०

कलम : १० राघवाचार्य रामानुज थोर विद्वान जाणून पाठशालेत मुख्तसर व विद्यार्थी यावर व शाळेचे इलाकदार याजवर हुकूम करतील.

---

The After Math–1818–1826 by **Dr. R. D. Chowksey M. A. Ph. D. P. 215**– श्री. य. न. केळकर यांचे कृपेने ]

Raghoba Acharya Ramanoje is, from a knowledge of his high acquirements and general character appointed mookhya shastree and principal of the college.

लेखांक ६ पुरवणी पृ. २३२ वरून पुढे चालू

त्याजवरून रामाजीपंत याहीं उत्तर दिल्हे की आमच्या तुमच्या मूलपुरुषाची देशमुखी आहे विसो केशव याणे तुम्हा आम्हासी द्वेषबुधीं धरिली म्हणून तुम्ही आम्हीं नव्हे सारिखे होऊ की काय येसे असोन चिंतो हरी वादास उभे राहिले तर तुम्ही आम्ही मिलोन वाद सांगो येसे बोलिल्यावरी रामाजीपंत यास उत्तर दिल्हे की देशमुखीचे वतन चालिले तरी तुम्हास विपरीत द्वेषबुद्धी विसो केशव याजसारिखी जाली तरीं तुम्हास शब्द कोण लावील त्याजवरून रामाजीपंत मलणकर याही उत्तर दिल्हे कीं सर्वांच्या मूल पुरुषाचे वतन आहे तुम्हास वतनाविसी द्वेशबुधी करू तर आपण माहादोबा वोक याचे पोटचा नव्हे येसा शफत केला त्याजउपरी चौरोजी हरी महादेव वोक मलणकर यासी बराबरी घेऊन मौजे कलबसेस राजश्री सूर्याजीराव चव्हाण कोकणराव देसाई याचे घरी जाऊन त्यास भेटून च्यार गोष्टी सांगोन त्याचे कागदपत्र होतें ते जैगडचा काजी आणऊन सर्व पत्रे वाचून पाहिली सूर्याजीराव हरिपंताजवळ बोलीले की मागे विसो केशव याणी आम्हासीं कजिया करून बहुत हैराण केले यासी तुम्ही अवघे भावबंद आठगावचे येकत्र होऊन आम्हासी पुढे मागे कजिया न करावा येसे वच्यान देणे त्यावरून हरी माहादेव बोलीले कीं आम्हीं आठ गावचे वोक येक वतन सर्वाचे येकाचे वचन दिलियास सर्वासमान आसे म्हणून हरिपंतीं आमचे हाती कोकणराव यासी सेण तुलसीं देवविल्या येसी शफत केलीयावर कोकणराव बोलिले की तुमचे सर्वाचे मूलपुरुशास देशमुखीचे वतन दिवाणात अर्ज करून देवीले आहे. कालपरत्वे आपआपणामध्ये कजिया करून वतनास आपल्या व आमच्या आपाये कराल याजकरिता शफत करविली आहे त्याजवरी हरिपंत व आम्ही श्रावणमासी पुणियासी आलो तेव्हा दुसरे दिवसीं राघो माहादेव व आम्ही व सदाशिव विस्वनाथ सिवनकर येसे मिलोन राजश्रीं गंगाधर नाईक यांचे घरी जाऊन भेट घेतली राघोपंत मलणकर याणी गंगाधर नाईकास सांगितले की देशमुखी

